

नाटके

माक्सिम गोर्की

गोर्की यांना लाभलेल्या प्रबळ गुणाचे, गोर्कींच्या प्रतिभेचे, सर्वांत प्रमुख वैशिष्टच जेव्हा सांगावेसे वाटते, तेव्हा असे आढळते की, ह्या गुणाची प्रत्येक अभिव्यक्ती त्याच त्या खास आंतरिक तेजाने उजळलेली आहे. आम्हाला कलाकार गोर्की माहीत आहेत; तत्त्वज्ञानी गोर्की, क्रांतिकारक गोर्की, मानवतावादी गोर्की, जीवनशिक्षक गोर्की माहीत आहेत. ह्या कुठल्याही क्षेत्राला त्यांच्या फलदायी गुणांनी स्पर्श केला, तरी मानवी विवेकाच्या विजयावरील गोर्कींच्या श्रद्धेचा आंतरिक प्रकाश तेथे पाजळत राहतो. माझ्या मते, विवेकाच्या विजयावरील त्यांची अढळ श्रद्धा, हेच त्यांच्या प्रतिभेचे मुख्य वैशिष्टच होते.

कॉन्स्तान्तिन फेदिन

जीवनावर एवढी श्रद्धा, मानवजातीच्या अस्सल "सुवर्णयुगा"च्या अस्तित्वाबद्दलचा एवढा गाढ विश्वास, दुसऱ्या कुणालाही नव्हता! मात्र त्याचवेळी, जीवनातील शोकांतिकेची आणि काठिण्याची गोर्कीएवढी दुसऱ्या कुणालाही जाण नव्हती.

लेओनिद लेओनोव

नाटकात आवश्यक असलेल्या मूलभूत गोष्टी : ते समयोचित पाहिजे, त्यात कथानक पाहिजे, कृती पाहिजे... ह्या गोष्टी असल्या, तरच आपल्या काळात अत्यावश्यक असलेल्या लढाऊ, ज्वलंत शब्दांमधून ते लोकांच्या प्रत्यक्ष भावना जाग्या करू शकेल...

मा. गोर्की

नामवंत रशियन लेखक, सोविएत साहित्याचे संस्थापक, माक्सिम गोर्की (१८६८-१९३६) यांच्या लेखनकलेचा सर्व जगातील वाचकांना उत्तम परिचय आहे. त्यांची कादंबरी 'आई', आत्मचरित्रात्मक पुस्तक-त्रयी 'बालपण', 'दाही दिशा,' 'माझी विद्यापीठे,' कादंबरीमहाकाव्य 'क्लीम सामगिनचे जीवन,' नाटके, कथा, कला. इ. लेनिन, ल्येव तल्स्तोय, आ. चेखोव ह्यांची साहित्य-चित्रे सातत्याने अनेक परकी भाषांमध्ये प्रसिद्ध होत आहेत.

"माक्सिम गोर्की यांच्या कारकीर्दीचे आणि वैयक्तिक जीवनाचे आश्चर्यकारक वैशिष्ट्य म्हणजे," – सोविएतांच्या देशाचे पहिले शिक्षणमंत्री आनातोली लूनाचार्स्की यांनी लिहिले होते – "त्यांच्या आयुष्याप्रमाणेच त्यांचा सरळ उभ्या रेषेत आलेख जातो: ती अगदी खालून सुरू होते, क्रांतीपूर्वी जसे त्यांचे जीवन आमच्या समाजाच्या अगदी तळागाळातून सुरू झाले त्याप्रमाणे, आणि अशा शिखरापर्यंत पोहोचते, जेथवर जाणे जागतिक इतिहासात फारच थोड्यांना जमलेय.

लेखकाने माघारी ठेवलेल्या प्रचंड नाट्यवारसामधून प्रस्तुत संग्रहात चार नाटके आहेत: गंजलेले घर' 'तळागाळातली माणसे' 'दाचावाले' 'वैरी'





मा‌क्सिम गोर्की

नाटके

गंजलेले घर
तळागाळातली माणसे
दाचावाले
वैरी

रादुगा प्रकाशन
मॉस्को

लोकवाङ्मय गृह प्रा. लि.
मुंबई

अनुवाद – अनिल हवालदार
चित्रे – अ. बेर्दोव

Максим Горький

ПЬЕСЫ

на языке маратхи

M. Gorky

PLAYS

in Marathi

सोविएत संघात मुद्रित

Г $\frac{4702010200-418}{031(05)-86}$ 206-85

ISBN 5-05-000232-x

अनुक्रमणिका

गंजलेले घर



पात्र-परिचय :

बेस्सेमेनोव, वासिली वासिल्येविच – वय ५८, सधन मध्यमवर्गीय, रंगारी संघाचे प्रमुख.

आकूलीना इवानोवना – त्यांची बायको, वय ५२.

प्योत्र – माजी विद्यापीठ-विद्यार्थी, वय २६ } त्यांची
तात्याना – शाळेतील शिक्षिका, वय २८ } मुले

नील – बेस्सेमेनोवनी पाळलेला मुलगा, इंजिन ड्रायव्हर, वय २७.

पेर्चिखिन – बेस्सेमेनोव यांचा दूरचा नातेवाईक, गाणारे पक्षी विकणारा, वय ५०.

पोल्या – त्याची मुलगी, शिंपीण, बेस्सेमेनोव कुटुंबात दिवसा काम करते, वय २१.

येलेना निकोलायेवना क्रीवत्सोवा – जेल-वॉर्डनची विधवा, बेस्सेमेनोव यांची भाडेकरू, वय २४.

तेतेरेव – गायक } बेस्सेमेनोव यांचे आश्रित.
शीश्किन – विद्यार्थी }

त्स्वेतायेवा शिक्षिका, तात्यानाची मैत्रिण, वय २५.

स्तेपानिदा – स्वयंपाकीण.

रस्त्यावरील **एक म्हातारी**.

लहान मुलगा, रंगाऱ्याचा मदतनीस.

डॉक्टर.

एका छोट्या प्रांतिक गावात नाटकातील प्रसंग घडतात.

नेपथ्य

मधन मध्यमवर्गीयाच्या घरातील खोली. रंगभूमीच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात पार्टिशन. त्यामुळे रंगमंचाची मागील बाजू अरुंद बनते आणि उज़व्या बाजूला खाली एक छोटी खोली बनते. मोठ्या खोलीपासून एका मोठ्या लाकडी कमानीने ती वेगळी झालेली आहे. कमानीवर चीटाच्या कापडाचे पडदे. मोठ्या खोलीच्या मागील भितीचे दार प्रवेशदालनाकडे जाते. तो घराचा अर्धा भाग आहे, जेथे स्वयंपाकघर आणि आश्रितांच्या खोल्या आहेत. ह्या दाराच्या डावीकडे काचेच्या भांड्यां-साठी प्रचंड कपाट, कोपऱ्यात पेटी; उजवीकडे – जुने काचेच्या पेटीतील घड्याळ. त्याचा चंद्राच्या आका-राचा लंबक काचेच्या पेटीत सावकाशपणे हेलकावतो. खोलीत शांतता असते तेव्हा त्याची उदास टिकटिक ऐकू येते. डाव्या भिंतीत दोन दारे – एक बेस्सेमेनोव दांपत्याच्या खोलीकडचे आणि दुसरे त्यांचा मुलगा प्योत्र ह्याच्या खोलीकडील. ह्या दोन दारांच्या दरम्यान पांढऱ्या फरशांचा मोठा चुलाणा. मेणकापडाचे आवरण घातलेला जुनाट दिवाण चुलाण्यासमोर आहे आणि त्याच्यापुढे जेवणाचे व चहा पिण्याचे मोठे मेज. भिंतीं-लगत सरळ पाठीच्या स्वस्त खुर्च्या काटेकोर सारख्या अंतराने मांडलेल्या आहेत. रंगमंचाच्या खालच्या डाव्या

कोपऱ्यात काचेचे कपाट – त्यात रंगीबेरंगी खोकी, ईस्टर-ची रंगवलेली अंडी, ब्राँझ शमादानांची एक जोडी, चहा आणि सूपचे चमचे, काही मद्यचषक आणि चांदीचे प्याले. कमानीने वेगळ्या केलेल्या छोट्या खोलीत प्रेक्षकांना सामोरा पियानो, संगीताच्या कागदांना ठेवण्याचे छोटे कप्प्यांचे फडताळ. खोलीच्या एका कोपऱ्यात लाकडी कुंडीत हृदयपर्णी फिलोदेन्ड्रोन झाड. उजव्या भिंतीत दोन खिडक्या. त्यांच्या चौकटीत फुलांच्या कुंड्या. खिडक्यांजवळ एक कोच, कोचाशेजारी भिंतीपुढे एक छोटे मेज.

अंक पहिला

सायंकाळ, सुमारे पाच वाजण्याची वेळ. खिडक्यांमधून शारदीय संधिप्रकाश डोकावतोय. मोठ्या खोलीत जवळ जवळ अंधार. तात्याना कोचावर अर्धवट रेलून पुस्तक वाचतेय. पोल्या मेजापाशी बसून शिवणकाम करतेय.

तात्याना (वाचते): "चंद्र वर आला. एवढासा छोटा आणि उदास चंद्र सबंध पृथ्वीवर एवढ्या स्निग्ध, रुपेरी-निळसर प्रकाशाचा शिडकावा करू शकतो ह्यावर विश्वास ठेवणे कठीण जात होते..." (पुस्तक मांडीवर टाकते.) अंधार झालाय.

पोल्या: दिवा पेटवू?

तात्याना: नको. मला वाचायचा कंटाळा आला...

पोल्या: किती छान लिहिलंय! अगदी साधं... काळजाला भिडतं... रडावंसं वाटतं...

स्तब्धता.

त्याचा शेवट जाणून घ्यायची फार फार इच्छा होतेय. त्यांचं लग्न होतं किंवा नाही?

तात्याना (चिडून): काय फरक पडतो?

पोल्या: मी बाई अशा माणसावर प्रेम केलं नसतं... मुळीच नाही!

तात्याना : कोण ?

पोल्या : तो – लेखक !

तात्याना : तो वारला.

पोल्या : अयाई ! किती वाईट ! खूप पूर्वी वारला ? तरुणपणीच ?

तात्याना : मध्यमवयात. वोदका फार प्यायचा...

पोल्या : बिच्चारा...

स्तब्धता.

हुशार माणसं का बरं दारूच्या नादी लागतात ? हा तुमचा आश्रित, गायक... तसं पाहिलं तर हुशार दिसतो... पण पितो. का बरं असं ?

तात्याना : जगायचा कंटाळा...

प्योत्र (झोपाळू मुद्रा. स्वतःच्या खोलीतून बाहेर येत) : थडग्यातल्याप्रमाणं अंधार आहे इथं. कोण बसलंय तिथं ?

पोल्या : मी... आणि तात्याना वासिल्येवना...

प्योत्र : तुम्ही दिवा का लावत नाही ?

पोल्या : संधिप्रकाशाचा आनंद लुटतोय...

प्योत्र : देवापुढच्या दिव्यातल्या तेलाचा वास म्हाताऱ्याच्या खोलीमधून माझ्या खोलीत झिरपतोय. म्हणूनच मला वाटतं मला स्वप्न पडलं की, कुठल्यातरी नदीत मी पोहतोय आणि पाणी डिंकासारखं चिकट... पोहायला खूप त्रास होतोय... कुठल्या दिशेला पोहत जावं ते मला समजत नाही... नजरेला किनारा दिसत नाही. काही वस्तू माझ्याशेजारून वाहात जातात, पण मी त्यांना पकडताच त्यांचा चुरा होतो... कारण त्या

कुजलेल्या आहेत. विचित्र स्वप्न... (शीळ घालत मागे-पुढे येरझाऱ्या मारतो.) चहाची वेळ झाली बुवा...

पोल्या (दिवा पेटवत) : मी आणत्ये बनवून चहा... (जाते.)

प्योत्र : आपल्या घरात संध्याकाळच्या वेळांना जास्तच उदास आणि भकास वाटतं. ह्या सगळ्या जुनाट वस्तू जणू फुगत जातात, अवजड बनतात आणि श्वास घ्यायलासुद्धा जागा उरत नाही... जीव कसा घुसमटून जातो. (कपाटावर मुठी आपटतो.) हे अगडबंब कोठार अठरा वर्षं एकाच जागी उभं आहे... तब्बल अठरा वर्षं... आयुष्य फार जलद पुढं सरकतं असं म्हणतात... पण हे कपाट एकाच जागी ढिम्म उभं आहे... लहानपणी अनेकदा ह्या कपाटावर माझं कपाळ आदळलंय... आणि आता का कुणास ठाऊक, पण मला त्याची अडगळ वाटते. अगदी वेडपट वस्तू... कपाट नव्हे तर कसलंतरी प्रतीक... सैतान नायनाट करो ह्याचा!

तात्याना : किती रटाळ आहेस रे तू प्योत्र! असा भयानक जगू नको बाबा!

प्योत्र : असा म्हणजे कसा?

तात्याना : कुठं जात नाहीस, फिरत नाहीस... फक्त वरच्या मजल्यावर त्या लेनाकडं... रोज संध्याकाळी. ह्याची म्हाताऱ्यांना फार काळजी वाटतेय...

प्योत्र काही बोलत नाही. नुसता शीळ घालीत येरझाऱ्या मारतो.

आजकाल मला फार थकायला होतं. शाळेतल्या गोंगाटानं आणि बेशिस्तीनं जीव अगदी नकोसा होतो. तर इथं भयाण शांतता आणि कडक शिस्त. मात्र येलेना रहायला आल्यापासून इथल्या वातावरणात जरा उल्हास आलाय. खरंच, मी फार दमून जाते! सुटी लागायला तर अजून खूप अवकाश आहे. नोव्हेंबर... डिसेंबर...

घड्याळात सहा टोल पडतात.

बेस्सेमेनोव (स्वतःच्या खोलीच्या दारातून डोके बाहेर काढत) : सारखी वटवट लावलीय! तक्रारअर्ज लिहून काढला नाही ना अजून?

प्योत्र: लिहिला, लिहिला...

बेस्सेमेनोव: अगदी गळ्याशी येईपर्यंत वेळ काढलास! च् च् च्! (नाहीसा होतो.)

तात्याना: कसला तक्रारअर्ज?

प्योत्र: व्यापारी सीझोव ह्याच्यावर सतरा रूबल पन्नास कोपेकचा दावा करण्याचा – त्याच्या पडवीचं छप्पर रंगवून काढल्याचा खर्च...

आकूलीना इवानोवना (दिव्यासह प्रवेश करते) : बाहेर परत पाऊस पडायला लागलाय. (कपाटापाशी जाते, चहापानाच्या वस्तू बाहेर काढते आणि मेजावर मांडते.) फार गार वाटतंय इथं. तापवलं तरी गारठा आहे. घर जुनं झालं... भेगा खूप पडल्यात जिकडं तिकडं! देवा रे देवा! पोरांनो, तुमचे वडील परत कुरकुरताहेत... पाठ दुखते म्हणतात. त्यांचंही आता

वय झालं ... सगळंच बिनसत चाललंय ... खर्च सारखे वाढताहेत ... त्यांच्या जोडीनं चिंतासुद्धा !

तात्याना (भावाला उद्देशून) : काल रात्री तू लेनाकडं बसला होतास ?

प्योत्र : हो ...

तात्याना : खूप मजा आली ?

प्योत्र : नेहमीप्रमाणं ... चहा प्यायलो, गाणी गायली ... वाद घातले ...

तात्याना : कुणी कुणाशी वाद घातले ?

प्योत्र : मी ... नीलशी आणि शीश्किनशी.

तात्याना : स्वाभाविक आहे.

प्योत्र : होय. नील अगदी उत्तेजित होऊन आयुष्याबाबत बोलत होता. मला अगदी असह्य होतो तो ! धैर्याचा मेरूमणी आणि जीवनप्रेमी ! मूर्खपणा. त्याचं बोलणं ऐकायला लागलं म्हणजे असं भासतं की, कुणालाही ज्ञात नसलेलं आपलं हे आयुष्य म्हणजे तो अमेरिकन अंकल सॅम आहे ... कोणत्याही क्षणी टपकेल आणि तुझ्यावर अनुग्रहांचा पाऊस पाडील. शीश्किननं दुधाचे फायदे आणि तंबाखूचे तोटे ह्या विषयावर प्रवचन झोडलं. मी भांडवलदारी विचारसरणीचा आहे असा त्यानं माझ्यावर आरोप केला.

तात्याना : सगळं नेहमीचंच ...

प्योत्र : होय, अगदी नेहमीचंच.

तात्याना : तुला ... येलेना खूप आवडते ?

प्योत्र : काही वाईट नाही ... ती आनंदी आहे ... आकर्षक आहे.

आकूलीना : चंचल आहे! आयुष्याला काही अर्थ नाही तिच्या! रोज संध्याकाळी तिच्याकडं पाहुणे – खाणं-पिणं, गाणं आणि नाचणं. पण तोंड धुण्यासाठी बेसिन विकत घेणं मात्र जमत नाही तिला! तसराळ्यात पाणी घेते आणि सगळ्या घरभर पाण्याचं शिंपण! फळ्या कुजायला लागल्यात...

तात्याना : मी काल संध्याकाळी क्लबात गेले होते. सोमोव होते तिथं... नगरमंडळाचे सभासद आणि आमच्या शाळेचे आश्रयदाते. माझ्याकडं पाहून ओळखी-दाखल नुसती मान हलवली त्यांनी. पण जज्ज रोमानोव यांची रखेली तिथं येताच धावले तात्काळ तिच्यापाशी. जणू काही ती गव्हर्नरांची बायको असावी, तसे. तिच्यापुढे झुकले काय, तिच्या हाताची चुंबनं काय घेतली...

आकूलीना : कसला निर्लज्ज माणूस! नेक पोरीचा हात धरून सगळ्यांसमोरून मिरवत जाण्याऐवजी हे कसले भलते थेर?

तात्याना : (भावाला उद्देशून) : जरा तू विचार कर! ह्या लोकांच्या नजरेत शाळामास्तरणीपेक्षा छचोर, रंगरंगोटी केलेली बाई मोठी ठरते...

प्योत्र : असल्या माणसांकडं लक्ष देऊ नये. आपण स्वत:ला वरच्या पातळीवर राखावं... ती बाई छचोर आहे थोडी, पण रंगरंगोटी मात्र करत नाही हं!

आकूलीना : तुला काय ठाऊक? तिचे गाल चाटून पाहिलेस काय? तुझ्या बहिणीचा अपमान झाला आणि

त्या अपमानाला कारण ठरलेल्या बाईची तू वकीली करतोस ?

प्योत्र : आई , तसं नव्हे ...

तात्याना : छे: बाई ! आईसमोर काही बोलण्याची सोय नाही !

बाहेरच्या हॉलमध्ये पावलांचा दणदण आवाज .

आकूलीना : तर , तर ! आली वस्सदिशी अंगावर ... अरे प्योत्र , नुसत्या येरझाऱ्या मारण्यापेक्षा समोवार उचलून आणलास तर बरं होईल ... ती स्तेपानिदा मारखी कुरकुरतेय ... उचलायला जड जातो म्हणून !

स्तेपानिदा (समोवार धरून कशीबशी मेजापाशी आणून खाली ठेवते आणि ताठ उभी रहात , धापा टाकत मालकिणीला उद्देशून म्हणते) : तुम्हाला आवडो वा नावडो , पण मी परत एकदा सांगत्ये – असलं भारी वजन माझ्याच्यानं इत:पर उचलायला जमणार नाही . पाय तुटतात ओझ्याखाली .

आकूलीना : ह्या कामासाठी खास माणूस नेमा असं सांगायचंय का तुला ?

स्तेपानिदा : काय वाट्टेल ते करा ! खुशाल तो गाणारा हे काम करूं दे – काय धाड भरलीय त्याला ? प्योत्र वासिल्यिच – हा समोवार मेजावरती उचलून ठेवा जरा ! माझ्यात बळ उरलं नाही बाई !

प्योत्र (समोवार उचलत) : ठीक आहे . उप्प ... हा ! (ठेवतो .)

स्तेपानिदा : उपकार झाले बघा ! (जाते .)

आकूलीना : खरंच , पेत्या , त्या गाणाऱ्याला सांग ,

म्हणावं रोज तेवढा समोवार उचलून इथं आणून ठेवत जा ! बरोबर ना ...

तात्याना (उसासत) : अरे देवा ...

प्योत्र : आणखी त्याला असंही सांगू का – पाणी भरून ठेव, फरशा धुवून काढ, धुरांडी स्वच्छ कर आणि कपडेही धू ?

आकूलीना (तुच्छतेने हात झटकत) : काय फालतू बोलतोस ! ही सगळी कामं व्यवस्थित आणि त्याच्या मदतीविना पार पडताहेत. पण समोवार उचलून आणा-यचं ...

प्योत्र : आईसाहेब ! समोवार कुणी उचलून आणायचा हा महत्त्वाचा प्रश्न रोज संध्याकाळी तुम्ही उपस्थित करता. आणि विश्वास ठेवा, जोवर एक हरकामी नोकर तुम्ही ठेवत नाही, तोवर ह्या प्रश्नाचा निकाल लागत नाही.

आकूलीना : कशाला हवा आणखी नोकर ? तुमचे वडील स्वतः अंगण झाडून काढतात.

प्योत्र : ह्याला म्हणतात कंजूसपणा. आणि बँकेत भरपूर पुंजी असताना असा कंजूसपणा करणं चांगलं मानत नाहीत.

आकूलीना : शूः ! जीभ आवर ! तुझ्या वडलांनी जर ऐकलं, तर बँकेचा इंगा दाखवतील तुला ! बँकेत पैसे तू ठेवलेस का ?

प्योत्र : ऐका !

तात्याना (झटदिशी उठत) : प्योत्र, निदान तू तरी गप्प बैस ! मला आता आणखी क्षणभरही हे

सहन होणार नाही!

प्योत्र (तिच्यापाशी जात) : उगीच ओरडू नको! ह्या भानगडीत माणूस नकळत ओढला जातो.

आकूलीना : लागलात कण्हायला! आईनं एक शब्द उच्चारायची सोय नाही...

प्योत्र : दिवसांमागून दिवस... एकच गोष्ट! सगळा उत्साहच मावळून जातो माणसाचा. जणू काजळी धरल्यासारखं वाटतं... किंवा गंज चढल्यासारखं.

आकूलीना (स्वतःच्या खोलीच्या दाराशी जाऊन ओरडते) : अहो, चहा प्यायला या.

प्योत्र : विद्यापीठात शिकायला परत जायची माझी वेळ भरली म्हणजे मी मॉस्कोला निघून जाईन आणि इथं एका आठवड्यापेक्षा जास्त काळ रहायला कधीही येणार नाही. विद्यापीठातल्या तीन वर्षांच्या आयुष्यात माझी घराची सवय सुटलीय! ह्या सगळ्या फालतू चिंता आणि मध्यमवर्गीय पीडा मी विसरून गेलोय! एकट्यानं राहणं छान – आई-बापांच्या छपराखाली नको!

तात्याना : मला जायला कुठंच जागा नाही...

प्योत्र : मी तुला सांगितलं – इथून जा आणि एखादा कोर्स कर!

तात्याना : कशाला हवाय कोर्स? मला जगायचंय... जगायची इच्छा आहे मला... शिकायची नाही! समजलं?

आकूलीना (समोवारवरून चहाची किटली उतरवताना हात पोळल्यामुळे ओरडते) : आई ग! नायनाट होवो तुझा!

तात्याना (भावाला उद्देशून) : आणि जगायचं म्हणजे काय करायचं, हे मला ठाऊक नाही. त्याबद्दल कल्पना करायलासुद्धा जमत नाही. कसं बरं मी जगायला हवं?

प्योत्र (उदासपणे) : खरंच, हुशारीनं जगलं पाहिजे ... सावधपणं ...

बेस्सेमेनोव (स्वतःच्या खोलीतून बाहेर येतात, मुलांवर एक नजर टाकतात आणि मेजापाशी बसतात) : आश्रितांना हाक मारलीत?

आकूलीना : पेत्या, बोलाव बाबा त्यांना ...

प्योत्र जातो. तात्याना मेजापाशी येते.

बेस्सेमेनोव : परत खडीसाखर विकत घेतलीत? किती वेळा मी सांगितलं ...

तात्याना : काय फरक पडतो, बाबासाहेब?

बेस्सेमेनोव : मी तुझ्याशी नव्हे, तुझ्या आईशी बोलतोय. मला माहीत आहे, तुला काहीच फरक पडत नाही ...

आकूलीना : अहो, फक्त एक पौंड विकत घेतली. आख्खा खडा आहे, फोडायला तेवढी सवड नाही मिळाली. रागावू नका!

बेस्सेमेनोव : मी रागवत नाही ... मी म्हणतो – खडीसाखर फार जड असते आणि अगोड असते. म्हणून तोटयाची ठरते. साखरेचा नेहमी आख्खा खडा विकत घ्यावा आणि स्वतःच फोडावा. त्यावेळी जो चुरा पडतो, तो चुरा स्वयंपाकात वापरता येतो. प्रत्यक्ष साखर हलकी आणि खूप गोड असते ... (मुलीला

उद्देशून.) तू उसासे टाकत चेहरा लांब करून का बसली आहेस?

तात्याना: तसं काही विशेष नाही... उगीचच.

बेस्सेमेनोव: काही विशेष घडलं नाही, तर उगीचच उसासे कशाला टाकतेस? किंवा बापाचे शब्द ऐकायला तुला त्रास होतो? आमच्या स्वतःसाठी नव्हे, तर तुम्हा तरुणांच्या हितासाठीच बोलतोय. आम्ही आमचं आयुष्य जगून घेतलंय – तुम्हाला अजून जगायचंय. पण जेव्हा तुमच्याकडं पाहतो तेव्हा समजेनासं होतं – ह्या जगात तुम्ही कसं निभावून नेणार कुणास ठाऊक? काय तुमचा जगण्यामागचा हेतू? आमची जगण्याची रीत तुम्हाला आवडत नाही हे तर आम्ही पाहतोय, आम्हाला ते जाणवतंय... पण तुम्ही स्वतःची कोणती रीत ठरवलीय? प्रश्न हाच आहे.

तात्याना: बाबासाहेब! किती वेळा ही गोष्ट तुम्ही माझ्याशी बोलला आहात याचा जरा विचार कराल?

बेस्सेमेनोव: आणखी बोलीन, अखंड बोलीन, थडग्यात जाईपर्यंत बोलत राहीन! कारण माझ्या आयुष्यात मला शांतता नाही. तुमच्याबद्दल चिंता वाटते. तुम्हाला शिक्षण देण्यात मी फार मोठी चूक केली. प्योत्रला विद्यापीठातून हाकलून लावलंय – आणि तू प्रौढ कुमारिका म्हणून बसली आहेस!

तात्याना: मी काम करत्येय... मी...

बेस्सेमेनोव: ऐकलं. ह्या कामापासून कुणाचा फायदा? तुझे पंचवीस रूबल – कुणालाही त्यांची गरज नाही. खुद्द तुलासुद्धा. लग्न कर, रीतीनं आयुष्य

जगायला लाग – मी स्वत: तुला दरमहा पन्नास देत जाईन.

आकूलीना (बाप-लेकीचा वरील संवाद चालू असताना खुर्चीत सतत चुळबुळत राहते, काहीतरी बोलण्याचा अनेकदा यत्न करते आणि सरतेशेवटी प्रेमळपणे विचारते) : अहो, तुम्हाला वात्रूश्की * हवीत का? दुपारच्या जेवणातून शिल्लक उरलीत... अं?

बेस्सेमेनोव (तिच्याकडे वळून करड्या नजरेने पाहतो, मग दाढीतल्या दाढीत स्मित करून म्हणतो) : ठीक आहे, आण तुझ्या वात्रूश्की... आण – ह्यँ, ह्यँ!

आकूलीना लगबगीने कपाटाकडे जाते आणि बेस्सेमेनोव मुलीला उद्देशून बोलतो.

पाहिलंस, जशी हंसी आपल्या पिलांचा कुत्र्यांपासून बचाव करते, तशी तुमची आई तुमचा माझ्यापासून बचाव करते. मी काहीतरी बोलून तुमच्या भावना दुखावेन, म्हणून तिच्या सर्वांगाचा नुसता थरकाप होतोय. अरे वा, पारधीबुवा! इतक्या दिवसांनंतर आज उगवलात!

पेर्चिखिन (दारात अवतरतो. त्याच्या पाठी पोल्या मुकाट उभी) : ह्या सगळ्या घराला, पांढऱ्या केसांच्या यजमानाला, सुंदर यजमानीणीला, त्यांच्या लाडक्या मुलांना – सदैव शांती लाभो!

बेस्सेमेनोव : तू परत दारू प्यायला लागलास?

---

* रशियन खाद्यपदार्थ, चीझ केक – अनु.

पेर्चिखिन : दुःख बुडवून टाकायला !

बेस्सेमेनोव : कसलं दुःख ?

पेर्चिखिन (बोलताना प्रत्येकाला वाकून अभिवादन करतो) : आज सोनेरी फिंच विकला ... तीन वर्षं पक्षी माझ्यापाशी होता ... फार छान लकेरी मारत गायचा – विकला ! नीच कृत्य केलं असं मनाला वाटलं आणि मनाची रूखरूख दारूत बुडवली. वाईट वाटलं पक्ष्याबद्दल ... सवय झाली होती ... त्याचा लळा लागला होता ...

पोल्या स्मित करते आणि बापाकडे पाहून मान डोलावते .

बेस्सेमेनोव : मग विकला कशाला पक्षी ?

पेर्चिखिन (मेजाभोवती फिरत वाट काढताना खुर्च्यांच्या पाठींना धरतो) : किंमत चांगली मिळाली.

आकूलीना : पैशाची तुला काय किंमत ? खुशाल उधळून टाकतोस.

पेर्चिखिन (खाली बसत) : खरं आहे तुमचं ! माझ्या हातात पैसा ठरत नाही एवढं खरं !

बेस्सेमेनोव : म्हणजे विकण्याचं पुन्हा एकदा काही एक कारण नव्हतं.

पेर्चिखिन : होतं कारण. पक्षी आंधळा व्हायला लागला होता. लौकरच मेला असता.

बेस्सेमेनोव (गालातल्या गालात हसत) : तू काही तसा मूर्ख नाहीस.

पेर्चिखिन : मी ही गोष्ट अकलेनं केली असं वाटतं ?

मुळीच नाही. माझ्या स्वभावातल्या हलकटपणापायी मी तसा वागलो.

प्योत्र आणि तेतेरेव प्रवेशतात.

तात्याना : आणि नील कुठाय?

प्योत्र : शीश्किनबरोबर तालमीला गेला.

बेस्सेमेनोव : कुठं करणार आहेत नाटकाचा खेळ?

प्योत्र : घोडशाळेत. सैनिकांपुढं.

पेर्चिखिन (तेतेरेवला उद्देशून) : देवाच्या भाटाला माझा नमस्कार. पक्षी धरायला येतोस का माझ्याबरोबर?

तेतेरेव : येतो. केव्हा?

पेर्चिखिन : उद्या.

तेतेरेव : नाही जमणार. मर्तिकाच्या ठिकाणी गायला जायचंय.

पेर्चिखिन : चर्चमधल्या पूजेआधी?

तेतेरेव : ठीक आहे. मला बोलाव. आकूलीना इवानोवना! दुपारच्या जेवणातलं काही शिल्लक राहिलंय का? पेज किंवा तसंच काहीतरी?

आकूलीना : आहे, आहे. पोल्या, आण बाई...

पोल्या जाते.

तेतेरेव : मनापासून धन्यवाद. तुम्हाला माहीतच आहे की, आज एका मर्तिकापायी आणि एका लग्नापायी माझं जेवण हुकलं.

आकूलीना : माहीत आहे, माहीत आहे.

प्योत्र चहाचा ग्लास उचलतो आणि कमानीतून छोटया

खोलीत जातो. त्याचे वडील त्याच्याकडे भेदक नजरेने पाहतात आणि तेतेरेव शत्रुत्वाच्या नजरेने पाहतो. काही सेकंद सगळेजण मुकाटपणे खात-पीत राहतात.

बेस्सेमेनोव : ह्या महिन्यात तू चांगली कमाई करतो आहेस तेरेन्ती ख्रिसान्फोविच. रोज कुणी ना कुणी मरतंय.

तेतेरेव : चाललंय... सध्या भाग्यरेषा उमटलीय.

बेस्सेमेनोव : आणि लग्नं सारखी होताहेत.

तेतेरेव : खरंच, लग्नांचा धूमधडाका उडालाय.

बेस्सेमेनोव : आता चार पैसे जमव आणि मग स्वत: लग्न कर.

तेतेरेव : लग्न करावंसं वाटत नाही.

तात्याना भावाकडे निघून जाते आणि त्या दोघांची हलक्या आवाजात कुजबूज सुरू होते.

पेर्चिखिन : नको करू लग्न! अजिबात नको!! आमच्या बंधूसारख्या वल्लींनी लग्न करणं ठीक नाही. त्यापेक्षा बुलफिंच पक्षी धरायला जाणं उत्तम!

तेतेरेव : एकदम कबूल!

पेर्चिखिन : मोठा छान उद्योग आहे – बुलफिंच धरायचा! पहिली हिमवृष्टी नुकती झालीय आणि ईस्टरच्या पाद्र्याप्रमाणं धरती पांढरा पोषाख ल्यायलीय... सगळीकडं स्वच्छ, चकचकीत आणि शांत शांत... विशेषकरून ऊन पडलं असलं तर वाहव्वाच! मन आनंदानं गाणी म्हणत असतं! झाडांवर अजून शरदातली पिवळी पानं चमकत असतात, फांद्यांना बर्फाचा रुपेरी मुलामा

चढलेला असतो. अशा सुंदरतेत अचानक आकाशामधून चक-चकीत लाल पक्ष्यांचा थवा भिरभिरत येतो आणि पॉपीच्या फुलांसारखा फांद्यांवर लटकतो. चिव्! चिव्! चिव्! गुबगुबीत छोटुकले पक्षी सेनापतींच्या थाटात फिरू लागतात. टुणटुण उड्या मारतात, कलकलाट करतात. मन प्रसन्न होतं! स्वतःच बुलफिंच व्हावं आणि त्या पक्ष्यांबरोबर बर्फात हुंदडावं अशी जोरदार इच्छा होते...

बेस्सेमेनोव : मूर्ख पक्षी आहे, बुलफिंच.

पेर्चिखिन : मी स्वतःच मूर्ख आहे.

तेतेरेव : छान चित्र रंगवलं.

आकूलीना (पेर्चिखिनला उद्देशून) : लहान बाळ आहेस तू...

पेर्चिखिन : पक्षी धरायला फार आवडतं! गाणाऱ्या पक्ष्यांपेक्षा अधिक सुंदर ह्या जगात काय आहे?

बेस्सेमेनोव : पण पक्षी धरणं पाप आहे. ठाऊक आहे?

पेर्चिखिन : ठाऊक आहे. पण आवडतं त्याला काय करणार? त्याशिवाय मला दुसरं काहीही करता येत नाही. कोणतंही काम आवडीचं असलं तर जास्त चांगलं वठतं, असं मला वाटतं.

बेस्सेमेनोव : कोणतंही काम?

पेर्चिखिन : कोणतंही!

बेस्सेमेनोव : आणि दुसऱ्यांच्या वस्तू स्वतःच्या खिशात टाकायचं काम आवडत असेल तर?

पेर्चिखिन : त्याला काम म्हणत नाहीत, चोरी म्हण-तात.

बेस्सेमेनोव : हं... असेल बुवा!

आकूलीना (जांभई देत): ओ-हो-हो! कंटाळा आला बाई! संध्याकाळच्या वेळांना नेहमी फार कंटाळ-वाणं वाटतं. तेरेन्ती ख्रिसान्फोविच, निदान तू तुझं गिटार आणून गाणी म्हटलीस तर बरं होईल.

तेतेरेव (थंडपणे): माननीय आकूलीना इवानोवना, तुमच्याकडं राहण्याच्या बदल्यात मी तुमचं मनोरंजन करण्याचा मक्ता घेतलेला नाही.

आकूलीना (न उमजून): काय म्हणालास?

तेतेरेव : जे ऐकलंत तेच!

बेस्सेमेनोव (चकित आणि प्रक्षुब्ध होऊन): तेरेन्ती ख्रिसान्फोविच, तुला मी समजूच शकत नाही. माणूस म्हणून तू... माफ कर स्पष्ट बोलल्याबद्दल... कवडी किंमतीचा आहेस... पण तुझा दिमाख मात्र एखाद्या उमरावाचा! कुठून आला?

तेतेरेव (थंडपणे): जन्मतःच मी असा आहे.

बेस्सेमेनोव : एवढा कशाचा गर्व करतोस? कृपा करून सांगशील का मला?

आकूलीना : उगीच आव आणतो. कसला गर्व करणार तो?

तात्याना : आई!

आकूलीना (दचकून): आं? काय झालं?

तात्याना संतापाने मान झटकते.

परत मी भलतंच काही बोलून गेले? छे:! आता तोंडाला कुलूप लावूनच बसत्ये! देव तुमचे रक्षण करो!

बेस्सेमेनोव (अपमानीत स्वरात) : तू जरा तोंड सांभाळून बोलत जा ग ! इथं आपण सुशिक्षित लोकांमध्ये राहतो. शिक्षणाच्या आधारावर कशावरही आणि कुणावरही टीका करण्याचा त्यांना अधिकार आहे. पण मी आणि तू म्हातारी, मूर्ख माणसं...

आकूलीना (तडजोडीच्या स्वरात) : खरंच ! अर्थातच... त्यांना जास्त समजतं.

पेर्चिखिन : बंधू, तू हे अगदी योग्य बोललास. तू थट्टेत म्हणालास, पण खरं बोललास.

बेस्सेमेनोव : मी थट्टेत मुळीच बोललो नाही...

पेर्चिखिन : थांब ! म्हातारी माणसं खरंच मूर्ख असतात.

बेस्सेमेनोव : विशेषतः तुला पाहिल्यावर तर खात्री पटते !

पेर्चिखिन : मला जमेला धरूच नका. पण खरं सांगतो, म्हातारी माणसं नसती, तर मूर्खपणाही नसता. ओलं झाड जळतं तसं म्हातारं माणूस विचार करत असतं – आगीपेक्षा धूरच जास्त.

तेतेरेव : (स्मित करत) : मी सहमत आहे.

पोल्या प्रेमळपणे बापाकडे पाहते आणि त्याच्या खांद्यावरून हात फिरवते.

बेस्सेमेनोव (धुमसत) : असं, असं ! उधळ आणखी मुक्ताफळं !

प्योत्र आणि तात्याना कुजबुजायचे थांबतात व पेर्चिखिनकडे सस्मित मुद्रांनी पाहतात.

पेर्चिखिन (उत्साहाने बडबडतो) : म्हातारी माणसं मुख्यत: फार हट्टी असतात! म्हाताऱ्याला समजतं की, त्याचं चुकलंय आणि काहीही समजत नाही हे त्याला जाणवतंय, पण हे कबूल करणं मात्र त्याला जमत नाही. फाजील अभिमान! इतकी वर्षं जगलो, चाळीस विजारी वापरल्या आणि तरीही काहीसुद्धा माहीत नाही असं कसं होईल? अपमान वाटतो! म्हणून तो मुठी आपटून सांगतो – 'मी म्हातारा, तेव्हा माझंच खरं!' पण उपयोग काय? बुद्धी तर नाठी त्याची! तरुणांची मनं तल्लख आणि चपळ असतात.

बेस्सेमेनोव (मग्रूरपणे) तुझ्या थापा पुष्कळ झाल्या. तू मला एक सांग: जर आम्ही मूर्ख असलो, तर मग आम्हाला शहाणपण शिकवायला नको?

पेर्चिखिन : काय उपयोग? दगडावर गोळ्या झाडल्या तर गोळ्याच चपट्या होतात!

बेस्सेमेनोव : थांब – मला मध्येच अडवूं नको! मी तुझ्यापेक्षा वयानं वडील आहे. मी म्हणतो: तल्लख आणि चपळ मनाची माणसं आम्हा म्हाताऱ्यांपासून लांब कोपऱ्यांमध्ये का पळतात, तोंडं वाकडी का करतात आणि आमच्याशी बोलत का नाहीत? तू विचार कर ह्यावर. आणि मीसुद्धा विचार करीन. कारण ह्या तुमच्या घोळक्यात मी मूर्ख ठरलो आहे... (खुर्ची जोराने आवाज करत मागे ढकलतो, स्वत:च्या खोलीच्या दाराशी जातो आणि बोलतो) ...माझ्या सुशिक्षित मुलांच्या दृष्टीनं...

स्तब्धता.

पेर्चिखिन (प्योत्र आणि तात्यानाला) : पोरांनो! तुम्ही म्हाताऱ्याला कशाला दुखवलं?

पोल्या (स्मित करत) : तूच त्यांना दुखवलंस...

पेर्चिखिन : मी? आयुष्यात कधी कुणाला दुखवलं नाही मी!

आकूलीना : देवा रे देवा! काय आमचं बिनसलंय समजत नाही! म्हाताऱ्याला कशाला दुखवलंत? सगळेच गाल फुगवून, सगळेच असंतोषी! त्यांना आता म्हातारपणी शांतता हवी... त्यांचा मान राखायला हवा! काही झालं तरी तुमचे वडील आहेत!.. जात्ये मी त्यांच्यापाशी. पालागेया, तू भांडी स्वच्छ कर.

तात्याना (मेजापाशी येत) : कशाबद्दल बाबा आमच्यावर नाराज झाले?

आकूलीना (दारात) : कारण तू नेहमी त्यांच्यापासून दूर पळत राहतेस, हुशार पोरी!

पोल्या भांडी विसळत असते तेव्हा तेतेरेव मेजावर हातांचे कोपर टेकवून धुंद नजरेने तिच्याकडे एकटक पहात राहतो. पेर्चिखिन प्योत्रपाशी जातो आणि छोटचा मेजावर बसतो. तात्याना सावकाशपणे स्वतःच्या खोलीत जाते.

पोल्या (तेतेरेवला) : माझ्याकडं काय बघताय... अशा नजरेनं?

तेतेरेव : सहज!

पेर्चिखिन : कसला विचार करतोस पेत्या?

प्योत्र : कुठं निघून जावं ह्याचा.

पेर्चिखिन : खूप दिवसांपासून तुला विचारायचं म्हणतोय : सांडपाणी-व्यवस्था म्हणजे काय?

प्योत्र : कशाला हवंय तुला? तुला समजून सांगायचं ठरवलं तर फार वेळ लागेल. लांबलचक... कंटाळवाणं...

पेर्चिखिन : पण तुला स्वत:ला तरी ते सगळं ठाऊक आहे का?

प्योत्र : ठाऊक आहे.

पेर्चिखिन (प्योत्रकडे अविश्वासाच्या नजरेने पहात): हं...

पोल्या : नील वासिल्येविच अजून का बरं येत नाहीत? खूप उशीर झाला.

तेतेरेव : तुमचे डोळे किती छान आहेत!

पोल्या : काल तुम्ही मला हे सांगितलंत.

तेतेरेव : आणि उद्यासुद्धा हेच सांगीन.

पोल्या : कशाला?

तेतेरेव : माहीत नाही. मी तुमच्यावर आषक झालोय असा कदाचित तुमचा समज झाला असेल ना?

पोल्या : देवा रे! माझा कसलाही समज झालेला नाही.

तेतेरेव : कसलाही नाही? अरेरे! विचार करायचा प्रयत्न करा.

पोल्या : कशाचा?

तेतेरेव : कशाचाही! उदाहरणार्थ, माझी ब्याद तुमच्या पाठी का लागते ह्याचा? विचार करा आणि सांगा मला.

पोल्या : काय चमत्कारिक आहात हो!

तेतेरेव : माहीत आहे – तुम्ही मला हे आधीच सांगितलंय. मीसुद्धा तुम्हाला परत सांगतो – इथून निघून जा! ह्या घरात तुम्ही राहणं इष्ट नाही... निघून जा!

प्योत्र : तुमचा प्रेमप्रसंग चाललाय का? मी इथून जाऊ का?

तेतेरेव : नाही, नाही. उगीच तसदी घेऊ नका. मी तुम्हाला निर्जीव वस्तूंमधली एक समजतो.

प्योत्र : फारशी हुशारी नाही!

पोल्या (तेतेरेवला) : किती भांडखोर आहात हो!

तेतेरेव एका बाजूला जातो आणि प्योत्र व पेर्चिखिन यांच्यातील संभाषण लक्षपूर्वक ऐकू लागतो.

तात्याना : (अंगाभोवती शाल गुंडाळून घेतलेली स्वतःच्या खोलीतून बाहेर येते आणि पियानोपाशी बसते. स्वरलिपी चाळताना) : नील अजून आला नाही?

पोल्या : नाही.

पेर्चिखिन : फार उदास वाटतं इथं! पेत्या, तुला आणखी एक गोष्ट विचारायचीय : अलिकडंच मी पेपरात वाचलं की, इंग्रजांनी उडती जहाजं बांधलीत. दिसतं तर सर्वसामान्य जहाजासारखं, पण त्यात बसलं आणि एक खास बटण दाबलं... सूं ऽ ऽ! पक्ष्याप्रमाणं ढगांपर्यंत वर उडत जातं आणि माणसाला पुढं कुठं नेतं कोण जाणे... बरीच इंग्रज माणसं अशा रीतीनं गायब झाली म्हणतात. हे खरं आहे, पेत्या?

प्योत्र : फालतूपणा सगळा !

पेर्चिखिन : पण पेपरात छापून आलं होतं !

प्योत्र : अशा खूप फालतू गोष्टी छापतात !

पेर्चिखिन : खरंच ?

तात्याना काहीतरी हळुवार आणि करुण संगीत वाजवते.

प्योत्र (चिडखोरपणे) : मग मी काय खोटं सांगतोय ?

पेर्चिखिन : रागावू नकोस रे बाबा. तुम्ही सगळी तरुण माणसं आम्हा म्हाताऱ्यांवर एवढे चिडून का असता ? साधं आमच्याशी बोलण्याचीसुद्धा इच्छा नसते तुमची ! हे चांगलं नाही.

प्योत्र : पुढं काय ?

पेर्चिखिन : पुढं मला असं दिसतंय की, मला इथून गेलं पाहिजे. माझा कंटाळा आला तुला ! पोल्या, तू घरी लौकरच जाणार आहेस ?

पोल्या : एवढं आवरून झालं की निघालेच. (खोलीतून निघून जाते. तेतेरेवची नजर तिचा पाठलाग करते.)

पेर्चिखिन : आपण दोघं मिळून पक्षी कसे धरत होतो ते विसरलास काय पेत्या ? त्या काळात माझ्यावर माया होती तुझी !

प्योत्र : आत्तासुद्धा मी ...

पेर्चिखिन : पाहतोय, जाणवतंय ... आत्ता तू कसा आहेस !

प्योत्र : त्या काळी मला सुंठीची बिस्कीटं आणि लॉलीपॉप आवडत. पण आता त्या वस्तू तोंडात घालवत नाहीत.

पेर्चिखिन : समजतं ... तेरेन्तीबुवा ! बीयर प्यायला चलणार ?

तेतेरेव : माझी मन:स्थिती ठीक नाही .

पेर्चिखिन : तर मग मी एकटाच जातो . गुत्त्यात सगळे मजेत असतात . तिथं सारा थेट मामला . इथं माणूस घुसमटून मरेल ! आणि हे काही तुमचं कौतुक म्हणून बोलत नाही ! तुम्ही काहीही करत नाही ... तुम्हाला कसलाही छंद नाही . पत्ते खेळू या ? आपण नेमके चौघं आहोत !

तेतेरेव पेर्चिखिनकडे पाहतो व स्मित करतो .

इच्छा नाही ? असो ... जशी तुमची मर्जी . अच्छा , जातो मी . (तेतेरेवपाशी जाऊन हातवाऱ्यांनी दारू पिण्याच्या खुणा करतो .) चलणार ?

तेतेरेव : नाही .

निराशेने हात झटकत पेर्चिखिन जातो . काही सेकंद शांतता . तात्याना हलक्या सुरात पियानो वाजविते . कोचावर आडवा झालेला प्योत्र गीत ऐकतोय आणि शीळेवर स्वर वाजवतोय . तेतेरेव उठतो आणि येरझाऱ्या घालू लागतो . बाहेर हॉलमध्ये बादली अथवा समोवारचा नळ जोरात खाली पडल्याचा आवाज होतो व पाठोपाठ स्तेपानिदाचे बोलणे ऐकू येते : "कुणी तुला इथं आणलं ?"

तात्याना (वाजवणे न थांबवता) : नीलला एवढा उशीर का बरं झाला यायला ?

प्योत्र : कुणीच येत नाहीय् !

तात्याना : तू येलेनाची वाट पाहतोस ?

प्योत्र : कुणीतरी यावं ...

तेतेरेव : तुमच्याकडं कुणीही येणार नाही.

तात्याना : नेहमी असे विकृत का तुम्ही ?

तेतेरेव : कुणीही तुमच्याकडं येणार नाही, कारण तुमच्यापाशी कुणाला देण्यासारखं काहीही नाही.

प्योत्र : इति तेरेन्ती बगास्लोवस्की उवाच !

तेतेरेव (आग्रहपूर्वक) : तुमच्या ध्यानात येतंय का... तो झिंगलेला, थेरडा पारधी... त्याचा देह आणि त्याचं मन थडथडीत जिवंत आहे. पण तुम्ही दोघं जणू आयुष्याच्या अखेरी उभे आहात – अर्धवट मेलेल्या अवस्थेत ?

प्योत्र : आणि तुम्ही ? तुमचं स्वतःबद्दल काय मत आहे ?

तात्याना (पियानोच्या स्टूलावरून उठत) : सभ्य गृहस्थहो, थांबवा ! तीच पाटी परत परत उगाळणं चाललंय ! ह्यावर तुमचा वाद होऊन गेलाय ...

प्योत्र : तुमची ढब मला आवडते, तेरेन्ती ख्रिसान्फोविच. तुमची भूमिकाही मला आवडते – आम्हा सगळ्यांचा निवाडा करणाऱ्या जज्जाची भूमिका ! पण मला कुतूहल आहे ... हीच भूमिका तुम्ही का स्वीकारलीत ? नेहमी तुमचा सूर असा असतो जणू तुम्ही आम्हाला मलमपट्टी करताय !

तेतेरेव : माझ्यासारखे लोक मलमपट्ट्या लावणारे नसतात !

प्योत्र : महत्त्वाचा मुद्दा तो नव्हे. मला म्हणायचंय –

तुम्हाला आम्ही आवडत नाही !

तेतेरेव : अजिबात आवडत नाही !

प्योत्र : प्रांजळपणाबद्दल धन्यवाद.

पोल्या प्रवेश करते.

तेतेरेव : तुमच्या आरोग्यासाठी खा !

पोल्या : काय देताय खायला ?

तात्याना : शिव्या !

तेतेरेव : सत्य !

पोल्या : मला थिएटरला जायचंय. माझ्याबरोबर कुणी येतंय का ?

तेतेरेव : मी ...

प्योत्र : आज काय आहे ?

पोल्या : 'दुसरं तारुण्य.' तात्याना वासिल्येवना, येणार ?

तात्याना : नाही. ह्या मोसमात मी नाटकं पाहणार नाही. वीट आला. ते गोळीबार, ती आरडा-ओरड, ती रडारड – आता सहन नाही होत !

तेतेरेव पियानोच्या एका पट्टीवर बोट आपटतो आणि करुण सूर काढतो.

सगळं खोटं आहे. कोणताही गोंगाट न करता, किंचाळ्या न फोडता, आयुष्य माणसाला मोडून टाकतं ! अश्रूंविना ! नकळत !

प्योत्र (खिन्नपणे) : प्रेमाच्या यातनांना ते नाट्यरूप देतात, पण कर्तव्य आणि इच्छा यांच्या कात्रीत सापडलेल्या माणसाच्या नाटकाला कुणी कवडीचं महत्त्व देत नाही.

तेतेरेव हसऱ्या मुद्रेने खर्जातील सूर वाजवत जातो.

पोल्या (अवघडून स्मित करत) : पण मला आवडतं नाटकं पहायला. फार फार आवडतं. उदाहरणादाखल दॉन सेझार दे बाझान, स्पॅनिश सरदार... केवळ अप्रतीम! अस्सल नायक...

तेतेरेव : माझं त्या नायकाशी साम्य आहे?

पोल्या : अय्या, कमाल आहे तुमची! तिळभर देखील साम्य नाही!

तेतेरेव (गालात हसत) : अरेरे! फार वाईट!

तात्याना : रंगभूमीवर एखादा नट जेव्हा आपलं प्रेम व्यक्त करत असतो, तेव्हा मला त्याचा अगदी तिटकारा येतो. खऱ्या आयुष्यात असं कधीही घडत नाही. कधीच नाही!

पोल्या : बरं तर, मी चलते... तेरेन्ती ख्रिसान्फोविच – येताय ना?

तेतेरेव (पियानो वाजवण्याचे थांबवतो) : नाही. स्पॅनिश सरदाराशी माझं तिळभरही साम्य नाही असं मला सांगण्यात आल्यानंतर आता मी येणार नाही.

पोल्या हसत निघून जाते.

प्योत्र (तिला जाताना पहात) : स्पॅनिश सरदाराचं तिला काय एवढं?

तेतेरेव : तिला त्या सरदारात काहीतरी भरीव दिसतं.

तात्याना : त्याचे कपडे सुंदर असतात...

तेतेरेव : आणि तो उल्हासी वृत्तीचा आहे. उल्हासी

माणूस नेहमी भला माणूस असतो. डांबीस क्वचितच उल्हासी लोक असतात.

प्योत्र: ह्या दृष्टिकोनातून तुम्ही ह्या पृथ्वीवरचे महाडांबीस ठरता!

तेतेरेव (परत पियानोमधून भरदार स्वर काढू लागतो): मी केवळ दारुडा आहे. बस्स! आपल्या रशियात खूप दारुडे आहेत याचं कारण काय ठाऊक आहे? कारण दारुडं असणं सोयीस्कर पडतं. दारुड्यावर आपल्याकडं प्रेम करतात. संशोधकाचा, धाडसी माणसाचा खूप तिरस्कार करतात. पण दारुड्यावर प्रेम करतात. कारण कसल्यातरी महान आणि चांगल्या गोष्टीवर प्रेम करण्यापेक्षा एखाद्या किरकोळ आणि क्षूल्लक गोष्टीवर प्रेम करणं खूप सोपं असतं.

प्योत्र (खोलीत फेऱ्या मारत): आपल्या रशियात... आपल्या रशियात... ऐकायला किती विचित्र वाटतं! रशिया... खरंच आपला आहे काय? माझा? तुमचा? कोण हे – आम्ही? कोण – आम्ही?

तेतेरेव (गातो): "आम्ही पाखरं स्वच्छंद..."

तात्याना: तेरेन्ती ख्रिसान्फोविच! कृपा करून पियानो पिळायचं थांबवा! मृत्युघंटा वाजल्यासारखा भास होतोय!

तेतेरेव: (वाजवत राहतो): माझ्या मन:स्थितीच्या साथीनुसार मी वाजवतोय.

तात्याना संतापून हॉलमध्ये निघून जाते.

प्योत्र (विचारमग्न होत): खरंच... थांबवा तुमचं

वाजवणं. मनावर निष्कारण ताण पडतोय त्याचा. मला असं वाटतं की, एखादा फ्रेंच अथवा इंग्रज जेव्हा 'फ्रान्स' अथवा 'इंग्लंड' म्हणतो, तेव्हा त्या शब्दात वास्तवता असते, काहीतरी ठाम आणि आकलनीय असतं. पण जेव्हा मी 'रशिया' म्हणतो, तेव्हा मला त्यात काहीच अभिप्रेत नसतं. त्या शब्दाला कसलाही स्पष्ट अर्थ देण्यास मी पूर्ण असमर्थ आहे.

स्तब्धता. तेतेरेव वादन चालू ठेवतो.

अनेक शब्द आपण केवळ सवयीपायी वापरतो. त्या शब्दांमागच्या अर्थाचा विचार न करता. उदाहरणार्थ, ' जीवन ' 'माझं जीवन'. ह्या दोन शब्दांमागं काय अर्थ दडलाय? (मुकाटपणे येरझाऱ्या घालतो.)

तेतेरेव हळुवारपणे पियानोवरून बोटे फिरवतो आणि शोकध्वनीने खोली भरून टाकतो. त्याच्या चेहऱ्यावर थिजलेले स्मित आहे. त्याच मुद्रेने तो प्योत्रकडे पाहतो.

त्या मूर्ख चळवळीत मी कशाला स्वतःला गुंतवून घेतलं कोण जाणे! विद्यापीठात मी शिकायला गेलो होतो आणि शिकत होतो... कृपा करून वाजवणं थांबवा! रोमन कायद्याचा अभ्यास करायला कुठली राजवट मला मना करील असं कधी वाटलं नव्हतं. खरंच कधी वाटलं नव्हतं! पण माझ्या मित्रांचा दबाव मला जाणवत होता आणि त्याच्या आहारी मी गेलो. अशा रीतीनं माझ्या आयुष्यातली दोन वर्षं खोडली गेली. ही बळजबरी! माझ्यावर झालेली बळजबरी! खरं आहे

ना? मला वाटलं होतं: अभ्यास पूर्ण करीन, वकील होईन, काम करीन... वाचन करीन, निरीक्षण करीन... आयुष्य जगीन!

तेतेरेव (उपरोधाने त्याच्या सुराशी सूर जुळवून): पालकांच्या आनंदासाठी, चर्चच्या आणि राज्याच्या हिता-साठी, समाजाच्या नम्र सेवकाला योग्य अशा रीतीनं!

प्योत्र: समाज ? ह्या गोष्टीचा मला विलक्षण तिटकारा आहे. व्यक्तीकडून तो सतत वाढत्या प्रमाणात अपेक्षा करतो, पण सुरळीत आणि विनाअडथळा व्यक्तित्वाचा विकास घडवायला तिला तो संधी मात्र देत नाही. माझ्या मित्रांच्या रूपानं हा समाज मला ओरडून सांगत होता – " माणसानं सर्वप्रथम नागरिक असलं पाहिजे!" तर मी नागरिक व्हायचा प्रयत्न केला! हलकट साले! समाजाच्या अपेक्षा पूर्ण करायची माझी इच्छा नाही... समाजाला मी मुळीच बांधलेला नाही! मी एक व्यक्ती आहे आणि व्यक्ती स्वतंत्र असली पाहिजे... थांबवा तुमचं पियानो बडवणं!

तेतेरेव: मी तुम्हाला साथ देतोय... मध्यमवर्गातल्या, माजी नागरिकाला – किती वेळ? अर्धा तास?

हॉलमध्ये गोंगाट.

प्योत्र (संतापून): तुम्ही... मर्यादा सोडत आहात!

प्योत्रकडे औपरोधिक नजर टाकून तेतेरेव पियानो वाजवत राहतो. नील, येलेना, शीश्किन, त्स्वेतायेवा आणि त्यांच्या किंचित पाठीमागून तात्याना प्रवेश करतात.

येलेना : ह्या मृत्युघंटेचा अर्थ काय? नमस्कार, भयाण राक्षसा! नमस्ते, भावी वकीलसाहेब! काय चाललंय इथं तुमचं?

प्योत्र (चेहरा वाकडा करीत) : मूर्खपणा...

तेतेरेव : आयुष्याचा अकाली निरोप घेतलेल्या ह्या माणसासाठी मी मृत्युघंटा वाजवतोय.

नील (तेतेरेवला) : ऐक! माझी तुला एक विनंती आहे! (तेतेरेवच्या कानात कुजबुजतो. तेतेरेव मान डोलावतो.)

त्स्वेतायेवा : मंडळी! तालमीला एवढी मजा आली!

येलेना : वकीलसाहेब! आज लेफ्टनंट बीकोव माझ्या-भोवती सारखी रुंजी घालत होता!

शीश्किन : बैल आहे तुमचा बीकोव...

प्योत्र : तुमच्याभोवती कुणी आणि कसा पिंगा घातला हे जाणून घेण्यात मला रस आहे, असं तुम्हाला का वाटतं?

येलेना : अगबाई! आज तुमचा मूड ठीक नाही!

त्स्वेतायेवा : प्योत्र वासिल्येविचचा मूड कधीच ठीक नसतो.

शीश्किन : त्याची ही कायम अवस्था आहे.

येलेना : तान्या! तुझासुद्धा नेहमीप्रमाणं उदास मूड आहे का? शरदातल्या पावसाळी रात्रीसारखा?

तात्याना : होय.

येलेना : पण मला बाई खूप आनंद झालाय! मंडळी, सांगा बरं – मला नेहमी खूप आनंदी का वाटतं?

नील : ह्या प्रश्नाचं उत्तर द्यायला माझा नकार

आहे. कारण खुद्द मलाही नेहमी खूप उल्हास वाटतो!

त्स्वेतायेवा : आणि मलासुद्धा!

शीश्किन : मला नेहमी नाही, पण ...

तात्याना : सदासर्वदा!

येलेना : तान्या! गंमत करत होतीस? हे छान! राक्षस! मला उत्तर द्या – मला आनंदी का वाटतं?

तेतेरेव : हे साक्षात चंचलते!

येलेना : का – य? ठीक आहे! जेव्हा माझ्यापाशी प्रेमयाचना कराल, तेव्हा ह्या शब्दांची तुम्हाला मी आठवण करून देईन!

नील : काही खायला मिळालं तर बरं होईल ... मला लौकरच कामावर जायचंय.

त्स्वेतायेवा : सबंध रात्रभर काम करणार? बिच्चारा!

नील : सबंध रात्र आणि सबंध दिवस! आख्खे चोवीस तास! स्वयंपाकघरात जातो आणि स्तेपानिदाला मुजरा ठोकतो.

तात्याना : मी सांगत्ये तिला ... (नीलबरोबर जाते.)

तेतेरेव : (येलेनाला) : अहो ... ऐका! मीसुद्धा तुमच्या प्रेमात पडलंच पाहिजे का?

येलेना : होय, निर्लज्ज माणसा! होय, भकास राक्षसा! होय! होय!

तेतेरेव (तिच्यापासून दूर सरत) : तर मग हा गुन्हा करीन ... मला हे अवघड नाही! एकदा मी एकाच वेळी दोन मुलींच्या आणि एका विवाहित बाईच्या प्रेमात होतो!

येलेना (त्याच्या अंगावर चालून जात) : आणि मग काय झालं ?

तेतेरेव : काहीही झालं नाही !

येलेना (प्योत्रच्या दिशेने मानेने खूण करीत दबत्या आवाजात) : तुम्हा दोघांचं काय चाललं होतं ?

तेतेरेव हसतो. दोघे हलक्या आवाजात बोलू लागतात.

शीश्किन (प्योत्रला) : ऐक बंधू – तीन दिवसांसाठी एक रूबल उसना देतोस ? माझ्या बुटांनी जबडा उघडलाय !

प्योत्र : घे ... तू मला सात देणं लागतोस !

शीश्किन : आठवण आहे.

त्स्वेतायेवा : प्योत्र वासिल्येविच ! आमच्या नाटकात तुम्ही का भाग घेत नाही ?

प्योत्र : मला अभिनय करायला जमत नाही.

शीश्किन : आम्हाला थोडंच जमतं ?

त्स्वेतायेवा : निदान तालमीला तरी यायचं. सैनिक फार मजेदार आहेत ! त्यांच्यात शीर्कोव नांवाचा एक आहे – विलक्षण गमत्या ! इतका गोड ... निष्पाप, लाजरं स्मित. आणि पूर्ण ठोंब्या !

प्योत्र : (डोळयांच्या कोपऱ्यांमधून येलेनाला पहात) : मला समजत नाही – ज्यांना काहीही कळत नाही अशी मठ्ठ माणसं स्वारस्यपूर्ण कशी ठरतात ?

शीश्किन : शीर्कोवसारखे तिथं अनेक आहेत ...

प्योत्र : मला वाटतं तसे खूप आहेत !

त्स्वेतायेवा : असं कसं म्हणता ? हे मला समजत

नाही – तुम्ही असं का वागता ? खानदानीपणा म्हणायचा का हा ?

तेतेरेव (अचानक मोठ्यांदा) : मला दुसऱ्यांची कीव येत नाही !

येलेना : श्शू !

प्योत्र : तुम्हाला माहीत आहे – मी मध्यमवर्गातला एक घटक आहे.

शीश्किन : त्यामुळं तर सामान्य माणसांविषयीचा तुझा दृष्टिकोन समजून घेणं जास्तच अवघड जातं.

तेतेरेव : माझी कुणीही कधीही कीव केली नाही ...

येलेना (दबत्या आवाजात) : वाईटाला भलेपणानं उत्तर द्यावं हे तुम्हाला माहीत नाही ?

तेतेरेव : माझ्यापाशी ना मोठी, ना छोटी नाणी ...

येलेना : हळू बोला !

प्योत्र (येलेना आणि तेतेरेव यांचे संभाषण ऐकत) : आणि मला समजत नाही – सर्वसामान्य माणसांबद्दल सहानुभूतीचा देखावा करण्याची तुम्हाला गरज का वाटते ?

त्स्वेतायेवा : आम्ही – देखावा करत नाही ! आमच्या-पाशी जे काही आहे, त्यात त्यांना वाटेकरी बनवतो.

शीश्किन : तसंसुद्धा नाही ... त्यांच्यात वावरायला आम्हाला आनंद वाटतो. ती माणसं खोटं वागत नाहीत. त्यांच्यात एक निरोगी वातावरण जाणवतं. रानातल्या-सारखं. आमच्यासारख्या पुस्तकातल्या किड्यांना अधून-मधून त्या शुद्ध हवेला फुफ्फुसांमध्ये भरून घ्यायची गरज आहे.

प्योत्र (दबत्या संतापाने हट्टाग्रहपूर्वक) : तुम्हाला केवळ आभासात जगायला आवडतं ... तुमच्या सैनिकांपाशी जाण्यामागचा तुमचा मनातला हेतू अजून तुम्हालाच उमगत नाही. खरं बोलतो म्हणून माफ करा – पण अगदी बावळट आहात! सैनिकांमध्ये शुद्ध हवा ध्यायची ... माफ करा ...

त्स्वेतायेवा : फक्त सैनिकच नव्हेत! तुम्हाला ठाऊक आहे ... रेल्वे डेपोतसुद्धा आम्ही नाटकाचे प्रयोग करतो.

प्योत्र : एकूण एकच. माझं असं म्हणणं आहे की, तुमच्या ह्या सगळया गडबड-गोंधळाला काहीतरी उदात्त कार्याचं स्वरूप देण्याचा तुम्ही प्रयत्न करता आणि स्वतःची फसवणूक करता. व्यक्तीचा विकास करायला तुम्ही मदत करताय अशी तुमची ठाम धारणा बनलीय. निव्वळ आत्मवंचना! उद्या एखादा अधिकारी किंवा फोरमन येईल आणि तुमच्या व्यक्तीच्या टाळक्यावर एक तडाखा मारील – तुम्ही त्या व्यक्तीच्या डोक्यात कोंबलेल्या सगळ्या गोष्टी तात्काळ बदाबदा बाहेर पडतील – जर तुम्ही तिच्या डोक्यात काही कोंबलं असलं तर ...

त्स्वेतायेवा : अशी भाषा ऐकायला फार दुःख होतं!

शीश्किन (उदासपणे) : खरंच ... ही भाषा पटत नाही. पहिल्यांदाच अशी भाषा ऐकतोय असं नव्हे, पण तरीही दरवेळी माझी तिच्याबद्दलची नावड वाढत चाललीय. प्योत्र, कधीतरी आपण ह्या विषयावर बोलू – आणि कायमचा सोक्षमोक्ष लावून टाकू!

प्योत्र (उपहासपूर्ण हेल काढत) : तू मला भीती घालतोस! पण ह्या बैठकीची मी तर वाट पाहतोय!

येलेना (संतापून ओरडते) : कशाला तुम्ही स्वतः-वर हे ओढवून घेता? (इतरांना) : मंडळी! लोकांनी ह्याला पशू मानावं असं ह्याला का वाटतं?

प्योत्र : केवळ स्वतःचं वेगळेपण सिद्ध करण्याच्या हव्यासापायी!

त्स्वेतायेवा : अर्थातच! वेगळेपण दाखवण्यासाठी! बायकांसमोर सगळे पुरुष स्वतःचं वेगळेपण सिद्ध करायचा आटापिटा करतात! कुणी निराशावादी बनून दाखवतो ... कुणी धूर्ततेचा आव आणतो. पण प्रत्यक्षात एकजात सगळे आळशी ढोण असतात!

तेतेरेव : थोडक्यात – स्पष्ट उत्तम सांगितलं!

त्स्वेतायेवा : मग काय – तुमची कौतुकं करू? वाट बघा! तुम्हाला चांगली ओळखून आहे!

तेतेरेव : तसं असेल तर माझ्यापेक्षा तुम्हाला जास्त माहीत आहे. खरंच, तुम्ही मला सांगा – वाईटाला भलेपणानं उत्तर द्यावं अथवा नाही? दुसऱ्या शब्दात विचारायचं तर वाईटपणा आणि भलेपणा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असं तुम्हाला वाटतं?

त्स्वेतायेवा : प्रत्येक गोष्टीला विपरीत रूप देण्याचा नादच आहे तुम्हाला!

शीश्किन : थांबा, त्याला अडवू नका! मंडळी, तेतेरेवचं बोलणं मला नेहमी ऐकायला आवडतं. त्याला थोडा अवधी द्या – तुमच्या डोक्यात सत्याचा खिळा तो हमखास ठोकील. आपल्यापैकी बहुतेकांच्या टाळक्यात अगदी सामान्य विचार असतात – जुनाट नाण्यां-प्रमाणं सपाट आणि झिजलेले!

प्योत्र : तू फार मोठ्या मनाचा आहेस. स्वतःच्या गुणांचं श्रेय दुसऱ्यांना चिकटवतोस!

शीश्किन : कसचं, कसचं! बंधू, खरं तेच बोललं पाहिजे! क्षुल्लक बाबतीतसुद्धा आपण प्रामणिक रहावं! मी सरळ कबूल करतो – अस्सल स्वतःचा असा एकही शब्द मी कधी उच्चारलेला नाही! पण मंडळी, तसं घडावं म्हणून जीव मात्र तळमळतो!

तेतेरेव : हेच अस्सल बोललास बघ!

शीश्किन (चटकन) : काय? खरं म्हणतोस?

तेतेरेव : बोललास, बंधू! खरंच... पण काय ते स्वतःच जाण!

शीश्किन : हे केवळ योगायोगानं घडलं.

तेतेरेव : आधी ठरवून अस्सलपणा उमटत नाही. मी प्रयत्न करून पाहिलाय.

येलेना : अहो आत्मशोधक, वाईटपणा आणि भलेपणा यावरचं तुमचं प्रवचन ऐकवा!

शीश्किन : खरंच, तत्त्वज्ञानाची वाफ सोड जरा!

तेतेरेव (पवित्रा घेऊन) : लायक द्विपादांनो! वाई-टाला भलेपणानं उत्तर दिलं पाहिजे असं जेव्हा तुम्ही म्हणता, तेव्हा तुमची सपशेल चूक होते. वाईटपणा हा तुमच्यातला जन्मजात गुण आहे, म्हणून तुम्हाला तो कवडीमोल वाटतो. भलेपणा हा तुम्ही साध्य करून घेतला आहे आणि त्याची फार मोठी किंमत तुम्हाला मोजावी लागल्यामुळं तो पृथ्वीवरच्या इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा दुर्मिळ वाटतो, जास्त आवडतो आणि अधिक सुंदर भासतो. ह्यावरून निष्कर्ष निघतो की, वाईटाला

भलेपणानं उत्तर देणं तुमच्या फायद्याचं नाही आणि तसं करणं व्यर्थ आहे. मी सांगतो तुम्हाला – भलेपणाला भलेपणानं उत्तर द्या. आणि जेवढं तुम्हाला मिळालं असेल, तेवढंच परत करा. त्याहून तसूभरही जास्त नको. नाहीतर दुसऱ्यांमध्ये बळकावण्याची वृत्ती निर्माण होते. माणूस लोभी प्राणी आहे. एकदा आवश्यकतेपेक्षा जास्त मिळालं, म्हणजे पुढच्या वेळी तो अधिकाची हाव धरतो. त्याचप्रमाणं, जेवढं देणं आहे त्यापेक्षा कमी देऊ नका. कारण एकदा त्याला फसवलंत – तर लक्षात ठेवा, माणूस मनाची जखम कधी विसरत नाही! तुमचं "दिवाळं" वाजलं असा तो डांगोरा पिटील, तुमच्याविषयीचा सगळा आदर त्याच्या मनातून नाहीसा होईल आणि पुढच्या वेळी तुमच्या भलेपणाच्या कमाईचा मोबदला देण्याऐवजी तुम्हाला तो भिक्षा देईल! बंधूंनो, भल्याची भल्यानं भरपाई करण्यात काटेकोरपणा राखा! कारण स्वतःच्या जवळच्यांना भिक्षा देणाऱ्यापेक्षा ह्या पृथ्वीवर अधिक करुणास्पद आणि तिरस्करणीय दुसरा कुणीही नाही! पण वाईटपणा पदरी पडला तर त्याची मात्र दामदुपटीनं परतफेड करा! तुमच्या जवळच्यानं तुमच्याशी केलेल्या वाईटपणाची परतफेड भरपूर वाईट-पणानं करा. तुम्ही भाकरतुकडा मागितलात आणि त्याऐवजी त्यानं तुमच्या हाती दगड ठेवला – तर त्याच्या डोक्यावर आख्खा डोंगर हाणा! (तेतेरेव भाषणाचा आरंभ विनोदी सुरात करतो, पण हळू हळू तो जास्त जास्त गंभीर होत जातो आणि समारोप करताना त्याचे शब्द भावनावेगाने, आवेशाने उमटतात. भाषण

संपल्यावर तो दाणदाण पावले आपटत एका बाजूला चालत जातो.)

कुणीही बोलत नाही. त्याच्या बोलण्यातील प्रामाणिकता आणि गंभीरपणा जाणवल्यामुळे प्रत्येकजण अवघडल्या-सारखा होतो.

येलेना (हळूच) : लोकांनी तुम्हाला कधीतरी खूप यातना दिल्या असाव्यात.

तेतेरेव (दात विचकून) : होय, त्यामुळं मला खूप आशा आहे की, वेळ येईल तेव्हा मी लोकांना यातना सोसायला लावीन. अथवा माझ्याखातर त्यांना यातना सोसाव्या लागतील.

नील (हातांमध्ये भांडे आणि पावाचा तुकडा धरून प्रवेश करतो. भांड्यातील पदार्थ सांडणार नाही अशी खबरदारी घेण्यासाठी एक डोळा भांड्यावर ठेवून तो बोलतो.)

तात्याना त्याच्या पाठोपाठ येते.

सारखं तत्त्वज्ञान! तान्या, क्षुल्लक बाबींना तत्त्वज्ञान लागू करण्याची तुझी खोड फार वाईट आहे! पाऊस पडतोय एक तत्त्वज्ञान, बोट कापलं – दुसरं तत्त्वज्ञान, चुलाण्यातल्या धुराचा वास येतोय – तिसरं तत्त्वज्ञान. अशा फालतू गोष्टींवर तत्त्वज्ञान ऐकू लागलो म्हणजे अगदी इच्छा नसतानाही मनात विचार येतो की, शिक्षणानं काही लोकांचं खूप नुकसान होतं.

तात्याना : किती उद्धट आहेस रे तू... नील!

नील (मेजापाशी बसून खात खात) : कसला उद्धटपणा केला मी ? तुला आयुष्य खरंच कंटाळवाणं वाटत असेल, तर कसल्यातरी उद्योगात गुंतवून घे. जो श्रमतो त्याला कंटाळा वाटायला फुरसत मिळत नाही. घरात कंटाळवाणं वाटत असेल तर खेड्यात जा ... तिथं पोरांना शिकव ... नाहीतर मॉस्कोला जा आणि स्वतः शीक.

येलेना : असंच पाहिजे तिला ! आणि ह्यालाही झोडपा ! (तेतेरेवकडे बोट दाखवते.)

नील (तिरपा कटाक्ष फेकत) : हा आणखी एक नमूना ! दुसरा हेराक्लिटस !

तेतेरेव : तुला अवघड जात नसेल तर मला दुसरा स्विफ्ट म्हण !

नील : तुझा फार गौरव केल्यासारखं होईल !

प्योत्र : खरंच, फारच गौरव होईल !

तेतेरेव : पण मला मात्र हे फार प्रिय वाटलं असतं ...

त्स्वेतायेवा : भूक फार मोठी आहे तुमची !

नील (भांड्यावरून नजर न ढळवता) : उगीच संतापू नको ... बरं ... पोल्या इथं होती ? म्हणजे ... ती कुठं गेली ?

तात्याना : नाटकाला. का ?

नील : काही नाही. सहज !

तात्याना : ती तुला हवी होती ?

नील : नाही ... निदान या क्षणी नको ... पण एरवी ... कायमची ... ती मला हवीय ! छे: ! काय बकबक करतोय मी !

तात्यानाशिवाय सगळे स्मित करतात.

तात्याना (चिकाटीने) : कशाला? कशाला हवी तुला ती?

उत्तर न देता नील खात राहतो.

येलेना (पटकन, तात्यानाला) : कशाबद्दल तो तुझी खरडपट्टी काढत होता? सांग पाहू!

त्स्वेतायेवा : खरंच, सांग बाई!

शीश्किन : नील वासिल्येव जेव्हा खरडपट्टी काढतो तेव्हा ऐकायला मला फार आवडतं...

प्योत्र : आणि मला आवडतं... त्याचं खाणं!

नील : मी सगळ्या गोष्टी व्यवस्थित करतो.

येलेना : तान्या, बोल ना!

तात्याना : इच्छा नाही...

त्स्वेतायेवा : तिला कधीही, कसलीही इच्छा नसते!

तात्याना : तुला काय ठाऊक! कदाचित मला खूप खूप इच्छा आहे... मरण्याची?

त्स्वेतायेवा : शी:! किती भयंकर!

येलेना : छे: बाई! मरणाची भाषा मला आवडत नाही!

नील : मरत नाही तोवर मरणाबद्दल काय बोलणार?

तेतेरेव : हे पहा अस्सल तत्त्वज्ञान!

येलेना : मंडळी, चला माझ्याकडं! समोवार एव्हाना उकळत असेल.

शीश्किन : चहा प्यायला आता मस्त मजा येईल! मला आशा आहे – चहाबरोबर काही खायलाही मिळेल?

येलेना : अर्थात !

शीश्किन (नीलकडे बोट दाखवत) : त्याच्याकडं पाहताना मला मत्सर वाटतोय – किती पापी मी !

नील : मत्सर करण्यासाठी आता काही शिल्लक उरलं नाही. मी सगळं मटकावून टाकलं. मीसुद्धा येतो तुमच्याबरोबर. तासभर सवड आहे मला.

तात्याना : कामावर जाईपर्यंत तू थोडी विश्रांती घेणं चांगलं ...

नील : मी विश्रांतीच घेतोय ...

येलेना : प्योत्र वासिल्येविच ! येणार ?

प्योत्र : तुमची परवानगी असेल तर ...

येलेना : आनंदानं ! तुमचा हात द्या ...

त्स्वेतायेवा : जोड्या बनवा सगळेजण ! नील वासिल्येविच, तुम्ही माझ्याबरोबर ...

शीश्किन (तात्यानाला) : आणि तुम्ही माझ्याबरोबर.

तेतेरेव : असं म्हणतात की, जगात पुरुषांपेक्षा बायका जास्त आहेत. तसं पाहिलं तर मी अनेक शहरांमध्ये राहिलोय, पण नेहमी माझ्या वाटचाला एकही बाई कधी उरलेली नाही !

येलेना (हसते आणि दाराकडे जाताना गाते) : आलोन्स, एन्फान्तस दे ला पात्री ... इ ... इ ... ये ! *

---

* फ्रेंच 'मार्सेलीस' मधील पहिली ओळ : " चाल पुढे, मायभूमीच्या सुपुत्रा ! " – सं.

शीश्किन (प्योत्रला पाठीत ढोसून) : लौकर चल, मायभूमीच्या सुपुत्रा !

गोंगाट करत, गात आणि हसत ते बाहेर जातात. काही सेकंद खोली रिकामी. मग म्हाताऱ्यांच्या खोलीचे दार उघडते आणि आकूलीना बाहेर येते. जांभया देत ती दिवे विझवून टाकते. खोलीमधून म्हाताऱ्याचा प्रार्थनेचा धीरगंभीर आवाज येतो. म्हातारी अंधारातून स्वतःच्या खोलीकडे परत जाताना खुर्च्यांना अडखळते.

पडदा

अंक दुसरा

स्थळ : पूर्वीचेच

शारदीय दुपार. मेजापाशी म्हातारे बेस्सेमेनोव बसले आहेत. तात्याना सावकाशपणे आणि मुकाटपणे येरझाऱ्या घालत आहे. प्योत्र दोन खोल्यांदरम्यानच्या कमानीत उभा राहून खिडकीतून बाहेर पाहतोय.

बेस्सेमेनोव : आख्खा तासभर मी तुमच्याशी बोलतोय, माझ्या लाडक्या बाळांनो, पण माझे शब्द तुमच्या

काळजांपर्यंत भिडलेले दिसत नाहीत. तुमच्यातला एकजण माझ्याकडं पाठ करून ऐकतोय, तर दुसरी एखाद्या कावळीनं कुंपणावर उड्या माराव्या तशी मागं-पुढं करतेय.

तात्याना: मी बसत्ये ... (खाली बसते.)

प्योत्र (वडलांकडे तोंड वळवून): तुम्ही आम्हाला सरळ सांगा – आमच्याकडून काय पाहिजे तुम्हाला?

बेस्सेमेनोव: तुम्ही कशा प्रकारची माणसं आहात हे जाणून घ्यायची इच्छा आहे मला! तू कसा आहेस हे समजून घ्यायचंय मला!

प्योत्र: थांबा! मी सांगतो तुम्हाला. माझं एवढं शिक्षण संपू दे ... मग समजेल ... सगळं दिसेल.

बेस्सेमेनोव: हं ... शिक्षण! शीक!! पण तू शिकत नाहीस! बाष्कळ बडबड करण्यात वेळ वाया घाल-वतोस. प्रत्येक गोष्टीला नाक मुरडायला तू शिकलास, पण मर्यादा राखायची अक्कल शिकला नाहीस. विद्या-पीठामधून तुला हाकलून लावलंय. तुझ्यावर अन्याय झाला असं वाटतं? चुकतो आहेस. विद्यार्थी हा शिकणारा असतो. त्यानं दुसऱ्यांना शिकवण्याच्या भान-गडीत पडू नये! विशीतलं प्रत्येक शेंबडं पोर जर कायदे घालून द्यायला लागलं, तर सगळीच अंदाधुंदी माजेल आणि शहाण्यासुरत्या माणसांना ह्या जगात जागाच राहणार नाही. प्रथम शीक, तुझ्या धंद्यातलं कसब मिळव आणि मग टीका करायला लाग. तोपर्यंत तुझ्या टीकेला कुणीही भीक घालणार नाही! तुझ्यातला दोष दाखवण्यासाठी मी तुला हे सांगत नाही, तर अगदी

मनापासून तळमळून सांगतोय ; कारण तू माझा मुलगा आहेस, माझ्या रक्ताचा आहेस. नीलला मी काहीही बोलत नाही ... जरी त्याच्यापायी मला खूप कष्ट पडलेत ... जरी तो माझा पाळलेला मुलगा आहे ... पण तरीही शेवटी ते परक्याचं रक्त. आणि जेवढा अधिक काळ उलटेल ... तेवढा तो मला जास्त परका होईल. मला दिसतंय ... तो डांबीस निघणार ... नट किंवा तसाच कुणीतरी होणार. कदाचित समाजवादीसुद्धा होईल ... खुशाल भोगो आपल्या कर्माची फळं!

आकूलीना (दारातून डोकावते आणि क्षीण, करुण आवाजात) : अहो, जेवणाची वेळ झाली ना?

बेस्सेमेनोव (कठोरपणे) : चालती हो इथून! नको तेव्हा नाक खुपसू नकोस!

आकूलीना पटकन दार बंद करते. तात्याना संतापून बापाकडे एक कटाक्ष टाकते व उठून परत येरझाऱ्या घालू लागते.

पाहिलंत? बिचाऱ्या तुमच्या आईला एका मिनटाची जिवाला स्वस्थता नाही ... सारखी तुमची राखण करते. मी तुमच्या भावना दुखवीन अशी तिला सतत भीती. पण प्रत्यक्षात मीच तुमच्याकडून दुखावला गेलोय! फार फार दुखावलोय! स्वतःच्या घरात मी जपून चालतोय. जणू फरशीवर फुटलेल्या काचा सांडल्या असाव्यात तसा. माझ्याकडं माझे जुने मित्र भेटायला येईनासे झालेत. म्हणतात: तुझी पोरं खूप शिकलेली, आम्ही साधी माणसं, आम्हाला तुझी पोरं हसतील! आणि खरंच तुम्ही अनेकदा आमची टवाळी केलीत,

मला शरमिंदं केलंत. सगळ्या मित्रांनी माझं नांव टाकलं... शिकलेली पोरं म्हणजे जणू प्लेग समजून! आणि तुम्ही स्वतःच्या बापाकडं मुळीच लक्ष देत नाही, त्याच्याशी प्रेमानं कधी चार शब्द बोलत नाही, तुमच्या मनात काय आहे अथवा पुढं काय करायचा इरादा आहे याबद्दल चकार शब्दानं सांगत नाही! मी तुम्हाला परका वाटतो. पण माझी तुमच्यावर माया आहे! तुमच्यावर माझं प्रेम आहे! प्रेम म्हणजे काय तुम्हाला समजतं? तुला हाकलून दिलं... माझ्या काळजाला ती गोष्ट झोंबली! तात्याना निष्कारण प्रौढ कुमारिका म्हणून झुरतेय — मला ह्याचं वाईट वाटतं! लोकांसमोर लाजही वाटतेय. लग्न करणाऱ्या आणि एकूण सगळ्या मुलींपेक्षा माझ्या तात्यानात काय उणीव आहे? प्योत्र, तुला माणूस म्हणून पहायची माझी इच्छा आहे — विद्यार्थी म्हणून नव्हे. फिलिप नझारोवचा मुलगा पहा — त्यानं शिक्षण पुरं केलं, लग्न केलं, घसघशीत हुंडा घेतला, वर्षाला दोन हजार पगार मिळवतोय आणि नगर-मंडळाचा सभासद म्हणून लौकरच निवडून येईल...

प्योत्र : जरा थांबा... मीही लग्न करीन!

बेस्सेमेनोव : होय, मी पाहतोय ना! तू उद्यासुद्धा तयार आहेस... प्रश्न आहे... कुणाशी? विधवेशी? त्या छिनाल बाईशी?

प्योत्र (संतापून) : तिला अशी नांवं ठेवायचा तुम्हाला मुळीच अधिकार नाही!

बेस्सेमेनोव : अशी म्हणजे कशी? विधवा किंवा छिनाल?

तात्याना : बाबा ... कृपा करून थांबवा हा विषय ! प्योत्र, तू इथून जा ... किंवा गप्प बैस ! मी बघ कशी चूप राहते. मला बाई काही समजेनासं झालंय ! बाबा ... जेव्हा तुम्ही बोलता, तेव्हा तुमचं बरोबर असं मला वाटतं ! अर्थात, तुमचं बरोबर हे मला ठाऊक आहे ! विश्वास ठेवा, खरंच मला तसं वाटतं ! पण तुमचं हे बरोबर असणं आम्हाला परकं वाटतं ... मला आणि त्याला ... समजतं ? आमची पाहण्याची तऱ्हा वेगळी आहे. थांबा, असं रागावू नका ! आपणा दोघांचंही बरोबर आहे.

बेस्सेमेनोव (एकदम उठत) : खोटं आहे ! आपल्यापैकी फक्त एकाचं बरोबर आहे – आणि ते माझं ! तुम्ही कसे बरोबर ? दाखवून दे ! सिद्ध कर !

प्योत्र : बाबा, ओरडू नका ! मीसुद्धा तसंच म्हणीन ! तुमचं बरोबर आहे ... पण त्यात आमचा कोंडमारा होतो. आम्ही आता मोठे झालोय. पूर्वीचे कपडे जसे आम्हाला तोकडे होतात, तसं तुमच्या पद्धतीनं जगणं आम्हाला तोकडं वाटतं ! आम्ही घुसमटतो !

बेस्सेमेनोव : अरे वा ! तुम्ही शिकून भलतेच शहाणे झालात – आणि मी मूर्ख ठरलोय ! तुम्ही ...

तात्याना : तसं नव्हे, बाबा ! तसं नव्हे ...

बेस्सेमेनोव : तसंच आहे ! तुमची मित्रमंडळी तुमच्याकडं येतात ... आख्खा दिवस घरात गोंगाट ! रात्रीसुद्धा झोप मिळत नाही. (प्योत्रला) तू त्या वरच्या मजल्यावरच्या रांडेबरोबर खुशाल माझ्या डोळ्यांदेखत प्रेमाचे चाळे करतोस ! (तात्यानाला) आणि तू सदा

वाकडं तोंड करून बसलेली! मी ... मी आणि तुमची आई ... एका कोपऱ्यात अंग चोरून राहतोय!

आकूलीना (एकदम खोलीत प्रवेशते आणि करुण स्वरात ओरडते) : माझ्या लाडक्यांनो! अहो ... मी कधी तुमच्यापाशी तक्रार केलीय? होय, मी एका कोपऱ्यात मुकाट जगीन! मात्र तुम्ही भांडू नका! एकमेकांना ओरबाडू नका! माझ्यावर दया करा! ..

बेस्सेमेनोव (एका हाताने तिला धरून आणि दुसऱ्या हाताने दूर ढकलून) : चालती हो इथून, थेरडे! तुझी त्यांना गरज नाही. आपणा दोघांचीही त्यांना गरज नाही! ते फार शहाणे बनलेत! त्यांच्या दृष्टीनं आपण ... परके ...

तात्याना (विव्हळते) : किती भयानक! किती भयंकर!

प्योत्र (निराशेने मुद्रा पांढरीफटक) : बाबा, हा मूर्खपणा आहे हे तुम्हाला कळत नाही का? आत्यंतिक मूर्खपणा! एकदम ...

बेस्सेमेनोव : एकदम? खोटं आहे! एकदम नव्हे! वर्षानुवर्षं माझ्या मनात खदखदतंय!

आकूलीना : पेत्या, त्यांचं म्हणणं कबूल कर! उगीच वाद घालू नको! तान्या, तुमच्या वडलांची कदर राखा!

बेस्सेमेनोव : मूर्खपणा? अरे गाढवा, हा मूर्खपणा नव्हे! हे भयानक आहे! एकदम ... बाप आणि पोरं ... दोघांचंही बरोबर! अरे तुम्ही माणसं नव्हेत, जनावरं आहात!

तात्याना : प्योत्र, जा इथून! बाबा, जरा शांत व्हा. मी तुमची विनवणी करते – शांत व्हा!

बेस्सेमेनोव : निर्दय! आम्हाला चेपून टाकताय. एवढा कशाचा तुम्हाला माज? असा गर्व करायला केलंत काय आजवर? आम्ही... आम्ही जगलो! काम केलं – घर बांधलं... तुमच्यासाठी! पापं केली... कदाचित खूप पापं घडली आमच्याकडून – पण ती तुमच्या कल्याणासाठी!

प्योत्र (ओरडतो) : आमच्यासाठी हे सगळं करा, असं आम्ही कधी सांगितलं होतं?

आकूलीना : प्योत्र! दया कर बाबा...

तात्याना : चालता हो इथून प्योत्र! मला सहन होत नाही... मीच जात्ये (खुर्चीत धपकन बसते.)

बेस्सेमेनोव : पळून जाता काय? सत्यापासून पळता? धूपापासून सैतान दूर पळतो तसं? अखेर स्वतःच्या मनाची शरम वाटली तुम्हाला!

नील (दार सताड उघडतो आणि उंबरठ्याशी उभा राहतो. तो नुकताच कामावरून आला आहे. त्याच्या चेहऱ्यावर धुळीचे आणि काजळीचे पट्टे उमटले आहेत. त्याचे हातही मळलेले आहेत. त्याचे गुडघ्यांपर्यंतचे बूट चिखलाने माखलेले आहेत. त्याच्या आखूड, पट्टा आवळलेल्या कुडत्यावर मळ आणि वंगण यांची चकाकी आहे. बोलताना तो एक हात पुढे करतो) लौकर वीस कोपेक द्या. बाहेर गाडीवानाला द्यायचेत!

त्याच्या अचानक आगमनामुळे आणि शांत आवाजामुळे

प्रत्येकजण तात्काळ ओरडायचा थांबतो व मुकाटपणे त्याच्याकडे टक लावून पाहतो.

(स्वतःच्या आगमनामुळे खोलीतील वातावरणात घडलेला परिणाम बघून एकूण प्रकार त्याच्या ध्यानात येतो, कुत्सित स्मित करीत) : परत भांडलात ?

बेस्सेमेनोव (उर्मटपणे ओरडतात) : ए ठोंब्या ! कुठं आलास ?

नील : आँ ? कुठं ?

बेस्सेमेनोव : टोपी ! तुझी टोपी उतर डोक्यावरून आधी ...

आकूलीना : काय हे वागणं ? घाणेरड्या कपड्यां-सकट थेट जेवायच्या खोलीत घुसतोस ! अगदी मर्यादा सोडलीस !

नील : मला आधी पैसे द्या !

प्योत्र (त्याला पैसे देत दबल्या आवाजात) : लौक-रात लौकर इथं परत ये !

नील (स्मित करत) : मदतीला ना ? फार अवघड जातंय ? आलोच आत्ता !

बेस्सेमेनोव : हे आणखी एक दिवटे ! मनात येईल तसं वागतात ! नवनवी खुळं घेऊन ! जगातल्या एकाही माणसाबद्दल आदर नाही ह्याच्या मनात !

आकूलीना (नवऱ्याच्या सुरात) : अगदी खरं ... गुंड नुसता ! तान्या, तू जा ... स्वयंपाकघरात जा आणि स्तेपानिदाला सांग ... आम्ही जेवायला तयार आहोत म्हणावं !

तात्याना जाते.

बेस्सेमेनोव (कडवट स्मित करत) : आणि प्योत्रला कुठं धाडणार तू? च् च् च्! मूर्ख म्हातारी! तू अगदी येडपट आहेस ... लक्षात घे, मी काही एखादं हिंस्र श्वापद नाही! मी ओरडतो त्यांच्यावर ... कारण मला काळजी वाटते त्यांची! संतापानं नव्हे, तर वेदनेपायी मी तसा ओरडतो. माझ्यापासून त्यांना लांब का पळवून लावत्येस?

आकूलीना : अहो, ठाऊक आहे मला तुमचं मन! सगळं समजतं! खरंच, वाईट वाटतं त्यांच्याबद्दल! आपण म्हातारे झालोत! देवा रे देवा! आमचं आता संपलं सारं! पण त्यांचं अजून सगळं व्हायचंय! बिचाऱ्यांना खूप टक्केटोणपे खायचे आहेत!

प्योत्र : बाबा, तुम्ही खरंच निष्कारण काळजी करता! उगीच काहीतरी डोक्यात घेतलंत ...

बेस्सेमेनोव : मला भीती वाटते! काळ असा महाभयानक! सगळं कोसळून पडतंय, मोडतंय! आयुष्य म्हणजे महाप्रचंड उद्रेक! तुझ्यासाठी भीती वाटते ... अचानक काही घडलं ... तर म्हातारपणी आम्हाला कोण आधाराला? एकटया तुझाच आम्हाला आधार! तो नील कसा आहे हे तुला ठाऊकच आहे! आणि हा तेतेरेव ... त्याच जातीचा पक्षी! त्यांच्यापासून सांभाळून रहा तू! त्यांना आपण आवडत नाही. सावध रहा!

प्योत्र : छे:, भलंतच काहीतरी! मला काहीही

इजा होणार नाही. आणखी थोडा थांबीन आणि मग विद्यापीठाकडं माफी मागीन!

आकूलीना: लौकर माफीचा अर्ज लिहून टाक, पेत्या. तुझ्या वडलांच्या जिवाला स्वस्थता मिळेल.

बेस्सेमेनोव: प्योत्र, तू जेव्हा असं बोलायला लागतोस तेव्हा तुझ्यावर माझा विश्वास बसतो – गंभीर आणि शहाणपणानं बोलतोस तेव्हा. मग खात्री वाटते की, माझ्यापेक्षा वाईट आयुष्य तुझ्या वाट्याला येणारं नाही. पण इतर वेळांना वाटतं...

प्योत्र: आता थांबवू हा विषय! खूप वेळा चर्वण झालंय ह्यावर!.

आकूलीना: माझे लाडके तुम्ही!

बेस्सेमेनोव: शिवाय तात्याना... शी:! तिनं ती मास्तरकी सोडली तर बरं होईल! काय तिच्यामुळं तिचं भलं होतंय? निव्वळ दमछाक!

प्योत्र: खरंच, तिला विश्रांतीची गरज आहे.

आकूलीना: खरंच, फार फार गरज आहे!

नील (कपडे बदलून आता निळ्या सदऱ्यात प्रवेश करतो, पण अद्याप हात-तोंड धुतलेले नाही) : जेवायचं ना लौकर?

नीलला पाहताच प्योत्र लगबगीने हॉलमध्ये निघून जातो.

बेस्सेमेनोव: जेवणाची चौकशी करण्यापूर्वी स्वत:चं थोबाड धुतलंस तर बरं होईल!

नील: माझं थोबाड फार मोठं नाही, पटकन धुवून

होईल. पण मला सपाटून भूक लागलीय! मुसळधार पाऊस, चावरं वारं, जुनं वाफेचं इंजिन ... रात्र फार वाईट गेली! अंगात अजिबात बळ नाही! तशा भिकार हवेत, तशा भिकार इंजिनाला चालवायचं काम आमच्या साहेबाला दिलं पाहिजे!

बेस्सेमेनोव: सोड आणखी वाफ! आजकाल पाहतो ... स्वतःच्या साहेबावर तू अगदी सहज शिंतोडे उडवायला लागला आहेस! सांभाळ, भलती आफत यायची!

नील: साहेबांवर आफत येणार नाही!

आकूलीना: वडील तुझ्याबद्दल बोलताहेत, तुझ्या साहेबांबद्दल नव्हे!

नील: अस्सं, माझ्याबद्दल! ..

बेस्सेमेनोव: होय, तुझ्याबद्दल!

नील: असं, असं!

बेस्सेमेनोव: पुरे तुझं असं-असं! ऐक ...

नील: ऐकतोय ...

बेस्सेमेनोव: तुझ्या डोक्यात वारं शिरलंय!

नील: बऱ्याच दिवसांपासून?

बेस्सेमेनोव: जीभ सैल सोडून माझ्याशी बोललास तर खबरदार!

नील: मला एकच जीभ आहे (जीभ बाहेर काढून दाखवतो), तिला सैल सोडलं तर लोकांशी मी बोलणार कसा?

आकूलीना (हातांनी दटावत): अरे बेशरम पोरा! जीभ काढून कुणाला दाखवतोस?

बेस्सेमेनोव : तू जरा गप्प बैस ग !

आकूलीना संतापाने मान हलवत निघून जाते.

अरे ए ... शहाण्या ! तुझ्याशी मला बोलायचंय !

नील : जेवणानंतर ?

बेस्सेमेनोव : आत्ता !

नील : जेवणानंतर जास्त बरं ! खरंच, मला फार भूक लागलीय, मी खूप दमलोय, पुरता गारठून गेलोय. कृपा करून बोलणं लांबणीवर टाका ! शिवाय ... तुम्ही मला काय सांगणार ? माझ्याशी भांडण उकरून काढणार ? तुमच्याशी भांडायला मला आवडत नाही. त्यापेक्षा मला तोंडावर सरळ सांगा की, मी तुम्हाला नको झालोय आणि मी ...

बेस्सेमेनोव : नरकात जा ! (स्वत:च्या खोलीत जातात आणि धाडकन दार बंद करतात.)

नील (पुटपुटतो) : छान ! इथल्यापेक्षा नरकात जाणं जास्त चांगलं ... (स्वत:शी गुणगुणत खोलीत फिरतो.)

तात्याना प्रवेश करते.

परत भांडलात ?

तात्याना : तू कल्पना करू शकणार नाहीस ...

नील : उत्तमरीत्या करू शकतो ! 'ना तिथं ना इथं' ह्या कधीही न संपणाऱ्या विनोदी नाटकातला एक नाट्यमय प्रसंग.

तात्याना : तुला ठीक आहे असं बोलायला ! विंगेत उभं रहायला जमतं तुला !

नील : ह्या सगळ्या गोष्टी एका कोनाड्यात ढकलून

कशा द्यायच्या हे माहीत आहे मला! आणि लौकरच ह्या जंजाळातून मी कायमचा बाहेर पडेन! डेपोत मेकॅनिक म्हणून बदली करून घ्यायचा मी प्रयत्न करतोय. रात्रीमागून रात्री मालगाड्या चालवायचा मला कंटाळा आलाय. पॅसेंजर गाड्या असत्या, एक्सप्रेस गाड्या असत्या, तर गोष्ट वेगळी! तुफान वेगात हवा कापत गेलो असतो! पण इथं... गोगलगायीच्या गतीनं सरपटत जायचं! सोबतीला फक्त आगवाला! अगदी पाण्याचं डबकं! मला माणसांमध्ये रहायला आवडतं.

तात्याना: तरीही आमच्यापासून दूर पळायची तुझी इच्छा आहे.

नील: होय... खरं बोलतो म्हणून माफ कर! पण कुणालाही तुमच्यापासून लांब पळायचीच इच्छा होईल. मला जगायला आवडतं, गोंगाट आवडतो, काम आवडतं, आनंदी साधी माणसं आवडतात! तुम्ही जगता असं वाटतं? आयुष्याच्या किनारीला नुसतं लोंबकळत राहता आणि कसल्यातरी अज्ञात कारणासाठी कण्हत-कुंथत राहता. कुणाबद्दल आणि कशाबद्दल तुम्ही असमाधानी आहात? मला तर काही समजत नाही.

तात्याना: तुला नाही समजत?

नील: खरंच नाही! माणसाला जेव्हा एका कुशीवर झोपायला अवघडतं, तेव्हा तो कूस बदलतो. पण आयुष्य जेव्हा अवघड होतं, तेव्हा तो नुसता कुरकुरत राहतो. बदलून टाकायचा प्रयत्न का करत नाही?

तात्याना: एका तत्त्वज्ञान्यानं म्हटलंय की, फक्त मूर्खांना आयुष्य सोपं भासतं!

नील : तत्त्वज्ञान्यांना मूर्ख गोष्टींचं जास्त ज्ञान असावं. पण मी स्वत:ला शहाण्यांपैकी एक समजत नाही. मात्र तुमच्याबरोबर राहणं मला कमालीचं नीरस वाटतं, एवढं खरं! कदाचित तुमच्या अखंड तक्रारींमुळं तसं वाटत असावं! कशाला तक्रारी करायच्या? कोण तुम्हा-ला मदत करणार? कुणीही मदत करू शकणार नाही आणि मदत करण्यात अर्थही नाही.

तात्याना : एवढा कठोरपणा तुझ्यात कुठून आला नील?

नील : ह्याला तू कठोरपणा म्हणतेस?

तात्याना : क्रूरपणा! मला वाटतं, त्या तेतेरेवपासून तुला ह्याची बाधा झाली. प्रत्येकाचा तो द्वेष करतो.

नील : प्रत्येकाचा नाही हं... (हसून.) हा तेतेरेव कुऱ्हाडीसारखा दिसतो असं वाटत नाही तुला?

तात्याना : कुऱ्हाडीसारखा? म्हणजे?

नील : लाकडी दांडा असलेली साधी लोखंडी पात्याची कुऱ्हाड.

तात्याना : भलते विनोद करू नको. खरं तर तुझ्याशी बोलण्यात आनंद वाटतो. तुझे विचार अस्सल असतात. पण तू इतका बेफिकीर आहेस...

नील : कुणाबद्दल?

तात्याना : लोकांबद्दल... माझ्याबद्दल...

नील : हं... सगळ्यांबद्दल नाही...

तात्याना : माझ्याबद्दल...

नील : तुझ्याबद्दल?

दोघे गप्प होतात. नील स्वत:च्या बुटांकडे पहात

राहतो, तात्याना त्याच्याकडे अपेक्षेने टक लावते.

हे बघ ... मी ... मला तुझ्याबद्दल ...

तात्याना त्याच्या दिशेने पुढे होते, पण नीलचे तिच्याकडे लक्ष नाही.

... खूप आदर वाटतो. तू मला आवडतेस. पण तू शाळामास्तरीण का झालीस? ते काम तुला आवडत नाही. त्याचा तुला त्रास होतो, तू थकून जातेस. खरं तर शिकवणं हे फार थोर कार्य आहे. मुलं म्हणजे उद्याची माणसं! त्यांची कदर केली पाहिजे, त्यांच्यावर प्रेम केलं पाहिजे. कोणतंही काम चांगल्या रीतीनं पार पाडायचं असेल, तर त्या कामावर प्रेम केलं पाहिजे. मला ऐरणीवर काम करायला फार फार आवडतं! तुमच्यावर आग ओकणाऱ्या, तुमचे डोळे जाळू पाहणाऱ्या, तुमच्या हातून निसटू पाहणाऱ्या धगधगत्या आकार-हीन लाल वस्तूवर घणाचा घाव घालताना मन मस्त थरारतं! ती जिवंत असते ... धगधगत असते ... तिच्या-वर घण घालून हवा तो आकार देता येतो!

तात्याना: हे करायला बळ हवं!

नील: आणि कसबसुद्धा!

तात्याना: नील, तुला कधी दया येत नाही?

नील: कुणाची?

येलेना (प्रवेशते): तुमची जेवणं झाली? नाही? तर मग माझ्याकडं चला! मस्त केक बनवलीय मी! वकीलसाहेब कुठं आहेत? झकास केक बनलीय!

नील (येलेनापाशी जात): मी येतो! तुमची

झकास केक आख्खी फस्त करतो! भुकेपायी माझा जीव चाललाय आणि ते मुद्दाम मला खायला देत नाहीत. या ना त्या कारणासाठी माझा राग करताहेत...

येलेना: तुमच्या जिभेपायी बहुधा! तान्या... चल!

तात्याना: आधी मी आईला सांगून येत्ये. (जाते.)

नील: बाबांना मी जीभ काढून दाखवली हे तुम्हाला कुठून समजलं?

येलेना: का-य? मला काहीही माहीत नाही! काय घडलं?

नील: नको ते पुराण! त्यापेक्षा तुमच्या झकास केकबद्दल मला सांगा!

येलेना: मी काढीन माहिती! आणि केकबद्दल— केक बनवायला मला एका कैद्यानं शिकवलं! खुनाचा आरोप होता त्याच्यावर. माझ्या नवऱ्यानं त्याला स्वयं-पाकघरात मदत करायची परवानगी दिली होती. बिच्चारा खूप हडकुळा आणि लहानखोर होता...

नील: तुमचा नवरा?

येलेना: छे: ग बाई! माझा नवरा तब्बल सहा फूट पाच इंच उंच!

नील: एवढा बुटका?

येलेना: चूप! आणि ह्या लांब मिशा! (बोटांनी मिशांची लांबी दाखवने), प्रत्येक मिशी सहा इंच लांब!

नील: एखाद्या माणसाची लायकी इंचांमध्ये मोज-ल्याचं पहिल्यांदाच ऐकतोय!

येलेना: इश्श! एक मिशा सोडल्या तर बाकी

त्याच्यात काहीच नव्हतं!

नील: अरेरे! तुम्ही केकबद्दल सांगा पुढं...

येलेना: तर तो कैदी आचारी होता... स्वतःच्या बायकोचा त्यानं खून केला होता. पण मला तो खूप आवडायचा. तिचा खून करायची त्याची इच्छा होती असं मला वाटत नाही...

नील: अच्छा, अच्छा... समजलं!

येलेना: चालते व्हा! तुमच्याशी बोलायची माझी इच्छा नाही!

तात्याना दारात उभी राहून त्यांना पाहते. दुसऱ्या दारातून प्योत्र प्रवेशतो.

वकीलसाहेब!.. माझ्याकडं... केक खायला चला!

प्योत्र: आनंदानं!

नील: आज बाबांनी ह्याची खरडपट्टी काढली – योग्य आदर न राखल्याबद्दल!

प्योत्र: चूप बैस रे!

नील: आणि मला आश्चर्य वाटतं – परवानगी घेतल्याविना तुमच्याकडं यायचा निर्णय त्यानं कसा घेतला?

प्योत्र (म्हाताऱ्यांच्या खोलीच्या दाराकडे अस्वस्थ नजर टाकून): जायचं असेल, तर जाऊ या!

तात्याना: तुम्ही जा आधी... मी आल्येच!

नील, प्योत्र, येलेना जातात. तात्याना स्वतःच्या खोलीकडे जाते. दरम्यान म्हाताऱ्यांच्या खोलीतून आकूलीनाचा आवाज येतो.

आकूलीना: तान्या!

तात्याना (थांबते आणि अधीरपणे खांदे उंचावते) : काय ?

आकूलीना (दारात येऊन) : इकडं ये ! (हलक्या आवाजात.) पेत्रूशा परत तिकडं गेला ?

तात्याना : होय ... आणि मीही जात्येय.

आकूलीना : देवा रे देवा ! पेत्याला ती चेटकीण जाळ्यात गुंतवणार ! माझं काळीज मला सांगतंय !.. निदान तू तरी त्याला काही सांगून पहा ! म्हणावं, तुला ती जोड नाही ! तीन हजार रूबल आणि नवऱ्याची पेन्शन, ह्यापलिकडं तिच्यापाशी दुसरं काहीही नाही ... मला ठाऊक आहे !

तात्याना : आईसाहेब, कशाला हा विषय ? येलेनाला प्योत्रबद्दल काडीचंही आकर्षण वाटत नाही ...

आकूलीना : मुद्दाम, मुद्दाम वागत्ये तसं ! त्याला डिवचत्ये आहे ती ! त्याच्याबद्दल काहीच वाटत नाही असा नुसता देखावा करत्ये ... पण प्रत्यक्षात मात्र उंदरा-वर पाळत ठेवणाऱ्या मांजरीसारखी त्याच्या मागं मागं असत्ये !

तात्याना : मला काय त्याच्याशी ? काय संबंध माझा ? तुम्ही स्वतःच सांगा ... माझ्यामागं कशाला पीडा ? मी थकल्येय ... समजत नाही का ?

आकूलीना : अगदी आत्ताच त्याला सांगायची गरज नाही. तू जा, पड, विश्रांती घे ...

तात्याना (जवळ जवळ किंचाळून) : विश्रांती घ्याय-ला मला कुठंही जागा नाही ! मी कायमची थकलेली ... कायमची ! समजलं ? सगळ्या आयुष्याभर ... तुमचा

वीट आलाय ... सगळ्या गोष्टींचा वीट आलाय. (झपाट्याने हॉलमध्ये निघून जाते.)

जणू मुलीला थांबवण्यासाठी आकूलीना एक पाऊल पुढे टाकते, मग हात झटकते आणि तोंड वासून जागच्या जागी उभी राहते.

बेस्सेमेनोव (दारातून डोकावत) : परत भांडण?

आकूलीना (दचकून) : नाही ... काही नाही ... असंच ...

बेस्सेमेनोव : काय असंच? उलट उत्तर केलं तिनं तुला?

आकूलीना (घाईघाईने) : छे :, छे :! मुळीच नाही! मी तिला म्हटलं ... जेवायची वेळ झाली! ती म्हणाली – भूक नाही! मी म्हटलं – भूक कशी नाही? ती म्हणाली ...

बेस्सेमेनोव : पुरे झालं थापा मारणं!

आकूलीना : थापा नाहीत, खरंच!

बेस्सेमेनोव : त्यांच्यापायी माझ्याशी किती खोटं वागतेस! माझ्या डोळ्यात सरळ पहा बघू ... नाही जमत? हात् तुझी!

आकूलीना नवऱ्यासमोर मान खाली घालून उभी राहते आणि तो मुकाट दाढी कुरवाळत उभा राहतो. नंतर उसासा टाकतो.

त्यांना शिक्षण देण्यात आपण चूकच केली!

आकूलीना (हळूच) : पुरे तुमचं! आजकाल साधी माणसंसुद्धा तेवढीच वाईट झालीत.

बेस्सेमेनोव : स्वत:पाशी आहे त्यापेक्षा जास्त मुलांना कधीही देऊ नये ! मला सगळ्यात त्रास होतो ... त्यांना कणाच नाही ... त्यांच्यात काही दम नाही ! प्रत्येक माणसात दुसऱ्यांपेक्षा काहीतरी वेगळं असलं पाहिजे ... खास स्वत:चं ! पण ही पोरं अगदीच बिनचेहऱ्याची ! तो नील पहा ... हलकट आहे ... पण त्याला स्वत:चा चेहरा आहे. धोकेबाज आहे ... पण त्याला समजू शकतो ! (दीर्घ सुस्कारा टाकतो.) तरुणपणी मला चर्चमधलं संगीत आवडायचं ... रानात आळंब्या गोळा करायला आवडायचं ... पण प्योत्रला काय आवडतं ?

आकूलीना (क्षीण उसासत) : वरच्या मजल्यावरच्या बाईकडं तो परत गेलाय !

बेस्सेमेनोव : असं ? जरा थांब ... मी तिला चांगला इंगा दाखवतो !

तेतेरेव प्रवेश करतो. नेहमीपेक्षा जास्त भकास आणि उदास. हातात वोदकाची बाटली व ग्लास.

तेरेन्ती ख्रिसान्फोविच ! परत सुरू केलं ?

तेतेरेव : काल, संध्याकाळच्या प्रार्थना संपल्यावर ...

बेस्सेमेनोव : कारण काय ?

तेतेरेव : कारण काहीही नाही ! जेवायचं केव्हा ?

आकूलीना : आत्ता मांडत्ये टेबल ! (तयारी करू लागते.)

बेस्सेमेनोव : अरेरे, तेरेन्ती ख्रिसान्फोविच, तू माणूस हुशार, पण वोदका तुझा घात करणार !

तेतेरेव : हे सन्माननीय मध्यमवर्गीय गृहस्था, तू खोटं बोलतोस ! वोदका माझा घात करत नाही, तर

माझी ताकद... अमाप ताकद... तीच माझा नाश करत्येय!

बेस्सेमेनोव: अमाप ताकद नांवाची गोष्टच नाही!

तेतेरेव: पुन्हा खोटं! आजकाल ताकदीची गरज नाही. गरज आहे झुकांडी देण्याची, धूर्तपणाची... सापासारख्या चपळतेची. (बाही वर सारून दंडाचा स्नायू दाखवतो.) पहा, ह्याचा एक दणका मारला तर टेबलाचा भुगा होईल. पण अशा हातांनी आयुष्यात काहीही करता येत नाही. मी लाकडं फोडू शकेन, पण लिहिणं कठीण आणि तसा प्रयत्न केला तर हसं होईल. ताकद वापरायला मला कुठं वावच नाही. फक्त जत्रांमध्ये काम करता येईल – भारी वजनं उचलून दाखवायची, लोखंडी कड्या तोडून दाखवायच्या, वगैरे वगैरे. एकेकाळी मी विद्यार्थी होतो... हुशार होतो... म्हणून तर धर्मविद्यालयातून माझी हकालपट्टी झाली. तुमच्यासारख्या लोकांनी सुखा-समाधानानं पहावं, असा माणूस होण्याची आता माझी इच्छा नाही. मला पाहताच माणसांनी बेचैन व्हावं, त्यांना आनंद होऊ नये, अशी माझी इच्छा आहे.

बेस्सेमेनोव: दुष्ट आहेस तू!

तेतेरेव: माझ्यासारखी अगडबंब जनावरं दुष्ट नसतात. तुला प्राणीशास्त्र ठाऊक नाही. निसर्ग धूर्त आहे. माझ्या ताकदीत जर आणखी दुष्टपणाची भर पडली असती, तर माझ्या तडाख्यातून कुठं पळाला असतास?

बेस्सेमेनोव: मी कशाला कुठं पळू? मी माझ्या स्वतःच्या घरात आहे.

आकूलीना : अहो, तुम्ही गप्प रहा ना!

तेतेरेव : अगदी बरोबर! तू स्वतःच्या घरात आहेस. तुझं सगळं आयुष्य म्हणजे तुझं घर, तुझी इमारत. म्हणूनच हे मध्यमवर्गीय गृहस्था, त्यात मला कुठंच जागा नाही!

बेस्सेमेनोव : अगदी निरर्थक जगतोस तू. पण जर तुझी इच्छा असती...

तेतेरेव : मला कसलीच इच्छा नाही. सगळ्या गोष्टींचा मनस्वी तिटकारा आहे मला. तुझ्यासारख्यांची चाकरी करून जगण्यापेक्षा दारूत बुडून मरणं मला जास्त पत्करतं. अरे मध्यमवर्गीय गृहस्था, मी शुद्धीवर आहे, व्यवस्थित पोषाखात आहे आणि नम्र सेवकाची भाषा माझ्या मुखात आहे, असं चित्र तू कल्पनेत तरी पाहू शकशील का? नाही, ते शक्य नाही!

पोल्या प्रवेश करते, पण तेतेरेवला पाहताच परत मागे लपते. तो तिला पाहतो, त्याच्या चेहऱ्यावर रुंद स्मित पसरते आणि मान डोलवीत हात पुढे करून बोलतो.

नमस्ते! घाबरू नका! मी आता तुम्हाला काहीही सांगणार नाही, कारण मला सारं ठाऊक आहे.

पोल्या (शरमून) : काय? तुम्हाला काहीही ठाऊक असणं शक्य नाही.

आकूलीना : आलीस? जा लौकर आणि स्तेपानिदाला सांग – कोबीचं सार आण.

बेस्सेमेनोव : केव्हाची वाट पाहतोय. (तेतेरेवला) :

तू आपले विचार मांडतोस ते ऐकायला मला फार आवडतं ... विशेषत: स्वत:विषयी बोलतोस तेव्हा ! तुझ्या-कडं नुसती एकदा नजर टाकली की बस्स ! भयानक अवतार आहे तुझा ! आणि स्वत:चे विचार बोलायला तू सुरुवात केलीस, की तुझ्यातल्या सगळ्या उणीवा ताबडतोब दिसायला लागतात (मन:पूर्वक गालातल्या गालात हसतात.)

तेतेरेव : तूसुद्धा मला आवडतोस. तू मापात शहाणा, मापात मूर्ख. मापात चांगला, मापात वाईट. मापात नेक आणि मापात खोटा. मापात धीट आणि मापात भित्रा. थोडक्यात – नमुनेदार मध्यमवर्गीय आहेस ! सामान्यपणाचं तू मूर्तिमंत प्रतीक आहेस आणि ह्या शक्तीपुढं साक्षात वीरसुद्धा तुझ्यापुढं लोटांगणं घालतात – ही शक्ती सतत अस्तित्वात आहे आणि कायम दिग्विजयी आहे. तेव्हा हे सन्माननीय चिचूंद्र्या, कोबीच्या सारा-आधी दारूचा एक घुटका मारू या !

बेस्सेमेनोव : जरा थांब. जेवण आणू देत, मग पिऊ. पण तू एवढा तडकून का बोलतोस ? कारणाशिवाय कडवट बोलून लोकांच्या भावना दुखवू नयेत. तुला काय वाटतं ते नम्रपणानं, चांगल्या रीतीनं सांगत जा, म्हणजे लोक लक्षपूर्वक ऐकतील. पण लोकांचा शब्दांनी अपमान करशील, तर कुणीही तुझं बोलणं ऐकणार नाही. जो ऐकेल, तो मूर्ख ठरेल !

नील (प्रवेशत) : पोल्या आली ?

तेतेरेव (किंचित हसून) : आली.

आकूलीना : तू कशाला तिची चौकशी करतोस ?

नील (तिला उत्तर न देता, तेतेरेवला) : ओहो! परत सुरू? अलिकडं सारखं सुरू केलंय तू...

तेतेरेव : लोकांचं रक्त पिण्यापेक्षा वोदका पिणं जास्त चांगलं! विशेषत: आजकाल माणसांचं रक्त फारच पातळ, वाईट आणि बेचव बनलंय. दमदार, चवदार रक्त फार कमी उरलंय. ते सगळं शोषून घेतलंय!

पोल्या मटणाची थाळी आणते, स्तेपानिदा सार आणते.

नील (पोल्यापाशी जात) : नमस्ते! उत्तर तयार?

पोल्या (दबत्या आवाजात) : इथं नको... सगळ्यां-समोर...

नील : का नको? भीती कशाची?

बेस्सेमेनोव : कुणाबद्दल बोलतोस?

नील : माझ्याबद्दल... आणि तिच्याबद्दल.

आकूलीना : काय झालं?

बेस्सेमेनोव : मला समजलं नाही...

तेतेरेव (किंचित हसून) : पण मला समजतंय... (वोदका ग्लासात ओततो आणि पितो.)

बेस्सेमेनोव : काय भानगड आहे? पालागेया, काय झालं ग?

पोल्या (शरमून हळू आवाजात) : काही नाही...

नील (मेजापाशी बसत) : रहस्य आहे... गुप्त गोष्ट!

बेस्सेमेनोव : गुप्त गोष्टी एखाद्या कोपऱ्यात जाऊन बोला – सगळ्या माणसांसमोर कशाला? धडधडीत आमच्यादेखत कपट-कारस्थानं! माणसाला स्वत:च्या घरातून

पळवून लावतील! खाणाखुणा काय करतात, कुजबुजतात काय, कट काय रचतात ... आणि मी मूर्खासारखा आ वासून बघतोय! नील, मी कोण आहे असं वाटतं तुला?

आकूलीना: खरंच, नील, काय हे ...

नील (शांतपणे): तुम्ही माझे धर्माचे बाप आहात. पण रागावण्याचं आणि दंगा करण्याचं काही कारण नाही. विशेष काहीही घडलेलं नाही.

पोल्या (खुर्चीवर नुकतीच बसलेली असते. परत उठून): नील ... वासिल्येविचनी ... काल संध्याकाळी ... मला सांगितलं ... विचारलं ...

बेस्सेमेनोव: काय विचारलं?.. आँ?

नील (शांतपणे): तुम्ही तिला घाबरवू नका. मी तिला विचारलं – माझ्याशी लग्न करशील का?

बेस्सेमेनोव यांच्या हातातील चमचा हवेत अधांतरीच राहतो व ते नील आणि पोल्याकडे चकित होऊन पाहतात. आकूलीना जागच्याजागी थिजते. तेतेरेव साव-काशपणे डोळ्यांची उघडझाप करत शून्यात टक लावून पहात राहतो. त्याचा गुडघ्यावरील हात मधूनमधून झटके देतो. पोल्या मान खाली घालून उभी राहते.

नील (पुढे बोलतो): आणि ती म्हणाली की आज ती मला उत्तर देईल. एवढंच!

तेतेरेव (हात झटकत): अगदी सरळ आणि साधं! व्रम्म!

बेस्सेमेनोव: अस्सं ... खरंच ... अगदी सरळ आणि

साधं! (कडवटपणे.) शिवाय आधुनिक! अगदी नव्या रीतीनं! पण तसं पाहिलं तर – माझा काय संबंध?

आकूलीना: धर्माची चाड नाही तुला! पाखंडी! अविचारी पोरगा आहेस तू! पहिल्यांदा आमच्याशी बोलायला हवं होतं...

नील (चिडून): आग लागो माझ्या जिभेला! कशाला बोललो मी ह्यांना?

बेस्सेमेनोव: तू चूप बैस ग! आपला काही संबंध नाही ह्या भानगडीशी! मुकाट खा. मीसुद्धा तोंडाला कुलूप घालतो.

तेतेरेव (झिंगत): पण मी बोलणार! किंवा तात्पुरतं मी माझं थोबाड बंद ठेवावं!

बेस्सेमेनोव: हो, सर्वांनी गप्प राहणं जास्त चांगलं. पण नील... माझ्या भाकर-मीठाची परतफेड काही चांगली केली नाहीस तू! नेहमी चोरट्या भानगडी करतोस – ह्यासारख्या!

नील: तुमच्या मीठ-भाकरीची परतफेड मी राबून केलीय आणि यापुढंही करीन. पण तुमच्या इच्छेपुढं मान तुकवणं मला जमणार नाही. त्या मूर्ख सेदोवाशी माझं लग्न लावून द्यायचा तुमचा बेत होता, कारण तिच्याकडून दहा हजाराचा हुंडा मिळणार होता. काय करायचीय ती मला? पोल्यावर माझं प्रेम आहे... खूप दिवसांपासून मी तिच्यावर प्रेम करतोय आणि ही गोष्ट कुणापासूनही मी लपवून ठेवलेली नाही. मी नेहमी उघडपणानं जगलोय आणि नेहमी तसाच

जगत राहीन. माझ्यावर ठपका ठेवण्याचं आणि माझ्याकडून अपमानीत होण्याचं काहीही कारण नाही.

बेस्सेमेनोव (संयम राखत): असं, असं! फार छान... तर मग काय? करा लग्न. आम्ही तुमच्या वाटेत आडवं येणार नाही. पण कोणत्या भांडवलाच्या आधारावर जगणार? जर रहस्य नसेल, तर सांगा!

नील: काम करू. मी डेपोत बदली करून घेतोय. आणि ती... तीसुद्धा काम करील. तुम्हाला पूर्वीप्रमाणंच माझ्याकडून दरमहा तीस रूबल मिळत राहतील.

बेस्सेमेनोव: बघू. वचनं देणं सोपं!

नील: माझ्याकडून लिहून घ्या तसं...

तेतेरेव: मध्यमवर्गीया! घे त्याच्याकडून लेखी! घे!

बेस्सेमेनोव: तुम्ही ह्या भानगडीत स्वत:चं नाक खुपसायची गरज नाही!

आकूलीना: आला मोठा... सल्लागार!

तेतेरेव: घेच लिहून त्याच्याकडून! पण नाही घेणार तू – तुला अब्रूची चाड जास्त! हिंमत होणार नाही तुझी! नील, दे त्याला लिहून: कबूल करतो की, दरमहा...

बेस्सेमेनोव: त्याच्याकडून मी तसं लेखी घेऊ शकेन! तसा मला हक्क आहे. त्याच्या वयाच्या दहाव्या वर्षापासून त्याला खाऊ-पिऊ घातलंय, कपडालत्ता दिलाय. आता सत्तावीस वर्षांचा आहे तो...

नील: आपण आपला हिशेब नंतर केला तर चालणार नाही का?

बेस्सेमेनोव : चालेल ! (चिडून .) पण लक्षात ठेव नील, आजपासून आपण एकमेकांचे शत्रू ! माझा हा अपमान मी कधीही विसरणार नाही – मी तुला त्याबद्दल कधीही क्षमा करणार नाही !

नील : कसला अपमान ? कोणता अपमान ? मी तुमच्याशी लग्न करीन, अशी तर अपेक्षा ठेवली नव्हतीत ना ?

बेस्सेमेनोव (नीलचे बोलणे न ऐकताच संतापाने ओरडतो) : लक्षात ठेव ! ज्यानं तुला खाऊ-पिऊ घातलं, कपडालत्ता पुरवला, त्यालाच नाक वर करून तोरा दाखवतोस ! गुप्त खलबतं करतोस ... सल्ला घेत नाहीस ... माझ्यापाठी कारस्थानं करतोस ! (पोल्याला .) आणि तू ग ! गोगलगाय पोटात पाय ! मुंडी खाली का घातलीस ? दातखीळ बसली ? तुझं काय करू शकेन मी हे ठाऊक आहे का तुला ?

नील (ताडकन उठत) : तुम्ही काहीही करू शकत नाही ! आरडाओरडा थांबवा ! ह्या घरात मीसुद्धा मालक आहे . दहा वर्षं मी राबलोय आणि माझी कमाई मी तुम्हाला देत आलोय . इथं माझा खूप पैसा खर्ची पडलाय . (जोरात पाय आपटतो आणि सबंध खोलीभर हात फिरवतो .) जो राबतो तोच मालक !

नील बोलत असताना पोल्या उठते आणि जाते . दारात तिची प्योत्र व तात्यानाशी भेट होते . प्योत्र खोलीत डोकावतो आणि नाहीसा होतो . पण तात्याना दाराजवळच्या खांबाला धरून उभी राहते .

बेस्सेमेनोव (नीलकडे डोळे वटारून पहात) : का... य? मालक? तू?

आकूलीना : चला हो इथून! चला बघू! (नीलला मुठीने धमकावत.) नील... कारटचा... थांब! (अश्रु-भरल्या नजरेने.) ... तुला चांगली अद्दल घडेल!

नील (निर्धारपूर्वक) : होय, जो राबतो तोच मालक! नीट लक्षात ठेवा!

आकूलीना (नवऱ्याला स्वतःबरोबर ओढून नेत) : चला हो तुम्ही! चला! मरोत ते! काही बोलू नका... काही ओरडू नका... कोण ऐकतंय आता आपलं?

बेस्सेमेनोव (बायकोच्या खेचण्याला विरोध करण्याचे थांबवून) : ठीक आहे! व्हा तुम्ही... मालक! पाहू... कोण मालक आहे ते! बघून घेऊ! (स्वतःच्या खोलीत आकूलीनाबरोबर निघून जातो.)

नील उत्तेजित मनाने खोलीत येरझाऱ्या घालतो. रस्त्या-वर दूर कुठेतरी बाजाची पेटी वाजतेय.

नील : चांगलाच गोंधळ करून ठेवला मी! कशाला मूर्खासारखं मी तिला विचारलं? अगदीच गाढव मी! माझ्यापाशी गुप्त काही रहातच नाही! इच्छा नसता-नाही सगळं बाहेर पडतं! छीः छीः!

तेतेरेव : काही बिघडलं नाही. नाट्यप्रसंग मोठा छान रंगला! अत्यंत आनंदानं मी ऐकला आणि पाहि-ला. फारच रंगतदार! बंधू, चिंता करू नको. नायका-च्या भूमिका रंगवण्याची तुझ्यात ताकद आहे. सध्याच्या

काळात नायकाची गरज आहे ... माझ्यावर विश्वास ठेव! आपल्या काळात सगळया माणसांची दोन प्रकारांमध्ये विभागणी केली पाहिजे : नायक, जे मूर्ख आहेत आणि हलकट, जें हुशार आहेत ...

नील : पोल्याला तशा विचित्र पेचात मी कशाला अडकवलं? घाबरली काय ती? नाही, ती भित्री नाही! कदाचित रागावली असणार! छ्या: !

आत्तापर्यंत दारात स्तब्ध उभी असलेली तात्याना पोल्याच्या उल्लेखासरशी दचकते. बाजाची पेटी वाजायची थांबते.

तेतेरेव : लोकांची मूर्खांमध्ये आणि हलकटांमध्ये विभागणी करणं फार सोपं आहे. हलकट – चिक्कार आहेत! बंधू, पशूंच्या बुद्धीनं ते जगतात. त्यांना फक्त बळाची भाषा समजते. माझ्यासारख्याचं बळ नव्हे – माझ्या छातीत आणि हातात सामावलेलं बळ नव्हे – धूर्ततेचं बळ! धूर्त पशूंची बुद्धी!

नील (त्याचे बोलणे न ऐकता) : आता लग्न लौकर, घाईनं करावं लागणार! जेवढं लौकर, तेवढं जास्त बरं! अजून तिनं मला उत्तर दिलं नाही, पण ती काय म्हणेल ते मला ठाऊक आहे. फार चांगली मुलगी आहे!.. ह्या माणसाचा मात्र मला विलक्षण तिटकारा वाटतो ... ह्या घराचा ... इथल्या सगळया जीवनाचा ... सडक्या आयुष्याचा! इथं राहणारी सगळी माणसं विक्षिप्त आहेत. आयुष्य नासवायला ती स्वत:च जबाबदार आहेत ह्याची त्यांच्यापैकी एकालाही जाणीव

नाही. आयुष्याचा त्यांनी तुरुंग बनवलाय! छळवादी! दुर्दैवी! असं करणं त्यांना कसं जमतं कोण जाणे! पण आयुष्य नासवणारी माणसं मला नजरेसमोर नकोशी होतात...

तात्याना एक पाऊल पुढे टाकते, थोडी थबकते. नंतर पावलांचा आवाज न करता कोपऱ्यातील पेटीवर जाऊन बसते. पोक काढून बसल्यामुळे ती खूप लहान आणि अधिक केविलवाणी भासते.

तेतेरेव: मूर्ख माणसं जीवनाला सुंदर नटवतात. मूर्खांची संख्या फार नाही. केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर दुसऱ्यांसाठीही, त्यांचा कसलातरी शोध चालू असतो. जगाला सुखी करण्याच्या आणि तत्सम फालतू योजना त्यांच्या डोक्यात घोळत असतात. सगळ्या गोष्टींचा आदी-अंत हुडकून काढू पाहतात. एकूण... त्यांचा अत्यंत मूर्खपणा चालू असतो...

नील (विचारमग्न होत): खरंच, मूर्खपणा! त्यात माझा हातखंडा आहे. पण ती माझ्यापेक्षा जास्त सूज्ञ आहे. तीसुद्धा आयुष्यावर प्रेम करते... पण तिचं प्रेम शांत-निवांत स्वरूपाचं आहे. आमचं एकत्र जीवन फार सुरेख असेल! आम्ही दोघंही धाडसी आहोत... आणि एखाद्या गोष्टीला साध्य करायचं ठरवलं, म्हणजे मग माघार नाही! नक्की प्राप्त करणार! ती मला... नुकत्या जन्मलेल्या बाळासारखी भासते. (हसतो.) ती आणि मी... दोघं एकत्र छान जगू!

तेतेरेव: मूर्ख माणूस सबंध आयुष्यभर नवल करत

बसेल – काच पारदर्शी का? तर हलकट माणूस सरळ काचेपासून बाटली बनवतो.

रस्त्यावर बाजाची पेटी परत वाजू लागते. ह्यावेळी अगदी खिडकीपाशी.

नील : तुझं सगळं ध्यान बाटल्यांवर!

तेतेरेव : नाही ... मूर्खांवर! आग पेटवण्यापूर्वीच आग कुठं आहे असा प्रश्न मूर्ख स्वतःला विचारतो. आणि आग विझली म्हणजे कुठं गेली अशी चौकशी करत बसतो. पण हलकट माणूस सरळ आगीपाशी बसतो आणि त्याला छान ऊब मिळते!

नील (विचारमग्न होत) : खरंच ... छान ऊब मिळते!

तेतेरेव : खरं सांगायचं तर प्रत्यक्षात ते दोघंही अक्कलशून्य! पण एक वेडेपणा सुंदर आणि शौर्यशाली, तर दुसरा शुंभ, भिकारडा. दोघंही जरी वेगवेगळ्या वाटांनी चालतात, तरी शेवटी मात्र एकाच मुक्कामी पोचतात – थडग्यात! माझ्या मित्रा, शेवटी फक्त थडगं! (हसतो.)

तात्याना सावकाशपणे मान हलवते.

नील (तेतेरेवला) : तुला काय झालंय?

तेतेरेव : मी हसतोय ... जिवंत राहिलेले मूर्ख आपल्या मेलेल्या बंधूकडं टक लावून पाहतात आणि स्वतःला विचारतात : कुठं गेला तो? पण हलकट लोक मेलेल्यांची इस्टेट सरळ बळकावतात आणि तृप्त, आकंठ, चैनीचं आयुष्य जगत राहतात. (हसतो.)

नील : चांगलाच झिंगला आहेस तू ! तुझ्या खोलीत का जात नाहीस ?

तेतेरेव : माझी खोली ? कुठं आहे मला खोली ?

नील : पुरे झाला चक्रमपणा ! मी तुला तुझ्या खोलीत घेऊन जाऊ का ?

तेतेरेव : बंधू , तुला ते काम जमणार नाही ! ना मी आरोपी , ना मी फिर्यादी ! माझा मीच आहे ! मी म्हणजे गुन्ह्याचा प्रत्यक्ष पुरावा ! आयुष्याचा सत्यानाश झालाय ! चांगल्या माणसांना ते तोकडं होतंय . मध्यमवर्गीयांनी त्या आयुष्याला उसवून स्वतःला त्यात कोंबून घेतलं आणि आता ते घट्ट आखूड झालंय ! ह्या वस्तुस्थितीचा मी साक्षात पुरावा – माणसाला कुठंही थारा नाही . जगायला कारण नाही आणि जगण्यासारखं काहीही नाही .

नील : पुरे आता ! जा ! जा बघू !

तेतेरेव : हात लावू नको मला ! मी खाली पडेन असं वाटतं तुला ? मी केव्हाच पडलोय , मूर्खा ! खू ... प खू ... प पूर्वीच ! माझ्या पायांवर उठायची मी धडपड करत होतो , पण तू आलास आणि नकळत धक्का मारून मला परत खाली पाडलंस . ठीक आहे . तू जा पुढं ! जा , माझी तक्रार नाही . तू धडधाकट आणि समर्थ आहेस ... इच्छा असेल तिकडं आणि इच्छा असेल त्या रीतीनं तू जाऊ शकतोस ... माझ्यासारखा पतित कौतुकाच्या नजरेनं तुला पाहतोय – जा पुढं !

नील : काय वटवट लावली आहेस तू ? ऐकायला छान वाटतंय , पण काहीही समजत नाही !

तेतेरेव : आणि समजून घेऊच नको! गरज नाही! काही गोष्टी न समजलेल्याच चांगल्या किंवा त्या समजूनही काही उपयोग नसतो. तू जा, पुढं जा!

नील : ठीक आहे, मी जातो! (हॉलमध्ये निघून जातो. कोपऱ्यात बसलेल्या तात्यानाकडे त्याचे लक्ष जात नाही.)

तेतेरेव (नीलपाठी वाकून अभिवादन करत) : चोरा, सुखी हो! नकळत तू माझी शेवटची आशा हिरावून घेतलीस ... जाऊं दे साली! (बाटली ठेवलेल्या मेजाकडे जात असताना खोलीच्या कोपऱ्यातील तात्यानाच्या आकृतीकडे त्याचे लक्ष जाते.) अरेच्चा! कोण असावं बरं तिथं?

तात्याना (हळूच) : मी आहे ...

बाजाची पेटी अचानक वाजायची थांबते.

तेतेरेव : तुम्ही? हं ... मला वाटलं, मला भास झाला ...

तात्याना : नाही, मी आहे.

तेतेरेव : समजलं ... पण तुम्ही का? इथं तुम्ही का?

तात्याना (हळू आवाजात, पण स्पष्ट आणि ठळकपणे) : कारण मला जगायला कुठंही थारा नाही, जगण्यासारखं काही नाही, जगायला काही कारण नाही ...

तेतेरेव सावकाश पावलांनी मुकाटपणे तिच्याकडे जातो.

मी एवढं का थकून जावं आणि केविलवाणं व्हावं,

मला माहीत नाही ... पण कमालीची शिणल्येय एवढं खरं! माझं वय फक्त अठ्ठावीस आहे ... आणि अशी मी शिणावी, ह्याची मला खरंच फार लाज वाटत्ये! ह्या दुबळेपणाच्या आणि हीणपणाच्या भावनेची शरम वाटत्ये! माझ्या अंतरी ... माझ्या काळजात ... रितेपणा नुस्ता! सगळं सुकून गेलंय ... जळून गेलंय ... मला हे जाणवतंय आणि त्याच्या वेदना होतात! असं कसं घडलं ते समजलंच नाही ... माझ्या नकळत माझ्या अंतरी रितेपण भरत गेलं!.. पण कशाला हे सगळं मी तुम्हाला सांगत्येय?..

तेतेरेव : काही समजत नाही ... दारू फार चढलीय ... अजिबात काही समजत नाही.

तात्याना : मला हवं त्या रीतीनं माझ्याशी कुणीही बोलत नाही. मला आशा होती ... तो बोलेल ... मुकाट-पणं फार काळ वाट पाहिली. पण हे आयुष्य ... भांडणं, क्षुद्रपणा, नीचपणा ... ही घुसमट ... ह्या सगळ्या गोष्टींनी मला दाबून टाकलं. हळूहळू, नकळत! जगायचं आता बळ नाही. माझ्या निराशेतसुद्धा बळ नाही! मला भीती वाटतेय ... अचानक मला भीती वाटतेय!

तेतेरेव (डोके हलवत तिच्यापासून दूर दाराकडे जातो. दार उघडल्यावर मागे वळतो आणि जड जिभेने बोलतो) : ह्या घराचा नायनाट होवो! बस्स ... पुरता नाश होवो!

तात्याना संथपणे स्वतःच्या खोलीकडे जाते. क्षणभर रंगमंच रिकामा आणि स्तब्ध. मग पोल्या झपाट्याने आणि आवाज न करता प्रवेश करते. पाठोपाठ नील

येतो. काहीही न बोलता ती दोघे खिडकीपाशी जातात. तेथे नील पोल्याचा हात पकडतो आणि दबत्या आवाजात बोलतो.

नील: आज जे काही घडलं, त्याबद्दल मला क्षमा कर. तो अगदीच मूर्खपणा आणि अजागळपणा झाला माझा! पण बोलायची जेव्हा इच्छा होते, तेव्हा गप्प बसणं मला जमत नाही!

पोल्या (अगदी कुजबुजत्या स्वरात): काहीही होवो! आता काहीही होवो! कोण ते माझे? मला मुळीच पर्वा नाही!

नील: मला माहीत आहे... तुझं माझ्यावर प्रेम आहे! मला ते दिसतं... मी तुला त्याबद्दल विचारणार-सुद्धा नाही. तू इतकी मजेदार आहेस – काल म्हणा-लीस: उद्या उत्तर देईन, मला विचार केला पाहिजे! विचित्रच आहेस! विचार कसला करायचा? प्रेम आहे ना?

पोल्या: होय, होय! केव्हापासून!

तात्याना दारामागे लपते आणि पडद्याआडून त्यांचा संवाद ऐकते.

नील: बघच तू – आपण खूप छान जगू! तू इतकी सुरेख साथीदारीण आहेस! गरीबीला तू भीत नाहीस... संकटांना हसतमुखानं तोंड देत्येस...

पोल्या (साधेपणाने): तू बरोबर असताना भ्यायचं कशाला? स्वतःशीसुद्धा मी दुबळी नाही... मी फक्त शांत आहे.

नील: आणि निग्रही आहेस. बळकट आहेस... तुला वाकवणं अशक्य. मी खूप आनंदात आहे. असं घडणार हे मला माहीत होतं. माझ्या आनंदाला पारावार उरला नाही!

पोल्या: मलाही आधीच सगळं माहीत होतं...

नील: खरंच? माहीत होतं? हे फार छान... जगणं किती छान आहे! होय ना?

पोल्या: होय लाडक्या, खूप छान आहे! कित्ती चांगला आहेस रे तू!

नील: तू जे काही बोलतेस ना... फार सुंदर सांगितलंस!

पोल्या: उगीच स्तुती करू नकोस! बरं, आपण आता गेलं पाहिजे इथून! कुणीतरी यायचं अचानक!

नील: खुशाल येवोत!

पोल्या: नाही, गेलं पाहिजे!.. अरे, परत माझं चुंबन घे!..

त्याच्या मिठीतून सोडवून घेत पोल्या धावत निघून जाते. तात्यानाला ती पहात नाही. पण सस्मित मुद्रेने पोल्यापाठी जाणारा नील तात्यानाला पाहतो व एकदम थबकतो. तो चकित होतो आणि त्याची मुद्रा त्रासिक बनते. ती मंद नजरेने टक लावून मुकाटपणे त्याच्याकडे पहात राहते. तिच्या ओठांवर छद्मी स्मित उमटते.

नील: (तिरस्काराने): चोरून ऐकत्येस? चोरून डोकावून पाहत्येस? छीः! (पटकन निघून जातो.)

तात्याना पुतळ्यासारखी थिजून जागच्या जागी उभी राहते. नील जाताना हॉलचा दरवाजा अर्धवट उघडा टाकतो आणि त्यातून बेस्सेमेनोवचा राकट आवाज ऐकू येतो: "स्तेपानिदा, कोळसे कुणी सांडले? दिसत नाही का? झाडून घे!"

पडदा

अंक तिसरा

स्थळ: पूर्वीचेच.

सकाळ. स्तेपानिदा फर्निचरवरील धूळ झटकत आहे. आकूलीना चहाचे प्याले धूत आहे.

आकूलीना: आज मटणाला फारशी चरबी नाही, तेव्हा असं कर: कालच्या रश्शावरचा तवंग काढून घे आणि कोबीच्या सारामध्ये मिसळ... म्हणजे सार चांगलं दाट दिसेल... ऐकलंस?

स्तेपानिदा: ऐकत्येय...

आकूलीना: आणि कोकराची सागुती तळताना सैल हातानं तूप वापरू नकोस... बुधवारी पाच पौंड मी विकत आणलं आणि काल पाहत्ये तर एक पौंडसुद्धा शिल्लक उरलेलं नाही...

स्तेपानिदा : आपण सगळं वापरलं...

आकूलीना : ते तू मला सांगायची गरज नाही... तुझ्या टाळक्यावर बघ किती माखलं आहेस... वंगण-वाल्याचं डबडं भरेल!

स्तेपानिदा : मुळीच नाही. मी केसांना दिव्याचं तेल माखते. वासावरून समजत नाही का?

आकूलीना : बरं बरं, पुरे!

स्तब्धता.

आज सकाळीच तात्यानानं तुला कुठं धाडलं होतं?

स्तेपानिदा : औषधांच्या दुकानात. नवसागर आणा-यला. वीस कोपेकचं नवसागर विकत घेऊन ये, असं म्हणाल्या.

आकूलीना : बहुधा डोकं दुखत असावं... (सुस्कारा टाकून.) नेहमी काही ना काही दुखणं आहे तिला!

स्तेपानिदा : लग्न का करून टाकत नाही? झटक्यात सगळी दुखणी पळतील!

आकूलीना : आजकाल मुलींची लग्नं करून देणं तेवढं सोपं राहिलं नाही आणि शिकलेल्या मुलींबाबत तर फारच अवघड!

स्तेपानिदा : चांगला घसघशीत हुंडा द्या, म्हणजे शिक्षणासकट तिला कुणी पत्करील!

प्योत्र क्षणभर आपल्या खोलीतून डोकावतो व परत नाहीसा होतो.

आकूलीना : तो सुखाचा दिवस माझ्या डोळ्यांना

पाहण्याचं भाग्य नाही मिळणार ... लग्न करायची तान्याची इच्छा नाही.

स्तेपानिदा : इच्छा नसायला काय झालं! ह्या वयात ?

आकूलीना (उसासा टाकते) : काल रात्री वरच्या मजल्यावरच्या बाईकडं कोण कोण होतं ?

स्तेपानिदा : तो मास्तर ... लाल केसांचा ...

आकूलीना : ज्याची बायको पळून गेलीय तो ?

स्तेपानिदा : हो, हो, तोच! शिवाय जकातवाला – हडकुळा आणि पिवळ्या तोंडाचा!

आकूलीना : माहीत आहे तो मला! व्यापारी पीमेनोवच्या पुतणीशी लग्न केलंय त्यानं ... त्याला क्षय झालाय!

स्तेपानिदा : सांगायला कशाला पाहिजे ... स्पष्ट दिसतंच!

आकूलीना : आपला गाणारा होता ?

स्तेपानिदा : गाणारा होता, प्योत्र वासिल्यिच होते ... रात्री दोन वाजेपर्यंत आपला गाणारा बेंबीच्या देठापासून गाणी ओरडत होता ... बैलासारखा डरकाळ्या फोडत होता!

आकूलीना : पेत्या घरी केव्हा परतला ?

स्तेपानिदा : त्यांच्यासाठी मी दार उघडलं तेव्हा बाहेर फटफटलं होतं.

आकूलीना : बाई ग!

प्योत्र (प्रवेश करीत) : स्तेपानिदा, आटप लौकर तुझं काम आणि पळ इथून!

स्तेपानिदा : आत्ता उरकते ... लौकर काम आटपलं तर मलाच आनंद आहे.

प्योत्र : आनंद वाटेल ना ? तर मग वटवट कमी कर आणि काम जास्त कर !

स्तेपानिदा नाकाने फुर्रर्र आवाज करते आणि निघून जाते.

आईसाहेब, तिच्याशी फार बोलत जाऊ नका असं किती वेळा सांगितलंय तुम्हाला ! स्वैपाकिणीशी आपल्या खाजगी गोष्टी बोलणं चांगलं नव्हे ! केव्हा समजणार तुम्हाला ? आणि तिच्यापाशी चौकशा करायच्या ... भलत्या गोष्टींच्या ... अगदी वाईट हे !

आकूलीना (अपमानीत स्वरात) : मी कुणाशी बोलायचं हे आता तुझ्या परवानगीनं ठरवायचं काय ? तू स्वतः जर माझ्याशी आणि स्वतःच्या वडलांशी बोलत नाहीस, तर मोलकरणीशी मला चार शब्द बोलायला दे !

प्योत्र : अहो पण ती मोलकरीण तुमच्या तोलाची आहे का ? कुचाळक्या सोडून तिच्यापासून तुम्हाला दुसरं काय ऐकायला मिळणार ?

आकूलीना : आणि तुझ्यापासून काय ऐकायला मिळतं ? सहा महिने घरात राहतो आहेस ... पण जन्म-दात्या आईबरोबर एकदासुद्धा तासभर कधी बसला नाहीस ... काही सांगितलं नाहीस ... मॉस्कोबद्दल आणि इतर गोष्टींबद्दल ...

प्योत्र : पण ऐका ...

आकूलीना : आणि जेव्हा बोलतोस – तेव्हा नुसतं "हे करू नका" आणि "ते करू नका"! जन्मदात्या आईला एखादी शेंबडी पोरगी समजून शिकवायला लागतोस, रागं भरतोस, टवाळी करतोस!

प्योत्र हात झटकून वेगाने हॉलमध्ये निघून जातो.

आकूलीना त्याच्या पाठी बोलते.

पाहिलंस? किती वेळ बोललास? (एप्रनच्या टोकाने डोळे पुशीत हुंदका देते.)

पेर्चिखिन (प्रवेश करतो. त्याच्या अंगात जुनी दुलईची बंडी आहे. बंडीच्या भोकांमधून कापसाचे धागे डोकावत आहेत. कमरेला त्याने दोरी बांधलीय, डोक्यावर फरची टोपी आणि पायात तागाच्या सालीची पादत्राणे) : तू का नाक सुरसुरते आहेस? प्योत्र काही भलतं बोलला का? माझ्याजवळून पक्ष्यासारखा सुळकन गेला... नमस्कारसुद्धा केला नाही. पोल्या – इथं आहे?

आकूलीना (उसासत) : स्वैपाकघरात, कोबी चिरतेय...

पेर्चिखिन : पक्ष्यांच्या जातीत चांगली रीत आहे – पिल्लाला पंख फुटले म्हणजे चारी दिशांना जायला ते मोकळं! आई-बापांनी कसलीही प्रवचनं झोडायची गरज नाही!.. घोटभर चहा माझ्यासाठी शिल्लक राहिलाय काय?

आकूलीना : पक्ष्यांची रीत तू स्वतःच्या घरात वापर-तोस ना?

पेर्चिखिन : अगदी बरोब्बर! आणि किती छान!

माझ्यापाशी काहीही नाही, माझा कुणाला त्रास नाही... जणू मी जमिनीवर रहातच नाही... हवेत तरंगतो!

आकूलीना (तिरस्काराने): आणि म्हणून माणसांना तुझ्याबद्दल काडीचा आदर नाही... घे, पी... मात्र चहा गार झालाय... आणि थोडा फिका आहे...

पेर्चिखिन (ग्लास उजेडात धरीत): खरंच, चहा फिका आहे... पण ग्लास रिकामा नाही हे काय थोडं? मात्र दाट चहात अडकून पडशील! आता लोकांच्या आदराबाबत म्हणायचं तर नकोच मला त्यांचा आदर... मी खुद्द कुणाबद्दलही आदर बाळगत नाही...

आकूलीना: तुझा आदर कुणाला पाहिजे? कुणालाही नको...

पेर्चिखिन: हे तर फारच उत्तम! मी पाहिलंय की, धरतीवर राहणारी माणसं एकमेकांच्या तोंडातून भाकरीचा तुकडा हिसकावून घेत असतात! पण माझी भाकरी आकाशातून येते... पक्ष्यांकडून... अगदी शुद्ध स्वरूपात!

आकूलीना: तर, तर! आला मोठा शुद्ध! काय रे, लग्न केव्हा? लौकरच?

पेर्चिखिन: कुणाचं? माझं? माझ्याशी लग्न ठरलेली कोकिळा अजून आपल्या रानात आली नाही साली! फारच उशीर लावत्येय... माझा दम टिकणं अवघड झालंय... ती पोचायच्या आतच बहुधा मी मरणार!

आकूलीना: फालतू वटवट करू नकोस, सरळ सांग! केव्हा लगीन लावणार?

पेर्चिखिन: कुणाचं?

आकूलीना : तुझ्या मुलीचं ! जणू काही माहीतच नाही असा आव आणतोस – छी !

पेर्चिखिन : माझ्या मुलीचं ? जेव्हा तिची इच्छा असेल ... तेव्हा लगीन लावून देईन !.. मात्र तिच्याशी लग्न करणारा कुणी तयार असला तर !

आकूलीना : फार पूर्वीपासून त्यांचा हा बेत शिजला होता का ?

पेर्चिखिन : बेत ? कुणाचा ?

आकूलीना : लग्नाचा ...

पेर्चिखिन : कुणाचं लग्न ?

आकूलीना : हात् मेल्या ! एवढा म्हातारा झालास – लाज वाटली पाहिजे स्वतःच्या मूर्खपणाची !

पेर्चिखिन : जरा थांब !.. उगीच न चिडता मला सरळ सांग – काय भानगड आहे ?

आकूलीना : तुझ्याशी बोलणं अशक्य आहे !

पेर्चिखिन : पण तू बोलते आहेस ... बराच वेळ बडबडते आहेस ... पण ना शेंडा ना बूड तुझ्या बोलण्याला !

आकूलीना (कोरड्या आणि मत्सरी सुरात) : पालागेयाचं नीलबरोबर कधी लग्न लावणार ?

पेर्चिखिन (आश्चर्याने ताडकन उठत) : का-य ? नीलबरोबर ?.. खरंच ?

आकूलीना : म्हणजे खरंच तिनं तुला सांगितलं नाही ? हद्द झाली बाई माणसांची आता !.. जन्मदात्या बापालासुद्धा ...

पेर्चिखिन (आनंदाने) : खरं सांगत्येस तू ? थट्टा

करतेस ना? नीलशी? कमाल आहे शिंच्यांची! अगदी खरंच कमाल! अग कारटे! पोल्या-पोल्या! ए, तू खोटं बोलत नाहीस ना? आणि मी मनाशी म्हणत होतो की, नील एक दिवस तात्यानाशी लग्न करणार! शप्पत! दिसत तर असं होतं की, तात्यानाबरोबर...

आकूलीना (अपमानीत स्वरात): जणू आम्ही तात्यानाला त्याला दिलं असतं! काय गरज... असल्या रिकामटेकड्याची?

पेर्चिखिन: नीलबद्दल असं म्हणत्येस? कमाल आहे तुझी! मला जरी दहा मुली असत्या... तरी अगदी डोळे मिटून दहाच्या दहाजणींना मी नीलला देऊन टाकलं असतं! शंभर तोंडांना खाऊ घालील असा भारी गडी आहे!

आकूलीना (उपहासाने): मला दिसतंय – सासरा तर त्याला झकास मिळणार! फा-र आनंद वाटला!

पेर्चिखिन: सासरा! हा-हा! हा सासरा कुणाच्याही डोक्यावर बोजा म्हणून बसायला तयार नाही! शीः! पाहिलंस? अतिआनंदानं माझे पाय आपोआप नाचताहेत! आता मी अगदी स्वतंत्र पोरगा! असा मस्त जगणार! इतःपर कुणाच्याही दृष्टीला पडणार नाही – थेट जंगल! पेर्चिखिन गायब! कमाल पोरगी आहे पोल्या! वाटायचं – कसं होणार बिचाऱ्या मुलीचं? खरंच वाईट वाटायचं! तिला जन्म दिला – पण बस्स! फक्त तेवढंच केलं! पण आता... मन मानेल तिथं जाईन! पार जगाच्या दुसऱ्या टोकाला आगीचा पक्षी धरायला जाईन!

आकूलीना : आता कुठं जातोस? भाग्य आल्यावर कुणी आयुष्याकडं पाठ फिरवून जातं का?

पेर्चिखिन : भाग्य? आयुष्याकडं पाठ फिरवून जायला मिळणं हेच भाग्य समजतो मी! पोल्या आता सुखी होईल ... खरंच सुखी होईल! नीलबरोबर तर नक्कीच! तो चांगला दणकट आहे, आनंदी आहे, साधा आहे ... माझ्या डोक्यातला मेंदूसुद्धा आनंदानं थयथय नाचतोय! आणि काळजात चंडोल गाणी म्हणताहेत! असा भाग्यवान म्हातारा कधी झाला होता? (गाण्याच्या सुरात.) पोल्याची नीलशी जमली जोडी! आयुष्याला त्यांच्या भलतीच गोडी!..

बेस्सेमेनोव (प्रवेश करतात. अंगात ओव्हरकोट व हातात टोपी) : परत झिंगलास काय?

पेर्चिखिन : आनंदाची झिंग आलीय! ऐकलंस? पालागेयाबद्दल? (आनंदाने हसतो.) नीलशी लग्न करत्येय! धमाल आहे की नाही?

बेस्सेमेनोव (थंड आणि कठोर सुरात) : आमचा त्याच्याशी काहीएक संबंध नाही ... मात्र आमचं येणं आम्ही वसूल करू!

पेर्चिखिन : आणि सारा वेळ समजत होतो की, नील तात्यानाशी लग्न करणार!

बेस्सेमेनोव का ... य?

पेर्चिखिन : शप्पत! स्पष्ट दिसत होतं की, तात्यानाचा ह्याला विरोध नव्हता ... आणि त्याच्याकडं ती अशा नजरेनं पहायची ... अशा नजरेनं ... कशा ते तुला ठाऊकच आहे ... समजलं? आणि अचानक ...

बेस्सेमेनोव (शांतपणे आणि संताप दाबून) : भल्या गृहस्था, मी काय सांगतो ते ध्यान देऊन ऐक – तू मूर्ख असशील, पण तरीही तुला समजलं पाहिजे की, एखाद्या मुलीच्या बाबतीत असं बोलणं सभ्यपणाचं मानत नाहीत ! ही – पहिली गोष्ट ! (हळूहळू आवाज चढवत जातो.) तुझी मुलगी कुणाकडं आणि कशी पाहते, ती कशा प्रकारची मुलगी आहे, ह्याच्याशी मला काहीही कर्तव्य नाही – पण एक मात्र निक्षून सांगतो : जर ती नीलशी लग्न करत असेल – तर पीडा संपली ! कारण ती दोघंही कवडी किंमतीची आहेत आणि जरी ती मला भरपूर देणं असली, तरी मी त्यांच्यावर थुंकतो ! ही – दुसरी गोष्ट ! आता शेवटची – तू आणि मी दूरचे नातेवाईक असलो तरी एकदा स्वतःचा अवतार पहा : कुणासारखा दिसतोस ? निव्वळ भटक्या ! अशा परिस्थितीत एखाद्या प्रतिष्ठित घरात तुला कोण येऊ देईल ? ह्या घाणेरड्या चिरगुटात आणि खेडवळ बुटात ?

पेर्चिखिन : अरेच्चा ! असं काय झालं तुला वासिली वासिल्येविच ? बंधू, काय रे ? मी काय इथं असा पहिल्यांदा येतोय ?

बेस्सेमेनोव : किती वेळा आलास ते मी मोजलं नाही आणि मोजायची इच्छा नाही ! पण एक मात्र दिसतं : ज्या अर्थी अशा अवतारात येतोस, त्याअर्थी घराच्या यजमानाबद्दल तुझ्या मनात आदर नाही. पुन्हा एकदा म्हणतो : कोण आहेस तू ? भिकारी, भटक्या, पाजी माणूस ! ऐकलंस ?.. ही तिसरी गोष्ट ! – आता

चालता हो इथून !

पेर्चिखिन (स्तंभित होऊन) : वासिली वासिल्येविच ! कशाबद्दल ? कोणत्या ...

बेस्सेमेनोव : चालता हो ! उगाच वटवट लावू नको !

पेर्चिखिन : लक्षात ठेव ! मी तुला काहीही दुःख दिलेलं नाही ...

बेस्सेमेनोव : जा म्हणतो ना ? चालता हो, नाही तर ...

पेर्चिखिन (सखेद संतापाने जात) : अरे म्हाताऱ्या ! वाईट वाटतं मला तुझ्याबद्दल ! अच्छा ! चलतो मी.

बेस्सेमेनोव खांदे ताठ करतात व ठाम, दणकट पावलांनी खोलीत मुकाट फेऱ्या मारू लागतात. आकूलीना चहाची भांडी स्वच्छ करता करता भित्र्या नजरेने नवऱ्याकडे पाहते. तिचे हात थरथर कापत आहेत आणि ती स्वतःशी काहीतरी पुटपुटते.

बेस्सेमेनोव : तू काय पुटपुटते आहेस ? मंत्र घालतेस काय ?

आकूलीना : मी देवाची प्रार्थना करतेय ... प्रार्थना !

बेस्सेमेनोव : मी महापौर होईन असं दिसत नाही ! मुळीच चिन्हं नाहीत – हलकट साले !

आकूलीना : असं कसं ? देवा रे देवा ! का बरं ? कदाचित ...

बेस्सेमेनोव : काय – कदाचित ? फेदका दोसेकिन, लोहार संघाचा प्रमुख, महापौर व्हायला बघतोय ! उपटसुंभ ! शेंबडा पोर !

आकूलीना : कदाचित ... त्याला निवडणार नाहीत ...

एवढ्यात धीर सोडू नका!

बेस्सेमेनोव : निवडणार ... स्पष्ट दिसतंय! आज तिथं गेलो तर मारे जोरात शिरा ताणत होता – आपल्या सगळ्यांचा म्हणे कठीण काळ आलाय! म्हणतो – एकजुटीनं रहायला पाहिजे. सगळ्या गोष्टी सगळ्या कारागिरांनी मिळून ठरवल्या पाहिजेत! कारखाने भरा-भरा उगवताहेत, अशा वेळी कामगार स्वतंत्रपणं काही करू शकणार नाहीत, असं म्हणाला! मग मी म्हणालो – सगळा दोष यहुद्यांचा! यहुद्यांना काबूत ठेवलं पाहिजे. गव्हर्नराकडं त्यांच्याविरुद्ध लेखी तक्रार केली पाहिजे – आम्हा रशियनांना कशी संधी देत नाहीत त्याबद्दल आणि सगळ्या यहुद्यांची दुसरीकडं पाठवणी करा, असं सांगितलं पाहिजे!

तात्याना हळूच दार उघडते आणि स्वतःच्या खोलीकडे अडखळत्या पावलांनी जाते.

त्यावर तो गालात हसतो आणि म्हणतो : "आणि यहुद्यांपेक्षा जास्त वाईट असलेल्या रशियनांचं आपण काय करायचं?" आणि वेगवेगळ्या सावध शब्दात माझ्यावर टीका करायला लागला ... मी न समजल्याचा आव आणला, पण त्याचा रोख माझ्या ध्यानात आला होता ... डांबरट कुठला! त्याचं थोडं ऐकलं आणि बाजूला झालो ... मनाशी म्हटलं – थांब बेट्या! घेतो तुझा समाचार! तेवढ्यात चुलाणेवाला मिखाईल क्र्यू-कोव माझ्यापाशी येऊन म्हणतो : "दोसेकिन महापौर झाला पाहिजे!" आणि माझ्या नजरेला नजर द्यायचं

टाळून तोंड दुसरीकडं वळवलं! मी त्याला सांगणार होतो: अरे चकण्या यहुद्या!..

येलेना प्रवेश करते.

येलेना: नमस्ते, वासिली वासिल्येविच! नमस्ते, आकूलीना इवानोवना...

बेस्सेमेनोव (शुष्कपणे): अं... तुम्ही? या, या. काय काम काढलंत?

येलेना: घरभाड्याचे पैसे द्यायला आल्येय.

बेस्सेमेनोव (अधिक आदबीने): छान, छान! किती आहेत? पंचवीस रूबल? तुम्ही मला आणखी चाळीस कोपेक देणं लागता – हॉलच्या खिडकीच्या दोन काचांबद्दल... आणि तुमच्या स्वैपाकिणीनं पडवीच्या दाराची बिजागरी मोडली, त्याबद्दल... वीस कोपेक धरू या?

येलेना (हसत): किती चोख हिशेब आहे तुमचा!.. माझ्यापाशी सुटे पैसे नाहीत... हे तीन रूबल घ्या!

आकूलीना: कोळशाचं एक पोतं तुम्ही घेतलं होतं... म्हंजे तुमच्या स्वैपाकिणीनं...

बेस्सेमेनोव: किती पैसे पडले पोत्याला?

आकूलीना: कोळशांना? पस्तीस कोपेक...

बेस्सेमेनोव: म्हणजे एकूण पंचाण्णव कोपेक झाले. दोन रूबल आणि पाच कोपेक... घ्या! आता चोख हिशेबाबद्दल म्हणाल तर तुमचं बोलणं अगदी खरं आहे बाईसाहेब! ह्या चोखपणापायीच जग चालतंय. आदी काळापासून सूर्य त्याला नेमून दिलेल्या वेळी चोखपणं उगवतो आणि ज्याअर्थी आकाशात चोखपणा

हा कायदा आहे, त्याअर्थी पृथ्वीवर तोच कायदा असला पाहिजे. तुमचंच उदाहरण घ्या – तुम्ही घरभाडं नेहमी ठरल्या तारखेला चोख देता...

येलेना: मला कर्जात रहायला आवडत नाही.

बेस्सेमेनोव: अत्यंत कौतुकास्पद! म्हणूनच प्रत्येकाचा तुमच्यावर विश्वास आहे.

येलेना: बराय्, अच्छा! मला जायचं आहे...

बेस्सेमेनोव: अच्छा, या! (ती जात असताना तिला न्याहाळतात आणि नंतर बोलतात.) झकास आहे! पण तरीसुद्धा तिला ह्या घरातून हाकलून द्यायला मला अत्यंत आनंद वाटेल!

आकूलीना: तसं केलंत तर फार छान होईल!

बेस्सेमेनोव: याउलट, जोवर ती इथं आहे, तोवर निदान तिच्यावर आपल्याला नजर ठेवता येईल. जर ती इथून गेली, तर प्योत्र नक्की तिच्या मागं मागं धावणार आणि आपल्याविना त्याला जाळ्यात पकडणं तिला खूप सोपं जाणार. शिवाय तू हे विसरू नकोस... भाड्याबाबत ती नेहमी चोख आहे आणि किरकोळ जादा पैसे द्यायला तिची कधी कुरकुर नाही... हं! अर्थात प्योत्रला हा धोका आहे... फार मोठा!

आकूलीना: कदाचित... तिच्याशी लग्न करण्याचा त्याच्या मनात विचारच नसेल!.. नुसतं आपलं...

बेस्सेमेनोव: तशी जर आपल्याला खात्री मिळाली, तर मन स्वस्थ होईल. मग चिंता करत बसावं लागणार नाही. कुंटणखान्यांमधून हिंडण्यापेक्षा इथं घरच्या घरी जास्त चांगलं...

तात्यानाच्या खोलीतून घोगऱ्या आवाजातील कण्हणे ऐकू येते.

आकूलीना (हळूच) : आं?

बेस्सेमेनोव (तेवढ्याच हळू आवाजात) : काय झालं?

आकूलीना (ती दबत्या आवाजात बोलते आणि कसलातरी कानोसा घ्यावा त्याप्रमाणे चौफेर भिरभिर पाहते) : बाहेर हॉलमध्ये ना?

बेस्सेमेनोव (मोठ्यांदा) : मांजरी असेल...

आकूलीना (अडखळत) : तुम्हाला... एक गोष्ट सांगायची होती...

बेस्सेमेनोव : ठीक आहे, बोल!

आकूलीना : आज तुम्ही पेर्चिखिनबरोबर जरा जास्तच कठोर वागलात असं नाही वाटत? तो बिचारा कधी कुणाचा अपमान करत नाही...

बेस्सेमेनोव : जर तो कुणाचा अपमान करत नाही, तर स्वतः अपमान वाटून घेणार नाही. आणि जर त्यानं अपमान मानला, तर आपलं काहीही जात नाही! त्याची ओळख असणं... हा काही बहुमान नव्हे!

ह्यावेळी कण्हण्याचा आवाज पूर्वीपेक्षा मोठ्यांदा.

कोण आहे?.. काय ग...

आकूलीना (गोंधळून) : मला माहीत नाही... खरंच ... कसला बरं हा आवाज?

बेस्सेमेनोव (प्योत्रच्या खोलीकडे वेगाने जात) : आत कुणी आहे का? प्योत्र!

आकूलीना (घाबरून त्यांच्यापाठी धावत) : पेत्या ... पेत्या ... पेत्या !

तात्याना (घोगऱ्या आवाजात ओरडते) : वाचवा ... आई ... धावा ... मला वाचवा ! ..

बेस्सेमेनोव आणि आकूलीना प्योत्रच्या खोलीतून वेगाने बाहेर येतात आणि एकही शब्द न उच्चारता तात्याना-च्या खोलीकडे धावतात. जणू भिऊन तिच्या खोलीच्या दारापाशी क्षणभर घुटमळतात आणि नंतर एकाच वेळी दाराला धक्का मारून दार उघडतात. त्यांना तात्यानाच्या किंचाळया ऐकू येतात.

जळतंय ... ओ-ओ ! दुखतंय ... पाणी ! पाणी ! द्या ! .. वाचवा ! ..

आकूलीना (खोलीतून धावत बाहेर येते व हॉलच्या दारातून जोराने ओरडते) : धावा ! मदत करा ! .. पेत्या ...

तात्यानाच्या खोलीतून बेस्सेमेनोव यांचा मंद आवाज ऐकू येतो : "काय ग ... पोरी ... काय केलंस ... काय झालं तुला ... माझ्या लाडक्या मुली ..."

तात्याना : पाणी ... मरत्येय ... सगळं पेटतंय ... देवा रे !

आकूलीना : या हो या ... इकडं या ... धावा !

बेस्सेमेनोव (खोलीतून) : धाव ... बोलाव ... डॉक्टरला ...

प्योत्र (धावत येतो) : काय झालं ? आँ ?

आकूलीना (त्याचा हात पकडून धापा टाकत): तात्याना!.. मरत्येय ...

प्योत्र (स्वतःला सोडवून घेत): सोडा! सोडा मला!

तेतेरेव (येता येता अंगात जाकीट घालत): काय झालं? आग लागली काय?

बेस्सेमेनोव: डॉक्टरला ... डॉक्टरला बोलाव ... प्योत्र ... पंचवीस रूबल देऊ कर!

प्योत्र (तात्यानाच्या खोलीतून धावत बाहेर येतो व तेतेरेवला): डॉक्टर!.. डॉक्टरला आणा! त्यांना सांगा ... विषबाधा झालीय ... बाईला ... नवसागर घेतला तिनं ... लौकर! लौकर!

तेतेरेव हॉलकडे धावतो.

स्तेपानिदा (धावत येते): अरे देवा रे ... अरे माझ्या देवा ...

तात्याना: पेत्या ... जळतेय! मरतेय!.. मला जगायचंय ..! जगायचंय मला!.. पाणी द्या!

प्योत्र: किती घेतलंस नवसागर? केव्हा प्यायलीस? बोल ...

बेस्सेमेनोव: माझ्या पोरी ... तानेच्का ...

आकूलीना: पोरीनं स्वतःचा घात करून घेतला!

प्योत्र: आईसाहेब, इथून जा तुम्ही ... स्तेपानिदा, तिला घेऊन जा ... जा म्हणतो ना इथून ...

येलेना धावत तात्यानाच्या खोलीत जाते.

आईला घेऊन जा इथून ...

एक म्हातारी प्रवेश करते, भित्र्या नजरेने सर्वत्र पाहते आणि स्वतःशी पुटपुटते.

येलेना (तात्यानाच्या खोलीतून आकूलीनाला हाताला धरून आणत दबत्या आवाजात) : काळजी करू नका ... काही धोका नाही ...

आकूलीना : माझी बबडी ! माझी लाडकी पोरगी ... काय मी तुझा अपमान केला ? काय मी तिचा अपराध केला ?

येलेना : सारं ठीक होईल ... डॉक्टर आले म्हणजे सर्व ठीक होईल ! बाई ग ... किती दुर्दैवी घटना !

म्हातारी (आकूलीनाचा दुसरा हात धरत) : धीर सोडू नका बाईसाहेब ! याहून वाईट प्रसंग घडतात ! त्या सीतानोव व्यापाऱ्याची गोष्ट घ्या – घोड्यानं लाथ मारून त्याच्या गाडीवानाची कूस फोडली ...

आकूलीना : लाडक्या पोरी ग ... आता मी काय करू ? माझ्या एकुलत्या एक पोरी ...

तिला घेऊन जातात. तात्यानाच्या किंचाळ्यांमध्ये तिच्या वडिलांचा घोगरा आवाज आणि प्योत्रचे तीक्ष्ण, भेदरट शब्द अधूनमधून ऐकू येतात. खुर्ची कोलमडते ; बशांचा खळखळाट होतो ; पलंगाच्या स्प्रिंगा करकरतात, उशी धप्पकन खाली पडते. केस विस्कटलेली, तोंडाचा आ वासलेली, डोळे विस्फारलेली स्तेपानिदा अनेकदा खोली-मधून धावत बाहेर येते व कपाटातून कप अथवा बशी काढताना दरवेळी काही ना काही वस्तू तिच्या हातून फुटते. हॉलच्या दारामधून अनेक चेहरे चौकसपणे

आत डोकावतात, पण प्रत्यक्ष खोलीत येण्याचे धाडस कुणीही करत नाही. फक्त रंगाऱ्याचा मदतनीस असलेला एक पोरगा उड्या मारत तात्यानाच्या खोलीपर्यंत जाऊन डोकावतो आणि परतताना अस्फुट आवाजात उद्गारतो: "मरते आहे!" रस्त्यावर बाजाच्या पेटीचा सूर उमटतो, पण तात्काळ तो गप्प होतो. हॉलमधून संभाषणाची हलकी कुजबूज ऐकू येते: "ठार मारलं तिला?.. बापानं ... त्यानं तिला बजावलं होतं: पोरी, सांभाळून पाऊल टाक!.. डोक्यावर... कशानं?.. खोटं बोलू नको... तिनं स्वतःच्या हातानं गळा कापून घेतला..." बायकी आवाज पृच्छा करतो: "लग्न झालं होतं तिचं?" कुणीतरी सहानुभूतीने ओठांचा चक्-चक् आवाज करते.

म्हातारी: (बेस्सेमेनोवच्या खोलीतून बाहेर येते. मेजाजवळून जात असताना चटकन एक पाव उचलते व रुमालाखाली दडवून दाराजवळच्या गर्दीत सामील होते): श्शू:! ती मरत्येय!

पुरुषाचा आवाज: काय तिचं नांव?

म्हातारी: लिझावेता ...

बाईचा आवाज: कशाबद्दल केलं तिनं असं?

म्हातारी: मागंच सणाच्या दिवशी तो तिला म्हणाला होता: "लिझावेता"...

गर्दीमध्ये हालचाल होते. डॉक्टर आणि तेतेरेव प्रवेश करतात. टोपी अथवा कोट न उतरवताच डॉक्टर थेट तात्यानाच्या खोलीकडे जातात. तेतेरेव खोलीत

एक कटाक्ष टाकतो व कपाळाला आठ्या घालून खोली-पासून दूर जातो. आजाऱ्याच्या खोलीतून विव्हळणे, कण्हणे, लोकांचे आवाज इ. ऐकू येतात. बेस्सेमेनोवच्या खोलीतून आकूलीनाचा शोक ऐकू येतो: "मला जाऊं दे! मला तिच्यापाशी गेलंच पाहिजे!" हॉलमधील जमावातून वेगवेगळे आवाज उमटतात: "गंभीर माणूस दिसतोय ... तो चर्चमध्ये गातो ... खरं सांगतोस?.. होय होय ... जॉन बाप्तिस्तच्या."

तेतेरेव (हॉलच्या दिशेने जात): तुम्ही इथं काय करताहात? चला, जा इथून! जा म्हणतो ना!

म्हातारी (दारातून): भल्या माणसांनो, जा इथून, निघा! इथं काही काम नाही तुमचं!..

तेतेरेव: तू कोण ग? तुला काय पाहिजे?

म्हातारी: मी भाजी विकत्ये बाबा ... हिरव्या पातीचा कांदा, काकड्या ...

तेतेरेव: तुला काय पाहिजे?

म्हातारी: मी सेम्यागिनाकडं चालले होत्ये ... माझ्या मुलाची ती धर्माची आई ...

तेतेरेव: मग? इथं तुझं काय काम?

म्हातारी: घराजवळून जात होत्ये ... एकदम गोंधळ ऐकला ... मला वाटलं ... आग लागली!

तेतेरेव: मग?

म्हातारी: आणि आत आल्ये ... काय संकट आलंय ते पहायला आल्ये ...

तेतेरेव: चालती हो इथून!.. तुम्ही सगळे! हॉल-मधून सगळे बाहेर जा!

स्तेपानिदा (तेतेरेवपाशी धावत येत) : पाण्याची बादली भरून आण ... लौकर !

हातरुमालात चेहरा गुंडाळलेला एक पांढरे केसवाला म्हातारा दारातून डोकावतो, तेतेरेवला डोळा घालतो व म्हणतो : "तिनं तुमच्या मेजावरचा पाव चोरला !" तेतेरेव तरातरा हॉलमध्ये जातो व लोकांना रस्त्यावर लोटू लागतो. गोंधळ आणि आरडाओरडा. एक पोरटे किंचाळते : "अयाई ग !" दुसरा कुणीतरी हसतो, आणखी कुणी संतापून उद्गारतो : "एवढ्या जोरात ढकलू नका !"

तेतेरेव (दिसत नाही) : चालते व्हा ! ताबडतोब !

प्योत्र (दारातून डोकावत) : शांत रहा ...! (खोलीत तोंड मागे वळवून.) बाबासाहेब, तुम्ही जा. आईपाशी जा ! जा ना ! (हॉलच्या दिशेने ओरडतो.) कुणालाही आत सोडू नका !

बेस्सेमेनोव तात्यानाच्या खोलीतून थरथरत्या पावलांनी बाहेर येतात. मेजापाशी येताच धप्पकन एका खुर्चीवर बसतात आणि काही सेकंद आढ्याकडे भकासपणे टक लावून पाहतात. मग उठून स्वतःच्या खोलीकडे जातात. तेथून येलेना व आकूलीना यांचा संवाद ऐकू येतो.

आकूलीना : माझं काय तिच्यावर प्रेम नव्हतं ? मी तिचा सांभाळ केला नाही ?

येलेना : शांत व्हा ... कृपा करून शांत व्हा ...

आकूलीना : अहो, तुम्हीच सांगा ... असं कसं झालं ...

दार बंद केल्यामुळे पुढचे बोलणे तुटते. आता रंगमंच मोकळा. बेस्सेमेनोवच्या खोलीतून दबते आवाज येतात; तात्यानाच्या खोलीतून तिचे कण्हणे, खालच्या आवाजातील संभाषण आणि तिची शुश्रूषा करणाऱ्यांकडून घडणारे बारीक-सारीक आवाज. तेतेरेव पाण्याची बादली आणतो, तात्यानाच्या खोलीच्या दारापाशी ठेवतो व हळूच दारावर टक-टक करतो. स्तेपानिदा दार उघडून बादली आत घेते, मग बाहेर येते व कपाळावरील घाम पुसू लागते.

तेतेरेव: काय?

स्तेपानिदा: काही नाही, सगळं ठीक होईल.

तेतेरेव: डॉक्टर तसं म्हणाला?

स्तेपानिदा: हूं! पण ... (निराशेने हात झटकत.) ... तिच्या आई-बापांना तिच्यापाशी सोडू नका असं म्हणाला ...

तेतेरेव: तिला आता बरं वाटतंय?

स्तेपानिदा: कुणास ठाऊक? विव्हळायची थांबलीय! सगळी हिरवीगार पडलीय ... डोळे हे एवढे मोठ्ठे झालेत ... निपचित पडून आहे. (संतापून दबत्या आवाजात.) ... मी त्यांना सांगितलं होतं ... कित्ती वेळा बजावलं होतं ... तिचं लग्न करून टाका! तिला उजवून टाका! नाही ऐकलं ... आता घ्या! .. एवढ्या वयापर्यंत पोरीनं नवऱ्याशिवाय कसं रहायचं? आणि तिचा देवावर विश्वास नाही ... नकोत प्रार्थना, नकोत नमस्कार! ... आणि आता घ्या!

तेतेरेव : चूप बैस ! कावळे !

येलेना (प्रवेश करते) : आता कशी आहे ती ?

तेतेरेव : माहीत नाही ... डॉक्टर म्हणाले की, धोका नाही ...

येलेना : म्हातारी खचली ! वाईट वाटतं त्यांच्याबद्दल !

तेतेरेव काही न बोलता नुसते खांदे उडवतो.

स्तेपानिदा (खोलीतून धावत जाते) : अग्गो बया ! तिकडं चूल तशीच ढणढणा पेटत राहिलीय ...

येलेना : कशामुळं ती असं वागली ? काय घडलं ? बिच्चारी तान्या ! किती दुखत असणार तिला ... (चेहरा वाकडा करते आणि शहारते.) फार दुखत असेल नाही ? खूप ? भयानक ?

तेतेरेव : माहीत नाही. मी कधी नवसागर प्यायलो नाही ...

येलेना : असा विनोद करवतो कसा तुम्हाला ?

तेतेरेव : मी विनोद करत नाही ...

येलेना (प्योत्रच्या खोलीपाशी जाते व डोकावते) : प्यो ... प्योत्र वासिल्येविच अजून तिथंच ... तिच्यापाशी आहेत ?

तेतेरेव : तिथून बाहेर पडला नाही त्याअर्थी तिथंच असणार.

येलेना (विचारमग्न होत) : त्यांच्यावर ह्या सगळ्याचा किती परिणाम झालाय ह्याची कल्पना करू शकते मी !

स्तब्धता.

जेव्हा मी ... जर मला असं काही पहायचा प्रसंग आला ... छी:, मला दुर्दैवाचा तिटकारा आहे!

तेतेरेव (स्मित करत): कौतुकाची बाब आहे.

येलेना: तुम्हाला समजतं? असं झटक्यात पकडलं असतं आणि माझ्या टाचांखाली चिरडून टाकलं असतं! कायमचं!

तेतेरेव: दुर्दैवाला?

येलेना: होय! मला त्याची भीती वाटत नाही ... मला त्याचा तिटकारा येतो. मला आनंदी रहायला आवडतं, माझ्या भोवती खूप माणसं असलेली आवडतं आणि नेहमी काहीतरी नवीन करायला आवडतं. स्वतः-साठी आणि माझ्या भोवतालच्या लोकांसाठी आयुष्य प्रसन्न कसं करावं हे ठाऊक आहे मला!

तेतेरेव: अत्यंत अत्यंत कौतुकास्पद!

येलेना: आणि आणखी ठाऊक आहे?.. मी तुमच्या-पाशी कबूल करत्ये: मी कमालीची दगडाच्या काळजाची आहे. दुर्दैवी माणसं मला आवडत नाहीत आणि काही लोक नेहमीच दुर्दैवी असतात. त्यांच्यासाठी तुम्ही कितीही खटपट केलीत, तरी काहीही उपयोग होत नाही. जर टोपीऐवजी त्यांच्या डोक्यावर सूर्य ठेवलात – याहून उत्तम ते काय? – तरीही दुर्दैवी माणूस सुस्कारत बसेल: "अरेरे, किती मी दुर्दैवी! किती मी एकाकी! कुणीही माझ्याकडं लक्ष देत नाही ... जीवन अंधारं आणि उदास आहे ... ओय्! ओह्! हाय्!" असा माणूस जेव्हा मला भेटतो, तेव्हा संतापापायी मला

त्याला आणखी दुःखी करण्याची इच्छा होते.

तेतेरेव: अहो बाईसाहेब! मीसुद्धा कबुली देतो: बायका जेव्हा तत्त्वज्ञान पाजळायला लागतात, तेव्हा क्षणभरसुद्धा मला सहन होत नाहीत! पण तुम्ही जेव्हा तत्त्वज्ञान बोलायला लागता, तेव्हा तुमच्या हाताचं चुंबन घ्यावंसं वाटतं!

येलेना (खटयाळपणे): फक्त हाताचं? आणि फक्त तत्त्वज्ञानपर बोलते तेव्हाच? (एकदम स्वतःला सावरून.) छी: छी:! तिकडं एक माणूस यातना सोसतंय ... आणि इकडं मी मूर्खासारखी वटवट करत्येय! थट्टामस्करी करत्येय ...

तेतेरेव (म्हाताऱ्यांच्या खोलीच्या दाराकडे बोट दाखवत): आणि तिथंही तळमळताहेत. तुम्ही कुठंही बोट दाखवा – सगळीकडं माणूस यातना सोसतोय! मला वाटतं, यातना सोसणं ही माणसाची एक सवयच होऊन बसलीय!

येलेना: पण खरंच वेदना होतात त्याला ...

तेतेरेव: होतात ना!

येलेना: आणि म्हणून त्याची दया केली पाहिजे.

तेतेरेव: नेहमी नव्हे ... आणि जेव्हा-केव्हा माणसाची दया करावीशी वाटली, तर त्यापेक्षा त्याला मदत करणं अधिक चांगलं!

येलेना: सगळ्यांना मदत करणं अशक्य आहे ... आणि कुणाची दया आल्याविना त्याला मदत करणं जमत नाही.

तेतेरेव: बाईसाहेब! मला असं वाटतं: यातना

इच्छेपायी जन्माला येते आणि इच्छा दोन प्रकारच्या असतात – एक आदरपात्र आणि दुसरी आदरास अपात्र. माणसाला चांगलं आणि बळकट बनवणाऱ्या इच्छा पूर्ण करण्यास मदत करावी. त्याला उदात्त बनवणाऱ्या, जनावरांपेक्षा वरच्या पातळीला नेणाऱ्या इच्छा पूर्ण करण्यास मदत करावी.

येलेना (त्याचे बोलणे न ऐकता) : कदाचित... कदाचित तसं असेल... पण तिथं काय चाललंय? ती झोपली काय? विलक्षण शांत झालंय. कुणीतरी कुज-बुजतंय... म्हातारी माणसंदेखील स्वतःच्या कोपऱ्यात चूप-चाप बसलीत. किती विचित्र! अचानक – गोंधळ, गडबड, किंचाळया, विव्हळणं! आणि तेवढ्याच अचा-नकपणं – एकही आवाज नाही, एकही हालचाल नाही!

तेतेरेव : ह्यालाच आयुष्य म्हणतात! थकून जाईपर्यंत माणसं आरडाओरडा करतात आणि मग चूप बसतात, विश्रांती घेतात. पुन्हा ओरडायला सुरवात करतात. ह्या घरात प्रत्येक गोष्ट चटकन गप्प होते – वेदनेच्या आरोळया... आनंदी हसणंसुद्धा! प्रत्येक धक्का म्हणजे चिखलाच्या डबक्यावर काठी मारणं! आणि शेवटचा आवाज नेहमीच क्षुद्रतेचा आकांत असतो! क्षुद्रता ह्या माणसांची देवता! उत्सव असो वा अनर्थ असो – तिचा शब्द इथं अखेरचा!

येलेना (विचारमग्न होत) : मी जेव्हा तुरुंगात रहात होते... तेव्हा तिथं खूप मजा होती. माझ्या नवऱ्याला पत्त्यांच्या जुगाराचा नाद होता... खूप दारू प्यायचा, सारखा शिकारीवर जायचा. आमचं शहर

आडवाटेवरचं होतं ... आणि तिथली बहुतेक माणसं ... स्वतःचा दर्जा गमावून बसलेली. मला खूप मोकळा वेळ असायचा. पण मी कुठं जायची नाही, कुणाला बोलवायची नाही. फक्त कैद्यांबरोबर रहायची. त्यांना मात्र मी खूप आवडायची. त्यांची जवळून ओळख झाल्यानंतर ती मजेदार माणसं असल्याचं आढळलं. तुम्हाला खरंच सांगत्ये – कमालीची छान आणि साधी माणसं होती! काही वेळा त्यांच्याकडं पाहताना विश्वा-सच बसायचा नाही की, हा – खुनी आहे, हा – चोर आहे, ह्यानं – आणखी असाच काही गुन्हा केलाय! कधीतरी विचारायची – "तू खून केलास?" – तर उत्तर द्यायचा – "होय, बाईसाहेब, मी खून केलाय! काय करणार?" आणि मला भासायचं – ह्या खुनी माणसानं, कुणाचा तरी अपराध स्वतःच्या माथी घेतलाय ... तो केवळ एक दगड होता, ज्याला कुणीतरी फेकलं! मी त्यांना वेगवेगळी पुस्तकं विकत घेऊन द्यायची ... प्रत्येक कोठडीत सोंगट्यांचा खेळ दिला होता ... पत्त्यांचा डाव दिला होता ... तंबाखू द्यायची ... आणि अगदी थोडी दारू द्यायची. त्यांना मोकळ्या हवेत फिरायला सोडायचे, तेव्हा ते चेंडूनं खुंट्या पाडण्याचा खेळ खेळायचे. अगदी लहान मुलांप्रमाणं – शप्पत! कधी कधी मी त्यांना गंमतीदार पुस्तकं वाचून दाखवायची आणि ते ऐकताना हसायचे ... अगदी लहान मुलांसारखं! मी पक्ष्यांचे पिंजरे विकत घेतले होते आणि प्रत्येक कोठडीत एकेक पक्षी होता ... त्या पक्ष्यावर त्यांचा खूप जीव होता – माझ्यावर होता तसा! आणि ठाऊक आहे –

जेव्हा मी भडक पोषाख करायची – तांबडं किंवा पिवळं पोलकं – तेव्हा ते जाम खूष व्हायचे! त्यांना आनंदी, भडक रंग खूप आवडतात! आणि मी मुद्दाम तसे भडक पोषाख घालायची... (सुस्कारा टाकते.) त्यांच्याबरोबर फार छान होतं! तीन वर्षं कशी उलटली ते ध्यानातसुद्धा आलं नाही... आणि माझ्या नवऱ्याला जेव्हा घोड्यानं ठार मारलं, तेव्हा नवऱ्याच्या मरणा-पेक्षा तुरुंग सोडण्याच्या दुःखापायी मी जास्त रडले... त्या कैद्यांपासून दूर जायला खूप वाईट वाटलं... कैदीसुद्धा फार कष्टी बनले होते... (खोलीत नजर फिरवत.) ह्या इथं, ह्या गावात, मला रहायला आवडत नाही... ह्या घरात काहीतरी वाईट गोष्ट आहे... माणसं वाईट नाहीत... पण दुसरं काहीतरी चांगलं नाही... एकदा की नाही, मला खूप उदास वाटत होतं... काळजावर काही-तरी भारी दडपण पडल्यासारखं वाटत होतं... अगबाई, आपण इथं बोलत बसलोय... आणि तिथं कदाचित माणूस मरतंय...

तेतेरेव (शांतपणे): आणि त्याच्याबद्दल आपल्याला वाईट वाटत नाही!

येलेना (पटकन): तुम्हाला वाईट वाटत नाही?

तेतेरेव: नाही. आणि तुम्हालाही...

येलेना (हळूच): होय, तुमचं खरं आहे! हे चांगलं नव्हे... मला समजतं... पण हे चांगलं नाही असं मला जाणवत नाही! तुम्हाला ठाऊक आहे: असं घडतं कधी कधी. काहीतरी बिनसलंय हे समजतं, पण तसं जाणवत नाही. तुम्हाला माहीत आहे: मला

त्याची जास्त दया येते ... तिच्यापेक्षा प्योत्र वासिल्येविच-ची जास्त दया येते ... मला एकूणच त्याची दया येते ... त्याला इथं चांगलं नाही वाटत ... होय ना ?

तेतेरेव : इथं सगळ्यांनाच वाईट ...

पोल्या (प्रवेश करीत) : नमस्का ...

येलेना (पटकन उठून तिच्यापाशी जात) : श्शू : ! हळू ! ठाऊक आहे ... तान्याला ... विषबाधा झालीय !

पोल्या : का ... य ?

येलेना : होय ना ! तिथं ... तिच्यापाशी डॉक्टर आणि तिचा भाऊ आहेत ...

पोल्या : मरतेय ... मरणार का ?

येलेना : कुणालाच माहीत नाही .

पोल्या : कशाबद्दल ? काही बोलली ? नाही ?

येलेना : ठाऊक नाही ! नाही !

प्योत्र (घामेजलेले डोके दारातून बाहेर काढत) : येलेना निकोलायेवना ... एक मिनिट ...

येलेना पटकन जाते .

पोल्या (तेतेरेवला) : तुम्ही माझ्याकडं बघताय काय — अशा नजरेनं ?

तेतेरेव : किती वेळा हा प्रश्न विचारलात मला ?

पोल्या : जर तसंच घडत असेल तर ... नेहमी काही-तरी वेगळी नजर ... कशाबद्दल ? (त्याच्यापाशी जात कठोर आवाजात .) ह्यात ... माझाच अपराध आहे असं तुम्हालाही वाटतं ?

तेतेरेव (किंचित हसून) : तुम्ही अपराधी आहात असं तुम्हाला जाणवतंय का ?

पोल्या : मला एकच जाणीव जास्त जास्त होतेय... तुमच्याबद्दलचा तिरस्कार वाढतोय! त्यापेक्षा हे कसं घडलं ते सांगितलंत तर बरं होईल!

तेतेरेव : काल तिला हळूच एक धक्का दिला होता आणि दुबळी असल्यामुळं आज ती कोलमडली... बस्स! एवढंच!

पोल्या : खोटं!

तेतेरेव : काय – खोटं?

पोल्या : तुम्हाला काय सुचवायचंय ते मला समजतं, पण ते खरं नाही! नील...

तेतेरेव : नील? नीलचा इथं काय संबंध?

पोल्या : ना त्याचा, ना माझा – आम्हा दोघांचाही काही संबंध नाही! तुम्ही... नाही! मला ठाऊक आहे... तुम्ही आम्हाला दोषी धरता... काय करणार?.. माझं त्याच्यावर प्रेम आहे... आणि त्याचं माझ्यावर... फार पूर्वीच ह्याची सुरवात झालीय!

तेतेरेव (गंभीरपणे) : मी तुम्हाला मुळीच दोषी धरत नाही... तुम्ही स्वतःच काहीतरी अंगावर ओढवून घेतलंत आणि तात्काळ खुलासा करायला लागलात! कशाबद्दल? मला तुमच्याबद्दल... फार आदर वाटतो. कुणी तुम्हाला नेहमी, सतत, पुनःपुन्हा सांगितलं होतं – ह्या घरातून लौकरात लौकर बाहेर पडा, ह्या घरात येऊ नका – इथं वातावरण निकोप नाही, इथं तुमच्या मनाला अपाय घडेल? हे मीच सांगितलं होतं...

पोल्या : बरं मग?

तेतेरेव : काही नाही. मला एवढंच सांगायचं होतं

की, जर तुम्ही इथं आला नसतात, तर आत्ता तुम्हाला जे अनुभवावं लागतं आहे ते अनुभवण्याची गरज पडली नसती ... बस्स, एवढंच !

पोल्या : अस्सं ! पण अशी कशी वागली ती ? तिचा जीव धोक्यात आहे ? काय घेतलं तिनं ?

तेतेरेव : मला माहीत नाही ...

प्योत्र आणि डॉक्टर प्रवेश करतात.

प्योत्र : पोल्या ! कृपा करून येलेना निकोलायेवनांना मदत करा ...

तेतेरेव (प्योत्रला) : कशी आहे ती ?

डॉक्टर : खरं सांगायचं तर काहीही गंभीर नाही ! जर पेशंट मनानं खंबीर असला, तर काहीही वाईट परिणाम घडणार नाहीत. ती अगदी थोडं प्यायली – अन्ननलिका भाजलीय ... पोटातसुद्धा अगदी थोडं नवसागर गेलं ... पण तेही ताबडतोब उलटून पडलं !

प्योत्र : डॉक्टर, तुम्ही दमला असाल. बसा जरा.

डॉक्टर : आभारी आहे ... आठवडाभर तिला फारसं बरं वाटणार नाही ... काही दिवसांपूर्वी एक मजेदार केस माझ्यापाशी आली होती – घरं रंगवणारा एक झिंगलेला माणूस बीयरऐवजी चहाचा ग्लासभर वॉर्निश प्यायला ...

बेस्सेमेनोव प्रवेश करतात. स्वतःच्या खोलीच्या दारापाशीच थांबून एकही शब्द न बोलता डॉक्टरांकडे प्रश्नार्थक व दुःखी नजरेने पहात राहतात.

प्योत्र : बाबासाहेब, शांत व्हा. गंभीर धोका नाही.

डॉक्टर : हो, हो! उगीच घाबरू नका! आणखी दोन-तीन दिवसांनंतर ती हिंडू-फिरू लागेल ...

बेस्सेमेनोव : खरंच ?

डॉक्टर : मी खात्री देतो!

बेस्सेमेनोव : उपकार आहेत तुमचे! खरं म्हणता ... धोका नाही – धन्यवाद! प्योत्र, अरे ... जरा इकडं ये ...

प्योत्र त्यांच्यापाशी जातो. दोघे दाराआड अदृश्य होतात. दोघांची कुजबूज आणि नाण्यांचा आवाज.

तेतेरेव (डॉक्टरना) : मग त्या रंगाऱ्याचं काय झालं ?

डॉक्टर : अं? काय ?

तेतेरेव : त्या रंगाऱ्याचं काय झालं ?

डॉक्टर : त्याचं? काही नाही – बरा झाला ... हं ... मला वाटतं ... आपली कुठंतरी भेट झालीय ?

तेतेरेव : कदाचित.

डॉक्टर : तुम्ही ... विषमाच्या तापानं इस्पितळात पडला होतात ?

तेतेरेव : होय!..

डॉक्टर (आनंदून) : तरीच! तरीच बरं का!.. बघतोय मघापासनं ... ओळखीचा चेहरा दिसतो!.. बरं मला सांगा ... ही वसंतामधली गोष्ट? होय? मला वाटतं ... तुमचं नांव आणि आडनांवसुद्धा मला आठवतं ...

तेतेरेव : आणि तुमची मला आठवण आहे.

डॉक्टर : असं ?

तेतेरेव : चांगली आठवण आहे. जेव्हा मी बरा व्हायला लागलो, तेव्हा माझा शिधा वाढवा असं मी तुम्हाला म्हटलं – तर तोंड वाकडं करून तुम्ही म्हणालात : "जे मिळतंय त्याबद्दलच आभार मान. तुझ्यासारखे दारुडे आणि भटके जगात भरपूर आहेत."

डॉक्टर (गडबडून) : माफ करा ... पण ... तुम्ही ... तुमचं नांव ... मी – डॉक्टर निकोलाय त्रोयेकूरोव ... आणि ...

तेतेरेव (डॉक्टरपाशी जात) : आणि मी – जन्मजात दारुडा आणि हिरव्या नागिणीचा आशिक – तेरेन्ती बोगोस्लोवस्की.

डॉक्टर त्याच्यापासून मागे सरतात.

अहो घाबरू नका, मी तुमच्या केसालासुद्धा धक्का लावत नाही. (डॉक्टरच्या अंगावरून हॉलकडे निघून जातो.)

स्वतःच्या टोपीने वारा घेत डॉक्टर आ वासून त्याच्याकडे पहात राहतात. प्योत्र प्रवेश करतो.

डॉक्टर (हॉलच्या दाराकडे धास्तावल्या नजरेने पहात) : बरं, मी चलतो ! माझी वाट पहात असतील ... जर दुखतंय अशी तिनं तक्रार केली, तर ... परत तेच औषध द्या ... आणखी काही थेंब ... वेदना फार होणार नाहीत ... अच्छा ! .. बरं मला सांगा ... इथं आत्ता एक नमुनेदार गृहस्थ होते ... तुमचे ते नातेवाईक ? ..

प्योत्र : नाही, तो आमचा आश्रित आहे.

डॉक्टर : अस्सं ! .. फार छान ! .. भलताच नमुनेदार ! अच्छा ... धन्यवाद !

प्योत्र त्यांना सोडायला जातो. बेस्सेमेनोव आणि आकूलीना स्वतःच्या खोलीतून बाहेर पडतात व चोरपावलांनी तात्यानाच्या खोलीकडे जाऊ लागतात.

बेस्सेमेनोव : थांब, तिकडं जाऊ नको ... काही आवाज येत नाही. बहुतेक तिला झोप लागली असावी. उगीच जागं करायला नको ... (आकूलीनाला कोपऱ्यातील पेटीकडे नेतात.) ... तर हा उत्सव पहायचा होता म्हणून जगलो आजवर ! आता सगळ्या गावभर ह्या गोष्टीचा बभ्रा होणार ...

आकूलीना : अहो, असं काय बोलताय ? खुशाल शिंगं फुंकू देत ! ती जिवंत राहिली म्हणजे मिळवली ! हव्या तेवढ्या घंटा गावभर वाजवू देत !

बेस्सेमेनोव : हो, हो ... मला माहीत आहे ! पण तू ... तुला काही समजत नाही ! आपली अब्रू गेली ना !

आकूलीना : कशामुळं अब्रू गेली ?

बेस्सेमेनोव : तुझ्या पोटच्या पोरीनं वीष घेतलं ! ह्याचा अर्थ काय झाला ? काय दुःख दिलं तिला आपण ? जनावरांसारखं वागलो काय तिच्याशी ? लोक आता काय वाट्टेल बोलायला लागतील ... अर्थात मला त्यांची फिकीर नाही ! मुलांखातर मी सहन करीन ... पण हे असं कशाला ? कशासाठी ? मला एवढं जाणून घ्यायचंय. आपली मुलं ! .. तोंडं बंद ठेवून जगतात ! त्यांच्या मनांमध्ये काय आहे ? काही समजत नाही !

त्यांच्या डोक्यांमध्ये काय चालतं ? काही कळत नाही ! दुःख ह्याचं होतं !

आकूलीना : मला समजतं हो ... मलासुद्धा ह्या गोष्टीचं खूप वाईट वाटतं ! काही झालं तरी मी आई ... आख्खा दिवस राब राब राबायचं, पण कुणाच्या तोंडून मायेचा एक शब्द ऐकायला मिळत नाही. मला समजतं ! निदान मुलं सुखात आणि धडधाकट असती तरी खूप मी म्हणत्ये – पण हे काही विपरीतच घडलं !

पोल्या (तात्यानाच्या खोलीतून बाहेर येते) : ती झोपत्येय ! तुम्ही जरा हळू आवाजात बोला.

बेस्सेमेनोव (उठत) : कशी आहे ती ? बघायला तर हरकत नाही ना ?

आकूलीना : मी हळूच जाऊ का ? आम्ही दोघं ?

पोल्या : कुणालाही तिच्यापाशी सोडायचं नाही अशी डॉक्टरांनी ताकीद दिलीय !

बेस्सेमेनोव (संशयाने) : तुला काय ठाऊक ? डॉक्टर होते तेव्हा तर तू इथं नव्हतीस !

पोल्या : मला येलेना निकोलायेवनांनी सांगितलं.

बेस्सेमेनोव : ती – तिथं आहे ? कमाल आहे ! परक्या माणसानं तिथं गेलेलं चालतं आणि रक्ताच्या नात्याच्या माणसांना – मनाई ! आश्चर्य आहे !

आकूलीना : स्वैपाकघरातच जेवावं ... म्हणजे तिला त्रास होणार नाही. बिच्चारी ! .. साधं डोकावूनसुद्धा पहायचं नाही ... (हात झटकून हॉलमध्ये निघून जाते.)

पोल्या कपाटाला टेकून उभी राहते व तात्यानाच्या खोलीकडे टक लावून पहात राहते. तिच्या भुवया आकुंचन पावलेल्या, ओठ घट्ट आवळलेले व शरीर ताठर बनलेले. कशाची तरी वाट पहात बेस्सेमेनोव मेजापाशी बसतात.

पोल्या: (हळूच) : आज माझे वडील इथं आले होते ?

बेस्सेमेनोव: तुला तुझ्या बापाची चौकशी करायची नाही. बापाचं काय तुला ? ठाऊक आहे मला ... कोण तुला पाहिजे ...

पोल्या त्यांच्याकडे आश्चर्याने पाहते.

होय, तुझा बाप इथं आला होता ! फाटक्या, घाणेरड्या कपड्यात ! सभ्यतेचा अंश नाही त्याच्यात ! तरी-सुद्धा बाप म्हणून त्याचा तू मान राखला पाहिजेस !

पोल्या: मी राखत्ये त्यांचा मान ... का तुम्ही असं बोलता ?

बेस्सेमेनोव: तुला समजावं म्हणून ! तुझा बाप भटक्या आहे, त्याला घर-दार नाही, पण तरीसुद्धा त्याच्या इच्छेच्या विरुद्ध तू वागू नयेस ! बाप म्हणजे काय हे तुम्हाला समजतं ? तुम्हा कुणाला भावनाच नाहीत ! आता तू – दरिद्री मुलगी, तुला डोक्यावर छप्पर नाही ... तू. नम्र वागायला पाहिजे, प्रत्येकाशी प्रेमानं वागायला पाहिजे ... पण तू ? स्वतःची मतं बोलून दाखवतेस, शिकलेल्या माणसांच्या तोडीस तोड असल्याचा आव आणतेस ! आता तू लग्न करायला

निघाली आहेस ... आणि त्या खोलीतल्या व्यक्तीनं जवळ जवळ स्वत:चा जीव दिला ...

पोल्या : तुम्ही काय बोलता आणि कशाला 'बोलता हे मला समजत नाही.

बेस्सेमेनोव : (स्वत:च्या विचाराचा धागा तुटल्यामुळे काहीसे चिडून) : समजून घे ... विचार कर ! तुला समजावं म्हणून तर बोलतोय ! कोण तू ? आणि लग्न करायला निघालीस ! तिकडं माझी पोटची मुलगी ... तिथं कशाला उभी राहिलीस ? जा स्वैपाकघरात ! कामाला लाग ! मी इथं पहारा करतो ... जा !

पोल्या त्यांच्याकडे गोंधळून पाहते व जाऊ लागते.

थांब ! .. अं .. आज तुझ्या बापावर मी खेकसलो !

पोल्या : कशाबद्दल ?

बेस्सेमेनोव : तुझा संबंध नाही त्याच्याशी ! जा — पळ !

पोल्या चकित मनाने जाते. बेस्सेमेनोव हलक्या पावलांनी तात्यानाच्या दारापाशी जातात व आत डोकावून पहायला बारीकशी फट उघडतात. येलेना बाहेर येते व पाठीशी दार बंद करते.

येलेना : आत जाऊ नका. ती झोपलीय. तिला त्रास देऊ नका !

बेस्सेमेनोव : हं ! .. आम्हाला सगळे त्रास देताहेत ... पण त्याचं काही नाही ! आणि तुम्हाला मात्र ... त्रास द्यायचा नाही !

येलेना (आश्चर्याने) : काय बोलताय तुम्ही ? अहो

ती आजारी आहे!

बेस्सेमेनोव : माहीत आहे मला... सगळं माहीत आहे... (हॉलमध्ये निघून जातात.)

येलेना त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून खांदे उडवते. मग ती खिडकीजवळच्या कोचावर जाऊन बसते, हात डोक्यामागे धरते व विचारात गढून जाते. तिच्या ओठांवर स्मित तरळते आणि स्वप्नाळूपणे ती डोळे मिटून घेते. विषण्णपणे आणि विस्कटल्या अवतारात प्योत्र प्रवेश करतो. कशापासून तरी सुटका करून घ्यावी अशा तऱ्हेने तो डोक्याला झटका देतो. येलेनाला पाहताच तो थबकतो.

येलेना (डोळे न उघडता) : कोण आहे?

प्योत्र : हसू का उमटलंय चेहऱ्यावर? ह्या सगळ्या भानगडीनंतर कुणाचा हसरा चेहरा पहायला फार विचित्र वाटतं...

येलेना (त्याच्याकडे कटाक्ष फेकत) : तुम्ही – रागावलात? दमलात? बिच्चारा मुलगा!.. कित्ती वाईट वाटतं मला तुमच्याबद्दल...

प्योत्र (तिच्यापाशी खुर्चीवर बसत) : मला स्वतःलासुद्धा वाईट वाटतं माझ्याबद्दल!

येलेना : तुम्ही कुठंतरी निघून गेलं पाहिजे.

प्योत्र : होय, गेलं पाहिजे. काय करतोय मी इथं? हे आयुष्य मला असह्य झालंय!

येलेना : कशा प्रकारं जगायची तुमची इच्छा आहे? सांगा! अनेकदा मी तुम्हाला हा प्रश्न विचारलाय... पण तुम्ही कधीही त्याचं उत्तर दिलेलं नाही.

प्योत्र : स्पष्ट बोलणं अवघड जातं !

येलेना : माझ्याशी ?

प्योत्र : तुमच्याशीसुद्धा ! माझ्याबद्दल तुम्हाला काय वाटतं, हे कुठं ठाऊक आहे मला ? अथवा मी बोलेन त्याचा अर्थ काय घ्याल ? काहीवेळा मला वाटतं की तुम्ही ...

येलेना : काय ? बोला ...

प्योत्र : की तुम्ही चांगलं ...

येलेना : माझं तुमच्याबद्दल फार फार चांगलं मत आहे ! तुम्ही खूप छान आहात ! गोड मुलगा !

प्योत्र (चिडून) : मी मुलगा नाही, मुळीच नाही ! मी खूप विचार केला ... ऐका, मला सांगा – तुम्हाला आवडतो, तुम्हाला रस वाटतो ह्या सगळ्या गोंधळात ? नील, शीश्किन, त्स्वेतायेवा आणि गोंगाट करणारी ती मंडळी ज्यात गुंतली आहेत ?.. जाडजूड पुस्तकांचं मोठ्यांदा सार्वजनिक वाचन, कामगारांसाठी नाटकं ? वेळ घालवण्याचा हा सुजाण मार्ग आहे असं वाटतं तुम्हाला ? ह्या सगळ्या गोष्टी खरंच महत्त्वाच्या वाटतात ? एखाद्यानं आपलं आयुष्य त्यासाठी वेचावं एवढ्या महत्त्वाच्या ? सांगा ...

येलेना : लाडक्या ! मी अडाणी माणूस ... मला मत नाही देता येणार ! नाही समजत मला ! मी चंचल मनाची बाई ... पण ती माणसं – मला ती सगळी आवडतात ! नील, शीश्किन ... जे काही करतात ते नेहमी मजेत ! मला आनंदी, उत्साही माणसं आवडतात ! मी स्वतः तशीच आहे ... पण का विचारलंत असं ?

प्योत्र : मला हे सगळं असह्य होतं ! जर त्यांना तसं जगायला आवडत असेल... त्यात जर त्यांना आनंद मिळत असेल – तर खुशाल जगोत ! माझी आडकाठी नाही ! कुणाच्याही आयुष्यात ढवळाढवळ करायची माझी इच्छा नाही – पण मला हवं तसं जगण्यात मला कुणी अडथळा आणू नये ! स्वतःच्या कामाचं एवढं अवडंबर ते का माजवतात ? मला ते भित्रा, अहंकारी अशी दूषणं का देतात ?

येलेना (त्याच्या डोक्यावर हात ठेवत) : बिचाऱ्याला खूप छळलं... थकलाय !

प्योत्र : नाही, मी नाही थकलो ! मला फक्त संताप आलाय ! मला हवं तसं जगायचा मला हक्क आहे ! मला तसा हक्क आहे ना ?

येलेना (त्याच्या केसांशी खेळत) : हा मला न झेपणारा आणखी एक पंडिती प्रश्न झाला ! मला एक माहीत आहे – मला हवं तसं मी जगत्ये ! जे करावंसं वाटतं, ते करत्ये ! आणि कुणी मला मठात जाण्याचा उपदेश केला – तर मुळीच जाणार नाही ! मठात जाण्याची बळजबरी केली – तर पळून जाईन, नदीत उडी मारीन !

प्योत्र : माझ्यापेक्षा त्यांच्या संगतीत तुम्ही जास्त वेळ असता ! तुम्ही... तुम्हाला माझ्यापेक्षा ती माणसं जास्त आवडतात ! मला हे जाणवतं... पण मला म्हणायचंय – मी हे म्हणू शकतो ! – ते लोक – रिकामी पिंपं आहेत !

येलेना (आश्चर्याने) : काय ? ते कोण आहेत ?

प्योत्र : रिकामी पिंपं !.. रिकाम्या पिंपांची एक नीतिकथा आहे ...

येलेना : मला माहीत आहे !.. म्हणजे मीसुद्धा ... मीसुद्धा एक रिकामं पिंप ?

प्योत्र : नाही, नाही ! तुम्ही – नाही ! तुम्ही आयुष्यानं मुसमुसलेल्या आहात ! निर्मळ झऱ्याप्रमाणं माणसाला ताजंतवानं करता !

येलेना : अगबाई ! म्हणजे – तुमच्या मतानं मी अगदी थंडगार आहे ?

प्योत्र : थट्टा करू नका ! माझी विनंती आहे तुम्हाला ! हा क्षण ... पण तुम्ही हसताय ! का बरं ? मी एवढा हास्यास्पद आहे ? मी – जगू इच्छितोय ! जगायचंय मला – स्वतःच्या अकलेनुसार ... स्वतःच्या इच्छेप्रमाणं !

येलेना : अहो मग जगा ना ! कोण अडवतंय ?

प्योत्र : कोण ? कुणीतरी आहे – आहे कुणीतरी ! जेव्हा मी विचार करतो – एकट्यानं, स्वतंत्रपणं जगायचा ... तेव्हा मला भास होतो – कुणीतरी म्हणतंय – नाही ! मी तसं वागायचं नाही !

येलेना : तुमचा विवेक ?

प्योत्र : विवेकाचा इथं काय संबंध ? मी ... नाही ... मी काय गुन्हा करू पाहतोय ? मला फक्त स्वतंत्र रहायचंय ... मला म्हणायचं आहे ...

येलेना (त्याच्यावर ओणवे होत) : हे असं सांगत नाहीत ! ह्याहून खूप साधेपणानं हे सांगितलं पाहिजे ! मी तुम्हाला मदत करीन ... बिच्चारा मुलगा ! म्हणजे

अशा साध्या बाबतीत तुमचा घोटाळा होणार नाही !

प्योत्र : येलेना निकोलायेवना ! तुम्ही ... थट्टा करून माझा छळ करताहात ! हा फार कठोरपणा आहे ! मला तुम्हाला सांगायचंय ... माझं अंतःकरण मी तुमच्यासमोर उघडं करतोय ...

येलेना : परत तसं नाही !

प्योत्र : मला वाटतं – मी दुबळा माणूस आहे ... हे आयुष्य मला झेपत नाही ! त्यातलं क्षुद्रपण जाणवतंय, पण काहीही बदल करणं जमत नाही ... काहीही सुधारता येत नाही ... मला दूर जायचंय ! एकटं जगायचंय ...

येलेना (त्याचे डोके स्वतःच्या हातांमध्ये धरत) : मी जे काही बोलते ते नीट, शांतपणं माझ्या पाठोपाठ म्हणा : "मी तुमच्यावर प्रेम करतो !"

प्योत्र : अं – हो ?.. नाही. थट्टा करू नका !

येलेना : अहो खरंच ! मी अगदी मनापासून, गंभीरपणं सांगितलं आणि केव्हाच ठरवलंय – तुमच्याशी लग्न करायचं ! कदाचित ... हे चांगलं नाही ... पण असं करायची माझी खूप खूप इच्छा आहे !

प्योत्र : अं .. किती भाग्यवान मी ! माझं तुमच्यावर प्रेम आहे ...

खोलीतून तात्यानाच्या विव्हळण्याचा आवाज. प्योत्र दचकून उठतो आणि डोळे विस्फारून सभोवती पाहतो.

येलेना शांतपणे उभी राहते.

ही तात्यानां असावी ! आणि इथं आपण ...

येलेना (त्याच्या जवळून जात) : आपण काहीही मूर्खपणाचं केलेलं नाही ...

तात्यानाचा आवाज : पाणी ... पाणी द्या ...

येलेना : आल्ये ... (प्योत्रकडे स्मित करून निघून जाते .)

हातांमध्ये डोके गच्च पकडून गोंधळल्या नजरेने समोर पहात प्योत्र उभा राहतो . हॉलचे दार उघडते आणि आकूलीना दारात उभी राहते .

आकूलीना (दबत्या मोठ्या आवाजात) : पेत्या ! पेत्या . तू कुठं आहेस ?

प्योत्र : इथं !

आकूलीना : जेवायला चल ...

प्योत्र : इच्छा नाही ... मी नाही येत !

येलेना (प्रवेश करीत) : ते माझ्याकडे येत आहेत !

आकूलीना तिच्याकडे नाराजीने पाहते व निघून जाते .

प्योत्र (येलेनाच्या दिशेने झेपावत) : किती वाईट झालं ... ! तिकडं ती पडलीय ... आणि आपण ...

येलेना : चला पाहू ! काय वाईट त्यात ? नाटकात-सुद्धा गंभीर प्रसंगानंतर एखादा हलका-फुलका प्रवेश घालतात ! प्रत्यक्ष आयुष्यात तर असं घडणं अगदी आवश्यक आहे !

प्योत्र तिला अधिक बिलगतो . ती त्याचा हात धरून आपल्याबरोबर त्याला घेऊन जाते .

तात्याना (घोगऱ्या आवाजात कण्हते) : ल्येना ! .. ल्येना ! ..

पोल्या धावत येते .

पडदा

अंक चौथा

स्थळ : पूर्वीचेच.

संध्याकाळ. मेजावर दिवा पेटवलेला. पोल्या मेजावर चहापानाची मांडामांड करतेय. आजारातून बरी होत असलेली तात्याना कोपऱ्यातील कोचावर अर्धवट अंधारात झोपलेली आहे. त्स्वेतायेवा तिच्याजवळ बसली आहे.

तात्याना (हळूच, तिटकाऱ्याने) : आयुष्याकडं आनंदानं आणि धिटाईनं तुझ्याप्रमाणं पाहू नये असं वाटत नाही मला? खूप वाटतं ग—पण जमत नाही! मी श्रद्धेविना जन्मले! विचार करायची जन्मजात सवय लागलीय!

त्स्वेतायेवा : बिच्चारी! तू फारच विचार करतेस! निव्वळ चिंतनाकरता माणसानं हुशार होणं चांगलं नाही, हे तुला पटतं ना? विचार करणं चांगलं, पण कल्पनेच्या भराऱ्याही मारता आल्या पाहिजेत. नाही तर आयुष्य अगदी रटाळ आणि ओझं होऊन बसेल! अधूनमधून भविष्यात डोकावून पाहिलं पाहिजे!

त्स्वेतायेवाचे बोलणे ऐकणारी पोल्या गालातल्या गालात हसते व तंद्रीत मग्न होते.

तात्याना : त्या भविष्यात काय आहे ?

त्स्वेतायेवा : सगळं ... जे काही पाहू इच्छितेस !

तात्याना : हं ... कल्पनाशक्ती चांगली हवी !

त्स्वेतायेवा : श्रद्धा हवी !

तात्याना : कशावर ?

त्स्वेतायेवा : स्वतःच्या स्वप्नांवर ! ठाऊक आहे : माझ्या शाळेतल्या मुलांचे जेव्हा मी डोळे पाहत्ये, तेव्हा मनात येतं : हा नोविकोव, शाळेचं शिक्षण संपवील, जिम्नाशियममध्ये जाईल ... नंतर विद्यापीठात ... मला वाटतं, तो डॉक्टर होईल ! फार छान, गुणी, जबरदस्त पोरगा आहे ... भव्य कपाळाचा. लोकांशी पटकन मिळून-मिसळून जातो. लाभाची अपेक्षा न धरता खूप काम करील. माणसं त्याच्यावर खूप प्रेम करतील ... त्याचा खूप आदर करतील ! मला हे ठाऊक आहे. आणि कधीतरी बालपणीच्या आठवणी काढताना त्याला आठवेल – मधल्या सुटीत खेळताना त्याच्या त्स्वेतायेवा नांवाच्या मास्तरणीनं त्याचं नाकाड कसं फोडलं होतं ! कदाचित त्याला ही आठवण राहणार नाही ... पण म्हणून काही बिघडत नाही ! मला वाटतं ... त्याला नक्की आठवण राहील ... माझ्यावर त्याचा खूप जीव आहे. शिवाय तो फाटक्या कपड्यातला, मळक्या चेहऱ्याचा, विसरभोळा क्लोकोव. नेहमी भांडतो आणि खोड्या काढतो. पोरका आहे. रात्रपाळीचा पहारा करणाऱ्या काकाबरोबर राहतो. फार गरीब आहेत ... पण भलता अभिमानी आणि धीट ! मला वाटतं – तो पत्रकार होईल. किती किती छान पोरं

आहेत माझ्यापाशी ! त्यांचं पुढं काय होईल, आयुष्यात ते कोणती भूमिका पार पाडतील, ह्याबद्दल नेहमी मनात नकळत विचार येत राहतात. माझे विद्यार्थी कसे जगतील ह्याबद्दल कल्पना करण्यात खूप मजा वाटते ! तान्या, तसं पाहिलं तर ही फार क्षुल्लक बाब आहे – पण त्यात किती गंमत आहे म्हणून सांगू !

तात्याना : पण तू ? तू स्वतः कुठं ? तुझे विद्यार्थी कदाचित खूप छान जगतील ... पण तेव्हा तू ...

त्स्वेतायेवा : मी मेलेली असेन ? छे: छे: ! मी चिक्कार म्हातारी होईपर्यंत जगणार आहे.

पोल्या (हळू आवाजात लाडिकपणे) : मार्या, तुम्ही कित्ती छान आहात ! कित्ती गोड आहात ...

त्स्वेतायेवा (पोल्याकडे पाहून स्मित करत) : अरे-च्चा ! चिमणी चिवचिवली ! तान्या, मी भावनाप्रधान नाही ... पण जेव्हा भविष्यकाळाचा विचार करत्ये ... भविष्यकाळातल्या माणसांचा विचार करत्ये, जीवनाचा विचार करत्ये – माझ्या मनात एक गोड हुरहुर निर्माण होते. जणू माझ्या काळजात शरदातला एक स्वच्छ दिवस उगवतो – शरदात असे दिवस येतात बघ ... स्वच्छ आकाश ... शांत तळपणारा सूर्य, वातावरण मादक आणि तरल ... दूरच्या रेषा ठळक दाखवणारं ... हवा ताजी ... थंड नाही ... उबदार ... पण उकाडा नव्हे ...

तात्याना : ह्या सगळ्या ... परीकथेतल्या गोष्टी ! कदाचित तू, नील, शीश्किन – आणि तुमच्यासारखी सगळी माणसं ... खरोखरच स्वप्नांमध्ये जगू शकता !

पण मला तसं जमत नाही.

त्स्वेतायेवा : नाही, थांब ... ती केवळ स्वप्नं नाहीत!

तात्याना : मला काहीही, कधीही खरं भासलं नाही ... फक्त ही मी स्वतः आणि ह्या भिंती सोडून! जेव्हा मी "हो" अगर "नाही" म्हणत्ये, तेव्हा ते काम मत म्हणून नव्हे! केवळ मी काहीतरी म्हटलं पाहिजे एवढ्याच कारणासाठी! खरंच! कधी मी "नाही" म्हणत्ये, पण दुसऱ्याच क्षणी मनात विचार येतो– खरंच? कदाचित "हो" असेल!

त्स्वेतायेवा : तुला तसं आवडतं! खरं सांग: ह्या दुहेरी व्यक्तिमत्वाची तुला स्वतःला मोहिनी पडत्ये ना? अथवा कोणत्याही गोष्टीवर श्रद्धा ठेवायला तुला भीती वाटत्ये? सरतेशेवटी, श्रद्धेपाठी जबाबदाऱ्या येतात!

तात्याना : मला माहीत नाही ... खरंच माहीत नाही! मला श्रद्धाळू बनव! तसं तुम्ही दुसऱ्यांना स्वतःवर श्रद्धा ठेवायला लावता! (हळूच स्मित करते.) पण तुमच्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या लोकांची मला दया येते! तुम्ही त्यांची फसवणूक करता! आयुष्य नेहमी आत्ता आहे तसंच होतं ... गढूळ आणि घुसमटून टाकणारं ... आणि नेहमी ते तसंच राहणार आहे!

त्स्वेतायेवा (स्मित करत): खरंच? कदाचित– तसं राहणार नाही.

पोल्या (स्वतःशी): नक्कीच तसं राहणार नाही!

तात्याना : तू काय म्हणालीस?

पोल्या : मी म्हणत्ये – तसं राहणार नाही !

त्स्वेतायेवा : शाब्बास, चिमणे !

तात्याना : ही त्यातली एक कमनशिबी ... श्रद्धाळू-मधली ! विचार तिला – का नाही राहणार ? आयुष्य का म्हणून बदलणार विचार ...

पोल्या (हळूच त्यांच्यापाशी जात) : त्याचं असं आहे ... अजून सगळी माणसं पुरतं जगत नाहीत ! फार कमी माणसं आयुष्याचा वापर करतात ... बहुतेकांना तर जगायला फुरसतच नाही ! चतकोर भाकरीसाठी ती फक्त राबताहेत. पण जेव्हा ही माणसं ...

शीश्किन (पटकन प्रवेश करत) : रामराम मंडळी ! (पोल्याला.) नमस्ते, डंकन राजाच्या सुंदर कन्ये !

पोल्या : काय ? कोणता राजा ?

शीश्किन : आहा ! पकडलं ! आत्ता समजलं – हायने तुम्ही वाचला नाही – पण दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ पुस्तक मात्र तुमच्यापाशी पडलंय ! नमस्ते, तात्याना वासिल्येवना ! ..

तात्याना (हात पुढे करत) : आता तिला पुस्तकां-साठी वेळ नाही ... ती लग्न करत्येय !

शीश्किन : असं ? कुणाशी ? आँ ?

त्स्वेतायेवा : नीलशी.

शीश्किन : अरेच्चा ! तर ह्याबद्दल मी अभिनंदन करतो. पण खरं म्हणजे हा शहाणपणा नव्हे – लग्न करणं आणि तत्सम ! आधुनिक काळात लग्न म्हणजे ...

तात्याना : पुरे ! नको ! आम्हाला व्याख्यान ठोकू नका ! ह्या विषयावर तुम्ही अनेकदा प्रवचन झोडलंय !

शीश्किन : ठीक आहे – गप्प बसतो ! तसं पाहिलं तर मला मुळीच सवड नाही ! (त्स्वेतायेवाला .) तुम्ही माझ्याबरोबर येता ना ? छान . प्योत्र कुठं ?

पोल्या : ते वरच्या मजल्यावर ...

शीश्किन : हं ! नाही, मी नाही बुवा जात त्यांच्यापाशी ! तात्याना वासिल्येवना ... तुम्ही ... किंवा पोल्या ... तुम्ही सांगा त्याला ... प्रोखोरोवची माझी शिकवणी ... म्हणजे माझी ती शिकवणी सुटली ! ..

त्स्वेतायेवा : परत ? बाई ग, तुमचं नशीबच खोटं !

तात्याना : तुमचं भांडण झालं ?

शीश्किन : तसं भांडण नव्हे . मी सभ्य वागण्याचा प्रयत्न केला !

त्स्वेतायेवा : पण घडलं तरी काय ? तुम्हीच तर त्या प्रोखोरोवचे गुण गात होतात !

शीश्किन : होय ! माझा मूर्खपणा होता तो ! तसं पाहिलं तर इतर अनेकांपेक्षा तो खूप चांगला आहे ... बेअकली नाही ! पण बढाईखोर आहे ... घमेंड्या मारतो ! (अचानक तडकून) हलकट सैतान साला !

तात्याना : प्योत्र यापुढं तुम्हाला शिकवण्या मिळवून देईल असं मला वाटत नाही .

शीश्किन : कदाचित ते माझ्यावर चिडतील .

त्स्वेतायेवा : तुमच्यात आणि प्रोखोरोवमध्ये काय बिनसलं ?

शीश्किन : विश्वास बसेल तुमचा ? तो यहुद्यांचा द्वेष करतो !

तात्याना : तुम्हाला काय करायचंय त्याच्याशी ?

शीश्किन : असभ्यपणा आहे हा ! बुद्धिवादी माणसाला शोभत नाही ! एकूणच भांडवलदार आहे लेकाचा ! आता हीच हकीकत घ्या : त्याची मोलकरीण रविवारच्या शाळेत जायला लागली होती. उत्तम ! रविवारच्या शाळा किती उपयुक्त आहेत ह्यावर त्यानंच मला एक लांबलचक कंटाळवाणं व्याख्यान ठोकलं होतं ... वस्तुत: मी त्याच्यापाशी अवाक्षरानं विचारणा केली नव्हती ! ह्या शाळेच्या स्थापनेत पुढाकार घेणाऱ्यांमध्ये त्याचाही समावेश होता अशी त्यानं बढाईही मारली. आणि एका रविवारी तो घरी आला – बापरे ! त्याच्यासाठी घराचं दार मोलकरणीनं न उघडता दाईनं उघडलं ! साशा – म्हणजे मोलकरीण – कुठं आहे ? शाळेत ! अस्सं ! आणि मोलकरणीला शाळेत जायला बंदी केली ! आता ह्याला काय म्हणाल तुम्ही ?

तात्याना खांदे उडवते आणि गप्प राहते.

त्स्वेतायेवा : पण एरवी एवढ्या मोठमोठ्या गोष्टी करतो ...

शीश्किन : एकूण बोलायचं तर असली चक्रम माणसंच प्योत्र नेहमी माझ्यासाठी शिकवणीला शोधून काढतो.

तात्याना (कोरडेपणाने) : आठवतं का, त्या खजिनदाराला तुम्ही शिकवत होतात तेव्हा त्याचं खूप कौतुक केलं होतं ...

शीश्किन : होय ... अर्थातच ! म्हातारा मोठा छान ! पण नाणकशास्त्रवेत्ता ! सारखा माझ्या नाकाशी वेगवेगळी तांब्याची नाणी धरायचा आणि सीझर, दिआदोखी * आणि रथांमधल्या फॅराओंबद्दल बोलत रहायचा. शेवटी मला सहन होईना. एक दिवस त्याला म्हणालो : "ऐका, विकेन्ती वासिल्येविच, मला वाटतं – हे सर्व फालतू आहे ! कोणताही फरसबंदी दगड तुमच्या नाण्यांपेक्षा जास्त प्राचीन आहे !" त्याला अपमान वाटला. "आयुष्याची पंधरा वर्षं मी काय फालतूपणा करण्यात वाया घालवली ?" मला तो म्हणाला. मी होकारार्थी उत्तर दिलं. तेव्हा माझा हिशेब चुकता करताना त्यानं मला अर्धा रूबल कमी दिला ... मला वाटतं, स्वतःच्या नाण्यांच्या संग्रहासाठी ठेवला. पण ही अगदी क्षुल्लक बाब झाली ... प्रोखोरोवबरोबर मात्र ... (उदासपणे.) फार विचित्र स्वभाव आहे माझा. (घाईने.) मार्या निकितीश्ना, चला, आपल्याला गेलं पाहिजे !

त्स्वेतायेवा : मी तयार आहे. अच्छा, तान्या ! उद्या रविवार ... सकाळीच तुझ्याकडं येईन मी.

तात्याना : जरूर ये. काहीवेळा मला वाटतं ... तुम्हा लोकांच्या पायात अडकणाऱ्या एखाद्या तणासारखी आहे मी ... ना मी सुंदर, ना उपयुक्त ... पण लोकांच्या पायांमध्ये अडकून त्यांना चालायला मात्र अडथळा करत्ये !

शीश्किन : काय भयंकर कल्पना ! शी : !

---

* सिकंदराच्या मृत्यूनंतर सत्तेसाठी लढणारे सेनानी – सं.

त्स्वेतायेवा : तान्या, असं ऐकलं म्हणजे फार वाईट वाटतं!

तात्याना : जरा थांब! मला वाटतं... आयुष्यातलं एक कठोर सत्य मला उमगलंय : ज्याची कशावरही श्रद्धा नाही, त्याला जगता येणार नाही!.. त्यानं मेलं पाहिजे!

त्स्वेतायेवा (स्मित करत) : खरंच? कदाचित तशी जरूरी नाही!

तात्याना : तू माझी चेष्टा करत्येस! दुसरा याहून चांगला उद्योग नाही?

त्स्वेतायेवा : नाही तान्या, नाही लाडके! तुझ्या आजारापायी, थकव्यापायी, तू असं बोलत्येस!.. बरं, भेटू पुन्हा! आम्ही क्रूर आणि कठोर मनाचे आहोत असं समजू नकोस.

तात्याना : बरं, या. भेटू पुन्हा.

शीश्किन (पोल्याला) : केव्हा वाचणार हायने? अरे हो... तुम्ही लग्न करता आहात!.. त्याविरुद्ध एक-दोन गोष्टी बोललो असतो... पण... अच्छा! (त्स्वेतायेवाच्या पाठोपाठ जातो.)

स्तब्धता.

पोल्या : मला वाटतं, चर्चमधल्या, प्रार्थना लौकरच आटपतील. समोवार गरम करायला सांगू?

तात्याना : म्हातारे चहा पितील असं मला वाटत नाही... पण तुला हवं तसं कर.

स्तब्धता .

पूर्वी शांतता खायला उठायची मला, पण आता फार छान वाटते ही शांतता!

पोल्या: तुमच्या औषधाची वेळ झाली ना?

तात्याना: अजून नाही... गेले काही दिवस आपल्या घरात फार गडबड-गोंगाट होता. हा शीश्किन फार गोंगाट करतो.

पोल्या (तिच्यापाशी जात): छान आहे तो...

तात्याना: दयाळू आहे, पण मूर्ख.

पोल्या: सभ्य आणि धीट आहे. जिथं काही अयोग्य दिसतं, तिथं ताबडतोब त्याविरुद्ध आवाज उठवतो. त्या मोलकरणीची कशी बाजू घेतली पहा. एरवी श्रीमंताघरची नोकरमाणसं कसं जगतात इकडं कोण लक्ष देतो? आणि कुणाच्या लक्षात आलं, तरी त्यांची बाजू घेऊन भांडतो कोण?

तात्याना (पोल्याकडे न पाहता): मला सांग पोल्या... तुला भीती नाही वाटत... नीलशी लग्न करायला?

पोल्या (चकित होऊन): भिण्यासारखं काय आहे त्यात? नाही, मी मुळीच भीत नाही...

तात्याना: पण मला बाई भीती वाटली असती! ह्याबद्दल मी तुझ्याशी बोलत्येय, कारण मला तू आवडतेस! तू त्याच्यासारखी नाही. तू साधी-सुधी आहेस. त्यानं खूप वाचन केलंय, तो शिकलासवरलेला आहे. कदाचित तुझा त्याला कंटाळा येईल... ह्याचा तू विचार केला आहेस पोल्या?

पोल्या : नाही. मला माहीत आहे... तो माझ्यावर प्रेम करतो.

तात्याना (तिखटपणे) : कसं काय समजतं हे?

तेतेरेव समोवार आणतो.

पोल्या : उपकार झाले तुमचे! मी दूध आणत्ये! (जाते.)

तेतेरेव (अतिमद्यपानापायी चेहरा सुजलेला) स्वैपाकघराच्या जवळून येत होतो, तर स्तेपानिदा विनवायला लागली : "बाबारे, एवढा समोवार उचलून ने! म्हणत्ये : तुला कधी इच्छा झाली तर खारवलेली काकडी देईन खायला!" मला खादाडाला मोह पडला...

तात्याना : तुम्ही एव्हाना चर्चमध्ये प्रार्थनेला जाऊन आलात?

तेतेरेव : नाही, आज गेलोच नाही. डोकं ठणठण दुखतंय. तुम्ही – कशा आहात? बरं वाटतंय?

तात्याना : ठीक आहे. दिवसातून वीस वेळा हा एकच प्रश्न मला ऐकायला मिळतो. इथं जर गोंगाट कमी असता, तर मला आणखी बरं वाटलं असतं. ही धांदल मला थोडी घाबरीघुबरी करत्ये... सगळीजणं कुठंतरी धावत असतात, ओरडत असतात. बाबा नीलवर संतापतात, आई सारखी सुस्कारे टाकत बसत्ये... आणि मी मुकाट निजून पाहत्ये... ज्याला ही माणसं जगणं म्हणतात त्यात मला तरी काही अर्थ दिसत नाही.

तेतेरेव : जगणं हा एक मजेदार उद्योग आहे.

मी तसा परका माणूस ... ह्या जमिनीवरच्या भानगडीं-मध्ये मुळीच भाग घेत नाही ... केवळ कुतूहलापोटी जगतो ... आणि तरीही आयुष्यात मला मजा वाटते.

तात्याना : आयुष्याकडून तुम्ही कसल्याच अपेक्षा धरत नाही, मला ठाऊक आहे. पण त्यात एवढी गंमत कसली आढळते तुम्हाला ?

तेतेरेव : लोक जीवनाचा सूर लावताहेत. नाटकाच्या थेटरात वादकमंडळी जेव्हा वाद्यांचा सूर लावत असतात, तेव्हा ऐकायला मला आवडतं. कानांवर वेगवेगळे अस्सल सूर पडतात, एखादी सुंदर ओळही ऐकू येते ... मग कुतूहल चाळवतं आणि वादक काय वाजवणार ते ऐकायला जीव आतुर होतो. त्यांच्यात सोलो वाजवणारा कोण ? नाटक कोणतं ? तसंच इथं घडतं ... माणसं सूर लावत असतात !

तात्याना : थिएटरबाबत हे खरं असेल. तिथं कंडक्टर येतो, हातातली छडी हलवतो आणि एखाद्या जुनाट संगीताचा तुकडा वादक निर्जीवपणानं वाजवतात. पण इथं ? ही माणसं काय वाजवू शकतात ? मला माहीत नाही ..

तेतेरेव : नांदीचा एखादा तुकडा ...

तात्याना : बघू !

स्तब्धता.

तेतेरेव पाईप शिलगावतो.

तुम्ही पाईप का ओढता ? सिगारेट का नाही ओढत ?

तेतेरेव: सोयीस्कर पडतं म्हणून. मी हा असा भटक्या. वर्षाचा बराच काळ रस्त्यावर घालवतो. आता लौकरच परत जाईन. हिवाळा सुरू झाला – की निघालोच!

तात्याना: कुठं?

तेतेरेव: माहीत नाही... काही फरक पडत नाही.

तात्याना: झिंगल्या अवस्थेत कुठंतरी गोठून पडाल!

तेतेरेव: प्रवासात कधीही दारू पीत नाही. आणि गोठलो तर काय झालं? एकाच जागी बसून सडण्यापेक्षा रस्त्यावर चालताना गारठणं जास्त छान!

तात्याना: मला टोमणा मारता काय?

तेतेरेव (घाबरून उठत): अरे बापरे, तसं नाही! अहो, असं कसं वाटलं तुम्हाला? मी... मी काही पशू नव्हे!

तात्याना (स्मित करत): उगीच अस्वस्थ होऊ नका! मला ह्याचा अपमान नाही वाटत! वेदनेची जाणीवच हरवलीय माझी! (कडवटपणे.) प्रत्येकाला जणू हे माहीत झालंय. नील, पालागेया, येलेना, मार्या... भिकाऱ्याला काय वाटेल ह्याचा विचार न करता मिठाईवर ताव मारणाऱ्या श्रीमंतांप्रमाणं वागतात सगळी!

तेतेरेव (तोंड वाकडे करून दात आवळून बोलतो): कशाला स्वतःकडं कमीपणा घेता? स्वतःची प्रतिष्ठा राखली पाहिजे...

तात्याना: ठीक आहे... पुरे करू हा विषय!

स्तब्धता.

सांगा मला काहीतरी... स्वतःबद्दल! तुम्ही स्वतः-विषयी कधीही बोलत नाही – का असं?

तेतेरेव: कथा प्रदीर्घ आहे, पण रसदार नाही.

तात्याना: नाही, सांगाच! असं विचित्र आयुष्य तुम्ही का जगता? मला तर तुम्ही हुशार वाटता, गुणी वाटता. असं काय घडलं तुमच्या आयुष्यात?

तेतेरेव (दात विचकून): काय घडलं? ही फार लांबलचक आणि कंटाळवाणी कथा आहे... जर मी स्वतःच्या शब्दात सांगितली... मी –

सूर्याला, सुखाला शोधायला गेलो...
नागडा आणि अनवाणी परतलो,
माझ्या आशा – माझी स्वप्नं
माझं सर्वस्व मी गमावलं!..

हा खुलासा त्रोटक असला तरी मला फार सुंदर वाटतो. त्यात फक्त आणखी पुस्ती जोडली पाहिजे की, रशियात दारू न पिणारा, प्रामाणिक, कामसू माणूस म्हणून राहण्यापेक्षा दारुडा आणि भटक्या म्हणून जगणं जास्त सोयीस्कर जातं.

प्योत्र आणि नील प्रवेश करतात.

तलवारीसारखी कठीण आणि धारदार माणसंच फक्त जगात स्वतःची वाट काढू शकतात... अरेच्चा! नील! कुठून आलास?

नील: डेपोतून. जोरदार लढत झाली आणि तेजस्वी विजय मिळवला. तो मठ्ठ टाळक्याचा डेपो-प्रमुख...

प्योत्र : मला वाटतं, लौकरच तुला नोकरीवरून काढून टाकतील ...

नील : दुसरी नोकरी शोधीन.

तात्याना : प्योत्र, तुला ठाऊक आहे – शीश्किनचं प्रोखोरोवशी भांडण झालं आणि ही गोष्ट तो तुला सांगायला शरमत होता.

प्योत्र (संतापून) : हद्द झाली त्याची ! किती अवघड करून ठेवलं त्यानं मला प्रोखोरोवसमोर ? आणि आता दुसऱ्या कुणाची शिफारस करणं अशक्य ...

नील : तू घाई करू नकोस ! त्याआधी दोष कुणाचा ते जाणून घे.

प्योत्र : मला माहीत आहे !

तात्याना : प्रोखोरोव यहुदीद्वेष्टा आहे हे शीश्किनला आवडलं नाही.

नील (हसून) : वा रे कोंबड्या !

प्योत्र : बरोबर ! तुला हे आवडणारच ! इतरांच्या दृष्टिकोनाबाबत तुलाही आदर वाटत नाही ! जंगली माणसं !

नील : थांब ! यहुद्यांचा तिटकारा करणाऱ्यांबद्दल तुला स्वतःला आदर वाटतो ?

प्योत्र : कुणाच्याही विचारांबद्दल – मग ते कसलेही असोत – त्या माणसावर हात टाकायची माझी तयारी नाही.

नील : पण माझी आहे ...

तेतेरेव (भांडणाऱ्या दोन्ही बाजूंना शांतपणे न्याहाळून) : होऊन जाऊं दे !

प्योत्र : कुणी दिला... कुणी दिला तुम्हाला हा हक्क ?

नील : हक्क – देत नाहीत. हक्क खेचून मिळवायचा असतो. जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली चिरडून जायची इच्छा नसेल, तर माणसानं स्वतःच हक्क जिंकून घेतले पाहिजेत.

प्योत्र : अस्सं !

तात्याना (तिरसटपणे) : झाली वाद पेटायला सुरुवात... अखंड वाद ! तुम्हाला वीट कसा येत नाही ?

प्योत्र (स्वतःला आवरत) : माफ कर – परत असं करणार नाही ! पण एक मात्र खरं – शीश्किननं मला पेचात टाकलं !

तात्याना : मला माहीत आहे. मूर्ख आहे तो !

नील : तो फार छान पोरगा आहे. दुसऱ्या कुणाला स्वतःच्या पायावर पाय ठेवायला देणार तर नाहीच – उलट स्वतःच दुसऱ्याच्या पायावर प्रथम पाय ठेवील ! स्वतःची किंमत जाणून असणं चांगलं असतं !

तात्याना : म्हणजे पोरकटपणा म्हणायचाय तुला ?

नील : नाही. मी चूक केली नाही. खुशाल म्हणा त्याला पोरकटपणा ! पण तरीही तो चांगलाच !

प्योत्र : हास्यास्पद आहे.

नील : तुला असं वाटतं ? दाता आवडत नाही म्हणून भाकरीचा एकुलता एक तुकडा नाकारणारा माणूस ?

प्योत्र : याचा अर्थ तो पुरेसा भुकेला नाही ! मला माहीत आहे – तुला हे पटणार नाही. तू स्वतः तसाच आहेस. पोरकट ! दर पावलाला वडलांना दाखवून

देऊ पाहतोस की, त्यांच्याबद्दल तुझ्या मनात काडीमात्र आदर नाही! कशासाठी असं?

नील: कशाला हे लपवायचं?

तेतेरेव: माझ्या बाळा, सभ्यता राखण्यासाठी लोकांनी धादांत खोटं बोलायचं असतं!

प्योत्र: पण ह्यात उद्देश कोणता? कोणता?

नील: बंधू, आपण एकमेकांना समजू शकणार नाही... कशाला उगाच समजावत बसू? तुझे वडील जे काही करतात आणि बोलतात... त्या प्रत्येक गोष्टी-चा मनस्वी तिटकारा वाटतो मला!

प्योत्र: कदाचित... मलासुद्धा तिटकारा वाटतो! पण तो न दाखवण्याची मी खबरदारी घेतो. तू मात्र सतत त्यांना डिवचत असतोस... आणि त्याचा राग ते आमच्यावर काढतात – माझ्यावर आणि बहिणीवर!

तात्याना: आता गप्प बसा ना! किती रटाळ!

नील तिच्याकडे कटाक्ष टाकून मेजाकडे जातो.

प्योत्र: आमच्या बोलण्याचा तुला एवढा त्रास होतो?

तात्याना: मला अगदी वीट आलाय! सारखं तेच ते... नेहमी तेच ते!

पोल्या हातात दुधाचा खुजा घेऊन प्रवेश करते. नील स्वप्नाळूपणे स्मित करत असलेला पाहून ती सर्वांचे त्याच्याकडे लक्ष वेधते.

पोल्या: बघा, बघा! कसा एखाद्या संतासारखा दिसतो!

तेतेरेव : तू का हसतोस ?

नील : मी ? डेपोच्या प्रमुखाची कशी भंबेरी उडवली त्याची आठवण करत होतो ... आयुष्य म्हणजे मोठी गंमत आहे !

तेतेरेव (खर्ज सुरात) : तथास्तु !

प्योत्र (खांदे उडवून) : आश्चर्य वाटतं ! ही आशावादी माणसं आंधळी जन्मतात काय ?

नील : मी आशावादी आहे अथवा आणखी कुणी आहे – हे महत्त्वाचं नाही ! पण मला जगायला आवडतं ! (उठतो आणि फेऱ्या मारू लागतो .) पृथ्वीवर राहणं ही फार छान गोष्ट आहे !

तेतेरेव : खरंच !

प्योत्र : तुम्ही दोघं – विनोदी आहात ! जर नाटक करत नसाल तर !

नील : आणि तू ... मला ठाऊक नाही ... तुला काय म्हणावं ? तसं कुणालाच रहस्य राहिलेलं नाही – तू प्रेमात पडला आहेस आणि तीसुद्धा तुझ्यावर प्रेम करतेय ! निदान एवढ्यासाठी तरी तुला गावंसं वाटत नाही ? कोलांटया उडया माराव्याशा वाटत नाहीत ? ह्या गोष्टीचा खरंच तुला आनंद होत नाही ?

समोवारआडून पोल्या सर्वांकडे अभिमानाने पाहते . नीलचा चेहरा दिसावा म्हणून तात्याना कोचावर कूस वळवते . पाईपमधील राख झाडताना तेतेरेव स्मित करतो .

प्योत्र : तू एक विसरतोस . पहिली गोष्ट : विद्यापी-

ठात अभ्यास करणाऱ्यांना लग्न करायची परवानगी नाही. दुसरी गोष्ट: माझ्या पालकांविरुद्ध मला फार मोठी लढाई करावी लागेल. आणि तिसरी –

नील: अरे देवा! काय रे हे? तुला एकच गोष्ट करण्यासारखी उरलीय – पळ! वाळवंटात पळून जा!

पोल्या स्मित करते.

तात्याना: नील, उगीच चेष्टा करू नकोस!

नील: नाही, पेत्रूखा, नाही! तू प्रेमात नसलास तरी जगणं ही फार थोर बाब आहे. अगदी खिळखिळं झालेलं इंजिन ऐन शरदातल्या रात्री, वादळ-वाऱ्यात, धुवाधार पावसात चालवत असलास – किंवा हिवाळ्यात बर्फाच्या गरजत्या चक्री वादळात चालवत असलास, बर्फानं तुला पुरतं वेढून टाकलं असलं – अशा रात्री इंजिन चालवणं जरी दमछाक करणारं आणि धोक्याचं असलं – तरी त्यातसुद्धा एक मजा आहे! फक्त एकाच गोष्टीत मजा नाही – प्रामाणिक माणसांना डुकरांकडून, चोरांकडून, मूर्खांकडून हुकूम ऐकावे लागतात! पण आयुष्य त्यांच्यासाठी मुळी बनवलेलंच नाही! ती वाईट माणसं नाहीशी होतील. निकोप शरीरावरची जखम जशी नाहीशी होते, तशी ती माणसं अदृश्य होतील. बदल घडणार नाही अशी एकही बाब जीवनात नाही!

प्योत्र: ही तुझी भाषणं आम्ही यापूर्वी खूप वेळा ऐकलीत. जरा थांब – आणि आयुष्य तुला काय उत्तर देतं ते पहा.

नील: मला हवं तेच उत्तर मी आयुष्याकडून घेईन. तू मला घाबरवू शकत नाहीस. तुझ्यापेक्षा मला जास्त

चांगलं माहीत आहे की, आयुष्य खडतर आहे; काही वेळा तर किळसवाणं क्रूर आहे आणि एक बेफाम, बेलगाम शक्ती माणसांना खाली दाबून टाकत असते. मला ते सगळं ठाऊक आहे आणि आवडत नाही. माझं मन खळबळून उठतं! ही रीत मला नकोय! मला माहीत आहे की, आयुष्य एक गंभीर मामला आहे आणि त्याला आकार नाही. त्याला आकार द्यायला माझी सगळी शक्ती आणि माझं कर्तृत्व पणाला लावावं लागेल. मी काही पुराणकथांमधला नायक नाही– मी एक प्रामाणिक, दणकट माणूस आहे. तरीही मी म्हणतो: हरकत नाही! शेवटी आम्हीच जिंकू! जीवनाच्या आवर्तात स्वतःला फेकून देऊन त्याला माझ्या इच्छेप्रमाणं बदलण्याची मी शर्थ करीन. त्याला इकडून तिकडून लोटीन, आकार देईन, एका गोष्टीला मदत करीन, तर दुसरीला अडथळा करीन. ह्याला म्हणतात आयुष्य जगण्यातला आनंद!

तेतेरेव (किंचित हसून): शिकण्याचं रहस्य त्यात दडलंय! तत्त्वज्ञानाचा धडा त्यात सामावलाय! बाकी सगळं तत्त्वज्ञान – फालतू!

येलेना (दारातून): कोणत्या कारणासाठी इथं आरडाओरडा आणि हातवारे चाललेत?

नील (तिच्यापाशी वेगाने जात): बाईसाहेब! तुम्ही मला समजून घ्याल! आत्ता मी आयुष्याचं गौरवगीत गायलं! सांगा बघू – जीवन म्हणजे एक आनंद आहे ना!

पोल्या (हळूच): जगणं – फार छान बाब आहे.

येलेना : कुणाचा विरोध आहे ह्याला ?

नील (पोल्याला) : अहा 'ग माझी हळूबाई !

येलेना : माझ्यासमोर तुमचा प्रेमप्रसंग नको हं !

प्योत्र : काय झालंय त्याला कुणास ठाऊक ! नक्की दारू प्यालाय !

तात्याना कोचावर डोके टेकवून सावकाशपणे हात वर उचलते आणि स्वतःचा चेहरा झाकून घेते.

येलेना : जरा थांबा ! तुम्ही चहा प्यायला जमला आहात ना ? मी तुम्हाला माझ्याकडं बोलवायला आल्ये आहे ... पण आता मीच तुमच्याइथं थांबत्ये. आज तुमच्याकडं आनंदी वातावरण आहे. (तेतेरेवला.) फक्त तुम्ही, पंडित कावळेमहाराज, चेहरा आंबट करून बसला आहात. कशाबद्दल ?

तेतेरेव : मलासुद्धा खूप आनंद झालाय. पण मी आनंदात असतो तेव्हा गप्प रहायला आवडतं आणि दुःखात असलो म्हणजे गोंगाट करतो.

नील : सगळ्या मोठ्या, हुशार, दुर्मुखल्या कुत्र्यां-प्रमाणं !

येलेना : मी तुम्हाला ना कधी आनंदी पाहिलंय, ना कधी दुःखी. फक्त तत्त्वज्ञान झोडताना ऐकलंय. मंडळी, तुम्हाला ठाऊक आहे का, तान्या – तुला ठाऊक आहे का ? ते मला तत्त्वज्ञान शिकवतात ! काल त्यांनी मला जवळच्या कारणांच्या काही नियमांवर एक लांबलचक व्याख्यान ऐकवलं ... छी : ! विसरले बाई ते सगळं ! काय बरं ते शब्द ?

तेतेरेव : सर्व जीवन परिस्थितीचा उगम ...

येलेना : ऐकलंत ? पहा, कसलं प्रचंड शहाणपण मला माहीत आहे ! तुम्हाला ठाऊक नाही की, हा कायदा प्रतिनिधित्व करतो ... प्रतिनिधित्व हा एक अस्सल तात्त्विक शब्द आहे ... एखाद्या एखाद्या दाताप्रमाणं, कारण त्याला चार मुळं आहेत ... बरोबर ?

तेतेरेव : तुमच्याशी वाद घालण्याची हिंमत नाही.

येलेना : अर्थातच ! जरा हिंमत करून बघा ! पहिलं मूळ – कदाचित पहिलं नसेल – हे प्राथमिक कारण. अस्तित्व – आकारातलं वस्तुमान. माझं उदाहरण घ्या : मी वस्तुमान आहे, ज्यानं सकारण स्त्रीचा आकार घेतलाय, पण काही कारण नसताना अस्तित्वाचा माझा हक्क नाकारण्यात आलाय. अस्तित्व चिरंतन आहे, पण ह्या पृथ्वीवर वस्तुमान आकारात उदयाला येतं आणि मग नाहीसं होतं. बरोबर ?

तेतेरेव : ठीक आहे. चालेल !

येलेना : त्याशिवाय कारणभूत अशी पूर्व आणि पश्चात नाती असतात हे मला ठाऊक आहे, पण ती कोणती हे मात्र विसरले ! ह्या सगळ्या शहाणपणापायी मला बहुधा टक्कल पडणार ! पण ह्या सर्व तत्त्वज्ञानानं उपस्थित केलेली सर्वांत गहन समस्या म्हणजे : तेरेन्ती ख्रिसान्फोविच, तुम्ही मला तत्त्वज्ञान का शिकवता ?

तेतेरेव : पहिलं कारण : तुमच्याकडं पहायला मला आनंद होतो.

येलेना : धन्यवाद ! दुसरं कारण सांगू नका. कदाचित त्यात दम नसणार ...

तेतेरेव : दुसरं कारण : माणूस तात्त्विक बोलताना खोटं बोलू शकत नाही, कारण तत्त्वज्ञान म्हणजेच केवळ कल्पनेची भरारी!

येलेना : काहीही समजलं नाही! खरंच, तान्या, आता कशी आहे तुझी प्रकृती? (उत्तराची वाट न पाहता.) प्योत्र... वासिल्येविच! तुम्ही का नाराज आहात?

प्योत्र : स्वतःवर नाराज आहे.

नील : आणि बाकीच्यांवर?

येलेना : मला अचानक गाणं म्हणायची ऊर्मी आलीय! आज शनिवार आहे आणि अजून चर्चची प्रार्थना संपली नाही हे किती वाईट!

म्हातारी माणसे येतात.

आह, धार्मिक मंडळी आली! नमस्ते!

बेस्सेमेनोव (कोरडेपणाने) : आमचाही तुम्हाला नमस्कार.

आकूलीना (नाराजीच्या सुरात) नमस्कार, बाईसाहेब! पण आज आपला आधी एकदा नमस्कार – चमत्कार होऊन गेलाय!

येलेना : होय की! मी विसरलेच! चर्चमध्ये खूप उकाडा होता?

बेस्सेमेनोव : तपमान मोजण्यासाठी आम्ही तिथं गेलो नव्हतो!

येलेना (शरमून) : अस्सं! पण माझा विचारण्याचा हेतु तो नव्हता – मला विचारायचं होतं... खूप माणसं होती का?

आकूलीना: आम्ही मोजली नाहीत, बाईसाहेब !

पोल्या (बेस्सेमेनोवना) : चहा पिणार ना तुम्ही ?

बेस्सेमेनोव: प्रथम जेवणार. अग ए, तू जेवणाची तयारी कर.

नाक सुरसुरत आकूलीना जाते. शांतता. तात्याना उठते आणि येलेना तिला मेजापर्यंत चालायला मदत करते. नील तात्यानाच्या जागी कोचावर बसतो. प्योत्र येरझाऱ्या घालू लागतो. पियानोपाशी बसलेला तेतेरेव त्या सर्वांकडे सस्मित मुद्रेने पहात राहतो. पोल्या समोवारपाशी आहे. बेस्सेमेनोव कोपऱ्यातील पेटीवर बसतात.

माणसं अशी चोर बनलेली पाहून खूप आश्चर्य वाटतं ! काही दिवसांपूर्वी, आम्ही दोघं चर्चला गेलो होतो तेव्हा दारापाशी चिखलावर मी एक फळकूट टाकलं होतं. पण परत येतो तेव्हा फळकूट गायब ! कुणा चोरानं पळवलं. आयुष्य पार पालटून गेलंय !

स्तब्धता.

पूर्वी भुरटचा चोऱ्या कमी व्हायच्या... मोठमोठे दरोडे पडायचे. कारण सगळयांची काळजं मोठ्ठी होती. भुरट्या चोऱ्यांचं पाप करायला शरमायचे...

रस्त्यावर, खिडकीपाशी गाण्याचा आणि ॲकॉर्डियनचा आवाज.

अरे वा... गाणी म्हणताहेत. शनिवार – आणि गाताहेत !

गाण्याचा आवाज जवळ येऊ लागतो. दोन आवाज गात आहेत.

बहुधा कामगार असावेत. गुत्त्यात जाऊन दारू ढोसली असणार, सगळा पगार संपवला असणार आणि आता गळे काढताहेत.

गायक घरापाशी आले आहेत. नील खिडकीमधून डोकावून पाहतो.

आणखी वर्षभर – फार तर दोन वर्षं – जगतील ... आणि खलास! भटके किंवा चोर बनतील!

नील: मला वाटतं – पेर्चिखिन आहे.

आकूलीना (दारापाशी): अहो, जेवण तयार आहे.

बेस्सेमेनोव (उठत): पेर्चिखिन. आणखी एक रिकामटेकडा ... (जातात.)

येलेना (त्यांची पाठमोरी आकृती न्याहाळत): माझ्याकडं चहा पिणं जास्त सोयीस्कर होईल नाही?

नील: म्हाताऱ्यांबरोबर तुमचं बोलणं फार मजेदार झालं.

येलेना: मी ... ते मला अवघडून टाकतात. मी आवडत नाही त्यांना ... आणि मला हे चमत्कारिक वाटतं ... अपमानास्पद वाटतं! का माझा राग करतात?

प्योत्र: म्हातारा मूळचा चांगला आहे, पण फार गर्विष्ठ आहे.

नील: शिवाय तो थोडा कंजूस आहे आणि थोडा भांडखोर आहे.

पोल्या: श्शू:! एखाद्या माणसाच्या पाठी असं का

बोलता ? चांगलं नाही !

नील : नाही, कंजूस असणं चांगलं नाही !

तात्याना (कोरडेपणाने) : ह्या विषयावर बोलणं थांबवावं असं मी सुचवते. बाबा कोणत्याही क्षणी बाहेर येतील. गेले तीन दिवस ते कुणावरही रागावले नाहीत. सगळ्यांशी प्रेमानं वागायचा प्रयत्न करताहेत.

प्योत्र : आणि असं वागणं त्यांना भारी जातंय.

तात्याना : आपण समजून घेतलं पाहिजे. ते म्हातारे झालेत. आपल्याआधी ते जन्माला आले आणि आपल्यासारखे त्यांचे विचार नाहीत हा त्यांचा दोष नव्हे. (संत्रस्तपणे.) माणसं किती क्रूर असतात ! किती उद्धट आणि कठोर वागतो आपण एकमेकांशी ! एकमेकांवर प्रेम करायला, नम्र आणि दयाळू वागायला आपल्याला शिकवतात...

नील (तिच्याच सुरात) : म्हणजे दुसऱ्यांनी आपल्या मानगुटी बसावं आणि आपला घोडा-घोडा करावा !

येलेना हसते. पोल्या आणि तेतेरेव स्मित करतात. जणू काहीतरी बोलण्याच्या इराद्याने प्योत्र नीलपाशी जातो. तात्याना संतापाने मानेला झटका देते.

बेस्सेमेनोव (प्रवेश करतात. येलेनाकडे रागीट कटाक्ष टाकतात) : पालागेया, तुझा बाप स्वैपाकघरात आहे... त्याला जाऊन सांग... शुद्धीवर असशील तेव्हा पुढच्या वेळी ये ! म्हणावं... आता घरी जा !

पोल्या जाते. नील तिच्या पाठोपाठ जातो.

बेस्सेमेनोव (नीलला उद्देशून) : तूसुद्धा जा... आपल्या भावी... अं... (वाक्य अर्धवट सोडून मेजापाशी बसतात.) तुम्ही... गप्प का? मी बघून ठेवलंय... मी दारात आलो रे आलो, सगळयांच्या ओठांना शिवण बसते!

तात्याना : तुम्ही नसता... तेव्हाही आम्ही फारसं बोलत नाही.

बेस्सेमेनोव (येलेनावर डोळे वटारून) : कुणाला हसलात?

प्योत्र : असंच सहज..! नील...

बेस्सेमेनोव : नील!.. सगळयाच्या मुळाशी तोच आहे. मला ठाऊकच होतं..

तात्याना : तुम्हाला चहा ओतू?

बेस्सेमेनोव : हं!

येलेना : तान्या, मी ओतते.

बेस्सेमेनोव : नको. तुम्ही कशाला तसदी घेता? माझी मुलगी देईल मला चहा.

प्योत्र : कोण देतं हे काय महत्त्वाचं? तान्याची तब्येत ठीक नाही...

बेस्सेमेनोव : मी तुला विचारत नाही ह्या विषयावरचं तुझं मत! परकी माणसं जर तुला रक्ताच्या नात्यातल्यांपेक्षा जास्त जवळची वाटतात...

प्योत्र : बाबा! तुम्हाला शरम नाही वाटत?

तात्याना : झालं सुरू! प्योत्र, तोंड आवर बघू!

येलेना (बळेच स्मित करत) : ह्यात काही अर्थ आहे का?

दार सताड उघडले जाते आणि किंचित झिंगलेला पेर्चिखिन प्रवेश करतो.

पेर्चिखिन: वासिली वासिल्येविच! तू तिथून निघून आलास, म्हणून मी इथं आलो... तुझ्या मागोमाग!

बेस्सेमेनोव (त्याच्याकडे न पाहता) आलास तर आता बैस! हा चहा पी... घे.

पेर्चिखिन: मला नको चहा! तूच पी! मी तुझ्याशी बोलायला आलोय...

बेस्सेमेनोव: काय बोलणार? सगळा फालतू मामला!

पेर्चिखिन: फालतू? अस्सं! (हसतो.) मजेशीर आहेस!

नील प्रवेश करतो आणि कपाटाला रेलून उभे रहात बेस्सेमेनोवांकडे टक लावतो.

गेले चार दिवस मी तुझ्याकडं यायचा बेत करतोय... तर आता आलो!

बेस्सेमेनोव: ठीक आहे!

पेर्चिखिन: नाही, ठीक नाही! वासिली वासिल्यिच! तू माणूस हुशार! श्रीमंत माणूस... पण मी तुझ्या विवेकाशी बोलायला आलोय!

प्योत्र (नीलजवळ जाऊन हळूच): कशाला त्याला तू इथं सोडलंस?

नील: तू गप्प बैस. तुझा त्याच्याशी संबंध नाही.

प्योत्र: तू नेहमी काहीतरी भानगड निर्माण करतोस.

पेर्चिखिन (प्योत्रच्या आवाजावर मोठा आवाज चढवीत): तू म्हाताराही आहेस... खू... प पूर्वीपासून तुला ओळखतो!

बेस्सेमेनोव (चिडून) तुला काय पाहिजे ?

पेर्चिखिन : सांग मला – का म्हणून तू मला तुझ्या घरातून हाकलून लावलंस ? खूप खूप विचार केला – पण टाळक्यात बत्ती पेटत नाही ! सांग बंधू, मी तुझ्यापाशी कोणत्याही वाईट भावनेनं आलो नाही ... बंधो, मी प्रेमानं तुझ्याकडं आलोय ...

बेस्सेमेनोव : झिंगल्या टाळक्यानं आला आहेस मूर्खा !

तात्याना : प्योत्र, मला मदत कर – नको, पोल्याला बोलाव .

प्योत्र बाहेर जातो .

पेर्चिखिन : आता पोल्याचीच गोष्ट घे . माझी लाडकी पोर ... माझा सुंदर चिमणा पक्षी ! तिच्यापायी तू मला हाकलून लावलंस ? होय ना ? तात्यानाचा प्रियकर तिनं पळवला म्हणून ?

तात्याना : काय हा मूर्खपणा ... किती क्षुद्रपणा !

बेस्सेमेनोव (सावकाशपणे उठत) : पेर्चिखिन, सांभाळ ! दुसऱ्यांदा ...

येलेना (नीलला दबत्या आवाजात) : त्यांना बाहेर घेऊन जा ! त्यांचं भांडण पेटेल .

नील : माझी इच्छा नाही .

पेर्चिखिन : दुसऱ्यांदा – मला हाकलून लावणार नाहीस, वासिली वासिल्यिच ! काही कारणच असणार नाही . पोल्यावर माझं प्रेम आहे ... ती चांगली पोर आहे ! पण तरीही तिनं असं करायला नको होतं – नाही बंधो, तिच्या वागण्याला माझी संमती नाही ! दुसऱ्याचा तुकडा कशाला घेतला तिनं ? चांगलं नाही केलं ...

तात्याना : लेना ! मी ... माझ्या खोलीत चलत्ये.

येलेना तिला हाताला धरून मदत करते. नीलजवळून जाताना तात्याना त्याला हळू आवाजात म्हणते.

तुम्हाला शरम कशी नाही वाटत ? त्यांना घेऊन जा.

बेस्सेमेनोव (कष्टाने संयम राखून) : पेर्चिखिन ! तू .. चूप रहा ! बैस – मुकाट बैस ! नाही तर घरी जा ...

पोल्या प्रवेश करते. तिच्या पाठोपाठ प्योत्र येतो.

प्योत्र (पोल्याला) : तुम्ही शांत व्हा ... मी तुम्हाला विनंती करतो !

पोल्या : वासिली वासिल्येविच ! माझ्या बाबांना मागच्या वेळी तुम्ही का हाकललंत ?

बेस्सेमेनोव गप्प राहतात. तिच्याकडे व सर्वांकडे कठोर नजरेने पाहतात.

पेर्चिखिन (बोटाने धमकावत) : श्शू: ! पोरी ! बोलू नकोस ... तुला समजलं पाहिजे ... तात्यानानं विष घेतलं – का ? समजलं ? वासिल वासिल्येव – पाहिलंस ? बंधो, प्रत्येकाच्या लायकीप्रमाणं मी सगळ्यांची हजेरी घेतो ! मी ... अगदी सरळ माणूस आहे

पोल्या : थांबा, बाबा ...

प्योत्र : पोल्या, तुम्ही ...

नील : तू गप्प बैस !

बेस्सेमेनोव : पालागेया, तू उर्मट आहेस ...

पेर्चिखिन : ती ? नाही, नाही ... ती ...

बेस्सेमेनोव : गप्प बैस तू ! माझा तोल सुटत चाल-लाय … कुणाचं हे घर ? कोण इथला मालक ? कोण जज्ज ?

पेर्चिखिन : मी ! मी सगळयांचा निवाडा करणार … ओळीनं … दुसऱ्याची वस्तू बळकावू नको — एक ! घेत-लीस — तर परत कर — दोन !

प्योत्र (पेर्चिखिनला) : ऐक — वटवट बंद कर ! चल माझ्या खोलीत …

पेर्चिखिन : मला तू आवडत नाहीस , प्योत्र ! गर्विष्ठ माणूस आहेस तू … पोकळ दिमाख दाखवणारा ! आणि तुला काहीही समजत नाही … सांडपाणी व्यवस्था म्हणजे काय ? समजलं ? बंधो , मला सांगितलं की …

प्योत्र त्याचा हात धरून ओढतो .

खबरदार , हात लावू नको अंगाला !

नील (प्योत्रला) : त्याला हात लावू नको !

बेस्सेमेनोव (नीलला) : तू काय करतोस इथं — कुत्र्याला पिसाळतो आहेस ? आँ ?

नील : नाही , मी समजून घेऊ इच्छितोय — काय भानगड आहे ? पेर्चिखिनचा काय अपराध ? कशाला त्याला हाकलून दिलंत ?.. इथं पोल्याचा काय संबंध ?

बेस्सेमेनोव : तू माझी उलटतपासणी घेतोस ?

नील : तसं करत असलो तर काय ? तुम्हीसुद्धा माझ्याप्रमाणं माणूस आहात .

बेस्सेमेनोव (विलक्षण संतापून) : नाही , तू माणूस नाहीस .. तू विष आहेस ! तू — जनावर !

पेर्चिखिन : श्शू ! शांत रहा ! सभ्यता राखली पाहिजे ...

बेस्सेमेनोव (पोल्याला) : आणि तू – धूर्त कारटी ! तू – नीच कुळातली !

नील (दात आवळून) : उगीच किंचाळू नका !

बेस्सेमेनोव : काय ? चालता हो ! साप कुठला ! घाम आणि रक्त गाळून मी तुला पोसला ...

तात्याना (स्वतःच्या खोलीतून) : बाबा ! बाबा !

प्योत्र (नीलला) : काय ? झालं समाधान ?.. छी: , शरम वाटायला हवी होती !

पोल्या (हळू आवाजात) : उगाच माझ्यावर ओरडू नका. मी तुमची गुलाम नाही ... सगळ्यांचा अपमान करण्याचा तुम्हाला हक्क नाही. आणि सांगा – माझ्या बाबांना का हाकललंत ?

नील (शांतपणे) : मीसुद्धा विचारतो ... इथं काही वेडी माणसं रहात नाहीत ... स्वतःच्या वागण्याचा जाब दिला पाहिजे.

बेस्सेमेनोव (अधिक शांतपणे, स्वतःचा तोल सावरून) : चालता हो नील ! काही घडण्याआधी चालता हो ! तुला मी खाऊ घातलंय ... तुला लहानाचा मोठा केलाय !

नील : तुमची भाकरी सारखी माझ्या तोंडावर फेकू नका ! जे मी खाल्लं त्या सगळ्याची राबून भरपाई केलीय !

बेस्सेमेनोव : तू ... माझा आत्मा खाल्लास ! दरोडेखोर आहेस ...

पोल्या (नीलचा हात पकडून) : चल, जाऊ इथून !

बेस्सेमेनोव : जा ... सरपटत जा ... साप ! तूच सगळ्याला जबाबदार ! माझ्या मुलीला डसलीस ... आता ह्याला ! तुझ्यामुळं माझ्या मुलीनं ...

पेर्चिखिन : वासिल वासिल्यिच ! हळू ! सभ्यपणानं !

तात्याना (किंचाळते) : बाबा ! हे खरं नाही ! प्योत्र – तू काही करत का नाहीस ? (स्वतःच्या खोली-च्या दारात येते आणि कुणाचाही आधार न घेता, लटपटत्या पावलांनी खोलीच्या मध्यभागी चालत येते.) प्योत्र, ह्याची गरज नाही ! देवा रे ! तेरेन्ती ख्रिसान्फोविच ! सांगा त्यांना ... सांगा त्यांना ... नील ! पोल्या ! दया करा – जा इथून ! चालते व्हा ! कशाला हे सगळं ...

खोलीत एकच गोंधळ माजतो. तेतेरेव हसत सावकाश उठतो. बेस्सेमेनोव मुलीपुढे माघार घेतात. प्योत्र तात्यानाचा दंड पकडतो व भोवती गोंधळून पाहतो.

पोल्या : चल !

नील : ठीक आहे. (बेस्सेमेनोवना.) तर, आम्ही जातो ..! अशी अखेर घडली याचं मला वाईट वाटतं !

बेस्सेमेनोव : चालता हो ! तात्काळ ! घेऊन जा तिला ...

नील : मी इथं परत येणार नाही.

पोल्या (मोठ्यांदा, कापऱ्या आवाजात) : माझ्यावर असा आरोप करायचा ? तात्यानासाठी मला दोषी धरायचं ? इथं काय मी अपराधी होत्ये ? निर्लज्ज आहात तुम्ही ...

बेस्सेमेनोव (भयंकर संतापाने) : चालती होतेस ना ?

नील : ओरडू नका !

पेर्चिखिन : मंडळी – रागावू नका ! नम्र असावं ...

पोल्या : अच्छा ! चला , बाबा .

नील (पेर्चिखिनला) : चला !

पेर्चिखिन : ना ... ही ! मी नाही येणार तुमच्याबरोबर ! मला कुणाचा आधार नको ... माझा मी स्वतंत्र ! तेरेन्ती ! मी एकटा ! माझा उद्योग – स्वच्छ !

तेतेरेव : माझ्याकडं चल ...

पोल्या : चला ! चला ना , जोवर तुम्हाला हाकललं नाही ...

पेर्चिखिन : नाही ! .. मी नाही येणार ! तेरेन्ती ... मी त्यांचा नाही ! मला समजतं ...

प्योत्र (नीलला) : कृपा करून जा आता !

नील (प्योत्रला) : जातो ! .. अच्छा ! .. तूसुद्धा काय ...

पोल्या : चल ! चल ! !

जातात .

बेस्सेमेनोव (त्यांच्यापाठी ओरडत) : परत याल ! लोटांगणं घालत याल !

प्योत्र : पुरे आता , बाबा !

तात्याना : बाबा , उगाच नका ना ओरडू !

बेस्सेमेनोव : जरा थांबा ! आपण बघूच !

पेर्चिखिन : बघा ... गेली निघून ! छान झालं ! खुशाल जाऊं देत !

बेस्सेमेनोव : जाताना त्यांना सांगायचं होतं मला – रक्तशोषक साले ! खाऊ-पिऊ घातलं ... (पेर्चिखिनला .) तू रे थेरडचा ! मूर्खा ! संपली तुझी वटवट ? काय पाहिजे तुला ? आँ – काय पाहिजे ?

प्योत्र : बाबा , शांत व्हा .

पेर्चिखिन : वासिल वासिल्यिच ! ओरडू नको ... मला तुझ्याबद्दल आदर वाटतो . मोठा मजेशीर आहेस तू ! मी मूर्ख आहे – बरोबर ! पण मला दोन गोष्टी समजतात !

बेस्सेमेनोव (दिवाणावर बसतात) : माझी विचार-शक्तीच हरवून गेलीय ! काहीच समजत नाही . काय घडलं ? अचानक उन्हाळ्यात आग लागावी तसं ... एकजण गेला ! म्हणाला – परत येणार नाही ! छी: ! इतकं सहज ! माझा विश्वास बसत नाही !

तेतेरेव (पेर्चिखिनला) : इथं काय करतोस ? कशा-साठी तू इथं ?

पेर्चिखिन : सारवासारव करायला . बंधो , माझा माम-ला सरळ – हे किंवा ते ! मधलं काही नाही ! माझी ती मुलगी ? फार छान ... म्हणजे तिनं ... (अचानक गप्प होतो .) ... मी बाप म्हणून नालायक आहे ! ती काहीही देणं लागत नाही . तिला पाहिजे तसं जगू दे . पण तान्याची मला दया येते .. तान्या ... मला वाईट वाटतं तुझ्याबद्दल ! बंधूंनो , मला तुम्हा सगळ्यांबद्दल वाईट वाटतं ! (उसासा टाकतो .) पण खरं सांगायचं तर – तुम्ही सगळे मूर्ख आहात !

बेस्सेमेनोव : चूप बैस !

प्योत्र : तान्या ! येलेना निकोलायेवना गेली ?

येलेना (तात्यानाच्या खोलीतून) : मी इथं आहे ... औषध तयार करत्येय .

बेस्सेमेनोव : माझ्या विचारांचा गोंधळ उडालाय ... काही उमजत नाही ! नील ... खरंच निघून गेला ? कायमचा ?

आकूलीना (अस्वस्थपणे प्रवेश करीत) : काय झालं ? नील आणि पालागेया स्वैपाकघरात आहेत ... मी पडवीत होत्ये ...

बेस्सेमेनोव : गेले ते ?

आकूलीना : नाही ... पेर्चिखिनला बोलावताहेत . पालागेया म्हणाली ... वडलांना सांगा ... तिचे ओठ थरथरा कापत होत्ये ... नील एखाद्या रागीट कुत्र्यासारखा गुरगुरतोय ... काय झालं ?

बेस्सेमेनोव (उठत) : आत्ता ... आत्ता जातो आणि ...

प्योत्र : बाबा – नको ! जाऊ नका ...

तात्याना : बाबा ! कृपा करा ... नका जाऊ ...

बेस्सेमेनोव : का नको ?

आकूलीना : काय झालंय असं ?

बेस्सेमेनोव : तुला माहीत आहे ... नील जातोय निघून ... कायमचा !

प्योत्र : मग त्यात काय झालं ? पीडा नाहीशी झाली ! कशाला हवाय तो तुम्हाला ? तो लग्न करतोय – स्वतःच्या कुटुंबाबरोबर रहायची त्याची इच्छा आहे .

बेस्सेमेनोव : म्हणजे ? मी ... मी काय ... परका त्याला ?

आकूलीना : अहो कशाला उगाच त्रास करून घेता? खुशाल जाऊं देत त्यांना हवं तिथं! आपल्याला आपली स्वत:ची मुलं आहेत... पेर्चिखिन, तू काय करतोस इथं? जा पाहू!

पेर्चिखिन : त्यांचा-माझा रस्ता एक नाही.

बेस्सेमेनोव : त्याच्या जाण्याचं मला दु:ख नाही. जर त्याला जायचं तर खुशाल जाऊं दे. पण कसा गेला? माझ्याकडं कशा डोळ्यांनी पहात होता?

येलेना तात्यानाच्या खोलीतून बाहेर येते.

तेतेरेव (पेर्चिखिनचा हात पकडून त्याला स्वत:बरोबर दारापर्यंत नेत) : चल, तू आणि मी, एकेक ग्लास पिऊ!

पेर्चिखिन : आत्ता कसं शहाण्यासारखं बोललास!

जातात.

बेस्सेमेनोव : तो आपल्यापासून दूर जाणार हे मला ठाऊक होतं... पण असं जायचं? आणि ही! काय ओरडत होती! भिकारीण! छे: छे:! मला त्यांना ऐकवलंच पाहिजे...

आकूलीना : अहो, पुरे झालं तुमचं! ती माणसं आपल्याला परकी! काय त्यांचा राग धरायचा? गेली – छान झालं!

येलेना (प्योत्रला हळूच) : चला माझ्याकडं...

तात्याना (येलेनाला) : आणि मी? मलासुद्धा घेऊन चला.

येलेना : चला! चला...

बेस्सेमेनोव (तिची हाक ऐकून) : कुठं ?

येलेना : माझ्याकडं !

बेस्सेमेनोव : कुणाला बोलावता आहात ? प्योत्रला ?

येलेना : हो ... आणि तात्यानाला .

बेस्सेमेनोव : तान्याला जमेस धरू नका ! आणि प्योत्रला तुमच्याकडं जायचं कारण नाही !

प्योत्र : अहो बाबा , मी काही लहान मुलगा नव्हे ! मी जाईन अथवा न जाईन .

बेस्सेमेनोव : जाणार नाहीस !

आकूलीना : पेत्या ! वडलांशी जिद्द धरू नको ! नमतं घे ...

येलेना (चिडून) : माफ करा , वासिली वासिल्ये-विच !

बेस्सेमेनोव : नाही , आता तुम्ही माफ करा ! जरी तुम्ही शिकलेली माणसं , जरी तुम्ही सगळी अब्रू कोळून प्यायला आहात ... जरी तुम्हाला वडीलधाऱ्यांचा मान अजिबात राखावासा वाटत नाही ...

तात्याना (भ्रम झाल्याप्रमाणे किंचाळते) : बाबा ! पुरे करा !

बेस्सेमेनोव : चूप ! जेव्हा तुझं नशीब तुझ्या हातात नाही ... तेव्हा चूप रहा ! थांब ! कुठं चाललीस ?

येलेना दारापाशी जाते .

प्योत्र (तिच्यामागून धावत जात तिचा हात पकडतो) : थांबा ! एक मिनिट ... आत्ताच ... सगळा खुलासा करणं आवश्यक आहे !

बेस्सेमेनोव : तुम्ही माझं ऐकलं पाहिजे. निदान एकदा तरी कृपा करून माझं ऐका! एकूण मामला मला समजून घ्यायला मदत करा.

पेर्चिखिन उजळल्या मुद्रेने प्रवेश करतो. त्याच्या पाठोपाठ हसरा तेतेरेव येतो. दारात थांबून ते एकमेकांशी नेत्रपल्लवी करतात. पेर्चिखिन बेस्सेमेनोवच्या दिशेने डोळा मारतो व हात झटकतो.

सगळे कुठंतरी निघून जाताहेत... कुठलाही खुलासा न देता... अरेरे! फार दु:खदायी आणि स्वैराचारी वागणं! प्योत्र, अरे तू कुठं जाशील? तू... तू कोण? कसा जगणार? काय करणार?

आकूलीना हळूच हुंदका देते. प्योत्र, तात्याना आणि येलेना एक छोटा गट करून उभे राहतात. पण "तू कुठं जाणार?" ह्या बेस्सेमेनोव यांच्या प्रश्नासरशी तात्याना बाजूला होते व मेजापाशी स्वत:च्या आईजवळ जाते. पेर्चिखिन तेतेरेवला खुणा करतो – तो मान हलवतो आणि पक्ष्यांच्या कळपाला घाबरवल्याप्रमाणे हातांच्या हालचाली करतो.

विचारण्याचा मला हक्क आहे... तू अजून खूप तरुण आहेस... मूर्ख आहेस! मी अठ्ठावन्न वर्षं पोरांसाठी हाडाची काडं करतोय...

प्योत्र : बाबा, हे मी पूर्वी ऐकलंय! शंभरवेळा...

बेस्सेमेनोव : चूप!

आकूलीना : अरे पेत्या, पेत्या!

तात्याना : आईसाहेब, तुम्हाला काहीही समजत नाही!

आकूलीना मान हलवते.

बेस्सेमेनोव : चूप रहा ! काय सांगणार तू आम्हाला ? काय शिकवणार तू आम्हाला ? काहीही नाही !

प्योत्र : बाबा ! तुम्ही माझा छळ करता आहात ! काय पाहिजे तुम्हाला ? काय हवंय् ?

आकूलीना (एकदम मोठ्यांदा) : नाही, थांब ! मलाही काळीज आहे ... आणि मलाही बोलायचा हक्क आहे ! पोरा ! तू काय करतो आहेस ? कसली जबाबदारी उचलतो आहेस ? कुणाचा सल्ला घेतलास ?

तात्याना : हे फार भयंकर आहे. बोथट करवतीसारखं ! (आईला.) तुम्ही माझ्या देहाचे आणि मनाचे तुकडे तुकडे करता आहात !

आकूलीना : तुझी आई म्हणजे बोथट करवत ? तुझी आई ?

बेस्सेमेनोव : म्हातारे, थांब ! त्याला बोलू दे !

येलेना (प्योत्रला) : पुरे ! मला अधिक सहन नाही होत ! मी चालले !

प्योत्र : एक मिनिट ... कृपा करा ! आत्ता सगळं स्पष्ट होईल ...

येलेना : नाही – हे वेड्यांचं घर आहे ! हे ...

तेतेरेव : येलेना निकोलायेवना – जा तुम्ही ! खड्ड्यात जाऊं दे त्या सगळयांना !

बेस्सेमेनोव : अहो सद्गृहस्थ ! तुम्ही ...

तात्याना : हे कधी संपणार की नाही ? प्योत्र, जा बघू !

प्योत्र (जवळजवळ किंचाळतो) : बाबा ... पहा ! आई ... ही माझी वधू !

स्तब्धता. सगळे प्योत्रकडे पाहतात. नंतर आकूलीना तोंडावर हात धरते व भेदरल्या नजरेने नवऱ्याकडे पाहते. जणू काही ढकलून दिल्याप्रमाणे बेस्सेमेनोव यांचा मागे झोक जातो व ते मुंडी खाली घालतात. तात्याना एक दीर्घ सुस्कारा टाकून पियानोकडे सावकाश चालत जाते. तिचे हात दोन्ही बाजूंना निर्जीवपणे लोंबत राहतात.

तेतेरेव (दबत्या आवाजात) : त्यानं योग्य क्षण पकडला !

पेर्चिखिन (पाऊल पुढे टाकत) : पाहिलंस ! सगळी पाखरं उडाली ! देवीच्या सणाच्या दिवशी पिंजऱ्यातून उडून जाणाऱ्या पाखरांप्रमाणं भराऱ्या मारा !

येलेना (प्योत्रच्या हातून आपला हात सोडवून घेत) : मला सोडा ! मला नाही सहन होत ...

प्योत्र (पुटपुटतो) : आता सगळं स्पष्ट झालं ... एकदम !

बेस्सेमेनोव (मुलापुढे झुकून) : धन्यवाद ... मुला ! आनंददायी बातमी सांगितल्याबद्दल !

आकूलीना (अश्रुभरल्या डोळ्यांनी) : पेतेन्का, अरे तू स्वतःचा सर्वनाश करून घेतलास ! अरे ... ती ... ती काय तुझी जोड आहे ?

पेर्चिखिन : ती ? प्योत्रला ? अग – काय बोलतेस म्हातारे ! त्याची काय किंमत आहे ?

बेस्सेमेनोव (येलेनाला उद्देशून सावकाशपणे) : बाई-साहेब, तुमचेही आभार मानतो! आता तो संपला! त्याला अजून शिकायला पाहिजे होतं ... पण आता? फार धूर्त वागलात! अर्थात मला आधीच ह्याची कल्पना आली होती ... (दुष्टपणे.) तुम्ही पकडलेल्या सावजाबद्दल अभिनंदन! प्योत्र, माझे तुला आशिर्वाद मिळणार नाहीत. आणि तू ... तू ... पकडलंस ना? चोरलंस? मांजरी ... हलकट!

येलेना : कशी हिंमत करता असं बोलायची?

प्योत्र : बाबा ... तुमचं डोकं फिरलंय!

येलेना : नाही, थांबा! तुमचं बरोबर आहे. मी स्वतः त्याला तुमच्यापासून हिरावून घेतला. स्वतः! मी स्वतः ... प्रथम मी स्वतःच सांगितलं त्याला ... माझ्याशी लग्न करण्याचा प्रस्ताव घातला! ऐकलं? ए म्हाताऱ्या वटवाघुळा! ऐकलं ना? मीच त्याला तुमच्यापासून ओढून घेतला! मला त्याची दया आली! तुम्ही त्याचा छळ केलात! तुम्ही माणसं नव्हेत — लोकांना खाऊन टाकणारा कसलातरी गंज आहात! तुमचं प्रेम म्हणजे त्याच्या दृष्टीनं मृत्यू! मला ठाऊक आहे ... तुम्हाला वाटतं, माझ्यासाठी मी हे केलं! खुशाल समजा! शीः! किती विलक्षण तिटकारा वाटतो मला तुमचा!

तात्याना : लेना! लेना! अग काय हे?

प्योत्र : येलेना ... चला!

येलेना : कदाचित मी त्याच्याशी लग्न करणार नाही ... तुम्हाला आनंद झाला ना? खरंच, कदाचित मी

लग्न करणार नाही. आशा सोडू नका! मी तशीच राहीन त्याच्याबरोबर ... बिनलग्नाची! पण तुम्हाला... तो मिळणार नाही! मुळीच मिळणार नाही! इत:पर तुम्ही त्याचा छळ करू शकणार नाही! आणि तोसुद्धा तुमच्यापाशी येणार नाही – कधीही! कधीही नाही!

तेतेरेव: जीते रहो! जीते रहो!

आकूलीना: अरे देवा! अहो, काय हो हे?..

प्योत्र (येलेनाला दरवाजाकडे ढकलत): जा ... जा ... लौकर!

येलेना जाते आणि प्योत्रला आपल्यामागून ओढून नेते.

बेस्सेमेनोव (हताशपणे सभोवार पहात): कसं काय? (अचानक संतापून.) पोलीसांना बोलाव! (पाय आपटत.) खड्ड्यात गेलं घरभाडं! उद्याच ... तुला ... रांडे!

तात्याना: बाबा! काय हे?

पेर्चिखिन (स्तंभित होतो; काही न उमजून): वासिल वासिल्यिच! अरे ए! काय हे? ओरडतोस कशाला? उलट तुला आनंद वाटला पाहिजे ...

तात्याना (बापाजवळ जात): ऐका ...

बेस्सेमेनोव: तू? तू अजून ... थांबलीस! तू का नाही निघून जात? तूही जा ... कुणी नाही बरोबर? जायला जागा नाही कुठं? संधी हुकली वाटतं?

तात्याना धडपडत मागे सरते व मागे वळून पटकन

पियानोपाशी जाते. आकूलीना कळवळून तिच्यापाशी धावते.

पेर्चिखिन : वासिल वासिल्यिच – जाऊं दे रे ! विचार कर ! प्योत्र आता शिकणार नाही – कशाला आता त्याला ?

बेस्सेमेनोव मख्खपणे पेर्चिखिनकडे पाहतात व मान डोलावतात.

जगण्यापुरतं त्याच्यापाशी धन आहे. तू पैसा साठवला आहेस ... बायको छान फुलासारखी ... आणि तू उगीच आरडाओरडा करतोस, गोंगाट करतोस ! विचित्रच आहेस !

तेतेरेव खो खो हसतो.

आकूलीना (विव्हळते) : सगळे सोडून गेले ! आम्हाला टाकून गेले !

बेस्सेमेनोव (सभोवार पहात) : चूप रहा ग ! येतील परत ! त्यांची हिंमत नाही कायम निघून जायची ! जातील कुठं ? (तेतेरेवला.) तू काय दात विचकतो आहेस ? सैताना ? तुलासुद्धा हाकून देतो ! उद्या ह्यावेळी तुझा इथं वाससुद्धा उरणार नाही ! तुम्हा सगळ्यांना हाकलून लावतो !

पेर्चिखिन : वासिली वासिल्यिच !

बेस्सेमेनोव : चालता हो ! कमनशिबी भटक्या !

आकूलीना : तान्या ! तानेचका ! माझ्या लाडके ! दुर्दैवी ग तू ! तुझं काय होणार ?

बेस्सेमेनोव: पोरी... तुला सगळं ठाऊक होतं... सगळं माहीत होतं तुला... तरी गप्प राहिलीस! खुद्द बापाविरुद्ध कट? (अचानक घाबरून.) तो तिला टाकून देईल असं वाटतं तुला? ह्या बाईला? नवरीच्या रूपातल्या ह्या वेश्येला? माझा पोरगा! तुम्ही नतद्रष्ट माणसं आहात! दुर्दैवी! स्वैराचारी!

तात्याना: पुरे झालं! तुमचा मला तिटकारा येईल असं काही करू नका!

आकूलीना: पोरी! तुला यश नाही ग! छळलं तुला! आम्हा सगळ्यांना छळलं! कशाबद्दल?

बेस्सेमेनोव: कुणी? सगळी त्या नीलची करणी! हरामखोर! माझ्या पोराचंही डोकं त्यानं फिरवून टाकलं! आणि पोरीला झुरत ठेवलं! (कपाटाशी उभ्या असलेल्या तेतेरेवला पाहून.) ए झिंगट, तू इथं काय करतोस? चालता हो! ह्या घरातून चालता हो!

पेर्चिखिन: वासिल वासिल्यिच! त्याला कशाबद्दल? हात्तेरी... म्हाताऱ्याचं डोकं फिरलं!

तेतेरेव (शांतपणे): म्हाताऱ्या, ओरडू नको! तुझ्यावर येणारं वादळ पळवून लावण्याचं तुझ्यात सामर्थ्य नाही! आणि उगीच बेचैन होऊ नकोस – तुझा मुलगा येईल परत!

बेस्सेमेनोव (पटकन): तुला... तुला कसं माहीत?

तेतेरेव: तो तुझ्यापासून फार दूर जाणार नाही. ह्यावेळी तो किंचित वर चढलाय. पण त्याला वरती खेचून घेतला म्हणून! तो परत खाली कोसळणार.

जेव्हा तू मरशील, तेव्हा तुझ्या ह्या घराची तो थोडी डागडुजी करील, इकडचं सामान तिकडं हलवील आणि तुझ्यासारखंच जगत राहील – शांत, आरामात, प्रतिष्ठितपणानं!

पेर्चिखिन (बेस्सेमेनोवला): पाहिलंस? वेडचा! उगीच भडकलास! माणूस तुझं भलं चिंततोय, तुला शांत करण्यासाठी प्रेमळ शब्द बोलतोय – आणि तू – किंचाळतोस! बंधो – तेरेन्ती, विद्वान माणूस आहे!

तेतेरेव: तो फर्निचरची थोडी परत मांडामांड करील – आयुष्याचं आणि लोकांचं ऋण छान पार पाडलं अशा समाधानात जगत राहील! तो तुझ्यासारखाच आहे ...

पेर्चिखिन: अगदी हुबेहूब!

तेतेरेव: अगदी तसाच ... भित्रा आणि मूर्ख!

पेर्चिखिन (तेतेरेवला): अरे ए! तू काय बोलतोस?

बेस्सेमेनोव: तू बोल ... पण नांवं ठेवू नकोस! हिंमत कशी होते तुझी?

तेतेरेव: आणि तुझ्यासारखाच योग्य वेळी तो कंजूसही होईल – तसाच फाजील आत्मविश्वासू आणि कठोर!

पेर्चिखिन गोंधळून तेतेरेवच्या चेहऱ्याकडे चकित नजरेने पाहतो – म्हाताऱ्याचे तो सांत्वन करतो अथवा त्याला दूषणे देतो हे त्याला उमजत नाही. बेस्सेमेनोवसुद्धा गोंधळलेले – पण तेतेरेवच्या बोलण्यात त्यांना रस वाटतो.

आणि आत्ता तू जसा अभागी बनला आहेस, तसाच तोसुद्धा अभागी बनेल! म्हाताऱ्या, आयुष्य पुढं सरक-

तंय. जो त्याच्याशी वेग राखणार नाही, तो मागं एकाकी पडणार!

पेर्चिखिन: ऐकलंस? जसं घडायचं तसं सगळं घडतंय आणि तू उगीच बोंबाबोंब करतोस!

बेस्सेमेनोव: तू जरा गप्प बसशील का?

तेतेरेव: आणि त्याच रीतीनं तुझ्या अभागी पुत्राचीसुद्धा कुणी दया करणार नाही. आत्ता मी जसं तुला विचारतो, तसंच त्याला सरळ तोंडावर विचारतील: "कशासाठी जगलास? कधी काय भलं केलंस?" आणि तुझ्याप्रमाणंच तोसुद्धा उत्तर द्यायला असमर्थ ठरेल.

बेस्सेमेनोव: छान... तू जेव्हा बोलतोस... नेहमी छान बोलतोस! पण तुझ्या काळजात काय? नाही, माझा तुझ्यावर विश्वास नाही! आणि... घर सोडून जा माझं! तुम्हा लोकांना फार काळ सहन केलं मी! तूसुद्धा माझ्यावर खूप वाईट परिणाम घडवलास...

तेतेरेव: अरेरे, खरंच तो मी असतो तर! पण दुर्दैवानं तो मी नव्हे! (जातो.)

बेस्सेमेनोव (मान मागे झटकून): करू सहन! ठीक आहे! बघू वाट... सगळं आयुष्य सहन केलं... आणखी सहन करू! (स्वतःच्या खोलीत जातात.)

आकूलीना (नवऱ्यापाठोपाठ धावते): अहो, ऐकलं का! का दुर्दैवी आपण? का आपली मुलं असं वागली? का अशी शिक्षा मिळाली आपल्याला? (स्वतःच्या खोलीत जाते.)

पेर्चिखिन खोलीच्या मध्यभागी डोळे मिचकावत उभा राहतो. पियानोपाशी बसलेली तात्याना डोळे विस्फारून सभोवार पाहते. बेस्सेमेनोवच्या खोलीतून दबते आवाज ऐकू येतात.

पेर्चिखिन: तान्या! तान ...

तात्याना त्याच्याकडे पहात नाही आणि काहीही उत्तर देत नाही.

तान्या! काय कारण घडलं – पळून जाणाऱ्यांना? आणि रडणाऱ्यांना? आ? (तात्यानाकडे पाहून सुस्कारा टाकतो.) विचित्र माणसं! (म्हाताऱ्यांच्या खोलीच्या दाराकडे कटाक्ष टाकतो, नंतर मान हलवीत हॉलच्या दारापाशी जातो.) तेरेन्तीकडं जाऊन बसावं ... विचित्र माणसं!

सावकाशपणे तात्याना खाली कोसळते. तिचे हात पियानोच्या पट्ट्यांवर आपटतात व आपल्या हातांवर ती डोके टेकते. खोलीत एकाच वेळी अनेक सुरांचा मोठा कल्लोळ उमटतो व सावकाशपणे तो विरत जातो.

पडदा

१९०१

तळागाळातली माणसे



पात्र-परिचय

मिखाईल इवानोविच कोस्तील्योव – ५४ वर्षे, पथिक-निवासाचा मालक.

वासिलिसा कार्पोवना – २६ वर्षे, त्याची बायको.

नताशा – २० वर्षे, तिची बहीण.

आब्राम मेदवेदेव – ५० वर्षे, त्यांचा काका, पोलीस.

वास्या पेपेल – २८ वर्षे.

आंद्रेई मित्रिच क्लेश्च – ४० वर्षे, कुलुपे दुरुस्त करणारा.

आन्ना – ३० वर्षे, त्याची बायको.

नास्त्या – २४ वर्षे, वेश्या.

क्वाश्न्या – सुमारे ४० वर्षांची, पेल्मेनी* विकणारी.

बूब्नोव – ४५ वर्षे, टोप्या बनवणारा.

बारोन – ३३ वर्षे.

सातीन
नट } दोघेही सुमारे ४० वयाचे.

लूका – ६० वर्षांचा एक भटक्या.

आल्योश्का – २० वर्षे, चांभार.

क्रीवोय झोब
तातारीन } गोदी-हमाल.

नांवे आणि संवाद नसलेले अनेक भटके.

---

* पेल्मेनी – कणकेमध्ये खिमा भरून उकडलेला एक रशियन पदार्थ – अनु.

कॉन्स्तन्तिन पेत्रोविच
प्यात्नीत्स्की यांना अर्पण.

मा. गोर्की

अंक पहिला

गुहेशी साम्य असलेले तळघर. अवजड कमानदार तक्तपोशी धुराने काळवंडलेली आणि काही ठिकाणी प्लास्टर निखळलेले. प्रेक्षकांच्या बाजूने, रंगमंचाच्या वरच्या भागातून, उजव्या अंगाला असलेल्या चौकोनी खिडकीतून प्रकाश वरून खाली पाझरतो आहे. एका पातळशा आडोशाने रंगमंचाचा उजवा कोपरा म्हणजे पेपेलची खोली बनला आहे. ह्या खोलीच्या दारापाशी बूब्नोवची निजायची लाकडी पेटी. डाव्या बाजूला प्रचंड रशियन चुलाणा. डाव्या बाजूच्या दगडी भिंतीचे दार स्वयंपाकघराकडे जाते. तेथे क्वाश्न्या, बारोन आणि नास्त्या राहतात. चुलाणा आणि हे दार यांच्या दरम्यान एक रुंद पलंग उभा आहे. ह्या पलंगाला मळकट कपड्यांचा आडोसा. सर्व भिंतींलगत निजण्याची फळकुटे बांधलेली. डाव्या भिंतीच्या खालच्या कोपऱ्यात एक लाकडी ओंडका. त्याला एक शेगडा आणि ऐरण जोडलेली. ऐरणीसमोरच्या लाकडी ठोकळ्यावर बसून क्लेश्च जुन्या कुलुपात चाव्या फिरवून पाहतो आहे. त्याच्या सभोवतालच्या फरशीवर वेगवेगळ्या चाव्यांचे जुडगे, एक चेपलेला

पत्र्याचा समोवार, हातोडा आणि कानशी, इत्यादी वस्तू विखुरलेल्या आहेत. निवासाच्या मध्यभागी एक मोठे मेज, दोन बाकडी व एक स्टूल आहे – सर्व घाणेरडी आणि रंग नसलेली. मेजावरील समोवारबरोबर क्वाश्न्या गुंतलेली; बारोन काळ्या पावाचा तुकडा चघळतोय; पानांचे कोपरे दुमडलेली एक जुनाट कादंबरी वाचण्यात नास्त्या मग्न आहे. मेजावर हातांचे कोपर टेकवून तिचे वाचन चालू आहे. पलंगाच्या पडद्यांआडून आन्नाचे खोकणे ऐकू येते. बूब्नोव स्वतःच्या पेटीवर बसून एका जुन्या विजारीच्या फाडलेल्या पट्ट्यांमधून टोपी कशी बनवायची ह्याचा हिशेब करतो आहे. त्याच्या गुडघ्यांमध्ये टोपीचा ठोकळा धरलेला. टोप्यांचे मुखवटे बनवण्यासाठी लागणारे कार्डबोर्डचे तुकडे आणि चिंध्या व मेणकापड इ. वस्तू त्याच्या सभोवती पडल्या आहेत. नुकताच जागा झालेला सातीन स्वतःच्या फळीवर पडून गुरगुरतो आहे. चुलाण्याच्या वरच्या कट्ट्यावर चुळबुळणारा आणि खोकणारा नट प्रेक्षकांना दिसत नाही.

वसंताच्या मोसमातील आरंभीचा काळ. सकाळ.

बारोन: बरं मग पुढे!

क्वाश्न्या: नाही रे बाबा, मी त्याला म्हणाले. एवढ्या गोष्टीपासून दूर रहा लाडक्या, म्हटलं त्याला. मी म्हटलं – हा अनुभव घेऊन झालाय... आणि आता शंभर शिजवलेल्या शिंपल्या दिल्यास तरी मी तयार व्हायची नाही... पुन्हा लगीन करायची नाही.

बूब्नोव (सातीनला): तू का गुरगुरतो आहेस?

सातीन गुरगुरतो.

क्वाश्न्या : मी म्हणाले – मी अशी सडाफटिंग बाई, ना कुणाची बांधलेली! उगा कशाला कुणा पुरुषाच्या खोड्यात स्वतःला अडकवून घेऊ? नाही बाई – मुळ्ळीच नाही! अगदी तो अमेरिकेतला राजपुत्र असला तरी त्याच्याशी लग्न करायची माझी अजिबात इच्छा नाही!

क्लेश्च : थापा मारतेस!

क्वाश्न्या : का... य?

क्लेश्च : थापा मारतेस! आब्रामशी तू लग्न करणार!

बारोन (नास्त्याच्या हातून पुस्तक हिसकावून घेत शीर्षक वाचतो) : "घातकी प्रेम"... (हसतो.)

नास्त्या (हात पुढे करत) : दे... दे म्हणते ना! उगाच लाडात येऊ नको हं!

बारोन तिच्याकडे पहात पुस्तक हवेत हलवतो.

क्वाश्न्या (क्लेश्चला) : तांबडा बोकड आहेस तू! थापा म्हणे! असले शब्द माझ्याशी वापरायची हिंमत कशी झाली?

बारोन (नास्त्याच्या डोक्यावर पुस्तकाची टप्पल मारत) : वेडी आहेस तू नास्त्या!

नास्त्या (पुस्तक हिसकावून घेत) : दे ना...

क्लेश्च : मोठ्ठी बाईसाहेबच तू!... पण त्या आब्राम-शीच तू लग्न करणार... त्याचीच तर वाट पाहते आहेस!

क्वाश्न्या : अर्थातच! दुसरं काय? तू तुझ्या बाय-कोला मरणाच्या वाटेला लावलंच आहेस...

क्लेश्च : चूप बैस थेरडे! कुत्रे, तुझा त्याच्याशी काही संबंध नाही!

क्वाश्न्या : आता कशा नाकाला मिरच्या झोंबल्या? खरं सोसत नाही!

बारोन : झाली सुरुवात! नास्त्या – तू कुठं आहेस?

नास्त्या (मान वर न करता) : अं?... जा इथून!

आन्ना (पडद्यांआडून डोकावत) : दिवसाची सुरवात झाली! दया करा माझ्यावर, पण आरडाओरडा आणि शिवीगाळ करू नका तुम्ही!

क्लेश्च : लागली विव्हळायला!

आन्ना : प्रत्येक दिवस परमेश्वराचा... निदान मला शांतपणं मरायला द्या!

बूब्नोव : गोंगाटानं मरणाला घाबरवता येत नाही!

क्वाश्न्या (आन्नापाशी जात) : कशी ग बयो तू ह्या वेताळाबरोबर राहिलीस?

आन्ना : पुरे असलं बोलणं... राहू दे मला एकटीला!

क्वाश्न्या : किती सोसणार ग तू अशी! आज छातीत थोडं हलकं वाटतंय?

बारोन क्वाश्न्या! बाजारात जायची वेळ झाली!

क्वाश्न्या : आत्ता आल्येच! (आन्नाला) गरम गरम पेल्मेनी देऊ तुला?

आन्ना : नको... उपकार बाई तुझे! कशाला मी खायचं?

क्वाश्न्या : अग – तू खा. गरम आहेत – नरम आहेत. एका कपात मी तुझ्यासाठी काढून ठेवते. जेव्हा खावंसं

वाटेल, तेव्हा खा! (बारोनला.) चला, जहागिर-दार... (क्लेश्चला.) ए, आग्यावेताळा... (स्वयं-पाकघरात जाते.)

आन्ना (खोकत): देवा रे...

बारोन (नास्त्याला हळूच धक्का देत): ए मूर्ख पोरी... टाकून दे!

नास्त्या (पुटपुटत): चालता हो इथून... मी तुझ्या वाटेत नाही!

शीळ वाजवत बारोन क्वाश्न्यापाठोपाठ जातो.

सातीन (फळीवर उठून बसत): काल मला कुणी चोपलं?

बूब्नोव: समजून तुला काही फरक पडणार आहे का?

सातीन: मान्य, काही फरक नाही. पण तरीही... कशाबद्दल मला पिटलं?

बूब्नोव: पत्ते खेळत होतास?

सातीन: हो...

बूब्नोव: म्हणून तुला बडवलं!

सातीन: हलकट साले!

नट (चुलाण्यामागून डोकावत): कधीतरी तुला पुरता ठार मारतील! मरेपर्यंत!

सातीन: तू गाढव आहेस!

नट: का म्हणून?

सातीन: कारण – दोनदा ठार मारता येत नाही!

नट (थोडे थांबून): का नाही? मला नाही समजत!

क्लेश्च: तू आता चुलाण्यावरून खाली उतर आणि

खोली स्वच्छ कर. लोळतोस काय?

नट: तुझा त्याच्याशी संबंध नाही.

क्लेश्च: जरा थांब – वासिलिसा आली म्हणजे तुला सांगील – कुणाशी संबंध!

नट: जहन्नममध्ये गेली ती वासिलिसा! आज खोली स्वच्छ करायची बारोनची पाळी आहे... बारोन!

बारोन (स्वयंपाकघरातून बाहेर येत): स्वच्छ करायला मला फुरसत नाही. मी क्वाश्न्याबरोबर बाजारात चाललोय.

नट: माझा त्याच्याशी काहीही संबंध नाही! खुशाल तुरुंगातसुद्धा जा! पण फरशी पुसायची आज तुझी पाळी! दुसऱ्यांसाठी मी नाही काम करणार!

बारोन: नीच कुठला! नास्त्या पुसून काढील फरशी... ए "घातकी प्रेम" – जागी हो! (नास्त्याच्या हातून पुस्तक खेचतो.)

नास्त्या (उठत): काय पाहिजे तुला? दे माझं पुस्तक! खोडकर कुठला! आणि म्हणे – जहागिरदार...

बारोन (पुस्तक परत देत): नास्त्या! माझ्याऐवजी तेवढी फरशी पुसून काढ – ठीक?

नास्त्या (स्वयंपाकघरात जात): तर-तर! मला गरजच पडलीय!

क्वाश्न्या (स्वयंपाकघरातून दाराशी येऊन, बारोनला): ए, तू चल! तुझ्याविना पुसतील फरशी... अरे ए नटा! तुला सांगताहेत ना, तर पूस फरशी! काही पाठ नाही मोडणार!

नट: हूं!.. नेहमी मीच! का म्हणून?

बारोन (दोन टोपल्या लटकावलेली कावड घेऊन स्वयंपाकघरातून बाहेर येतो. टोपल्यांना मळकट कापडांचे आवरण) : नेहमीपेक्षा आज जास्त जड आहे.

सातीन : जहागिरदारकुळात जन्म घेण्यात काही अर्थ होता ?

क्वाश्न्या (नटाला) : फरशी नीट पुसून काढ ! (बारोनला प्रथम वाट देऊन त्याच्या मागोमाग बाहेर जाते.)

नट (चुलाण्यावरून खाली उतरत) : धुळीचा मला फार त्रास होतो. (अभिमानाने.) माझी शरीरयंत्रणा दारूच्या विषानं भिनलीय ! (एकदम विचारमग्न बनतो व एका फळीवर बसतो.)

सातीन : शरीरयत्रणा ... तर्कयंत्रणा ...

आन्ना आंद्रेइ मित्रिच ...

क्लेश्च : आता काय आणखी ?

आन्ना : तिथं क्वाश्न्यानं माझ्यासाठी पेल्मेनी ठेवल्यात. त्या घे आणि खा.

क्लेश्च (तिच्यापाशी जात) : तू – तू नाही खाणार?

आन्ना : इच्छा नाही. कशासाठी खाऊ ? तू राबणारा माणूस ... तुला खाल्लं पाहिजे.

क्लेश्च : घाबरतेस ? नको घाबरू ! कदाचित ...

आन्ना : जा, खा ! मला फार त्रास होतोय ... बहुधा लौकरच ...

क्लेश्च (बाहेर जात) : काही नाही ... कदाचित उठशील आजारातून ! घडतं असं कधी कधी ! (स्वयंपाकघरात जातो.)

नट (एकदम जागा झाल्याप्रमाणे मोठ्यांदा) : काल दवाखान्यात डॉक्टर मला म्हणाले : तुमची शरीरयंत्रणा दारूनं पूर्ण पोखरून गेलीय !

सातीन (स्मित करत) : तर्कयंत्रणा ...

नट (आग्रहाने) : तर्कयंत्रणा नव्हे – शरीरयंत्रणा !

सातीन : सिकाम्ब्री !

नट (त्याच्या दिशेने हात झटकत) : वेडपट आहेस ! मी खरंच गंभीरपणानं सांगतोय. जर शरीरयंत्रणा ... पोखरली असेल ... तर फरशी पुसणं मला हितकर नाही ... धूळ नाकात जाणं ...

सातीन : सूक्ष्मजीवशास्त्र !

बूब्नोव : तू काय बरळतो आहेस ?

सातीन : शब्द ! आणखी एक आहे : अनुभवातीत !

बूब्नोव : म्हणजे ?

सातीन : माहीत नाही ... विसरलो !

बूब्नोव : मग कशाला बोलतोस असले शब्द ?

सातीन : गंमत म्हणून ! बंधो, माणसांच्या सगळ्या शब्दांचा मला वीट आलाय ... आपले सगळे शब्द ऐकून कान किटलेत ! मला वाटतं ... प्रत्येक शब्द हजारो वेळा ऐकला असावा !

नट : 'हॅम्लेट' नाटकात म्हटलंय : "शब्द, शब्द, शब्द !" फार सुरेख नाटक. त्यात मी मुडदेफरासाची भूमिका करायचा !

क्लेश्च (स्वयंपाकघरातून बाहेर येत) : फरशी-पुशाची भूमिका केव्हा करायला लागणार ?

नट : तुला काय करायचंय ? (स्वतःच्या छातीवर

मूठ आपटत.) "ऑफेलिया! तुझ्या प्रार्थनांमधून माझी आठवण कर!"

रंगभूमीपासून काही अंतरावर गोंगाट, आरोळ्या, पोलीसांच्या शिट्यांचे आवाज. क्लेश्च काम करायला बसतो. कानशीने कर्कश्य आवाज करतो.

सातीन: न समजणारे, दुर्मीळ शब्द मला आवडतात. मी लहानपणी तारकचेरीत पोऱ्या म्हणून काम करत होतो, तेव्हा खूप पुस्तकं वाचून काढली.

बूब्नोव: तू तारवाल्याचं कामसुद्धा केलं आहेस?

सातीन: होय... (किंचित हसून.) काही फार छान पुस्तकं आहेत आणि खूप चमत्कारिक शब्द आहेत. एकेकाळी मी एक सुशिक्षित माणूस होतो – ठाऊक आहे?

बूब्नोव: ऐकलंय... शंभर वेळा! पण म्हणून काय? मीसुद्धा एकेकाळी दुकानाचा मालक होतो – फरच्या कपड्यांचं दुकान होतं माझं! केसाळ कातडी रंगवून रंगवून हात पिवळे पडायचे – रंगामुळं! बंधू, तेव्हा वाटायचं, ते पिवळे हात कधी धुतलेच जाणार नाहीत. तशा पिवळ्या हातांसकटच मरणार! आणि आता पहा – हे हात! निव्वळ घाण!

सातीन: मग, त्यात काय झालं?

बूब्नोव: काही नाही. आणखी काहीही नाही.

सातीन: तुला म्हणायचं काय होतं?

बूब्नोव: काही म्हणायचं नव्हतं. सहज – आपली एक कल्पना. कितीही काळजीपूर्वक रंगवून काढलंत

तरी शेवटी सगळा रंग निघून जातो. पुरता धुवून निघतो.

सातीन: ओह ... काय हाडं दुखताहेत माझी!

नट (गुडघ्यांना स्वतःच्या हातांची मिठी घालून बसत): शिक्षणात काही अर्थ नाही – मुख्य म्हणजे अंगी गुण पाहिजेत. एक नट होता माझ्या माहितीचा – अक्षर लावून भूमिका वाचायचा ... पण अभिनय असा बहारदार, की प्रेक्षकांच्या टाळ्यांनी सारं थिएटर हादरायचं!

सातीन: बूब्नोव, मला पाच कोपेक दे!

बूब्नोव: माझ्यापाशी अवघे दोन कोपेक आहेत.

नट: मी म्हणतो: नटाच्या अंगी गुण हवेत! गुण म्हणजे स्वतःवरचा विश्वास, स्वतःच्या सामर्थ्यावरचा विश्वास.

सातीन: मला पाच कोपेक दे – म्हणजे माझा विश्वास बसेल की, तू गुणी आहेस, हीरो आहेस, मगर आहेस, पोलीस अधिकारी आहेस! .. क्लेश्च, पाच कोपेक दे!

क्लेश्च: गेलास उडत! तुझ्यासारखे इथं खूप आहेत!

सातीन: का उगाच शिव्या घालतोस? तुझ्यापाशी कवडीसुद्धा नाही हे मला ठाऊक आहे.

आन्ना: आंद्रेइ मित्रिच ... मला घुसमटतंय ... त्रास होतोय ...

क्लेश्च: मी काय करू?

बूब्नोव: बाहेरचं दार उघड.

क्लेश्च: वा! तू तिथं फळीवर बसला आहेस आणि

मी इथं खाली फरशीवर. आपण जागा बदलू या एकमेकांच्या, मग तू उघड बाहेरचं दार. आधीच मला सर्दी झालीय.

बूब्नोव (शांतपणे): माझ्यासाठी दार उघडण्याची गरज नाही. तुझीच बायको सांगत्येय.

क्लेश्च (उदासपणे): माणूस काय वाट्टेल ते मागतं.

सातीन: माझ्या डोक्यात घणघणतंय! छी:! माणसं कशाला एकमेकांची टाळकी फोडतात?

बूब्नोव: फक्त टाळकीच फोडत नाहीत, सबंध अंग मडकून काढतात! (उठत.) मी थोडा दोरा विकत घेऊन येतो. आज आपले मालक आणि मालकीण इतका वेळपर्यंत कसे काय आले नाहीत? कदाचित खपली काय? (जातो.)

आन्ना खोकते. डोक्याखाली हात धरून सातीन स्तब्ध पडून राहतो.

नट (सभोवार केविलवाणे पहात आन्नापाशी जातो): काय? फार त्रास होतोय?

आन्ना: घुसमटतंय!

नट: तुला बाहेर घेऊन जाऊ? ऊठ. (तो तिला उठायला मदत करतो, तिच्या खांद्यांवर काही चिरगुटे टाकतो आणि तिच्या हाताला धरून बाहेर नेऊ लागतो.) हं... अस्सं.. ठाम पाऊल टाक! मी स्वतःच आजारी... दारूनं स्वतःचा नाश करून घेतलाय!

कोस्तील्योव (दाराशी): फिरायला निघालात?

वाहव्वा रे जोडी – बकरा आणि मेंढी!

नट : बाजूला हो ... दिसत नाही? आजारी माणसं येताहेत!

कोस्तील्योव : अर्थात! अर्थात! (नाकातल्या सुरात प्रार्थना गुणगुणत खोलीभर संशयित नजरेने पाहतो. पेपेलच्या खोलीचा कानोसा घेण्याचा प्रयत्न करतो.)

घरमालकाच्या हालचाली खालच्या नजरेने न्याहाळत क्लेश्च जोरजोराने चाव्यांचा खळखळाट करतो व कानस घासतो.

घासतो आहेस?

क्लेश्च : काय?

कोस्तील्योव : मी म्हटलं – घासतो आहेस?

स्तब्धता.

अं ... काय बरं विचारायचं होतं मला? (पटकन हळू आवाजात.) माझी बायको इथं आली होती?

क्लेश्च : पाहिली नाही ...

कोस्तील्योव : (पेपेलच्या खोलीकडे सावधपणे जात) : महिना दोन रूबल भाड्यात तू माझी किती जागा आडवतोस? पलंग ... शिवाय स्वत: बसतोस! हं! निदान पाच रूबलची जागा! तुझ्याकडून आणखी अर्धा रूबल जादा घेतला पाहिजे.

क्लेश्च : माझ्या गळ्याला फास लाव आणि माझा जीव घे. लौकरच थडग्यात जाशील, पण अर्ध्या रूबल-च्या मोहात अजून गुंतून पडतोस!

कोस्तील्योव : कशाला तुला फास लावू ? कुणाला त्यापासून फायदा ? खुशाल जग आणि देव तुला मदत करो ! पण तरी तुझ्याकडून आणखी अर्धा रूबल मी वसूल करणार एवढं नक्की ! देवासमोरच्या दिव्यासाठी तेल विकत घेईन. पवित्र पुतळीसमोर माझी पापं जळून जावीत म्हणून दिवा पेटता ठेवीन. माझ्या आणि तुझ्याही पापांना मोक्ष मिळावा म्हणून. तसा तू स्वतःच्या पापांचा कधी विचार करतोस ? नाही ना ! अरे आंद्रयूशा, महादुष्ट माणूस आहेस तू ! तुझ्या दुष्टपणापायी तुझी बायको झिजून गेली. कुणालाही तू आवडत नाहीस, कुणी तुझा आदर राखत नाही. तुझं काम असं घासघीस करायचं ... सगळ्यांना त्रास देणारं ...

क्लेश्च : (ओरडतो) : तू इथं मला वीष घालायला आलास काय ?

सातीन जोराने गुरगुरतो.

कोस्तील्योव (दचकून) : अरे बापरे, भल्या माणसा ...

नट (प्रवेश करत) : बाहेर मोकळ्या हवेत बसवलं तिला, अंगाभोवती कपडे घेतलेत गुंडाळून ...

कोस्तील्योव : बंधू, फार दयाळू मनाचा आहेस तू ! चांगली गोष्ट आहे. तुझ्या खात्यावर ती जमा होईल.

नट : केव्हा ?

कोस्तील्योव : दुसऱ्या जगात, बंधो ! तिथं आपल्या सगळ्या करणींचा हिशोब होतोय ...

नट : पण तू इथंच माझ्या दयाळूपणाचं मला बक्षिस का देत नाहीस ?

कोस्तील्योव : हे मी कसं काय करणार ?

नट : निम्मं कर्ज माफ कर !

कोस्तील्योव : हॅ, हॅ ! अजून तू विनोद करतोस, अजून थट्टा करतोस ! काळजाच्या दयाळूपणाची कधी पैशाशी तुलना करतात ? दयाळूपणा हा सर्वांत मोठा उपकार. आणि तू मला देणं – ते देणंच राहणार ! म्हणजे ते तुला फेडलंच पाहिजे ! माझ्यासारख्या म्हाताऱ्या माणसाला दयाळूपणा दाखवल्याबद्दल तू परतफेडीची अपेक्षा करायची नाही.

नट : पाजी आहेस तू म्हाताऱ्या ! (स्वयंपाकघरात जातो.)

क्लेश्च उठतो आणि बाहेर जातो.

कोस्तील्योव (सातीनला) : घाशा पळाला इथून ! ख्यॅ, ख्यॅ ! मी आवडत नाही त्याला !

सातीन : सैतानाशिवाय तू दुसऱ्या कुणाला आवडतोस ?

कोस्तील्योव (लबाडपणे) : का रे बाबा शिव्या घालतोस ! मला तुम्ही सगळे आवडता... मला समजतं... तुम्ही बंधू गरीब आहात, दुर्दैवी आहात, पतित आहात... (अचानक, पटकन.) अं... आ... वास्या – घरात आहे ?

सातीन : जाऊन बघ...

कोस्तील्योव (दारापाशी जाऊन टकटक करतो) : वास्या !

स्वयंपाकघराच्या दाराशी नट अवतीर्ण होतो. तो काही-तरी चघळतोय.

पेपेल : कोण आहे ?

कोस्तील्योव : मी ... मी आहे ... वास्या ...

पेपेल : काय पाहिजे ?

कोस्तील्योव : (दूर होत) : दार उघड.

सातीन : (कोस्तील्योवकडे न पाहता) : तो दार उघडील आणि ... ती तिथं असेल.

नट फुर्रर आवाज करतो.

कोस्तील्योव (अस्वस्थपणे खालच्या आवाजात) : आं ? कोण – तिथं ? तू ... काय ?

सातीन : काय ? तू – मला काही म्हणालास ?

कोस्तील्योव : तू काय म्हणालास ?

सातीन : आपलं सहज – स्वतःशी !

कोस्तील्योव : सांभाळ बंधू ! थट्टेत मर्यादा सोडू नको ! (दारावर जोरात ठोकतो.) वासिली !

पेपेल (दार उघडत) : काय ? कसला त्रास द्यायला इथं आला आहेस ?

कोस्तील्योव : (खोलीत डोकावून पहात) : मी ... पाहिलंस – तू ...

पेपेल : पैसे आणलेस ?

कोस्तील्योव : माझं तुझ्यापाशी एक काम आहे ...

पेपेल : पैसे – आणलेस ?

कोस्तील्योव : कशाचे ? थांब ...

पेपेल : पैसे – घडयाळाबद्दल सात रूबल – कुठं आहेत ?

कोस्तील्योव : कोणतं घड्याळ, वास्या? अरेच्चा... तू...

पेपेल : सांभाळ! सांभाळ! काल साक्षीदारांसमोर मी तुला दहा रूबलना घड्याळ विकलं... तीन– मिळाले, उरलेले सात – दे! डोळे. काय भिरीभिरी फिरवतोस? स्वत:चा उद्योगधंदा सोडून उगाच इथं घोटाळत बसतो आणि लोकांना त्रास देतो!

कोस्तील्योव : श्शू:! रागावू नको, वास्या! घड्याळ... अं...

सातीन : चोरीचा माल आहे.

कोस्तील्योव (खंबीरपणे) : चोरीचा माल मी घेत नाही. तुझी हिंमत कशी झाली...

पेपेल (त्याचा खांदा पकडून) : तू – कशाला मला छळतो आहेस? काय पाहिजे तुला?

कोस्तील्योव : अं... मला... काही नाही... तू तसा असलास तर मी जातो.

पेपेल : चालता हो आणि पैसे आण!

कोस्तील्योव (जाता जाता) : काय असभ्य माणसं! अरेरे...

नट : अस्सल विनोदी नाटक!

सातीन : झकास! हे आपल्याला आवडतं!

पेपेल : तो इथं काय करत होता?

सातीन (हसत) : तुला समजत नाही? बायकोला शोधतोय... वासिली, त्याची खोपडी का उडवून टाकत नाहीस?

पेपेल : त्याच्यासारख्या गचाळ माणसापायी मी कशा-

ला स्वतःच्या आयुष्याचा सत्यानाश करून घेऊ?

सातीन : जरा हुशारीनं वाग. नंतर वासिलिसाशी लग्न कर... आमचा मालक होशील.

पेपेल : ओहो, केवढी मज्जा! माझ्या चांगुलपणाचा फायदा घेऊन मला समजायच्या आत तुम्ही माझ्यासकट माझ्या इस्टेटीला विकून दारू प्याल! (एका फळीवर बसतो.) थेरडा सैतान! झोपेतून जागं केलं मला! काय छान स्वप्न पडलं होतं मला – मी मासे धरत होतो आणि एक प्रचंड मासा गळाला लागला. स्वप्नाशिवाय एवढा मोठ्ठा मासा बाहेर कुठं सापडणार नाही. गळाला तो लागला होता आणि छडी तुटायची भीती वाटली म्हणून मी जाळं फेकायच्या तयारीत होतो... आत्ता जाळं फेकणार...

सातीन : तो मासा नव्हता – ती वासिलिसा होती!

नट : वासिलिसा त्याला केव्हाच गावलीय!

पेपेल (रागाने) : तुम्ही सगळे नरकात जा... आणि बरोबर तिलाही घेऊन जा!

क्लेश्च (बाहेरून प्रवेश करत) : भयानक थंडी आहे!

नट : आन्नाला का आणलं नाहीस? गोठून जाईल...

क्लेश्च : तिला नताशा स्वैपाकघरात घेऊन गेली.

नट : म्हातारा... पळवून लावील!

क्लेश्च (कामाला बसत) : तर नताशा तिला परत आणील!

सातीन : वासिली! पाच कोपेक दे.

नट (सातीनला) : हात् तुझी... पाच कोपेक!

वास्या! आम्हाला वीस कोपेक दे!

पेपेल: लौकर दिले पाहिजेत... नाहीतर मागणी रूबलपर्यंत जायची... घ्या!

सातीन: जगात चोरांसारखी उत्तम माणसं दुसरी नाहीत!

क्लेश्च (उदासपणे): त्यांना सहज पैसे मिळतात... कारण ते काम करत नाहीत!

सातीन: खूप लोकांना सहज पैसा मिळतो हे खरं – पण फारच थोडयांच्या हातून पैसा सुटतो. काम? असं काम दे, जे करायला आनंद वाटेल. कदाचित मी काम करीनसुद्धा. हो! कदाचित! जेव्हा काम आवडतं असतं, तेव्हा आयुष्य म्हणजे आनंद! पण जेव्हा काम कर्तव्य ठरतं, तेव्हा आयुष्य म्हणजे गुलामी! (नटाला.) ए, सार्दानापाल, चल!

नट: चल, नेबूचदनीझार! चाळीस हजार दारुडयां-एवढी दारू पितो...

जातात.

पेपेल (जांभई देत): तुझ्या बायकोचं कसं आहे?

क्लेश्च: लौकरच जाईल असं वाटतं...

स्तब्धता.

पेपेल: कशासाठी निष्कारण घासत बसतोस?

क्लेश्च: मग काय करायचं?

पेपेल: काहीही नाही.

क्लेश्च: खाऊ काय?

पेपेल: माणसं जगतात की...

क्लेश्च : ही ? ही कसली माणसं ? भिकेकंगाल ! नुसता गाळ ! मी काम करणारा माणूस आहे ... त्यांच्याकडं नजर टाकायलासुद्धा शरम वाटते. अगदी ल्हान वयापासून मी काम करतोय ... इथून मी तुटून जाणार नाही असं वाटतं तुला ? नक्की जाईन ! अगदी अंगाची सालटी घासून गेली तरी बेहत्तर, पण जाईन ! जरा थांब ... बायको लौकरच मरेल ! इथं मी अवघे सहा महिने राहतोय ... पण सहा वर्षं राहिल्यासारखं वाटतंय !

पेपेल : इथं तुझ्यापेक्षा वाईट कुणीही नाही. उगाच बोलतोस तू ...

क्लेश्च : वाईट नाही ? मान नाही, अब्रू नाही ... नुसेच जगतात !

पेपेल (बेफिकीरपणे) : कुणाला पाहिजे – मान आणि अब्रू ? पायात बुटांच्या जागी ना घालू शकतोस मान, ना अब्रू ! ज्यांच्या हाती सत्ता आहे त्यांना गरज असते मानाची, अब्रूची !

बूब्नोव (प्रवेश करतो) : हू ... हू ... हू ... काय गारठा !

पेपेल : बूब्नोव ! तुला अब्रू आहे ?

बूब्नोव : का – य ? अब्रू ?

पेपेल : हूं !

बूब्नोव : कशाला ती मला ? मी श्रीमंत नाही.

पेपेल : तेच मी म्हटलं – मान, अब्रू यांची श्रीमंतांना गरज आहे. पण क्लेश्च आपल्याला शिव्या घालतोय : म्हणतो – आपल्याला अब्रू नाही ...

बूब्नोव : त्याला काय – उसनी आणायचीय ?

पेपेल : त्याला स्वतःची भरपूर आहे.

बूब्नोव : म्हणजे – विकतोय ! पण इथं तिला कुणीही विकत घेणार नाही. जर जुना पत्त्यांचा जोड असला तर कदाचित मी विकत घेतला असता... तोसुद्धा उधारीवर !

पेपेल (शिकवण्याच्या सुरात) : मूर्ख आहेस तू आंद्रयूश्का ! अब्रूबाबत तू बारोनचं नको, तर सातीनचं बोलणं ऐक.

क्लेश्च : त्यांच्याकडून शिकण्यासारखं काही नाही मला !

पेपेल : तुझ्यापेक्षा ते जास्त शहाणे आहेत – जरी दारुडे असले तरी !

बूब्नोव : जो दारुडा आहे आणि शहाणाही आहे – त्याला दुप्पट बक्षिस !

पेपेल : सातीन म्हणतो – प्रत्येक माणसाची इच्छा असते की, त्याच्या शेजाऱ्याला अब्रू असावी. पण कुणीही स्वतःपाशी तिला बाळगत नाही. अगदी खरं आहे...

नताशा प्रवेश करते. तिच्या पाठोपाठ लूका येतो. त्याच्या हाती काठी, पाठीवर पडशी व कमरपट्ट्याला भांडे आणि चहाची किटली अडकवलेली.

लूका : राम, राम भल्या माणसांनो !

पेपेल (मिशीवरून हात फिरवत) : नताशा !

बूब्नोव (लूकाला) : दोन वर्षांपूर्वी भला माणूस होतो.

नताशा : हा नवा भाडेकरू.

लूका : मला सगळं सारखंच! बदमाशांबद्दलसुद्धा मला आदर वाटतो. एकही पिसू वाईट नाही. सगळ्याच काळ्या आणि सगळ्याच उड्या मारतात. इथं मला कुठं ठेवणार बाई तू?

नताशा (स्वयंपाकघराच्या दाराकडे बोट दाखवत) : तिथं आत, आजोबा.

लूका : उपकार झाले तुझे पोरी! तिथं तर तिथं! म्हाताऱ्याला जिथं ऊब मिळेल, तीच त्याची मायभूमी.

पेपेल : विचित्र म्हाताऱ्याला आणलंत तुम्ही नताशा.

नताशा : तुमच्यापेक्षा जास्त रंजक आहे... आंद्रेइ, तुझी बायको आमच्या स्वयंपाकघरात आहे. थोड्या वेळानं तिला घेऊन जायला ये.

क्लेश्च : ठीक आहे... येईन.

नताशा : तिच्याशी थोडं प्रेमानं वागलास तर बरं होईल. आता ती काही फार जगणार नाही.

क्लेश्च : ठाऊक आहे...

नताशा : नुसतं ठाऊक असणं पुरेसं नाही. तू समजून घे. सरतेशेवटी मरणं म्हणजे भयानकच!

पेपेल : पण मला नाही भीती वाटत.

नताशा : असं? फारच शूर वीर!

बूब्नोव (हलकेच शीळ घालत) : धागे कुजके आहेत!

पेपेल : खरंच, मी नाही भीत! आत्ता, या क्षणाला मरणाला कवटाळीन! उचला सुरी आणि खुपसा माझ्या काळजात! मरीन—पण तोंडातून हुंकार काढणार नाही!

ह्या मरणात मला आनंद वाटेल, कारण स्वच्छ हातांकडून ते आलेलं असेल!

नताशा (जात): काय उगीच थापा मारता मला?

बूब्नोव (विव्हळत): धागे तर कुजके आहेत...

नताशा (बाहेरच्या दारापाशी): आंद्रेइ, बायको-बद्दल विसरू नको.

क्लेश्च: बरं...

पेपेल: मस्त पोरगी आहे!

बूब्नोव: काही वाईट नाही पोरगी!

पेपेल: माझ्याशी असं का वागते? नेहमी फटकारते! इथं राहिली तर सत्यानाश होणार तिचा!

बूब्नोव: तुझ्यापायी तिचा सत्यानाश होणार.

पेपेल: माझ्यापायी कशाबद्दल? मला तिच्याबद्दल वाईट वाटतं...

बूब्नोव: लांडग्याला कोकराबद्दल वाटतं तसं...

पेपेल: खोटं! मला तिच्याबद्दल फार फार वाईट वाटतं... इथं जगणं तिला अवघड जातंय... मला दिसतंय...

क्लेश्च: जरा थांब! तिच्याबरोबर बोलताना तुला वासिलिसानं पाहिलं म्हणजे समजेल!

बूब्नोव: वासिलिसा? खरंच, फुकटात ती काही देणार नाही. बाई भयंकर क्रूर आहे.

पेपेल (फळीवर आडवे होत): दोघेही तुम्ही मसणात जा! आलेत मोठे ज्ञानी पुरुष!

क्लेश्च: दिसेल तुला... जरा थांब!

लूका (स्वयंपाकघरात गातो) : मध्यरातीची वेळ... वाट नाही दिसत ...

क्लेश्च (बाहेर जात) : काय कोकलतोय हा ? छी : !

पेपेल : जाम कंटाळा आला बुवा ! का बरं मला असा वैताग येतो ? सगळं छान चाललेलं असतं आणि अचानक थंडी भरावी तसा वैतागाचा झटका येतो.

बूब्नोव : वैताग आला ? हं ...

पेपेल : भयंकर वैताग आलाय !

लूका (गातो) : अहो ... वाट नाही दिसत ...

पेपेल : म्हातारबुवा ! अहो !

लूका (दारातून डोकावत) : मला तुम्ही हाक मारताय ?

पेपेल : होय. गाणं म्हणू नको.

लूका (प्रवेश करत) : आवडत नाही ?

पेपेल : जेव्हा छान गातात, तेव्हा आवडतं.

लूका : म्हणजे मी वाईट गातो ?

पेपेल : बरोब्बर !

लूका : अरे वारे तुझी ! मला वाटलं – मी छान गातो. नेहमी असं घडतं – माणूस नेहमी स्वतःबद्दल समजूत करून घेतो : मी चांगलं करतोय ! पण माणसं नेमकी त्याच्यावर नाराज !

पेपेल (हसतो) : खरं आहे.

बूब्नोव : वैताग आला म्हणतोस – आणि स्वतः खो खो हसतोस.

पेपेल : तुला काय करायचंय ? कावळा ...

लूका : कुणाला वैताग आला ?

पेपेल : मला !

बारोन प्रवेश करतो.

लूका : कमाल आहे ! तिथं स्वैपाकघरात एक पोरगी वाचत बसलीय ... वाचतेय ... आणि रडतेय ! खरंच ! डोळ्यातून पाण्याच्या धारा लागल्यात ! मी तिला म्हटलं – बाई ग, तुला काय झालं ? तर ती म्हणते – वाईट वाटतं ! कुणाबद्दल म्हणून विचारलं, तर म्हणते – त्या पुस्तकातल्या माणसाबद्दल ! बघा, माणूस कशा-कशात गुंतवून घेतो आं ? तिलासुद्धा तुझ्यासारखा वैताग आलेला दिसतोय ...

बारोन : ती मूर्ख आहे.

पेपेल : बारोन ! चहा प्यायला ?

बारोन : प्यायलो ! पुढे ?

पेपेल : अर्धी बाटली पाहिजे ?

बारोन : चालेल ! पुढे ?

पेपेल : हाता-पायांवर उभा रहा आणि कुत्र्यासारखं भुंकून दाखव.

बारोन : ठोंब्या ! तू कोण ? व्यापारी ? किंवा झिंगला आहेस ?

पेपेल : भुंक म्हणतो ना ! माझी करमणूक होईल. एकेकाळी तू जहागिरदार होतास आणि आमच्यासारख्या लोकांना माणसं समजत नव्हतास.

बारोन : ठीक, पुढे ?

पेपेल : पुढं काय ? आता मी तुला कुत्र्यासारखं भुंकायला लावतोय – आणि तू भुंकशील ... होय ना ?

बारोन : होय, भुंकीन ! मूर्खशिरोमणी ! पण तुझ्या-पेक्षा मी अतिहलकट बनलोय ह्याची मला जाणीव झालेली असताना त्यात तुझी करमणूक काय होणार ? मी तुझ्या जोडीचा नव्हतो तेव्हा मला हाता-पायांवर ओणवं चालायला लावायला हवं होतंस ...

बूब्नोव : हे मात्र खरं !

लूका : छान ! छान सांगितलं !

बूब्नोव : जे घडलं ते घडलं आणि आता नुसता भुस्सा उरलाय ! इथं सभ्य गृहस्थ नाहीत. सगळं धुवून गेलंय. फक्त नागवा माणूस राहिलाय !

लूका : म्हणजे सगळे सारखे ... आणि तू भल्या माणसा, खरंच जहागिरदार होतास ?

बारोन : हे काय आणखी ? तू कोण – पिशाच्चा ?

लूका (हसतो) : मी उमराव पाहिलाय आणि राजाही पाहिलाय ... पण जहागिरदाराला मात्र पहिल्यांदाच भेटतोय, तेसुद्धा खंक झालेल्या !

पेपेल (खो खो हसत) : बारोन ! तू मला लाजवलंस !

बारोन : वासिली, अरे एव्हाना तुला आक्कल आली पाहिजे ...

लूका : हचॅं, हचॅं ! मंडळी, तुमचं जगणं बघितलं ना ... कमाल वाटते !

बूब्नोव : आम्ही कण्हत जागे होतो आणि कुंथत झोपी जातो – असलं आमचं जिणं !

बारोन : याहून उत्तमही जगलोय ! .. होय ... एके-काळी ... सकाळी जागा झाल्यावर अंथरुणात लोळतच

पहिली कॉफी प्यायचा! साय घातलेली कॉफी!..

लूका: आपण सगळी माणसं! कितीही रुबाब आणला, कितीही देखावा केला, तरी माणसं म्हणून आपण जन्मलो आणि माणसं म्हणूनच मरणार. मला असं दिसतंय की, माणसं जास्त शहाणी होत चाललीत, मजेदार होत चाललीत. जेवढी जास्त वाईट जगतात, तेवढी अधिक चांगलं जगायची त्यांना इच्छा होते. महाचिवट आहेत!

बारोन: म्हातारबुवा, तू कोण? कुठून उगवलास इथं?

लूका: मी?

बारोन: यात्रेकरू आहेस?

लूका: धरतीवरची आपण सगळीजणं यात्रेकरू आहोत. असं म्हणताना मी ऐकलंय की, आपली धरतीमाताच आकाशातली एक यात्रेकरू आहे.

बारोन (कठोरपणे): ते असो! पासपोर्ट आहे?

लूका (थोडे थांबून): तू कोण? गुप्त पोलीस?

पेपेल (आनंदून): शाब्बास म्हाताऱ्या! काय जहागिरदार – जिरली का?

बूब्नोव: खरंच, चांगलीच जिरली!

बारोन (शरमून): असं काय विशेष झालं? म्हातारबुवा, मी सहज थट्टा करत होतो. खुद्द माझ्यापाशीच तसला कागद नाही.

बूब्नोव: खोटं!

बारोन: आहे... कागद आहेत... पण त्यांचा कुठंही उपयोग नाही.

पेपेल : बारोन ! चल, गुत्त्यात जाऊ या .

बारोन : तयार ! अच्छा म्हातारबाबा ! लबाड आहेस !

लूका : अरे बाबा, तऱ्हेतऱ्हेची माणसं असतात !

पेपेल (बाहेरच्या दारापासून) : अरे चलताय ना ? (जातो .)

बारोन घाईघाईने त्याच्यामागून जातो .

लूका : तो खरंच जहागिरदार होता ?

बूब्नोव : कुणाला ठाऊक ? तो खानदानी कुळातला आहे हे खरं ! आत्तासुद्धा अचानक असा काही वागून जातो की, त्याचं खानदानीपण एकदम दिसून येतं . अजून पूर्वीच्या सवयी पुरत्या गेलेल्या नाहीत .

लूका : खानदानीपण देवीच्या रोगासारखं आहे . माणूस कदाचित बरा होतो, पण वण कायम राहतात .

बूब्नोव : तसा ठीक आहे तो . फक्त कधीतरी लाथा झाडतो – तुझ्या पासपोर्टाबाबत बोलला तसं काहीतरी .

आल्योश्का (किंचित झिंगलेल्या अवस्थेत शीळ घालत आणि ॲकॉर्डियन वाजवत प्रवेश करतो) : राम राम मंडळी !

बूब्नोव : कशाला कोकलतोस ?

आल्योश्का : माफ करा... क्षमा करा ! तसा मी स्वभावानं नम्र माणूस आहेस .

बूब्नोव : परत झिंगापाणी केलंस ?

आल्योश्का : करता येईल तेवढं ! आत्ताच पोलीस ठाण्यामधून त्या मेद्याकिन हवालदारानं मला हाकलून लावलं आणि म्हणाला – " पुन्हा रस्त्यात तुझी सावली

दिसली तरी खबरदार! अगदी वाससुद्धा येता कामा नये!" पण मी माणूस बंदा! माझा मालक माझ्यावर गुरगुरतो – पण मालक म्हणजे कोण? फू:! निव्वळ गैरसमज! माझा मालक दारुडा आणि मी असा फकीर माणूस! काहीही इच्छा नाही – खतम्! घे मला रूबल-ला, नाहीतर वीसला! पण मला – काहीही नको!

नास्त्या स्वयंपाकघरातून बाहेर येते.

दहा लाख दे मला – नको! आणि माझ्यासारख्या चांगल्या माणसाला एक दारुडा हुकूम करतो? मुळीच नको!

दारात उभी राहिलेली नास्त्या आल्योश्काकडे पाहून मान डोलावते.

लूका (प्रेमळपणे): अरे पोरा, वाट चुकलास रे तू!

बूब्नोव: वेडा माणूस आहे तो!

आल्योश्का (फरशीवर झोपत): घे, खाऊन टाक मला! पण मला मात्र काहीही नको! मी टोकाला पोचलेला माणूस! सांगा मला – माझ्यात काय कमी आहे? इतरांपेक्षा मी वाईट का? तो मेद्याकिन म्हण-तो – रस्त्यावर सापडलास तर थोबाड फोडीन! पण मी जाणार – अगदी रस्त्याच्या मध्यभागी जाऊन झोप-णार! तुडव मला! मला कसलीही इच्छा नाही!..

नास्त्या: बिच्चारा! अजून वयानं किती तरुण... पण एवढ्यात मोडून पडलाय!

आल्योश्का (तिला पाहताच गुडघ्यांवर उभा राह-

नो) : बाईसाहेब ! मेमसाब ! मी झिंगापाणी केलं ...

नास्त्या (मोठ्या दबत्या आवाजात) : वासिलिसा !

वासिलिसा (झटकन दार उघडून आत येत , आल्यो-श्काला) : तू परत इथं ?

आल्योश्का : नमस्ते ... कृपा करा ...

वासिलिसा : अरे कुत्र्याच्या पिल्ला , तुझं तोंडसुद्धा दाखवू नकोस असं मी तुला बजावलं होतं ... पण तू परत आलास ?

आल्योश्का : वासिलिसा कार्पोवना ... तुला मी प्रेत-यात्रेच्या वेळचं संगीत वाजवून दाखवू ?

वासिलिसा (त्याची बकोटी पकडून) : चालता हो !

आल्योश्का (दाराकडे जात) : थांब ... तसं नाही ! प्रेतयात्रेचं संगीत ... नुकतंच शिकलोय ! ताजा सूर आहे ! थांब ... असं नाही करायचं !

वासिलिसा : मी तुला दाखवते काय करायचं ते ! आख्खी गल्ली तुझ्यावर सोडते ! कुचाळखोर मेला ! माझ्याविरुद्ध कंड्या पिकवायला अजून फार बच्चा आहेस तू !

आल्योश्का (पळत) : बरं , बरं , मी जातो ...

वासिलिसा (बूब्नोवला) : त्याचे पायसुद्धा इथं दृष्टी-ला न पडले पाहिजेत ! ऐकलंस ?

बूब्नोव : मी इथं तुझा पहारेकरी नाही .

वासिलिसा : तू कोण आहेस ह्याच्याशी मला काही-एक कर्तव्य नाही ! दयेवर जगतो आहेस – विसरू नको ! किती देणं लागतोस मला ?

बूब्नोव (शांतपणे) : मोजले नाही ...

वासिलिसा : बघ – मी मोजीन !

आल्योश्का (दार उघडून ओरडतो) : वासिलिसा कार्पोवना ... मी तुला भीत नाही ! ना-ही भीत ! (नाहीसा होतो .)

लूका हसतो .

वासिलिसा : तू कोण रे ?

लूका : वाटसरू यात्रेकरू .

वासिलिसा : एका रात्रीपुरता , का राहणार काही दिवस ?

लूका : बघितलं पाहिजे पहिल्यांदा ...

वासिलिसा : पासपोर्ट ?

लूका : आहे ...

वासिलिसा : दे !

लूका : मी खुद्द आणून देतो ... तुझ्या खोलीत !

वासिलिसा : म्हणे यात्रेकरू ! भटक्या मवालीच दिसतो .

लूका (उसासत) : बाई , तुझ्या काळजात माया नाही !

वासिलिसा पेपेलच्या खोलीच्या दारापाशी जाते .

आल्योश्का (स्वयंपाकघरातून डोकावत , दबत्या आवाजात) : गेली ? आं ?

वासिलिसा (त्याच्याकडे वळून) : तू अजून इथं ?

आल्योश्का कर्कश्य शीळ घालतो आणि नाहीसा होतो . नास्त्या आणि लूका हसतात .

बून्नोव (वासिलिसाला): नाही तो...

वासिलिसा : कोण ?

बून्नोव : वास्का.

वासिलिसा : त्याच्याबद्दल मी तुझ्याकडं चौकशी केली ?

बून्नोव : बघतोय मी... पाहते आहेस सगळीकडं !

वासिलिसा : सगळं जिथल्या तिथं आहे किंवा नाही ते पाहतेय ! समजलं ? अजून फरशी का पुसलेली नाही ? ही जागा स्वच्छ राखा असं कितीवेळा बजावलंय मी ?

बून्नोव : आज नटाची पाळी होती...

वासिलिसा : कुणाची पाळी होती याबाबत मला काहीही कर्तव्य नाही ! पण जर स्वच्छता-इन्स्पेक्टरनं इथं येऊन मला दंड ठोकला, तर मात्र तुम्हा सगळ्यांना हाकलून लावीन !

बून्नोव (शांतपणे): मग जगणार कशावर तू ?

वासिलिसा : एक बारीक ठिपकासुद्धा फरशीवर दिसता कामा नये ! (स्वयंपाकघराकडे जाताना नास्त्याला उद्देशून.) तू इथं का तडमडतेस ? थोबाड सुजलंय कशानं ? पुतळ्यासारखी मख्ख उभी का ? फरशी पुसून काढ ! नताल्याला बघितलंस ? इथं आली होती का ती ?

नास्त्या : माहीत नाही... नाही बघितलं.

वासिलिसा : बून्नोव ! माझी बहीण इथं आली होती ?

बून्नोव (लूकाकडे बोट दाखवत): अं... तिनंच ह्याला आणला...

वासिलिसा : आणि तो – घरात होता ?

बूब्नोव : वासिली ? होता ... पण नताल्या फक्त क्लेश्चबरोबर बोलली .

वासिलिसा : ती कुणाबरोबर बोलली हे मी तुला नाही विचारलं ! घाण सगळीकडं ... डुकरं ! स्वच्छ करा इथं – समजलं ? (झटकन निघून जाते .)

बूब्नोव : काय बाई जंगली आहे !

लूका : तिच्याशी लटपट चालायची नाही .

नास्त्या : अशा आयुष्यात कुणीही जंगली बनेल ! तिच्या नवऱ्यासारख्या माणसाशी कुणाला बांधून ठेवा , म्हणजे समजेल !

बूब्नोव : पण ती काही घट्ट बांधलेली नाही !

लूका : नेहमी अशी वागते ... स्फोट उडाल्यासारखी ?

बूब्नोव : नेहमी ! याराला भेटायला आली होती ... पण त्याचा इथं पत्ता नाही !

लूका : म्हणजे पीडा आहे तर ! अरे देवा ! धरती-वरती अंमल गाजवणारी वेगवेगळी माणसं एकमेकांना काय भयानक धमक्या घालताहेत ! आणि तरी आयु-ष्यात शिस्त नाही ! स्वच्छता पण नाही !

बूब्नोव : सगळ्यांना शिस्त पाहिजेय , पण अक्कल अपुरी पडतेय . अरेच्चा , फरशी पुसून काढली पाहिजे ! नास्त्या ..! तू का नाही बरं हे काम करत ?

नास्त्या : का म्हणून ? मी काय तुमची मोलकरीण आहे ? (क्षणभर गप्प राहून .) आज मी दारू पिऊन खूप तर्रर्र होणार आहे . खच्चून पिणार !

बूब्नोव : म्हणजे काहीतरी करणार ...

लूका : कशाला ग पोरी दारू प्यावीशी वाटते? थोड्या वेळापूर्वी रडत होतीस आणि आता म्हणतेस – झिंगणार दारू पिऊन!

नास्त्या (आव्हानपूर्वक) : चिक्कार पिणार आणि परत रडणार! बास्स!

बूब्नोव : फार काही नाही.

लूका : पण कारण तर सांग! पुटकुळीसुद्धा कारणा-शिवाय उमटत नाही!

नास्त्या मान हलवून गप्प राहते.

अरे, अरे, अरे! मंडळी! तुमचं काय होणार? .. चला, मी तुमची फरशी पुसून काढतो. कुठं आहे झाडू?

बूब्नोव : दाराच्यापलिकडे, बाहेरच्या खोलीत.

लूका बाहेरच्या दाराकडे जातो.

नास्त्योन्का!

नास्त्या : काय.

बूब्नोव : वासिलिसा त्या आल्योश्कावर एवढी का उखडली?

नास्त्या : तो तिच्याबद्दल प्रत्येकाला सांगत सुटला की, वास्काला तिचा कंटाळा आलाय आणि वास्का तिला टाकून देणार आहे ... नताशाला जवळ करणार आहे ... मी इथून दुसऱ्या घरात निघून जाणार!

बूब्नोव : काय? कुठं?

नास्त्या : वैताग आलाय मला... इथं मी उपरी आहे !

बून्नोव (शांतपणे) : तू सगळीकडंच उपरी ! आणि ह्या जगातली सगळी माणसंही उपरी !

नास्त्या मान हलवते. उठते आणि शांतपणे बाहेर निघून जाते. मेदवेदेव प्रवेश करतो. त्याच्या पाठोपाठ झाडू घेऊन लूका येतो.

मेदवेदेव : तू मला ओळखीचा वाटतोस...

लूका : बाकीच्या सगळ्यांना... ओळखतोस ?

मेदवेदेव : माझ्या फेरीतल्या सगळ्यांना ओळखणं हे काम आहे माझं ! पण तुला मात्र ओळखत नाही !

लूका : कारण सगळं जग तुझ्या फेरीत मावत नाही... थो-डं-सं शिल्लक राहिलंय. (स्वयंपाकघरात जातो.)

मेदवेदेव (बून्नोवपाशी जात) : बरोबर – माझ्या फेरीचा पट्टा फारसा मोठा नाही. पण मोठ्यापेक्षा महा-वाईट आहे. आत्ता, काम संपवण्यापूर्वी, त्या आल्योश्का चांभाराला ठाण्यावर न्यावं लागलं. आणि त्यानं काय केलं माहीत आहे ? रस्त्याच्या मध्यभागी आडवा पडला आणि ॲकॉर्डियन वाजवत बोंबलत होता : काही नको मला, कसली इच्छा नाही मला ! रस्त्यावरून घोडे जातात, शिवाय इतर गाड्यांची वर्दळ. कशाखाली तरी चिरडला असता. दंगेखोर पोरगा आहे. पण मी त्याची पक्की व्यवस्था लावली. गोंधळ माजवायला खूप आवडतं त्याला.

बूब्नोव : संध्याकाळी सोंगट्यांचा डाव खेळायला येणार ?

मेदवेदेव : येईन. अं... वास्काचं... कसं काय ?

बूब्नोव : काही नाही. सगळं आहे तसंच.

मेदवेदेव : म्हणजे, जिवंत आहे ?

बूब्नोव : त्याला जिवंत नसायला काय झालं ? त्याला ठीक आहे जगायला...

मेदवेदेव : (संशयाने) : असं म्हणतोस ?

बादली घेऊन लूका बाहेरच्या दाराकडे जातो.

वास्याबद्दल काहीतरी एक अफवा उठली होती. तू ऐकलीस ?

बूब्नोव : मी खूप अफवा ऐकतो.

मेदवेदेव : वासिलिसाच्या संबंधात... तुला काही आढळलं ?

बूब्नोव : काय ?

मेदवेदेव : असंच... एकूण ! कदाचित तुला माहीत आहे, पण वेड पांघरतोस ! मला वाटतं, सगळ्यांना ठाऊक आहे... (कडक आवाजात.) बंधू, खोटं बोलू नये !

बूब्नोव : बंधू, मी कशाला खोटं बोलू ?

मेदवेदेव : अस्सं ! भिकार कुत्रे साले ! म्हणतात – वास्या आणि वासिलिसाचं... पण मला काय करायचंय म्हणा ? मी तिचा बाप नाही... काका... का लोक मला हसतात ?

क्वाश्न्या आत येते.

अलिकडं लोकांना काय झालंय समजत नाही – प्रत्ये-काला हसतात. अरेच्चा! तू ... एव्हाना आलीस!

क्वाश्न्या : माझ्या शिबंदीला चौकशा फार! बूब्नोव! ह्यानं बाजारात परत माझी मनधरणी केली ... मी त्याच्याशी लग्न करावं म्हणून!

बूब्नोव : करून टाक लगीन! काय बिघडलं? त्याच्यापाशी पैसा आहे आणि गडी अजून भक्कम आहे तब्येतीनं!

मेदवेदेव : मी? हा-हा!

क्वाश्न्या : अरे लबाड लांडग्या! माझ्या जखमेवर मीठ चोळू नको! लग्न करण्याचा उद्योग एकदा करून पाहिला बाबा! हिवाळ्यात बर्फात भोकातून उडी मारण्यासारखं आहे – एकदा केलं, म्हणजे जन्मभर आठ-वण!

मेदवेदेव : तू ... थांब ग! नवरे – वेगवेगळे असतात!

क्वाश्न्या : पण मी तर तीच! माझा लाडका नवरा जेव्हा चचला – नरकात चांगला खरपूस भाजून निघू दे मेला – तेव्हा आख्खा दिवस मी एकटी आनंदात बसून राहिले! स्वतःच्या सुदैवावर माझा विश्वासच बसत नव्हता!

मेदवेदेव : योग्य कारणाशिवाय जर तुझ्या नवऱ्यानं तुला मारहाण केली, तर तू पोलीसात तक्रार गुदरायची होती.

क्वाश्न्या : देवापाशी मी तब्बल आठ वर्षं गाऱ्हाणं मांडत होते. त्यानं नाही मदत केली.

मेदवेदेव : आजकाल बायकोला मारहाण करायला

वंदी आहे. फार कडक कायदे आहेत. योग्य कारणाशिवाय कुणालाही मारहाण करायची नाही – फक्त सुव्यवस्था राखण्यासाठी!

लूका (आन्नाला आत आणत): पहा, आलो की नाही आपण? अग पोरी, अशा दुबळ्या अवस्थेत कुणी एकटं फिरतं का? कुठं तुझी जागा?

आन्ना (त्याला दाखवत): उपकार तुमचे, आजोबा...

क्वाश्न्या: बघा ही – लग्नाची बायको! टाका नजर तिच्यावर एकदा!

लूका: बाई अगदी अशक्त आहे... तिचं कण्हणं मी ऐकलं आणि बघतो तर भिंतीचा आधार धरून एकेक पाऊल लटपटत टाकत्येय! तुम्ही तिला असं एकटीला सोडू नका!

क्वाश्न्या: आमच्याकडून चूक घडली बाबा! तिची मोलकरीण बहुधा फिरायला गेलीय...

लूका: तू थट्टा करत्येस... पण माणसाला असं एकटं टाकणं ठीक आहे का? प्रत्येकाची काही ना काही स्वत:ची किंमत म्हणून असतेच!

मेदवेदेव: तिच्यावर लक्ष ठेवलं पाहिजे. अचानक मेली तर? फार कटकट होईल. तिला नजरेआड होऊ देऊ नका.

लूका: अगदी बरोबर, जमादारसाहेब...

मेदवेदेव: अं... मी... अजून तसा पूर्ण जमादार नाही...

लूका: असं? पण दिसता तर तसे!

रंगभूमीमागे गोंगाट. दबत्या किंकाळ्या ऐकू येतात.

मेदवेदेव: भांडण जुंपलं काय?

बूब्नोव: तसंच दिसतंय...

क्वाश्न्या: जाऊन बघून येत्ये.

मेदवेदेव: मलाही गेलं पाहिजे. छी:, ही नौकरी म्हणजे! भांडणाऱ्या माणसांना आम्ही वेगळं का करायचं हे मला समजत नाही. ते दमतील तेव्हा आपोआप थांबतील. खुशाल त्यांना एकमेकांची कणीक तिंबू दे. चांगली आठवण राहील आणि पुन्हा सहजासहजी चटकन मारामारी करणार नाहीत.

बूब्नोव (फळीवरून खाली उतरत): ह्याबद्दल तुझ्या साहेबापाशी बोल.

कोस्तील्योव (धाडकन दरवाजा उघडत ओरडतो): आब्राम! लौकर ये! वासिलिसा नताशाच्या मागं लागलीय! ती तिला ठार मारील... ये लौकर!

क्वाश्न्या, मेदवेदेव आणि बूब्नोव बाहेर धावतात. लूका मान हलवून त्यांच्या दिशेने टक लावून पाहतो.

आन्ना: देवा रे... बिचारी नताशा!

लूका: कोण भांडतंय तिथं?

आन्ना: मालकिणी... बहिणी-बहिणी...

लूका (आन्नापाशी जात): कशाबद्दल भांडण?

आन्ना: तशा त्या... दोघी खाऊन-पिऊन ठीक आहेत... धडधाकट...

लूका: तुझं नांव काय ग?

आन्ना: आन्ना... तुझ्याकडं पाहिलं की माझ्या

बापाची मला आठवण येत्ये ... असाच प्रेमळ ... नरम ...

लूका : मला खूप धक्काबुक्की झालीय – म्हणून असा नम्म बनलोय ! (खी खी करून हसतो .)

पडदा

अंक दुसरा

स्थळ : पूर्वीचेच . संध्याकाळ .

सातीन , क्रीवोय झोब , बारोन आणि तातारीन चुलाण्यापाशी बसून पत्ते खेळत आहेत . क्लेश्च आणि नट त्यांचा खेळ पहात बसले आहेत . बूब्नोव आणि मेदवेदेव सोंगट्यांचा डाव बूब्नोवच्या फळीवर बसून खेळत आहेत . लूका आन्नाशेजारी बसला आहे . निवासात दोन दिवे पेटत आहेत . एक पत्ते खेळणाऱ्यांच्या जवळच्या भिंतीवर आणि दुसरा बूब्नोवच्या फळीवर .

तातारीन : आणखी एक डाव खेळणार . मग बास्स !

बूब्नोव : झोब ! गाण म्हण ! (गातो .)

रविराजा उगवतो नि मावळतो ...

क्रीवोय झोब (त्याच्या सुरात सूर मिसळून) :

कारागृहाच्या कोठडीत माझ्या अंधार ...

तातारीन (सातीनला) : पीस पत्ते ! चांगले कसून पीस ! तू कसा आहेस हे ठाऊक आहे आम्हाला !

बूब्नोव आणि क्रीवोय झोब (एकत्र) :

दिवस-रात्र पहारेकरी ...
ठेवतो नजर माझ्या खिडकीवर ...

आन्ना : मारामाऱ्या ... अपमान ... ह्याशिवाय दुसरं काहीही पाहिलं नाही मी ! दुसरं काहीही नाही !

लूका : उगीच जिवाला त्रास करून घेऊ नको बाई !

मेदवेदेव : ए , काय खेळतोस ? लक्ष दे .

बूब्नोव : आं ? हं , हं , हं ...

तातारीन (सातीनला मुठीने धमकावत) : पत्ते लपवून का ठेवतोस ? मला दिसतंय ... साला तू ...

क्रीवोय झोब : जाऊं दे , आसान ! ते आपल्याला कसंही करून फसवणार ! बूब्नोव , परत गाणं सुरू कर .

आन्ना : कधी पोटभर खाल्ल्याचं आठवत नाही . प्रत्येक घास मोजावा लागला ! सगळं आयुष्य भिऊन काढलं . दुसऱ्यापेक्षा कणभर जास्त अन्न पोटात जाऊ नये म्हणून मन मारलं . सदासर्वदा लक्तरं ल्यायले ... अख्ख्या माझ्या दुर्दैवी आयुष्यात . कशासाठी ?

लूका : बिच्चारी पोर ! थकलीस ? सगळं ठीक होईल .

नट (क्रीवोय झोबला) : गुलाम टाक ! गुलाम... ह्रान् तुझी !

बारोन : पण आमच्यापाशी राजा आहे.

क्लेश्च : ते नेहमी एक पान वरचढ खेळतात.

सातीन : आमची ती सवय आहे.

मेदवेदेव : राणी !

बूब्नोव : माझीसुद्धा ! आता ?

आन्ना : आता मी मरत्येय...

क्लेश्च : पाहिलंस ? पाहिलंस ? प्रिन्स, डाव टाकून दे ! खेळू नकोस !

नट : त्याला स्वतःला समजत नाही ?

बारोन : सांभाळ आंद्रेइ ! नाहीतर सरळ तुला नरकात भिरकावून देईन !

तातारीन : चला, आणखी एक डाव ! घडा स्वतःच पाणी भरायला गेला आणि फुटला ! माझं तसंच !

क्लेश्च मान हलवत बूब्नोवकडे जातो.

आन्ना : सारखा विचार करत्येय : देवा रे देवा, परलोकातसुद्धा माझा असाच छळ होणार का ? तिथंसुद्धा ?

लूका : काहीही होणार नाही ! झोप शांत. सगळं ठीक होईल. तिथं छान विश्रांती मिळेल. थोडा आणखी दम धर. बाई ग, सगळयांना दम धरावा लागतो... प्रत्येकाला आपापल्या परीनं आयुष्यात दम धरावाच लागतो. (उठतो आणि झपझप पावले टाकत स्वयंपाकघरात निघून जातो.)

बून्नोव (गातो) :

खुशाल करा पहारा ...

क्रीवोय झोब :

पळून मला जायचंच नाही !

दोघे एकत्र गातात

स्वातंत्र्यासाठी जीव तळमळतो ...
साखळदंड आडवा येतो !

तातारीन (ओरडतो) : ए ! पान बाहीत लपवलंस !

बारोन (शरमून) : मग काय ? तुझ्या नाकात घालू ?

नट (खात्री पटवत) : प्रिन्स ! तू चुकतोस ! कुणीही ... कधीही ...

तातारीन : मी पाह्यलं ! डांबीस ! मला नाही खेळायचं !

सातीन (पत्ते गोळा करत) : ठीक आहे, आसान, तू जा ! आम्ही फसवतो हे तुला माहीत आहे. मग कशाला खेळायला आलास आमच्याबरोबर ?

बारोन : हरला फक्त वीस कोपेक आणि गोंगाट करतोय तीन रूबलचा ! छी : ! म्हणे प्रिन्स !

तातारीन : (संतापून) : नेकीनं खेळलं पाहिजे !

सातीन : कशाला ?

तातारीन : कशाला म्हणजे ?

सातीन : म्हणजे – कशाला ?

तातारीन : तुला माहीत नाही ?

सातीन : नाही माहीत. तुला माहीत आहे ?

तातारीन रागाने थुंकतो. त्याला सगळे खो खो हसतात.

क्रीवोय झोब (संथपणे) : येडपट आहेस तू, आसान! अरे समजून घे! जर ते नेकीनं रहायला लागले, तर तीन दिवसात भुकेपायी हात-पाय झाडून मरतील!

तातारीन : मला काय त्याच्याशी! माणसानं नेकीनं जगलं पाहिजे!

क्रीवोय झोब : पुन्हा तेच तुणतुणं वाजवतोय! त्या-पेक्षा चहा प्यायला जाऊ या – चल! बूब्नोव! (गातो.)

माझ्या बेड्यांनो – माझ्या साखळदंडानो ...

बूब्नोव :

माझ्या कडव्या पहारेकऱ्यांनो ...

क्रीवोय झोब : चल, आसान! (गात जातो.)

ना येतं सोडायला, ना तोडायला ...

तातारीन मुठीने बारोनला धमकावतो आणि मित्राच्या पाठोपाठ जातो.

सातीन (हसून, बारोनला) : माननीय जहा-गिरदारसाहेब, तुम्ही परत एकदा खड्ड्यात कोसळलात! एवढा शिकला-सवरलेला माणूस, पण बाहीत पान लपवायला जमलं नाही!

बारोन (हात झटकत) : कसं काय झालं कुणास ठाऊक!

नट : गुण नाही ... स्वतःवर विश्वास नाही. आणि

त्याशिवाय कधीही, काहीही यश लाभणार नाही!

मेदवेदेव: माझ्यापाशी एक राणी – पण तुझ्यापाशी दोन! हं!

बूब्नोव: एक असली तरी डरो मत! डोक्यानं खेळ!

क्लेश्च: हरलात तुम्ही, आब्राम इवानीच!

मेदवेदेव: तू कशाला नाक खुपसतोस? गप्प बैस!

सातीन: जिंकले – त्रेपन्न कोपेक.

नट: त्यातले तीन कोपेक मला... पण कशासाठी हवेत मला तीन कोपेक?

लूका (स्वयंपाकघरातून बाहेर येत): तातारीनला नागवा केलात? वोदका प्यायला जाणार का?

बारोन: चल आमच्याबरोबर.

सातीन: झिंगल्यानंतर तू कसा वागतोस हे बघितलं पाहिजे.

लूका: शुद्धीवर असतो त्यापेक्षा चांगला नक्कीच नाही.

नट: चल, म्हातारबुवा. मी तुला काही कडवी म्हणून दाखवतो.

लूका: हे काय?

नट: कविता – समजलं?

लूका: हां, हां, क-वि-ता! काय करायच्यात मला – कविता?

नट: मजा येते. आणि काहीवेळा – उदास वाटतं.

सातीन: ए कडवेवाल्या, येतोस? (बारोनबरोबर जातो.)

नट : येतो – मी गाठतो तुम्हाला ! तर म्हातारबाबा, उदाहरणादाखल एक कविता म्हणतो... सुरवात मी विसरलो... विसरलो ! (कपाळ चोळतो.)

बूब्नोव : तयार ! ही तुझी राणी मेली... खेळ !

मेदवेदेव : मी तिथं चाल करायला नको होती. छ्या !

नट : पूर्वी, माझ्या शरीरयंत्रणेत जेव्हा दारूचं विष भिनलेलं नव्हतं, तेव्हा माझी स्मरणशक्ती उत्तम होती, म्हातारबुवा ! आणि आता... संपलं, बंधो ! माझ्या दृष्टीनं सारं संपलं ! ह्या ओळी मी नेहमी अशा थाटात म्हणायचा... टाळ्यांचा प्रचंड कडकडाट ! टाळ्यांचा कडकडाट म्हणजे काय ते तुला ठाऊक नाही. बंधू, ही चीज वोदकासारखी आहे. मी हा असा येऊन उभा रहायचा. (पवित्र्यात उभा राहतो.) उभा रहायचा... आणि... (गप्प होतो.) काही आठवत नाही... एक शब्द आठवत नाही ! माझ्या अत्यंत आवडत्या ओळी... म्हातारबुवा, हे फार वाईट !

लूका : खरंच, अत्यंत आवडती गोष्ट विसरला ह्यात चांगलं ते काय ? आवडत्या गोष्टीत प्राण साठवलेला असतो.

नट : माझा प्राण मी दारूत बुडवला, म्हातारबुवा... बंधू, मी संपलो. का मी खलास झालो ? माझा माझ्यावर विश्वास नव्हता. माझा अवतार संपला !

लूका : अरे, काय बोलतोस असं ? तू उपचार करून घे. दारूचं व्यसन आजकाल उपचारांनी नाहीसं करतात म्हणे, ऐकलंस ? बंधो, हे उपचार फुकट करतात.

त्यांनी असं एक उपचार-केंद्र उघडलंय आणि तिथं अगदी मोफत उपचार करतात. कारण दारुडेसुद्धा माणसंच आहेत असं त्यांना वाटतं. आणि दारुड्याला जेव्हा स्वतःवर उपचार करून व्यसन सोडावंसं वाटतं, तेव्हा त्यांना आनंद होतो. तेव्हा तू तिथं जा आणि बरा हो!

नट (विचारमग्न होत): कुठं? कुठं आहे ते?

लूका: ते... एका शहरात... कोणतं बरं? काही-तरी विचित्र नांव आहे. ठीक आहे, मी सांगीन तुला त्या शहराचं नांव. पण तोवर तू तयारी कर. मन खंबीर कर... स्वतःला सावर... कळ सोस. मग उपचार घेऊन बरा हो आणि पुन्हा नव्यानं आयुष्य सुरू कर. बंधू, नव्यानं जगणं किती छान आहे. मनाचा निश्चय कर – एकदाच आणि कायमचा!

नट (स्मित करत): नव्यानं... परत सुरवात... खरंच, फार छान!.. नव्यानं? (हसतो.) हं... मला जमेल? खरंच मला जमेल?

लूका: का नाही? माणसाची इच्छा असली म्हणजे त्याला सगळं जमतं!

नट (अचानक, झोपेतून जागा झाल्याप्रमाणे): तू – भलताच थोर आहेस! तात्पुरता तुझा निरोप घेतो. (शीळ घालतो.) म्हातारबुवा अच्छा! (जातो.)

आन्ना: आजोबा!

लूका: काय ग, पोरी?

आन्ना: माझ्याशी बोल.

लूका (तिच्यापाशी जातो) : ठीक आहे. आपण ग्प्या मारू या.

क्लेश्च त्यांना पाहतो. मग मुकाटपणे बायकोपाशी जातो, तिला पाहतो आणि जणू काहीतरी सांगण्याची इच्छा असल्याप्रमाणे हातवारे करतो.

काय, बंधू ?

क्लेश्च (हळू आवाजात) : काही नाही... (सावकाशपणे चालत बाहेरच्या दारापाशी जातो, काही सेकंदपर्यंत तेथे उभा राहतो आणि निघून जातो.)

लूका (डोळ्यांनी त्याचा मागोवा घेत) : तुझ्या नवऱ्याला फार कठीण जातंय...

आन्ना : आता मी त्याचा विचार करत नाही.

लूका : तुला तो वरचेवर मारहाण करायचा ?

आन्ना : भयंकर ! त्याच्यापायीच माझी ही अवस्था झाली !

बूब्नोव : माझ्या बायकोचा एक यार होता. डांबीस मोंगटचा फार छान खेळायचा.

मेदवेदेव : हूं...

आन्ना : आजोबा ! माझ्याशी बोल... मला कसंतरीच होतंय !

लूका : काही विशेष नाही ! मरणाआधी असं होतं,– पोरी ! काही विशेष नाही बाळे ! असा विचार कर... मरशील आणि तुझं सगळं सुरळीत होईल. कश्शाची म्हणून गरज वाटणार नाही आणि कसलीही भीती उरणार नाही ! शांत, निवांत... झोपून रहा ! मरण

सगळ्यांना शांत करतं! आपल्यासारख्यांशी ते फार प्रेमानं वागतं, मेल्यावर विश्रांती मिळते म्हणतात ते खरं आहे पोरी! कारण ह्या जगात माणसाला कुठं विश्रांती लाभते?

पेपेल येतो. तो किंचित झिंगलेला; विस्कटलेला अवतार आणि विषण्ण मुद्रा. दाराजवळच्या फळीवर गप्प आणि हालचाल न करता बसून राहतो.

आन्ना: तिथंसुद्धा यातना भोगाव्या लागतील?

लूका: काहीही भोगावं लागणार नाही. काही नाही! तू विश्वास ठेव! शांतता – दुसरं काही नाही! तुला देवासमोर बोलावून नेतील आणि सांगतील: देवा, पहा, तुझी दासी आन्ना आलीय!

मेदवेदेव (कडक आवाजात): तिथं काय सांगतील हे इथं तुला कसं माहीत? वा रे तू!

मेदवेदेवचा आवाज ऐकताच पेपेल मान वर करतो आणि ऐकू लागतो.

लूका: ज्याअर्थी मी बोलतोय, त्याअर्थी मला माहीत आहे श्रीमान जमादार...

मेदवेदेव: (समजूत पटून): हं... तुझा मामला आहे... पण मी अजून पूर्ण जमादार नाही.

बूब्नोव: दोन मारले!

मेदवेदेव: अरे सैताना!

लूका: देव तुझ्याकडं प्रेमानं आणि मायेनं पाहून म्हणेल: ठाऊक आहे मला ही आन्ना! म्हणेल, ह्या आन्नाला स्वर्गात न्या! तिथं तिला शांतपणा

मिळेल. मला माहीत आहे – फार कष्टाचं आयुष्य जगलीय ती ... फार दमलीय ... आन्नाला निवांतपणा द्या !

आन्ना (धाप टाकत) : आजोबा ... तसं झालं तर बरं होईल ! शांत ... निवांत ... कसली दमणूक नको ! ..

लूका : नाही दमावं लागणार ! काही करावं लागणार नाही ! तू विश्वास ठेव ! आनंदानं मरणाला कवटाळ ... कोणतीही भीती न बाळगता ! मी तुला सांगतो – आपल्यासारख्यांना मरण म्हणजे लहान बाळांना जशी आई !

आन्ना : कदाचित ... कदाचित ... मी बरी होईन ?

लूका (हसून) : कशाला ? परत यातना सोसायला ?

आन्ना : पण ... आणखी थोडं ... आणखी थोडंसंच जगायला मिळालं तर ! जर तिथं यातना नसतील ... तर इथं मी आणखी थोडं सोसू शकेन !

लूका : तिथं काहीही होणार नाही ! .. फक्त ...

पेपेल (उठत) : खरं आहे ... कदाचित – खरं नाही !

आन्ना (घाबरून) : देवा ...

लूका : अरेच्चा, मदनमहाराज ...

मेदवेदेव : कोण ओरडतंय ?

पेपेल (त्याच्यापाशी जात) : मी ! काय म्हणणं आहे ?

मेदवेदेव : म्हणणार काय ? निष्कारण ओरडतोस माणसानं शांतपणं वागावं.

पेपेल : ए, मठ्ठ्या ! त्यांचा काका म्हणे ! ह्यॅ-ह्यॅ !

लूका (पेपेलला, हळू आवाजात) : ऐक – ओरडू नको! इथं बाई मरत्येय ... एव्हाना तिचे ओठ मातकट दिसायला लागलेत ... शांत रहा.

पेपेल : आजोबा, तुझा मी मान राखतो! शाब्बास बंधू तुझी! छान खोटं बोलतोस ... कानाला गोड लागतील अशा परीकथा सांगतोस! बोल खोटं खुशाल! कारण ह्या जगात कानाला गोड लागेल असं फार कमी ऐकायला मिळतं, बंधो!

बूब्नोव : खरंच बाई मरतेय?

लूका : अशा बाबतीत थट्टा करत नाहीत.

बूब्नोव : म्हणजे खोकायची थांबेल! फार भयानक खोकायची! दोन मारले! ..

मेदवेदेव : सैतान तुझा नायनाट करो!

पेपेल : आब्राम!

मेदवेदेव : मला पहिल्या नांवानं हाक मारायचा तुला अधिकार नाही.

पेपेल : आब्राश्का! नताशा – आजारी आहे?

मेदवेदेव : तुला काय करायच्यात चौकशा?

पेपेल : नाही, तू सांग – वासिलिसानं तिला खूप झोडपलं?

मेदवेदेव : तुझा ह्यात काही संबंध नाही! त्या घरगुती गोष्टी आहेत ... तू कोण मधे लुडबूडणारा?

पेपेल : मी कुणीही असो, पण मनात आणलं तर तुम्हाला इतःपर नताशाचं नखसुद्धा नजरेला पडणार नाही.

मेदवेदेव (खेळ सोडून) : तू – काय बोलतोस?

कुणाबद्दल बोलतोस तू? माझी पुतणी आहे ती... चोर साला!

पेपेल: असेन मी चोर, पण तू पकडलं नाहीस मला!

मेदवेदेव: जरा थांब! तुला पकडीन... लौकरच!

पेपेल: पकडलंस तर तुमच्या ह्या सगळ्या घरट्या-वर आकाश कोसळेल! कोर्टात मी गप्प राहीन असं वाटतं? लांडगा नक्कीच सुळे बाहेर काढील! मला विचारतील: कुणी तुला चोरी करायला शिकवलं आणि कुठं? मीष्का कोस्तील्योव आणि त्याची बायको! चोरीचा माल कुणी घेतला? मीष्का कोस्तील्योव आणि त्याच्या बायकोनं!

मेदवेदेव: तू खोटारडा आहेस. कुणीही विश्वास ठेवणार नाही तुझ्यावर!

पेपेल: विश्वास ठेवतील – कारण ते खरं आहे! शिवाय तुलाही गोवतो त्यात! ही:, ही:! तुम्हा सगळ्यांचा सत्यानाश करतो! बघशीलच!

मेदवेदेव (तोल सुटून): खोटं बोलतोस! थापा मारतोस! काय मी तुझं वाईट केलंय? पिसाळलेला कुत्रा आहेस तू!

पेपेल: पण काय तू माझं चांगलं केलं आहेस?

लूका: अस्सं..!

मेदवेदेव (लूकाला): तू का उगाच काव-काव करतोस? तुझा इथं काय संबंध? ही खाजगी, घरची बाब आहे!

बूब्नोव (लूकाला): तू बाजूला रहा! इथं तुझा-

माझा काही संबंध नाही.

लूका (नम्रपणे): पण मी काय केलं? मी फक्त एवढंच म्हणतो की, कुणी कुणाचं जर भलं केलं नाही, तर याचाच अर्थ त्यानं वाईट केलं!

मेदवेदेव (न उमजून): हे बघ! इथं आम्ही सगळे एकमेकांना जाणतो — पण तू कोण? (रागाने फुर्रर्र आवाज करून झपाट्याने निघून जातो.)

लूका: चिडला शिलेदार! मंडळी, तुम्हा लोकांचे पाय एकमेकात अडकलेत असं दिसतंय मला!

पेपेल: वासिलिसापाशी तक्रार करायला धावला!

बूब्नोव: मूर्ख आहेस तू वासिली. फुका धिटाईचा आव आणतोस! सांभाळ — आळंब्या गोळा करायला रानात जातोस तेव्हा शौर्याचा आव आणणं ठीक! पण इथं त्याचा काही उपयोग नाही. तुझी मुंडी झट-क्यात मुरगाळून टाकतील ती माणसं!

पेपेल: शक्य नाही! आम्हा यारोस्लावच्या लोकांना असं सहजासहजी धरणं सोपं नाही! त्यांना लढायचंच असेल — तर होऊन जाऊं देत दोन हात!

लूका: पण खरं सांगायचं तर तरुण माणसा, तू इथून निघून जाणं तुझ्या भल्याचं होईल.

पेपेल: कुठं जाऊ? सांग ...

लूका: जा — सैबेरियात!

पेपेल: वाहव्वा! पण मला सरकारी खर्चानं सैबेरियात पाठवतील, तेव्हाच जाईन! एरवी नाही.

लूका: माझं ऐक — जा तिकडं! तिथं तुला स्वतःची वाट गवसेल! तुझ्यासारख्यांची तिथं गरज आहे.

पेपेल : माझी वाट आधीच तयार आहे. माझा बाप सगळं आयुष्य तुरुंगात बसला आणि माझ्या-साठीही त्यानं तिथंच जागा राखून ठेवलीय. मी अगदी लहान होतो तेव्हापासून मला चोर, चोराचा पोर ह्याच नांवांनी ओळखतात.

लूका : सैबेरिया फार छान आहे! सोन्याची जमीन! ज्याच्यापाशी बळ आणि अक्कल आहे, त्याला तिथं अगदी उबदार वाफ्यातल्या हिरव्या काकडीसारखं वाटेल!

पेपेल : म्हाताऱ्या! कशाला तू थापा मारतोस?

लूका : आं?

पेपेल : बहिरा! मी म्हणतो कशाला थापा मारतोस?

लूका : मी काय थापा मारल्या?

पेपेल : सगळ्या बाबतीत! तिथं तुझ्या दृष्टीनं चांगलं... इथं चांगलं... निव्वळ बाता! कशासाठी?

लूका : तू माझ्यावर विश्वास ठेव! खुद्द जाऊन पहा! उपकार मानशील! इथं कशाला घुटमळतोस? आणि कशाला तुला सत्य जाणून घ्यायची तळमळ लागलीय? जरा विचार कर – सत्य कदाचित तुझ्या मानेवर कुऱ्हाडीसारखा घाव घालील.

पेपेल : मला सगळं सारखंच! कुऱ्हाड तर कुऱ्हाड...

लूका : येडपट आहेस! कशाला स्वतःच्या हातांनी स्वतःचा जीव घ्यायचा?

बूब्नोव : कशाबद्दल तुम्ही दोघं वाद घालताय? वास्का, मला समजत नाही – कसलं सत्य तुला पाहिजे? आणि कशाला? न सांगता तुला ठाऊक आहे. आणि प्रत्येकाला माहीत आहे.

पेपेल : तुझी काव-काव थांबव ! सांगू दे त्याला – ऐक म्हाताऱ्या, देव आहे ?

लूका स्मित करून गप्प राहतो.

बूब्नोव : नदीच्या पाण्यातून वाहात जाणाऱ्या लाकडी ढलप्यांप्रमाणं माणसं जगतात. आणि घरं बांधली, म्हणजे ढलपे गायब !

पेपेल : काय ? आहे ? बोल ...

लूका (हळूच) : जर विश्वास ठेवत असशील – तर आहे. विश्वास नसेल तर नाही ! ज्यावर विश्वास आहे, ते आहे ...

स्तंभित होऊन पेपेल काही न बोलता म्हाताऱ्याकडे टक लावून पहात राहतो.

बूब्नोव : जाऊन चहा पितो बुवा ! गुत्त्यात येणार का ?

लूका : (पेपेलला) : बघतोस काय असा !

पेपेल : अस्सं ! थांब ... म्हणजे ...

बूब्नोव : ठीक आहे. तर मी एकटाच जातो. (दारापाशी जातो आणि तिथे त्याची वासिलिसाशी भेट होते.)

पेपेल : दुसऱ्या शब्दात, तू ...

वासिलिसा (बूब्नोवला) : नास्त्या घरात आहे ?

बूब्नोव : नाही. (जातो.)

पेपेल : अच्छा ... आलीस !

वासिलिसा (आन्नापाशी जात) : अजून जिवंत आहे ?

लूका : तिला जागं करू नको.

वासिलिसा : तू इथं का घुटमळतोस?

लूका : हवं तर मी इथून जातो.

वासिलिसा (पेपेलच्या खोलीच्या दाराकडे जात) : वासिली, माझं तुझ्याकडं एक काम आहे.

लूका बाहेरच्या दाराकडे जातो, दार उघडतो व धाडकन बंद करतो. मग हळूच एका फळीवरून चुलाण्यावर चढतो.

वासिलिसा : (पेपेलच्या खोलीतून) : वास्या, इकडं ये!

पेपेल : नाही येणार. माझी इच्छा नाही.

वासिलिसा : काय झालं? कशाबद्दल असा आंबट झालायस?

पेपेल : मला वैताग आलाय. ह्या सगळ्या उद्योगाचा पुरता वीट आलाय.

वासिलिसा : माझासुद्धा वीट आलाय?

पेपेल : होय, तुझासुद्धा!

वासिलिसा खांद्यावरील शाल घट्ट आवळते आणि छातीवर हातांची घडी घालते. ती आन्नाच्या बिछान्यापाशी जाते, पडद्यांआड डोकावते आणि पेपेलकडे येते.

पेपेल : काय? बोल...

वासिलिसा : काय बोलणार? जबरीनं प्रेम करायला लावणं शक्य नाही... आणि प्रेमाची भीक मागणं माझ्या स्वभावात नाही. खरं बोललास म्हणून तुझे आभारच मानत्ये मी!

पेपेल : काय खरं बोललो ?

वासिलिसा : माझा तुला वीट आला हे ! किंवा हे खरं नाही ?

पेपेल मुकाटपणे तिला पाहतो.

(ती त्याच्या जवळ जाते.) काय बघतेस ? ओळखत नाहीस ?

पेपेल (सुस्कारत) : फार देखणी आहेस तू, वासिलिसा !

ती त्याच्या खांद्यावर हात ठेवते, पण तो खांद्याला झटका देऊन हात बाजूला करतो.

...पण तू कधीही माझं काळीज जिंकलं नाहीस. तुझ्याबरोबर मी जगलो, आणखी बरंच काही केलं, पण मला तू कधीही आवडली नाहीस.

वासिलिसा (हळूच) : अस्सं ... ! मग ?

पेपेल : मग ? बोलण्यासारखं आपल्यापाशी काही नाही ! अजिबात नाही ! दूर जा माझ्यापासून.

वासिलिसा : दुसरी कुणी मनात भरलीय ?

पेपेल : तुला काय करायचंय ? आणि कुणी मनात भरली असली, तरी तिच्या प्राप्तीसाठी मदतीला तुला बोलावणार नाही !

वासिलिसा (सूचकपणे) : चूक करतोस. कदाचित मी तुला मदत करीन – तिला मिळवून द्यायला !

पेपेल (संशयाने) : तिला ? म्हणजे कुणाला ?

वासिलिसा : तुला माहीत आहे. उगीच ढोंग कशाला ? वासिली, मी सरळ वागणारी बाई आहे.

(हळू आवाजात.) लपवत नाही – तू माझा अपमान केलास. चाबूक सपकन मारावा तसा! अगदी निष्कारण. म्हणायचास की, माझ्यावर प्रेम करतोस आणि अचानक...

पेपेल : अचानक नव्हे. खूप काळापासून ही अवस्था आहे. बाई, तुला काळीज नाही. बाईला अंत:करण असलं पाहिजे. आम्ही पुरुष पशू असतो. आम्हाला माणसाळणं आणि शिकवणं हे तुमचं काम आहे. पण तू काय मला शिकवलंस?

वासिलिसा : झालं ते झालं! माणूस स्वत:शीसुद्धा मुक्त नसतो हे मला ठाऊक आहे. इत:पर तुझं माझ्यावर प्रेम नसेल... तर ठीक आहे! जे आहे ते आहे!

पेपेल : म्हणजे... सगळं खलास! भांडण न करता शांततेनं वेगळे झालो? छान!

वासिलिसा : नाही, थांब! काही झालं तरी एकेकाळी मी तुझ्याबरोबर राहिले होत्ये... ह्या डोहातून वर निघायला कधीतरी तू मला मदत करशील अशी अपेक्षा बाळगून मी वाट पहात होत्ये. माझ्या नवऱ्याच्या, माझ्या काकाच्या तावडीतून मला मुक्त करशील असं वाटलं होतं. ह्या सगळ्या आयुष्यातून सोडवशील अशी आशा होती. कदाचित वास्या, मी तुझ्यावर प्रेम केलं नसेल, पण माझ्या ह्या आशेनं, माझ्या मनातल्या ह्या कल्पनेनं तुझ्यावर प्रेम केलं. समजलं? तू मला खेचून वर काढशील म्हणून मी वाट पाहिली.

पेपेल : तू खिळा नाहीस आणि मी पकड नाही! मीसुद्धा विचार केला होता की, तुझ्यासारख्या चलाख

16-178

बाईनं – तू नक्कीच चलाख आहेस, पण ... धूर्त आहेस!

वासिलिसा (त्याच्या दिशेने झेपावत): वास्या! चल, आपण एकमेकांना मदत करू!

पेपेल: कशी?

वासिलिसा (प्रयत्नपूर्वक, हळू आवाजात): बहीण माझी... तुला आवडते, हे ठाऊक आहे मला.

पेपेल: म्हणून तर तू तिला गुराप्रमाणं बडवून काढत्येस! याद राख, वासिलिसा! तिला तू धक्का लावू नको!

वासिलिसा: थांब! असा भडकू नकोस! सगळं शांतपणं, गोडीगुलाबीनं करता येईल. तिच्याशी लग्न करायची तुझी इच्छा आहे? शिवाय मी तुला पैसे देईन... तीनशे रूबल! मला आणखी मिळाले, तर तुला आणखी देईन!

पेपेल (तिच्यापासून दूर जात): जरा थांब! हे कसं काय? कशाच्या बदली?

वासिलिसा: मला मोकळं कर – माझ्या नवऱ्याच्या तावडीतून! माझ्या मानेभोवतालचा हा फास सोडव!

पेपेल (हळूच शीळ घालत): अशी भानगड आहे तर! वाहव्वा! धूर्त विचार केलास तू! म्हणजे नवऱ्याला थडग्यात, याराला तुरुंगात आणि तू स्वतः...

वासिलिसा: वास्या! कशाला तुरुंगात? तू स्वतः करू नकोस काहीही! तुझ्या मित्रांकरवी पार पाड! आणि जरी तू स्वतः केलंस, तरी कुणाला माहीत होणार? नताल्या – विचार कर! पैसे मिळतील. कुठं-तरी निघून जा. मला कायमची मुक्त करशील.

आणि बहीण माझ्यापाशी राहणार नाही – तिच्या दृष्टीनं हे चांगलंच होईल. तिला सतत समोर बघणं मला अवघड जातं. पोरीचा मी छळ करत्ये, तिला मारहाण करत्ये... एवढी मारत्ये की, नंतर तिची दया येऊन मीच रडायला लागत्ये तरीही – झोडपत्ये! आणि झोडपणार!

पेपेल : पशू आहेस! स्वतःच्या पाशवी वागण्याचा वर टेंभा मिरवतेस?

वासिलिसा : टेंभा नाही मिरवत. खरं ते बोलत्येय. विचार कर वास्या... माझ्या नवऱ्याखातर तुला दोनदा तुरुंगात बसावं लागलं... त्याच्या लोभीपणापायी! एखाद्या ढेकणाप्रमाणं माझं तो रक्त शोषून घेतोय. चार वर्षं शोषतोय! कसला तो नवरा? नताशाला पिळून काढतो, तिला सारखा टोचून बोलतो, भिकारीण म्हणून हिणवतो. सगळ्यांच्या दृष्टीनं तो वीष आहे!

पेपेल : फार कावेबाज बोलत्येस!

वासिलिसा : माझ्या बोलण्यातून सगळं स्पष्ट आहे. मला काय पाहिजे ते फक्त मूर्खाला समजणार नाही!

कोस्तील्योव सावधपणे प्रवेश करतो आणि चोरून पुढे येतो.

पेपेल (वासिलिसाला) : चालती हो!

वासिलिसा : विचार कर! (नवऱ्याला पाहते.) तू – काय? माझ्यासाठी आलास?

पेपेल दचकतो आणि डोळे वटारून कोस्तील्योवकडे पाहतो.

कोस्तील्योव : मी ... मी आहे. तुम्ही इथं ... एकटेच? अं ... तुमचं काही बोलणं चाललं होतं? (अचानक पाय आपटतो व ओरडतो.) वासिलिसा ... भिकारणी ... हलकट ... नीच! (स्वतःच्या ओरडण्याच्या आवाजाने आणि थंड मौनाच्या प्रतिक्रियेने घाबरतो.) देवा, मला क्षमा कर. वासिलिसा, परत तू मला पापाला प्रवृत्त करते आहेस! मी तुला सगळीकडं शोधतोय ... (परत आवाज चढवून.) झोपायची वेळ झाली! देवासमोरच्या दिव्यात तेल ओतायला विसरलीस टवळे! भिकारीण डुकरीण ... (थरथरत्या बोटाने तिला धमकावतो.)

वासिलिसा पेपेलवर नजर स्थिर ठेवून सावकाशपणे बाहेरच्या दाराकडे जाते.

पेपेल : (कोस्तील्योवला) : तू चालता हो इथून!

कोस्तील्योव (किंचाळतो) : मी मालक आहे इथला! तूच चालता हो! चोर ...

पेपेल (ताणल्या आवाजात) : चालता हो मीष्का ...

कोस्तील्योव : खबरदार! मी तुला ...

पेपेल त्याची कॉलर पकडून त्याला गदगदा हलवतो. अचानक चुलाण्यावर कुणाचीतरी हालचाल होते आणि प्रदीर्घ जांभईचा मोठा आवाज होतो. पेपेल कोस्तील्योवला सोडतो. कोस्तील्योव ओरडत बाहेर पळतो.

पेपेल (चुलाण्याजवळच्या फळीवर उडी मारत) : कोण आहे तिथं? चुलाण्यावर कोण आहे?

लूका (डोके वर उचलून) : आं?

पेपेल: तू?!

लूका (शांतपणे) : मीच... खुद्द... देवा रे, येसू ख्रिस्ता!..

पेपेल (बाहेरचे दार बंद करतो आणि त्याचा कोलदांडा शोधण्याचा व्यर्थ प्रयत्न करत) : च्यायला... म्हाताऱ्या, खाली उतर!

लूका: आत्ता... उ-त-रतो!

पेपेल (खेकसत) : तू चुलाण्यावर कशाला चढलास?

लूका: मग कुठं चढायला पाहिजे होतं?

पेपेल: पण... तू तर बाहेर गेला होतास ना?

लूका: बंधू, बाहेर मला म्हाताऱ्याला फार थंडी वाजते.

पेपेल: तू... सगळं ऐकलंस?

लूका: आं... ऐकलं! कसं नाही ऐकणार? मी काय बहिरा आहे? अरे तरुण माणसा, भाग्य तुझ्याकडं चालून येतंय... तुझं नशीब फळफळतंय!

पेपेल (संशयाने) : कसलं भाग्य? कशात ते?

लूका: मी चुलाण्यावर चढून बसलो हेच!

पेपेल: कशाला तू आवाज केलास?

लूका: कारण मला उकडायला लागलं! त्याबद्दल तू माझे आभार मानले पाहिजेस. मला वाटलं — पोराचा तोल सुटेल आणि त्या म्हाताऱ्याचा गळा दाबून तो जीव घेईल.

पेपेल: होय, असं माझ्याकडून घडलं असतं खरं! नजरेसमोर सहन होत नाही तो मला!

लूका : काय शहाणपण त्यात ? काही अवघड नाही... अनेकदा अशीच चूक होते.

पेपेल (स्मित करत) : तुझ्या हातून अशी चूक कधी झाली होती वाटतं ?

लूका : पोरा, मी तुला काय सांगतो ते ऐक - ह्या बाईपासून दूर रहा ! तिला हुसकून लाव ! अंगाला तिचा वारासुद्धा लागू देऊ नको. तुझ्या मदतीशिवाय ती आपल्या नवऱ्याचा काटा काढील आणि तुझ्यापेक्षा जास्त हुशारीनं ते काम पार पाडील. त्या कैदाशिणीचं तू ऐकू नको. पहा माझ्याकडं - काय माझा अवतार ? टकल्या ! कशामुळं ? अशाच वेगवेगळ्या बायांपायी ! माझ्या डोक्यावरच्या केसांपेक्षा जास्त बाया मी जाण-ल्यात. पण ही वासिलिसा महाभयानक राक्षशीण आहे.

पेपेल : तुझे आभार मानावेत किंवा न मानावेत हेच मला समजत नाही.

लूका : तू काही बोलू नको ! माझ्यापेक्षा उत्तम तुला सांगता येणार नाही. तू ऐक - तुला जी कुणी आवडते आहे तिला बगलेत मार आणि एकदम चालायला लाग इथून ! चालता हो ! निघून जा !

पेपेल (उदासपणे) : लोकांना समजून घेणं कठीण झालंय ! भले कोण आणि वाईट कोण ? काही समजत नाही.

लूका : न समजण्यासारखं काय आहे त्यात ? माणूस नेहमीच सारखा नसतो. त्याच्या काळजाचा सूर कसा लागलाय त्यावर सगळं अवलंबून असतं. आज तो भला असतो, तर उद्या वाईट. पण ती पोरगी जर

खरंच तुझ्या काळजात भरली असेल, तर तिला संगत घेऊन ताबडतोब इथून निघून जा... कायमचा! नाही तर एकटा निघून जा. तुझं वय अजून तरुण आहे. बाईल मिळवायला पुढं रग्गड वेळ आहे.

पेपेल (त्याचा खांदा धरून): नाही, तू सांग – कशाला तू हे सगळं सांगतो आहेस?

लूका: थांब – अरे सोड मला! त्या आन्नाला पाहतो. ती कण्हल्यासारखं वाटलं. (आन्नाच्या बिछान्यापाशी जातो, पडदे बाजूला करून आत डोकावतो आणि तिला स्पर्श करतो.)

पेपेल त्याच्याकडे विचारमग्न, गोंधळलेल्या मुद्रेने पहात राहतो.

येशू ख्रिस्ता, दया कर प्रभो! तुझी दासी आन्ना हिचा आत्मा प्रेमानं स्वीकार!

पेपेल (दबत्या आवाजात): मेली? (अधिक व्यवस्थित पहावे म्हणून तो पुढे होतो, पण पलंगापर्यंत जात नाही.)

लूका (हळूच): यातनेतून सुटली बिचारी! तिचा नवरा कुठाय?

पेपेल: बहुतेक... गुत्त्यात!

लूका: त्याला सांगितलं पाहिजे.

पेपेल (शहारत): प्रेतं मला आवडत नाहीत.

लूका (दाराकडे जात): कशाबद्दल आवडावीत ती? आवडावीत जिवंत माणसं! जिवंत!!

पेपेल: मी तुझ्याबरोबर येतो.

लूका : भिती वाटते ?

पेपेल : आवडत नाही ...

घाईघाईने जातात. रंगमंच रिकामा आणि शांत. बाहेरच्या दाराकडून कसलेतरी मंद, न समजणारे आवाज येतात. शेवटी नट प्रवेश करतो.

नट (दार बंद करत नाही, उलट दारकसाला टेकून उंबरठ्यावर उभा राहतो आणि मोठ्यांदा हाक मारतो) : म्हातारबुवा ! कुठं आहेस तू ? मला आठवल्या त्या ओळी ... ऐक ! (हेलपाटतो, दोन पावले पुढे टाकून पवित्रा घेतो आणि बोलू लागतो.)

सभ्य गृहस्थहो ! पवित्र सत्याकडे जाणारी
जर एकही वाट गवसत नसेल,
तर माणसांना झेपावणारी स्वप्ने देणाऱ्या
वेड्या मनांचे कल्याण असो !

नटापाठी नताशा दरवाजात येते.

नट : म्हातारबुवा !

उद्या जर सूर्यानं आपल्या किरणांनी
जगाला प्रकाश द्यायचं थांबवलं
तर उद्या एखाद्या वेड्याचं स्वप्न
साऱ्या जगाला उजळून काढेल.

नताशा (हसते) : बुजगावणं ! .. झिंगलाय ...

नट (तिच्याकडे वळून) : अच्छा, तू आहेस होय ? तो म्हातारा कुठं आहे ? आजोबा कुठं आहे ? इथं

पाहता कुणीच दिसत नाही. नताशा, अच्छा! चलतो नताशा!

नताशा : (प्रवेश करत) : भेटीदाखल दोन शब्दसुद्धा बोलला नाहीस आणि म्हणे – "आच्चा! च्यलतो!"

नट (तिची वाट अडवून) : मी निघून जातोय... जातो! जेव्हा वसंताचा मोसम येईल, तेव्हा मी नसेन!

नताशा : सोड मला! कुठं चाललास?

नट : शहर शोधायला... तिथं उपचार करतात. तूसुद्धा जा इथून! ऑफेलिया, जोगिणींच्या मठात जा! दारुड्यांना बरं करणारं एक इस्पितळ आहे. अतिशय उत्तम! तिथं संगमरवराची फरशी आहे... संगमरवराची! भरपूर उजेड... स्वच्छता... खाणं – सगळं फुकट! आणि संगमरवरी फरशी! हो! मी ते इस्पितळ शोधून काढतो, बरा होतो आणि नवा बनतो! राजा लीयर म्हणाला तसं : मी पुनर्जन्माच्या वाटेवर आहे. नताशा, रंगभूमीवर माझं नांव स्वेर्चकोव-झावोल्झस्की. कुणालाही हे नांव माहीत नाही! कुणा-लाही! इथं मला नांव नाही. नांव गमवायचं किती दुःख वाटतं? ह्याची कल्पना तुला आहे? कुत्र्यांना सुद्धा नांवं असतात!

नटापासून सुरक्षित अंतर राखून नताशा सावधपणे आन्नाच्या पलंगाकडे जाते व पडद्यातून आत डोकावते.

नांवाशिवाय – माणूस नाही!

नताशा : बघ! बिचारी मेली वाटतं!

नट : (मान हलवून) : शक्य नाही!

नताशा (मागे सरकत) : देवा रे ! बघ ...

बून्नोव (दाराशी) : काय बघायचं ?

नताशा : आन्ना ... मेली !

बून्नोव : म्हणजे खोकायची थांबली ! (आन्नाच्या बिछान्यापाशी येऊन पाहतो व नंतर स्वतःच्या फळीकडे जातो .) क्लेश्चला सांगितलं पाहिजे . ही भानगड त्यालाच निस्तरली पाहिजे !

नट : मी जातो ... सांगतो ... तिनं गमावलं नांव ! (जातो .)

नताशा (खोलीच्या मध्यभागी येऊन) : मीसुद्धा अशीच केव्हातरी ... एखाद्या तळघरात ... कंगाल अवस्थेत !

बून्नोव (स्वतःच्या फळीवर जुनाट कपडे पसरत) : काय ? तू काय बरळते आहेस ?

नताशा : असंच ! स्वतःशी !

बून्नोव : वास्याची वाट पाहत्येस ? सांभाळ ! त्या वास्यापायी स्वतःची मुंडी मुरगळून घेशील !

नताशा : कुणापायी तरी मुरगाळून घ्यायचीच ना ? मग वास्या इतरांपेक्षा हजार पटींनी बरा !

बून्नोव (फळीवर झोपत) : ती तुझी बाब !

नताशा : खरं म्हणजे ती मेली हे चांगलंच झालं ! पण तरीही वाईट वाटतं ! देवा ! कशासाठी माणूस जगतं ?

बून्नोव : सगळ्यांचं एकच ! जन्म घ्यायचा , जगायचं आणि मरायचं ! मी मरणार ... तू मरणार ... वाईट कशाबद्दल वाटून घ्यायचं ?

लूका, तातारीन, कीवोय झोब आणि क्लेश्च प्रवेश करतात. क्लेश्च सर्वांमागून सावकाशपणे, पाठीला पोक काढून येतो.

नताशा : श्शू ! आन्ना ...

कीवोय झोब : समजलं आम्हाला. आता मेली तर तिच्या आत्म्याला शांती मिळो !

तातारीन (क्लेश्चला) : तिला ओढून नेलं पाहिजे. बाहेर ओढून नेलं पाहिजे ! इथं प्रेत ठेवून चालणार नाही. इथं जिवंत माणसं झोपतात.

क्लेश्च (हळू आवाजात) : ओढू ...

सगळे पलंगापाशी जातात. दुसऱ्यांच्या खांद्यांवरून क्लेश्च स्वतःच्या बायकोला पाहतो.

कीवोय झोब (तातारीनला) : तिला वास सुटेल असं वाटतं तुला ? तिला कसलाच वास सुटणार नाही. कारण जिवंतपणीच ती सुकून गेलीय.

नताशा : देवा रे ! काय माणसं तरी ! आता तरी चार चांगले शब्द बोलायचे तिच्याबद्दल कुणीतरी ! छी: !

लूका : पोरी, तू त्यांचं मनावर घेऊ नको. मेले-ल्यांचं कुठं दुःख करत बसणार ते ? आणि आपण तरी ? अग, जिवंत माणसांची करुणा करत नाही ! आपण आपली कीव करून घेऊ शकत नाही ! मग मेलेल्यांचं काय घेऊन बसलीस ?

बूब्नोव (जांभई देत) : शिवाय शब्दांनी तुम्ही

मरणाला घाबरवून परतवू शकत नाही. आजारपण शब्दांना घाबरतं, पण मृत्यू नाही!

तातारीन (दूर जात) : पोलीसला बोलावलं पाहिजे.

क्रीवोय झोब : पोलीसांना आणलंच पाहिजे. क्लेश्च! पोलीसला कळवलंस?

क्लेश्च नाही. ते मला तिचं दफन करायला लावतील. आणि माझ्यापाशी तर अवघे चाळीस कोपेक.

क्रीवोय झोब : तसं असेल तर उसने घे. आपण वर्गणी काढू... कुणी पाच कोपेक, कुणी जेवढे देऊ शकेल तेवढे! पण पोलीसला लौकर कळव! नाही तर त्यांना वाटायचं – बायकोला तू ठार मारलंस, किंवा आणखी काहीतरी... (फळ्यांपाशी जातो आणि तातारीनजवळ निजायच्या बेतात.)

नताशा (बूब्नोवकडे जात) : आता ती माझ्या स्वप्नात येत राहणार. मला नेहमी मेलेली माणसं स्वप्नात दिसतात. एकटीला बाहेर जायला भीती वाटत्ये... तिथं खूप अंधार आहे.

लूका (तिच्या पाठी जात) : तू जिवंत माणसांपासून सांभाळून रहा... माझं ऐक!

नताशा : आजोबा, मला सोबत कर.

लूका : चल, मी तुला सोडतो!

जातात. स्तब्धता.

क्रीवोय झोब : ओहो! आसान! लौकरच वसंताचा मोसम येईल. अखेर आपल्याला ऊब मिळेल! एव्हाना खेड्यात शेतकरी नांगर-फाळ दुरुस्त करायला लागले

असणार. नांगरणीची तयारी करत असणार. आणि आपण? आसान? साला महंमद घोरायला लागला!

बूब्नोव: तातारांना झोपायला आवडतं!

क्लेश्च (खोलीच्या मध्यभागी उभा राहून भकास नजरेने शून्यात पाहतो): आता मी काय करू?

क्रीवोय झोब: जाऊन झोप. बास्स!

क्लेश्च (हळू आवाजात): पण... तिचं काय करायचं?

त्याला कुणीही उत्तर देत नाही. सातीन आणि नट प्रवेश करतात.

नट (ओरडतो): म्हातारबुवा! इकडं ये! माझ्या विश्वासू केंट!

सातीन: मिक्लूखा-मक्लायला वाट करून द्या!

नट: कायमचा निर्णय घेतला! म्हातारबुवा, ते शहर कुठं आहे? तू कुठं आहेस?

सातीन: फाता-मोर्गाना! म्हाताऱ्यानं तुला बंडल मारलं! काहीही नाही! ना शहर, ना माणसं! काहीही नाही!

नट: खोटं!

तातारीन (एकदम उठत): मालक कुठं आहे? मालकाकडं जातो! शांतपणं झोपायला मिळत नाही! मग मी पैसे कशाला द्यायचे? प्रेतं! दारुडे भोवती! (वेगाने जातो.)

सातीन त्याच्या पाठी शीळ घालतो.

बूब्नोव (झोपाळलेल्या आवाजात): मंडळी, झोपा. गोंगाट करू नका. रात्री माणसानं झोपलं पाहिजे.

नट : ओह् ... इथं एक प्रेत पडलंय ! "आमच्या जाळयांमध्ये एक प्रेत गावलंय !" कविता – बेरान्जेर !

सातीन (ओरडतो) : प्रेतांना ऐकू येत नाही ! प्रेतांना काहीही जाणवत नाही ... ओरड ... रड ! मेलेल्यांना ऐकू येत नाही ! ..

दारात लूका अवतीर्ण होतो.

पडदा

अंक तिसरा

परसदार. घाणीने विखुरलेले आणि रानगवत माजलेले. रंगमंचाच्या मागील बाजूस उंच आगसुरक्षित विटांची भिंत. तिच्यामुळे आकाश झाकलेले. तिच्याशेजारी झुडुपे. उजव्या बाजूस काळपट ओंडक्यांची भिंत – बहुधा पडवीची अथवा तबेल्याची. डाव्या बाजूला कोस्तील्योवचे तळघरासकटचे घर ; राखाडी रंग, मोडकळीला आलेले. ते कोनात उभे असल्यामुळे रंगमंचाच्या मागील बाजूस मध्यापर्यंत त्याचा एक कोपरा आलेला आहे व विटांची भिंत आणि घर यांच्या दरम्यान एक अरुंद बोळ. घराला दोन खिडक्या – एक जमिनीलगत, दुसरी सहा फूट उंचावर भिंतीलगत. घराजवळ सुमारे १२ फूट लांबीचा ओंडका पडलेला. त्याच्याशेजारी खिळखिळी

व उलटी झालेली एक लाकडी घसरगाडी. उजव्या बाजूस जुन्या फळकुटांचा आणि तुळयांचा ढीग. मावळतीचा सुमार. विटकरी भिंतीवर संधिप्रकाशाची लाली पसरलेली. वसंताच्या मोसमाचा आरंभकाळ. बर्फ नुकताच वितळलाय आणि झुडुपांच्या काळ्या फांद्यांना अजून कळ्या फुटलेल्या नाहीत. नताशा आणि नास्त्या ओंडक्यावर बसलेल्या आहेत. लूका आणि बारोन घसरगाडीवर. उजव्या बाजूच्या फळकुटांच्या ढिगावर क्लेश्च आडवा पसरलेला. तळघराच्या खिडकीपाशी बूब्नोवचा चेहरा दिसतोय.

नास्त्या (तालबद्ध सुरात गोष्ट सांगताना मान डोलवीत व डोळे मिटून): तर आम्ही आधी ठरवल्याप्रमाणं तो रात्रीच्या वेळी बागेत, ग्रीष्मवाटिकेपाशी येतो. मी एवढा वेळ वाट पहात उभी आहे की, भीतीनं आणि दु:खानं माझं सबंध अंग थरथरतंय. तोसुद्धा थरथर कापतोय आणि पांढराफटक पडलेला. हातात त्यानं पिस्तूल धरलेलं...

नताशा (सूर्यफुलाच्या बिया चघळत): इश्श! कॉलेजची पोरं निकरावर असतात असं म्हणतात ते खरं तर?

नास्त्या: आणि तो मला घाबऱ्या आवाजात म्हणतो: "माझ्या मौल्यवान प्रेमा..."

बूब्नोव: ह्यॅ, ह्यॅ! मौल्यवान?

बारोन: थांब! तुला आवडत नसलं तर ऐकू नको. पण तिच्या थापांमध्ये अडथळा आणू नको... पुढे!

नास्त्या : " लाडके, माझ्या प्रेमा – मला तो म्हणतो! मी तुझ्याशी लग्न करायला माझे आई-बाप संमती देत नाहीत! तुझ्यावर मी प्रेम करतो म्हणून जन्मांतरी-चा शाप घालायची धमकी देताहेत! म्हणून मी माझ्या जीवनाचा शेवट केला पाहिजे – असं म्हणतो!" त्याच्या हातातलं पिस्तूल हे भलं मोठ्ठं आणि दहा काडतूसं त्यात ठासलेली. " निरोप दे – म्हणतो – माझ्या हृदया-च्या लाडक्या सखे! मी कायमचा निर्णय घेतलाय – तुझ्याविना जगणं मला अशक्य आहे!" मी त्याला उत्तर दिलं – " माझ्या अविस्मरणीय मित्रा, राऊल!.."

बूब्नोव (चकित होऊन) : का-य ? कोण ? क्राऊल ?

बारोन (हसतो) : नास्त्या! पण मागच्या वेळी ... गास्तोन होता!

नास्त्या (ताडकन उठत) : चूप बसा! दळभद्री मेले! भटके कुत्रे!.. तुम्हाला प्रेम म्हणजे ... प्रेम काय ते समजतं? पण माझ्या आयुष्यात अस्सल प्रेम मी अनुभवलंय! (बारोनला.) ए, तू कवडीमोलाचा! म्हणे शिकलेला माणूस ... बिछान्यात झोपून कॉफी प्यायचा ...

लूका : जरा थांबा! तुम्ही मधे अडवू नका! माणसाचा आदर राखा. शब्द महत्त्वाचे नाहीत – त्यांच्यामागचा भाव महत्त्वाचा आहे. सांग पोरी, त्यांच्याकडं लक्ष देऊ नको!

बूब्नोव : कावळे, रंगव तुझी पिसं! मार थापा!

बारोन : बरं ... पुढे!

नताशा : त्यांचं ऐकू नको – कोण ते ? त्यांना तुझा हेवा वाटतो, कारण स्वतःबद्दल असं काही सांगायला त्यांच्यापाशी काहीच नाही.

नास्त्या (परत खाली बसते) : पुढं सांगायची माझी इच्छा नाही ! त्यांचा विश्वास बसत नाही... चेष्टेनं हसतात ! (एकदम बोलणे तोडून काही सेकंद गप्प राहते. मग डोळे मिटून भावनावेगाने मोठ्या आवाजात बोलू लागते आणि जणू दूरचे संगीत ऐकावे अशा रीतीने हातांचा ताल धरते.) तर मी त्याला उत्तर देत्ये : "माझ्या जीवनाच्या आनंदा ! माझ्या तेजस्वी चंद्रकोरा ! मलासुद्धा तुझ्याविना ह्या जगात राहणं शक्य नाही ! मी वेड्यासारखी तुझ्यावर प्रेम करत्ये आणि जोवर माझं काळीज धडधडत राहील, तोवर तुझ्यावरच प्रेम करत राहीन ! पण स्वतःचा तरणा जीव गमावू नको. तुझ्या लाडक्या आई-बापांना तुझी खूप गरज आहे. त्यांचा आयुष्याचा तू एकमेव आनंद आहेस ! माझा त्याग कर ! खुशाल माझं आयुष्य तुझ्यासाठी झुरण्यात संपू दे ! मी एकटी – मी तसली ! माझ्या नाशाकडं मला जाऊं दे ! काही फरक पडत नाही. माझी कवडी किंमत नाही. माझ्यासाठी काहीही उरलेलं नाही... काही नाही" (हातांनी तोंड झाकते व आवाज न करता रडते.)

नताशा (बाजूला वळून अस्फुट आवाजात) : रडू नको !

लूका स्मित करतो व नास्त्याच्या डोक्यावरून हात फिरवतो.

17–178

बूब्नोव (खो खो हसत) : हात्! सैतानी बाहुली कुठली!

बारोन (हसत) : आजोबा, हे खरं असं वाटतं तुला? हे सगळं त्या पुस्तकातलं – 'घातकी प्रेम.' सगळा हा फालतूपणा! टाकून दे!

नताशा : तुझं काय जातं? तू गप्प रहा! देवानं आधीच तुला खुंटी मारून ठेवलीय!

नास्त्या (संतापून) : अरे हरवलेल्या आत्म्या! पोकळ माणसा! तुला अंतःकरण आहे का?

लूका (नास्त्याचा हात धरून) : चल पोरी! कशाचाही राग धरू नको! मला माहीत आहे – माझा विश्वास आहे! तुझंच खरं आहे, त्यांचं नाही! तू अस्सल प्रेम अनुभवलंस असा निदान तुझा विश्वास आहे – तर खरंच तसं होतं! खरंच! पण त्याच्यावर – ज्याच्याबरोबर तू राहतेस – त्याच्यावर रागवू नको! कदाचित मत्सरापायी तो हसतो. कदाचित अस्सल प्रेम त्यानं कधी अनुभवलंच नसेल! कदाचित त्याला कधीच काही माहीत नसेल! चल बघू!

नास्त्या (छातीवर हात घट्ट आवळून) : आजोबा, देवाशपथ, तसं घडलं! खरंच घडलं! सगळं घडलं! तो तरुण विद्यार्थी... फ्रेंच होता! गास्तोन त्याचं नांव. काळी दाढी राखली होती त्यानं. चकचकीत बूट वापरायचा. हे खरं नसेल तर इथल्या इथं मला ठार मार! माझ्यावर त्यानं फार फार प्रेम केलं! खूप ...!

लूका : मला माहीत आहे. माझा विश्वास आहे.

चकचकीत बुटांमध्ये म्हणत्येस? अहाहा! आणि तूसुद्धा त्याच्यावर प्रेम केलंस?

कोपऱ्यात अदृश्य होतात.

बारोन: काय वेडपट पोरगी आहे ही! मनाची प्रेमळ. पण मूर्ख! एवढं मूर्ख कुणीही नसेल!

बूब्नोव: माणसाला एवढं खोटं बोलायला का आवडतं? आणि कोर्टात शपथ घेऊन सांगावं तसं नेहमी शपथा घेऊन सांगायचं!

नताशा: खरं बोलण्यापेक्षा खोटं बोलणं जास्त छान वाटतं. मीसुद्धा...

बारोन: काय – तूसुद्धा? पुढे?!

नताशा: सारखी मनाशी वेगवेगळ्या कल्पना करत राहते आणि मग वाट पाहते...

बारोन: कशाची?

नताशा (अवघडून स्मित करत): असंच... उद्या कुणीतरी येईल... खास असा! किंवा काहीतरी घडेल... अघटित असं! खूप काळ वाट पाहत्येय... नेहमी वाट पाहत्ये... पण प्रत्यक्षात कशाची वाट पहायचीय?

स्तब्धता.

बारोन (वाकडे स्मित करत): वाट पाहण्यासारखं काहीही नाही. मी कशाचीही वाट पहात नाही. सगळं एव्हाना होऊन गेलंय. संपलं! खलास झालं! पुढे?

नताशा: किंवा मनाशी कल्पना करत्ये की, उद्या

अचानक मला मरण येईल! मग पोटात खड्डा पडतो. उन्हाळ्यात मरणाची कल्पना करणं छान, कारण उन्हाळ्यात गाजता पाऊस पडतो... वीज कोसळून मरण येणं सहज शक्य असतं!

बारोन: तुझं आयुष्य वाईट आहे आणि तुझ्या बहिणीचा स्वभाव सैतानी आहे.

नताशा: कुणाचं आयुष्य चांगलं आहे? सगळ्यांचंच वाईट – मी पाहत्येय!

क्लेश्च (आतापर्यंत स्तब्ध पडून अलिप्त राहिलेला असतो, पण ह्या शब्दांसरशी पटकन उठतो): सगळ्यांचं? मुळीच खरं नाही! सगळ्यांचं नव्हे! जर सगळ्यांचंच वाईट असतं तर एवढं दु:ख वाटलं नसतं!

बूब्नोव: काय झालं तुला? सैतानानं डोक्यात चिमटा हाणला? एकदम बोंबलायला का लागलास?

स्वत:शी पुटपुटत क्लेश्च परत निजतो.

बारोन: नास्त्याबरोबर समझोता करायला मला गेलं पाहिजे. जर समझोता झाला नाही, तर दारू प्यायला मला पैसे द्यायची नाही!

बूब्नोव: हूं... माणसांना खोटं बोलायला आवडतं! नास्त्याचं समजण्यासारखं आहे. स्वत:चं थोबाड रंग-वायची तिला सवय आहे. म्हणून आत्मासुद्धा रंगवू पाहत्येय! स्वत:च्या आत्म्याला लाली फासत्येय! पण... दुसऱ्या माणसांच्या कशाला? आता त्या लूकाचंच घ्या... खूप थापा मारतो! काहीही फायदा नसताना

वटवट करतो! एवढा थेरडा झाला! कशाला पाहिजे त्याला हे?

बारोन (हसत बाहेर जात) : त्या सगळया लोकांचे आत्मे भुरकट रंगाचे आहेत! सगळयांना लाली फासायची इच्छा आहे.

लूका (कोपऱ्यातून प्रवेश करत) : अरे जहागिरदार, कशाला त्या पोरीला दु:खी केलंस? कशाला तिला चिडवलंस? खुशाल रडूं दे तिला आवडत असेल तर! स्वत:च्या करमणुकीसाठी ती आसवं गाळते! तुला काय त्याचा त्रास झाला?

बारोन : ती बुद्दू आहे, म्हातारबुवा! वैताग आलाय तिचा! आज कोण – तर राऊल! उद्या – गास्तोन! आणि नेहमी तेच ते! पण असो – मी जाऊन तिची समजूत घालतो!.. (जातो.)

लूका : जा, जा... तिच्याशी गोडीनं वाग! माणसाशी गोडीनं वागण्यात कधीही अपाय होत नाही.

नताशा : आजोबा, तू फार प्रेमळ आहेस! कशामुळं तू असा प्रेमळ बनलास?

लूका : प्रेमळ आहे म्हणत्येस? ठीक आहे. प्रेमळ तर प्रेमळ!

विटकरी भिंतीमागून अ‍ॅकॉर्डियनचे मंद संगीत व गाण्याचा आवाज ऐकू येतात.

पोरी, कुणीतरी प्रेमळ असण्याची गरज आहे. लोकांची दया करणारं कुणीतरी पाहिजे! ख्रिस्तानं सगळयांची करुणा केली आणि आपण सगळयांनी तसंच वागावं

असं सांगितलं. मी तर म्हणतो – माणसाची वेळेवर दया केली तर चांगला परिणाम होतो! उदाहरण सांगतो – तोम्स्क शहराजवळ एका इंजिनिअरच्या दाचाची* मी रखवाली करत होतो. हा दाचा जंगलाच्या अगदी गाभ्यात उभा होता. हिवाळ्याचे दिवस .., मी एकटा ... भोवताली खूप सुंदर! एकदा आवाज ऐकले – कुणीतरी घर फोडत होतं!

नताशा : चोर?

लूका : होय, चोरच! घरफोडी करत होते. मी बंदूक उचलली आणि बाहेर गेलो. बघतो तर दोघं खिडकी उघडत होते. त्या कामात ते एवढे गुंतले होते की त्यांनी मला पाहिलंच नाही. मी त्यांच्यावर ओरडलो – अरे चोरांनो! चालते व्हा! ते माझ्यावर कुऱ्हाड घेऊन वळले. मी त्यांना दम घातला – थांबा तिथल्यातिथं! नाहीतर गोळी घालीन! पहिल्यांदा एका-वर आणि नंतर दुसऱ्यावर मी बंदूक रोखली. पटकन त्यांनी गुडघे टेकले आणि सोडून दे म्हणून याचना केली. पण एव्हाना त्यांच्या कुऱ्हाड उगारण्यानं मी संतापलो होतो. म्हणालो – मी तुम्हाला हाकलून लावलं होतं, पण गेला नाहीत! आता तुमच्यापैकी कुणीतरी एकानं त्या झुडुपातून एक फांदी तोडून आणा! त्यांनी फांदी आणली. मी त्यांना आज्ञा केली – आता एकानं खाली निजायचं आणि दुसऱ्यानं त्या फांदीनं त्याला झोडपून काढायचं! तर असं त्यांनी माझ्या हुकूमावरून

---

* दाचा – रशियन धर्तीची खेड्यातील बंगली – अनु.

एकमेकांना झोडपून काढलं. नंतर मला म्हणतात – आजोबा, ख्रिस्ताखातर आम्हाला काहीतरी खायला द्या! उपाशीपोटी भटकतोय! असले हे चोर! (हसतो.) ... कुऱ्हाडवाले! दोघं छान माणसं होती! मी त्यांना म्हणालो – तुम्ही आधीच सरळ खायला का मागितलं नाही? ते म्हणाले – वैताग आला मागून, मागून! कुणी देत नाही! वाईट वाटतं! दोघं माझ्या-बरोबर आख्खा हिवाळाभर राहिले! एकाचं नांव होतं स्तेपान. बंदूक घेऊन जंगलात जायचा. दुसरा याकोव सारखा आजारी होता. खोकायचा सदानकदा. आम्ही तिघं दाचाची रखवाली करत होतो. वसंताचा मोसम आला तसं म्हणाले – चलतो आम्ही आजोबा! आणि गेले निघून. रशियाच्या दिशेनं गेले.

नताशा: पळालेले कैदी होते का ते?

लूका: अर्थातच. पळालेले कैदी. जिथं त्यांना हद्दपार केलेलं होतं, तिथून पळून आले होते. छान पोरं होती! मी त्यांची दया केली नसती, तर कदाचित त्यांनी मला ठार मारलं असतं. किंवा आणखी काहीतरी घडलं असतं. म्हणजे नंतर खटला, तुरुंग, सैबेरिया... कशासाठी? तुरुंग माणसाला भलेपण शिकवत नाही आणि सैबेरियासुद्धा भलेपण नाही शिकवत! पण माणूस माणसाला अगदी सहजपणं भलेपण शिकवू शकतो.

स्तब्धता.

बूब्नोव: हं! पण मला खोटं बोलायला जमत नाही. कशाला खोटं बोलायचं? सत्य आहे तसं सांगून

टाकावं असं माझं मत आहे. लाजायचं काय त्यात?

क्लेश्च (जणू काहीतरी अंगाला डसल्याप्रमाणे ओरडत उठतो) : कसलं सत्य? कुठं आहे सत्य? (स्वतःवरची चिरगुटे हातांनी ओढत.) हे पहा सत्य! कामधंदा नाही. ताकद नाही. हेच सत्य! छप्पर नाही! मेलं पाहिजे कुत्र्यासारखं! हेच सत्य, सैताना! काय करू मी ह्या सत्याचं? मला श्वास घ्यायला द्या – जगायला द्या! काय माझा गुन्हा? काय करायचं मला सत्य? सैताना, जगणं अशक्य झालंय – जगायला मिळत नाही – हेच सत्य!

बूब्नोव : पहा, माणूस कसा ढवळून निघाला!

लूका : प्रभो येशू!.. ऐक रे गड्या! तू ...

क्लेश्च (बेचैनीमुळे थरथर कापत) : सगळीजणं वचवच करताय – सत्याबद्दल! म्हाताऱ्या, तू सर्वांचं सांत्वन करतोस. पण मी सांगतो तुला – कुणाचंही थोबाड पहावंसं वाटत नाही मला! हे सत्य आहे – मग ते खुशाल कायमचं नतद्रष्ट असो! समजलं? समजून घे! नतद्रष्ट आहे तुझं सत्य! (घराच्या कोपऱ्याशी धावतो, मागे वळून पाहतो.)

लूका : अरेरे! काय अस्वस्थ बनलाय माणूस! कुठं पळाला!

नताशा : डोकं फिरलंय त्याचं!

बूब्नोव : मजा आली! नाटकातल्यासारखं वागला ... अधूनमधून होतं असं! आयुष्याची अजून सवय नाही झाली त्याला!

पेपेल (कोपऱ्यामधून सावकाशपणे प्रवेश करतो) :

गमराम मंडळी ! लूका, धूर्त म्हाताऱ्या, अजून तुझ्या परीकथा सांगतो आहेस ?

लूका : इथं माणूस कसा ओरडत होता हे तू पहायला हवं होतं !

पेपेल : क्लेश्च होता काय ? काय झालं त्याला ? मैतान पाठी लागल्यासारखा धावत होता !

लूका : काळीज गलबललं म्हणजे माणूस असा धावतो.

पेपेल (बसत) : मला आवडत नाही तो ... फार गर्विष्ठ आणि दुष्ट ! (क्लेश्चची नक्कल करत.) "मी – कामकरी माणूस !" जणू बाकी सगळे त्याच्यापेक्षा नीच ! राब बेटच्या, राबायची हौस असेल तर ! त्यात गर्व कसला बाळगायचा ? माणसाचं मोल जर त्याच्या राबण्यावर ठरत असेल, तर कुणाही माणसा-पेक्षा घोडा जास्त चांगला ! ओझं ओढतो आणि गप्प राहतो !.. नताशा ... तुझी माणसं घरात आहेत ?

नताशा : स्मशानात गेलीत ... मग चर्चमध्ये प्रार्थनेला जाणार आहेत.

पेपेल : तरीच तू अशी रिकामटेकडी बसली आहेस ! असं क्वचित बघायला मिळतं !

लूका (विचारमग्न होत, बूब्नोवला) : तू म्हणतोस – सत्य बोलावं ! पण सत्य माणसाचे रोग नेहमीच बरं करतं असं नाही. सत्यानं आत्म्याची मलमपट्टी नेहमी नाही करता येत. एकदा असं घडलं – सत्यभूमीवर विश्वास बाळगणारा एक माणूस माझ्या माहितीचा होता ...

बूब्नोव : कशा-वर ?

लूका : सत्यभूमीवर ! म्हणाला – जगात सत्यभूमी असलीच पाहिजे ! त्या भूमीत खास माणसं राहतात – चांगली माणसं ! एकमेकांचा ती आदर राखतात... बारीकसारीक गोष्टीत एकमेकांना मदत करतात. त्यांचं सगळं छान आहे ! तर ही सत्यभूमी शोधून काढायला हा भला माणूस निघाला. तो गरीब होता... त्याचं आयुष्य खडतर होतं. काहीवेळा तर परिस्थिती इतकी वाईट होती की मुकाट पडून मरण्यापलिकडं दुसरं काही करणं त्याला शक्य नसायचं. पण तरी त्यानं धीर सोडला नाही. किंचित हसायचा आणि म्हणायचा: "ठीक आहे. मी सोशीन ! आणखी थोडं थांबीन... नंतर – हे जीवन टाकून देईन आणि सत्यभूमीत जाईन !" ही भूमी म्हणजे त्याचा एकमेव आनंद होती !

पेपेल : मग ? गेला ?

बूब्नोव : कुठं ? ह्यॅ, ह्यॅ !

लूका : हे सगळं सैबेरियात घडलं – तो माणूस ज्या खेड्यात रहात होता, तिथं एका शिकलेल्या माणसाला हद्दपारीवर पाठवलं... त्या शिकलेल्या माणसानं स्वतः-बरोबर पुस्तकं, नकाशे नेले होते. हा गरीब माणूस त्या शिकलेल्या माणसाला म्हणाला : "माझ्यावर कृपा कर आणि ही सत्यभूमी कुठं आहे ते सांग ! तिथपर्यंत कसं जायचं ते सांग !" त्या शिकलेल्या माणसानं पुस्तकं उघडली, नकाशे पसरले – खूप खूप निरखून पाहिलं – पण सत्यभूमीचा कुठं ठिकाणा लागेना ! सगळ्या गोष्टी त्या नकाशांवर होत्या – पण सत्यभूमी मात्र नव्हती !

पेपेल (हळू आवाजात) : काय? कुठंही सापडली नाही?

बूब्नोव हसतो.

नताशा: थांब रे तू! आजोबा, पुढं?

लूका: गरीब माणसाचा विश्वास बसेना. म्हणाला – कुठंतरी ती भूमी असलीच पाहिजे! नीट शोध! जर सत्यभूमी नसेल, तर तुझ्या पुस्तकांचा आणि नकाशांचा काहीही उपयोग नाही! शिकलेल्या माणसाला अपमान वाटला! म्हणाला – माझे नकाशे सर्वांत खात्रीलायक आहेत. पण सत्यभूमी मुळी कुठंच नाही! गरीब माणूस खूप संतापला. असं कसं? एवढं जगलो, एवढं सोसलं – का? तर अशी भूमी आहे असा विश्वास होता म्हणून! पण नकाशात तर नाही! फसवेगिरी! मग तो शिकलेल्या माणसाला म्हणतो: "अरे हलकटा! पाजी माणसा! तू डांबीस आहेस, शिकलेला नाहीस!" आणि एक त्याच्या कानशिलात ठेवून दिली! परत दुसऱ्या कानशिलात थप्पड हाणली!.. (स्तब्धता.) मग घरी गेला आणि स्वतःला फास लावून घेतला!

सगळे गप्प राहतात. लूका सस्मित मुद्रेने पेपेल आणि नताशाला न्याहाळतो.

पेपेल (हळू आवाजात) : च्यायला... कथा काही मजेची नाही!

नताशा: फसवणूक सोसली नाही त्याला...

बूब्नोव (उदासपणे) : सगळ्या... काल्पनिक गोष्टी...

पेपेल : म्हणजे अशी भूमी जगात नाहीच असं ठरलं !

नताशा : बिच्चारा ... तो माणूस !

बूब्नोव : सगळं रचून सांगितलंय ! ह्यॅ, ह्यॅ ! सत्यभूमी ! टाळक्यातच ! ख्यॅ, ख्यॅ, ख्यॅ ! (खिडकीतून अदृश्य होतो.)

लूका (बूब्नोवच्या खिडकीच्या दिशेने मान डोलवत) : हसतो ! अरेरे !

स्तब्धता .

बरं दोस्तांनो ! मस्त जगा ! लौकरच तुमच्यापासून मी दूर जाणार ...

पेपेल : आता कुठं ?

लूका : युक्रेनमध्ये. तिथं नवा धर्म निघालाय असं ऐकतो. बघायला पाहिजे ! माणसं सारखा शोध घेताहेत. जास्त चांगलं कसं जगता येईल म्हणून प्रयत्न करताहेत ! प्रभो, त्यांना धीर दे !

पेपेल : तुला काय वाटतं ? त्यांना हवं ते सापडेल ?

लूका : लोकांना ? सापडेल ! जो शोधील, त्याला सापडेल ! ज्याला खूप इच्छा असते, त्याला गवसतं !

नताशा : किती छान होईल असं झालं तर ! जास्त चांगल्या आयुष्याचा त्यांनी विचार केला तर कित्ती छान होईल !

लूका : ती माणसं नक्की तसा विचार करतील ! पोरी, फक्त त्यांना मदत करायला हवी ! त्यांचा आदर करायला हवा !

नताशा : मी कशी मदत करू ? मी स्वतःच असहाय आहे.

पेपेल (ठामपणे) : मी परत एकदा तुझ्याशी बोलणार आहे, नताशा ! इथं, ह्याच्यासमोर ! त्याला सगळं माहीत आहे. माझ्याबरोबर चल !

नताशा : कुठं ? एका तुरुंगातून दुसऱ्या तुरुंगात ?

पेपेल : मी सांगितलं तुला – चोऱ्या करायचं मी सोडून देईन ! देवाशप्पत सोडून देईन ! एकदा सांगितलं, म्हणजे नक्की तसा वागणार ! मी शिकलेला आहे... काम करीन ! हा म्हणतो – सैबेरियात स्वतःच्या इच्छेनं जायला पाहिजे. जाऊ या तिकडं, काय ? ह्या आयुष्याचा मला तिटकारा नाही असं वाटतं तुला ? अग नताशा, मला माहीत आहे... दिसतं ! मी स्वतःची समजूत घालतो की, प्रामाणिक म्हणवून घेणारी माणसं माझ्यापेक्षा मोठ्या चोऱ्या करतात. पण ह्याची मला मदत होत नाही. मला हे नकोय ! मला कशाची खंत नाही आणि अब्रूवर माझा विश्वास नाही. पण मला एक जाणवतं – जगलं पाहिजे ! पण उत्तम जगलं पाहिजे ! स्वतःला स्वतःचा आदर वाटेल असं जगलं पाहिजे !

लूका : बरोबर, पोरा ! देव तुला मदत करो ! खरंच – माणसानं स्वतःचा आदर राखला पाहिजे !

पेपेल : अगदी लहानपणापासून मी चोर. सगळे नेहमी मला म्हणायचे – चोर वास्का, चोराचा पोर वास्का ! असं म्हणता ? तर ठीक ! मी चोरच बनतो ! तू समजून घे – कदाचित सूडापायी मी चोर बनलो.

मी चोर आहे, कारण कुणीही दुसऱ्या काही नांवानं मला हाक मारायचा कदाचित कधी विचारच केला नाही. नताशा... तूसुद्धा त्याच नांवानं हाक मारणार मला? काय?

नताशा (दुःखाने) : माझा कुठल्याच शब्दांवर विश्वास बसत नाही. आज मला फार बेचैन वाटतंय. काळजात काहीतरी खुपतंय. काहीतरी घडणार असं वाटतंय. वासिली, निष्कारण आज तू हा विषय काढलास...

पेपेल : मग केव्हा? मी काही पहिल्यांदाच असं बोलत नाही!

नताशा : कशाला मी तुझ्याबरोबर यायचं? प्रेमाखातर? माझं तेवढं तुझ्यावर प्रेम नाही! कधी कधी तू मला आवडतोस, पण कधी कधी नजरेसमोर नकोसा होतोस! याचा अर्थ माझं प्रेम नाही तुझ्यावर! जेव्हा प्रेम करतात, तेव्हा त्या माणसात वाईट काहीच दिसत नाही म्हणे! पण मला तर तुझे दुर्गुण दिसतात...

पेपेल : करशील प्रेम! भिऊ नकोस! मी तुला शिकवीन माझ्यावर प्रेम करायला. तू फक्त संमती दे! वर्षापेक्षा मी जास्त काळ पाहिलंय तुला. मी पाहतोय – तू गंभीर, चांगली मुलगी आहेस! तुझ्यावर भिस्त ठेवता येईल! मी तुझ्यावर फार फार प्रेम करतो!

नटलेली वासिलिसा खिडकीत अवतीर्ण होते आणि खिडकीच्या चौकटीमागे अर्धवट लपून ऐकत उभी राहते.

नताशा : अस्सं! माझ्या प्रेमात पडलास आणि माझ्या बहिणीशी...

पेपेल (अस्वस्थपणे) : तिचं काय ? तिच्यासारख्या काय कमी आहेत ?

लूका : पोरी, तसा विचार करू नको. भाकरी नसली तर माणूस कंदमुळं खाऊन जगतो ! त्याच्यापाशी भाकर तर नाही ...

पेपेल (खिन्नपणे) : माझी कीव कर तू ! आयुष्य काही गोड नाही माझं ! लांडग्याच्या ह्या जिण्यात आनंद कमी. दलदलीत माणूस हाताला सापडेल ते खेचत राहतो – आधारासाठी ! पण तिथं सगळं कुजलेलं ... हातून सुटतं ! तुझी बहीण – वेगळी असेल असं वाटलं होतं. पण नाही ! पैशाचा तिला लोभ नसता, तर तिच्यासाठी मी काय वाट्टेल ते केलं असतं ! मात्र माझी ती सर्वस्वी झाली असती तर ! पण तिला दुसरंच हवंय – तिला पैसा पाहिजे ! मोकाट जगायला पाहिजे ! बेबंद जगायला मोकळीक पाहिजे ! ती मला मदत करू शकत नाही. पण तू – कोवळ्या झाडा-सारखी ! वाकशील, पण तुटणार नाहीस !

लूका : पोरी, मी तुला सांगतो – जा त्याच्याबरोबर, जा ! तो चांगला पोरगा आहे. मात्र त्याला सारखी आठवण करून देत जा, की तो चांगला पोरगा आहे. म्हणजे ही गोष्ट तो विसरायचा नाही ! त्याचा तुझ्यावर विश्वास आहे. तू फक्त त्याला सांगत जा – "वास्या, तू भला माणूस आहेस हे विसरू नको !" पोरी, तू जरा विचार कर – दुसरा कुठला रस्ता तुझ्यापुढं मोकळा आहे ? तुझी बहीण म्हणजे पिसाळलेलं जनावर ! तिच्या नवऱ्याबद्दल तर बोलायलाच नको. थेरडा अति-

वाईट. आणि इथलं एकूण आयुष्यही अत्यंत खराब. कुठं जाणार तू दुसरीकडं? आणि हा पोरगा भक्कम आहे ...

नताशा : जायला कुठंच जागा नाही हे मला ठाऊक आहे. त्यावर विचार केलाय मी. फक्त माझा कुणावरही विश्वास नाही! आणि जायला मला कुठं ठिकाण नाही!

पेपेल : एकच रस्ता! पण त्या रस्त्यावर मी तुला सोडणार नाही! त्यापेक्षा तुला ठार मारीन!

नताशा (स्मित करत) : बघ, अजून मी तुझी बायको बनले नाही, तोवर मला तू ठार मारायला निघालास!

पेपेल (तिला मिठी घालत) : विसर, नताशा! हे असंच असलं पाहिजे!

नताशा (त्याला बिलगत) : वासिली, मी तुला एक सांगत्ये ... देवाची आण घेऊन सांगत्ये! माझ्यावर तू एकदा हात टाकलास, किंवा माझा अपमान केलास ... तर मी स्वतःची गय करणार नाही! एक तर आत्महत्या करीन, किंवा ...

पेपेल : तुला मारण्यापूर्वीच माझा हात झडून जावो!

लूका : पोरी शंका घेऊ नकोस. तुला त्याची गरज आहे ह्यापेक्षा तुझी त्याला गरज जास्त आहे.

वासिलिसा (खिडकीतून) : जमलं लग्न! आता यापुढं फक्त प्रेम!

नताशा : आले परत! अरे देवा! त्यांनी पाहिलं! वासिली, आता रे?

पेपेल : अशी घाबरतेस कशाला? आता तुझ्या अंगाला

हात लावण्याची कुणाचीही हिंमत होणार नाही!

वासिलिसा : घाबरू नको, नताशा! तो तुला मारणार नाही! मला माहीत आहे – तो ना मारू शकतो, ना प्रेम करू शकतो!..

लूका (हळूच) : छी:! काय ही बाई! जहरी नागीण!

वासिलिसा : त्याला फक्त सुंदर भाषणं करणं माहीत आहे!

कोस्तील्योव (प्रवेश करतो) : नताश्का! इथं काय करत्येस, फुकटखाऊ? पाठीमागं नालस्ती करतेस? घरच्या माणसांना शिव्या मोजतेस? समोवार तयार केलास? टेबल मांडलं नाहीस?

नताशा (जात) : पण तुम्ही चर्चमध्ये जाणार होतात ...

कोस्तील्योव : आम्ही कुठं जाणार होतो त्याच्याशी तुला काय करायचंय? तुला सांगितलं ते काम मुकाट पार पाडत जा!

पेपेल : जीभ आवर तुझी! आता यापुढं तुझी ती मोलकरीण नाही! नताशा, जाऊ नको. काहीही काम करू नको!

नताशा : तू हुकूम देऊ नको! खूप वेळ आहे अजून! (जाते.)

पेपेल (कोस्तील्योवला) : आता पुरे! तिला पाहिजे तसं राबवून घेतलंत! आता ती माझी आहे!

कोस्तील्योव : तुझी? केव्हा विकत घेतलीस? किती पैसे मोजलेस?

वासिलिसा खो खो हसते.

लूका: वास्या! तू जा इथून!

पेपेल: तुम्ही फार मजेत दिसताय! सांभाळा! रडायची पाळी येईल!

वासिलिसा: बाई ग, किती भयंकर! भीतीनं माझा अगदी थरकाप उडालाय!

लूका: वासिली, जा इथून! पाहिलंस – तुला डिवचायला पाहते आहे ती! मुद्दाम चिडवते आहे!

पेपेल: होय! खोटं बोलत्येय! तुला हवं तसं होणार नाही!

वासिलिसा: आणि जे मला नकोय, तेही होणार नाही, वास्या!

पेपेल (तिला मुठीने धमकावत): बघून घेऊ! (जातो.)

वासिलिसा (खिडकीतून नाहीसे होत): चांगला वाजवते मी तुझ्या लग्नाचा बेंडबाजा!

कोस्तील्योव (लूकापाशी येत): काय रे म्हाताऱ्या?

लूका: काही नाही म्हाताऱ्या!

कोस्तील्योव: तू जाणार, म्हणतात?

लूका: खूप राहिलो!

कोस्तील्योव: कुठं?

लूका: वाट फुटेल तिकडं!

कोस्तील्योव: म्हणजे भटकंती करणार! एका जागी राहणं तुला मानवत नाही असं दिसतं?

लूका: धावत्या दगडाखाली शेवाळं साचत नाही म्हणतात!

कोस्तील्योव : ती दगडाची बाब झाली ! पण माणसानं एका जागी रहायला पाहिजे. लोकांनी झुरळांसारखं राहू नये. जिथं ज्याला हवं तिथं त्यानं घुसायचं ! माणसानं आपली जागा निश्चित ठरवावी. वाट चुकल्या-सारखं भटकू नये !

लूका : पण ज्याला सगळीकडंच घरच्यासारखं वाटतं?

कोस्तील्योव : त्याला भटक्या म्हणतात. कुचकामी माणूस. माणसाचा काहीतरी उपयोग असला पाहिजे. त्यानं काम केलं पाहिजे.

लूका : अरे वारे तू !

कोस्तील्योव : तर काय? यात्रेकरू म्हणजे काय? परका माणूस... इतरांसारखा नसलेला. जरी त्यानं बरंच विशेष ज्ञान प्राप्त केलं असलं... कुणी जाणून घेण्याची तसदी घेतली नसेल असं जरी काही त्याला ठाऊक असलं... अगदी सत्य माहीत असलं... तरी असल्या सत्याची कुणालाही गरज नाही ! खुशाल त्यानं ते स्वतःपाशी ठेवावं आणि गप्प बसावं ! जर अस्सल यात्रेकरू असला, तर गप्प राहील ! नाहीतर कुणालाही समजणार नाही अशी वटवट करत राहतो. त्यानं कुणाच्या बाबतीत ढवळाढवळ करू नये, काही बदलायचा प्रयत्न करू नये. लोकांच्या कारभारात नाक खुपसू नये ! माणसं कशी जगतात ह्याशी त्याला काहीही कर्तव्य नाही. त्यानं धर्मपरायण जगावं. रानात, गुंफां-मध्ये, लोकांच्या नजरेआड रहावं ! कुणाला त्रास देऊ नये. कुणाचा निवाडा करू नये. सगळ्यांसाठी प्रार्थना करावी. जगातल्या सगळ्या पापांच्या क्षालनासाठी

माझ्या ... तुझ्या ... सगळयांच्या ! म्हणूनच तो जगातल्या सगळ्या भानगडीपासून दूर पळतो – प्रार्थना करण्यासाठी ! समजलं ?

स्तब्धता.

पण तू कसला यात्रेकरू ? पासपोर्ट नाही ... भल्या माणसापाशी पासपोर्ट असावा ... सगळ्या भल्या माणसांपाशी पासपोर्ट असतो !

लूका : आपल्यापैकी काही माणसं आहेत – काही नुसतेच प्राणी आहेत !

कोस्तील्योव : आता जादा हुशारी दाखवू नकोस ! कोडी घालू नकोस ! तुझ्यापेक्षा जास्त मूर्ख नाही मी ! माणसं आणि प्राणी म्हणजे काय ?

लूका : इथं कुठं कोडं आहे ? मी एवढंच म्हणतो – नापिक जमीन आहे आणि सुपिक जमीन आहे. सुपिक जमिनीत पेरशील ते उगवेल !

कोस्तील्योव : काय म्हणायचंय तुला ?

लूका : तुझंच पहा ! जर खुद्द प्रभू तुला म्हणाला : "मिखाईल, माणसासारखा वाग बाबा !" तरी काही फरक पडणार नाही तुझ्यात ! जसा आहेस, तसाच राहशील !

कोस्तील्योव : तुला ठाऊक आहे ? माझ्या बायकोचा काका पोलीसात आहे ? जर मी ...

वासिलिसा (प्रवेश करते) : मिखाईल इवानीच, चहा प्यायला चल !

कोस्तील्योव (लूकाला) : हे बघ, तू चालता हो इथून ! घरात परत दिसू नको !

वासिलिसा : खरंच, आवर तुझं चंबूगबाळं इथून, म्हाताऱ्या ! तुझी लांब जीभ फार त्रास देते. कुणास माहीत ? तू फरारी असायचास ...

कोस्तील्योव : आजच चालता हो ! इथं तुझा वास-मुद्धा रहायला नको ! नाही तर – याद राख !

लूका : काकाला बोलावशील ? बोलाव ... तुझ्या काकाला. फरारी पकडलाय म्हणावं ! काकाला बक्षिस मिळेल कदाचित तीन कोपेक !

बूब्नोव (खिडकीतून) : काय सौदा चाललाय इथं ? तीन कोपेकला काय ?

लूका : मला विकायची धमकी घालताहेत.

वासिलिसा (नवऱ्याला) : चल !

बूब्नोव : तीन कोपेकला ? बघ म्हाताऱ्या ... नाही तर एक कोपेकला विकतील !

कोस्तील्योव (बूब्नोवला) : तू आलास सरपटत ? भिंतीतल्या चुल्यामधल्या पिशाच्चासारखा ? (बायकोसह जातो.)

वासिलिसा : ह्या जगात हलकट माणसं किती भरलीत ! आणि वेगवेगळे चोर !

लूका : चहा छान भुरकून घ्या !

वासिलिसा (मागे वळून) : जीभ आवर ... विषारी भुईफोडच्या ! (नवऱ्याबरोबर कोपऱ्यातून निघून जाते.)

लूका : आज रात्री जाणार !

बूब्नोव : हे सर्वांत उत्तम ! योग्य वेळी निघून जाणं नेहमी छान !

लूका : अगदी बरोब्बर बोललास !

बून्नोव : मी काय म्हणतोय ते मला ठाऊक आहे. योग्य वेळी निघून गेल्यामुळंच कदाचित माझा तुरुंग चुकला !

लूका : असं ?

बून्नोव : खरंच ! त्याचं असं झालं—माझ्या बायकोचं एका कारागिराशी सूत जमलं होतं. कारागिर चांगला होता ... कुत्र्यांची कातडी रंगवून त्यांना केसाळ प्राण्यांची कातडी म्हणून विकण्यात तरबेज ! मांजराची कातडी— कांगरूची बनवायचा ! चलाख माणूस ! तर त्याच्या- बरोबर माझी बायको गुंतली ! त्यांचं एकमेकांशी असं काही घट्ट जमलं की, मला डोळ्यात तेल घालून रहायची वेळ आली—माझ्यावर विषप्रयोग करतील किंवा दुसऱ्या रीतीनं माझा काटा काढतील ही सारखी धास्ती ! काहीवेळा मी बायकोला मारहाण करायचा आणि मग तो कारागिर माझ्याशी जोरदार मारामारी करायचा ! एकदा त्यानं माझी अर्धी दाढी उपटली आणि एक फासळी मोडली. मीसुद्धा इरेला पेटायचा. एक दिवस मी माझ्या बायकोच्या डोस्क्यावर लोखंडी चिमटा हाणला आणि मग जंगी युद्धच सुरू झालं ! माझ्या लक्षात आलं की, कधी ना कधी ते माझ्यावर मात करणार ! तेव्हा विचार केला आणि बायकोचा निकाल लावायचं ठरवलं ! पण वेळेवर तोल सावरला आणि तिथून निघून गेलो !

लूका : हे उत्तम ! खुशाल त्यांना कुत्र्यांच्या कातडी रंगवू देत !

बूब्नोव : पण दुकान बायकोच्या हाती राहिलं आणि माझी ही अशी अवस्था आली! मात्र खरं सांगायचं तर दारूपायी मी दुकान फुंकलं असतं! दारूनं माझी ही दशा केली ...

लूका : दारूपायी? असं?

बूब्नोव : भयानक दारूबाज आहे मी! एकदा प्यायला सुरुवात केली म्हणजे माझी कातडी सोडून सगळं स्वाहा! शिवाय, मी कमालीचा आळशी! काम म्हणून करायला नको!

सातीन आणि नट प्रवेश करतात. त्यांचा वाद चालू.

सातीन : फालतू! तू कुठंही जाणार नाहीस. तू स्वतःला फसवतो आहेस गड्या! म्हाताऱ्या – तू ह्या माणसाचे कशाला कान फुंकलेस?

नट : खोटं बोलतोस! आजोबा, सांग त्याला की तू खोटं बोलतो आहेस! मी चाललो! आज मी रस्ता झाडायचं काम केलं आणि अजिबात दारू प्यायलो नाही. कमाल आहे ना! हे पहा – तीस कोपेक आणि मी पूर्ण शुद्धीवर!

सातीन : मूर्खपणा! दे – मी पितो त्या पैशांची ... नाही तर पत्त्यात घालवतो.

नट : चल, हट्! हे – प्रवासासाठी!

लूका (सातीनला) : त्याला योग्य रस्त्यावरून बाजूला का ढकलतोस!

सातीन : "हे महापंडिता, देवांच्या लाडक्या, सांग मला! भविष्यात माझ्या काय वाढून ठेवलंय?" बंधू,

मी पुरता धुवून निघालोय! सगळं गमावलं! पण आजोबा, अजून सगळं गमावलं नाही! माझ्यापेक्षा धूर्त शिकारी अजून ह्या जगात आहेत!

लूका: आनंदी आणि छान आहेस तू बंधू!

बूब्नोव: नटवर्य! जरा इकडं ये.

नट खिडकीपाशी जातो आणि खाली वाकून बूब्नोवशी हलक्या आवाजात बोलू लागतो.

सातीन: बंधू, माझ्या तरुणपणी मी मजेशीर होतो! आठवणी काढायला छान वाटतं! बिनधास्त! मस्त नाचायचा, नाटकात कामं करायचा, लोकांना खूप हसवायचा. छान होतो!

लूका: मग गाडी कुठं घसरली तुझी?

सातीन: म्हातारबुवा, तुला चौकशा फार! सगळं माहीत करून घ्यायचा सोस! कशाला?

लूका: माणसांना समजून घ्यावंसं वाटतं... पण तू मात्र अजून कळत नाहीस! कॉन्स्तन्तिन, तू छान माणूस आहेस, मूर्ख नाहीस, पण अचानक...

सातीन: तुरुंग! आजोबा, मी चार वर्षं सात महिने तुरुंगात काढले... आणि एकदा तुरुंगात जाऊन आलास, म्हणजे तू कुणाचाही नाहीस!

लूका: ओहो! कशाबद्दल शिक्षा झाली होती?

सातीन: एका हलकटाबद्दल! संतापाच्या आणि तिटकाऱ्याच्या भरात मी त्याला ठार मारलं! तुरुंगातच मी पत्ते खेळायला शिकलो!

लूका: ठार का मारलंस? बाईपायी?

सातीन : सख्ख्या बहिणीसाठी ! पण तू फार चौकशा करतोस ! मला कुणी प्रश्न विचारलेले आवडत नाहीत. शिवाय हे सगळं फार फार पूर्वी झालं ! बहीण ... मेली ! नऊ वर्षं उलटली. माझी बहीण फार छान होती, बंधू !

लूका : आयुष्य फार सहजपणं घेतोस ! पण थोड्या वेळापूर्वी तो कुलूपवाला कसा विव्हळत होता ते ऐकायला पाहिजे होतंस ! आहाहा !

सातीन : क्लेश्च ?

लूका : हो. "काम नाही – ओरडत होता – काहीही नाही !"

सातीन : होईल सवय !.. आता मी काय बरं करावं ?

लूका (हळूच) : बघ ! येतोय !

मान खाली घालून मंद पावले टाकत क्लेश्च येतो.

सातीन : ए, विधुरा ! मुंडी कशाला खाली घातलीस ? कसला विचार चाललाय ?

क्लेश्च : विचार करतोय – पुढं काय करू ? हत्यारं नाहीत. मर्तिकात सगळं गेलं !

सातीन : मी तुला सल्ला देतो – काहीही करू नको ! धरतीला नुसता भार होऊन बैस !

क्लेश्च : ठीक आहे तुला बोलायला ! पण मला लोकांपुढं लाज वाटते ...

सातीन : सोड लाज ! कुत्र्यापेक्षा वाईट जिणं तुला जगावं लागतं ह्याची लोकांना नाही लाज वाटत !

विचार कर. तू काम करू नको. मी काम करणार नाही. आणखी शेकडो ... हजारो ... काम करणार नाहीत! समजलं? सगळे काम सोडून देतात! कुणीही काहीही करू इच्छित नाही! तेव्हा काय होईल?

क्लेश्च : भुकेनं सगळे मरतील!

लूका (सातीनला) : अशा कल्पना घेऊन तू फरा-ऱ्यांबरोबर जा! असा एक संप्रदाय आहे – फरारी लोकांचा!

सातीन : माहीत आहे. आजोबा, ते लोक मूर्ख नाहीत!

कोस्तील्योवच्या खिडकीतून नताशाची किंकाळी :
"कशाबद्दल? थांब! कशाबद्दल?.."

लूका (अस्वस्थपणे) : नताशा? ती ओरडते आहे? आं?

कोस्तील्योवच्या घरात गोंगाट. बशा फुटल्याचा आवाज, लोकांची कुजबुज आणि कोस्तील्योवचे कर्कश्य ओरडणे–
"कुत्री साली! रांड!"

वासिलिसा : थांब! मी तिला दाखवत्ये!

नताशा : आई ग! मला ठार मारताहेत!

सातीन (खिडकीपाशी जाऊन ओरडतो) : ए, काय चाललंय तुमचं?

लूका (धावपळ करत) : वासिली! वास्याला बोलवा! अरे देवा! बंधूंनो ... मंडळी ...

नट (पळत) : मी आत्ता त्याला बोलावतो ...

बूब्नोव : सारखंच तिला मारायला लागलेत !

सातीन : चल म्हाताऱ्या ... साक्षीदार बनू !

लूका (सातीनच्या पाठोपाठ जात) : मी कसला साक्षीदार ! वासिली लौकर आला तर बरं ... अरे देवा !

नताशा : ताई ! .. ताई ! .. आ .. आ .. आ ...

बूब्नोव : तोंडात बोळा घातला ! जाऊन बघतो .

लोक हॉलमध्ये गेल्यामुळे कोस्तील्योवच्या घरातील गोंगाट थांबतो . म्हाताऱ्याचे ओरडणे ऐकू येते . "थांबा !" दार जोरात आपटल्याचा आवाज . कुऱ्हाडीचा घाव बसल्याप्रमाणे हा आवाज होतो . सगळा गोंधळ एकदम थांबतो . रंगमंचावर शांतता . संधिप्रकाश .

क्लेश्च (अलिप्त मनाने , घसघसा हात चोळत उलट्या घसरगाडीवर बसून आहे . काहीतरी अगम्य पुटपुटत राहतो) : पण कसं ? माणसानं जगायला तर पाहिजे ना ? (मोठ्या आवाजात .) छप्पर ! माझ्या डोक्यावर एक छप्पर पाहिजे ! मला छप्पर नाही ! माझ्यापाशी काहीही नाही ! माणूस एकटा – अगदी एकटा ! सगळी पीडा ह्यात आहे . कुणीही मदत करायला नाही ! (पोक काढून तो सावकाशपणे जातो .)

काही सेकंद भयानक शांतता . मग रंगभूमीपलिकडून कुजबुज . हळूहळू तिचे जवळ येणाऱ्या गोंगाटात रूपांतर . वेगवेगळे आवाज स्पष्ट ऐकू येतात .

वासिलिसा : मी तिची बहीण आहे ... सोड !

कोस्तील्योव : तुला काय हक्क ?

वासिलिसा : कैदी मेला !

सातीन : वास्याला बोलाव ! लौकर ! झोब – हाण त्याला !

पोलीसची शिटी वाजते.

तातारीन (धावतो. त्याचा उजवा हात प्लास्टरमध्ये अडकवलेला) : असा कुठला कायदा आहे – दिवसाढवळ्या ठार मारायचा ?

क्रीवोय झोब (त्याच्या पाठी मेदवेदेव) : छ्याः ! मी त्याला मस्त हाणला !

मेदवेदेव : मारामारी करायची हिंमत कशी केलीस ?

तातारीन : आणि तू ? तुझं काय काम आहे ?

मेदवेदेव (तातारीनमागे धावत) : थांब ! शिटी मला परत दे !

कोस्तील्योव (धावत येतो) : आब्राम ! पकड ! त्याला धर ... ठार मारलं ...

कोपऱ्यामागून विस्कटलेल्या नताशाला आधार देत क्वाश्न्या आणि नास्त्या येतात. सातीन त्यांच्यामागून चालत येतो. बहिणीच्या अंगावर धावून जाणाऱ्या वासिलिसाला तो मागे ढकलतो. आल्योश्का तिच्याभोवती वेड्यासारखा उड्या मारतोय, तिच्या कानात शीळ घालतोय, ओरडतोय आणि किंचाळतोय. त्यांच्यापाठी फाटक्या कपड्यांमधल्या काही स्त्री-पुरुषांचा घोळका.

सातीन (वासिलिसाला) : कुठं ? हलकट रांडे ...

वासिलिसा : दूर हो, गुन्हेगारा ! आयुष्याची किंमत

मोजीन, पण तिचे तुकडे तुकडे करीन!

क्वाश्न्या (नताशाला दूर नेत): पुरे वासिलिसा! जरा लाज बाळग! अशी जनावरासारखी काय वागत्येस?

मेदवेदेव (सातीनला पकडत): अस्सं... सापडलास नावडीत!

सातीन: झोब! हाण त्यांना! वास्या! वास्या!

विटांची भिंत आणि घर यांच्या दरम्यानच्या बोळात त्यांची गर्दी जमते. नताशाला उजव्या बाजूच्या फळकुटांच्या ढिगावर नेऊन बसवतात.

पेपेल (अचानक येतो व काहीही न बोलता लोकांना ढकलून वाट काढतो.) नताशा कुठाय? तू...

कोस्तील्योव (कोपऱ्यात लपत): आब्राम! वास्याला धर! बंधूंनो, वास्याला पकडायला मदत करा! चोराला... दरोडेखोराला...

पेपेल: ए तू... रंडीबाज थेरड्या! (कोस्तील्योवला हाताचा जोरदार तडाखा हाणतो.)

कोस्तील्योव अशा रीतीने पडतो की, कोपऱ्यातून फक्त त्याचे वरचे अर्धे शरीर दिसते. पेपेल नताशाकडे धावतो.

वासिलिसा: वास्याला हाणा! लोकहो, चोराला मारा!

मेदवेदेव (सातीनवर किंचाळतो): तू मधे पडू नको! इथं खाजगी बाब आहे! ती नात्याची माणसं आहेत – पण तू कोण?

पेपेल: काय... तिनं कशानं तुला मारलं? सुऱ्यानं?

क्वाश्न्या : बघ तरी, पशू कुठले! पोरीच्या पायांवर उकळतं पाणी ओतलं!

नास्त्या : समोवार उलटा केला!

तातारीन : कदाचित – चुकून! नक्की माहीत करून घेतलं पाहिजे! उगाच बोलण्यात अर्थ नाही!

नताशा : (जवळ जवळ बेशुद्ध होत) : वासिली... मला घेऊन जा! मला लपवून ठेव!

वासिलिसा : देवा रे! बघा-बघा! मेला ठार मारलं त्याला ...

कोस्तील्योव जेथे पडला आहे त्या ठिकाणी सगळे धावतात. बूब्नोव गर्दीतून वेगळा होतो आणि पेपेल-पाशी जातो.

बूब्नोव (हळूच) : वास्का! म्हातारा तर... खपला!

पेपेल (जणू काही न समजल्याप्रमाणे त्याच्याकडे पहात) : जा... बोलाव! इस्पितळात नेलं पाहिजे! मी ह्याचा त्यांना जाब विचारीन!

बूब्नोव : मी म्हणतोय – म्हाताऱ्याला कुणीतरी खतम केला!

आगीवर पाणी फेकताच होते त्याप्रमाणे रंगभूमीवरील गोंगाट विरतो. दबत्या आवाजात वेगवेगळे शेरे ऐकू येतात : "खरंच?" "फार वाईट!" "अस्सं?" "बंधू, जाऊ या इथून!" "च्यायला!" "आता सांभाळ!" "पोलीस नाहीत तोवर पसार हो!" गर्दी कमी होते. बूब्नोव आणि तातारीन जातात. नास्त्या आणि क्वाश्न्या कोस्तील्योवच्या प्रेताकडे धावतात.

वासिलिसा (जमिनीवरून उठत विजयी स्वरात

ओरडते) : ठार मारलं! माझ्या नवऱ्याला... त्यानं ठार मारलं! वास्यानं ठार मारलं! मी पाहिलं! लोकहो, मी खुद्द माझ्या डोळ्यांनी पाहिलं! काय, वास्या? पोलीस!

पेपेल (नताशापासून दूर होत) : सोड... बाजूला हो! (म्हाताऱ्यावर एक कटाक्ष टाकतो, वासिलिसाला) : काय? आनंद झाला? (पायाने प्रेताला ढकलत.) म्हातारा कुत्रा... खपला! तुझ्या मनासारखं झालं! आता तुझाही निकाल लावायचा का? (तिच्या अंगावर धावून जातो.)

सातीन आणि क्रीवोय झोब पटकन मधे पडतात. वासिलिसा बोळात लपते.

सातीन : काय करतोस? भानावर ये!

क्रीवोय झोब : अरे एवढी घाई काय?

वासिलिसा (परत येत) : काय वास्या, लाडक्या मित्रा? नशीबापासून तुझी सुटका नाही! पोलीस! आब्राम... शिटी वाजव!

मेदवेदेव : सैतानांनी माझी शिटी पळवली!

आल्योश्का : ही बघ! (वाजवतो.)

मेदवेदेव त्याच्यामागे धावतो.

सातीन (पेपेलला नताशाकडे नेत) : वास्का — भिऊ नको! मारामारीत ठार झाला... फालतू! ह्याची किंमत फार नाही मोजावी लागणार...

वासिलिसा : वास्याला पकडा! त्यानं ठार मारलं... मी पाहिलं!

सातीन : मीसुद्धा तीनवेळा म्हाताऱ्याला मारलं होतं... त्याला काय जास्त लागतंय? साक्षीदार म्हणून मला बोलाव, वास्या!

पेपेल : मला ह्यातून सुटायचं नाही. ह्यात वासिलिसाला गुंतवायची माझी इच्छा आहे. आणि मी तिला बरोब्बर गोवतो! असं व्हावं अशी तिची इच्छाच होती – नवऱ्याला ठार मार असं तिनं मला सांगितलं होतं. त्याबद्दल माझ्याशी ती बोलली होती.

नताशा (अचानक मोठ्या आवाजात) : अस्सं! आत्ता कळलं! वासिली, असं आहे काय? भल्या माणसांनो! त्यांनी एकत्र मिळून केलं! माझ्या बहिणीनं आणि त्यानं – दोघांनी आधी ठरवून केलं! हा सगळा बनाव त्यांनी आधीच रचला होता! ठीक वासिली? म्हणून आज तू माझ्याशी तसं बोललास – तिनं ऐकावं म्हणून? भल्या माणसांनो! ती त्याची रखेली आहे... तुम्हाला माहीतच आहे! सगळ्यांना ठाऊक आहे. त्यांनी एकत्र मिळून हे कर्म केलं! नवऱ्याला ठार मारायला तिनं त्याला सांगितलं... नवरा त्यांना अडथळा होता... आणि मीसुद्धा अडथळा ठरत होत्ये... म्हणून मला पांगळी केली त्यांनी!

पेपेल : नताशा! अग, तू काय बोलतेस हे?

सातीन : च्यायला! कमाल झाली!

वासिलिसा : खोटं! खोटं सांगत्येय ती... मी... त्यानं... वास्कानं खून केला!

नताशा : त्या दोघांनी मिळून! तुम्ही दोघं नालायक आहात! दोघंही!

सातीन : वा रे खेळ ! सांभाळ – वासिली ! तुला न्या अडकवताहेत !

क्रीवोय झोब : कळणं कठीण झालंय ! वाहव्वा रे वाहव्वा !

पेपेल : नताशा ! तू खरंच ... तुला खरंच असं वाटतं की, मी तिच्याबरोबर ...

सातीन : अरे देवा ! नताशा ... जरा ताळ्यावर ये !

वासिलिसा (बोळातून) : माझ्या नवऱ्याचा खून झाला ! इन्स्पेक्टरसाहेब ! वास्का पेपेल ... चोर ... त्यानं खून केला ... इन्स्पेक्टरसाहेब ! मी पाहिलं ... माझ्या डोळ्यांनी ! सगळ्यांनी पाहिलं ...

नताशा (अर्धवट शुद्धीत झटके देत) : भल्या माणसांनो ! माझ्या बहिणीनं आणि वासिलीनं खून केला ! पोलीस ... ऐका ... माझ्या बहिणीनं त्याला पढवला ... तिनं त्याला सांगितलं ... स्वतःच्या जाराला ... तो बघा हलकट ! त्यांनी खून केला ! त्यांना धरा ... खटला भग ... मलाही न्या ! तुरुंगात मलाही घेऊन जा ! ख्रिस्ताशपथ, मला तुरुंगात न्या ! ..

पडदा

अंक चौथा

पहिल्या अंकाप्रमाणेच सर्व दृश्य. फक्त पेपेलच्या खोलीला बनविणारा आडोसा काढून टाकलेला आहे

आणि क्लेश्चची ऐरण दिसत नाही. पेपेलची खोली होती त्या कोपऱ्यातील फळीवर तातारीन तळमळत आणि विव्हळत पडला आहे. मेजापाशी बसून क्लेश्च ॲकॉर्डियन दुरुस्त करतोय, मधून मधून सूर दाबतोय. मेजाच्या दुसऱ्या टोकाला बारोन, सातीन आणि नास्त्या बसले आहेत. त्यांच्यासमोर एक वोदकाची बाटली, तीन बीयरच्या बाटल्या व थोडा काळा पाव आहे. चुलाण्यावर नट खोकत तळमळतो आहे. रात्र. मेजाच्या मध्यभागी उभ्या असलेल्या दिव्याचा रंगमंचावर उजेड पडला आहे. बाहेर वाऱ्याचा घूं घूं आवाज.

क्लेश्च : त्या गोंधळात तो गायब झाला.

बारोन : पोलीसांपासून पळाला. आगीपासून धूर पळतो तसा!

सातीन : पुण्यवानांपासून पापी पळतात तसे!

नास्त्या : छान होता म्हातारा! पण तुम्ही – माणसं नाहीत! तुम्ही गंज आहात!

बारोन (पीत) : तुमच्या आरोग्यासाठी, मेमसाहेब!

सातीन : विचित्र होता म्हातारा! नास्त्या त्याच्या प्रेमात पडली होती.

नास्त्या : हो, प्रेमात पडले होते आणि त्याच्यावर प्रेम केलं होतं! अगदी खरं! त्याला सगळं दिसायचं – सगळं समजायचं!

सातीन (हसून) : एकूण, बिनदातवाल्यांसाठी मऊ खाऊ असावा, तसा तो होता.

बारोन (हसतो) : गळवांच्या प्लास्टरसारखा.

क्लेश्च : त्याला करुणा वाटायची. पण तुमच्यात करुणा नाही.

सातीन : जर मी तुझी कीव केली, तर तुला काय फायदा ?

क्लेश्च : तू लोकांची कीव करत नाहीस, पण तरीही त्यांच्या भावना जपतोस.

तातारीन (फळीवर उठून बसतो आणि लहान बाळाप्रमाणे स्वतःच्या दुखऱ्या हाताला डोलवतो) : म्हातारा छान होता. आत्म्याचा कायदा त्याला ठाऊक होता. ज्याला आत्म्याचा कायदा माहीत – तो छान ! ज्यानं कायदा गमावला – तो स्वतःला हरवला !

बारोन : कोणता कायदा, प्रिन्स ?

तातारीन : वेगवेगळा ... तुला माहीत आहे.

बारोन : पुढे !

तातारीन : माणसाचा अपमान करू नको – हा कायदा !

सातीन : त्याला म्हणतात : "गुन्हेगार आणि दुर्जनांसाठी दंडसंहिता !"

बारोन : आणखी एक – "जस्टिस ऑफ पीस यांनी लादलेले दंडनियम."

तातारीन : कुराण हा कायदा आहे. तुमचं कुराण कायदा असलं पाहिजे. आत्मा कुराण असला पाहिजे.

क्लेश्च (ॲकॉर्डियनचा सूर तपासत) : खरखर करतंय, सैतान ! प्रिन्स बरोबर बोलतोय – कायद्यानं जगलं पाहिजे. बायबलप्रमाणं.

सातीन : तू जग.

बारोन : प्रयत्न करून बघ.

तातारीन : महंमदानं कुराण दिलं. त्यानं सांगितलं : "हा कायदा! इथं लिहिलंय त्याप्रमाणं वाग!" मग काळ येतो – कुराण अपुरं पडेल. काळ स्वतःचा कायदा देतो – नवा. प्रत्येक काळाचा स्वतःचा कायदा असतो.

सातीन : होय. आता काळ आला आहे "दंड-संहितेचा." कडक कायदा. हा कायदा लौकर नाहीसा होणार नाही.

नास्त्या (मेजावर ग्लास आपटत) : कशासाठी... कशाला मी इथं राहत्ये... तुमच्याबरोबर? निघून जात्ये कुठंतरी... जगाच्या दुसऱ्या टोकाला!

बारोन : अनवाणी, मेमसाहेब?

नास्त्या : नागडी! हातापायांवर रांगत!

बारोन : फार सुंदर चित्र दिसेल, मेमसाहेब! जर हातापायांवर...

नास्त्या : होय, रांगत! फक्त मला तुझं दर्शन घडायला नको. तुम्हा सर्वांचा वीट आलाय! सगळ्या आयुष्याचा... सगळ्या माणसांचा!

सातीन : जाशील तेव्हा नटवर्याला बरोबर घेऊन जा. तोसुद्धा तिकडंच जायच्या तयारीत आहे. त्याला समजलंय की, जगाच्या टोकापासून अवघ्या अर्ध्या मैलावर तर्कयंत्रणेच्या रोगांवर उपचार करणारं इस्पितळ आहे.

नट (चुलाण्यावरून डोकावत) : मूर्खा, शरीरयंत्र-णेच्या!

सातीन : दारूमुळे पोखरलेल्या तर्कयंत्रणांसाठी ...

नट : होय, तो जाणार. बघालच – तो जाणार!

बारोन : कोण तो, साहेब ?

नट : अस्मादिक !

बारोन : धन्यवाद ... त्या देवतेच्या सेवका ... काय त्या देवतेचं नांव ? नाटकं, शोकांतिका ... काय बरं तिचं नांव ?

नट : म्यूज, मठ्ठा ! देवता नव्हे – म्यूज !

सातीन : लाचेसिस ? हेरा ? आफ्रोदीत ? आत्रोपोम ? नेमकं काय नांव ते सैतानालाच ठाऊक ! त्या म्हाताऱ्यानं नटवर्याला असा निष्कारण बिथरवला. समजलं बारोन ?

बारोन : म्हातारा मूर्ख होता.

नट : अडाणी ! रानटी ! अंतःकरण नसलेली माणसं ! तुम्ही बघाल – तो जाणार ! "अज्ञानी मनांच्या माणसांनो, स्वतःला खाऊन फस्त करा !" कविता – बेरान्जेर !.. तो स्वतःला जागा शोधील, जिथं नसेल ... नसेल ...

बारोन : जिथं काहीही नसेल, साहेब ?

नट : हो ! काहीही नसेल ! "हा खळगा माझं थडगं बनेल ! ह्या अस्थिपंजर देहाला कुणीही वाचवू शकणार नाही !" कशाला तुम्ही जगता ? कशाला ?

बारोन : ए, एडमंड कीन अथवा प्रतिभावंत आणि व्यसनी ! बोंबलू नको !

नट : मी बोंबलणार !

नास्त्या (मेजावरून डोके वर उचलते आणि हात झटकते) : किंचाळ ! खुशाल ऐकू देत !

बारोन : काय अर्थ आहे त्यात, मेमसाहेब ?

सातीन : त्यांच्या नादी लागू नकोस, बारोन! गेले खड्ड्यात! खुशाल कोकलू देत! त्यांच्या कवट्या फुटतील! त्यात अर्थ आहे! म्हातारा म्हणाला होता – माणसाला अडथळा आणू नको! त्यानंच आपल्या सर्वांमध्ये हे आंबोण भिनवलं...

क्लेश्च : त्यांना कुठलीतरी भूल दाखवली, पण रस्ता न सांगता स्वत: पसार झाला.

बारोन : म्हातारा भंकस होता.

नास्त्या : खोटं! तू स्वत:च भंकस आहेस!

बारोन : चूप, मेमसाहेब!

क्लेश्च : म्हाताऱ्याला सत्य तर आवडायचं नाही. सत्याच्या अगदी विरोधी होता. तसंच असणं भाग होतं! खरंच, कसलं आलंय सत्य? पण त्याशिवाय आयुष्य नाही. प्रिन्सचंच पहा – कामावर हात तर मोडून घेतला. आता हात कापून काढावा लागणार आहे. हे घ्या सत्य!

सातीन (मेजावर मूठ आपटत) : चूप व्हा! तुम्ही सगळे गुरं आहात! मठ्ठ! त्या म्हाताऱ्याबद्दल एका अक्षरानं बोलू नका! (अधिक शांतपणे.) बारोन, तू सगळ्यात अतिवाईट आहेस. तुला काहीही समजत नाही. आणि तू खोटं बोलतोस. म्हातारा भंकस नव्हता. सत्य काय? माणूस. हेच सत्य! त्याला हे ठाऊक होतं – पण तुला नाही. तुमची डोकी विटांसारखी आहेत. मला तो समजला. अर्थात तो खोटं बोलायचा. पण केवळ करुणेपोटी, सैतानांनो! अनेक माणसं स्वत:-च्या बांधवांच्या कीवेपोटी खोटं बोलतात. मला माहीत

आहे. मी पुस्तकं वाचली आहेत. त्यांच्यात फार सुंदर रीतीनं खोटं सांगितलेलं असतं. ती तुम्हाला स्फूर्ती देतात, तुमच्यात खळबळ माजवतात. काही असत्यं माणसाचं सांत्वन करतात, त्याला नशीबाशी तडजोड करायला मदत करतात. कामगाराचा हात मोडून टाकणाऱ्या वजनाला असत्य सबब शोधतं. उपास-मारीनं मरणाऱ्या माणसांना असत्य दोषी ठरवतं. मला तुमची असत्यं माहीत आहेत. जे कच्च्या काळजाचे आहेत अथवा दुसऱ्याच्या जीवावर जगतात, त्यांनाच असत्यांची गरज भासते. काही माणसांना खोटयाचा आधार मिळतो, काही खोटयामागं दडतात. पण जो माणूस स्वतःच स्वतःचा मालक आहे, जो स्वतंत्र आहे आणि इतरांचं रक्त शोषत नाही – त्याला खोटयाची गरजच काय? असत्य हा गुलामांचा आणि मालकांचा धर्म आहे. सत्य स्वतंत्र माणसाचा देव आहे.

बारोन: वाहव्वा! छान बोललास! तुझ्या सर्व मनाशी मी सहमत आहे. एखाद्या प्रतिष्ठित माणसा-प्रमाणं तू बोलतोस!

सातीन: जर तुमची प्रतिष्ठित माणसं वारंवार लफंग्यांप्रमाणं बोलतात, तर लफंग्यानं काहीवेळा प्रति-ष्ठितांप्रमाणं का बोलू नये? अनेक गोष्टी मी आता विसरून गेलोय, पण तरीही एक-दोन लक्षात आहेत. म्हातारा मोठा चलाख होता. एखाद्या जुन्या, घाणेरडया नाण्यावर आम्लाची प्रतिक्रिया घडवावी, तसा परिणाम त्यानं माझ्यावर केला. त्याच्या आरोग्यासाठी पिऊ या! माझा ग्लास भरा!

नास्त्या सातीनच्या ग्लासात बीयर भरून त्याच्या हाती देते.

(सातीन किंचित हसतो.) म्हातारा स्वतःच्या बुद्धीवर जगतो. आपल्या डोळ्यांनी तो सगळं पाहतो. एक दिवस मी त्याला म्हणालो: "आजोबा, माणसं कशा-साठी जगतात?" (लूकाच्या आवाजाची आणि लकबींची नक्कल करत.) "आयुष्य अधिक चांगलं बनवण्या-साठी ती जगतात, माझ्या मित्रा. आता उदाहरणा-दाखल आपल्याकडं काही सुतार आहेत – सगळे फालतू. पण मग त्यांच्यात एक अस्सल सुतार जन्मतो... यापूर्वी पृथ्वीवर कधी झाला नव्हता असा सुतार! त्याच्या तेजापुढं सगळे फिके पडतात. सगळ्या सुतारकामावर तो स्वतःचा असा शिक्का ठेवतो की, एकाच उडीत कारागिरी वीस वर्षांनी पुढं जाते. इतर माणसांबाबत हेच घडतं – जस्तवाले, चांभार, इतर कामकरी माणसं आणि शेतकरीसुद्धा जमीनदारसुद्धा. सगळे अधिक चांगल्यासाठी जगतात. प्रत्येकाला वाटतं, तो स्वतः-साठी जगतोय – पण प्रत्यक्षात तो अधिक चांगल्यासाठी जगत असतो. जवळजवळ शंभर वर्षं ते जगतात – कदाचित आणखीसुद्धा, आणि सगळे अधिक चांगल्या-साठी."

नास्त्या सातीनकडे एकाग्र नजरेने पाहते. क्लेश्चसुद्धा ॲकॉर्डियनची दुरुस्ती थांबवून ऐकत राहतो. बारोन मुंडी स्वतःच्या छातीवर झुकवून मेजावर बोटांनी हलका ताल धरतो. नट मुकाटपणे चुलाण्यावरून खाली उतरतो आणि एका फळीवर बसतो.

म्हातारा म्हणतो – "माझ्या भल्या मित्रा, सगळी माणसं. अगदी एकूणएक, अधिक चांगल्यासाठी जगतात. आपण एकमेकांचा विचार केला पाहिजे. कारण एखादी व्यक्ती कोण आहे, ती का जन्मली आणि काय करू शकते. हे पाहणं आपलं काम नव्हे. कदाचित आपल्या भाग्यासाठी, आपल्याला मोठी मदत व्हावी, म्हणून त्या व्यक्तीचा जन्म झाला असेल. विशेषत: लहान मुलांचा आपण आदर केला पाहिजे. त्या छोट्यांना स्वातंत्र्याची गरज आहे. आपण त्यांच्यात लुडबूड करू नये. त्यांचा आपण आदर राखला पाहिजे." (हसतो.)

स्तब्धता.

बारोन (विचारमग्न होत) : हं! अधिक चांगल्या-साठी? माझ्या घराण्याची मला आठवण झाली... जुनं घराणं... येकातेरीना राणीच्या काळापासूनचं... उमराव... योद्धे. फ्रान्सहून आलेले... झारची सेवा करत वर वर चढत गेलेले. पहिल्या निकोलायच्या अमदानित माझे आजोबा – गुस्ताव देबिल – फार वरच्या पदावर होते. संपत्ती... शेकडो भूदास... घोडे... आचारी...

नास्त्या : खोटारडा! असं काहीही नव्हतं!

बारोन (झटकन उठत) : का... य? पुढे?!

नास्त्या : असं काहीही नव्हतं!

बारोन (ओरडतो) : मॉस्कोत घर! पीटरबुर्गमध्ये घर! घोडागाड्या... घराण्याचं चिन्ह मिरवणाऱ्या घोडागाड्या!

क्लेश्च ॲकॉर्डियन उचलतो व एका कोपऱ्यात जाऊन बसतो. आणि तेथून न्याहाळू लागतो.

नास्त्या : असं काही नव्हतं!

बारोन : चूप! मी सांगतो... अनेक हुजरे...

नास्त्या (गंमत आवडून) : असं काही नव्हतं!

बारोन : ठार मारीन!

नास्त्या (पळून जाण्याच्या तयारीत) : घोडागाड्या नव्हत्या!

सातीन : पुरे नास्त्या! त्याला चिडवू नको.

बारोन : थांब... तू हलकटे! माझे आजोबा...

नास्त्या : आजोबा नव्हते! काहीही नव्हतं!

सातीन खो खो हसतो.

बारोन (संतापापायी थकून बाकड्यावर बसत) : सातीन... सांग तिला – त्या कुत्रीला... तूसुद्धा हसतोस? तू... तुझाही विश्वास नाही बसत? (मेजावर मुठी आपटत निराशेने ओरडतो.) ह्या सगळ्या गोष्टी होत्या – हलकटांनो!

नास्त्या (विजयी स्वरात) : आहा – किंचाळतोस! समजलं – माणसावर जेव्हा कुणीही विश्वास ठेवत नाही तेव्हा त्याला कसं वाटतं ते?

क्लेश्च (मेजापाशी परत येत) : मला वाटलं – जोरदार मारामारी होणार!

तातारीन : छ्या! मूर्ख माणसं! फार वाईट!

बारोन : माझी थट्टा कुणी केलेली मला सहन होत नाही! माझ्यापाशी पुरावे आहेत... दस्तऐवज आहेत, सैतानांनो!

सातीन : फेकून दे ! आणि आजोबांच्या घोडागाड्या विसरून जा ! भूतकाळातल्या बग्गींमधून कुठंही सफरीला जाणार नाहीस.

बारोन : तिची हिंमत कशी झाली ?

नास्त्या : सांगा – कशी हिंमत झाली ?

सातीन : पाहिलंस – हिंमत आहे तिची ! काय कमी आहे तिच्यात तुझ्यापेक्षा ? जरी पूर्वी कदाचित केवळ बग्ग्या आणि आजोबाच नव्हेत, तर आई-बापही तिला नसतील !

बारोन (शांत होत) : सैतान तुझा नायनाट करो ! तू शांतपणं विचार करू शकतोस. मला वाटतं... मला स्वभावच नाही !

सातीन : एक मिळव. उपयोगी पडेल.

स्तब्धता.

नास्त्या, तू कधी इस्पितळात जातेस ?

नास्त्या : कशाला ?

सातीन : नताशाकडं ?

नास्त्या : तुला उशीर झाला ! ती केव्हाच बाहेर पडली. आणि गायब झाली. कुठंही तिचा मागमूस नाही.

सातीन : म्हणजे – संपूर्ण गेली !

क्लेश्च : खरंच – कोण कुणाला जास्त जोरात दणका मारील ? वास्या वासिलिसाला, किंवा ती त्याला ?

नास्त्या : वासिलिसा सुटून परत येणार ! ती लबाड आहे. पण वास्याला सक्त मजुरीवर सैबेरियात धाडणार !

सातीन : मारामारीत खून घडल्यास – फक्त तुरुंगात.

नास्त्या : वाईट ! सक्तमजुरी जास्त चांगली. तुम्हा सर्वांना सक्तमजुरीवर धाडलं पाहिजे. केरकचऱ्याप्रमाणं लोटून एखाद्या खड्डयात फेकून दिलं पाहिजे.

सातीन (चकित होऊन) : काय झालं तुला ? पिसाळलीस ?

बारोन : तिच्या कानशीलात एक हाणतो ! आगा-वूपणाबद्दल !

नास्त्या : अंगाला हात तर लावून बघ !

बारोन : लावीन !

सातीन : पुरे ! तिच्या अंगावर हात टाकू नको. माणसाचा अपमान करू नको. माझ्या टाळक्यातून तो म्हातारा निघत नाही. (खो खो हसतो.) माण-साला दुखवू नको ! पण एकदा जर मला दुखावलं – ज्यातून मी कधीही बरा होणार नाही अशा रीतीनं ? तर काय ? क्षमा करायची ? कधीही नाही ! कुणाला-ही !

बारोन (नास्त्याला) : तुला समजलं पाहिजे की, तू माझ्या बरोबरीची नाहीस. तू ... गाळ आहेस !

नास्त्या : अरे हतभाग्या ! राहतोस तर माझ्या जीवावर ... सफरचंदामधल्या किड्यासारखा !

पुरुष खो खो हसतात.

क्लेश्च : हात् वेडे ! सफरचंद !

बारोन : कसं रागवायचं हिच्यावर ! येडपट आहे.

नास्त्या : हसताय ? स्वत:ला फसवताय ! तुम्हाला खरं म्हणजे हे गंमतीचं वाटलेलं नाही.

नट (उदासपणे) : हाण त्यांना !

नास्त्या : जर मला शक्य असतं, तर तुम्हाला (मेजावरून कप उचलून फरशीवर फेकते) ... असं फेकलं असतं !

तातारीन : भांडी कशाला फोडतेस ? ए, मूर्खे !

बारोन : (उठत) : नाही ... आता मी तिला रीत-भात शिकवतोच !

नास्त्या (पळून जात) : सैतान तुमचा नायनाट करो !

सातीन (तिला हाक मारत) : ए ! पुरे ! कुणाला तू घाबरवतेस ? शेवटी भानगड तरी काय ?

नास्त्या : लांडगे ! घुसमटून मेलात तर छान ! लांडगे !

नट (उदासपणे) : तथास्तु !

तातारीन : ऊ-ऊ ! वाईट बाई – रशियन बाई ! लहरी – मोकाट ! तातार बाई अशी नसते ! तातार बाईला कायदा माहीत असतो.

क्लेश्च : तिला चांगला इंगा दाखवला पाहिजे.

बारोन : र ... रांड !

क्लेश्च (ॲकॉर्डियनचा सूर लावत) : तयार ! पण त्याचा मालक अजून आला नाही. पोरगा तळमळतोय.

सातीन : आता, पी !

क्लेश्च : धन्यवाद. मुटकुळीची वेळ झाली.

सातीन : आमची सवय झाली ?

क्लेश्च (पितो आणि कोपऱ्यात पलीकडे जात) : ठीक आहे. माणसं सगळीकडंच असतात. पहिल्यांदा

हे दिसत नाही. नंतर नीट पाहिलं म्हणजे दिसतं – सगळी माणसंच!

तातारीन स्वतःच्या बिछान्यावर एक फडके पसरतो आणि गुडघे टेकून प्रार्थना करू लागतो.

बारोन (तातारीनकडे सातीनचे लक्ष वेधत) : बघ!

सातीन : असू दे! तो छान पोरगा आहे. त्याला त्रास देऊ नको! (हसतो.) आज मी फार प्रेमळ बनलोय! कारण मात्र सैतानालाच ठाऊक!

बारोन : जेव्हा तू दारू पितोस, तेव्हा तू नेहमी प्रेमळ बनतोस. आणि हुषारसुद्धा.

सातीन : जेव्हा मी झिंगतो तेव्हा मला सगळं आवडतं. खरंच... तो प्रार्थना करतोय? फार उत्तम! माणसाची श्रद्धा असेल अथवा नसेल – ती त्याची स्वतःची बाब! माणूस स्वतंत्र आहे. सगळ्या गोष्टींची किंमत तो स्वतः मोजतो – धर्माची, नास्तिकपणाची, प्रेमाची, अकलेची! माणूस ह्या सगळ्याची किंमत स्वतः मोजतो – म्हणून तो स्वतंत्र! माणूस – हेच सत्य! माणूस म्हणजे काय? म्हणजे तू नव्हे, मी नव्हे, ते नव्हेत... नाही! – म्हणजे तू, मी, तो, म्हातारा, नेपोलियन, महंमद... सगळे एकत्र! (बोटाने हवेत माणसाची आकृती रेखाटतो.) समजलं? हे महाप्रचंड आहे! त्यात सगळा आरंभ आणि सगळी अखेर! माणसात जे काही आहे ते सर्व माणसासाठी! फक्त माणूस तेवढा अस्तित्वात आहे – बाकी सगळ्या त्याच्या हाताच्या आणि मनाच्या निर्मिती. मा-णू-स! हे अतिउत्तम! ऐकताना गौरव

वाटतो ! मा-णू-स ! माणसाचा मान राखला पाहिजे ! त्याची कीव नाही करायची ... कीव करून त्याची किंमत कमी नाही करायची ... त्याचा मान राखायला हवा ! बारोन, माणसासाठी पिऊ या ! (उठतो.) स्वतःला माणूस म्हणून जाणवण्यात मजा आहे. मी – माजी गुन्हेगार, खुनी, जुगारी ... खरंच ! रस्त्यावरून जातो तेव्हा लोक मला चोर समजतात ... जरा बाजूला होतात आणि भेदरट कटाक्ष टाकतात ... आणि अनेकदा मला म्हणतात – "हलकट ! फसव्या ! काम कर !" काम करायचं ? कशासाठी ? पोट भरावं म्हणून ? (हसतो.) स्वतःच्या पोटोबाची सदैव चिंता करणाऱ्या माणसांचा मला तिटकारा आहे. बारोन, पोट म्हणजे मुख्य गोष्ट नाही. खरंच नाही ! माणूस त्यापेक्षा श्रेष्ठ आहे ! माणूस पोटापेक्षा थोर आहे !

बारोन (डोके हलवीत) : तू असा विचार करतोस हे छान आहे. काळीज गरम व्हायला त्यामुळं मदत होते. पण मला मात्र असं जमत नाही. (सभोवती नजर टाकतो व दबत्या आवाजात.) बंधू, मला कधी कधी भीती वाटते. समजलं ? घाबरायला होतं ... कारण – पुढे काय ?

सातीन (येरझाऱ्या घालत) : फालतूपणा ! माणसानं कुणाला भ्यायचं ?

बारोन : मला आठवतं त्या काळापासून माझ्या डोक्यात धुकं भरलंय ! कधीही काहीही मला समजलं नाही. मला जमलंच नाही. मला भासतं, सगळं आयुष्यभर मी नुसते कपडे बदलतोय ! कशासाठी ?

नाही कळत! शिकलो – उमरावांच्या पोरांच्या इन्स्टिट्यूटमध्ये गणवेष घालून शिकत होतो. काय शिकलो? आठवत नाही. लग्न केलं. सूट घातला. मग गाऊन घातला. बायको वाईट निवडली. कशाला? नाही समजत! सगळी इस्टेट उधळली कुठलीतरी ब्रिटकी विजार आणि राखाडी जाकीट घालून फिरलो. कसं गमावलं सगळं? लक्षात नाही आलं... सरकारी खजिन्याच्या कचेरीत नोकरी केली. परत गणवेष. बिल्ला लावलेली टोपी. सरकारी पैशांची अफरातफर केली. माझ्या अंगात कैद्याचे कपडे घातले... नंतर... ह्या चिंध्या वापरतोय. बास्स! सगळं स्वप्नातल्यासारखं. काय? गंमतीदार आहे?

सातीन: फारसं मजेदार नाही. मूर्खपणाच जास्त आहे.

बारोन: मलासुद्धा हा मूर्खपणाच वाटतो. खरंच... कशासाठी तरी मी जन्मलो असलो पाहिजे... होय ना?

सातीन (हसत): तसं असावं. माणूस अधिक चांगले आयुष्य बनवण्यासाठी जन्मतो. (मान हलवीत.) छान शब्द!

बारोन: ही... नास्त्या! कुठं पळाली? जाऊन पाहतो... कुठं आहे ती? काही झालं तरी ती... (बाहेर जातो.)

स्तब्धता.

नट: तातारीन!

स्तब्धता.

ग्रेन्म!

तातारीन डोके वळवतो.

माझ्यासाठी प्रार्थना कर!

तातारीन : काय?

नट (हळूच) : प्रार्थना कर... माझ्यासाठी!

तातारीन (थोडे थांबून) : तू स्वतःच प्रार्थना कर!

नट (पटकन चुलाण्यावरून खाली उतरतो, मेजापाशी जातो, थरथरत्या हातांनी वोदका ग्लासात ओततो. पितो आणि जवळ जवळ बाहेर पळतो) : मी निघालो!

सातीन : अरे ए! सिकाम्ब्री! कुठं? (शीळ वाजवतो.)

प्रवेश करतात : बायकी सुती बंडीत मेदवेदेव व बूब्नोव ; दोघेही दारू प्यायलेले, पण फारसे झिंगलेले नाहीत. बूब्नोवच्या एका हातात गाठाळ बिस्कीटांची माळ आणि दुसऱ्या हातात धुरावलेले काही मासे. एका खाकोटीत वोदकाची बाटली आणि कोटाच्या खिशातून दुसरी बाटली डोकावते आहे.

मेदवेदेव : उंट काहीसा गाढवासारखा असतो! फक्त बिनकानांचा!

बूब्नोव : पुरे! तू स्वतःच गाढवासारखा आहेस!

मेदवेदेव : उंटाला मुळी कानच नाहीत! तो नाकपुड्यांनी ऐकतो!

बूब्नोव (सातीनला) : मित्रा, मी तुला सगळ्या गुत्त्यांमधून शोधलं! घे बाटली. माझे सगळे हात गुंतलेले आहेत.

सातीन : तू ती बिस्कीटं टेबलावर ठेव... म्हणजे एक हात मोकळा होईल.

बूब्नोव : बरोबर! अरे पहा जरा ह्याला! किती हुषार आहे नाही ?

मेदवेदेव : चोर साले सगळे हुषार – मला ठाऊक आहे! अकलेविना त्यांचं चालणार नाही. चांगला माणूस मूर्ख असू शकतो, पण वाईट माणसाला हमखास अक्कल असली पाहिजे! पण त्या उंटाबाबत तुझं साफ चुकलं! ते ओझ्याचं जनावर! ना त्याला शिंगं, ना दात!

बूब्नोव : माणसं कुठं आहेत? का बरं इथं माणसं नाहीत? ए, उतर खाली! मी दारू पाजतो! कोण आहे त्या कोपऱ्यात?

सातीन : तुझा शेवटचा कोपेक दारूत केव्हा संपणार? बुजगावण्या!

बूब्नोव : फार काळ नाही उरला! ह्यावेळी साठवलेलं भांडवल फार मोठं नव्हतं... झोब ! झोब कुठाय ?

क्लेश्च : (मेजापाशी येत) : नाही तो...

बूब्नोव : उ र्‌ र्‌ र्‌! तू फेंदाड कुत्र्या! गु र्‌ र्‌ र्‌! भुंकू नको! वटवट नको! पी, भटक, मुंडी खाली घालून उभा राहू नको... मी सगळ्यांना दारू पाजतो! बंधू, मला पाजायला आवडतं! जर मी धनवान

असतो तर मोफत गुत्ता उघडला असता! देवाशप्पत! मगीनासकट... गाणाऱ्यांसकट! ये, पी, खा, ऐक गाणी... मनाला हलकं कर! पैसा नाही? घे— मोफत गुत्ता! सातीन! मी तुला... तुला माझ्या भांडवलामधले निम्मे पैसे देऊन टाकले असते!

सातीन : तू मला आत्ता दे सगळे!

बूब्नोव : सगळं भांडवल? आत्ता? घे— रूबल... आणखी... वीस कोपेक... पाच कोपेक... सूर्यफुलाच्या बिया... संपलं!

सातीन : ठीक आहे! माझ्यापाशी सुरक्षित राहतील! त्यांच्यावर मी जुगार खेळीन.

मेदवेदेव : मी साक्षीदार आहे. सुरक्षित ठेवण्यासाठी पैसे दिले... तारखेला! किती?

बूब्नोव : तू? तू— उंट! आम्हाला साक्षीदार नकोत!

आल्योश्का (अनवाणी प्रवेशतो): बंधूंनो, माझे पाय मी ओले केले!

बूब्नोव : ये... घसा ओला कर! तुला त्याचीच गरज आहे. बेटया, तू गातोस आणि वाजवतोस... हे फार छान! पण पितोस निष्कारण! बंधू, हे फार वाईट! पिणं— फार वाईट!

आल्योश्का : तुझ्यावरून मला ते दिसतं! तू जेव्हा झिंगलेला असतोस, तेव्हाच फक्त माणसासारखा वागतोस! क्लेश्च! ॲकॉर्डियन दुरुस्त केलं? (नाचत गातो.)

अरे माझा मुखडा

नसता जर छकडा—

लाडकीनं माझ्यावर
जीव नसता टाकला!..

बंधूंनो, थंडी वाजत्येय! पा... पार... ग... गारठलो!

मेदवेदेव: हं... कोण ही तुझी लाडकी?

बूब्नोव: गप्प रहा! बंधू, आता तू खलास! आता तू नाहीस पोलीस आणि नाहीस काका...

आल्योश्का: फक्त मावशीचा नवरा!

बूब्नोव: तुझी एक पुतणी – तुरुंगात! दुसरी – मरणाच्या पंथाला...

मेदवेदेव (गर्वाने): खोटं! ती मरत नाही. ती फक्त नाहीशी झाली!

सातीन खो खो हसतो.

बूब्नोव: काय फरक, बंधो? पुतण्यांशिवाय माणूस – काका नाही!

आल्योश्का: सरकारसाहेब! सेवानिवृत्त ड्रमवाला बोकड!

लाडकीपाशी पैसा बक्कळ
माझ्यापाशी छदाम नाही!
म्हणूनच मी बिनधास्त
म्हणूनच मी झक्कास!..

थंडी वाजतेय!

झोब प्रवेश करतो; नंतर – अंकाच्या अखेरीपर्यंत काही पुरुष व स्त्रिया रंगभूमीवर राहतात. ही माणसे कपडे बदलतात, फळ्यांवर बिछाने पसरतात आणि कुरकुरत आडवी होतात.

क्रीवोय झोब: बूब्नोव! तू का पळालास?

बूब्नोव : इकडं ये ! बैस ... गाणं म्हणू या बंधो ! मला आवडतं ... आं ?

तातारीन : रात्र झाली – झोपलं पाहिजे ! गाणी उद्या म्हणा !

सातीन : काही बिघडत नाही, प्रिन्स ! तू इकडं ये !

तातारीन : काय बिघडत नाही ? गोंगाट होईल ... जेव्हा गाणी म्हणतात तेव्हा गोंगाट होतो.

बूब्नोव (त्याच्यापाशी जात) : प्रिन्स ! हात कसा आहे ? छाटला का तुझा हात ?

तातारीन : कशाला ? वाट बघू ... कदाचित नाही छाटावा लागणार ... हात काही लोखंडाचा नाही. कापायला फार वेळ नाही लागायचा !

क्रीवोय झोब : आसान, तुझा अवतार संपला ! हाताशिवाय तुला कुठंही थारा मिळणार नाही ! बंधू, आपल्या हातांवर आणि पाठींवर आपलं मोल ठरतं ! हात नाही – म्हणजे माणूस नाही ! आटपला तुझा अवतार ! ये वोदका प्यायला आणि विसर सगळं !

क्वाश्न्या (प्रवेश करत) : रामराम माझ्या लाडक्यांनो ! बाहेर कडाक्याचा गारठा पडलाय ! माझा पोलीस इथं आहे ? हवालदार !

मेदवेदेव : मी ?

क्वाश्न्या : परत माझी बंडी घातलीस ? आणि दोन घोट मारलेले दिसतात ? काय विचार आहे तुझा ?

मेदवेदेव : बूब्नोवच्या वाढदिवसानिमित्त ! शिवाय गारठा पडलाय ...

क्वाश्न्या : माझ्याकडं बघ ! गारठा म्हणे ! फार

लाडात येऊ नको. झोपायला चल!

मेदवेदेव (स्वयंपाकघरात जात): झोपणं मला जमेल. खरंच, खूप वेळ झाला!

सातीन: तू एवढी कडक का वागतेस त्याच्याशी?

क्वाश्न्या: मित्रा, दुसऱ्या रीतीनं वागून चालणार नाही. त्याच्यासारख्या पुरुषावर घट्ट पकड ठेवली पाहिजे. माझ्याबरोबर मी त्याला रहायला घेतलं तेव्हा वाटलं होतं – त्याचा मला काही उपयोग होईल... शिपाईगडी आहे आणि तुम्ही लोक असे दंगेखोर – मी बिचारी बाईमाणूस एकटी! पण तो प्यायला लागलाय. मला हे खपायचं नाही!

सातीन: वाईट मदतनीस निवडलास तू!

क्वाश्न्या: त्याहून चांगले नाहीतच! तुला माझ्या-बरोबर रहायची इच्छा नाही – फार गर्विष्ठ आहेस! माझ्याशी रहायला लागलास तर एक आठवड्याहून जास्त टिकणार नाहीस... माझ्या फाटक्या इस्टेटीसकट मला जुगारात फुंकून टाकशील!

सातीन (खो खो हसत): हे मात्र खरं! मी तुला जुगारात नक्की लावीन!

क्वाश्न्या: तेच तर! आल्योश्का!

आल्योश्का: मी इथं आहे.

क्वाश्न्या: माझ्याबद्दल काय अफवा उठवतोस?

आल्योश्का: मी? फक्त सत्य! सांगतो – ही बाई आहे बघा तुमच्यासाठी! आश्चर्यकारक! मांस, चरबी, हाडं मिळून दहा पूड वजनाची – आणि मेंदू औंसभरसुद्धा नाही!

क्वाश्न्या : हे तू खोटं बोलतोस ! मला खूप मोठा मेंदू आहे ... ते नव्हे ! माझ्या पोलीसाला मी बडवते असं का सांगतोस ?

आल्योश्का : मला वाटलं ... जेव्हा त्याच्या झिंज्या पकडून तू त्याला फरफटत आणलंस, तेव्हा तू त्याला चोप दिलास ! ..

क्वाश्न्या (हसून) : गाढव ! तू न पाहिल्याचा बहाणा करायचास ! सगळ्यांपुढं आपली लक्तरं कशाला मांडनोस ? शिवाय ... त्याला वाईट वाटतं. तुझ्या अशा कंड्या पिकवण्यापायी तो दारू प्यायला लागला !

आल्योश्का : म्हणजे ती म्हण खरी ठरली – कोंबडीचं पिल्लूसुद्धा दारू पितं !

सातीन आणि क्लेश्च खो खो हसतात.

क्वाश्न्या : अरे लांब जिभेच्या ! आल्योश्का, असा कसा रे तू ?

आल्योश्का : नंबर एकचा माणूस ! माझे सगळे हात वापरतो ! आणि जिकडं माझी नजर – तिकडं माझा म्होरा !

बूब्नोव (तातारीनच्या फळीपाशी) : चल ! काही झालं तरी झोपायला देणार नाही ! सबंध रात्रभर गाणी म्हणू ! झोब !

क्रीवोय झोब : गाणी म्हणायची ? चालेल !

आल्योश्का : आणि मी साथीला वाजवतो.

सातीन : आम्ही ऐकू !

तातारीन (स्मित करत) : अरे सैतान बूब्ना !

आण दारू ! दारू पिऊ, मजा करू, मरण आलं तर मरणाला कवटाळू !

बूब्नोव : सातीन, ओत त्याला ! झोब, बैस ! बंधूंनो ! माणसाला कितीसं लागतं ? मी ... पाहिलंत ... खूष ! झोब ! माझं आवडतं गाणं म्हण ! गाणार आणि भरपूर रडणार !

क्रीवोय झोब (गातो) :

रविराजा उगवतो नि मावळतो ...

बूब्नोव (त्याचा सूर पकडून) :

कारागृहाच्या कोठडीत माझ्या अंधार ...

धाडदिशी दरवाजा उघडतो.

बारोन (दारात उभा राहून ओरडतो) : अरे, मंडळी ! इकडं या ! बाहेरच्या रिकाम्या जागेत ... नटवर्यानं स्वतःला फास लावून घेतला !

सगळे गप्प होतात. सर्वांची नजर बारोनकडे. त्याच्या पाठीमागून नास्त्या अवतरते आणि मंद पावलांनी, डोळे विस्फारून मेजाकडे येते.

सातीन (अस्फुट आवाजात) : छीः ! विचका केला गाण्याचा ! महामूर्ख !

पडदा

१९०२

दृचावाले

दृश्ये

■



पात्र-परिचय

बासोव, सेर्गेइ वासिल्येविच – अॅडव्होकेट, वय सुमारे ४०.
वार्वारा मिखायलोवना – त्यांची पत्नी, २७ वर्षे.
कालेरीया – बासोव यांची बहीण, २९ वर्षे.
व्लास – बासोव यांच्या पत्नीचा भाऊ, २५ वर्षे.
सूस्लोव, प्योत्र इवानोविच – इंजिनिअर, ४२ वर्षे.
यूलीया फिलीप्पोवना – त्यांची पत्नी, ३० वर्षे.
दूदाकोव, किरिल आकीमोविच – डॉक्टर, ४० वर्षे.
ओल्गा अलेक्सेयेवना – त्यांची पत्नी, ३५ वर्षे.
शालीमोव, याकोव पेत्रोविच – साहित्यिक, ४० वर्षे.
र्‍यूमिन, पावेल सेर्गेयेविच – ३२ वर्षे.
मार्या ल्वोवना – डॉक्टर, ३७ वर्षे.
सोन्या – त्यांची कन्या, १८ वर्षे.
द्वोयेतोचिये, सेम्योन सेम्योनोविच – सूस्लोव यांचे काका, ५५ वर्षे.
झामीस्लोव, निकोलाय पेत्रोविच – बासोव यांचा मदतनीस, २८ वर्षे.
झीमिन – विद्यार्थी, २३ वर्षे.
पूस्तोबायका – दाचांचा राखणदार, ५० वर्षे.
क्रोपिल्किन – राखणदार.
साशा – बासोवांची मोलकरीण.

नोंड गुंडाळून घेतलेली बाई श्रीयुत सेम्योनोव पिवळ्या पोषाखातील तरुणी चौकडीच्या सुटातील तरुण निळ्या पोषाखातील तरुणी गुलाबी पोषाखातील तरुणी युंकर उंच टोपीतील गृहस्थ	} हौशी कलावंत

अंक पहिला

बासोवांचा दाचा. मोठ्या खोलीचा एकाचवेळी भोजन-दालन आणि दिवाणखाना म्हणून वापर. रंगभूमीच्या मागील भागात डावीकडे बासोव यांच्या अभ्यासिकेकडे जाणारे दार. उजवीकडील दार त्यांच्या पत्नीच्या खोलीचे. ह्या खोल्यांना कॉरीडॉरने वेगळे केले आहे. त्याच्या दारावर काळपट पडदे टांगले आहेत. उजव्या भिंतीत एक खिडकी आणि व्हरांड्याकडे जाणारे मोठे दार. डाव्या भिंतीत दोन खिडक्या. खोलीच्या मध्यभागी मोठे टेबल आणि अभ्यासिकेच्या दारासमोर मोठा पियानो. सर्व फर्निचर वेताचे, दाचाच्या धर्तीचे; फक्त कॉरीडॉरच्या दारापाशी रुंद दिवाण, त्यावर राखी आच्छादन. संध्याकाळ. बासोव अभ्यासिकेत टेबलापाशी बसले आहेत. टेबलावर हिरव्या शेडचा दिवा पेटलेला. ते दाराशी तिरपे बसून लिहीत आहेत, मोठ्या खोलीतील अर्धवट अंधाराकडे मधून मधून वळून पहात आहेत आणि स्वतःशी काहीतरी गुणगुणत आहेत. वार्वारा आवाज न करता स्वतःच्या खोलीमधून बाहेर येते, काडी पेटवून तोंडासमोर धरते व सभोवार पाहते. काडी विझते. अंधारात हलक्या पावलांनी ती खिडकीपाशी जात असताना खुर्चीला आदळते.

बासोव : कोण आहे ?

वार्वारा : मी .

बासोव : अस्सं ...

वार्वारा : तू मेणबत्ती घेतलीस ?

बासोव : नाही .

वार्वारा : साशाला बोलाव घंटी वाजवून .

बासोव : क्लास आला ?

वार्वारा (व्हरांड्याच्या दारापाशी) : माहीत नाही ...

बासोव : वेडपट दाचा . सगळीकडं विजेच्या घंटा बसवल्यात , पण भिंतींना तडे गेलेत आणि तक्तपोशीच्या फळ्या करकरताहेत ... (काहीतरी आनंदी गाणे गुण-गुणतो .) वार्या , तू गेलीस ?

वार्वारा : मी इथं आहे ...

बासोव (कागद गोळा करून ठेवत) : तुझ्या खोलीत वाऱ्याचे झोत येतात ?

वार्वारा : होय ...

बासोव : पाहिलंस !

साशा प्रवेश करते .

वार्वारा : दिवा आणा , साशा .

बासोव : साशा , क्लास मिखायलोविच आला ?

साशा : अजून नाही .

साशा जाते , दिवा घेऊन परत येते आणि आराम-खुर्चीजवळच्या टेबलावर दिवा ठेवते . रक्षापात्र पुसते , जेवणाच्या टेबलावरील आच्छादन व्यवस्थित करते .

वार्वारा पडदे ओढते, फडताळावरून एक पुस्तक घेते आणि आरामखुर्चीत बसते.

बासोव (भलेपणाने) : हा फार अव्यवस्थित वागायला लागलाय, क्लास... आणि आळशी... अलिकडं तर अजिबातच चमत्कारिक वागतोय. ही वस्तुस्थिती आहे.

वार्वारा : तुला चहा पाहिजे ?

बासोव : नको. मी सूस्लोवांकडं जातो.

वार्वारा : साशा, ओल्गा अलेक्सेयेवनाकडे जा... त्यांना विचारा, माझ्याकडं त्या चहा प्यायला येत आहेत किंवा नाही...

साशा जाते.

. **बासोव** (खणात कागद ठेवत) : संपलं! (पाठ ताठ करत अभ्यासिकेतून बाहेर येतात.) वार्या, तू त्याला सांगितलंस तर बरं होईल... अर्थात नरम शब्दात.

वार्वारा : काय सांगायचं ?

बासोव : म्हणावं की, जरा जबाबदारीनं स्वतःची कामं पार पाडत जा... अं ?

वार्वारा : मी सांगीन. फक्त मला वाटतं, साशासमोर तू निष्कारण ह्या गोष्टी बोलतोस.

बासोव (खोलीत नजर टाकत) : त्यात काय विशेष! नोकरांपासून कितीही केलं तरी लपून रहात नाही. किती रिकामं वाटतं इथं... वार्या, ह्या मोकळ्या भिंती कशानंतरी झाकल्या पाहिजेत... कसल्यातरी फ्रेम-

नी... चित्रांनी... बघ, कसं भकास वाटतंय!.. बरं, मी चलतो. तुझा हात दे लाडके. फार थंड वागत्येस माझ्याशी. मुळीच बोलत नाहीस... कशामुळं असं? तुझा चेहरा असा कंटाळलेला, कशामुळं? सांग!

वार्वारा: सूस्लोवांकडं जायची तुला खूप घाई आहे?

बासोव: होय, गेलं पाहिजे. त्यांच्याबरोबर खूप दिवसात बुद्धिबळ खेळलो नाही... आणि खूप दिवसात तुझ्या हाताचं चुंबन घेतलं नाही... का? आश्चर्य आहे.

वार्वारा (स्मित लपवत): तर माझ्या मन:स्थितीबाबत चर्चा करणं आपण लांबणीवर टाकू... तुला सवड मिळेपर्यंत... तसं काही हे महत्त्वाचं नाही, होय ना?

बासोव (शांत करण्याचा प्रयत्न करत): अर्थातच! मी आपलं सहज बोललो... काय असू शकणार? तू छान बाई आहेस... हुशार, प्रामाणिक... आणि तत्सम. जर माझ्याविरुद्ध तुझी काही तक्रार असती, तर तू मला सांगितली असतीस... तुझे डोळे कशामुळं एवढे चमकताहेत?.. बरं वाटत नाही?

वार्वारा: नाही, मी ठणठणीत आहे.

बासोव: तुला काहीतरी उद्योगात स्वत:ला गुंतवून घेतलं पाहिजे, माझ्या लाकडे वार्या! तू सारखी वाचत असतेस... खूप वाचतेस!.. पण असा अतिरेकी नाद लावून घेणं चांगलं नव्हे – विसरू नकोस!

वार्वारा: आणि ही गोष्ट तूही विसरू नकोस, जेव्हा सूस्लोवांकडं लाल मदिरा पीत बसशील...

बासोव (हसून) : हे तू दुष्टाव्यानं बोललीस! पण ही सगळी आधुनिक, खमंग पुस्तकं मदिरेपेक्षा जास्त अपायकारक आहेत – खरंच! त्यांच्यात काहीतरी अंमली आहे... आणि त्यांची रचना करतात मनाचा तोल गेलेले काही सद्‌गृहस्थ. (जांभई देतो.) लौकरच आपल्याकडं एक लेखक उगवायचा आहे. मुलांच्या भाषेत "नेक-भला" असा... खरंच, आता तो कसा बनलाय कुणास ठाऊक! बहुधा थोडी 'ग' ची बाधा झाली असणार. ही सगळी सार्वजनिक प्रसिद्ध माणसं कमालीची पीडादायी गर्विष्ठ असतात. एकूणच विचित्र माणसं! आपली कालेरीयासुद्धा अशीच विचित्र – खरं तर ती कुठली आलीय लेखिका? शालीमोवला पाहून तिला आनंद होईल. तिनं त्याच्याशी लग्न केलं तर छान होईल! वय झालंय तिचं... खरंच! वय झालंय तिचं... आणि सतत दात दुखत असावा त्याप्रमाणं तक्रारी करत असते! तसं रूपही सामान्य!

वार्वारा : किती अनावश्यक गोष्टी बोलतोस, सेर्गेइ!

बासोव : खरंच? काही बिघडत नाही, आपण दोघंच तर आहोत. होय, बडबडायला मला आवडतं... (पडद्याच्या दुसऱ्या बाजूला कुणीतरी खोकल्याचा आवाज.) कोण आहे?

सूस्लोव (पडद्यामागून) : मी.

बासोव (त्यांना भेटायला जात) : आणि मी तुझ्या-कडं यायला निघालो होतो!

सूस्लोव (मूकपणे वार्वाराला अभिवादन करतो) : चला. मी तुला घेऊन जाण्यासाठी आलोय... आज तू

...गान गेला होतास?

बासोव: नाही. काय झालं?

सूस्लोव (वाकडे स्मित करत): म्हणतात, तुझ्या ...ननीसानं क्लबात दोन हजार रूबल जिंकले....

बासोव: ओहो!

सूस्लोव: कुणातरी जोरदार झिंगलेल्या व्यापाऱ्याचे...

वार्वारा: का तुम्ही नेहमी असं म्हणता...

सूस्लोव: कसं?

वार्वारा: आत्तासारखं... पैसे जिंकले – आणि ठासून ...गना... झिंगलेल्या माणसाकडून.

सूस्लोव (किंचित हसून): मी ठासून सांगत नाही.

बासोव: ह्यात काय विशेष? जर हा म्हणाला ...सता की, झामीस्लोवनं त्या व्यापाऱ्याला प्रथम भरपूर ... पाजली आणि नंतर त्याचे पैसे जिंकून घेतले, ... ते वाकडं बोलणं झालं असतं!.. चला, प्योत्र... वार्या, जेव्हा क्लास येईल... अरेच्चा! हा पहा – ...गवला!

क्लास (हातात जुनी चामडी बॅग घेऊन प्रवेश करतो): तुम्हाला माझ्याविना चैन पडत नव्हती, ...लक? हे समजून आनंद वाटला! (सूस्लोवना ...ोड्या अतिरेकी दटावणीच्या सुरात.) तुम्हाला कुणी-... एक माणूस शोधतोय. नुकताच बाहेरून आला ...सावा हे स्पष्ट दिसतंय. तो प्रत्येक दाचापाशी चालत ...तोय आणि मोठ्या आवाजात सगळ्यांना विचारतोय, ...म्ही कुठं राहता... (बहिणीजवळ जात.) नमस्ते, ...र्या.

वार्वारा : नमस्ते .

सूस्लोव : पीडा आली ! बहुधा, माझे काका ...

बासोव : म्हणजे तुझ्याकडं येणं बरं दिसणार नाही ?

सूस्लोव : हे काय आणखी ? ज्यांना मी जवळजवळ ओळखत नाही अशा काकांबरोबर बसायला मला आनंद होईल असं वाटतं ? मी त्यांना दहा वर्षांत पाहिलेलं नाही .

बासोव (व्लासला) : जरा माझ्यापाशी या ... (व्लासला अभ्यासिकेत नेतो .)

सूस्लोव (सिगारेट पेटवत) : तुम्ही आमच्याकडं येता, वार्वारा मिखायलोवना ?

वार्वारा : नाही ... तुमचे काका – गरीब आहेत ?

सूस्लोव : श्रीमंत आहेत . खूप . तुम्हाला वाटतं, मला फक्त गरीब नातेवाईक आवडत नाहीत ?

वार्वारा : माहीत नाही ...

सूस्लोव (खवटपणे खोकत) : हा झामीस्लोव एका अमंगळ दिवशी सेर्गेइला संकटात घालणार, बघाल तुम्ही ! तो पाजी आहे ! तुम्ही सहमत नाही ?

वार्वारा (शांतपणे) : तुमच्याबरोबर त्याच्याबद्दल बोलायची माझी इच्छा नाही .

सूस्लोव : ठीक आहे ... सोडून द्या तो विषय . (गप्प राहतो .) तुम्ही तुमच्या ह्या काहीशा रोखठोकपणामुळं निर्भिड माणसाची भूमिका वठवताय असं भासतं . सांभाळा ! ही भूमिका वठवणं अवघड आहे ... त्यासाठी धैर्य पाहिजे, चातुर्य पाहिजे , ताकद पाहिजे . तुम्हाला माझ्या बोलण्याचा राग आला नाही ना ?

वार्वारा : नाही.

सूस्लोव : आणि वाद घालावा असं वाटत नाही? अथवा माझ्या शब्दांशी तुम्ही मनानं सहमत आहात?

वार्वारा (सरळपणे) : मला वाद घालता येत नाही... बोलणं जमत नाही...

सूस्लोव (खिन्नपणे) : माझा राग मानू नका. माग वेळ स्वाभाविक वागण्याचं धैर्य असलेली माणसं ह्या जगात अस्तित्वात आहेत ह्यावर विश्वास ठेवणं मला कठीण जातं.

साशा (प्रवेश करत) : ओल्गा अलेक्सेयेवना म्हणाल्या की त्या आत्ता येत आहेत. चहा बनवू?

वार्वारा : होय.

साशा : निकोलाय पेत्रोविच आपल्याकडं येताहेत. (जाते.)

सूस्लोव (अभ्यासिकेच्या दारापाशी जात) : सेर्गेइ, तू लौकर येतोस ना?.. मी चलतो...

बासोव : आत्ता आलो, एक मिनटात!

झामीस्लोव (प्रवेश करत) : नमस्ते, मालकीण-बाई! नमस्ते, प्योत्र इवानोविच.

सूस्लोव (खोकत) : रामराम. कसे आहात—मजेत?

झामीस्लोव : बिनधास्त माणूस! काळीज हलकं, खिसा हलका आणि टाळकंही हलकं!

सूस्लोव (अशिष्टपणे आणि उपहासाने) : टाळकं आणि काळीज ह्याबाबत वाद घालणार नाही, पण खिशाबाबत मात्र... असं म्हणतात, क्लबात तुम्ही कुणालातरी धुवून काढलात!

झामीस्लोव (सौम्यपणे) : माझ्या बाबतीत म्हणणं योग्य ठरेल – जिंकलो ! धुवून काढणं हा शब्द चोरांना वापरतात .

वार्वारा : तुमच्याबद्दल नेहमी काही ना काही सन-सनाटी ऐकायला मिळतं ! असं भाग्य फक्त असाधारण लोकांना लाभतं म्हणतात .

झामीस्लोव : निदान माझ्या बाबतीत म्हणाल तर माझ्या पाठीमागं माझ्याविषयी बोलण्यात येणाऱ्या गोष्टी ऐकून मला वाटू लागलंय – मी असाधारण माणूस असावा !.. पण दुर्दैवानं मी फार क़मी पैसे जिंकले – बेचाळीस रूबल ...

सूस्लोव कोरडे खोकतात आणि डावीकडील खिडकीपाशी जाऊन बाहेर पाहू लागतात .

बासोव (बाहेर येत) : फक्त ! मी एव्हाना शँपेनची स्वप्नं पहात होतो ... बरं, तुम्हाला काही बातमी सांगायचीय का मला ? मी घाईत आहे ...

झामीस्लोव : तुम्ही बाहेर जाताय ? तर मग तुम्ही परत आल्यावर सांगीन काही घाई नाही . वार्वारा मिखायलोवना , तुम्ही नाटकाला आला नाहीत हे फार वाईट झालं ! यूलीया फिलीप्पोवनांनी अप्रतीम काम केलं ... फार सुरेख !

वार्वारा : मला त्यांचा अभिनय पहायला नेहमीच आवडतं .

झामीस्लोव (उत्साहाने) : त्या फार गुणी आहेत ! माझं जर चूक असेल, तर माझा शिरच्छेद करा !

सूस्लोव (हसून) : आणि चुकून शिरच्छेद करण्याची वेळ आली तर? अगदी डोक्याविना... हे बरं नव्हे! चला. सेर्गेइ! भेटू परत, वार्वारा मिखायलोवना. बरं आहे... (झामीस्लोवला झुकून अभिवादन करतात.)

बासोव (अभ्यासिकेत कागद चाळणाऱ्या व्लासकडे नजर टाकत) : तर उद्या सकाळी नऊपर्यंत तुम्ही ह्या सगळ्या नकला पूर्ण कराल अशी आशा धरू ना?

व्लास : धरा, धरा... आणि माननीय मालक, तुम्हाला निद्रानाशाची बाधा होवो!

सूस्लोव आणि बासोव जातात.

झामीस्लोव : मीही जातो... मालकीणबाई, तुमचा हात...

वार्वारा : थांबा चहा प्यायला!

झामीस्लोव : परवानगी देत असाल तर मी नंतर येतो. पण आत्ता – शक्य नाही! (वेगाने जातो.)

व्लास (अभ्यासिकेतून बाहेर येत) : वार्या! या घरात चहा पिणार आहेत?

वार्वारा : साशाला हाक मार. (त्याच्या खांद्यांवर हात ठेवते.) कशामुळं एवढा त्रासला आहेस?

व्लास (तिच्या हातांशी गाल घासत) : दमलोय. दहापासून तीनपर्यंत खटल्याला बसलो होतो... तीनपासून सातपर्यंत शहरभर धावपळ करत होतो... शूरोच्का!*

---

* शूरोच्का – शूरा – साशा – अलेक्सान्द्राचे लाडके रूप. – अनु.

... जेवायलाही सवड मिळाली नाही.

वार्वारा: कारकून ... तुझ्या लायकीला शोभत नाही, व्लास!

व्लास (खोटया शोकाने): शिखर गाठण्याचा आणि तत्सम प्रयत्न मी केला पाहिजे हे माहीत आहे. पण, वार्या! उदाहरणांची मला आवड म्हणून छपरांवरची धुरांडी स्वच्छ करणाऱ्याकडं मी पाहतो: अर्थात, तो सर्वांपेक्षा उंचावर चढला ... पण म्हणून स्वतःपेक्षा उंच ठरला?

वार्वारा: वेडपटपणा करू नको! दुसरं काम का शोधत नाहीस? याहून चांगलं, जास्त महत्त्वाचं?

व्लास (धक्का बसल्याचा विनोदी अभिनय करत): बाईसाहेब! खाजगी मालमत्तेच्या पवित्र संस्थेचं रक्षण आणि सांभाळ करणाऱ्या यंत्रणेमधला मी एक महत्त्वाचा, जरी अप्रत्यक्ष असा दुवा आहे! आणि ह्याला तुम्ही निरुपयोगी श्रम म्हणता? किती कुविचार भरलेत तुमच्या डोक्यात!

वार्वारा: तुला गंभीरपणं बोलायचं नाही का?

साशा प्रवेशते.

व्लास (साशाला): हे अतिआदरणीया! उदार व्हा, चहा आणि काहीतरी खायला द्या!

साशा: आत्ता देत्ये! कटलेटं चालतील?

व्लास: चालतील! कटलेटं चालतील, त्यांच्याबरोबर येणारं सर्व काही चालेल! वाट बघतो!

साशा जाते.

क्लास (बहिणीच्या कमरेला मिठी घालतो व खोलीत तिच्याबरोबर फिरू लागतो) : तू कशी आहेस ?

बार्बारा : मला का कुणास ठाऊक, उदास वाटतंय, क्लासिक ! काहीवेळा काही कारण नसताना अचानक मला कैदेत पडल्याचा भास होतो... सगळं परकं वाटतं... सगळं विरोधी असल्यासारखं वाटतं ! जणू सगळ्याची कुणालाही गरज नाही !.. आणि कुणीही गंभीरपणं जगत नाही असं वाटू लागतं... तुझंच पहा ! नेहमी टर उडवतोस, थट्टा करतोस...

क्लास (तिच्या पुढ्यात मजेदार पवित्रा घेऊन उभा राहतो) :

माझ्या मित्रा, नको रागावू मला
माझ्या ह्या मस्करीला :
मस्करीपाठचे दु:खाचे डोंगर
लपवायचेत तुझ्यापासून मला !

कविता खास माझ्या कारखान्यात तयार झालीय आणि काल्डेरीयाच्या कवितांपेक्षा अनेकपटींनी चांगली आहे... पण शेवटपर्यंत सगळ्या ओळी मी म्हणून दाखवणार नाही... त्या पाच कोस लांब पसरल्या आहेत ! माझ्या लाडक्या भगिनी ! मी गंभीर व्हावं अशी इच्छा आहे तुझी ? म्हणजे, एकाक्ष आपल्या जवळच्या सगळ्यांनी एकाक्षच असावं अशी इच्छा धरतो, तसं हे झालं !

माशा चहाच्या कप-बशा घेऊन येते व चटपट टेबलावर मांडामांड करू लागते. रात्रीच्या राखणदाराची खडखड ऐकू येते.

वार्वारा : पुरे क्लास ! वटवट करायची गरज नाही.

क्लास : ठीक – तो म्हणाला – आणि कष्टी चेहऱ्यानं गप्प बसला ! खरंच ! तू काही उदार मनाची नाहीस, बहिणाबाई ! आख्खा दिवसभर मी मुकाटपणं वेगवेगळ्या लोकांच्या भानगडींच्या नकला लिहिण्यात गुंतलेला असतो ... साहजिकच संध्याकाळी मला वटवट करायची इच्छा होते !

वार्वारा : पण मला इथून कुठंतरी निघून जावंसं वाटतं, जिथं साधी, निकोप माणसं राहतात, दुसऱ्या भाषेत बोलतात आणि काहीतरी गंभीर स्वरूपाचं, मोठ्ठं, सगळ्यांच्या उपयोगी पडेल असं काम करतात ... तुला समजतं ?

क्लास (विचारमग्न होत) : हो ... मला समजतं. पण तू कुठंही जाणार नाहीस, वार्या !

वार्वारा : पण कदाचित जाईनही ! (स्तब्धता. साशा समोवार* आणते.) बहुतेक उद्या शालीमोव येतील ...

क्लास (जांभई देत) : त्यांचं अलिकडचं लेखन मला नाही आवडत – पोकळ, कंटाळवाणं, निर्जीव.

वार्वारा : एकदा मी त्यांना एका समारंभात पाहिलं होतं ... त्यावेळी मी जिम्नाशियममध्ये होत्ये. आठवतं,

---

* चहाचे पाणी उकळविण्याची रशियन धाटणीची किटली – अनु.

कती ठामपणं, भक्कमपणं पावलं टाकत ते व्यासपीठावर चालत आले... दाट, विस्कटलेले केस, चेहरा धीट आणि निर्भिड... स्वतःच्या आवडीनिवडी ठाम माहीत असलेल्या माणसाचा चेहरा! स्वतःच्या बळाची कल्पना असणारा! त्यांना मी पाहिलं तेव्हा अशी माणसं अस्तित्वात आहेत ह्या जाणीवेनं माझं सर्वांग आनंदानं थरथर कापलं! छान वाटलं! खरंच! आठवतं, किती जोरानं ते डोक्याला झटके देत होते, त्यांचे बंडखोर केस काळ्या झंझावाताप्रमाणं त्यांच्या कपाळावर पसरत होते... आणि त्यांचे चमकते डोळे मला आठवतात... एव्हाना सहा-सात, नव्हे आठ वर्षं उलटली...

व्लास : एखादी विद्यार्थिनी नव्या शिक्षकाला बघायला आतुर झालेली असते, तशी त्यांना पहायला तू आतुर बनली आहेस. सांभाळ, माझ्या बहिणी! मी असं ऐकलंय की हे लेखक लोक बायकांना फूस लावण्यात पटाईत असतात!

वार्वारा : हे चांगलं नाही व्लास – अगदी ग्राम्य झालं!

व्लास (साधेपणाने, कळकळीने) : रागावू नकोस, वार्या!

वार्वारा : तू समजून घे... मी त्यांची वाट पाहत्येय... वसंताच्या मोसमाच्या आगमनाप्रमाणं! माझं जीवन सध्या कष्टी आहे...

व्लास : मला समजतं, समजतं! मलासुद्धा जगणं अवघड झालंय! अब्रूनं जगणं जमत नाही आणि समजत नाही, पुढं काय होणार?

वार्वारा: होय रे व्लास, होय! पण मग कशाला तू ...

व्लास: स्वतःला मूर्ख ठरवून घेतो? माझ्या खऱ्या भावना लोकांना समजलेल्या मला आवडत नाही.

कालेरीया (प्रवेश करत): किती सुंदर रात्र! आणि तुम्ही इथं आत बसला आहात! इथं धुराचा वास येतोय!

व्लास (चित्तवृत्ती बदलून): माझा मुजरा, अमूर्त वासिल्येवना!

कालेरीया: राईत इतकं शांत, गूढ वातावरण पसरलंय... सुरेख! लडिवाळ चंद्र, दाट आणि उबदार सावल्या... दिवस रात्रीपेक्षा जास्त सुंदर कधीही असू शकणार नाही...

व्लास (तिच्या स्वराची नक्कल करत): खरंच! तरुणीपेक्षा म्हाताऱ्या नेहमीच जास्त मजेत असतात आणि पाकोळ्यांपेक्षा खेकडे अधिक वेगानं उडतात!

कालेरीया (टेबलापाशी बसत): तुम्हाला काहीही समजत नाही! वार्या, मला चहा ओत... आपल्याकडं कुणीही आलं नव्हतं?

व्लास (थट्टेने): कुणीही इथं येऊ शकत नाही, कारण कुणीही अस्तित्वात नाही!

कालेरीया: कृपया, मला शांत बसू दे!

व्लास मुकाटपणे तिला वाकून अभिवादन करतो आणि अभ्यासिकेत जाऊन टेबलावरील कागदांची चाळवाचाळव करू लागतो. खिडकीपासून दूरवर रात्रीच्या

गखणदाराच्या दंडुक्याची खडखड आणि हलकी शीळ ऐकू येतात.

वार्वारा: तुझ्याकडं यूलीया फिलीप्पोवना आली होती...

कालेरीया: माझ्याकडं? हं, हं... नाटकाबाबत...

वार्वारा: तू राईत गेली होतीस?

कालेरीया: हो. मला न्यूमिन भेटला होता... तुझ्या-बद्दल खूप खूप बोलला.

वार्वारा: काय म्हणाला तो?

कालेरीया: तुला माहीत आहे...

स्तब्धता. व्लास नाकातल्या सुरात काहीतरी गुणगुणतोय.

वार्वारा (उसासा टाकत): मला फार वाईट वाटतं!

कालेरीया: त्याच्याबद्दल?

वार्वारा: एकदा तो मला म्हणाला होता – स्त्रीवर प्रेम करणं ही पुरुषावरली करुण जबाबदारी आहे.

कालेरीया: पूर्वी त्याच्याशी तू वेगळी वागायचीस.

वार्वारा: त्याबद्दल तू मला दोषी धरतेस? होय?

कालेरीया: छे: छे: वार्या, मुळीच नाही!

वार्वारा: प्रथम मी त्याची दु:खी मन:स्थिती बद-लायचा प्रयत्न केला... आणि त्याच्यासाठी माझा खूप वेळ खर्च करत होत्ये हे खरं... पण मग ते सगळं कुठल्या दिशेला चाललं होतं हे माझ्या ध्यानात आलं – आणि तो निघून गेला.

कालेरीया: त्याच्याशी खुलासा केलास?

वार्वारा: एका शब्दानं नाही! ना मी, ना त्यानं...

स्तब्धता.

कालेरीया: त्याचं प्रेम कोमट स्वरूपाचं असावं – सुंदर शब्दांमध्ये व्यक्त केलेलं – कुठलाही आनंद त्यात नसलेलं! आनंद न देणारं प्रेम स्त्रीला अपमानकारक आहे. तो कुबडा आहे हे तुझ्या कधी ध्यानात आलं?

वार्वारा (चकित होऊन): नाही लक्षात आलं... खरंच? तुझी चूक होत आहे!..

कालेरीया: त्याच्यात काहीतरी वैगुण्य आहे – त्याच्या मनात! आणि माणसात मला जेव्हा हे जाणवायला लागतं, तेव्हा त्याच्या शरीरातही वैगुण्य असल्याचा मला भास होऊ लागतो.

व्लास (अभ्यासिकेतून कष्टी मुद्रेने, कागदांचा जुडगा हातांवर आपटत बाहेर येतो): ह्या भानगडींची संख्या विचारात घेता आणि त्यावर माझे अनुमान आधारून मी आपल्याला सांगू इच्छितो मालकीणबाई की, माझी कितीही इच्छा असली तरी, सांगितलेल्या कालमर्यादेत हे अप्रिय काम पार पाडणं मला अशक्य आहे.

वार्वारा: मी तुला नंतर मदत करीन. चल ये, चहा प्यायला.

व्लास: माझ्या बहिणी! तू माझी खरीखुरी बहीण आहेस! ह्याचा अभिमान बाळग! अमूर्ता वासिल्येवना, जोवर माझी बहीण आणि खुद्द मी जिवंत आहोत, तोवर प्रेमाचे धडे शिका!

कालेरीया: तुम्हाला ठाऊक आहे – तुम्ही कुबडे आहात!

व्लास: कुठल्या दृष्टिकोनातून?

कालेरीया : तुमच्या आत्म्याला कुबड आहे.

क्लास : पण त्यामुळं माझ्या शरीराला वाकडेपण [illegible]

कालेरीया : उर्मटपणा – कुबडासारखंच वैगुण्य ... मूर्ख [illegible] लंगड्यांसारखी असतात.

क्लास (तिच्या स्वराची नक्कल करत) : आणि [illegible] तुमच्या व्याख्यांप्रमाणे असतात.

कालेरीया : ग्राम्य माणसं मला नेहमी देवीचे वण तोंडावर असलेल्या लोकांसारखी भासतात ... आणि ते नेहमी सोनेरी केसांची असतात!

क्लास : सर्व काळेसावळे लौकर लग्न करतात आणि सर्व अध्यात्मवादी आंधळे-बहिरे असतात ... त्यांना वाचाशक्ती असते हे फार वाईट!

कालेरीया : हे फार शहाणपणाचं नव्हे! आणि तुम्हाला बहुधा अध्यात्मविद्या ठाऊक नाही!

क्लास : ठाऊक आहे. तंबाखू आणि अध्यात्मविद्या ह्या गोष्टी चिंतनाची आवड असणाऱ्यांसाठीच केवळ शोधून काढण्यात आलेल्या आहेत. मी धूम्रपान करत नाही आणि तंबाखूचे वाईट परिणाम मला अजिबात ठाऊक नाहीत. पण अध्यात्मविद्या मला माहीत आहे आणि तिच्यापायी चक्कर येते आणि मळमळतं!

कालेरीया : दुबळ्या डोक्यांना फुलांच्या वासानंसुद्धा चक्कर येते!

वार्वारा : थांबा, नाहीतर तुमचं भांडण सुरू होईल.

क्लास : मी खाणार आहे – जास्त हितकर आहे.

कालेरीया : मी पियानो वाजवते – ते जास्त चांगलं.

किती घुसमटतंय इथं, वार्या!

वार्वारा : मी व्हरांड्याचं दार उघडते... ओल्गा येत्येय!

स्तब्धता. व्लास चहा पितो. कालेरीया पियानोपाशी बसून राहते. रात्रीच्या राखणदाराची अस्पष्ट शीळ ऐकू येते व तिला त्याहून मंद शीळेने दूरवरून उत्तर मिळते. कालेरीया पियानोच्या मधल्या पट्ट्यांवर हलकेच हात फिरवते. ओल्गा अलेक्सेयेवना पडद्यांना एकदम बाजूला सारून एखाद्या भेदरलेल्या पाखराप्रमाणे खोलीत प्रवेश करते.

ओल्गा (राखी रंगाची शाल डोक्यावरून खेचून काढत) : ही पहा आल्ये! कशीबशी सुटका करून घेतली! (वार्वाराचे चुंबन घेते.) नमस्ते, कालेरीया वासिल्येवना! वाजवा, वाजवा! आपण हस्तांदोलन नाही केलं तरी चालेल ना? नमस्ते, व्लास.

व्लास : नमस्ते, मातोश्री?

वार्वारा : बैस... चहा ओतू? यायला तुला एवढा उशीर का?

ओल्गा (भेदरटपणे) : थांब! बाहेर भयानक अंधार आहे. राईत कुणीतरी लपलंय असा मला भास होत होता. राखणदार शिटया वाजवताहेत... त्या शिटया हास्यास्पद आणि केविलवाण्या वाटतात. कशाला ते शिटया वाजवतात?

व्लास : खरंच! संशयास्पद आहे! आपल्याला तर ते वाजवत नाहीत ना?

ओल्गा : मला तुझ्याकडं लौकरात लौकर यायचं

द्रोनं. पण नाद्या हटून बसली. बहुधा तीसुद्धा आजारी पडणार. वोल्का आजारी पडलाय हे तुला माहीत आहे? त्याला ताप चढलाय... मग सोन्याला आंघोळ घालायची होती. मीषा दुपारच्या जेवणानंतर राईत जो पसार झाला तो आत्ता परतला... सगळं अंग बरबटलंय, मळका अवतार आणि अर्थातच भुकेला! तेवढ्यात नवरा शहरातून परतला. कपाळाला आठ्या आणि तोंडातून चकार शब्द काढत नाही. माझं डोकं अक्षरश: गरगरतंय. ही नवी मोलकरीण म्हणजे एक शिक्षा आहे! उकळतं पाणी बाळाच्या दुधाच्या बाटल्यांवर तिनं ओतलं आणि सगळ्या बाटल्या तडकल्या.

वार्वारा (स्मित करत): बिच्चारी ग तू! दमन्येस...

क्लास: हे मार्फा, मार्फा! तुला किती किती चिंता! म्हणून प्रत्येक गोष्टीची अतिचिंता किंवा वाजवीपेक्षा कमी चिंता! किती शहाणपण साठलंय ह्या शब्दांमध्ये!

कालेरीया: किती भयंकर वाटतात ऐकायला! शी:!

क्लास: माफ करा. भाषा मी नाही शोधून काढली!

ओल्गा (काहीशी कष्टी होत): अर्थात हे सगळं ऐकून तुम्हाला हसू येत असेल... नीरस वाटत असेल... मला समजतं! काय करणार! ज्याचं जे दुखतं, त्याबद्दल तो बोलतो! मुलं... जेव्हा त्यांच्याबद्दल मी विचार करू लागत्ये, तेव्हा माझ्या छातीत अक्षरश: घंटा वाजू लागत्ये... मुलं, मुलं! किती अवघड जातं म्हणून सांगू तुला वार्या!

वार्वारा : मला क्षमा कर — पण तू जरा अतिरेक करत्येस असं वाटतं.

ओल्गा (उत्तेजित होऊन) : नाही, असं बोलू नको ! तू नाही निवाडा करू शकत... नाही ! ही जाणीव किती कष्ट देणारी, कुरतडणारी आहे हे तुला माहीत नाही... मुलांची जबाबदारी ! उद्या ती मला विचारतील — कसं जगलं पाहिजे ... तर मी काय सांगू ?

व्लास : तुम्ही आधीपासूनच एवढी काळजी कशाला करता ? कदाचित ती हा प्रश्न विचारणार नाहीत ? कदाचित स्वतःच तर्कानं जाणतील... नेमकं कसं जगलं पाहिजे !

ओल्गा : तुम्हाला माहीत नाही ! एव्हापासून ती विचारायला लागलीत ! हो ! आणि ह्या भयाण प्रश्नांना उत्तरं नाहीत ना माझ्यापाशी, ना तुमच्यापाशी, ना कुणापाशी ! बाई असणं किती छळवादी आहे !..

व्लास (हळू आवाजात, गंभीरपणे) : माणूस असलं पाहिजे ... (अभ्यासिकेत जातो व टेबलाशी बसून लिहू लागतो.)

वार्वारा : पुरं झालं, व्लास ! (उठते आणि सावकाशपणे व्हरांड्याच्या दारापाशी चालत जाते.)

कालेरीया (स्वप्नाळूपणे) : उषेनं आपल्या स्मितानं नभातल्या तारका विझवल्या... (पियानोपासून उठते आणि व्हरांड्याच्या दारापाशी वार्वाराजवळ उभी राहते.)

ओल्गा : मला वाटतं, मी तुम्हा सर्वांना कष्टी

केल्ं ना ? रात्री ओरडणाऱ्या वटवाघुळाप्रमाण ... देवा रे ! ठीक, नाही बोलत याबद्दल ... वार्या, उठून का गेलीस ? ये माझ्यापाशी ... नाहीतर मी समज करून घेईन की, माझी संगत तुला आवडत नाही !

वार्वारा (चटकन तिच्याजवळ जात) : काय भलतंच बोलत्येस ओल्गा ! मला फक्त तुझ्याबद्दल फार फार वाईट वाटलं !

ओल्गा : नको वाईट वाटून घेऊ ! काहीवेळा स्वतः-चाच तिटकारा येतो. स्वतःची कीव येत्ये ! मला भास होतो की, माझा आत्मा सगळा सुरकुतून गेलाय ! आणि एखाद्या म्हाताऱ्या छोटया कुत्र्याप्रमाणं मी बन-ल्येय ... अशी छोटी कुत्री असतात ... चिडकी, कुणीही त्याना आवडत नाही आणि नकळत चावा घ्यायला बघतात ...

कालेरीया : रविराजा उगवतो नि मावळतो — पण माणसांच्या काळजात सदा संध्याछाया दाटलेल्या ...

ओल्गा : काय झालं तुम्हाला ?

कालेरीया : मला ? असंच ... स्वतःशी बोलत्येय !

व्लास (अभ्यासिकेत "चिरंतन स्मृती" नाकातल्या आवाजात गुणगुणतो) : कौटुंबिक सुखं ... कौटुंबिक सुखं ...

वार्वारा : व्लास, तुझ्या पाया पडत्ये, गप्प रहा !

व्लास : ठीक !

ओल्गा : मी त्यांची मनःस्थिती बिघडवली ...

कालेरीया : राईतून माणसं आली. बघा, किती

सुंदर! आणि पावेल सेर्गेयेविच किती मजेशीर हातवारे करताहेत ...

वार्वारा: कोण आहे आणखी त्यांच्याबरोबर?

कालेरीया: मार्या ल्वोवना ... यूलीया फिलीप्पोवना ... सोन्या, झीमिन ... आणि झामीस्लोव.

ओल्गा (अंगाभोवती शाल गुंडाळून घेत): मी अशी अवतारात आल्येय! ही भपकेबाज सूस्लोवा माझी टर उडवते! मला मुळीच आवडत नाही ती!

वार्वारा: क्लास, साशाला घंटी वाजव.

क्लास: मालकीणबाई, तुम्ही माझ्या मुख्य कामात सारखे अडथळे आणताहात एवढं लक्षात ठेवा!

ओल्गा: ही थोर बाई आहे ... अजिबात मुलांकडं लक्ष देत नाही – पण आश्चर्य! त्यांच्या तब्येती नेहमी ठणठणीत!

मार्या (व्हरांड्याच्या दारातून आत येत): तुमचे यजमान म्हणाले की, तुमची प्रकृती बिघडलीय – खरंच? काय झालंय तुम्हाला?

वार्वारा: तुम्ही आलात याबद्दल मला आनंद वाटला. माझी प्रकृती उत्तम आहे.

व्हरांड्यात गोंगाट, हसण्याचे आवाज.

मार्या: चेहरा थोडासा ताणलेला वाटतोय (ओल्गाला.) आणि तुम्ही इथं? कित्ती दिवसात तुम्ही दिसलाच नाहीत ...

ओल्गा: जणू काही माझा सदैव आंबट चेहरा पाहून तुम्हाला खूप आनंदच होतो!

मार्या : पण मला जर आंबटच आवडत असेल तर ? तुमची मुलं कशी आहेत ?

यूलीया (व्हरांड्यातून आत येत) : बघा किती पाहुणे घेऊन आल्ये मी तुमच्यापाशी ! पण रागावू नका – आम्ही लौकरच जाऊ . नमस्ते , ओल्गा अलेक्सेयेवना ... पुरुष आत का येत नाहीत ? वार्वारा मिखायलोवना , तिथं पावेल सेर्गेयेविच आणि झामीस्लोव आहेत . मी त्यांना बोलावत्ये – चालेल ?

एकाच वेळी:

वार्वारा : अर्थात !

यूलीया : चला , कालेरीया वासिल्येवना .

मार्या (व्लासला) : तुम्ही बारीक झालात . कशामुळं ?

व्लास : मला माहीत नाही !

साशा (खोलीत येऊन) : समोवार गरम करू ?

वार्वारा : हो ... आणि लौकर .

मार्या (व्लासला) : तुम्ही तोंडं वेडीवाकडी का करताय ?

ओल्गा : ते नेहमीच ...

व्लास : माझा तो व्यवसाय आहे !

मार्या : सारखं चतुर वागायचा प्रयत्न करता ? होय ना ? आणि कधीही यश नाही ?.. अहो वार्वारा मिखायलोवना , तुमच्या पावेल सेर्गेयेविचना एक दिवस नक्की मनोविकाराचा झटका येणार !

वार्वारा : त्यांना माझे कशाबद्दल म्हणताय ?

न्यूमिन आत येतो. नंतर यूलीया फिलीप्पोवना आणि कालेरीया. क्लास कपाळाला आठ्या घालून अभ्यासिकेत जातो व पाठी दार बंद करतो. ओल्गा मार्याला डावीकडे नेते व छातीवर बोट दाखवीत काहीतरी तिच्याशी पुटपुटते.

न्यूमिन : अशा उशीरा वेळेला आम्ही इथं कोसंळल्याबद्दल माफ करा...

वार्वारा : पाहुणे आले की मला आनंद होतो...

यूलीया : औपचारिकपणा नसतो ह्यातच खरं तर दाचावरच्या आयुष्यातली गंमत आहे!.. तुम्ही त्यांचा वाद ऐकायला हवा होता! ह्यांचा आणि मार्या ल्वोवनाचा!

न्यूमिन : ज्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत आणि ज्यांना स्पष्ट करावं लागतं, अशा गोष्टींबद्दल शांतपणं बोलायला मला जमत नाही.

साशा समोवार घेऊन येते. वार्वारा टेबलापाशी तिला हळू आवाजात काही सूचना देते आणि कप-बशा मांडते. पियानोपाशी उभा असलेला न्यूमिन विचारमग्न चेहऱ्याने तिच्याकडे टक लावून पहात राहतो.

यूलीया : तुम्ही फार उत्तेजित आहात. त्यामुळं तुम्ही दुसऱ्याची नीट खात्री पटवू शकत नाही! (वार्वाराला उद्देशून.) तुमचे पतीराज माझ्या नवऱ्याबरोबर आत्मघाताची उपकरणं घेऊन बसलेत! कन्याक पीत आहेत आणि चांगलेच झिंगणार असा माझा कयास आहे. माझ्या नवऱ्याकडं अचानक त्याचा काका आलाय

– कुणीतरी मांस विकणारा किंवा तेल गाळणारा आहे. थोडक्यात, धंद्यामधला माणूस आहे. जोरजोरात हसतो, आरडाओरडा करत बोलतो... डोक्यावरचे सगळे केस पांढरे, आणि कुरळे... मजेशीर माणूस! अगबाई, निकोलाय पेत्रोविच कुठं? माझा लाडका शिलेदार?

झामीस्लोव (व्हरांड्यातून): मी इथं खिडकीखाली उभा आहे, इनेझिल्या!

यूलीया: इकडं या. तिथं काय बोलताय?

झामीस्लोव (आत येत): तरुण मंडळींना बिघडवतोय! सोन्या आणि झीमिन यांनी मला पटवायचा प्रयत्न केला की, सामाजिक, नैतिक आणि तत्सम समस्या सोडविण्यासाठी रोजचा वेळ समर्पित करणं हेच माणसाचं जीवनातलं ध्येय असतं! तर मी त्यांना पटवत होतो – आयुष्य म्हणजे कला! स्वतःच्या डोळयांनी पाहण्याची कला, स्वतःच्या कानांनी ऐकण्याची कला!

यूलीया: हा निव्वळ मूर्खपणा!

झामीस्लोव: हा सिद्धांत केवळ आत्ता मला अचानक सुचला, पण तो माझं पक्कं मत बनणार आहे. जीवन म्हणजे प्रत्येक गोष्टीत आनंद आणि सौंदर्य शोधण्याची कला! खाण्या-पिण्यातसुद्धा कला आहे! जंगली माणसांप्रमाणं ती भांडतात!

यूलीया: कालेरीया वासिल्येवना – वटवट थांबवा!

झामीस्लोव: कालेरीया वासिल्येवना! मला माहीत आहे – तुम्हाला सगळया सुंदर गोष्टी आवडतात – पण मी तुम्हाला का आवडत नाही? ह्या विसंगतीचा खुलासा कसा करायचा?

कालेरीया (स्मित करत) : तुम्ही फार गोंगाट करता आणि भपकेबाज आहात ...

झामीस्लोव : हं ! पण आत्ता मुद्दा तो नव्हे ... आम्ही – मी आणि ही सुरेख तरुणी ...

यूलीया : पुरे करा ना ! आम्ही आलो होतो ...

झामीस्लोव (कालेरीयापुढं झुकून) : तुमच्यापाशी !

यूलीया : विचारायचं होतं ...

झामीस्लोव (आणखी खाली झुकत) : तुम्हाला !

यूलीया : छे: बाई ! चला, तुमच्या स्वच्छ, सुंदर छोटया खोलीत जाऊ या !.. मला ती खूप आवडते ...

झामीस्लोव : चला ! इथं सगळे आम्हाला त्रास देतात !

कालेरीया (हसून) : चला !

कॉरीडॉरच्या दाराकडे जातात.

यूलीया : थांबा ! माझ्या नवऱ्याच्या काकाचं आडनांव काय माहीत आहे ? द्वोयेतोचिये !

झामीस्लोव (हवेत दोनदा बोटे खुपसत) : समजलं ? द्वोयेतोचिये !

हसून पडद्यांमागे अदृश्य होतात.

ओल्गा : नेहमी किती मजेत असते ती ! खरं तर मला माहीत आहे ... आयुष्य तिचं फारसं चांगलं नाही ... नवऱ्याशी तिचं ... .

वार्वारा (कोरडेपणाने) : ओल्या,* मला वाटतं, ह्या गोष्टीशी आपला काही संबंध नाही !

---

* ओल्गाचे लाडके रूप – अनु.

ओल्गा : मी काहीतरी मूर्खासारखं बोलत्ये का ?

न्यूमिन : आजकाल कौटुंबिक नाटकं फार घडायला लागलीत !

सोन्या (दारातून डोकावत) : आई ! मी फिरायला जात्येय ...

मार्या : आणखी फिरायला ?

सोन्या : आणखी ! इथं खूप बायका झाल्यात आणि त्यांच्याबरोबर मला कंटाळा येतो.

मार्या (थट्टेने) : तू जरा सांभाळून बोल !.. तुझी आईसुद्धा ... एक बाईच आहे !

सोन्या (धावत आत येत) : आई ! खरंच ? केव्हापासून ?

ओल्गा : काय बडबडत्येय ती !

वार्वारा : निदान नमस्ते म्हणायचंस !

मार्या : सोन्का ! तू असभ्य आहेस !

सोन्या (वार्वाराला) : आज आपण एकमेकींना भेटलो नव्हतो का ? मी तुमचं आनंदानं चुंबन घेत्ये ... जर मला आनंद मिळत असेल ... किंवा निदान काही खर्च करावा लागत नसेल ... तर मी नेहमी प्रेमळ आणि उदार वागत्ये !

मार्या : सोन्का ! पुरे कर वटवट आणि चालती हो इथून !

सोन्या : काय पण माझी आई ! एकदमच स्वतःला बाई म्हणवून घ्यायला लागली ! माझी तिच्याशी १८ वर्षं ओळख आहे, पण पहिल्यांदाच असं ऐकलं ! फारच विशेष !

झीमिन (पडद्यांमधून डोकावत) : तुम्ही येताय की नाही ?

सोन्या : भेटा – हा माझा गुलाम !

वार्वारा : तुम्ही का आत येत नाही ?.. या !

सोन्या : सभ्य समाजात तो वावरायला योग्य नाही.

झीमिन : माझ्या जाकीटाची बाही तिनं फाडलीय ; एवढं एकच कारण !

सोन्या : फक्त एवढंच कारण ! त्याला हे कमी वाटतंय असं दिसतंय ! त्याला माझ्याकडून आणखी प्रसाद हवाय् ! आई , मी नंतर तुला हाक मारायला येईन , चालेल ? आणि आता चालल्ये – चिरंतन प्रेमाबद्दल माक्स मला काय सांगतो ते ऐकायला ...

झीमिन : खूप वेळ वाट पहावी लागेल !

सोन्या : बघून घेऊ मुला ! अच्छा ! चंद्र अजून आहे ?

झीमिन : मी मुलगा नाही ! स्पार्ता ... माफ करा सोन्या , पण माणसाला कशाला ढकलायचं ...

सोन्या : तुम्ही अजून माणूस नाही – पुढे चल , स्पार्ता !

त्यांच्या बोलण्याचे आणि हसण्याचे आवाज घरापाशी बराच वेळ घुमत राहतात .

न्यूमिन : तुमची मुलगी छान आहे मार्या ल्वोवना .

ओल्गा : केव्हातरी मी तिच्यासारखीच होत्ये ...

वार्वारा : तुम्हा दोघींचं एकमेकींशी वागणं मला खूप आवडतं ... फार छान ! बसा मंडळी चहा प्यायला .

मार्था: होय, आम्ही मैत्रिणी आहोत.

ओल्गा: मैत्रिणी – कसं काय साधलं?

मार्था: काय?

ओल्गा: मुलांशी मैत्री.

मार्था: अगदी साधं: मुलांशी प्रामाणिक वागावं, सत्य त्यांच्यापासून लपवू नये. त्यांना फसवू नये.

न्यूमिन (किंचित हसून): पण हे धोक्याचं आहे! सत्य रांगडं आणि कठोर असतं. त्यात नेहमी संशयवादाचं सूक्ष्म विष लपलेलं असतं... सत्याचा नेहमी भयानक दिसणारा चेहरा मुलापुढं उघडा करून तुम्ही त्याला विषबाधा करणं शक्य आहे.

मार्था: मग टप्प्या-टप्प्यानं त्याच्यावर विषप्रयोग करावा असं तुम्हाला वाटतं? म्हणजे माणसाला तुम्ही कसं मोडून टाकता ह्याचा धक्का स्वतःला बसू नये म्हणून?

न्यूमिन (चिडून, उत्तेजितपणे): पण मी असं म्हटलं नाही! माझा फक्त ह्या मूर्ख प्रयत्नांना विरोध आहे – जीवनावरील काव्याची सुंदर वस्त्रं ओरबाडून टाकण्याच्या आणि त्याची कठोर, किळसवाणी रूपं उघडी करण्याच्या! जीवनाला नटवणं आवश्यक आहे! जुनी वस्त्रं फेकून देण्याआधी नवी वस्त्रं तयार करणं जरूरीचं आहे.

मार्था: कशाबद्दल तुम्ही बोलता आहात? मला नाही समजत!

न्यूमिन: फसवून घेण्याच्या माणसाच्या हक्काबद्दल! तुम्ही आयुष्याबद्दल सतत बोलता! आयुष्य म्हणजे काय? हा शब्द माझ्यासमोर एका प्रचंड, आकारहीन

राक्षसाची आकृती उभी करतो – हा राक्षस सतत बळी मागत असतो – मानवी बळी! प्रत्येक दिवशी तो मानवी मेंदू आणि स्नायू भक्षण करत असतो, घटाघटा मानवी रक्त पीत असतो. (सारा वेळ वार्वारा लक्षपूर्वक न्यूमिनचे बोलणे ऐकत असते आणि हळूहळू तिची मुद्रा आश्चर्यमिश्रित भीतीने ग्रासते. जणू काही त्याला थांबविण्याच्या हेतूने ती किंचित हालचाल करते.) कशाला हे? मला ह्यात काही अर्थ दिसत नाही. पण माणूस जेवढा जास्त जगतो, तेवढ्या जास्त प्रमाणात त्याला सभोवती घाण आढळते... ग्राम्यता, रांगडेपणा आणि नीचपणा पहायला मिळतो! त्यामुळं सौंदर्याबद्दल, विशुद्धतेबद्दल त्याची आस अधिक तीव्र बनते! जीवनातल्या विसंगतींवर मात करण्याचं अथवा जीवनाला घाणीपासून आणि दुष्टाव्यापासून मुक्त करण्याचं बळ त्याच्यापाशी नाही. तर मग त्याच्या आत्म्याला ठार मारणाऱ्या गोष्टींकडं डोळेझाक करण्याचा त्याचा हक्क निदान हिरावून घेऊ नका! त्याचा धडधडीत अपमान करणाऱ्या गोष्टींपासून खुशाल त्याला तोंड फिरवू दे! विसरण्याची आणि विश्रांतीची त्याला गरज आहे. माणसाला शांती हवीय... (वार्वाराच्या नजरेशी नजर भिडताच तो दचकतो आणि बोलणे एकदम थांबवतो.)

मार्या (शांतपणे): तुमच्या ह्या माणसाचं दिवाळं वाजलंय? किती वाईट! म्हणून त्याला जगात विश्रांतीचा हक्क आहे असं म्हणता? फारसं प्रशंसनीय नाही.

न्यूमिन (वार्वाराला): माझ्या आरडाओरडा-

बद्दल माफ करा… मला दिसतंय, तुम्हाला आवडलं नाही!

वार्वारा: तुम्ही असे ताणल्या मन:स्थितीत बोलताय म्हणून - नव्हे…

न्यूमिन: मग कशाबद्दल? कशाबद्दल?

वार्वारा (सावकाशपणे, अत्यंत शांतपणे): मला आठवतं… वर्ष, दोन वर्षांपूर्वी तुम्ही अगदी वेगळं बोलत होतात… एवढ्याच कळकळीनं… असंच तापून…

न्यूमिन (खवळून): माणूस वाढत असतो आणि त्याच्या विचारांचाही विकास घडत असतो!

मार्या: हे छोटुकले काळे विचार भेदरलेल्या उंदरा-प्रमाणं इकडं-तिकडं धावाधाव करत असतात!

न्यूमिन (अजूनही तेवढ्याच अस्वस्थपणे): चक्राकार गतीनं ते वर चढतात, पण ते सतत वर चढतात एवढं मात्र खरं! मार्या ल्वोवना, मी प्रामाणिक नाही असा तुम्हाला संशय वाटतो ना?

मार्या: मला? नाही! मला दिसतंय… तुम्ही प्रामाणिकपणं ओरडताय… आणि अशा आरडाओरड्याचा माझ्यावर फारसा परिणाम घडत नसला, तरी माझी खात्री पटलीय की, तुम्हाला कसल्यातरी गोष्टीनं जबरदस्त हबका दिलाय! आयुष्यापासून लपून रहायची तुमची इच्छा आहे… आणि असे काही तुम्ही एकटेच नव्हेत हे मला ठाऊक आहे – भेदरलेली माणसं जगात भरपूर आहेत.

न्यूमिन: होय, अशी माणसं खूप आहेत, कारण आयुष्य किती भयंकर आहे ह्याची लोकांना जास्त जास्त

सूक्ष्म आणि तीव्र रीतीनं जाणीव होते आहे. आयुष्यात सर्व गोष्टी आधीच निर्णित केलेल्या आहेत. फक्त माणसाचं अस्तित्व योगायोग आहे आणि ते अर्थहीन आहे... हेतूशून्य आहे!

मार्या (शांतपणे): तुमच्या अस्तित्वाच्या योगायोगाच्या वस्तुस्थितीला सामाजिक आवश्यकतेच्या पातळीवर चढवण्याचा प्रयत्न करा आणि मग तुमच्या आयुष्याला अर्थ प्राप्त होईल.

ओल्गा: अरे देवा! माणसं जेव्हा कठोर बोलतात आणि आरोप करतात, तेव्हा मी एका कोपऱ्यात अंग चोरून बसत्ये... जणू ते मलाच बोल लावतात असं मला भासतं! आयुष्यात प्रेमळपणा मुळातच किती कमी! मला बाई आता घरी गेलं पाहिजे! तुझ्याकडं यायला छान वाटतं, वार्या... नेहमी काहीतरी नवीन ऐकायला मिळतं... मनाच्या तारा कुठंतरी छेडल्या जातात... उशीर झाला, घरी जायला हवं!

वार्वारा: बैस ग! अशी कशी तू? एकदमच? तुझी गरज भासली तर घरून कुणालातरी पाठवतील तुझ्यासाठी.

ओल्गा: होय, पाठवतील... ठीक आहे, मी थांबत्ये. (दिवाणावर पाय मुडपून बसते. व्हरांड्याच्या दारात उभा राहिलेला ऱ्यूमिन अस्वस्थपणे काचेवर बोटांनी टिचक्या मारत राहतो.)

वार्वारा (विचारात गढत): आपण फार विचित्र जगतो! फक्त खूप बोल-बोल बोलतो! असंख्य मतं आपण बनवतो, त्यांना पटकन स्वीकारतो आणि तेवढ्याच

त्यांदिशी त्यांना त्याग करतो. पण स्पष्ट, जोरदार इच्छा मात्र आपल्याला होत नाहीत… मुळीच नाहीत!

त्यूमिन: मला उद्देशून तुम्ही हे बोलताय?

वार्वारा: मी सर्वांना उद्देशून बोलत्येय. अगदी अप्रामाणिकपणं, असुंदरपणं, कंटाळवाणं जिणं जगतो आपण!

यूलीया (वेगाने प्रवेश करते. तिच्या पाठोपाठ कालेरीया): मंडळी, मला मदत करा…

कालेरीया: पण खरंच, ही वेळ नव्हे…

यूलीया: तिनं नवी कविता लिहिलीय आणि बालकाश्रमाच्या मदतीसाठी होणाऱ्या कार्यक्रमात ती वाचून दाखवण्याचं तिनं मला वचन दिलंय… आत्ता इथं ती कविता तिनं वाचावी अशी मी विनंती करत्ये! मंडळी, तिला सांगा!

त्यूमिन: वाचा! तुमच्या प्रेमळ कविता मला आवडतात!

मार्या: मलासुद्धा ऐकायची इच्छा आहे. ह्या वादविवादात माणूस निष्कारण उर्मट बनतो. वाचा, खरंच!

वार्वारा: काहीतरी नवीन, कालेरीया?

कालेरीया: होय. गद्य. रटाळ.

यूलीया: अहो, वाचा ना! तुम्हाला काय त्रास होतो? चला, इतरांना गोळा करू या! (कालेरीयाला ओढत बाहेर जाते.)

मार्या: कुठं आहेत… व्लास मिखायलोविच?

वार्वारा: तो अभ्यासिकेत बसलाय. खूप काम आहे त्याला!

मार्या : मी त्यांच्याशी जराशी तिखट वागल्ये … सारा वेळ त्यांचं विदूषकी वागणं पाहून खरंच वाईट वाटतं !

वार्वारा : होय, वाईट वाटतं. त्याच्याशी थोडं मऊ वागलात तर बरं होईल ! तो तसा चांगला आहे. त्याला खूप लोकांनी प्रवचनं झोडली, पण कुणीही त्याच्याशी प्रेमानं वागत नाही.

मार्या (स्मित करत) : आपल्या सर्वांचा हाच अनुभव ! म्हणून आपण सगळे असे उर्मट, तिखट बनलोय !

वार्वारा : तो वडलांबरोबर रहायचा … वडील सदा झिंगलेले … त्याला मारहाण करायचे !

मार्या : त्यांच्यापाशी जात्ये. (अभ्यासिकेच्या दारापाशी जाऊन टकटक वाजवते आणि आत जाते.)

न्यूमिन (वार्वाराला) : मार्या ल्वोवनाशी तुमची मैत्री जास्त जास्त जुळत चाललीय ?

वार्वारा : मला त्या आवडतात.

ओल्गा (हळूच) : सगळ्या बाबतीत किती कठोर बोलतात त्या ! फार कठोर !

न्यूमिन : मार्या ल्वोवनात धर्मश्रद्ध माणसाचा आत्यंतिक क्रूरपणा आहे … आंधळा आणि निष्ठुर क्रूरपणा ! कसा काय हा स्वभाव आवडू शकतो ?

दूदाकोव (कॉरीडॉरमधून प्रवेश करत) : नमस्ते, माफ करा … ओल्गा, तू इथं ? घरी चलणार लौकर ?

ओल्गा : आत्तासुद्धा तयार आहे. तू फिरून आलास ?

वार्वारा : पेलाभर चहा, किरिल आकीमोविच ?

दूदाकोव : चहा ? नको . रात्री पीत नाही ... पावेल निकोलायेविच . माझं तुमच्याशी काम आहे ... उद्या तुमच्याकडे येऊ ?

च्यूमिन : जरूर .

दूदाकोव : अल्पवयीन गुन्हेगारांच्या पुनर्वसनाबाबत ! त्यांनी परत काहीतरी उपद्व्याप केला ! आणि आता त्यांना चोपताहेत ! कालच्या वर्तमानपत्रात तुमच्यामाझ्यावर त्यासंबंधात बरीच आग पाखडलीय .

च्यूमिन : मी खरंच , फारा दिवसात त्या कॉलनीत गेलो नाही ... नेहमी काही ना काही काम निघतं आणि जाणं राहतं .

दूदाकोव : हं ... एकूण सर्वांनाच काही ना काही काम निघतं ... धावपळ खूप आणि प्रत्यक्षात काम काहीच होत नाही ! का बरं असं ? मी खूप दमून जातो . थोडं राईत फिरलो ... मन शांत झालं ... एरवी मनत ताणलेली मन:स्थिती !

वार्वारा : तुमचा चेहरा ओढलेला दिसतोय .

दूदाकोव : शक्य आहे . आज एक अप्रिय घटना घडली . आमचा गाढव साहेब तक्रार करत होता : आम्ही काटकसरीनं वागत नाही ! आजारी लोक फार खातात आणि आम्ही क्विनाईनचे मोठे डोस देतो ! मूर्ख ! पहिली गोष्ट म्हणजे त्याचा ह्याच्याशी काहीही संबंध नाही ... शिवाय , शहराचा खालचा भाग त्यांनी कोरडा केला , तर क्विनाईन वापरण्याची मला गरजच पडणार नाही . मी ते खातो असं वाटतं त्याला ? क्विनाईन आणि नालायक . क्षणभर सहन होत नाहीत मला !

ओल्गा : असल्या क्षुल्लक गोष्टी मनाला एवढ्या कशाला लावून घ्यायच्या, किरिल ? एव्हाना असल्या गोष्टींची सवय झाली पाहिजे.

दूदाकोव : पण सबंध आयुष्यच असल्या क्षुल्लक गोष्टींनी भरलेलं असेल तर ? आणि सवय झाली पाहिजे म्हणजे काय ? कशाची सवय ? प्रत्येक मूर्ख तुझ्या कामात नाक खुपसतो आणि जगायला अडथळा आणतो, त्याची ? खरंच मला सवय होत चाललीय ! साहेब म्हणतो – काटकसर करा ! मी काटकसर करीन ! जरी माझ्या कामाला तसं अपायकारक असलं तरी ! तरीही काटकसर करीन ! कारण माझी खाजगी प्रॅक्टिस नाही आणि ही मूर्ख नोकरी सोडणं मला परवडणार नाही.

ओल्गा (दूषणास्पद स्वरात) : मोठं कुटुंब आहे म्हणून ? होय ना, किरिल ? मी काही पहिल्यांदाच ऐकत नाही हे तुझ्याकडून ... आणि इथं बोलला नसतास तर चाललं असतं ... अव्यवहारी, रांगडा माणूस ! (डोक्याभोवती शाल गुंडाळून झटकन वार्वाराच्या खोलीकडे जाते.)

वार्वारा : ओल्गा ! असं काय बोलत्येस ?

ओल्गा (हुंदके देत) : सोड, सोड मला ! मला माहीत आहे ! मी पूर्वी ऐकलंय सगळं ...

दोघी वार्वाराच्या खोलीत नाहीशा होतात.

दूदाकोव (गोंधळून) : घ्या ! .. असलं काहीही टाळक्यात नव्हतं ! मला माफ करा पावेल सेर्गेयेविच ...

अगदी चुकून घडलं हे ... मी फार बेचैन झालोय ... वेगाने जातो. दारात त्याची कालेरीया, यूलीया व झामीस्लोवशी जवळजवळ टक्कर होते.)

यूलीया : डॉक्टरनी आपल्याला जवळजवळ खालीच पाडलं होतं! काय झालंय त्यांना?

ऱ्यूमिन : मानसिक ताण ... (वार्वारा बाहेर येते.) ओल्गा अलेक्सेयेवना गेल्या?

वार्वारा : होय.

यूलीया : ह्या डॉक्टरांवर माझा विश्वास नाही. काहीतरी गडबड आहे त्यांच्यात. तोतरं बोलतात, भमरभोळे वागतात ... चष्म्याच्या पेटीत चमचा ठेवतात आणि स्वतःच्या छोटया हातोडीनं चहा ढवळतात ... काहीतरी भलतंच विष चुकून औषध म्हणून लिहून द्यायचे!

ऱ्यूमिन : मला वाटतं, स्वतःच्या मस्तकावर गोळी झाडून ते आयुष्याचा शेवट करतील.

वार्वारा : किती शांतपणं सांगताय तुम्ही हे ...

ऱ्यूमिन : डॉक्टरांमध्ये आत्महत्येचं प्रमाण फार आहे

वार्वारा : माणसांपेक्षा शब्द आपल्याला जास्त हेलावतात ... होय ना?

ऱ्यूमिन (दचकून) : वार्वारा मिखायलोवना!

कालेरीया पियानोपाशी बसते. झामीस्लोव तिच्याशेजारी उभा राहतो.

झामीस्लोव : सगळं ठीक आहे तुम्हाला?

कालेरीया : धन्यवाद ...

झामीस्लोव : ऐका, मंडळी!

मार्या आणि व्लास अत्यंत उत्साहाने बाहेर येतात.

व्लास : ओहो! कविता म्हणणार आहेत वाटतं?

कालेरीया (चिडून) : जर तुम्हाला ऐकायची इच्छा असेल, तर गोंगाट करणं बंद करा!

व्लास : सर्व सजीवांनो, मरा!

मार्या : चूप राहू... एकदम चूप!

कालेरीया : आनंद वाटला! ही कविता गद्यरूप आहे. तिला संगीताचा साज चढवायचाय.

यूलीया : संगीताच्या साथीवर वाचन! किती छान! मला आवडतं! सगळ्या अस्सल गोष्टी आवडतात... माझं लहान मुलाप्रमाणं आहे... सुंदर चित्रं असलेली पोस्टकार्डं, मोटारी, असल्या गोष्टीसुद्धा मला आनंद देतात.

व्लास (तिच्या स्वराची नक्कल करत) : भूकंप, ग्रामोफोन, इन्फ्लूएन्झा...

कालेरीया (मोठ्यांदा शुष्कपणे) : मला सुरवात करू द्याल का? (सगळे पटकन बसतात. कालेरीया हलकेच पियानोवरून बोटे फिरवते.) ह्याचं नांव – 'उंच पर्वतावरील श्वेतपुष्पी.'

"आल्पची शिखरं बर्फानं आणि हिमानं सदैव आच्छादलेली आहेत. त्यांच्यावर साम्राज्य नांदतंय थंड निःस्तब्धतेचं, मानी शिखरांच्या शहाण्या मौनाचं.

आकाशाचं असीम वाळवंट पर्वतशिखरांवर पसरलंय आणि अगणित तारका हिमशिखरांवर खेदानं चमचमताहेत.

पर्वतपायथ्याशी, गर्दीनं दाटलेल्या भूमीवर, आयुष्य [illegible]नीनं थरथरतंय, वाढतंय आणि भूमीच्या मालकाला – [illegible]णमाला – यातनांच्या ओझ्याखाली वाकवतंय.

धरतीच्या काळ्या विवरांमधून हास्याचे, कण्हण्याचे, [illegible]नापाच्या किंकाळयांचे, प्रेमाच्या कुजबुजींचे आवाज [illegible]मटताहेत... जीवनाचं गंभीर आणि अनेक आवा-[illegible]चं संगीत!.. पण मूक पर्वतशिखरं आणि निर्विकार [illegible]का – माणसांच्या सुस्काऱ्यांनी मुळीच डहुळत नाहीत.

आल्पची शिखरं बर्फानं आणि हिमानं सदैव आच्छाद-[illegible]ली आहेत. त्यांच्यावर साम्राज्य नांदतंय थंड निः-[illegible]ब्धतेचं, मानी शिखरांच्या शहाण्या मौनाचं.

पण जणू काही अभागी धरतीची आणि थकल्या [illegible]णसांच्या दुःखांची कहाणी सांगण्यासाठी – बर्फाच्या [illegible]यांशी, चिरंतन मूक शांततेच्या साम्राज्यात, एकाकी [illegible]न्न पर्वतपुष्प उमलतंय – श्वेतपुष्पी!

त्यावर, आकाशातल्या असीम वाळवंटात, मानी [illegible]र्य मूकपणं प्रवास करतोय, मुका चंद्र कष्टी चांदणं [illegible]झरतोय आणि तारका मुकेपणानं, धडधडत्या काळजानं [illegible]मचमताहेत.

आणि स्तब्धतेचं थंडगार पांघरूण आकाशातून अलगद-[illegible]णानं दिवस-रात्र एकाकी फुलाला – श्वेतपुष्पीला – आलिंगन घालतंय!"

स्तब्धता. सगळे विचारात गढतात. दूरवर राखणदा-रांच्या काठ्यांची खडखड आणि हलक्या शिट्यांचे आवाज ऐकू येतात. डोळे विस्फारलेली कालेरीया शून्य दृष्टीने पहात बसते.

यूलीया (हळूच) : किती छान ! खूप दु:खद ... नितळ ...

झामीस्लोव : ऐका ! ह्या कवितेचं वाचन शुभ्र पोषाखात केलं पाहिजे – श्वेतपुष्पासारख्या झालरी लावलेल्या ! कसं दिसेल ? अत्यंत सुंदर ! अप्रतीम !

व्लास (पियानोपाशी जात) : मलासुद्धा आवडलं, खरंच ! (कसनुसा स्मित करतो .) आवडलं ! छान आहे ! अगदी खूप उकाड्याच्या दिवशी थंडगार सरबत प्यायल्यासारखं वाटलं !

कालेरीया : चालते व्हा !

व्लास : मी प्रामाणिकपणं म्हणालो . रागावू नका !

साशा (प्रवेश करत) : श्रीयुत शालीमोव आलेत .

एकूण धावपळ . वार्वारा दारापाशी धावते, पण शालीमोवना पाहताच दाराशीच थांबते . त्यांना टक्कल पडले आहे .

शालीमोव : मला आनंद वाटतो की ...

वार्वारा (हळूच , थोडे थांबून) : आत यावं ... या ... सेर्गेइ आत्ता येईल ...

पडदा

अंक दुसरा

बासोव यांच्या दाचासमोरील मैदान . सभोवताली देवदार, पाईन आणि भोजाच्या झाडांचे दाट कडे . डाव्या

बाजूला दोन पाईनच्या झाडांखाली एक गोल टेबल आणि तीन खुर्च्या. त्यांच्यापाठी किंचित उंच पडदे मोडलेला व्हरांडा. त्याच्यासमोर झाडांच्या पुंजक्याखाली पाठ टेकायला फळी असलेला रुंद बाक. त्याच्याजवळून गाईत जायचा रस्ता. त्यापुढे उजव्या बाजूला मागील भागात छोटासा शंखाकृती खुला रंगमंच. त्यापासून मूस्लोवांच्या दाचाला जाण्याचा रस्ता. रंगमंचासमोर काही बाकडी. संध्याकाळ, सूर्य मावळतोय. बासोवांच्या दाचामध्ये कालेरीया पियानो वाजवीत आहे. पूस्तोबायका सावकाशपणे आणि कष्टाने रंगमंचासमोरील बाकड्यांची व्यवस्थित रचना करीत आहे. खांद्यावर बंदूक लटकावलेला क्रोपिल्किन पाईनच्या झाडाजवळ उभा आहे.

क्रोपिल्किन : तो दाचा यंदा कुणी घेतलाय ?

पूस्तोबायका (उदास, भरदार आवाजात) : इंजिनिअर सूस्लोव.

क्रोपिल्किन : सगळे नवीन ?

पूस्तोबायका : काय ?

क्रोपिल्किन : सगळे नवीन, म्हटलं. मागच्या वर्षी ऱ्हात होते त्यांच्यापैकी कुणी नाही.

पूस्तोबायका (पाईप काढत) : सगळे सारखेच. एकजात सारखे.

क्रोपिल्किन (उसासा टाकत) : अर्थातच ... सगळे ... साहेबलोक ... ह्यॅ ह्यॅ ! ..

पूस्तोबायका : दाचावाले – सगळे एकसारखे. पाच वर्षांत मी इतके पाहिलेत की, मोजता येणार नाहीत.

पावसाळी दिवसातल्या डबक्यामधल्या बुडबुड्यांसारखी वाटतात ती माणसं ... फुगतात आणि फुटतात ... फुगतात आणि फुटतात ...

बासोवांच्या दाचामागून मेंडोलिन, बालालैका * आणि गिटार घेतलेल्या तरुणांचा घोळका आरडाओरडा करीत, हसत-खिदळत येतो व राईच्या रस्त्याने जातो.

क्रोपिल्किन : अरे वा ... गाणी-बजावणी ! हेसुद्धा कार्यक्रम करणार काय ?

पूस्तोबायका : करतील ... त्यांना काय ! ही काही उपाशीपोटी माणसं नाहीत.

क्रोपिल्किन : मोठ्या घरची माणसं कार्यक्रम कसे करतात ते मी एकदासुद्धा पाहिलेलं नाही ... मजा येत असेल नाही ? तू बघितलं आहेस ?

पूस्तोबायका : मी ? पाहिलंय ! बंधू, मी सगळं पाहिलंय ...

उजवीकडून द्रोयेतोचिये यांचे गडगडाटी हसणे ऐकू येते.

क्रोपिल्किन : कसा असतो त्यांचा खेळ ?

पूस्तोबायका : अगदी साधा. कपडे करतात आणि बोलतात ... वेगवेगळे शब्द, कुणाला काय आवडतील तसे ... ओरडतात, काहीतरी करत असल्याप्रमाणं इकडंतिकडं धावाधाव करतात ... टाळकी फिरल्यागत ... एकमेकांना फसवतात. एकजण म्हणतो – मी प्रामाणिक

---

* रशियन तंतुवाद्य – अनु.

आहे, दुसरा म्हणतो – मी हुषार आहे, तिसरा म्हणतो – मी अभागी आहे... कुणाला काय सुचेल ते तो बड-बडतो...

डावीकडे कुणीतरी कुत्र्याला शीळ घालून हाक मारतो: "बायान ! बायान !" पूस्तोबायका कुऱ्हाडीच्या दांड्याने बाकड्याचा खिळा ठोकतो.

क्रोपिल्किन: अरे वा... कमाल आहे! आणि गाणी गातात ?

पूस्तोबायका: गाणी फारशी गात नाहीत ते... इंजिनिअरची बायको कधीतरी गाते... पण आवाज तिचा – पातळ !

क्रोपिल्किन: साहेबलोक येताहेत !

पूस्तोबायका: खुशाल येवोत !

उजव्या बाजूने रंगमंचाशेजारी द्वोयेतोचिये प्रवेश करतात. त्यांच्या पाठोमागून सूस्लोव येतात.

द्वोयेतोचिये (प्रेमळ स्वरात): तू मला हसू नको! तुला जेमतेम चाळीस वर्षं उलटलीत, तेवढ्यात टक्कल पडलंय! पण माझी साठी झाली तरी भरघोस कुरळे केस आहेत टाळक्यावर! आता ते पांढरे झाले म्हणून काय बिघडलं? ह्यॅ,ह्यॅ!

पूस्तोबायका मंदपणे, अजागळपणे बाकडी सरकवत राहतो. क्रोपिल्किन सावधपणे रंगमंचामागे जातो.

सूस्लोव: तुमचं सौभाग्य... पुढं सांगा... मी ऐकतोय !

द्रोयेतोचियेः चल, बसू या. तर ह्या दरम्यान जर्मन आले. माझी छोटी फॅक्टरी जुनी होती, यंत्रं भिकार होती आणि त्यांनी सगळं नवीन बसवलं. अर्थात त्यांचा माल माझ्यापेक्षा जास्त चांगला आणि स्वस्त होता. बघितलं – मी गाळात जाणार! विचार केला – जर्मनांपेक्षा उत्तम माल तयार करणं मला जमणार नाही! तेव्हा ठरवलं – सगळं फुंकून टाकायचं! (विचारमग्न होऊन गप्प बसतात.)

सूस्लोवः सगळं विकून टाकलं?

द्रोयेतोचियेः शहरातलं घर शिल्लक ठेवलं. मोठ्ठं, जुनं घर आहे. आता मला काही उद्योग नाही. फक्त एकच उद्योग राहिलाय – पैसा मोजायचा! ह्यॅ, ह्यॅ! खरं बोलायचं तर एवढा मी मूर्ख थेरडा... पण फॅक्टरी विकून टाकल्यावर पोरका झाल्यासारखं वाटलं एकदम! फार कंटाळा येतो आणि काय करावं ते समजत नाही. हे बघ – हे माझे हात! पूर्वी माझ्या ते ध्यानात येत नसत. पण आता नकोशी असलेली वस्तू लोंबकळतेय असं वाटतं! (हसतात. स्तब्धता. वार्वारा व्हरांड्यात येते व पाठीशी हात बांधून विचारमग्नपणे येरझाऱ्या घालू लागते.) ती बघ, बासोवची बायको आली. काय बाई आहे... चुंबक! आणखी दहा वर्षांनी जर लहान असतो...

सूस्लोवः पण तुम्ही... तुमचं लग्न झालंय ना?

द्रोयेतोचियेः झालं होतं. आणि फक्त एकदाच नव्हे! पण माझ्या काही बायका मेल्या आणि काही मला सोडून गेल्या. मुलं होती... दोन मुली... दोघीही

वारल्या! आणि एक मुलगासुद्धा! बुडाला!! बायकांच्या बाबतीत मी फार भाग्यवान होतो. सगळ्या तुमच्या रशियात मिळाल्या. तुमच्यापासून बायका काढून नेणं फार सोपं आहे! नालायक आहात तुम्ही पुरुष! जेव्हा जेव्हा इथं यायचा, तेव्हा तेव्हा बघायचा... सुरेख बाई, पण तिचा नवरा असा-तसाच! बघता बघता तिला गटवायचा! ह्यॅ, ह्यॅ! (क्लास खोलीतून व्हरांड्यात येतो व उभा राहून बहिणीला पाहतो.) हं... हे सगळं घडलं... पण आता – काहीही नाही आणि कुणीही नाही!

सूस्लोव: मग कसं जगायचा विचार आहे?

द्रोयेतोचिये: माहीत नाही. तूच सल्ला दे! तुमचे बीटचे शेंडे फालतू गड्या! आणि डुक्करसुद्धा! ऐन उन्हाळ्यात डुकराचं मांस खायचं म्हणजे विपरीतच!

क्लास: काय झालं, वार्या?

वार्वारा: काही नाही... सहज... मी केविलवाणी दिसतेय... होय ना?

क्लास (तिच्या कमरेला मिठी घालत): तुला काहीतरी छान, प्रेमळ सांगावंसं वाटतं... पण काय बोलायचं तेच ठाऊक नाही!

वार्वारा: मला एकटीला राहू दे!

द्रोयेतोचिये: ते बघ श्रीयुत चेर्नोव आपल्याकडं येत आहेत.

सूस्लोव: तो विदूषक!

द्रोयेतोचिये: उत्साही पोरगा आहे, पण कुचकामी.

क्लास (जवळ येत): कुणाबद्दल म्हणताय?

द्रोयेतोचिये : अं ... हा पुतण्या, ह्यँ, ह्यँ! पण तुम्हालासुद्धा धंद्याची विशेष आवड दिसत नाही?

क्लास : जी काही तुमची ओझरती ओळख मला झालीय, मान्यवर सेम्योन सेम्योनोविच, त्यावरून तुमच्या दृष्टीनं धंदा ह्या शब्दाचा अर्थ तुमच्या जवळच्या माणसांमधून रस पिळून काढायचा, असाच ना? ह्या दृष्टीनं अजून मी धंदेवाला नाही! अरेरे!

द्रोयेतोचिये : ह्यँ, ह्यँ! तुम्ही चिंता करू नका! तरुणपणी, बरं का, हे जरा अवघडच जातं! विवेकबुद्धी अजून तेवढी निब्बर बनलेली नसते आणि डोक्यात मेंदूऐवजी गुलाबी जेली ठासून भरलेली असते. पण वय वाढेल आणि कुणाच्यातरी मानगुटी चढून बसाल! ह्यँ, ह्यँ! जवळच्या माणसाच्या मानगुटी पटकन बसता येतं आणि स्वतःचा फायदा करून घेता येतो!

क्लास : तुम्ही निर्विवादपणं ह्या बाबतीत अनुभवी माणूस आहात आणि तुमच्या सांगण्यावर माझा विश्वास आहे. (झुकून अभिवादन करतो आणि जातो.)

द्रोयेतोचिये : ह्यँ, ह्यँ! माझी हजामत केली म्हणून खूष झाला! छान पोरगा आहे. स्वतःला हीरो समजतो. खुशाल समजो! त्याच्या तरुण मनाला तेवढीच फुंकर! (डोके खाली झुकवून गप्प बसतात.)

कालेरीया (व्हरांड्यात येत) : तू अजून थाऱ्यावर येत नाहीस?

वार्वारा (हळूच) : नाही, जमत नाही ...

कालेरीया : आता तू कुणाची वाट पाहणार?

वार्वारा (विचारमग्न होत) : माहीत नाही ... माहीत नाही !

कालेरीया खंदे उडवते आणि व्हरांडा उतरून दाचा-च्या डाव्या बाजूला नाहीशी होते .

द्वोयेतोचिये : खरंच ! काय रे पेत्रूखा ... कसं जगा-यचं मी ?

सूस्लोव : पटकन ह्या प्रश्नाचा निर्णय लावता येणार नाही . विचार केला पाहिजे .

द्वोयेतोचिये : निर्णय लागत नाही ? ह्यॅ , ह्यॅ ! काय म्हणालास ?

सूस्लोव : काही नाही ... मी काहीही बोलत नाही .

द्वोयेतोचिये : आणि काहीही सांगणार नाहीस , हे मला दिसतंय . (उजवीकडून राईमधून बासोव आणि शालीमोव येतात . झुकून अभिवादन करतात आणि पाईनच्या झाडांखालील टेबलापाशी बसतात . बासोव यांच्या मानेभोवती टॉवेल आहे .) ते बघ – लेखक आणि अॅडव्होकेट येत आहेत ... भटकताय ?

बासोव : पोहलो .

द्वोयेतोचिये : पाणी गार आहे ?

बासोव : प्रमाणात आहे .

द्वोयेतोचिये : मीसुद्धा मला वाटतं पोहायला जावं . चल , प्योत्र , कदाचित मी बुडून मरीन – लौकर वारसा मिळेल तुला – कसं ?

सूस्लोव : नाही , मला शक्य नाही . मला त्यांच्याशी थोडं बोलायचं आहे .

द्रोयेतोचिये: तर मग मी जातो. (उठतात आणि उजव्या बाजूला राईत जातात. सूस्लोव त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहतात आणि हसून बासोवपाशी येतात).

बासोव: वार्या, आम्हाला बीयरची एक बाटली आणून द्यायला सांग... नाही, त्यापेक्षा तीन बाटल्या सांग... तर काय म्हणतात तुझे काका?

वार्वारा खोलीत निघून जाते.

सूस्लोव: थोडा कंटाळा आणतात...

बासोव: खरंच, ही म्हातारी माणसं रटाळ असतात.

सूस्लोव: माझ्याकडं येऊन रहायची त्यांची इच्छा दिसतेय.

बासोव: कोण? तुझे काका? अस्सं... तुझा काय विचार?

सूस्लोव: कुणास ठाऊक? बहुधा त्यांची इच्छा असेल, तसंच होईल.

साशा बीयर घेऊन येते.

बासोव: तू का गप्प, याकोव?

शालीमोव: थोडंसं डोकं ताळयावर नाही. विसरलो मी... त्या भांडकुदळ बाईचं नांव काय?

बासोव: मार्या ल्वोवना... अरे प्योत्र, आज आमच्याकडं दुपारी जेवणाच्या वेळी कसलं जंगी शाब्दिक युद्ध झडलं!

सूस्लोव : अर्थातच, मार्या ल्वोवना...

शालीमोव : जबर बाई आहे बुवा...

वार्वारा परत व्हरांड्यात येते.

सूस्लोव : मला आवडत नाही ती.

शालीमोव : तसा मी नरम माणूस आहे, पण मी कबूल करतो की, तिचा अपमान करायच्या अगदी बेतात होतो.

बासोव (हसून) : पण तिनं भरपूर ऐकवलं तुला !

शालीमोव (सूस्लोवला) : तुम्ही माझ्या जागी आहात अशी कल्पना करा : माणूस लेखक आहे, अनेक भावनांच्या क्षोभातून जातो... शेवटी दमतो. विश्रांती घ्यायला, विचारांची नीट जुळणी करायला म्हणून मित्राकडं रहायला येतो... आणि अचानक एक बाई उगवते आणि त्याच्या मनाचा ठाव घ्यायला सुरवात करते : कशावर तुमचा विश्वास आहे, कशावर तुमच्या आशा आहेत, अमूक गोष्टीवर का लिहीत नाही आणि अमूक गोष्टीबाबत गप्प का राहता ? मग ती म्हणते, तुमच्या लेखनात हे धूसर दिसतंय, हे अशक्य वाटतं, हे सुंदर नाही... अहो मातुश्री, तुम्हाला जमत असेल तर खुशाल लिहा ना स्पष्ट, खात्रीलायक आणि सुंदर ! अगदी प्रतिभाशाली लेखन करा – पण मला बिचाऱ्याला विश्रांती घेऊं द्या ! शी: !

बासोव : हे सोसलं पाहिजे माझ्या मित्रा. माणसं जेव्हा वोल्गा नदीवर प्रवास करतात, तेव्हा स्टर्जन मासा हमखास खातात आणि जेव्हा एखाद्या लेखकाला

भेटतात, तेव्हा हमखास स्वत:चं चातुर्य त्याच्यापुढं दाखवू पाहतात. हे सहन करणं भाग आहे.

शालीमोव: हे फारसं चतुरपणाचं नाही... शहाणपणाचंही नव्हे! ती बऱ्याचवेळा येते तुझ्याकडं?

बासोव: नाही... म्हणजे येते वारंवार! पण मी तिला फारसं उत्तेजन देत नाही. ती अगदी सरळसोट आहे, एखाद्या काठीसारखी... माझ्या बायकोची तिच्याशी मैत्री आहे. ती माझ्या बायकोवर फार वाईट परिणाम घडवतेय. (व्हरांड्याकडे नजर टाकतो तेव्हा वार्वारा दिसते.) वार्या... तू इथं आहेस?

वार्वारा: तुला तसं दिसतंय ना!

झामीस्लोव आणि यूलीया सूस्लोवांच्या दाचापासून झपझप चालत येतात. खिदळताहेत. गोंधळलेल्या बासोवकडे शालीमोव हसून पाहतात.

झामीस्लोव: वार्वारा मिखायलोवना! आम्ही पिकनिक काढतोय... होड्यांमधून जातोय.

यूलीया: नमस्ते, लाडके!

वार्वारा: आत या!

खोलीत अदृश्य होतात. सूस्लोव उठतात आणि सावकाशपणे त्यांच्या पाठीमागून जातात.

झामीस्लोव: कालेरीया वासिल्येवना घरात आहेत?

शालीमोव (हसून): तू बायकोला भितोस असं दिसतं, सेर्गेइ?

बासोव (सुस्कारा टाकत): भलतंच! ती फार छान आहे.

शालीमोव (किंचित हसून) : एवढं दुःखी स्वरात का सांगितलंस हे ?

बासोव (दबत्या आवाजात, सूस्लोवकडे मानेने निर्देश करत) : मत्सर करतोय... माझ्या मदतनीसाचा... समजलं ? आणि त्याची बायको – तू लक्ष दे – खास बाई आहे !

सोन्या आणि झीमिन मागच्या बाजूने जातात.

शालीमोव : असं ? बघू ! पण खरं तर बायकांशी नव्यानं ओळखी करून घेण्याच्या माझ्या इच्छेवर ह्या मार्या ल्वोवनानं पुरता बोळा फिरवलाय !

बासोव : बंधू, हा नमूना अगदी वेगळा आहे. ओह् ! तू बघशील... (स्तब्धता.) बऱ्याच दिवसात तुझं काहीच प्रसिद्ध झालं नाही. काहीतरी फार मोठं लिहितो आहेस काय ?

शालीमोव (चिडकेपणाने) : काहीही लिहीत नाही मी... खरं ते सांगतो ! आणि जेव्हा काय चाललंय ह्याचा थांगपत्ता लागत नाही, अशा काळात लिहिणार काय कपाळ ? लोक गोंधळलेले आहेत, निसरडे वागताहेत, त्यांच्यावर नेमकं बोट ठेवणं अशक्य झालंय !

बासोव : तर मग तसंच लिही – काहीही समजत नाही ! बंधू, लेखकानं प्रामाणिक असणं सर्वांत महत्त्वाचं !

शालीमोव : सल्ल्याबद्दल आभार ! प्रामाणिकपणा महत्त्वाचा नाही राहिला, मित्रा ! प्रामाणिकपणं मी कदाचित एकच गोष्ट करू शकलो असतो – दिओक्लेतिआनप्रमाणं लेखणी टाकायची आणि कोबीची

ञागवड करायची ... (दाचामागून काही भिकाऱ्यांचे हल-क्या सुरात गाणे ऐकू येते: "भल्या माणसांनो, ख्रिस्ताच्या नांवानं, मृतांच्या आठवणीखातर, एक भाकर-तुकडा वाढा." पूस्तोबायका त्यांना हाकलून लावतो.) पण पोट भरलं पाहिजे आणि म्हणून लिहिलं पाहिजे. कुणासाठी? माहीत नाही ... लेखकानं आपल्या वाच-काला स्पष्ट पाहिलं पाहिजे – तो कसा आहे? कोण आहे? पाच वर्षांपूर्वी मला खात्री होती की, वाचकाला मी ओळखतो ... माझ्यापासून त्याची काय अपेक्षा आहे हेसुद्धा माहीत होतं! पण अचानक, अगदी नकळत-पणं मी त्याला गमावला! खरंच गमावला! ह्यातलं नाटच जाणून घे! आता म्हणतात – नवा वाचक जन्माला आलाय ... कोण तो?

बासोव: मला तुझं बोलणं समजत नाही. काय ह्याचा अर्थ – वाचकाला गमावला? तर मग मी ... आम्ही सगळे – देशातले बुद्धिजीवी – आम्ही वाचक नव्हेत? नाही समजत ... कसं आम्हाला गमावलं? अं?

शालीमोव (विचारमग्न होत): अर्थात ... बुद्धि-जीवी – मी त्यांच्याबद्दल नाही बोलत. पण आणखी एक आहे ... नवा वाचक.

बासोव (मान हलवीत): अरेच्चा? नाही बुवा समजत.

शालीमोव: मलासुद्धा समजत नाही ... पण जाण-वतं. रस्त्यावरून जाताना काही माणसं दिसतात ... त्यांच्या चेहऱ्यांमध्ये काहीतरी वेगळं आहे ... त्यांचे डोळे ... त्यांच्या डोळयांमध्ये पाहतो तेव्हा जाणवतं:

माझं लेखन ही माणसं वाचणार नाहीत! त्यांना त्यात रस नाही!.. हिवाळ्यात एका कार्यक्रमात मी वाचन केलं, तेव्हाही दिसलं–अनेक डोळे माझ्याकडे लक्षपूर्वक पहात होते, कुतूहलानं पहात होते ... पण ही माणसं मला परकी होती. मी त्यांना आवडत नाही! माझी त्यांना गरज नाही... लॅटिन भाषेप्रमाणं... त्यांच्या दृष्टीनं मी जुना झालोय ... आणि माझे सगळे विचारही जुनाट ठरलेत ... मला समजत नाही – ही कोण माणसं? कोण त्यांना आवडतो? काय पाहिजे त्यांना?

बासोव : खरंच ... आश्चर्य आहे. मला वाटतं – मानसिक ताणाचा अतिरेक झाला म्हणून असं होतं? इथं रहा, विश्रांती घे, मन शांत कर आणि वाचक तुला परत गवसेल! आयुष्यात मुख्य म्हणजे सर्व गोष्टींकडं शांतपणं, लक्षपूर्वक पहावं ... मला असं वाटतं ... चल, घरात जाऊ! याशा, तुला एक सांगतो! थोडंसं – मोरासारखं वाग!

शालीमोव (दचकून) : का ... य? मोरासारखं वाग म्हणजे? कशाला?

बासोव (गूढपणे) : म्हणजे पाठीमागं असा पिसारा फुलव! वार्यापुढं ... माझ्या बायकोपुढं ... तिचं मनोरंजन कर ... तिची मैत्री संपादन कर ...

शालीमोव (थोडे थांबून) : म्हणजे विद्युल्लेखेचा तडाखा सोसणाऱ्या तारेचं काम मला करावं लागणार? मजेदार आहेस तू! ठीक आहे. जशी तुझी इच्छा!

बासोव : तसा भलताच ग्रह करून घेऊ नकोस ... ती फार छान आहे! पण कशाबद्दल तरी सारखी

झुरतेय... आता सगळेच झुरायला लागलेत! सगळ्यांच्या मनःस्थिती बिघडलेल्या... विचित्र संभाषणं... एकूण कुठंतरी बिघाड झालाय! बरं, तुझं लग्न झालंय? मी असं ऐकलं की,.तू घटस्फोट घेतलास.

शालीमोव: आणि परत लग्न केलं होतं आणि परत एक घटस्फोट घेतला... तुला सांगू, स्त्रीमध्ये साथी शोधणं अवघड आहे.

बासोव: खरंच! अगदी योग्य बोललास! मित्रा, अगदी सत्य आहे हे...

घरात जातात. पिवळ्या पोषाखातील तरुणी आणि चौकडीच्या सुटातील तरुण राईमधून येतात.

तरुणी: अजून कुणीही नाही? पण सांगितलं होतं... सहा वाजता! आवडतं तुम्हाला असं?

तरुण: खरं सांगायचं तर मला नेहमी हीरोच्या भूमिका करायची सवय...

तरुणी: कमाल आहे! मला तसंच वाटलं होतं!

तरुण: होय, हीरोच्या! पण तो मला देतोय विनोदी भूमिका. हे योग्य नाही – पटतं ना!

तरुणी: सगळ्या चांगल्या भूमिका त्यांनी स्वतःसाठी घेतल्या...

उजवीकडे राईत जातात. दुसऱ्या बाजूने सोन्या आणि झीमिन येतात. रंगमंचाच्या मागील भागातून सूस्लोव मंद गतीने स्वतःच्या दाचाकडे जात आहेत.

झीमिन (दबत्या आवाजात): तर मी तिकडं

नाही येत, सोन्या अच्छा, उद्या... मी जाणार.

सोन्या (त्याच्याच सुरात) : ठीक... जा! सांभाळून ऱ्हा, माक्स, मी तुला विनंती करत्ये.

झीमिन (तिचे हात पकडत) : आणि तूसुद्धा...

सोन्या : भेटू परत! तीन आठवड्यानंतर... आधी नाही?

झीमिन : नाही, आधी नाही. परत भेटू, लाडके सोन्या! तू माझ्याशिवाय... (गोंधळून गप्प होतो.)

सोन्या : काय?

झीमिन : काही नाही... वेडेपणा! अच्छा, सोन्या...

सोन्या (त्याचा हात पकडून) : नाही, सांग – तू माझ्याशिवाय – काय?

झीमिन (डोके खाली झुकवून हळूच) : दुसऱ्या कुणाशी लग्न करणार नाहीस?

सोन्या : असं बोलू नको माक्सिम... आणि विचार-सुद्धा करू नको! ऐकलंस? हा मूर्खपणा आहे – नीचपणा आहे! माक्सिम... समजलं?

झीमिन : नको... वाईट वाटून घेऊ नको. माफ कर... इच्छा नसताना मनात काहीतरी जंगली विचार येतात... असं म्हणतात – माणूस स्वतःच्या भावनेचा मालक नाही!

सोन्या (संतापून) : हे खोटं आहे! धादांत खोटं आहे माक्सिम! तुला हे माहीत व्हावं अशी माझी इच्छा आहे – की हे खोटं आहे!.. दुबळेपणाचं समर्थन करायला हा विचार शोधून काढलाय. माक्सिम, लक्षात ठेव, माझा ह्यावर विश्वास नाही! जा!..

झीमिन (तिचे हात दाबून) : ठीक आहे! मी ह्याची आठवण ठेवीन, सोन्या... नक्की! भेटू परत, लाडके!

झीमिन दाचाच्या कोपऱ्यावरून वेगाने निघून जातो. सोन्या त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात राहते, नंतर सावकाशपणे व्हरांड्यात येते आणि मग खोलीत जाते. दूदाकोव, व्लास आणि मार्या राईतून उजव्या बाजूने येतात. त्यांच्यापाठीमागून द्वोयेतोचिये. मार्या एका बाकावर बसतात, द्वोयेतोचिये त्यांच्या शेजारी बसतात आणि जांभई देतात.

दूदाकोव : आयुष्य एवढं अवघड असूनही माणसं गंभीरपणानं वागत नाहीत – असं का?

व्लास : मला माहीत नाही, डॉक्टर! तर पुढं सांगतो: माझा बाप आचारी होता. अफाट कल्पना करायचा. माझ्यावर फार क्रूरपणं त्यानं प्रेम केलं आणि स्वतःच्या पाईपप्रमाणं सगळीकडं मला फिरवायचा. मी अनेकदा आईकडं पळून गेलो, पण तो लाँड्रीत यायचा, त्याच्या तडाख्यात सापडतील तेवढ्यांना पिटून काढायचा आणि परत मला कैद करून न्यायचा. एकदा तो एका बिशपची नोकरी करत होता तेव्हा मला शिक्षण देण्याचा घातकी विचार त्याच्या मनात आला. म्हणून मी धर्मविद्यालयात दाखल झालो. मग काही महिन्यांनंतर बापानं एका इंजिनिअरकडं नोकरी धरली आणि मी रेलकामगारांच्या तंत्रविद्यालयात शिकू लागलो... एक वर्षानंतर मी कृषिविद्यालयात होतो,

कारण ग्रामीण जमीन खात्याच्या अध्यक्षाकडं माझा बाप नोकरी करत होता. चित्रकलाविद्यालयाच्या आणि व्यापारी तंत्रविद्यालयाच्या भिंतींना मला पाहण्याचा मान लाभला. थोडक्यात सांगायचं तर, मी सतराव्या वर्षात पदार्पण केलं तेव्हा शिक्षणाची मला एवढी तिडीक बसली होती की, काहीही शिकणं मला अशक्य ठरलं – अगदी धूम्रपान करायला अथवा पत्ते खेळायला शिकणंसुद्धा! असं काय पाहताय माझ्याकडं, मार्या ल्वोवना?

मार्या (विचारमग्न होत): फार वाईट वाटतं हे सगळं ऐकून.

व्लास: वाईट वाटतं? पण हा भूतकाळ आहे!

तोंड गुंडाळून घेतलेली बाई: अहो, आमचा झेन्या कुणी पाहिला का? पोरगा... इकडं धावत आला नाही? गवताची टोपी आहे डोक्यावर... सोनेरी केस आहेत...

मार्या: नाही पाहिला.

बाई: काय कारटा तरी! रोझोव साहेबांचा पोरगा! महाचळवळ्या पोरगा... नाही दिसला?

व्लास: नाही पाहिला, मावशीबाई!

बाई काहीतरी पुटपुटत राईत जाते.

द्वोयेतोचिये: तुम्हाला समजतं श्रीयुत चेर्नोव...

व्लास: काय? नाही समजत.

द्वोयेतोचिये: तुम्ही मला आवडता!

व्लास: असं?

द्रोयेतोचिये : खरंच !

क्लास : मला आनंद वाटला – तुमच्यासाठी !

द्रोयेतोचिये खो खो हसतात.

दूदाकोव : तुम्हाला फार कठीण काळ काढावा लागणार, क्लास !

क्लास : केव्हा ?

दूदाकोव : एकूणच ... नेहमी !

द्रोयेतोचिये : अर्थात अवघड जाणार ... कारण माणूस रोखठोक आहे. आणि तो वाकतो अथवा नाही हे पाहण्यासाठी त्याच्या वाटेत अडथळे आणून स्वतःचं मनोरंजन करण्याचा माणसं नेहमी प्रयत्न करणार.

क्लास : बघू ! पण आता चहा प्यायला चलता ? बहुधा आमच्याकडं एव्हाना चहापान सुरू झालं असावं.

दूदाकोव : ही उत्तम कल्पना आहे.

द्रोयेतोचिये : माझी हरकत नाही, पण मी येणं बरं दिसेल ?

क्लास : संकोच करू नका आजोबा. मी पुढं जातो ... (पळत दाचाकडे जातो. बाकीचे सावकाशपणे जातात.)

द्रोयेतोचिये : छान पोरगा आहे.

मार्या : होय, चांगला आहे. फक्त निष्कारण बढाणे करतो.

द्रोयेतोचिये : हरकत नाही ! जाईल ही सवय. त्याच्या मनात प्रामाणिकपणा आहे. बहुतेक माणसं वरपांगी प्रामाणिकपणा पांघरतात, नेकटाय वापरतात तसा ! माणूस सतत ओरडत राहतो : "मी प्रामाणिक,

प्रामाणिक !" जेव्हा एखादी पोरगी स्वत:बद्दल पुन:-पुन्हा सांगायला लागते – "मी कुमारी आहे ! मी कुमारी आहे !" तेव्हा माझी खात्री पटलेली असते की, तिचं कौमार्य केव्हाच निकालात निघालंय ! ह्यॅ, ह्यॅ ! मला माफ करा, मार्या ल्वोवना ...

मार्या : तुमच्यापासून दुसरी काय अपेक्षा करणार ?

व्हरांड्यातून घरात जातात. सूस्लोव त्यांना दारात भेटतात.

द्वोयेतोचिये : तू कुठं निघालास, प्योत्र ?

सूस्लोव : असंच ... सिगारेट ओढायला, मोकळ्या हवेत.

सूस्लोव मंदपणे स्वत:च्या दाचाकडे जातात. वाटेत त्यांना तोंड गुंडाळून घेतलेली बाई भेटते. राईमधून उंच टोपीतील गृहस्थ येतो, थांबतो आणि खांदे उडवतो.

बाई : साहेब, तुम्ही एका लहान मुलाला पाहिलंत का ? कोल्या ... नाही ... झेन्या त्याचं नांव ... जाकीट आहे अंगात !

सूस्लोव (हळू आवाजात) : नाही ... जा इथून !

बाई पळत जाते.

गृहस्थ (ऐटीत झुकतो) : महाशय, माफ करा ... तुम्ही मला तर शोधत नाही ?

सूस्लोव (आश्चर्याने) : मी नाही कुणाला शोधत. ती बाई शोधतेय.

गृहस्थ : त्याचं असं आहे ... नाटकात मुख्य भूमिका करायला मला बोलावण्यात आलंय.

सूस्लोव (दूर जात) : माझा त्याच्याशी संबंध नाही.

गृहस्थ (अपमानीत स्वरात) : मग कुणाचा नेमका संबंध आहे? सरतेशेवटी दिग्दर्शक आहे कुठं? दोन तास मी शोधतोय ... पायपीट करतोय ... गेला ... गावढळ !.. (उघडया रंगमंचापाशी चालत जातो व त्यामागे अदृश्य होतो. सूस्लोवांच्या दाचाच्या रस्त्यावरून ओल्गा येते.)

ओल्गा : नमस्ते, प्योत्र इवानोविच !

सूस्लोव : अं ... नमस्ते !.. फार उकडतंय !

ओल्गा : उकडतंय? मला नाही तसं वाटत ...

सूस्लोव : (सिगारेट पेटवत) : पण माझा जीव घुसमटला. इथं कुठलीतरी अर्धवट डोक्याची माणसं फिरताहेत. लहान मुलांना शोधतात, दिग्दर्शकांना शोध-तात !

ओल्गा : होय, होय. तुम्ही थकलात काय? तुमचे हात थरथर कापताहेत.

सूस्लोव : (तिच्याबरोबर बासोवांच्या दाचाकडे परत येत) : याचं कारण काल मी खूप दारू प्यायलो आणि झोप व्यवस्थित झाली नाही.

ओल्गा : कशाला तुम्ही पिता?

सूस्लोव : मजेत जगण्यासाठी !

ओल्गा : माझ्या नवऱ्याशी तुमची भेट झाली?

सूस्लोव : ते बासोवांकडं चहा पीत बसलेत.

वार्वारा (व्हरांड्यात येते) : तू माझ्याकडं आलीस, ओल्गा ?

ओल्गा : मी भटकतेय.

वार्वारा : आणि तुम्ही का निघून गेलात, प्योत्र इवानोविच ?

सूस्लोव (किंचित हसून) : नेहमीप्रमाणं जमिनीवरून चालतोय ! लेखकमहाशयांची आणि महाथोर मार्या ल्वोवनाची भाषणं ऐकायचा वीट आला.

वार्वारा : असं ? तुम्हाला नाही आवडत ? पण मी मात्र ऐकत्येय.

सूस्लोव (खांदे उडवून) : तुम्हाला लखलाभ होवोत ! अच्छा, चलतो ... (स्वतःच्या दाचाकडे जातो.)

ओल्गा (हळूच) : तो असं का वागतो हे तुला समजतं ?

वार्वारा : नाही. ते समजून घेण्याची माझी इच्छा नाही. आत चलतेस ?

ओल्गा : बैस माझ्याबरोबर. तिथं तुझ्याविना अडणार नाही.

वार्वारा : अर्थातच. तू परत बेचैन आहेस ?

ओल्गा : शांत जगणं मला शक्य आहे का, वार्या ? तो शहरातून आला, मिनिटभर घरात डोकावला आणि गायब झाला ... ह्याचा मला आनंद होऊ शकत नाही हे पटतं ना तुला ?

वार्वारा : ते आमच्याकडं बसलेत.

सावकाशपणे त्या देवदारांच्या झाडांच्या पुंजक्याकडे जातात.

ओल्गा (त्रासिकपणे) : तो माझ्यापासून आणि मुलांपासून लांब पळतोय. मला समजतं, त्याला अतिकामाचा ताण पडलाय... विश्रांतीची गरज आहे. पण तशी मीसुद्धा थकल्येय! किती दमल्येय म्हणून सांगू! काहीही काम होत नाही हातून... सारख्या चुका होतात. मग स्वतःचाच राग येतो. त्यानं आठवण ठेवली पाहिजे – माझं सगळं तारुण्य, माझं सारं बळ मी त्याच्यापायी खर्चलंय.

वार्वारा (सौम्यपणे) : लाडके ओल्गा मला वाटतं, तुला तक्रारी सांगायला आवडतं! नाही? माझं चुकतंय?

घरातून वादविवादाचा अस्पष्ट गोंगाट ऐकू येत असतो. आता आवाज वाढत जातो.

ओल्गा : माहीत नाही... शक्य आहे! त्याला सांगायची इच्छा आहे माझी – मी आणि मुलांनी निघून जाणं जास्त हिताचं ठरेल!

वार्वारा : अगदी बरोबर. तुम्ही एकमेकांपासून थोडा काळ लांब राहणं आवश्यक आहे. जा तू... मी तुझ्या खर्चाची व्यवस्था करीन.

ओल्गा : मी आधीच तुला खूप पैसे देणं आहे.

वार्वारा : किरकोळ गोष्टी आहेत ह्या! शांत हो. इथं बसू या.

ओल्गा : तुझ्या मदतीविना मी जगू शकत नाही ह्याचा मला फार तिटकारा येतो... स्वतःचा फार तिटकारा वाटतो! तुझ्यापासून पैसे उसने घेणं...

तुझ्या नवऱ्याचे पैसे घेणं... मला सोपं जातं असं वाटतं तुला? जर जगायची अक्कल नसेल... सगळं आयुष्यभर कुणाच्या तरी मदतीची, आधाराची गरज भासत असेल... तर स्वतःचा मान रहात नाही... समजलं? कधी कधी तूसुद्धा मला आवडत नाहीस... डोळ्यांसमोर नकोशी होत्येस! कारण अशी शांत राहू-नेस, तर्काच्या कसोटया लावत बसतेस, पण जगत नाहीस, जाणवून घेत नाहीस.

वार्वारा: लाडके, मला फक्त गप्प बसायला जमतं! नकारी करणं मला अशक्य ठरतं! एवढंच!

ओल्गा: जी माणसं दुसऱ्यांना मदत करतात, ती मनातल्या मनात मदत घेणाऱ्यांचा तिटकारा करत असावीत. दुसऱ्याला मी मदत करावी, अशी माझी इच्छा आहे.

बासोवांच्या दाचाकडे ऱ्यूमिन लगबगीने येतो.

वार्वारा: माणसांचा तिटकारा करता यावा म्हणून?

ओल्गा: होय! होय! मला आवडत नाहीत ती! मार्या ल्वोवना मला आवडत नाही – कशाबद्दल ती सगळ्यांची कठोर हजेरी घेते? ऱ्यूमिन मला आवडत नाही – तो प्रत्येक बाबतीत तत्त्वज्ञानाचा लेप लावतो, पण काहीही करायची त्याच्यात हिंमत नाही, त्याला जमत नाही. आणि तुझा नवराही मला आवडत नाही – कणकेच्या गोळ्याप्रमाणं तो मऊ बनलाय... तुला घाब-रायला लागलाय! हे काय चांगलं? आणि तुझा

भाऊ... ह्या प्रवचनं झोडणाऱ्या बाईच्या, ह्या चिडक्या मार्या ल्वोवनाच्या, प्रेमात पडलाय!

वार्वारा (चकित होऊन रागीट सुरात): ओल्गा! तुला काय झालंय? हे चांगलं नाही! ऐक...

ओल्गा: हो! हो! नसू दे चांगलं! आणि ही मानी कालेरीया! गप्पा मारते सौंदर्याच्या, पण प्रत्यक्षात फक्त लग्नाची इच्छा आहे तिची!

वार्वारा (कठोर आणि थंड सुरात): ओल्गा! ह्या भावनांच्या आहारी तू जाऊ नकोस... तुला त्या भलत्या वाटेला नेतील!

ओल्गा (हळू आवाजात, पण ठामपणे आणि दुष्टाव्याने): मला नाही पर्वा! कुठंही पोचले तरी चालेल! पण ह्या रटाळ यातनांमधून मुक्त होईन! मला जगायचंय! मी दुसऱ्यांपेक्षा वाईट नाही! मला सगळं दिसतं... मी मूर्ख नाही... तू कशी आहेस हेसुद्धा मला समजतं! तुझं आयुष्य आरामाचं आहे. तुझा नवरा श्रीमंत आहे. धंद्याबाबत तुझा नवरा फारसा नेक चालीचा नाही... सगळेजण त्याच्याबद्दल असं बोलतात. तुला माहीत असलं पाहिजे!.. तू स्वतःसुद्धा... असं काहीतरी करून ठेवलं आहेस की, तुला मुलं होऊ नयेत...

वार्वारा (सावकाशपणे उठते आणि ओल्गाकडे चकित डोळयांनी पाहते): काहीतरी करून ठेवलंय? तू... तुला काय म्हणायचंय?..

ओल्गा (गोंधळून): मी विशेष काही बोलत नाही... मला फक्त सांगायचं होतं... मला नवरा म्हणाला

होता की, अनेक बायकांना मुलं नको असतात.

वार्वारा: मला तुझं म्हणणं समजत नाही, पण जाणवतंय. कसलातरी घाणेरडा आरोप तू माझ्यावर लादू पाहते आहेस. मात्र तो आरोप जाणून घेण्याची माझी इच्छा नाही.

ओल्गा: वार्या, असं बोलू नको, माझ्याकडं अशा नजरेनं पाहू नको. पण हे खरं आहे... तुझ्या नवऱ्या-बद्दल काय वाट्टेल ते बोलतात.

वार्वारा (शहारते आणि विषण्णपणे बोलते): ओल्गा, तू मला बहिणीसारखी होतीस. तुला जगणं किती जड जातंय हे जर मला माहीत नसतं, कधीतरी आपण एका वेगळ्याच जीवनाची स्वप्नं पाहिली होती हे जर मला आठवत नसतं...

ओल्गा (प्रामाणिकपणे): मला क्षमा कर... क्षमा कर. मी दुष्ट बनल्येय.

वार्वारा: सुंदर, रंगीबेरंगी आयुष्याची स्वप्नं पाहिली होती आणि ह्या हरवलेल्या स्वप्नांवर एकत्र आसवं ढाळली होती. तू मला फार दुखवलंस ओल्गा! तुझी इच्छा होती अशी? मला फार दुखावलंस!

ओल्गा: असं बोलू नको... बोलू नको असं, वार्या!

वार्वारा: मी जाते. (ओल्गा उठते.) नको! माझ्यामागून येऊ नकोस! गरज नाही.

ओल्गा: तू कायमची... वार्या? तू – कायमची?

वार्वारा: चूप रहा! थांब... तू कशाबद्दल माझ्याशी असं वागलीस ते मला समजत नाही.

द्रोयेतोचिये, लगबगीने व्हरांड्यातून येतात, खो खो हसतात आणि वार्वारापाशी येऊन तिचा हात पकडतात.

द्रोयेतोचिये : मी पळालो, बाईसाहेब! देखणे तत्त्वज्ञ श्रीयुत न्यूमिन यांनी माझी भंबेरी उडवली! मला सगळे पंडिती शब्द माहीत नाहीत आणि त्यांना उलट उत्तरं देणं मला जमलं नाही. एखाद्या झुरळाला काकवीत बुडवावं तसं त्यांनी मला भाषणांच्या महापुरात बुडवलं. अक्षरशः दूर पळालो त्यांच्यापासून! त्यापेक्षा तुमच्याशी गप्पा मारणं चांगलं. हा म्हातारा तुमच्यावर ठार वेडा झालाय, खरंच! पण तुमच्या चेहऱ्यावर असा हरवलेला भाव का? (ओल्गाकडे पाहतात आणि असमाधानाचा फूत्कार टाकतात.)

ओल्गा (केविलवाणेपणे) : मी जाऊ, वार्या?

वार्वारा (ठामपणे) : हो... (ओल्गा लगबगीने रंगमंचाच्या पाठीमागील भागात जाते. तिची पाठमोरी आकृती नाहीशी होईपर्यंत वार्वारा तिच्याकडे पहात राहते व मग द्रोयेतोचिये यांच्याकडे वळते.) काय म्हणालात तुम्ही? माफ करा... मी...

द्रोयेतोचिये (स्नेहभावाने) : छेः बाईसाहेब! तुमच्याकडं पाहिलं म्हणजे जाणवतं : इथं तुम्ही सुखी नाही! खरं ना? (खो खो हसतात.)

वार्वारा (त्यांना आपादमस्तक न्याहाळून, शांत आणि संथपणे) : हे बघा सेम्योन सेम्योनोविच, अशा विचित्र स्वरात माझ्याशी बोलण्याचा हक्क तुम्हाला कुणी दिला, ह्याचा मला खुलासा कराल काय?

द्रोयेतोचिये : ह्यॅ, ह्यॅ, ह्यॅ! सोडा! माझं म्हातारपण

आणि माझा अनुभव मला हा हक्क देतात.

वार्वारा : मला माफ करा... पण अशिष्टपणं दुसऱ्याच्या वैयक्तिक भानगडीत नाक खुपसण्याचा त्यामुळं अधिकार प्राप्त होत नाही.

द्वोयेतोचियें (भलेपणाने) : मी अजिबात कुठं नाक खुपसत नाही. पण मला दिसलं... इथं तुम्हाला परकं वाटतंय आणि मलाही परकं वाटतंय... तेव्हा मला तुमच्याशी बोलायची इच्छा झाली. पण मी काहीतरी घोटाळा केलाय... मला क्षमा करा.

वार्वारा (किंचित हसून) : मला माफ करा... मला वाटतं, मी तुमच्याशी काहीशी उर्मट वागले. पण खरंच, अशा रीतीनं कुणाचं बोलणं ऐकून घ्यायची मला सवय नाही.

द्वोयेतोचियें : मला समजतं! मला दिसतंय की तुम्हाला तशी सवय नाही! इथं कशी सवय होणार? चला, फिरायला जाऊ या? म्हाताऱ्यावर अनुग्रह करा!

सेम्योनोव सायकलवरून जोरात येतो आणि नेमका द्वोयेतोचियें यांच्या पायांपाशी कोसळतो.

द्वोयेतोचियें (घाबरून) : अहो साहेब, तुम्ही कुठं? काय विचार आहे आपला?

सेम्योनोव (धापा टाकत) : माफ करा... सगळं संपलं?

द्वोयेतोचियें : काय संपलं? डोकं फिरलंय का?

सेम्योनोव : किती वाईट! टायर पंक्चर झालं!

आज मला दोन तालमी होत्या ...

द्वोयेतोचिये : पण माझा त्यांच्याशी काय संबंध ?

सेम्योनोव : तुम्ही भाग घेत नाही ? माफ करा ! मला वाटलं, तुम्ही मेकपमध्ये आहात !

द्वोयेतोचिये (वार्वाराला) : काय भानगड आहे ?

वार्वारा (सेम्योनोवला) : तुम्ही तालमीला आलात ?

सेम्योनोव : होय आणि वाटेत ...

वार्वारा : अजून तालमीला सुरवात झालेली नाही.

सेम्योनोव (आनंदाने) : फार आभारी आहे आपला ! हे फार वाईट झालं होतं ... नेहमी मी अगदी वेळेवर येतो !

द्वोयेतोचिये : कशाबद्दल वाईट वाटतंय तुम्हाला ?

सेम्योनोव (ऐटीत) : जर मला उशीर झाला असता, तर वाईट वाटलं असतं ... माफ करा. (झुकून अभिवादन करतो आणि खुल्या रंगमंचाकडे जातो.)

द्वोयेतोचिये : विचित्र प्राणी आहे ! जवळ जवळ अंगावरच घातली होती त्यानं सायकल ! चल, इथून लांब जाऊ या, वार्वारा मिखायलोवना ! नाहीतर आणखी कुणी येऊन आदळायचा !

वार्वारा (विमनस्कपणे) : चला ... मी रुमाल आणत्ये ... आत्ता आल्येच ! (दाचाकडे जाते. सेम्योनोव द्वोयेतोचिये यांच्यापाशी येतो.)

सेम्योनोव : तिकडून आणखी येत आहेत ... दोन तरुणी आणि एक युंकर ...

द्वोयेतोचिये : असं ? येत आहेत ? ऐकून आनंद वाटला मला !

सेम्योनोव : आत्ता ते इथं उगवतील ... हा युंकर कोण माहीत आहे ? त्याच्या बहिणीनं गोळी झाडून आत्महत्या केली होती !

द्वोयेतोच्चिये : तोच का हा ? कमाल आहे !

सेम्योनोव : किती सनसनाटी, होय की नाही ? तरुण मुलगी आणि अचानक पिस्तूल झाडते !

द्वोयेतोच्चिये : हं ... खरंच ... सनसनाटी !

सेम्योनोव : मला वाटलं, तुम्ही मेकप केलाय ... तुमचे केस आणि तुमचा चेहरा ... अगदी मेकप केल्या-सारखे वाटतात !

द्वोयेतोच्चिये : आपले मनापासून आभार मानतो !

सेम्योनोव : मी खोटी स्तुती करत नाही, खरंच सांगतोय !

द्वोयेतोच्चिये : माझा विश्वास आहे तुमच्यावर. पण मला समजत नाही ... ह्यात कौतुकास्पद काय ?

सेम्योनोव : म्हणजे काय ? मेकपमध्ये माणूस प्रत्य-क्षातल्यापेक्षा नेहमी जास्त सुंदर दिसतो. तुम्ही नेपथ्यकार नर नव्हेत ना ?

राईमधून सूस्लोव येतात. रंगभूमीच्या पाठीमागील भागात पिवळ्या पोषाखातील तरुणी आणि चौकडीच्या सुटातील तरुण अवतरतात.

द्वोयेतोच्चिये : नाही ! मी फक्त काका आहे ... ह्या सद्गृहस्थाचा.

पिवळ्या पोषाखातील तरुणी : श्रीयुत साझानोव !

सेम्योनोव : मला हाक मारताहेत. आश्चर्य आहे ...

माझं आडनांव इतकं साधं आहे, पण कुणाच्याही नीट लक्षात रहात नाही... भेटू परत! (तरुणीपाशी लगबगीने जाऊन अभिवादन करतो.)

सूस्लोव (जवळ येत): बायकोला पाहिलंत? (द्रोयेतोचिये नकारार्थी मान हलवतात आणि सुटकेचा निःश्वास टाकतात.) ही कलाकार मंडळी जमताहेत असं दिसतंय.

द्रोयेतोचिये: हा चिकटचा मला वैताग देत होता... मला नेपथ्यकार ठरवत होता... फेंगड्या पायांचा अमीबा! तोसुद्धा पृथ्वीवर जागा अडवतो. परत वाद सुरू झाला त्यांचा!

दाचामधून बाहेर पडतात: कालेरीया, शालीमोव, न्यूमिन, वार्वारा. त्यांचा वाद लक्षपूर्वक ऐकत द्रोयेतोचिये त्यांच्या भेटीला जातात. सूस्लोव बाकावर बसतात आणि दुर्मुखल्या मुद्रेने सर्वांना पाहतात.

शालीमोव (पूर्ण वैतागून): नाही, मी तिच्यापासून दूर, अगदी उत्तर ध्रुवापर्यंत पळून जायला तयार आहे! फारच तापट बाई!

न्यूमिन: तिची जुलूमशाही मला विलक्षण त्रासदायक वाटते! अशी असहिष्णु माणसं गुन्हेगाराप्रमाणं आहेत! त्यांच्यासारखाच प्रत्येकानं विचार केला पाहिजे, असा त्यांचा आग्रह का?

वार्वारा (शोधक नजरेने सर्वांकडे पहात): त्यांची ज्यात श्रद्धा आहे त्यापेक्षा अधिक थोर आणि अधिक सुंदर त्यांना दाखवून द्या!

कालेरीया : ह्या अतितुष्टांच्या थंड्या, पोकळ स्वप्नांना तू थोर आणि सुंदर मानतेस?

वार्वारा (हेलावून) : मला माहीत नाही... याहून जास्त तेजस्वी मला दिसत नाही... (वार्वाराचे बोलणे शालीमोव लक्षपूर्वक ऐकू लागतात.) मला बोलायची कला अवगत नाही. पण मंडळी, मला काळजात जाणवतं : माणसांच्या मनात स्वतःच्या लायकीची जाणीव जागी केली पाहिजे... सर्व माणसांच्या! तेव्हा आपल्यापैकी कुणीही दुसऱ्याचा अपमान करणार नाही... माणसाचा आदर राखणं आपल्याला जमत नाही ह्याचं फार दुःख होतं... वाईट वाटतं!

कालेरीया : अरे देवा! मार्या ल्वोवना तर हे आम्हाला शिकवणार नाही!

वार्वारा : तुम्ही सगळीजणं त्यांच्याशी वैर का धरता? कशाबद्दल?

र्‍यूमिन : ह्याला त्याच सर्वप्रथम जबाबदार आहेत! त्या असह्य होतात. जेव्हा कुणी आयुष्याचा अर्थ मला समजावून देऊ पाहतं, तेव्हा कुणीतरी गच्च मगरमिठीत मला पकडून माझा चेंदामेंदा करतंय, असं मला वाटतं!

कालेरीया : अशा माणसांबरोबर राहणं किती अवघड! घुसमटायला होतं!

वार्वारा : आणि आयुष्याबद्दल केवळ सतत तक्रारी करणाऱ्या माणसांमध्ये राहणं सोपं, मजेचं असतं कालेरीया? प्रामाणिकपणं विचार करा : जी माणसं काहीही करत नाहीत, पण स्वतःबद्दल बोलत राहतात, स्वतः-

च्या तक्रारींनी सगळं वातावरण दूषित करतात आणि आयुष्य सुधारण्याच्या दृष्टीनं मात्र काहीही करत नाहीत, अशा माणसांमध्ये राहणं सोपं आहे का? त्यांच्यात राहणं मोकळेपणाचं वाटेल का? काय करतो आपण आयुष्यात? तुम्ही, मी, तू?..

न्यूमिन: आणि त्या काय करतात? मार्या ल्वोवना? फक्त वैर वाढवतात?

कालेरीया: ज्यांना विसरून जाणं जास्त चांगलं असे जुने-पुराणे शब्द उकरून काढतात! जिवंत माणसं मृतांच्या कल्पनांवर जगू शकत नाहीत!

उघड्या रंगमंचापाशी हौशी कलावंत जमत आहेत. पूस्तोबायका त्या रंगमंचावर खुर्च्या ठेवत आहे.

द्वोयेतोचिये: तुम्ही एवढं मनाला कशाला लावून घेता वार्वारा मिखायलोवना? बंद का करत नाही हा विषय? चला फिरायला... तुम्ही मला कबूल केलंय.

वार्वारा: होय... मी येत्ये! मला जे जाणवतं, जे सांगावंसं वाटतं... ते सांगायला जमत नाही! किती वाईट! असं बुद्धीनं मुकं असणं!

शालीमोव: हे खरं नाही अशी मी साक्ष देतो! मी तुमच्याबरोबर आलो तर चालेल?

वार्वारा: खुशाल चला...

द्वोयेतोचिये: नदीपाशी चला... उन्हाळी घरात. अहो बाईसाहेब, एवढ्या कशाला चिडताय?

वार्वारा: छी:... कसलातरी कठीण गैरसमज झाल्याचं मला जाणवतंय.

राईत जातात. सूस्लोव त्यांच्या पाठमोऱ्या आकृतींकडे पाहून किंचित हसतात.

न्यूमिन (सर्वांच्या पाठमोऱ्या आकृती पहात) : हा शालीमोव इथं आल्यापासून किती विलक्षण खळबळली आहे ती! ताडताड बोलतेय! खरं तर असा कोण तो? तिला दिसतंय – त्याच्यातला लेखक संपलाय! जेव्हा तो खात्रीपूर्वक बोलतो, तेव्हा स्वतःची प्रतारणा करतो, दुसऱ्यांना फसवतो!

कालेरीया : तिला हे माहीत आहे. काल संध्याकाळी, त्यांच्याशी बोलल्यानंतर, अपेक्षाभंग झालेल्या एखाद्या लहान मुलाप्रमाणं ती ढसढसा रडली. ते दूर होते तेव्हा तिचा समज होता की, ते सामर्थ्यवान आहेत, धीट आहेत. तिची अपेक्षा होती : तिच्या रित्या आयुष्यात ते काहीतरी नवीन, स्वारस्यपूर्ण घेऊन येतील!

बासोवांच्या दाचावर कोपऱ्यातून झामीस्लोव आणि यूलीया येतात. तो तिच्या कानात काहीतरी कुजबुजतो आणि ती हसते. सूस्लोव हे पाहतात.

न्यूमिन : चला, घरात जाऊ या. काहीतरी वाजवा... संगीत ऐकावंसं वाटतंय.

कालेरीया : चला... खरंच, भोवती सगळं असं असलं म्हणजे आयुष्य फार दुःखी वाटतं.

यूलीया : बघा : आपले कलाकार एव्हाना आले. सहा वाजता तालीम ठरली होती आणि आता?

झामीस्लोव : आता साडेसात! पूर्वी फक्त तुम्ही उशीर करत होतात, आता सगळेच! तुमचा प्रभाव!

यूलीया : हा – उद्धटपणा ?

झामीस्लोव : हे कौतुक करतोय ! मी एक सेकंदापुरता मालकांपाशी पळत जाऊन येतो. चालेल ना ?

यूलीया : लौकर परत या !

झामीस्लोव बासोवांच्या दाचात जातो. यूलीया गाणे गुणगुणत झाडांखालच्या गटापाशी येते. तिचा नवरा तिच्या दृष्टीस पडतो.

सूस्लोव : कुठं होतीस ?

यूलीया : तिथं ... आणि तिथं ...

खुल्या रंगमंचापाशी पिवळ्या पोषाखातील तरुणी, तरुण, सेम्योनोव, युंकर आणि दोन तरुणी. रंगमंचावर पूस्तोबायका खडखड आवाज करत टेबल ठेवतोय. हंशा, उद्गार : "मंडळी !" – "दिग्दर्शक कुठं आहेत ?" – "श्रीयुत स्तेपानोव !" "ते इथं आहेत, मी पाहिलं." – "शहरात जायला उशीर होतोय आम्हाला !" – "माफ करा – स्तेपानोव नव्हे, सेम्योनोव !"

सूस्लोव : सारा वेळ त्याच्याबरोबर ? असं उघडपणानं ... यूलीया, तू काय करते आहेस ? सगळेजण मला हसताहेत. तुला समजत नाही ?

यूलीया : एव्हाना हसताहेत ? किती वाईट !

सूस्लोव : आपल्याला ह्याचा निर्णय केला पाहिजे. मी तुला असं वागू देणार नाही ...

यूलीया : ज्याला हसतात अशा माणसाच्या बायकोची भूमिका मला मुळीच करायची नाही.

सूस्लोव : सांभाळ, यूलीया ! मी समर्थ आहे ...

यूलीया : उर्मट वागायला, एखाद्या गाडीवानाप्रमाणं ? – मला माहीत आहे ...

सूस्लोव : खबरदार, अशी भाषा वापरशील तर ! बदचाल !

यूलीया (हळू आवाजात, शांतपणे) : हा प्रसंग आपण घरी पुरा करू. इकडं माणसं येताहेत ... तू इथून गेलास तर बरं होईल ... तुझा चेहरा असा बनलाय ! (किळस आल्याप्रमाणे शहारा देते. सूस्लोव एक पाऊल तिच्या दिशेने टाकतात, मग पटकन मागे सरतात आणि दात आवळून तोंडातल्या तोंडात पुटपुटत जाईत नाहीसे होतात.)

सूस्लोव : कधीतरी मी तुला गोळी घालणार !

यूलीया : (त्याच्या पाठी) : आज नाही ना ? काय ? गाणे गुणगुणते.) "दिवस डुबतीला आला" (तिचा आवाज कापतो.) "किरमिजी पाण्यात झुकला ..." मोठ्या, विस्फारल्या नजरेने समोर पाहते आणि हळूहळू डोके खाली झुकवते. बासोवांच्या दाचामधून मार्या ल्वोवना उत्तेजित मनःस्थितीत बाहेर पडते. दूदाकोव आणि बासोव मासे धरण्याचे गळ घेऊन येतात.)

बासोव (गळाची दोरी सोडवत) : अहो बाई ... थोडं मऊ वागावं, प्रेमळ वागावं ... आपण सारेच माणसं आहोत ! कुणा सैतानानं माझी गळाची दोरी गुंतवून ठेवली ?

मार्या : मला बोलूं द्या !

दूदाकोव : अहो बघताय ना, ते दमलेत ...

बासोव : अहो बाई, असं बरं नव्हे! तुमच्या म्हणण्याप्रमाणं असं ठरतं की, माणूस लेखक बनला म्हणजे त्यानं एखाद्या वीराप्रमाणं वागलं पाहिजे? पण प्रत्येक लेखकाला वीर व्हायची इच्छा असतेच असं नाही!

मार्या : आयुष्यापासून आणि माणसांपासून आपण नेहमी जास्त जास्त अपेक्षा बाळगल्या पाहिजेत.

बासोव : ह्या अशा ... उंचावायच्या – होय! पण शक्यतेच्या मर्यादांमध्ये! प्रत्येक गोष्टीचा उत्क्रांतीमधून टप्प्या-टप्प्यानं विकास घडतो! उत्क्रांती! हे विसरून चालणार नाही!

मार्या : अशक्याची मागणी मी करत नाही! पण आपण अशा देशात रहात आहोत जिथं फक्त लेखकच सत्याचा उच्चार करू शकतो, आपल्या माणसांच्या गुणावगुणांचा नि:पक्षपातीपणानं न्याय करू शकतो आणि लोकांची परिस्थिती सुधारण्यासाठी लढा पुढं चालवू शकतो. एकटा तोच असं करू शकतो आणि रशियन लेखकानं असं असलं पाहिजे.

बासोव : खरं आहे अर्थातच, पण ...

मार्या (व्हरांड्यातून खाली येत) : पण तुमच्या मित्रात मला हे दिसत नाही, खरंच नाही दिसत! काय पाहिजे त्याला? काय शोधतोय तो? कुठं आहे त्याची चीड? त्याचं प्रेम? त्याचं सत्य? कोण तो : माझा मित्र? वैरी? मला हे समजत नाही ... (दाचा-च्या कोपऱ्यातून पटकन निघून जाते.)

बासोव (गळाचा गुंता सोडवत) : तुमच्या ह्या

मानसिक उकळीबद्दल मला आदर वाटतो... मार्या च्योवना! गडप झाली? नाही, तुम्ही मला सांगाच – का त्या एवढ्या तापतात? अगदी शाळकरी मुलांनाही माहीत असतं की, लेखकानं प्रामाणिक असावं... माणसांच्या कल्याणासाठी त्यानं काम करावं, वगैरे, वगैरे. सैनिकानं शूर असावं, वकीलानं चतुर असावं. पण ही निगरगट्ट बाई शिळपट भाषणांचा तुमच्या टाळक्यावर अखंड मारा करत्येय... चला डॉक्टरमहाशय, मासे धरू या! कुणी ह्या गळाचा गुंता केला? सैतान!

दूदाकोव: खरंच, शहाणपणाच्या खूप गोष्टी बोलतात त्या! त्यांना जगणं अगदी सोपं आहे... खाजगी प्रॅक्टिस करतात आणि गरजा कमी.

बासोव: आणि हा याकोव... डांबरट आहे! तिनं त्याला कोपऱ्यात धरलं तेव्हा किती शिताफीनं तो निसटला, हे तुमच्या ध्यानात आलं? (हसतात.) चांगल्या फॉर्मात असतो तेव्हा सुंदर बोलतो! होय, बोलतो छान, पण पहिल्या बायकोनंतर, तसा तिच्याबरोबर तो फक्त सहा महिने राहिला... नंतर टाकलं त्यानं तिला...

दूदाकोव: घटस्फोट घेतला, असं म्हणतात अशा प्रसंगी.

बासोव: ठीक आहे, घटस्फोट घेतला असं म्हणू... पण आता, जेव्हा ती वारली, तेव्हा तिची छोटी इस्टेट कबजात घ्यायला बघतोय. आहे की नाही?

दूदाकोव: च् च्! हे चांगलं नाही! जरा अनावश्यकच झालं!

बासोव : पण त्याला आवश्यक वाटतं ! चला डॉक्टर-साहेब , नदीवर जाऊ या !

दूदाकोव : तुम्हाला माहीत आहे ?

बासोव : काय ?

दूदाकोव (विचारमग्नपणे , सावकाश) : तुम्हाला आश्चर्य नाही वाटत – म्हणजे विचित्र नाही वाटत – की आपण एकमेकांचा तिरस्कार करायला लागलो नाही ?

बासोव (थबकून) : का ... य ? थट्टा तर करत नाही ?

दूदाकोव : नाही , पूर्ण गंभीरपणानं बोलतोय ... खरं तर आपण सगळी भयानक पोकळ माणसं आहोत ... तुम्हाला असं जाणवत नाही ?

बासोव (दूर जात) : नाही , नाही जाणवत ... मी निकोप आहे ... आणि एकूणच व्यवस्थित माणूस आहे , माफ करा ...

दूदाकोव : नाही ... तुम्ही विनोद करू नका ...

बासोव : विनोद ? ऐका , डॉक्टर ... थोडक्यात म्हणजे तुम्हालाच उपचारांची गरज आहे . बरं , तुम्हाला विचारतो – तुम्ही मला पाण्यात ढकलणार तर नाही ना ?

दूदाकोव (गंभीरपणे , खांदे उडवून) : मी कशाला करू तसं ?

बासोव (जात) : नाही ... तुमची मन:स्थिती जरा विचित्र दिसतेय , म्हणून विचारलं !

दूदाकोव (खिन्नपणे) : तुमच्याशी गंभीरपणं बोलणं अवघड आहे .

बासोव : आणि बोलूच नका ... गरज नाही ! गंभीर बोलण्याची तुमची कल्पना फार विचित्र आहे. गंभीर बोलणं टाळू !

बासोव आणि दूदाकोव जातात. उजवीकडून सोन्या व व्लास येतात. बासोवांच्या दाचामधून झामीस्लोव घाईने खुल्या रंगमंचाकडे धावतो व तेथे त्याचे जोरदार आरोळयांनी स्वागत होते. त्याच्याभोवती लोकांचा गट गर्दी करतो आणि तो काहीतरी त्यांना समजावून सांगू लागतो.

सोन्या : तुम्ही कवी आहात यावर माझा विश्वास बसत नाही.

व्लास : अरेरे ... माझ्या काही कविता फार सुरेख आहेत. उदाहरणार्थ :

पीच आणि अननस ही फळं,
निसर्गानं निर्माण नाही केलीत
आमच्यासाठी खास ! नको –
त्यांची वांच्छा धरू बेटा व्लास.

सोन्या (हसत) : असल्या फालतूपणात कशाला स्वतःचा वेळ वाया दवडता ? थोडं गंभीर वागण्याचा प्रयत्न का करत नाही ?

व्लास (हळूच, गूढपणे) : हे पंडिता सोफीया, मी तसा प्रयत्न केला होता ! त्या प्रयत्नानिमित्त मी एक कवितासुद्धा लिहिली होती. (नाकातल्या सुरात गुणगुणून नंतर ओळी म्हणतो.)

फार थोर छोट्या कामासाठी,
फार लहान मोठ्या कामासाठी!

सोन्या (गंभीरपणे) : सोडून द्या नाद ! मला समजतंय की, वेडपटपणा करायची खरी तुमची इच्छा नाही. मला सांगा – कसं जगायची तुमची इच्छा आहे ?

क्लास (उत्कटपणे) : छान ! खूप छान जगायची माझी इच्छा आहे !

सोन्या : त्यासाठी तुम्ही काय करताय ?

क्लास (पडत्या सुरात) : काही नाही ! अगदी काहीही करत नाही मी !

मार्या (राईतून) : सोन्या !

सोन्या : मी इथं आहे. काय झालं ?

मार्या : घरी चल ... तुझ्याकडं पाहुणे आलेत.

सोन्या : आल्ये ... (मार्या ल्वोवना येतात.) ह्या विदूषकाला तुझ्या ताब्यात देत्ये. तो फालतू बोलतो आणि त्याबद्दल त्याची उत्तम कणीक तिंबली पाहिजे. (पळून जाते.)

क्लास (केविलवाणेपणे) : हूं, करा सुरवात ... स्टेशनपासून इथपर्यंत सबंध रस्ताभर तुमच्या लेकीनं माझी कणीक तिंबली, पण अजून मी जिवंत राहिलोय.

मार्या (प्रेमळपणे) : बिच्चारे ! कशाला विदूषकी चाळे करावेत ? कशाला स्वत:ला कमीपणा आणायचा ? कुणाला हवंय हे ?

क्लास (तिच्याकडे न पाहता) : तुम्ही म्हणता गरज नाही... पण कुणीही हसत नाही आणि लोकांनी हसावं अशी माझी इच्छा आहे. (अचानक – तावा-तावाने, सरळपणे आणि उमाळ्याने.) मला सगळ्याचा वीट आलाय, मार्या ल्वोवना. ह्या माणसांबद्दल मला प्रेम वाटत नाही, आदर वाटत नाही. ती केविलवाणी आहेत, डासांप्रमाणं क्षुद्र लहान आहेत. त्यांच्याशी गंभीरपणं बोलणं मला अशक्य ठरतं. मी बहाणा घ्यावा आणि त्यांच्यापेक्षा अधिक उघडपणं घ्यावा, अशी त्यांच्यामुळे मला इच्छा होते. माझ्या डोक्यात सगळ्या प्रकारच्या फालतू गोष्टी गच्च ठासून भरल्यात. मोठ्यांदा ओरडायची, भांडायची आणि तक्रारी करायची मला खूप इच्छा होते. मला वाटतं, लौकरच मी वोदका प्यायला लागणार! मी त्यांच्यात राहतो तेव्हा त्यांच्यासारखं वागण्यावाचून मला गत्यंतर नसतं, म्हणून मी असा भयानक बनलोय. त्यांच्या ग्राम्यतेची मला बाधा झालीय. ते बघा... ऐकताय? इकडं येत आहेत! काहीवेळा नजरेसमोर नकोसे होतात. चला इथून! तुमच्याशी बोलायची माझी खूप खूप इच्छा आहे!

मार्या (त्याचा हात धरते) : तुम्हाला अशा मनःस्थितीत बघायला मला किती आनंद होतो म्हणून सांगू!

क्लौस : तुमचा विश्वास बसणार नाही... पण काहीवेळा सर्वांना उद्देशून काहीतरी दुष्ट, धारदार, अपमानकारक ओरडावं अशी फार ऊर्मी येते!

राईत जातात. उजव्या बाजूने शालीमोव, यूलीया व वार्वारा येतात.

शालीमोव : परत गंभीर चर्चा? माझ्यावर दया करा, गंभीर वागून दमलोय... तत्त्वज्ञानाचा मला वीट आलाय. माझी मनःस्थिती सुरळीत, शांत होई-पर्यंत मला निवांत जगू द्या. भटकायची, स्त्रियांचं प्रणयाराधन करण्याची माझी इच्छा आहे.

यूलीया : स्वतःच्या मनाला ताण न देता तुम्ही स्त्रियांचं प्रणयाराधन करू शकता? हे काहीतरी वेगळंच दिसतंय... तुम्ही माझं प्रणयाराधन का करत नाही?

शालीमोव : तुमच्या उदार मान्यतेचा फायदा घ्यायला मला आनंदच वाटेल!

यूलीया : मी मान्यता देत नाही, विचारत्येय...

शालीमोव : तरीही तुमचा प्रश्न म्हणजे एक प्रकारची संमतीच आहे असं मी मानतो.

यूलीया : बरं, राहू दे हा विषय... माझ्या प्रश्नाचं उत्तर द्या... प्रामाणिकपणानं!

शालीमोव : ठीक आहे: स्त्रीशी मैत्री करणं शक्य आहे असं मी मानतो, पण फार काळ नाही. निसर्गाला फसवता येत नाही!

यूलीया : म्हणजे फक्त प्रेमाची प्रस्तावना म्हणून तुम्ही स्त्रीच्या मैत्रीकडं पाहता?

शालीमोव : प्रेम! प्रेमाकडं मी फार गंभीरपणं पाहतो! जेव्हा मी स्त्रीवर प्रेम करतो, तेव्हा तिला जमिनीपासून वर उंचावण्याची माझी इच्छा असते. माझ्या सर्व विचारांच्या आणि भावनांच्या फुलांनी

नाला शृंगारायची माझी इच्छा असते.

झामीस्लोव (रंगमंचावरून) : यूलीया फिलीप्पोव्ना! कृपया इकडं या!

यूलीया : आल्ये! तात्पुरता तुमचा निरोप घेत्ये श्रीयुत फूलवाले! तुमच्या फुलबागेत तोवर मशागत करा ... (रंगमंचाकडे जाते.)

शालीमोव : तात्काळ! किती छान, आनंदी बाई आहे ... तुम्ही काय असं चमत्कारिकपणं पाहताय माझ्याकडं, वार्वारा मिखायलोव्ना?

वार्वारा : तुमच्या मिशा तुम्हाला फार शोभून दिसतात!

शालीमोव (स्मित करत) : असं? आभारी आहे तुमचा. माझा स्वर तुम्हाला आवडत नाही? तुम्ही फार कडक आहात. पण त्यांच्याशी दुसऱ्या स्वरात बोलणं अशक्य आहे हे खरं ना?

वार्वारा : मला वाटतं, चकित होण्याची माझी समर्थता मी गमावू लागल्येय.

शालीमोव : मला समजतं – मला अशा तऱ्हेनं पाहणं तुम्हाला विचित्र वाटतंय. होय ना? पण स्वतःचे विचार ठणठणा ओरडत फिरणं चांगलं नव्हे – त्या वेडपट ऱ्यूमिनप्रमाणं! ओह्! माफ करा! मला वाटतं ... ते तुमचे मित्र आहेत?

वार्वारा (नकारार्थी मान हलवत) : मला मित्र नाहीत!

शालीमोव : माझ्या आंतरिक जीवनाला मी फार मौल्यवान मानतो आणि आल्यागेल्यासमोर त्याचं प्रद-

र्शन मांडावं असं मला वाटत नाही. पायथागोरसच्या अनुयायांनी मोजक्याच लोकांना आपली रहस्यं सांगितली होती.

वार्वारा: आता तुमच्या मिशा तुमच्या चेहऱ्याला विशोभित दिसायला लागल्यात!

शालीमोव: मिशांचं काय घेऊन बसलात! ठेवा त्यांना बाजूला! तुम्हाला म्हण माहीत आहे: लांडग्यांमध्ये राहताना लांडग्यासारखं रहावं? फार मोठं शहाणपण सामावलंय ह्या म्हणीत. विशेषत: एकाकीपणाचा कडू प्याला जो पूर्ण प्यालाय त्याला... तुमची अजून पुरती हौस फिटली नसणार... आणि कठीण आहे समजून घेणं तुम्ही अशा माणसाला जो... पण मला वाटतं मी निष्कारण तुम्हाला अडवून धरतोय.

झुकून अभिवादन करतात आणि खुल्या रंगमंचाकडे जातात. हातात पुस्तक धरलेला झामीस्लोव हळूच रंगमंचावर चढतो आणि सेम्योनोवला अभिनय समजावून देतो. बाकीचे लोक मुकाट बघत बसलेत. बासोव हातात गळ धरून घाईघाईने येतात.

बासोव: वार्या! काय मासे मिळालेत! बहार आली! डॉक्टर तर मासे धरण्यात अगदीच कुचकामी... पण आज त्यांनासुद्धा घबाड मिळालं! बघ, केवढा हा मासा! काकांनी तीन धरले! (भोवती पहात.) बरं का, आत्ता इकडं येत होतो आणि अचानक – कल्पना करू शकशील! तिथं, उन्हाळी घरापाशी, वाळक्या पाईनपाशी, मार्या ल्वोवनासमोर व्लास गुडघे टेकून

ब्रमलेला! आणि तिच्या हातांची चुंबनं घेतोय! काय हे? लाडके, तू सांग त्याला समजावून – अजून लहान पोरगा आहे तो! आणि ती बाई वयानं त्याची आई शोभेल!

वार्वारा (हळू आवाजात): सेर्गेइ, ऐक: कृपा करून गप्प रहा ह्याबद्दल... एका शब्दानं बोलू नको कुणापाशी! तुला समजत नाही. चुकीच्या दृष्टीनं तू पाहतोस. तू सगळ्यांना सांगशील आणि ते वाईट ठरेल! लक्षात घे.

बासोव: एवढी का अस्वस्थ होतेस? जर मी हे बोलायचं नाही, तर नाही बोलणार. पण किती हा मूर्खपणा? आणि मार्या ल्वोवना...

वार्वारा: मला वचन दे की, तू हे विसरशील! दे वचन!

बासोव: वचन? देतो... जहन्नममध्ये जावोत ते! पण मला समजावून सांग...

वार्वारा: मी काहीही समजावून सांगू शकणार नाही. पण एवढं ठाऊक आहे... तुला वाटतं तसं हे काही नाही... हे प्रेम-प्रकरण नव्हे!

बासोव: अस्सं! हं! प्रेम-प्रकरण नव्हे? ठीक आहे, वार्या! मी गप्प राहीन. घाबरू नको! मी चाललो मासे धरायला – आणि मी काहीही पाहिलं नाही! अरे हो, थांब! तुला ठाऊक आहे, आपला याकोव – पशू साला!

वार्वारा (घाबरून): काय झालं सेर्गेइ? आणखी काय?

बासोव : असं घाबरतेस काय एकदम ! ही गोष्ट अगदी वेगळी आहे.

वार्वारा (हळू आवाजात, दचकत) : ऐक ... मला काहीही जाणून घ्यायचं नाही ... समजून घे मला ! नको रे, सेर्गेइ !

बासोव (चकित होऊन, घाईने) : पण विशेष काहीच नाही ! विचित्रच आहेस ... काय झालंय तुला ? फक्त तो स्वतःच्या मयत पत्नीच्या बहिणीपासून इस्टेट खेचून घ्यायला बघतोय !

वार्वारा (दुःखाने आणि किळस येत) : विनंती करत्ये तुला ... गप्प रहा ! पाया पडत्ये ! तुला समजत कसं नाही ... बोलू नको, सेर्गेइ !

बासोव (अपमानीत स्वरात) : वार्या, तुला मान-सोपचार घेतले पाहिजेत ! माफ कर ... पण विचित्र वागत्येस ... आणि अपमानकारक !

बासोव चटकन निघून जातात. वार्वारा सावकाशपणे व्हरांड्याकडे जाते. खुल्या रंगमंचापाशी गोंगाट, हंशा.

झामीस्लोव : राखणदार ! कंदील कुठाय ?

यूलीया : श्रीयुत सोमोव ! माझ्या ओळी कुठं ?

सेम्योनोव : सेम्योनोव म्हणा कृपया, शक्य असेल तर !

यूलीया : ठीक आहे.

झामीस्लोव : मंडळी, सावधान ! आपण सुरू करतोय !

पडदा

अंक तिसरा

गाईमधील मोकळी जागा. पाठीमागील बाजूस झाडां-खाली गालीचा अंथरलेला आहे व त्यावर खाद्यपदार्थ आणि बाटल्या आहेत. गालीचाभोवती बासोव, द्रोये-तोचिये, शालीमोव, सूस्लोव, झामीस्लोव बसले आहेत. त्यांच्या उजव्या बाजूला काही अंतरावर मोठा समोवार; त्याच्याजवळ साशा बशा विसळतेय, पूस्तो-बायका आडवा पडून पाईप ओढतोय. त्याच्याशेजारी वल्ह्यांची जोडी, टोपली व पत्र्याची बादली. डाव्या बाजूला अग्रभागी गवताची गंज आणि जमिनीत ठोकलेला खुंट. गंजीवर कालेरीया, वार्वारा आणि यूलीया बसल्या आहेत. बासोव दबत्या आवाजात काहीतरी सांगत आहेत आणि पुरुष त्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकत आहेत. उजवीकडून अधूनमधून सोन्याचा आवाज ऐकू येतो; बालालैकाचे आणि गिटारचे आवाज. संध्याकाळ होत आली आहे.

यूलीया: आपली पिकनिक अगदीच रटाळ झाली.

कालेरीया: आपल्या आयुष्याप्रमाणं.

वार्वारा: पुरुषांना मात्र मजा आलीय.

यूलीया: ते खूप दारू प्यायलेत आणि आता बहुधा वात्रट विनोद एकमेकांना सांगताहेत.

स्तब्धता. सोन्या: "तसं नाही – आणखी हळू." गिटार छेडले जाते. द्रोयेतोचिये खो खो हसतात.

यूलीया: मीसुद्धा दारू प्यायले ... पण त्यामुळं मला मजा येत नाही. त्याउलट घडतं! जेव्हा कडक मद्याचा एक ग्लास मी पिते, तेव्हा मला जरा जास्त गंभीर व्हायला होतं. आयुष्य अधिक अवघड वाटू लागतं आणि काहीतरी तुफान अविचारी कृत्य करायची खुमखुमी येते.

कालेरीया (विचारमग्न होते): सगळं अंधुक बनलंय ... स्पष्ट दिसत नाही आणि भीती वाटत्येय!

वार्वारा: कशाची भीती वाटतेय?

कालेरीया: माणसांची! त्यांच्यावर विसंबता येत नाही. कुणावर विश्वास ठेवता येत नाही.

वार्वारा: होय, खरंच विसंबता येत नाही. तुझं समजतं मला.

बासोव आर्मेनियन हेलात बोलतात: "कशाला लाडके? मला आधीच खूप छान वाटतंय!" सर्व पुरुष हसतात.

कालेरीया: नाही, तुला नाही समजत! आणि मला तू समजत नाहीस. आणि कुणीही कुणालाही समजत नाही ... समजून घेण्याची इच्छा नाही ... उत्तरेकडल्या थंडया समुद्रात वाहत जाणाऱ्या हिमखंडांप्रमाणं माणसं दिशाहीन वाहत चालली आहेत ... एकमेकांवर आपटत आहेत.

द्रोयेतोचिये उठतात आणि उजवीकडे जातात.

यूलीया (हळू आवाजात गाते) :

दिवस डुबतीला आला
किरमिजी पाण्यात झुकला

जेव्हा वार्वारा बोलू लागते, तेव्हा यूलीया गाणे थांबवते आणि एकतानतेने तिच्या चेहऱ्याकडे पाहू लागते.

वार्वारा : आयुष्य म्हणजे अगदी बाजार आहे. सगळे एकमेकांना फसवू पाहताहेत. द्यायचं कमी – घ्यायचं जास्त.

यूलीया :

काळवंडतो आकाशाचा घुमट
चोरपावली येती सावल्या.

कालेरीया : माणसं कशी असावीत, म्हणजे त्यांना पाहताना नीरस वाटणार नाही ?

वार्वारा : ती प्रामाणिक असली पाहिजेत !.. आणि धीट ...

कालेरीया : ती अधिक ठाम असली पाहिजेत, वार्या ! किमान त्यांचे संबंध ठाम असले पाहिजेत.

यूलीया : पुरे करा तुमचं तत्त्वज्ञान ! त्यात मजा नाही. त्यापेक्षा गाणी म्हणू.

वार्वारा : तुम्ही फार छान द्वंद्वगीत म्हटलंत, यूलीया फिलीप्पोवना.

यूलीया : होय, छान होतं ... निर्मळ ! मला सगळ्या निर्मळ गोष्टी आवडतात ... तुमचा विश्वास नाही बसत ? खरंच आवडतं ... निर्मळ पहायला ... ऐकाय-

ला ... (हसते .)

कालेरीया : माझ्या अंत:करणात कसलातरी राखाडी संताप वाढतोय ... शरदामधल्या मेघासारखा भुऱ्या रंगाचा ! संतापाचा हा दाट मेघ माझ्या अंत:करणाला दाबतोय, वार्या ! माझं कुणावरही प्रेम नाही, कुणावर प्रेम करण्याची माझी इच्छा नाही ! अशीच विचित्र प्रौढ कुमारिका म्हणून मरणार !

वार्वारा : पुरे कर ! फार कंटाळवाणं वाटतं !

यूलीया : विवाहित असणं हेसुद्धा शंकास्पद सुख आहे. तुमच्या जागी मी असते, तर न्यूमिनशी लग्न केलं असतं. तो थोडा आंबटतोंडचा आहे, पण ...

सोन्या : "थांबा ! आता करा सुरू ! नाही, प्रथम मेंडोलिन !" मेंडोलिन आणि गिटारचे द्वंद्वगीत .

कालेरीया : तो रबरी आहे.

वार्वारा : का कुणास ठाऊक, पण मला एक करुण गीत आठवलं ... माझ्या आईकडं काम करणाऱ्या धोबिणी हे गाणं गायच्या ... तेव्हा मी लहान होते, शाळेत शिकत होते. आठवतं – घरी यायची, सबंध लॉंड्री दमट आणि वाफेनं घुसमटून गेलेली असायची ... तिथं अर्ध्या-उघडया बायका धुणी बडवत असायच्या आणि हळू, थकल्या आवाजात गाणं म्हणायच्या :

गे माझ्या जन्मदात्या माय,
मी अभागिनी माझी करुणा कर,
परक्या घरी माझा जीव कष्टी,
दुष्ट गुलामीत काळीज सुकलं !

आणि हे गाणं ऐकलं म्हणजे मी रडायची ... (बासोव : "साशा ! बीयर द्या ... आणि पोर्टवाईन ... ") माझं आयुष्य तेव्हा छान होतं ! ह्या बायका माझ्यावर प्रेम करायच्या ... आठवतं ... संध्याकाळी, कामं संपल्यावर, भल्यामोठ्या स्वच्छ धुतलेल्या टेबलाभोवती बसून चहा प्यायच्या ... आणि मला बरोबरीची समजून स्वत:जवळ बसवून घ्यायच्या.

कालेरीया : वार्या, फार रटाळ बोलतेस ! अगदी त्या मार्या ल्वोवनाप्रमाणं नीरस !

यूलीया : माझ्या लाडक्या बायांनो, आपण फार वाईट जगतोय !

वार्वारा (विचारमग्न होत) : होय, वाईट ... आणि याहून जास्त चांगलं कसं जगायचं ते माहीत नाही. माझी आई सबंध आयुष्यभर काम करत होती ... किती प्रेमळ होती ! किती आनंदी ! तिच्यावर सगळे प्रेम करत. तिनं मला सुशिक्षित बनवलं ... शाळेचं शिक्षण जेव्हा मी पूर्ण केलं तेव्हा किती आनंद झाला होता तिला ! त्यावेळी तिला चालता येत नव्हतं – तिला संधिवाताचा विकार जडला होता अगदी शांत मरण आलं तिला ... मला म्हणाली – "रडू नको, वार्या ! काही विशेष नाही ! माझी घटका भरली ... जगून झालं, राबून झालं ! " माझ्यापेक्षा तिच्या जीवनात जास्त अर्थ सामावला होता. मला जगणं सोपं जात नाही. मला भासतं, मी भलत्याच वाटेला आल्येय, भलत्याच माणसांपाशी आणि त्यांची आयुष्यं मला समजत नाहीत. आपल्या ह्या सुसंस्कृत

लोकांची आयुष्यं मला समजत नाहीत. जत्रेत मांडलेल्या दुकानांप्रमाणं ती डळमळती आणि तात्पुरती भासतात. किंवा नदीच्या प्रवाहात वाहत जाणाऱ्या बर्फाप्रमाणं. तो बर्फ घट्ट असतो, चमकत असतो, पण त्यात खूप घाण भरलेली असते... खूप लज्जास्पद आणि वाईट... जेव्हा मी प्रामाणिक, धीट पुस्तकं वाचते, तेव्हा मला भासतं की, सत्याचा तळपता सूर्य उगवतोय... बर्फ वितळतोय, त्यातील सगळी घाण बाहेर पडतेय आणि नदीच्या लाटा लौकरच त्या बर्फाचा पूर्ण चुरा करतील, सारी घाण दूर वाहून नेतील...

कालेरीया (तिटकाऱ्याने आणि खेदाने) : तू नवऱ्या-ला सोडून का जात नाहीस? तो अगदी नीच पशू आहे, तुला त्याची मुळीच गरज नाही.

वार्वारा भ्रमिष्ट नजरेने कालेरीयाकडे पाहते.

कालेरीया (आग्रहपूर्वक) : सोड त्याला आणि निघून जा कुठंतरी! .. शिकायला जा... प्रेम कर... पण इथून निघून जा!

वार्वारा (उठते, तिटकाऱ्याने) : किती रांगडं हे!

कालेरीया : तू करू शकशील! घाणीची तुला भीती नाही. तुला धुणी वगैरे आवडतात... तू कुठंही राहू शकशील.

यूलीया : तुम्ही स्वतःच्या भावाबद्दल फारच छान बोलता!

कालेरीया (शांतपणे) : होय! तुमची इच्छा असेल तर तसंच काहीतरी तुमच्या नवऱ्याबद्दल सांगत्ये!

यूलीया (हसून) : सांगा ! मला अपमान नाही वाटणार. मी स्वतःच त्याला अधूनमधून असं काही-तरी ऐकवत असते आणि त्यामुळं तो खूप संतापतो... तोसुद्धा मला त्याच रीतीनं परतफेड करतो... नुकतंच तो मला सरळ तोंडावर म्हणाला की, मी – बदचाल आहे !

वार्वारा : आणि तुम्ही... तुम्ही काय म्हणालात ?

यूलीया : मी नकार दिला नाही. मला माहीत नाही... बदचाल म्हणजे काय, पण मला खूप कुतूहल आहे. पुरुषांविषयी कुतूहलजनक आसक्ती मला वाटते. (वार्वारा उठते आणि दोन-तीन पावले दूर जाते.) मी सुंदर आहे – हेच माझं दुर्भाग्य ! शाळेत सहावीत होते तेव्हापासून मास्तर अशा काही नजरांनी माझ्या-कडं पहात की, मी शरमिंदी व्हायची, लाजेनं लाल व्हायची. त्यांचं ह्यामुळं मनोरंजन व्हायचं, गालातल्या गालात हसत जिभल्या चाटायचे, मेजवानीला आलेल्या भुकेल्या आधाशांसारखे !

कालेरीया (शहारत) : छीः ! किती नीचपणा !

यूलीया : होय. नंतर माझ्या विवाहित मैत्रिणींनी मला धडे दिले ! पण सर्वांत जास्त शिकले मी माझ्या नवऱ्यापासून ! त्यानं माझं मन दूषित केलं... त्यानं माझ्या मनात पुरुषांबद्दल आसक्ती निर्माण केली. (हसते. पुरुषांच्या गटामधून शालीमोव वेगळे होतात आणि हळूहळू स्त्रियांकडे येतात.) आणि मी त्याचं जीवन दूषित करतेय. एक म्हण आहे : मूठभर घेतलंस, तर पसाभर परत दे !

शालीमोव (जवळ येत) : फार छान म्हण आहे! निःसंशयपणं कुणा उदार आणि प्रेमळ माणसानं ती तयार केली असावी ... वार्वारा मिखायलोवना, नदीवर येणार का?

वार्वारा : माझी हरकत नाही. चला!

शालीमोव : कृपया तुमचा हात देता?

वार्वारा : नाही ... मला नाही आवडत.

शालीमोव : किती दुःखी मुद्रा दिसतेय तुमची! तुमच्या भावाशी तुमचं साम्य नाही. तो अतिआनंदी प्राणी! फार मजेदार पोरगा!

उजवीकडे जातात.

कालेरीया : आयुष्याबाबत समाधानी असलेली अशी माणसं आपल्यामध्ये नाहीत. तुम्हीच बघा ... नेहमी उल्हासी असता, पण मनातून ...

यूलीया : तुम्हाला हा सद्गृहस्थ आवडतो? मला तर त्याच्यात काहीतरी लबाडी आढळतेय! बेडकासारखा थंडगार असावा ... चला, आपणही नदीवर जाऊ.

कालेरीया (उठत) : चला! काय फरक पडतोय!

यूलीया : त्याला तिच्यात थोडासा रस वाटत असावा. खरंच, ती अगदी परकी भासते आपल्यात! आणि अशा विचित्र, शोधक नजरेनं सगळ्यांकडं पहात असते ... काय पहायचंय तिला? मला ती आवडते, पण तिची भीती वाटते ... फार कडक ... निर्मळ आहे ती!

जातात. उजवीकडून मोठमोठ्या आरोळ्या आणि हसणे ऐकू येते. ओरडतात: "होडी! लौकर! वल्ही कुठं आहेत? वल्ही!" पूस्तोबायका सावकाशपणे उठतो आणि वल्ही खांद्यावर टाकून जायला निघतो. सूस्लोव आणि बासोव गोंगाटाच्या दिशेने धावतात. झामीस्लोव पूस्तोबायकाच्या दिशेने झेपावतो आणि वल्ही त्याच्यापासून हिसकावून घेतो.

झामीस्लोव: अरे शुंभा, जरा बूड हलव लौकर! ऐकल्या नाहीस आरोळ्या? काहीतरी वाईट प्रसंग घडलाय आणि तू... मद्दड! (धावतो.)

पूस्तोबायका (त्याच्या पाठोपाठ जाताना पुटपुटतो): जर काही वाईट घडलं असतं, तर असं ओरडले नसते. आला मोठा वीर! उगीच उड्या मारतोय!

काही सेकंद रंगभूमी पूर्ण मोकळी. आरोळ्या ऐकू येतात: "खडे मारू नका! पकडा! वल्ह्यांना!" हंशा. डावीकडून मार्या आणि व्लास झरझर चालत येतात. दोघेही प्रक्षुब्ध.

मार्या (प्रक्षुब्ध, पण हळू आवाजात): पुरे करा हे, ऐकलंत? माझी इच्छा नाही. माझ्याशी तसं पुन्हा बोलू नका! तसा मी तुम्हाला हक्क दिलाय?

व्लास: मी बोलणार! बोलणार!

मार्या (जणू काही व्लासला ढकलून देण्यासाठी हात पुढे करत): तुम्ही माझा आदर राखा!

व्लास: माझं तुमच्यावर प्रेम आहे... प्रेम आहे तुमच्यावर! तुमच्या काळजावर वेड्यासारखं प्रेम करतो मी!

तुमच्या बुद्धिमत्तेवर प्रेम करतो! आणि ह्या पांढऱ्या केसांच्या बटेवर! तुमच्या डोळ्यांवर आणि तुमच्या बोलण्यावर ...

मार्या: चूप व्हा! खबरदार!

क्लास: मला जगणं अशक्य आहे ... तुमची गरज आहे मला! हवेसारखी, अग्नीसारखी!

मार्या: देवा रे देवा! ह्याशिवाय चालणार नाही? नाही चालणार?

क्लास (हातांनी स्वतःचे डोके गच्च धरत): तुम्ही मला माझ्या नजरेसमोर वर उचललात ... मी कुठंतरी अंधारात चाचपडत होतो ... वाटेविना, ध्येयाविना! स्वतःच्या बळावर विश्वास बाळगायला तुम्ही मला शिकवलंत!

मार्या: चालते व्हा! मला छळू नको! लाडक्या, मला छळू नको!

क्लास (गुडघे टेकत): तुम्ही एव्हाना मला खूप दिलं आहे, पण ते पुरेसं नाही. उदार व्हा, मन मोठं करा! मला खात्री हवीय, मला जाणून घ्यायचंय, की मी तुमच्या केवळ अवधानाचाच नव्हे, तर प्रेमाचाही विषय आहे! मी तुमची विनवणी करतो – मला झिडकारू नका!

मार्या: नाही, उलट मी तुमची विनवणी करते! इथून जा! नंतर ... मग मी तुम्हाला उत्तर देईन ... आत्ता नाही ... आणि उठा! मी विनंती करते, उठा!

क्लास (उठतो): विश्वास ठेवा – तुमच्या प्रेमाची मला नितांत गरज आहे! ह्या क्षुल्लक माणसांमध्ये

राहून माझं हृदय कलंकित बनलंय ... ती सगळी घाण जाळून टाकू शकेल अशी धगधगीत आग मला हवी आहे ! माझ्या मनाला निर्मळ करण्यासाठी !

मार्या : माझ्याबाबत निदान थोडातरी आदर बाळगा ! अहो मी – म्हातारी ! तुम्हाला हे दिसतंय ! तुम्ही आता निघून जावं अशी माझी इच्छा आहे ... जा !

व्लास : ठीक !.. मी जातो ... पण नंतर, मग – तुम्ही मला सांगितलं पाहिजे ...

मार्या : होय ... होय ... नंतर ... जा !

व्लास घाईघाईने उजव्या बाजूला राईत जाऊ लागतो आणि त्याची बहिणीशी टक्कर होते.

वार्वारा : हळू !.. काय झालंय तुला ?

व्लास : तू होय ?.. माफ कर !

मार्या (वार्वाराच्या स्वागताला हात पुढे करत) : या हो, माझ्यापाशी या !

वार्वारा : काय झालं तुम्हाला ? त्यानं तुमचा अपमान केला ?

मार्या : नाही ... म्हणजे ... हो ! अपमान केला ? मला काही म्हणून काही समजत नाही !

वार्वारा : तुम्ही बसा ! काय घडलं ?

मार्या : तो मला म्हणाला ... (हसते आणि भ्रमिष्टाप्रमाणे वार्वाराकडे पाहते.) तो ... मला म्हणाला ... की त्यांचं माझ्यावर प्रेम आहे ! आणि माझे केस पांढरे झालेत, दात खोटे बसवलेत ... तीन दात ! मी चक्क म्हातारी ! त्याला हे दिसत नाही काय ? माझी मुलगी अठरा वर्षांची आहे ! हे अशक्य !.. विचित्र !

वार्वारा (हेलावून) : अहो असं काय करताय ! अशा बेचैन होऊ नका ! मला सगळं सांगा ! तुम्ही अशा ...

मार्या : मी कशीही नाही ! आपणा सर्वांप्रमाणं मीही एक अभागी बाई ! मला मदत करा ! त्याला माझ्यापासून झटकून टाकला पाहिजे ! मला हे करणं जमणार नाही ... मी – निघून जाते !

वार्वारा : मला तुमचं समजतं ! त्याच्याबद्दल दया वाटते तुम्हाला ! तो आवडत नाही तुम्हाला ! बिच्चारा व्लास !

मार्या : अहो तसं नाही ! मला त्याची दया वाटत नाही ... मला स्वत:चीच कीव येते !

वार्वारा (पटकन) : ...पण का ?

सोन्या राईतून येते आणि गवताच्या गंजीमागे काही सेकंद उभी राहते. तिच्या हातात फुले आहेत आणि स्वत:च्या आईवर व वार्वारावर त्या फुलांचा वर्षाव करण्याचा तिचा इरादा आहे. पण आईचे शब्द ऐकताच ती काही पावले पुढे येते व मग मागे फिरून हलक्या पावलांनी निघून जाते.

मार्या : माझं त्याच्यावर प्रेम आहे ! तुम्हाला ह्याचं हसू येतं ना ? खरंच ... प्रेम करते ! केस माझे पांढरे झालेत, पण जगायची फार इच्छा आहे ! मी भुकेलीच आहे ! आयुष्याची चवच अजून चाखायला मिळाली नाही. माझं तीन वर्षांचं वैवाहिक जीवन म्हणजे निव्वळ छळ ! कधीही कुणावर प्रेम केलं नाही ! आणि आता

म्हा ... सांगायला मला शरम वाटते ... पण कुणी प्रेमानं कुरवाळावं असं फार वाटतं ! हळुवार ... राकट ... स्पर्श हवा वाटतो ! मला ठाऊक आहे – उशीर झालाय ! खूप उशीर झालाय ! मी तुमची विनवणी करते – मला मदत करा ! त्याची खात्री पटवून द्या – त्याची चूक होतेय ! तो प्रेम करत नाही ! .. मी अभागी होते ... खूप सोसलंय ... आता पुरे !

वार्वारा : मला तुमची भीती समजत नाही ! जर तुम्ही त्याच्यावर प्रेम करता आणि तो तुमच्यावर प्रेम करतो – तर मग काय ? भावी संकटांची तुम्हाला भीती वाटते ? पण कदाचित ती संकटं खूप खूप दूर असतील !

मार्या : हे शक्य आहे असं वाटतं तुम्हाला ? आणि माझी मुलगी ? माझी सोन्या ? आणि माझं वय ? माझी ननद्रष्ट वर्षं ? हे पांढरे केस ? तो अजून खूप तरुण आहे ! वर्षं उलटेल आणि तो मला टाकून देईल ! नाही ... असला अपमान मला सहन होणार नाही !

वार्वारा : मोजमापं कशाला करायची ? हिशेब कशाला मांडायचे ? आपण सगळे जगायला किती घाबरतो ! याचा अर्थ काय ? सांगा, याचा अर्थ काय ? किती आपण स्वतःची कीव करतो ! मी काय बोलतेय ते मला समजत नाही ... कदाचित असं बोलणं मूर्खपणाचं आणि अनावश्यक आहे . पण मी ... मला समजत नाही ! एखादी भलीमोठी मूर्ख माशी स्वतंत्र होण्यासाठी काचेवर धडाथडा आपटत राहते, तशी माझी परिस्थिती झालीय ! मला तुमच्याबद्दल वाईट वाटतं . तुम्हाला किंचित का होईना, आनंद द्यावा अशी माझी इच्छा

होती. आणि मला माझ्या भावाचीही कीव येते! तुम्ही त्याचं खूप कल्याण करू शकला असतात! त्याला आईचं सुख मिळालं नाही... त्यानं खूप दुःख भोगलंय, अपमान सोसलेत! तुम्ही त्याची आई बनू शकला असतात!

मार्या (मान खाली घालून): आई!.. होय! फक्त आई! मला तुमचं बोलणं समजतं! धन्यवाद!

वार्वारा (घाईने): नाही! तुमचा गैरसमज झाला! मी तसं नाही म्हणाले...

उजव्या बाजूने राईमधून न्यूमिन येतो. बायकांना पाहताच थांबतो आणि किंचित खोकतो. पण त्यांना त्याचे खोकणे ऐकू जात नाही. तो अधिक जवळ येतो.

मार्या: तसं सांगायची तुमची इच्छा नव्हती, पण नकळत साधं, डोकं ठिकाणावर ठेवून सांगितलेलं सत्य बोललात! मला त्याची आई व्हायला हवं! होय—आणि मित्र! मला खूप रडावंसं वाटतंय... मी जाते! ते बघा, न्यूमिन उभे आहेत. माझा चेहरा फार विचित्र दिसत असणार... म्हातारी गोंधळली! (शांत, थकल्या पावलांनी राईत निघून जाते.)

वार्वारा: मी येते तुमच्याबरोबर.

न्यूमिन (लगबगीने): वार्वारा मिखायलोवना! जरा थांबता का? मी तुमचा फार वेळ घेणार नाही!

वार्वारा: मी तुम्हाला गाठते, मार्या ल्वोवना. राखणदाराच्या खोपटाच्या दिशेनं जा. तुम्हाला काय सांगायचंय, पावेल सेर्गेयेविच?

न्यूमिन (सभोवती पहात) : आत्ता ... मी सांगतो ... (मान खाली घालतो व गप्प राहतो.)

वार्वारा : अशा गूढ रीतीनं का बघताय ? काय भानगड आहे ?

रंगभूमीच्या मागील भागात सूस्लोव गुणगुणत उजवीकडून डावीकडे जातात. बासोवचा आवाज ऐकू येतो: "व्लास, तुम्ही कविता म्हणून दाखवणार होतात. कुठं चाललात ?"

न्यूमिन : मी ... सरळच सुरवात करतो ! तुम्ही मला खूप काळ ओळखता ...

वार्वारा : चार वर्षं. काय झालंय तुम्हाला ?

न्यूमिन : मी थोडा अस्वस्थ आहे ... भीती वाटते ! हे शब्द उच्चारण्याचा माझा ठाम निर्णय होत नाही. माझी इच्छा होती की ... तुम्ही ... अं ...

वार्वारा : समजत नाही ! मी काय केलं पाहिजे ?

न्यूमिन : ओळखा ! तर्कानं जाणा बघू !

वार्वारा : काय ओळखू ? तुम्ही सरळ बोला ना !

न्यूमिन (हळूच) : खूप पूर्वीपासून जे सांगायची माझी इच्छा आहे ... केव्हापासून तुम्हाला सांगायचंय ... आता ... तुम्हाला समजलं ?

स्तब्धता. वार्वारा भुवया उंचावून न्यूमिनकडे थंड नजरेने पाहते आणि मंदपणे त्याच्यापासून दूर जाते.

वार्वारा (अनिच्छेने) : किती विचित्र दिवस !

न्यूमिन (हळूच) : मला भासतंय की, आख्खं आयुष्य मी तुमच्यावर प्रेम करतोय ! तुम्हाला प्रत्यक्ष

पाहिलं नव्हतं, तुमची ओळख नव्हती – त्याच्या आधीपासून प्रेम करतोय! तुम्ही माझ्या कल्पनेतली आदर्श स्त्री होतात! तारुण्यात निर्माण होणाऱ्या त्या वैभवशाली प्रतिमेतली! काहीवेळा त्या प्रतिमेचा सबंध आयुष्यभर शोध घेतात आणि ती गवसत नाही, पण माझी तुमच्याशी भेट झाली... माझ्या स्वप्नसुंदरीशी!

वार्वारा (शांतपणे): पावेल सेर्गेयेविच! ह्याबद्दल न बोलणं इष्ट! माझं तुमच्यावर प्रेम नाही! मुळीच नाही!

न्यूमिन: पण... कदाचित... मी बोलू का?

वार्वारा: काय? कशाला?

न्यूमिन: काय करणार? काय केलं पाहिजे? (हळूच हसतो.) संपलं सारं! किती सहज! किती किती काळापासून हे सांगायची मी मनाची तयारी करत होतो! आणि माझ्या प्रेमाचा उच्चार करण्याच्या त्या घडीचा विचार करतानासुद्धा माझं मन सुखावत होतं!.. आणि आता... सारंच विपरीत!

वार्वारा: अहो, पण त्याला मी काय करू?

न्यूमिन: हो, अर्थात... मला समजतं! तुम्हाला माहीत आहे – तुमच्यावर, तुमच्या माझ्याबद्दलच्या भावनांवर, माझ्या सगळ्या आशा मी लावून बसलो होतो. पण आता त्या आशा मावळल्या आणि जगण्यासारखं काहीच उरलं नाही.

वार्वारा: असं बोलायची गरज नाही. मला दुखवायची गरज नाही. मी थोडीच जबाबदार ह्या गोष्टींना?

न्यूमिन : पण मला किती यातना होताहेत ! पूर्ण न केलेल्या वचनांच्या वजनाखाली मी चिरडला जातोय. माझ्या तारुण्यात मी स्वतःशी आणि दुसऱ्यांसमोर प्रतिज्ञा केली होती की, मला जे योग्य वाटेल त्याच्या समर्थनार्थ मी सबंध आयुष्यभर संघर्ष करीन. आता माझ्या आयुष्यातली सर्वोत्तम वर्षं सरली – पण मी काहीही केलं नाही ! अगदी काहीच नाही ! सुरवातीला तयारी करण्यात, भूमी कशी आहे ते जोखण्यात, योग्य क्षणाची वाट पाहण्यात मी वेळ खर्च केला. स्वतःला कळायच्या आतच निवांत जीवनाची मला सवय झाली, मला ते आवडू लागलं आणि त्यात बिघाड करण्याची मला भीती वाटू लागली. किती प्रांजलपणं मी बोलतोय हे तुम्ही पाहताय ? प्रांजल वागण्याचा माझा आनंद हिरावू नका ! बोलायची मला शरम वाटते, पण ह्या शरमेत तिखट गोडवा आहे... कबुलीजबाबाचा आनंद आहे.

वार्वारा : तर मग मी तुमच्यासाठी काय करू ?

न्यूमिन : प्रेमाची याचना करत नाही – दयेची भीक मागतोय ! जीवनाच्या माझ्याकडं होणाऱ्या सतत मागण्यांपायी मी अगदी हबकून गेलोय. मी सावधपणं त्यांना टाळतोय, वेगवेगळ्या सिद्धांतांमागं लपतोय. तुम्हाला हे समजतंय याची मला कल्पना आहे. तुमच्याशी माझी भेट झाली आणि अचानक माझ्या हृदयात आशा पालवली की... माझ्या वचनपूर्तीत तुम्ही मला मदत कराल, अधिक चांगल्या जीवनाच्या निर्मितीसाठी श्रमायला मला बळ आणि

इच्छा प्राप्त करून द्याल !

वार्वारा (तावातावाने) : मला शक्य नाही ! समजून घ्या तुम्ही – मला शक्य नाही ! मी स्वतःच दरिद्री आहे. मीच आयुष्यात गोंधळून गेले आहे. आयुष्यात अर्थ शोधायचा प्रयत्न करतेय, पण गवसत नाही. मी जगते ते काय आयुष्य ? आपण जगतो तसं जगणं योग्य आहे का ? मनाला ठाशीव आणि सुंदर जीवनाची आस आहे. पण भोवती नतद्रष्ट रिकामपण भरलंय... असं जगायची किळस येते, शरम वाटते ! सगळ्यांना कशाचीतरी भीती वाटते. एकमेकांना धरून ठेवायचा , आधार घेण्याचा सगळे प्रयत्न करतात... ओरडतात, किंचाळतात ...

न्यूमिन : मीसुद्धा मदतीचा आधार मागतोय ! आता मी दुबळा, ठाम निर्णय घेण्यास असमर्थ असा माणूस बनलोय. पण जर तुम्ही मनात आणलंत...

वार्वारा (जोराने) : खोटं ! माझा तुमच्यावर विश्वास नाही ! केवळ माझ्या सहानुभूतीला जाग आणण्यासाठी हे शब्द बोलता आहात ! जरी मी सामर्थ्यवान असले तरी माझ्या अंतःकरणाला तुमच्या छातीत ठेवणं तर मला शक्य नाही ! माणसाचा पुनर्जन्म घडवण्यास समर्थ अशी शक्ती माणसाबाहेर कुठंतरी वास करते, यावर माझा विश्वास नाही. एकतर ही शक्ती माणसातच असते, अथवा ती अस्तित्वातच नाही ! मी आणखी बोलणार नाही... माझ्या मनात वैर वाढतंय !

न्यूमिन : माझ्याबद्दल ? पण का ?

वार्वारा : नाही, तुमच्याबद्दल नव्हे! एकूण सगळ्यांबद्दल! या धरतीवर आपण परक्यांप्रमाणं जगतो. लोकांच्या जीवनासाठी उपयुक्त ठरणं आपल्याला जमत नाही. मला भासतं की, लौकरच, उद्या, कुठलीतरी दुसरी, सामर्थ्यवान, धैर्यवान माणसं येणार आहेत आणि कचऱ्याप्रमाणं आपल्याला मातीत लोटून देणार आहेत. खोटेपणाविषयी, फसवणुकीविषयी माझ्या अंतरंगात वैरभावना भडकतेय.

न्यूमिन : पण मला माझ्या आभासांमध्ये जगावंसं वाटतं! आता मला खरं समजलं आणि माझ्या जीवनाला अर्थच उरला नाही.

वार्वारा (शहारत) : माझ्यासमोर तुमचं मन असं उघडं करू नका. एखाद्या माणसाला लुबाडण्यात आलं असलं आणि तो दरिद्री बनला असला, तर मला त्याच्याबद्दल अनुकंपा वाटते. पण दौलत उधळून दरिद्री बनलेल्या अथवा जन्मतःच दरिद्री असलेल्या माणसाबद्दल मला करुणा वाटत नाही.

न्यूमिन (अपमानीत स्वरात) : एवढं कठोर होऊ नका! तुम्हीसुद्धा आजारी, घायाळ आहात!

वार्वारा (ताठर अभिमानाने) : घायाळ आजारी नसतो! फक्त देहाची मोडतोड झालेली असते. विषबाधा झालेला माणूस आजारी असतो.

न्यूमिन : माझी कीव करा! सरतेशेवटी मी माणूस आहे!

वार्वारा : आणि मी? मी काय माणूस नाही? अथवा तुमचं आयुष्य मजेत जावं म्हणून फक्त माझी

जरूरी आहे? ह्याला क्रूरपणा नाही म्हणायचा? तारुण्यात प्रतिज्ञा करणारे तुम्ही काही एकटेच नव्हेत – स्वतः-च्या प्रतिज्ञा मोडणारे कदाचित हजारो लोक आहेत.

न्यूमिन (विमनस्कपणे): निरोप द्या! मला समजतं – मला उशीर झालाय! पण शालीमोवसुद्धा... एकदा नीट पहा त्याच्याकडं... बघा म्हणजे समजेल...

वार्वारा (थंडपणे): शालीमोव? तुम्हाला हक्क नाही...

न्यूमिन: अच्छा! मला आणखी बोलणं अशक्य आहे... चलतो!

राईत डाव्या बाजूला वेगाने निघून जातो. त्याच्या पाठोपाठ धावत जाण्याची इच्छा असावी अशी वार्वारा हालचाल करते, पण त्याचवेळी ठामपणे मान हलवून थांबते आणि खुंटावर बसते. गालीचावर मांडलेल्या खाद्यपदार्थांपाशी सूस्लोव येतात आणि मदिरा पितात. वार्वारा उठते आणि राईत डावीकडे जाते. उजवीकडून लगबगीने न्यूमिन येतो, सभोवार नजर टाकतो आणि निराशेने गवताच्या गंजीवर बसकण घालतो. किंचित झिंगलेले सूस्लोव शीळ घालत न्यूमिनपाशी जातात.

सूस्लोव: तुम्ही ऐकलात?

न्यूमिन: काय?

सूस्लोव (बसत): वाद.

न्यूमिन: नाही. कोणता?

सूस्लोव (सिगारेट पेटवत): व्लास विरुद्ध लेखक आणि झामीस्लोव.

न्यूमिन : नाही ...

सूस्लोव : अरेरे !

न्यूमिन : सांभाळा, गंजीला आग लावाल !

सूस्लोव : खुशाल जळो ! इथं जोरदार वाद झाला. पण सगळ्या थापा ... मला ठाऊक आहे. मी स्वतः एकेकाळी असाच तत्त्वज्ञान पाजळत होतो. मीसुद्धा माझ्या काळात सगळे आधुनिक शब्द वापरायचा आणि त्यांची किंमत मला ठाऊक आहे. पुराणमतवाद, बुद्धि-जीवीवर्ग, लोकशाही ... आणखी काय बरं? हे सगळं निर्जीव आहे ... सगळं खोटं ! माणूस सर्वप्रथम प्राणि-शास्त्रीय वस्तुस्थिती आहे. तुम्हाला हे ठाऊक आहे ! आणि कितीही बहाणे केलेत, तरी तुम्हाला खायची, प्यायची, स्त्री-सहवासाची इच्छा असते हे लपवू शकत नाही. हेच तुमचं सत्य ! शालीमोव बोलतो तेव्हा मी समजू शकतो : तो साहित्यिक – शब्दांशी खेळणं हा त्याचा धंदा आहे. आणि जेव्हा व्लास बोलतो, तेव्हाही मी समजू शकतो : तो तरुण आणि मूर्ख आहे. पण जेव्हा हा डांबीस, हिंस्र पशू, झामीस्लोव बोलतो – तेव्हा त्याच्या नरडीला आवळा-यची मला जबरदस्त इच्छा होते ! तुम्ही ऐकलंत? बासोवला त्यानं एका भानगडीत चांगलंच अडकवलंय ! घाणेरडा मामला आहे ... पन्नास हजाराची रक्कम लाटतील ! तो बासोव आणि हा भामटा ! पण नंतर त्यांना कुणीही सभ्य माणसं मानणार नाही ! आणि ही गर्विष्ठ वार्वारा, जिला अजून स्वतःचा प्रेमिक निश्चित करता येत नाही ...

न्यूमिन : तुम्ही घाणेरड्या गोष्टी बोलता आहात! (चटकन निघून जातो.)

सूस्लोव : शेळपट गाढव! (उजवीकडून पूस्तोबायका येतो. तोंडातून पाईप काढून एकटक सूस्लोवकडे पाहतो.) असा आ वासून बघतोस काय? माणसं कधी बघितली नाहीत? चालता हो इथून!

पूस्तोबायका : जातो. (सावकाश निघून जातो.)

सूस्लोव (गंजीवर आडवे होत) : "धरतीवरची सारी माणसं..." (खोकतात.) सगळे तुम्ही छुपे रुस्तुम!.. "पैशापायी मरतात माणसं..." फालतू... पैशाला काही अर्थ नाही... जेव्हा तो जवळ असतो... (झोपाळूपणे) आणि लोक काय म्हणतील याची भीती बाळगावी... शुद्धीवर असलेल्या माणसानं! तुम्ही सगळे छुपे रुस्तुम आहात... तुम्हाला सरळ सांगतो!.. (झोपतात. दूदाकोव आणि ओल्गा एकमेकांच्या हातात हात गुंफवून सावकाशपणे येतात. ओल्गा दूदाकोवच्या अंगावर झुकून त्यांचा चेहरा निरखत राहते.)

दूदाकोव : आपणा दोघांचंही चुकलं होतं. भावनांच्या आणि काळज्यांच्या चक्रात गुरफटत गेलो. एकमेकांबद्दलचा आदर गमावून बसलो. कशाबद्दल तू माझा आदर करायचा? असा कोण मी?

ओल्गा : माझ्या लाडक्या किरिल... तू माझ्या मुलांचा बाप आहेस... मला तुझ्याबद्दल आदर वाटतो... माझं तुझ्यावर प्रेम आहे.

दूदाकोव : मी दमतो आणि माझा ताबा सुटतो... मानसिक ताण सहन होत नाही! आणि तू सगळं

गंभीरपणं मनाला लावून घेतेस ... मग भांडणं होतात!

ओल्गा: आख्ख्या जगात माझा असा तू एकटाच! तू आणि आपली मुलं! तसं दुसरं कोण आहे मला?

दूदाकोव: जरा आठव ओल्गा ... कधीतरी तू आणि मी ... अशा जीवनाची स्वप्नं पाहिली होती का? (डाव्या बाजूला झाडांपाशी यूलीया आणि झामीस्लोव येतात.) खरंच ...

ओल्गा: काय करणार? करणार काय? आपल्याला मुलं आहेत! त्यांचं कल्याण प्रथम पाहिलं पाहिजे.

दूदाकोव: हं ... मुलं ... मला समजतं! पण काही-वेळा मनात विचार येतो ...

ओल्गा: माझ्या लाडक्या! करणार काय?

राईत निघून जातात.

यूलीया (हसत पुढे येत): अत्यंत गंभीर आणि हेलावणारा! केवढा हा धडा मला!

झामीस्लोव: ही पाचव्या बाळाची प्रस्तावना ... अथवा एव्हाना सहाव्याची? लाडक्या यूलीया, मी वाट पाहतोय!

यूलीया (खोटा अविर्भाव करत): आता काय सांगावं ते मला समजत नाही ... किती छान होते ते! माझ्यात हाच गुण परत येणार नाही का, माझ्या वेडपटा?

झामीस्लोव: हे नंतर, यूलीया ...

यूलीया: होय, नंतर. पापाच्या वाटेनंच जाण्याचा मी तूर्त निर्णय केलाय आणि माझं दाचावरचं प्रेम-प्रकरण स्वाभाविक मरणानं मरो. त्या क्लासबरोबर

आणि लेखकाबरोबर तुमचा कसला आरडाओरडा चालला होता ?

झामीस्लोव : आज हा क्लास अर्धवटासारखा वागतोय. संभाषण आमच्या श्रद्धांबाबत चाललं होतं.

यूलीया : तुझी कशावर श्रद्धा आहे ?

झामीस्लोव : माझी फक्त माझ्यावर श्रद्धा आहे, यूलीया. मला हवं तसं जगण्याचा माझा हक्क आहे, यावर केवळ माझी श्रद्धा आहे.

यूलीया : पण माझी कशावरच श्रद्धा नाही.

झामीस्लोव : माझं बालपण उपासमारीत गेलं. तारुण्यही तसंच पूर्ण हलाखीत. माझा भूतकाळ फार अप्रिय होता, लाडके यूलीया ! खूप कष्ट सोसलेत आणि वाईट पाहिलंय ... फार यातना भोगल्यात ! आता मात्र माझ्या जीवनाचा मीच न्यायाधीश आणि मीच मालक – बास्स ! बरं, मी जातो ... परत भेटू, माझ्या प्राणा ! .. आपल्याला सांभाळून राहिलं पाहिजे. एकमेकांपासून दूर राहिलं पाहिजे.

यूलीया (अतिरेकी भावनाप्रधानतेने) : दूर किंवा जवळ – काय फरक पडतो माझ्या शूर शिलेदारा ? आपल्यासारख्या वेडया प्रेमिकांनी कुणाला भ्यायचं ?

झामीस्लोव : अदृश्य होतो, प्रिये ! .. (राईत जातो. यूलीया त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहते, नंतर सभोवार बघून मोकळेपणी दीर्घ सुस्कारा टाकते. गाणे गुणगुणत ती गवताच्या गंजीपाशी येते.)

यूलीया :

आई जसं बाळा शांतवते
तसं शांत कर माझ्या तडफडत्या जीवा...

नवऱ्याला पाहत. थांबते, शहारते आणि काही सेकंद स्तब्धपणे त्याच्याकडे टक लावून पाहते. दूर जाऊ इच्छिते, पण त्याऐवजी स्मित करून नवऱ्याशेजारी बसते. गवताच्या पात्याने त्याच्या चेहऱ्याला गुदगुल्या करते. सूस्लोव घशात गुरगुरतात.

यूलीया: किती सुरेल!

सूस्लोव: कोण हा सैतान? अरेच्चा, तू?

यूलीया: दारूचा किती दर्प येतोय तुला! गवताची आख्खी गंज हा वास दडपू शकत नाही. ही दारू तुझा सत्यानाश करील, माझ्या मित्रा!

सूस्लोव (हात तिच्यापुढे धरत): तू... एवढी जवळ... ते केव्हा घडलं हे एव्हाना मी विसरलोय, यूलीया.

यूलीया: आणि ते आनंदी क्षण आठवून काही उपयोग नाही, माझ्या मित्रा... ऐक, माझ्यावर, एक अनुग्रह करशील?

सूस्लोव: कोणता? बोल – मी तयार आहे! माझ्यावर विश्वास ठेव, यूलीया... तुझ्यासाठी काय वाट्टेल ते करायला मी तयार आहे.

यूलीया: प्रेमळ नवरा नेमका असाच असला पाहिजे!

सूस्लोव (तिचा हात चुंबत): सांग मला... काय हवंय् तुला?

यूलीया (खिशातून छोटे रिवॉल्वर बाहेर काढत): चल, दोघंही गोळ्या झाडून घेऊ, माझ्या मित्रा! प्रथम तू... नंतर मी!

सूस्लोव: किती जीवघेणी थट्टा, यूलीया! फेकून दे ही घाण... फेकून दे म्हणतो ना!

यूलीया: थांब... तुझा हात दूर कर! माझी सूचना तुला आवडत नाही? पण तू तर मला गोळी घालायच्या तयारीत आहेस ना?.. मी प्रथम स्वतःला गोळी घातली असती, पण मला भीती वाटते की, तू फसवशील आणि जिवंत राहशील. माझी परत एकदा फसवणूक करून घ्यायची इच्छा नाही आणि तुझा विरह सहन करण्याचीही माझी इच्छा नाही... मी तुझ्याबरोबर खूप खूप काळपर्यंत राहणार आहे... आता तुला आनंद झाला?

सूस्लोव (हताशपणे): ऐक यूलीया, तसं चालणार नाही... नाही चालणार!

यूलीया: चालेल – तू बघशील! आहे तुझी इच्छा – मी स्वतः तुला गोळी घालू?

सूस्लोव (तोंडावर हात झाकून घेत): माझ्याकडं असं पाहू नको! तू झाडशीलसुद्धा गोळी! मी – जातो... मला शक्य नाही!

यूलीया (मजेत): जा... मी तुझ्या पाठीत गोळी झाडीन. अरेरे, आता जमणार नाही. ती बघ मार्या ल्वोवना आली... फार छान बाई! प्योत्र, तू तिच्या प्रेमात का पडत नाहीस? तिचे केस किती सुंदर आहेत!

सूस्लोव (हळू आवाजात): तू मला वेडा करणार!

कशाबद्दल? कशाबद्दल तू माझा तिटकारा करतेस?

यूलीया (तिरस्काराने): तुझा तिटकारा करणं अशक्य आहे.

सूस्लोव (हळूच सुस्कारा सोडत): तू मला अशी छळतेस कशाबद्दल? बोल!

मान खाली घालून विचारमग्न मनःस्थितीत मार्या येते. बायकोच्या हातातील रिवॉल्वरकडे नजर रोखून सूस्लोव उभे आहेत.

यूलीया: मार्या ल्वोवना! इकडं या! प्योत्र, तू मला अत्यंत नीच बाई बनवलं आहेस... जा, चालता हो! मार्या ल्वोवना, आपण लौकरच घरी जाणार काय?

मार्या: खरंच मला माहीत नाही! सगळीजणं कुठं-तरी विखुरलीत. तुम्ही वार्वारा मिखायलोवनाला पाहिलंत?

यूलीया: त्या बहुधा लेखकमहाशयांबरोबर आहेत. प्योत्र, तुला नदीवर जायचं होतं ना? जा. तुझ्यावाचून आम्हाला काही कंटाळा येणार नाही.

सूस्लोव मुकाटपणे जातात.

मार्या (विमनस्कपणे): किती तोडून बोलता तुम्ही!

यूलीया: त्यामुळं काही यातना होत नाहीत. कुणा एका तत्त्वज्ञान्यानं पुरुषांना सल्ला दिला होता: बाईजवळ जाताना हातात चाबूक घेऊन जा.

मार्या: तो नीत्शे!

यूलीया : असं ? मला वाटतं, तो अर्धवट डोक्याचा होता ! मला शहाणे किंवा अर्धवट शहाणे – कुठलेच तत्त्वज्ञ माहीत नाहीत, पण जर मी तत्त्वज्ञानी असते तर बाईला सांगितलं असतं : माझ्या लाडके, पुरुषापाशी जाताना चांगला जाडजूड सोटा घेऊन जा ! (डाव्या बाजूने, मैदानाच्या मागील भागात, ओल्गा आणि कालेरीया प्रवेश करतात व खाद्यपदार्थ मांडलेल्या गाली-चापाशी बसतात.) मला असंही सांगण्यात आलं की, एका रानटी टोळीत असा एक छान रिवाज आहे : रम्य सुखाची फुलं तोडण्यापूर्वी पुरुष बाईच्या डोक्यावर दंडुक्याचे प्रहार करतो. आपणा सुसंस्कृत लोकांमध्ये हा प्रकार लग्नानंतर घडतो. तुमच्या डोक्यावर दंडुके बसलेत ?

मार्या : हो ... य !

यूलीया (स्मित करत) : रानटी लोक प्रामाणिक आहेत ! खरं ना ? तुम्ही अशा उदास का ?

मार्या : नका विचारू ... तुम्हाला जगणं अवघड झालंय ?

उजवीकडून हातात गळ घेतलेले, डोक्यावर टोपी नसलेले द्वोयेतोचिये येतात.

यूलीया (हसून) : कुणी माझ्या तक्रारी ऐकल्यात ?.. मी नेहमी हसरी ... हे बघा काकासाहेब ! तुम्हाला आवडतात ते ? मला फार आवडतात.

मार्या : होय, ते छान आहेत.

द्वोयेतोचिये (जवळ येत) : माझी टोपी वाहून गेली ...

तरुण मंडळी धावली तिला वाचवायला, पण त्यांनीच तिला तळाशी बुडवलं! डोक्यावर बांधायला कुणापाशी जादा रुमाल नाही का? डोक्यावर केस नसलेल्या जागी डास चावताहेत!

यूलीया (उठत) : थांबा, आत्ता आणून देते. (रंगभूमीच्या मागील बाजूस जाते.)

द्वोयेतोचिये : तिथं श्रीमान चेर्नोवनी सगळ्यांची खूप करमणूक केली! छान पोरगा आहे!

मार्या : ते खूप मजेशीर आहेत?

द्वोयेतोचिये : कमालीचा! धमाल केली! कविता म्हणून दाखवल्या. कुणा एका पोरीनं स्वतःच्या आल्बम-मध्ये त्याला काही लिहायची विनंती केली आणि त्यानं लिहिलं : "तुम्ही हसऱ्या डोळ्यांनी माझ्याकडं पाहिलंत आणि नजरेचा तो तीर थेट माझ्या काळजात घुसला! चक्क दोन आठवडे बाईसाहेब, डोळ्याला डोळा लागत नाही!" आणि पुढं...

मार्या (घाईने) : पुढं सांगू नका... मला ही कविता माहीत आहे... तुम्ही इथं बरेच दिवस मुक्काम करणार आहात?

द्वोयेतोचिये : मला वाटलं होतं, आयुष्याच्या अखेरी-पर्यंत आता पुतण्याकडं रहावं... पण तो काही याबाबत फारसा उत्सुक दिसत नाही. दुसरीकडं जायला मला कुठं जागा नाही... माझं कुणीही नाही... पैसे आहेत, पण आणखी काही नाही!

मार्या (विमनस्कपणे, त्यांच्याकडे न पाहता) : तुम्ही खूप श्रीमंत आहात?

द्रोयेतोचिये : माझ्यापाशी जवळ जवळ दहा लाख आहेत. ह्यॅं, ह्यॅं ! दहा लाख ! मेलो तर सगळे प्योत्रला मिळतील. पण त्याला त्याची फारशी फिकीर दिसत नाही. माझ्याशी तो फारसा प्रेमानं वागत नाही. एकूणच त्याला कसली जोरदार इच्छा दिसत नाही. त्याला काहीही नको. मला समजत नाही तो ! कदाचित त्याला माहीत आहे की, कोणत्याही परिस्थितीत पैसा त्यालाच मिळायचा आहे – मग कशाला उगीच चिंता करायची ? ह्यॅं, ह्यॅं !

मार्या (कुतूहलाने) : गरीब बिच्चारे ! सामाजिक कल्याणासाठी तुम्ही देणगी का देत नाही ?

द्रोयेतोचिये : होय ! एका श्रीमानांनी मला हा सल्ला दिला होता. पण मला तो आवडत नाही. महाडांबीस आहे, पण आव मात्र उदारमतवाद्याचा आणतो. खरं सांगायचं तर हे सगळे पैसे प्योत्रसाठी ठेवायला मला दु:ख होतंय. त्याला काय ? तो आत्ताच गर्वानं फुगलेला आहे. (मार्या हसते. द्रोयेतोचिये लक्षपूर्वक तिच्याकडे पाहतात.) तुम्ही हसता कशाला ? मी वेडपट वाटतो ? नाही, मी वेडा नाही ... मला फक्त एकट्यानं जगायची सवय नाही. शोक करून करून काळीज सुकलंय माझं ! सगळ्यांबद्दल वाईट वाटतं ! पण तुम्हाला खरं सांगतो ... तुम्ही फार छान आहात ! (हसतात.)

मार्या : धन्यवाद !

द्रोयेतोचिये : अहो, तुम्हालाच धन्यवाद ! तुम्ही मला गरीब बिच्चारे म्हणालात ! ह्यॅं, ह्यॅं ! हा शब्द मी माझ्या बाबतीत कधीही ऐकला नव्हता ! सगळे म्हणायचे –

श्रीमंत! ह्यॅ, ह्यॅ! आणि मला स्वतःलाही वाटायचं – मी श्रीमंत! पण प्रत्यक्षात ठरलं – मी गरीब बिच्चारा!

यूलीया (हातात रुमाल घेऊन येते): काका, तुम्ही प्रेम व्यक्त करताय?

द्रोयेतोचिये: आता कुठलं प्रेम? मी आता फक्त आदर व्यक्त करू शकतो!.. रुमालाची छान गाठ मार बघू! जायच्या आधी थोडं खाऊन घेतो...

यूलीया: बघा... तुम्हाला फार छान दिसतो!

द्रोयेतोचिये: खोटं बोलतेस! माझा चेहरा पुरुषी आहे. खायला चला. केव्हापासून तुला विचारायचं म्हणतोय – तुझं नवऱ्यावर प्रेम नाही?

यूलीया: तुमच्या मतानं तो प्रेम करण्यालायक आहे?

द्रोयेतोचिये: तर मग त्याच्याशी लग्न का केलंस?

यूलीया: त्यावेळी त्यानं विशेष असल्याचा बहाणा केला.

द्रोयेतोचिये (हसतात): तू म्हणजे अगदी कमाल आहेस!

तिघेही रंगभूमीच्या मागील भागात जातात. तेथे त्यांचा हसण्या-बोलण्याचा आवाज पुढील प्रसंगात अस्पष्ट ऐकू येत राहतो. डावीकडून शालीमोव, दूदाकोव, व्लास आणि किंचित झिंगलेले बासोव येतात. व्लास रंग-भूमीच्या मागील भागातील माणसांकडे जातो. बाकीचे तिघे गवताच्या गंजीवर.

झामीस्लोव (राईतून ओरडतो): मंडळी! घरी परताय‌ची वेळ झाली!

बासोव: याकोव, ही जागा सुंदर आहे नाही?

मस्त सहल झाली ना?

शालीमोव: तू नुसता बसून राहिलास. आणि पीत राहिलास... दारूत भिजून चिंब झालायस!

रंगभूमीच्या मागील भागात द्वोयेतोचियेंच्या डोक्यावरील रुमाल सोन्या बांधते. हंशा. राईमधून झामीस्लोव गालीचापाशी येतो, दारूची बाटली व ग्लास घेतो आणि बासोवकडे येतो. सोन्याला हातांनी झटकून द्वोयेतोचिये त्याच्या पाठोपाठ येतात.

बासोव (गवतावर धपकन बसत): मी परत बसतो... निसर्गाचं सौंदर्य बसून निरखलं पाहिजे... निसर्ग, जंगल, झाडं... वाळकं गवत... फार आवडतो मला निसर्ग! (काही कारणाने खिन्न आवाजात.) आणि माणसंही आवडतात. माझा गरीब बिच्चारा, प्रचंड, विचित्र देश... माझा रशिया... मला आवडतो! सगळं आणि सगळे मला आवडतात! माझं मन खूप कोवळं आहे! नासपातीसारखं! याकोव, ही सुरेख तुलना तू वापर: नासपातीसारखं कोवळं मन!

शालीमोव: ठीक, वापरीन मी.

सोन्या: सेम्योन सेम्योनोविच, अजून बांधून झाला नाही!

द्वोयेतोचिये: होईल बांधून! माझ्या म्हाताऱ्याची थट्टा केलीत... मला फार अपमान वाटलाय! ह्यॅ, ह्यॅ!

बासोव: अरेच्चा, दारू! ओता माझ्यासाठी. किती छान! मंडळी, किती मजा आली! आयुष्याकडं मित्रत्वानं, साधेपणानं पाहणाऱ्याला आयुष्य म्हणजे एक

निखळ आनंद आहे. मंडळी, जीवनाकडं स्नेहभावानं, विश्वासानं पाहिलं पाहिजे. लहान मुलाच्या साध्या डोळ्यांनी जीवनाचा चेहरा पाहिला पाहिजे. मग सगळं उत्तम घडतं! (बासोवची बडबड ऐकून खुंटापाशी उभे असलेले द्वोयेतोचियेे खो खो हसतात.) सद्गृहस्थहो! एकमेकांच्या अंतःकरणांमध्ये लहान मुलांच्या स्पष्ट डोळ्यांनी पहा – दुसरी काहीही जरूरी नाही... काका का हसताहेत? त्यांनी छान पर्च मासा धरला होता... मी त्या पर्चला परत नदीत सोडला. कारण मी अद्वैतवादी आहे. खरंच! मला पर्च आवडतात. आणि काकांनी स्वतःची टोपी नदीत गमावली!

शालीमोव : फार वटवट केलीस सेर्गेइ!

बासोव : निवाडा करू नको, म्हणजे तुझा निवाडा कुणी करणार नाही. मी तुझ्याएवढंच छान बोलू शकतो. तू सुंदर शब्द बोलतोस आणि मीही सुंदर शब्द बोलतो!.. मला मार्या ल्वोवनाचा आवाज ऐकू येतोय... झकास बाई... अत्यंत आदरपात्र!

शालीमोव : मला अशी मुलूखमैदानी तोंडाची बाई आवडत नाही. एकूणच मला आदरपात्र बायका आवडत नाहीत.

बासोव (आनंदाने) : अगदी खरं! आदरपात्र बायकांपेक्षा आदरास अपात्र बायका अधिक चांगल्या! एकदम खरं!

द्वोयेतोचिये : वा! राणीसारख्या बाईशी लग्न केलेला माणूस असं बोलतो!

बासोव : माझी बायको? वार्या? ती विशुद्ध आचर-

णाची आहे! कर्मठ! विलक्षण स्त्री, संतीण! पण – तिच्याशी नीरस वाटतं! ती खूप वाचन करते आणि नेहमी कुठल्या ना कुठल्या तत्त्वज्ञान्याचं वचन सांगते. तिच्या आरोग्यासाठी पिऊ या!

शालीमोव: समारोप अगदी अनपेक्षित! पण तरीही ती मार्या ल्वोवना...

बासोव (मधेच अडवत): तुला माहीत आहे – माझ्या कारकुनाबरोबर तिचं प्रेम-प्रकरण आहे. खरं! तो तिच्यापुढं स्वतःच्या प्रेमाची कबुली देत असताना मी खुद्द पाहिलंय!

द्वोयेतोचिये: हं... ह्याबद्दल न बोललेलं उत्तम! (दूर जातात.)

बासोव: अरे हो! ही गुप्त गोष्ट आहे!

कालेरीया (प्रवेश करत): सेर्गेइ! तुला वार्या दिसली नाही?

बासोव: ही माझी बहीण! माझी लाडकी कवयित्री... याकोव, तिनं तुला स्वतःच्या कविता म्हणून दाखवल्या? तू ऐकच – फार छान आहेत! सगळं उंच उंच! ढग... डोंगर... तारे...

कालेरीया: तू प्यायलास वाटतं? होय ना?

बासोव: फक्त एकच प्याला!

झामीस्लोव: ह्या बाटलीमधून!

शालीमोव: मला तुमच्या कविता ऐकायची फार इच्छा आहे, कालेरीया वासिल्येवना.

कालेरीया: बघा हं! तुमचे शब्द खरे मानून मी चार लठ्ठ वह्या घेऊन आले तर?

शालीमोव : घाबरवू नका! मी भित्रा नाही!

कालेरीया : बघू!

यूलीया (राईत गाते): "घरा जायची वेळ झाली!.."

कालेरीया उजवीकडे जाते. तिची सोन्याशी भेट होते. यूलीयाच्या आवाजाच्या दिशेने झामीस्लोव जातो. बासोव त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहतात आणि शालीमोवकडे झुकून त्यांच्या कानात काहीतरी कुजबुजतात.

शालीमोव त्यांचे बोलणे ऐकून हसतात.

कालेरीया : घरी जायचं?

सोन्या : हो. सगळे दमलेत.

कालेरीया : जेव्हा मी घरातून बाहेर पडते, तेव्हा माझ्याबरोबर एक अंधुक आशा येत असते. पण घरी परतते मात्र मी एकटी! तुमच्या बाबतीत असं होत नाही ना?

सोन्या : नाही.

कालेरीया : होईल.

सोन्या (हसून): दुःखी गोष्टी बोलायला तुम्हाला आवडतं असं मला वाटतं.

कालेरीया : असं? तुमच्या तेजस्वी डोळ्यांवर विचाराच्या अस्वस्थ सावलीचं पांघरुण घालावं अशी माझी इच्छा आहे. अत्यंत रांगड्या, भयानक माणसांच्या संगतीत मी तुम्हाला अनेकदा पाहते आणि जीवनाच्या घाणीकडं एवढ्या निर्भयपणं तुम्ही कशा पाहता याचं नवल करते. त्या लोकांच्या सहवासाची किळस येत नाही?

सोन्या (हसून) : घाण त्यांच्या कातडीवर असते – ती साबणानं धुवून टाकता येते.

रंगभूमीच्या खूप मागे जातात. त्यांचे संभाषण अस्पष्ट होत जाते.

शालीमोव (उठत) : तुझी जीभ फार विषारी आहे सेर्गेइ. सांभाळ – तू स्वत: एक नवरा आहेस!

बासोव : मी ?

शालीमोव : निसर्ग सुंदर आहे – पण त्यात डास कशाला असतात ? माझा रग मी कुठं टाकला ?

उजवीकडे जातात. बासोव आडवे होतात आणि गाणे गुणगुणू लागतात. रंगभूमीच्या मागील भागात साशा, सोन्या आणि पूस्तोबायका सामान आवरू लागतात. डाव्या बाजूने गवताच्या गंजीपाशी वार्वारा येते. तिच्या हातात फुलांचा गुच्छ.

क्लास (राईतून) : होडीतून कोण जाणार, मंडळी ?

बासोव : वार्या! तू भटकतेस ? आणि मी एकटा सगळे निघून गेले.

वार्वारा : तू परत खूप प्यायलास, सेर्गेइ.

बासोव : फार प्यायलो ?

वार्वारा : तुला कन्याकचा त्रास होतो. मग काळीज धडधडतंय म्हणून तक्रार करत बसशील.

बासोव : पण मी जास्त करून पोर्टवाईन प्यायलो. मला दूषणं देऊ नको, वार्या! माझ्याशी नेहमी कठोर आणि करड्या सुरात बोलतेस ... पण मी नरम स्वभावाचा

माणूस ... लहान बाळासारखं माझं सगळ्यावर नाजुक प्रेम आहे ... माझ्या लाडके, बैस इथं! अखेरीस एकदाचं मनःपूत हितगुज करू या! आपण एकमेकांशी मनं मोकळी करणं आवश्यक आहे.

वार्वारा: पुरे कर! घरी निघालेत सगळे ... ऊठ आणि होडीकडं जा ... जा म्हणते ना!

बासोव: ठीक आहे – जातो! कुठं जायचं? तिकडं? जातो ...

पाय जोराने आपटत जातो. वार्वारा त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहते. तिचा चेहरा कठोर बनलाय. उजवी-कडे ती नजर टाकते तेव्हा तिला शालीमोव दिसतात. ते हलक्या पावलांनी तिच्यापाशी येतात व गोड स्मित करतात.

शालीमोव: तुमचा चेहरा ओढलाय, डोळे कष्टी दिसताहेत ... दमलात?

वार्वारा: थोडीशी.

शालीमोव: मी खूप दमलोय ... माणसांना बघून दम-लोय ... ह्या लोकांमध्ये तुम्हाला बघून मला दुःख होतं. माफ करा!

वार्वारा: कशाबद्दल?

शालीमोव: माझे शब्द कदाचित तुम्हाला अप्रिय वाटले?

वार्वारा: तसं वाटलं असतं तर मी सांगितलं असतं.

शालीमोव: मी तुम्हाला बघतोय, ह्या गोंगाटी माणसांमध्ये किती मुकाटपणं वावरता तुम्ही आणि

तुमचे डोळे काहीतरी उत्तर शोधताहेत. तुमचं मौन मला शब्दांपेक्षा जास्त बोलकं भासतं. मीसुद्धा एकाकी-पणातला गारठा आणि खडतरपणा अनुभवलाय.

सोन्या (ओरडते): आई! तू होडीतून जाणार?

मार्या (राईतून): नाही, मी पायी जाणार.

वार्वारा (शालीमोवपुढे फूल धरत): पाहिजे?

शालीमोव (झुकून स्मित करत): आभारी आहे. केवळ अशा स्नेहभावानं मला फुलं देतात तेव्हा मी विलक्षण काळजीपूर्वक त्यांचं जतन करतो. (उजवी-कडून राईमधून व्लास: "ए राखणदार! दुसरं वल्हं कुठं?") तुमचं हे फूल माझ्या पुस्तकात कुठंतरी पानांआड राहील. कधीतरी ते पुस्तक मी हातात घेईन, मला फूल दिसेल आणि तुमची आठवण होईल... हास्यास्पद वाटतं? भावनाप्रधान?

वार्वारा (हळूच मान खाली घालून): बोला...

शालीमोव (तिच्या चेहऱ्याला कुतूहलाने निरखत): जगण्याची अजिबात अक्कल नसलेल्या ह्या माणसांमध्ये राहताना तुम्हाला फार त्रास होत असणार.

वार्वारा: तुम्ही शिकवा त्यांना अधिक चांगलं जगा-यला!

शालीमोव: माझ्यात शिक्षकाचा आत्मविश्वास नाही. मी परका माणूस – जीवनाचा एकाकी निरीक्षक. भपके-बाज भाषणं मला जमत नाहीत आणि माझे शब्द ह्या माणसांच्या धैर्याला जाग आणू शकणार नाहीत. तुम्ही, कशाचा विचार करता आहात?

वार्वारा: मी? असे विचार आहेत जे मला लोकां-

पासून दूर ढकलतात. म्हणून त्यांना जन्मतःच ठार केलं पाहिजे.

शालीमोव : मग तुमचा आत्मा म्हणजे स्मशान होईल! नाही, माणसांपासून दूर जाता म्हणून घाबरायचं कारण नाही. माझ्यावर विश्वास ठेवा – माणसांपासून जेवढं दूर रहाल, तेवढी हवा जास्त स्वच्छ आणि सर्व छान, स्पष्ट दिसतं.

वार्वारा : मला तुमचं बोलणं समजतं... जणू काही कुणीतरी जवळचं माणूस असाध्य रोगानं आजारी आहे अशी दुःखद भावना मला पछाडतेय.

उजवीकडे गोंगाट.

शालीमोव (तिचे शब्द न ऐकता) : आत्ता किती प्रामाणिकपणं मी बोलतोय हे जर तुम्हाला समजलं तर! कदाचित तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवत नाही, पण तरीही मी सांगतो : तुमच्यासमोर प्रांजळ व्हावं, अधिक चांगलं बनावं, अधिक शहाणं बनावं, अशी इच्छा होते.

वार्वारा : धन्यवाद.

शालीमोव (अस्वस्थपणे तिच्या हातांचे चुंबन घेत) : जेव्हा तुमच्या नजीक असतो तेव्हा मला भासतं की, अथांग आनंदसागराच्या काठाशी मी उभा आहे. लोखंडात चुंबकाची शक्ती जशी घुसते, तशी लोकांच्या अंतरंगाचा भेद करण्याची जणू तुमच्यात अद्भुत शक्ती आहे. माझ्या मनात एक धीट, वेडा विचार येतोय. मला वाटतं की, जर तुम्ही... (स्वतःचे बोलणे थांबवून

ते सभोवार नजर टाकतात. वार्वारा त्यांच्याकडे लक्षपूर्वक पाहते.)

वार्वारा : जर मी ?.. काय ?

शालीमोव : वार्वारा मिखायलोवना, तुम्ही मला हसणार तर नाही ? मी सांगावं अशी तुमची इच्छा आहे ?

वार्वारा : नाही ... मी समजले ... तुमच्या प्रणयाराधनात फारशी सूक्ष्मता नाही ...

शालीमोव (गोंधळून) : नाही, तुम्हाला समजलं नाही ! तुम्ही ...

वार्वारा (सरळपणे, खिन्न हळू आवाजात) : तुमची पुस्तकं वाचली तेव्हा तुमच्यावर किती उत्कट प्रेम करत होते मी ! किती आतुरतेनं तुमची वाट पहात होते ! एका साहित्यिक समारंभात तुम्ही वाचन केलं होतं तेव्हा मला तुम्ही फार बुद्धिमान, समंजस भासला होतात. त्यावेळी मी सतरा वर्षांची होते. तेव्हापासून ते तुमची आता प्रत्यक्षात भेट होईपर्यंत एखाद्या तेजस्वी ताऱ्याप्रमाणं तुमची प्रतिमा माझ्या हृदयात वसली होती. एखाद्या ताऱ्याप्रमाणं !

शालीमोव (हळू आवाजात मान खाली घालून) : ऐका ... नका बोलू ! मी क्षमा मागतो !

वार्वारा : ह्या गलिच्छ जीवनाचा भार असह्य झाला म्हणजे मी तुमची आठवण करायची आणि मग जीवन सुसह्य व्हायचं. काहीतरी एक आशा होती ...

शालीमोव : मन मोठं करा ! समजून घ्यायचा प्रयत्न करा !

वार्वारा : आणि तुम्ही उगवलात ! इतरांसारखेच ठरलात ! चारचौघांसारखेच ... ह्याचं दुःख झालं ! काय घडलं तुमच्या आयुष्यात ? स्वतःच्या मनाची खंबीरता जपून ठेवणं शक्य होत नाही ?

शालीमोव (उत्तेजित होत) : मला सांगा – इतर माणसांपेक्षा माझ्याकडून तुम्ही वेगळ्या अपेक्षा का बाळगता ? माझ्या बाबतीत वेगळे मापदंड का लावता ? तुम्ही सगळे मन मानेल तसं जगता आणि मी लेखक म्हणून तुमच्या इच्छांप्रमाणं जगायचं होय ?

वार्वारा : असं नका बोलू ! नका ! टाकून द्या माझं फूल ! इतर माणसांपेक्षा उत्तम, श्रेष्ठ समजलेल्या माणसाला मी ते दिलं होतं. टाकून द्या माझं फूल ! (चटकन जाते.)

शालीमोव (तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात) : खड्ड्यात गेलं ! (फूल चुरगाळतो.) नागीण ! (अस्वस्थपणे रुमालाने चेहरा पुसत वार्वारा गेली त्याच दिशेने जातो. दूदाकोव आणि ओल्गा डाव्या बाजूने राईतून घाईघाईने येतात.)

झामीस्लोव (राईत गातो) : "हे निशे, पांघर लौकर ..."

यूलीया (त्याच्या सुराशी सूर मिसळत) : "... तुझं गडद पारदर्शी वस्त्र ..."

क्लास (राईत) : अहो, बसा ना !

दूदाकोव : बघ ... थोडक्यात उशीर टळला !

ओल्गा : मी खूप दमलेय ! माझ्या लाडक्या किरिल ... हा दिवस तू कधीही विसरू नकोस.

दूदाकोव : आणि तू स्वतःची आश्वासनं विसरू नकोस ! भावनांवर संयम राखत जा !

ओल्गा : माझ्या लाडक्या ! मला खूप आनंद झालाय ! आता आपलं आयुष्य फार छान होईल !

जातात. उजवीकडून पूस्तोबायका टोपली घेऊन येतो आणि जमिनीवर नजर फिरवत काहीतरी शोधू लागतो.

पूस्तोबायका : शी : ! सगळीकडं घाण करून ठेवलीय ! तुमच्यामागं नुसती घाणच राहणार ! धरतीचा सत्यानाश करतात ! (डावीकडे जातो.)

यूलीया (राईतून) : आणखी कोण आलं नाही ?

सोन्या (हाक मारते) : आई !

बासोव (मोठ्यांदा ओरडतो) : अहो आईसाहेब !

मार्या (डावीकडून येते. चेहरा थकलेला, नजर भांबावलेली) : मी इथं आहे सोन्या !

सोन्या (पळत येते) : चल आई, चल ! काय झालं ग तुला ?

मार्या : काही नाही ... मी पायी जाते ... जा, सांग, म्हणावं माझ्यासाठी थांबू नका. जा ...

सोन्या (एका बाजूला धावत जाते व तोंडावर हात ठेवून ओरडते) : आमच्यासाठी थांबू नका, तुम्ही जा ! आम्ही पायी येतो ... काय ? परत भेटू !

व्रोयेतोचिये (राईतून) : तुम्ही दमून जाल !

सोन्या : अच्छा !

मार्या : तू का नाही गेलीस त्यांच्याबरोबर ?

सोन्या : कारण तुझ्याबरोबर थांबले ...

मार्या : चल ...

सोन्या : नाही, आपण थोडा वेळ बसू या. आई, तुला उदास वाटतंय? माझी लाडकी आई! बैस... अस्सं! तुला मिठी मारू दे मला! अश्शी! आता बोल– काय झालंय तुला?

राईमधून हंशा, आरोळ्या, मोठमोठ्याने बोलण्याचे आवाज ऐकू येतात.

यूलीया (राईतून) : होडी फार हलवू नका!

झामीस्लोव : नको, गाणं नको म्हणायला! त्यापेक्षा वाजवा!

बासोव (तेथूनच) : संगीतवाले, पुढं बसा!

गिटार आणि मेंडोलिनच्या तारा छेडल्याचे आवाज.

क्लास (राईतून) : नि-घा-लो!

मार्या : सोन्या! माझ्या मुली! जर तुला कळलं असतं!

सोन्या (सरळपणे) : मला कळतं!

मार्या : तुला काहीही कळत नाही!

सोन्या : माझ्या आई! तुला आठवतं – मी लहान होते तेव्हा धडा समजला नाही म्हणून मूर्खासारखी भोकाड पसरायची आणि तू मला उराशी कवटाळून – ही अश्शी – डोलवत अंगाई गीत म्हणायचीस. (गाते.)

जो जो रे,
आई, जो जो रे!..

मला वाटतं, आता तुला धडा समजत नाही, माझ्या आई! जर तुझं त्याच्यावर प्रेम आहे...

द्वोयेतोचिये खो खो हसतात.

मार्था: सोन्या! चूप! तुला कसं समजलं?

गितार आणि मेंडोलिनची जुगलबंदी.

सोन्या: श्शू! स्वस्थ पडून रहा...

जो जो रे,
आई, जो जो रे!..

माझी आई फार चतुर आहे. तिनं मला सरळ, स्पष्ट विचार करायला शिकवलं. आई, तो फार छान पोरगा आहे–त्याला झिडकारू नको! आणि तुझ्या हाती तो आणखी चांगला होईल! एव्हाना तू एक चांगलं माणूस निर्माण केलं आहेस–आई, मी येडपट माणूस नाही ना? आता दुसऱ्याचं संगोपन कर...

मार्था: लाडके, हे शक्य नाही!

सोन्या: श्शू! तो माझा भाऊ होईल... तो रांगडा आहे, त्याला तू सौम्य बनवशील. तुझ्यात खूप नाजुक-पणा आहे... उत्साहानं काम करायला तू त्याला शिकव; जशी स्वत: काम करतेस, जसं मला काम करायला शिकवलंस. माझा तो छान स्नेही बनेल. आपण छान राहू! प्रथम तिघं... मग आपण चौघं होऊ... कारण, माझ्या लाडके, मी त्या वेडपट माक्सिमशी लग्न करणार आहे. आई, माझं त्याच्यावर प्रेम आहे. तो खूप छान आहे!

मार्था: सोन्या, माझ्या पोरी, तू सुखी होशील! तू नक्की सुखी होशील!

सोन्या: स्वस्थ पडून रहा आणि ऐक! आम्ही दोघं आमचा अभ्यास पुरा करू आणि मित्रत्वानं, समरशीत, छान जगू! आपण चौघं! धीट, प्रामाणिक चार माणसं!

मार्था: माझ्या लाडके! माझ्या आनंदा! आपण तिघं असू: तू, तुझा नवरा आणि मी. जर तो आपल्या-बरोबर असला, तर फक्त तुझा भाऊ म्हणून... माझा मुलगा म्हणून!

सोन्या: आणि आपण छान जीवन जगू! आपल्या जीवनाला आपण सुंदर बनवू! पण आता थोडी विश्रांती घे, आई. रडू नको!..

जो जो रे,
आई, जो जो रे!..

सोन्याचा कंठ गहिवरतो. दूरवरून गिटार आणि मेंडो-लिनचे आवाज ऐकू येत असतात.

पडदा

अंक चौथा

दुसऱ्या अंकाचे नेपथ्य. संध्याकाळ. सूर्य मावळून गेला आहे. पाईन वृक्षांखाली बासोव आणि सूस्लोव बुद्धिबळ

खेळत आहेत. व्हरांड्यात साशा टेबलावर रात्रीच्या जेवणाची मांडामांड करते आहे. राईत उजव्या बाजूने ग्रामोफोनचे कर्कश्य आवाज येत आहेत. घरात कालेरी-या पियानोवर काहीतरी करुण संगीत वाजवत आहे.

बासोव: आपल्या देशाला सद्हेतू असलेल्या माण-सांची गरज आहे. अशी माणसं उत्क्रांतीवादी असतात. ती घाई करत नाहीत.

सूस्लोव: उंट मारला...

बासोव: खुशाल मार!.. सद्हेतू असलेला माणूस जीवनामध्ये नकळत, हळूहळू बदल घडवतो. पण त्याचं कार्य तेवढंच कायमचं टिकतं.

दाचाच्या कोपऱ्यामधून दूदाकोव घाईने येतात.

दूदाकोव: ए... माझी बायको तुमच्याकडं नाही?

बासोव: तुमची – नाही! बसा, डॉक्टर.

दूदाकोव: शक्य नाही. घाईत आहे. शिक्षकाचा अहवाल छापण्यासाठी तयार करायचाय.

बासोव: मला वाटतं, गेली दोन वर्षं तुम्ही हा अहवाल तयार करता आहात ना?

दूदाकोव (जाता जाता): कारण मी एकटाच फक्त काम करतोय! माणसं खूप आहेत, पण काम करणारे कुणी नाहीत – का?

बासोव: हा डॉक्टर अगदी वेडपट आहे.

सूस्लोव: तुझी चाल.

बासोव: ठीक आहे... करतो चाल! तर मी म्हणत होतो: सद्हेतू मनात असला पाहिजे. एकलकोंडेपण

आपल्याला न परवडणारी चैन आहे. अकरा वर्षांपूर्वी मी ह्या भागात आलो ... माझ्यापाशी फक्त एक ब्रीफ-केस आणि एक गालीचा एवढ्याच वस्तू होत्या. ब्रीफकेस रिकामी होती आणि गालीचा पातळ होता. स्वतः मी हडकुळा होतो.

सूस्लोव : तुझा वजीर मारला!

बासोव : अरेच्चा! तुझ्या घोड्याची चाल माझ्या ध्यानात कशी आली नाही?

सूस्लोव : माणूस तत्त्वज्ञान घोटत बसतो तेव्हा नेहमी तो हरतो.

बासोव : सत्याचं सत्य – बदकं म्हणतात त्याप्रमाणं!

खेळात गढून जातात. राईच्या उजव्या बाजूने व्लास आणि मार्या येतात. त्यांना बुद्धिबळखेळाडू दिसत नाहीत.

मार्या (हळूच) : माझ्या छान बाळा! विश्वास ठेवा ... हे लौकरच नाहीसं होईल ... जाईल निघून! तेव्हा तुम्ही माझे मनःपूर्वक आभार मानाल!

व्लास (मोठ्यांदा) : फार अवघड जातंय मला, फार कठीण!

बासोव ऐकू लागतात आणि सूस्लोवना गप्प राहण्याची खूण करतात.

मार्या : निघून जा, इथून लौकर निघून जा! मी तुम्हाला वचन देते पत्र लिहिण्याचं! काम करा, जीवनात स्वतःचं स्थान शोधा, धीट बना, क्षुल्लक

अडचणींना घाबरून माघार घेऊ नका. तुम्ही छान आहात आणि माझं तुमच्यावर प्रेम आहे. होय, होय, मी प्रेम करते तुमच्यावर. (बासोव डोळे विस्फारतात. सूस्लोव हसऱ्या मुद्रेने त्यांच्याकडे पाहतात.) पण हे प्रेम तुम्हाला अनावश्यक आहे आणि मला भीती वाटते. मला ही कबुली द्यायला लाज वाटत नाही – मला भीती वाटते. तुमच्या मनातली ही भावना पटकन नाहीशी होईल आणि मी मात्र जसा काळ जाईल तशी तुमच्यावर जास्त जास्त प्रेम करू लागेन. ह्याची अखेर फार हास्यास्पद होईल... गलिच्छ होईल. निदान मला फार वेदनादायी होईल.

व्लास: नाही, मी शपथ घेतो...

मार्या: मला शपथांची गरज नाही.

व्लास: प्रेम संपलं तरी आदर कायम राहील.

मार्या: प्रेम करणाऱ्या स्त्रीला एवढं पुरं पडत नाही. शिवाय लाडक्या, केवळ वैयक्तिक जीवनात गुंतून रहायला मला शरम वाटते. कदाचित हे हास्यास्पद आणि अनैसर्गिक वाटेल, पण आपल्या काळात वैयक्तिक सुखाचा केवळ हव्यास धरणं लज्जास्पद ठरेल. जा, माझ्या मित्रा, जा! आणि लक्षात ठेवा – संकटक्षणी जेव्हा तुम्हाला स्नेह्याची गरज भासेल, तेव्हा माझ्यापाशी या. तुमचं मी अत्यंत लाडक्या मुलाप्रमाणं स्वागत करीन... अच्छा!

व्लास: तुमचा हात द्या! तुमच्यासमोर गुडघे टेकायची माझी इच्छा आहे. माझं फार प्रेम आहे तुमच्यावर! खूप रडावंसं वाटतंय... अच्छा!

मार्या : अच्छा, माझ्या लाडक्या! माझा सल्ला लक्षात ठेवा : कशालाही भ्यायचं कारण नाही ... कुणा-ढीसमोर वाकू नका ... कधीही!

क्लास : जातो मी ... माझ्या प्रेमा! माझ्या निखळ पहिल्या प्रेमा! आभारी आहे ... (मार्या चटकन राईत उजव्या बाजूला जाते. क्लास दाचाकडे जाऊ लागतो, त्याला बासोव आणि सूस्लोव दिसतात, त्यांनी सर्व ऐकल्याचे त्याला समजते; तो थांबतो. बासोव उठतात, झुकतात आणि काहीतरी बोलण्याच्या बेतात असतात. क्लास त्यांच्यापाशी जातो.) गप्प बसा! गप्प बसा! एकही शब्द नको! एक शब्द उच्चारू नका! (दाचाकडे जातो.)

बासोव (गोंधळून) : भलताच चिडलाय!

सूस्लोव (हसून) : काय? घाबरलास?

बासोव : नाही. असा कसा तो? मला माहीत होतं ... पण असल्या उदात्त भावना वगैरे असतील अशी कल्पना नव्हती ... विदूषक कुठले! (मोठमोठ्याने हसतात. सूस्लोवांच्या दाचाकडून यूलीया आणि झामीस्लोव येतात. यूलीया नवऱ्यापाशी येते व झामीस्लोव दाचाकडे जातो.)

सूस्लोव : कदाचित तिनं मुद्दाम तसं नाटक केलं असावं! पोराला घट्ट मुठीत धरून ठेवण्यासाठी ...

बासोव : अरे देवा! किती विनोदी, नाही?

सूस्लोव (कपाळाला आठ्या घालत) : धूर्त आहे बाई! फार वाईट डाव खेळली माझ्याशी. तुला ठाऊक आहे, तिच्या सल्ल्यावरून माझ्या काकांनी सगळे पैसे

देऊन टाकले ...

यूलीया : प्योत्र, तुझ्याकडं एक माणूस आलाय ...

बासोव (अडवून) : नाही, तुम्ही विचारा, आत्ता काय घडलं !

सूस्लोव : कोण आलंय ?

यूलीया (बासोवना) : काय झालं ? (नवऱ्याला) : कुणी कंत्राटदार. म्हणतोय, तातडीचं काम आहे. कुठंतरी, काहीतरी गडबड झालीय.

सूस्लोव (घाईने जात) : काय एकेक पीडा !

बासोव : तुम्ही कल्पना करा ... आम्ही बसलोय ... मी आणि तुमचा नवरा ... अचानक आल्या मार्या ल्वोवना ... (खो खो हसतात.) असं दिसतंय – त्यांचं प्रेमप्रकरण आहे !

यूलीया : कुणाचं ? माझ्या नवऱ्याचं आणि मार्या ल्वोवनाचं ? (हसते.)

बासोव : व्लासचं ! ह्या विदूषकाचं ...

यूलीया : हात्तिच्या, हेच होय ! पण तुमच्या जिभेच्या कृपेनं ही गोष्ट सर्वांना केव्हापासून ठाऊक झालीय !

बासोव : पण गंमत तपशीलांमध्ये आहे ...

दाचामागून हातात पुडकी घेतलेले द्वोयेतोचिये आणि न्यूमिन येतात.

द्वोयेतोचिये : रामराम ! वार्वारा मिखायलोवना घरात आहेत ? पहा मी कुणाला घेऊन आलो !

बासोव : अरे वा ! दूर भ्रमंती करून परतलात ...

नमस्ते ! छान दिसताय, कांती मस्त रापलीय उन्हात, थोडे बारीक झालाय ... कुठून आलात ?

च्यूमिन : दक्षिणेतून. पहिल्यांदाच समुद्र पाहिला ... नमस्ते, यूलीया फिलीप्पोवना !

यूलीया : एकूण तुम्ही छान दिसताय पावेल सेर्गेयेविच – मलासुद्धा समुद्रावर जावंसं वाटतंय.

द्वोयेतोचिये : मी घरात जातो ... (जाऊ लागतात.) निरोपाची भेट म्हणून तुला चॉकलेटं आणलीत, पुतणी-बाई.

बासोव :

> **मी सागर पाहिला ... आणि**
> **आधाशी नजरेनं त्याला मापलं,**
> **माझ्या आत्म्याचं बळ**
> **त्याच्यासमोर जोखलं ...**

असंच ना ? चला घरात, बायकोला खूप आनंद होईल !

च्यूमिन : तिथं फार छान ! मला वाटतं, केवळ संगीतामधून समुद्राची भव्यता आणि सौंदर्य उत्तम रीतीनं व्यक्त होतात. त्याच्यासमोर माणसाला स्वतःची क्षुद्रता जाणवते. चिरंतनासमोर माणूस खुजा भासतो त्याप्रमाणं.

दाचामागून वार्वारा येते.

बासोव : मी बुद्धिबळं गोळा करतो. वार्या, पावेल सेर्गेयेविच आले, तुला माहीत आहे ?

वार्वारा : ते आपल्याकडं आहेत ?

बासोव (तिच्यापाशी जात) : होय. आणि सुंदर शब्दांचा स्वतःचा खजिना आणखी भरून आलेत असं

दिसतं. वार्या, तुला काय सांगू! सूस्लोवबरोबर बसून बुद्धिबळ खेळत होतो, तेवढ्यात अचानक मार्या ल्वोवना आणि क्लास ... त्यांचं प्रेमप्रकरण आहे! (हसतात.) तू म्हणाली होतीस, तसं काही नाही म्हणून. पण प्रत्यक्षात तसंच आहे! साक्षात सत्य!

वार्वारा: सेर्गेइ, पुरे कर! तू काहीतरी घाण बोलशील अशी भीती वाटते.

बासोव: वार्या! मी अजून काहीच सांगितलं नाही ...

वार्वारा: मी तुला विनंती केली होती की, मार्या ल्वोवना आणि माझा भाऊ यांच्या संबंधात तू लक्ष घालू नकोस. पण तू सगळ्यांना सांगत सुटलास ... हे चांगलं नव्हे ... तुला समजत कसं नाही?

बासोव: झाली सुरवात! खरंच, तुझ्याबरोबर मी काहीच न बोलणं चांगलं!

वार्वारा: होय, तू एकूणच कमी बोललास तर बरं होईल आणि एकदातरी स्वतःच्या कृत्याबद्दल विचार कर. निदान एकदातरी तुझ्याबद्दल लोक काय बोलतात ते ऐक, सेर्गेइ!

बासोव: माझ्याबद्दल? मी वरच्या पातळीवरचा आहे. खुशाल कुणाला काय बोलायचंय ते बोलू देत! पण मला आश्चर्य वाटतं की, तू, वार्या, खुद्द माझी बायको ...

वार्वारा: तुझी बायको होण्याचा मान तुला वाटतो तेवढा मोठा नाही आणि हा मान मला फार जड जातोय.

बासोव (गोंधळून): वार्वारा, तू काय बोलतेस?

अन्न कसं बोलतेस?

व्हरांड्यात द्वोयेतोचिये आणि क्लास येतात.

वार्वारा: माझ्या मनात जे येतंय ते मी बोलतेय. तसंच मला जाणवतंय.

बासोव: मला समजावून सांग...

वार्वारा: ठीक आहे. मी नंतर समजावून सांगीन.

नाकाचा फुर्रर्र आवाज करून बासोव दाचाकडे जातात. क्लास त्यांच्याकडे तिटकाऱ्याने पाहतो, नंतर व्हरांड्यातल्या जिन्याच्या खालच्या पायरीवर बसतो.

द्वोयेतोचिये: वार्वारा मिखायलोवना, मी तुमच्यासाठी चॉकलेटं घेऊन आलोय.

वार्वारा: आभारी आहे.

द्वोयेतोचिये (व्हरांड्यातल्या पायरीवर बसत): मी सगळ्या बायकांसाठी चॉकलेटं आणलीत. म्हणजे त्या माझी प्रेमानं आठवण काढतील. तुमचं चित्र मला द्या!

वार्वारा: अग बाई... आत्ता आणते! (घरात जाते.)

द्वोयेतोचिये: मग काय, क्लासकाका, चलायचं आपण?

क्लास: लौकरात लौकर!

द्वोयेतोचिये: एक दिवसापेक्षा कमी अवधी उरलाय. खरंच! तुमच्या बहिणीला आपल्याबरोबर घ्यायला पाहिजे! इथं तिला करण्यासारखं काही नाही.

क्लास (खिन्नपणे): इथं कुणालाच करण्यासारखं काही नाही!

द्रोयेतोचिये : तुम्ही माझ्याबरोबर येताय ह्याचा मला खूप आनंद झालाय. आमचं शहर छोटं आहे, सुंदर आहे. भोवती रान, नदी... माझं घर प्रचंड आहे— दहा खोल्या! एका खोलीत खोकलास तर सगळीकडं आवाज घुमतो. हिवाळ्यात जेव्हा बाहेर वादळं होतात, तेव्हा घरात फार एकटं वाटतं! हं! (उजवीकडून सोन्या घाईघाईने येते.) तारुण्यात एकाकीपण माण-साला इष्ट असतं... पण म्हातारपणी दोघं असलेली जास्त चांगलं! ह्यॅ, ह्यॅ! ए चिटुकले!.. अच्छा! उद्या मी जातोय आणि परवा तुम्ही म्हाताऱ्याला विसरून जाल. जणू काही जगात तो नव्हताच असं!

सोन्या : नाही, विसरणार नाही. तुमचं आडनांव एवढं मजेदार आहे!

द्रोयेतोचिये : बस्स, एवढ्याचमुळं? पण त्याबद्दलही आभार!

सोन्या : अहो आजोबा, मी खरंच नाही विसरणार तुम्हाला! तुम्ही किती साधे, किती छान आहात! साधी माणसं मला फार आवडतात! पण... माझी आई तुम्हाला कुठं दिसली का?

द्रोयेतोचिये : त्यांना पाहण्याचा आनंद आज लाभला नाही!

क्लास : दाचावर त्या नाहीत. चला, शोधून काढू. कदाचित त्या नदीजवळच्या उन्हाळी घरात असतील.

कालेरीया : मी तुमच्याबरोबर आले तर काही हरकत आहे तुमची?

सोन्या : खुशाल चला.

तिघे राईत जातात. द्रोयेतोचिये त्यांच्या पाठमोऱ्या आकृतींकडे पाहतात, सुस्कारा टाकतात आणि गाणे गुणगुणू लागतात. वार्वारा हातात फोटो घेऊन येते. तिच्यापाठोपाठ न्यूमिन.

वार्वारा: हा घ्या माझा फोटो! केव्हा जाताय तुम्ही?

द्रोयेतोचिये: उद्या. स्वाक्षरीबद्दल आभार! मी साक्षात तुमच्या प्रेमात पडलोय!

वार्वारा: कशाबद्दल माझ्या प्रेमात पडायचं?

द्रोयेतोचिये: प्रेमात पडायला काही कारण लागतं? बास्स – प्रेमात पडलो! सूर्य जसा आकाशात कशाच्या आधारावर तरंगतो ते माहीत नाही, तसंच अस्सल प्रेमाचं आहे.

वार्वारा: मला ठाऊक नाही बाई.

द्रोयेतोचिये: मला दिसतंय, तुम्हाला ठाऊक नाही... चला, या माझ्याकडं. तुमचा भाऊ येतोय. काहीतरी काम सापडेल तुम्हाला तिथं.

वार्वारा: मी काय काम करणार? मला काहीही येत नाही!

द्रोयेतोचिये: काम करायला शिकला नाहीत, म्हणून येत नाही. शिका! मी आणि क्लास दोन शाळा बांधणार आहोत – एक मुलांसाठी आणि एक मुलींसाठी...

न्यूमिन (विमनस्कपणे): जीवनाला अर्थ येण्यासाठी काहीतरी मोठं, उपयुक्त काम केलं पाहिजे. आपल्या खुणा शतकानुशतकं मागं राहतील असं! कसलीतरी मंदिरं उभारली पाहिजेत...

द्रोयेतोचिये : हे पंडिती शहाणपण माझ्या आवाक्या-पलिकडचं आहे. ह्या शाळांची कल्पनासुद्धा माझी नव्हे. एका भल्या व्यक्तीनं माझ्या टाळक्यात हा विचार भरवला.

न्यूमिन : अत्यंत उच्च शिक्षणसंस्थासुद्धा आपल्याला फक्त परस्परविरोधी सिद्धांत देतात, जीवनाच्या गूढां-विषयी नुसते तर्क देतात.

वार्वारा (चिडून) : देवा रे! किती कंटाळवाणं हे! किती क्षुल्लक आणि सामान्य!

न्यूमिन (सगळ्यांकडे पाहतो आणि विचित्र, हळू हसतो) : होय, मला माहीत आहे. हे मृत शब्द शरदातल्या पानगळीसारखे आहेत. सवयीपायी मी त्याचा उच्चार करतो. कारण माहीत नाही, पण कदाचित शरदाचा मोसम सुरू झाला म्हणून! सागराचं दर्शन घेतल्यापासून हिरव्या लाटांची बारीक कुजबूज सतत माझ्या मनात गुंजतेय. त्या संगीतात माणसांचे सर्व शब्द बुडून जात आहेत. समुद्रात पावसाचा थेंब मिसळून जावा तसे!

वार्वारा : तुम्ही काहीतरी विचित्र वागता आहात. काय झालंय तुम्हाला?

राईच्या उजव्या बाजूने कालेरीया आणि व्लास येतात.

न्यूमिन (हसून) : काहीही नाही ... खरंच!

कालेरीया : तुमच्या पायांवर भक्कम उभं रहायचं, म्हणजे गुडघाभर चिखलात उभं रहायचं?

व्लास : हवेत टांगून रहायला तुम्हाला आवडेल?

स्वतःचे कपडे आणि स्वतःचे मन स्वच्छ राखायचं, एवढीच तुमची चिंता? पण कुणाला पाहिजे तुमच्या-सारखी स्वच्छ आणि थंडगार?

कालेरीया: मी स्वतःला हवीय!

व्लास: गैरसमज होतोय! तुम्हाला स्वतःलासुद्धा तुम्ही नकोशा आहात.

कालेरीया: तुमच्याशी बोलायची माझी इच्छा नाही. तुम्ही अशिष्ट आहात! (चटकन घरात जाते.)

द्वोयेतोचिये: मग काय, व्लासकाका? तरुणीचा अपमान करून खूष झालात?

व्लास (बहिणीच्या पायांशी खालच्या पायरीवर बसून): वीट आलाय तिचा मला! (तिची नक्कल करून.) हाय, मी कंटाळ्यापायी मरतेय! मी तिला सांगितलं – लोकांबरोबर जगलं पाहिजे आणि एकट्यानं मेलं पाहिजे!

त्यूमिन (पटकन): बरोबर! कठोर आहे, पण सत्य! अगदी बरोबर!

बासोव आणि यूलीया व्हरांड्यात येतात.

वार्वारा (स्वतःशीच): आपल्या अंतःकरणांना स्पर्श न करता आयुष्य आपल्याजवळून जातंय – फक्त आपल्या विचारांना ढवळून!

बासोव: वार्या, मी साशाला सांगितलंय की, रात्रीच्या जेवणाची व्यवस्था इथं कर. (सूस्लोव स्वतः-च्या दाचाकडून घाईघाईने येतात.) सेम्योन सेम्योनो-

विच, आम्ही तुम्हाला छोटासा निरोप देतो. शँपेन प्यायला कायदेशीर निमित्त!

द्वोयेतोचियेः मी फार हेलावून गेलोय!

सूस्लोवः यूलीया, जरा एक मिनिट...

यूलीयाः काय झालं?

सूस्लोव बायकोला बरोबर घेऊन जातात आणि वाटेत तिच्या कानात काहीतरी हळूच सांगतात. ती दचकून एकदम दूर होते व थांबते. ते तिचा हात धरून उजवीकडे नेतात. तेथे काही मिनिटेपर्यंत बोलतात आणि बासोव निघून गेल्यावर व्हरांड्याकडे परततात.

बासोवः मंडळी, मी तुम्हाला उत्तम सॉसेजेस देणार आहे! युक्रेनमधल्या माझ्या एका अशीलानं पाठवलीत. माझा मदतनीस कुठं आहे? (हळूच.) तो यूलीया फिलीप्पोवनाच्या नवऱ्याचासुद्धा मदतनीस बनलाय.

वार्वारा (संतापून, हळूच): सेर्गेइ! किती घाणेरडेपणा!

बासोव (समर्थन करीत): पण सर्वांना माहीत आहे, वार्या! तू निष्कारण अशी एकदम... साशा! (घरात जातो.)

यूलीया (दुष्टपणे): काकासाहेब! प्योत्रनं नुकतीच बांधलेली तुरुंगाची भिंत कोसळली... दोन कामगार गाडले गेले!

सूस्लोव (किंचित हसून): आनंद वाटला ना?

वार्वारा (घाबरून): काय म्हणताय? कुठं घडलं?

सूस्लोवः एका छोट्या तालुक्याच्या गावी.

द्रोयेतोचिये : अभिनंदन ! वा रे तरुणमंडळी ! बांधकामाच्या जागी एकदा तरी गेला होतास ?

सूस्लोव : गेलो होतो ... त्या हरामखोर कंत्राटदाराची चूक !

यूलीया : खोटं ! एकदाही गेला नव्हता ... त्याला कधी वेळच नसतो !

द्रोयेतोचिये : चाबकाचे फाटके मारले पाहिजेत ! काय माणसं तरी ! काम न करता जगतात !

सूस्लोव (किंचित हसून) : मी स्वतःवर गोळी झाडून घेतो ! काम होईल !

न्यूमिन (नकारार्थी मान हलवत) : तुम्ही – कधीही गोळी झाडून घेणार नाही !

सूस्लोव : अचानक झाडली तर ?

वार्वारा : त्या गाडलेल्या कामगारांचा काय झालं ? मेले ?

सूस्लोव (कपाळाला आठ्या घालून) : माहीत नाही ... उद्या जाईन तिकडं .

ओल्गा येते .

व्लास (मोठ्यांदा नाराजीने) : किती नीचपणा !

सूस्लोव (दात आवळून) : हळू , तरुण माणसा , हळू !

ओल्गा (जवळ येत) : नमस्ते ! अगदी शरदामधल्या पक्ष्यांप्रमाणं बसला आहात . आज मी सगळ्यांना भेटले का ? अगबाई , पावेल सेर्गेयेविच ! केव्हा आलात ?

सूस्लोव परत पत्नीसह थोडे दूर जातात आणि तिला काहीतरी सांगतात. त्यांचा चेहरा संतापलेला. यूलीया उपहासाने झुकून अभिवादन करते आणि व्हरांड्याकडे परतते. सूस्लोव मोठ्यांदा शीळ घालत स्वत:च्या दाचा-कडे जातात. यूलीयाकडे एक दृष्टिक्षेप टाकून द्वोयेतो-चिये सूस्लोव यांच्या पाठोपाठ जातात.

न्यूमिन: आजच आलो.

ओल्गा: आणि एवढ्यात इथं? तुम्ही खरे मित्र. किती घुसमटतंय! लौकरच शरदाचा मोसम सुरू होईल... शहरात रहायला जाऊ आणि तिथं दगडाच्या भिंतींमध्ये एकमेकांपासून आणखी दूर जाऊ, परके बनू...

व्लास (नाराजीने): परत तक्रारी सुरू झाल्या...

बासोव (व्हरांड्याच्या दारातून): पावेल सेर्गेयि-विच, एक क्षणभर!..

ओल्गा (व्लासला): हे खरं नाही का?

न्यूमिन हाकेच्या दिशेने जातो. त्याला कालेरीया आणि शालीमोव भेटतात. ओल्गाला उत्तर न देता व्लास पाईनच्या झाडांकडे जातो.

शालीमोव (कंटाळवाण्या तिऱ्हाईतपणे): लोकशाही-पासून खूप मोठ्या अपेक्षा बाळगताहेत, पण मी विचारतो, ह्या, लोकशाहीवादी नामक जनावराला कोण ओळखतो?

कालेरीया (उसळून): होय, होय! तुमचं हजार वेळा बरोबर आहे... अजून तो जनावर आहे,

गनटी ! त्याची जाणीवपूर्वक इच्छा एकच – आकंठ न्यायची !

शालीमोव : आणि करकर वाजणारे बूट घालतो.

कालेरीया : त्याची श्रद्धा कशावर ? कोणता संप्रदाय त्याचा ?

व्लास (चिडून) : आणि तुम्ही ? तुमची कशावर श्रद्धा आहे ? तुमचा कोणता संप्रदाय ?

कालेरीया (व्लासला उत्तर न देता) : श्रद्धाळू लोक नव्या जीवनाची फुंकर घालत आहेत. उच्चभ्रू भावनेचे !

व्लास : कोण हे उच्चभ्रू ? कुठं आहेत ?

कालेरीया : मला तुमच्याशी बोलण्याची इच्छा नाही, व्लास. याकोव पेत्रोविच, चला तिकडं ...

व्हरांड्यातून उतरतात आणि देवदाराच्या झाडांखाली बसून हळू आवाजात बोलू लागतात. कालेरीया अस्वस्थ हालचाली करते. शालीमोव शांत, संथपणे वागतात जणू काय ते खूप दमले आहेत.

वार्वारा (व्लासपाशी जात) : आज तू फारच संतापला आहेस व्लास !

व्लास (मंदपणे) : मला खूप त्रास होतोय, वार्या.

यूलीया : व्लास मिखायलोविच, चला नदीवर ...

व्लास : नाही ... माफ करा ! इच्छा नाही !

यूलीया : चला ना ! मला तुम्हाला काहीतरी सांगायचंय ...

व्लास (अनिच्छेने) : ठीक आहे, चला. काय भानगड आहे ?

यूलीया त्याचा हात धरते आणि रंगभूमीच्या मागील भागात जाताना त्याच्या कानात काहीतरी सांगते. वार्वारा व्हरांड्यात जाते.

ओल्गा (वार्वाराचा हात पकडून) : वार्या ! अजून तुझा माझ्यावर राग आहे ?

वार्वारा (विचारमग्न होत) : राग ? नाही.

व्लास (रंगभूमीच्या मागील भागात, मोठ्यांदा) : नालायक ! जर तो माझ्या बहिणीचा नवरा नसता...

यूलीया : श्शू: ! (त्याला राईत घेऊन जाते.)

वार्वारा (घाबरून) : बाई ग ! काय झालं ?

ओल्गा : बहुधा, इंजिनिअरची बायको काहीतरी चुगल्या सांगतेय. वार्या, मला तर अजून तू रागावलेली दिसतेस ! रागाच्या भरात माणसाच्या तोंडून चुकून वावगे शब्द उमटतात हे तू समजून घेतलं पाहिजेस.

वार्वारा (विचारमग्न होत) : तुला हात जोडते – थांबव हा विषय ! ठिगळं लावलेलं मला काही आवडत नाही... मैत्रीसुद्धा !

ओल्गा (उठते) : किती राग ठेवतेस मनात ! विसरणं शक्य नाही काय ? निदान, क्षमा करणं !

वार्वारा (ठाम, थंड सुरात) : आपण फार गोष्टींना क्षमा करतो. हा दुबळेपणा. एकमेकांबद्दलचा आदर त्यामुळं नष्ट होतो. एका माणसाला मी खूप खूप क्षमा केली... आता मी त्याच्या दृष्टीनं शून्य किंमतीची ठरलेय !

ओल्गा (थोडा वेळ स्तब्ध राहून) : सेर्गेइ वासिल्ये-

विचांबद्दल तू बोलतेस? (वार्वारा उत्तर देत नाही. मान हलवून दूर शून्यात पहात राहते.) किती लौकर बदलतात माणसं! ते विद्यार्थी होते तेव्हाचे मला आठवतात... किती छान होते! गरीब, आनंदी आणि बेफिकीर! अगदी आपला माणूस! पण तू मात्र फारशी बदलली नाहीस: तशीच विचारात गढलेली, गंभीर, कडक... जेव्हा तू त्याच्याशी लग्न करणार हे समजलं तेव्हा किरिल म्हणाल्याचं मला आठवतं: अशा बायकोबरोबर सेर्गेइ कधीही वाकड्या वाटेला जाणार नाही. तो चंचल आणि ग्राम्यतेकडं झुकणारा आहे, पण ती...

वार्वारा (सरळपणे): कशाला हे बोलतेस तू ओल्गा? मला दाखवून द्यायला – किती निःष्प्रभ ठरलेय मी?

ओल्गा: वार्या! असा कसा विचार येतो तुझ्या मनात? मी आपली सहज आठवण केली...

वार्वारा (हळू आवाजात, जणू शिक्षा फर्मावावी अशा स्पष्ट शब्दात): होय, मीसुद्धा दुबळी, करुण आहे. तुला हेच सांगायचं होतं? मला हे ठाऊक आहे ओल्गा, फार पूर्वीपासून ठाऊक आहे.

साशा (व्हरांड्यात): वार्वारा मिखायलोवना, साहेब तुम्हाला बोलावताहेत.

वार्वारा मुकाट घरात जाते.

ओल्गा (वार्वारापाठी जात): वार्वारा, ऐक! तुला समजलं नाही!

कालेरीया (हळू) : सत्य जाणलं असं मानणारा माणूस माझ्या दृष्टीनं मेलेलाच होय ! (स्तब्धता. शालीमोव धूम्रपान करतात.) सांगा मला, तुम्हाला जगायचं ओझं वाटतं ?

शालीमोव : काहीवेळा – फार !

कालेरीया : वारंवार वाटतं असं ?

शालीमोव : मजेत जगणं कधी घडतच नाही. मी एव्हाना एवढं काही पाहिलंय, की आता आनंदच होत नाही. आणि सरळ सांगतो, सध्याचा काळ मजेचा राहिलाच नाही.

कालेरीया (हळू) : विचार करणाऱ्या प्रत्येक माणसाचं जीवन – एक शोकमय नाटक.

शालीमोव : होय ... मला सांगा ...

कालेरीया : काय ?

शालीमोव (उठत) : स्पष्टपणं सांगा – माझ्या कथा तुम्हाला आवडतात ?

कालेरीया (उत्साहाने) : खूप ! विशेषतः अलीकडच्या ... त्या फारशा वास्तववादी नाहीत, त्यांच्यात कमी भरीवपणा आहे ! उदासीनतेच्या नाजुक धुक्याचं त्यांच्यावर आवरण आहे. सूर्यास्तावेळी ढग जसे सूर्याला झाकोळून टाकतात, तशा त्या काळजाला झाकोळून टाकतात. त्यांचं खरं मोल फार थोडे जाणतात, पण हे थोडे तुमच्यावर नितांत प्रेम करतात.

शालीमोव (स्मित करत) : आभारी आहे तुमचा. तुम्ही नव्या कवितांबद्दल बोलला होतात ... वाचून दाखवणार का ?

कालेरीया : दाखवीन. नंतर कधीतरी. (स्तब्धता. शालीमोव होकारादाखल मुकाट मान झुकवतात. राईतून उजव्या बाजूने व्लास आणि यूलीया विचार-मग्नतेने येतात व पाईनच्या झाडांपाशी जातात. व्लास टेबलापाशी बसतो, त्यावर कोपर टेकतो आणि हळू शीळ वाजवू लागतो. यूलीया घरात जाते.) इच्छा आहे – आत्ता ?

शालीमोव : काय – आत्ता ?

कालेरीया (खिन्न स्मित करत): एवढ्यात विसरलात ?.. किती पटकन !

शालीमोव (भुवया आकुंचित करत): जरा थांबा... काय बरं...

कालेरीया (उठत): तुम्ही मला माझ्या कविता वाचून दाखवायला सांगितलं होतंत... इच्छा असली तर आत्ता वाचू ?

शालीमोव (घाईने): अरे हो, खरंच वाचा ! संध्याकाळ एवढी रम्य आहे... फार मजा येईल ! तुमची चूक होतेय, मी विसरलो नव्हतो... फक्त विचारात गढलो आणि प्रश्न समजला नाही.

कालेरीया (घराकडे जात): ठीक आहे... मी वाचून दाखवते. अर्थात तुम्हाला त्यांच्यात मुळीच रस नाही हे मला ठाऊक आहे.

शालीमोव (तिच्या जाणाऱ्या आकृतीकडे पहात): हे खरं नाही, विश्वास ठेवा माझ्यावर.

कालेरीया धावत व्हरांड्यात जाते. शालीमोव खांदे

30*

उडवून वाकडे तोंड करतात. भोवती पाहतात तेव्हा क्लास दिसतो. सूस्लोवांच्या दाचाकडून सूस्लोव आणि द्वोयेतोचिये येतात. दोघेही संतापलेले, गप्प.

शालीमोव (क्लासला): स्वप्नरंजन चाललंय?

क्लास (सौम्यपणे): शीळ वाजवतोय.

व्हरांड्यात येतात: ओल्गा – कठड्याजवळच्या एका वेताच्या खुर्चीत बसते; च्यूमिन – तिच्यापाशी उभा राहतो व ती हळू आवाजात त्याला काहीतरी सांगते; बासोव – टेबलापाशी जाऊन खाद्यपदार्थांची पाहणी करतात; वार्वारा व्हरांड्यातल्या एका गोल खांबाला टेकून उभी राहते. झामीस्लोव तिच्या पुढ्यात.

बासोव: सगळे आले? क्लास? मार्या ल्वोवना?

क्लास: मी इथं आहे.

झामीस्लोव: आम्ही सगळी अवघड माणसं आहोत, वार्वारा मिखायलोवना.

बासोव (कठड्यावरून वाकून पहात): उत्तम! याकोव, तू इथं आहेस? छान!

हळू गाणे गुणगुणत यूलीया घरातून बाहेर येते व व्हरांड्याच्या पायरीवर बसते. झामीस्लोवचे बोलणे ऐकत द्वोयेतोचिये उभे राहतात. वक्त्याकडे एकदा नजर टाकून सूस्लोव पाईन वृक्षांपाशी गप्प बसून राहिलेल्या शालीमोव व क्लासकडे जातात.

झामीस्लोव: केवळ आमच्या मानसिक प्रक्रिया

गुंतागुंतीच्या आहेत म्हणून आम्ही देशातले उत्तम लोक ठरतो – बुद्धिजीवी ठरतो. आणि तुम्ही ...

वार्वारा (अस्वस्थपणे) : आपण बुद्धिजीवी नव्हे! आपण वेगळेच आहोत. आपण आपल्या देशातले दाचावाले! प्रवासी माणसं! आपण जीवनात आरामशीर जागा शोधत राहतो. आपण काहीही करत नाही आणि किळस यावी इतकं बोलत राहतो.

उजव्या बाजूने रंगभूमीच्या मागील भागातून मार्या ल्वोवना आणि सोन्या येतात.

बासोव (उपहासाने) : तुझ्या शब्दांचा खरेपणा तू स्वतःच विशेष ठळकपणानं सिद्ध करते आहेस.

कालेरीया कवितांची वही घेऊन येते. टेबलापाशी थांबते आणि ऐकू लागते.

वार्वारा (संतापून) : आणि आपल्या संभाषणांमध्ये भयानक खोटेपणा भरलेला असतो! एकमेकांपासून मानसिक दारिद्र्य लपवण्यासाठी आपण सुंदर सुंदर वाक्यांची वस्त्रं पांघरतो, ज्ञानाच्या भपकेबाज पुस्तकांआड दडतो. आयुष्याला प्रत्यक्षात जाणून न घेता त्याच्या शोकांतिकेबाबत बोलतो. तक्रारी करण्यात आणि कण्हत बसण्यात आनंद मानतो.

दूदाकोव व्हरांड्यापाशी येतात आणि स्वतःच्या बायकोच्या दृष्टीला पडणार नाही अशा बेताने उभे राहतात.

र्‍यूमिन (बेचैनपणे) : हे बरोबर नाही. तक्रारीत माणसाचं सौंदर्य दडलंय. वार्वारा मिखायलोवना, माण-

साच्या शोकाच्या प्रामाणिकतेबद्दल शंका घेणं क्रूरपणाचं आहे.

वार्वारा : तक्रारी खूप झाल्या ! गप्प राहण्याचं धैर्य बाळगा ! स्वतःच्या क्षुल्लक दुःखांबाबत मौन पाळलं पाहिजे. जेव्हा आपण आयुष्याबाबत समाधानी असतो तेव्हा गप्प राहणं आपल्याला जमतं ना ? आपल्यापैकी प्रत्येकजण स्वतःचं सुख एकाकीपणानं भोगतो. पण स्वतःची दुःखं आणि वेदना मात्र रस्त्यावर मांडतो, सगळ्यांना दाखवतो. सबंध जगभर आरडा-ओरडा आणि रडारड करून स्वतःच्या वेदनांचा डांगोरा पिटतो. आपल्या घरांमधली घाण बाहेर फेकून शहरची हवा दूषित करतो. त्याच पद्धतीनं आपल्या मनातली घाण आपल्या नजीकच्या माणसांच्या पायांपाशी फेकतो. माझी खात्री आहे की, आपल्या तक्रारींपायी आणि शोकापायी शेकडो-हजारो निकोप माणसं विषबाधा होऊन आणि गुदमरून मरत आहेत. आपल्या वैयक्तिक जखमांचं हिडीस प्रदर्शन करण्याचा अधिकार कुणी दिला ?

स्तब्धता.

व्लास (हळूच) : शाबास, वार्या !

द्वोयेतोचिये : खरंच, हुषार आहे.

मार्या मूकपणे वार्वाराचा हात गोंजारते. व्लास आणि सोन्या तिच्यापाशी उभे आहेत. न्यूमिन अस्वस्थपणे मानेला झटका देतो.

न्यूमिन : मला बोलायचंय ! अखेरचं एकदाच मला बोलायला परवानगी द्या !

कालेरीया : मौन बाळगायचं धैर्य पाहिजे.

ओल्गा (बासोवला) : किती धीटपणं आणि कठोरपणं वार्वारा बोलायला लागलीय!

बासोव : होय, प्रेषित बालामची गाढवीण बोलली... (घाबरून पटकन स्वतःच्या तोंडावर हात ठेवतात. वार्वाराला उत्तेजित मनःस्थितीमुळे नवऱ्याचे उद्‌गार ऐकू जात नाहीत, पण बाकीच्यांच्या लक्षात येते. झामीस्लोव घाईघाईने व्हरांड्यातून बाहेर जातो आणि खो खो हसतो. शालीमोव स्मित करतात आणि नापसंतीने मान हलवतात. व्लास आणि सोन्या बासोव यांच्याकडे संतापाने पाहतात. बाकीचे न ऐकल्याचा बहाणा करतात. ताणलेली शांतता. सूस्लोव खोकतात आणि स्मित करतात. काहीतरी बिनसल्याचे ध्यानात येऊन वार्वारा चिंतायुक्त मुद्रेने सभोवार पाहते.)

वार्वारा : मला वाटतं, मी काहीतरी तोडून, असभ्य बोलले? सगळे असे विचित्र का वागताहेत?

व्लास (मोठ्यांदा) : असभ्य तू नाही बोललीस...

ओल्गा (भाबडा चेहरा करत) : काय झालं मंडळी?

मार्या (घाईने, हळुवार आवाजात) : व्लास, कृपा करा! नको! (बासोवांच्या शब्दांचा परिणाम नाहीसा करण्यासाठी बोलायला आरंभ करते. नंतर रंगात येऊन ठामपणे, तावातावाने बोलू लागते, शालीमोव, सूस्लोव आणि झामीस्लोव उघडपणे तिचे बोलणे ऐकत नाहीत. दूदाकोव संमतीदर्शक मान हलवतात. बासोव कृतज्ञतेने तिच्याकडे पाहतात आणि इतरांना खुणा करून ऐकायला सांगतात.) मंडळी, आपण सगळ्यांनी

वेगळं असलं पाहिजे. आपण धोब्यांची, स्वयंपाकीणींची मुलं – धडधाकट कामगारांची मुलं! आपण इतरांपेक्षा वेगळं असलंच पाहिजे! आपल्या देशात यापूर्वी सुशिक्षित माणसं कधीही जनसामान्यांशी रक्ताच्या नात्यानं बांधली गेली नव्हती. ह्या रक्ताच्या नात्यानं आपल्यामध्ये जोरदार इच्छा निर्माण केल्या पाहिजेत – आपल्या सग्यासोयऱ्यांच्या जीवनात सुधारणा घडवून त्यांचं जीवन तेजस्वी आणि विशाल करण्याच्या. सारा दिवस ही माणसं अंधारात आणि घाणीत राहून केवळ राबताहेत. करुणेपायी किंवा उपकाराखातर त्यांच्या जीवनाला सुधारण्याचा आपण प्रयत्न करू नये, तर आपल्यासाठी, नतद्रष्ट अलगता नाहीशी करण्यासाठी, आपण आणि आपले सगेसोयरे यांच्यातली प्रचंड दरी नष्ट करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. त्यांच्या श्रमांवर जगणाऱ्या त्यांच्या शत्रूंकडे ते ज्या नजरांनी पाहतात, त्याच नजरांनी उंचावर उभ्या असलेल्या आपल्याकडं पाहताहेत. अधिक चांगल्या जीवनाचा रस्ता शोधण्यासाठी त्यांनी आपल्याला आधी पाठवलंय. पण आपण पुढं आलो आणि वाट हरवली. आपणच स्वतःला एकाकी बनवलं, काळज्या आणि अंतर्गत विरोध निर्माण केले. ही आपली शोकांतिका! पण ती आपणच निर्माण केलीय. आपल्या यातनांना आपणच जबाबदार आहोत. खरंच वार्या! आपल्या कण्हण्या-कुंथण्यानं जीवन दूषित करण्याचा आपल्याला हक्क नाही.

थकून वार्वाराशेजारी खाली बसते. स्तब्धता.

दूदाकोव (सर्वांवर नजर टाकत) : बरोबर ! हे सत्य !

ओल्गा (घाईने) : तू इथं ? इकडं ये ...

शालीमोव (टोपी उचलून) : तुमचं बोलणं संपलं मार्या ल्वोवना ?

मार्या : हो .

ओल्गा (व्हरांडयाच्या कोपऱ्यात नवऱ्याला घेऊन जात) : तू ऐकलंस ? समजलं ? किती मूर्ख ब्रासोव !

दूदाकोव (हळूच) : इथं बासोवचा काय संबंध ?

व्हरांड्यात हालचाली . वार्वारा सगळ्यांकडे पाहते . बासोवच्या उद्गारांचा परिणाम नाहीसा झाला अशी कुणाची अजून खात्री नाही .

ओल्गा : हळू ! इथं वार्वारा खूप तावातावानं बोलली आणि तो तिला बालामची गाढवीण म्हणाला .

दूदाकोव : मठ्ठ आहे लेकाचा ! ओल्गा , तिकडं घरी ...

ओल्गा : थांब ! कालेरीया कविता वाचणार आहे . एकूण छानच झालं ! खरंच छान झालं ! वार्वारा फारच गर्विष्ठ बनलीय .

र्‍यूमिनला ताण असह्य होतो . तो व्हरांड्यातून खाली उतरतो व जवळच येरझाऱ्या मारू लागतो .

शालीमोव : मंडळी , कालेरीया वासिल्येवना आपल्या आग्रहाला मान देऊन स्वतःच्या काही कविता वाचून दाखवत आहेत .

बासोव : वाच, लाडके, लौकर!

कालेरीया (शरमून) : ठीक आहे, मी वाचते...

शालीमोव : तुमच्यासाठी खुर्ची.

कालेरीया : गरज नाही. वार्या, कशामुळं माझ्यावर ही जबाबदारी? माझ्या कवितांबाबत एवढी आस्था अचानक निर्माण झालेली बघून मी बावरून गेलेय!

वार्वारा : मला माहीत नाही. बहुधा कुणीतरी काही-तरी अविचारी शेरा मारला असावा आणि त्यावर पांघरुण घालायची प्रत्येकाची धडपड चाललीय.

कालेरीया : तर मी वाचते. वार्या, तुझ्या शब्दांचं जे झालं, तेच नशीब माझ्या कवितांना लाभणार आहे. आपल्या जीवनाच्या चिखलात सगळं शोषून घेतलं जातंय...

शरदानं घातलेल्या फुंकरीनी
थंड आकाशातून सावकाशपणं
सुंदर हिमकण कोसळताहेत,
जणू छोटी, कोमेजलेली फुलं...

घाणेरड्या, शिणलेल्या आणि आजारी
धरतीवर भिरभिरते हिमकण
हलकेच नाजुक पांघरुण घालताहेत
शुभ्र, स्वच्छ बाळलेण्यासारखं...

काळे, विचारमग्न पक्षी...
मेलेली झाडं आणि झुडुपं...
शुभ्र, मुके हिमकण
थंड आकाशातून कोसळताहेत...

स्तब्धता. कसल्यातरी अपेक्षेनं सर्वजण कालेरीयाकडे पाहतात.

शालीमोव: मोहक!

च्यूमिन (विचारमग्नपणे):

> **सुंदर हिमकण कोसळताहेत**
> **जणू छोटी, कोमेजलेली फुलं...**

व्लास (उसळून): मीसुद्धा कविता रचतो. मलासुद्धा कविता वाचून दाखवायची आहे!

द्वोयेतोचिये (खो खो हसत): होऊन जाऊ दे!

शालीमोव: रंगतदार स्पर्धा!

वार्वारा: व्लास, ह्याची गरज आहे काय?

झामीस्लोव: जर गंमत असेल, तर जरूर!

मार्या: तुम्हाला आठवण करून देते महाशय! स्वतःशी प्रामाणिक वागा!

सर्वजण व्लासची खळबळलेली मुद्रा पाहतात. अत्यंत शांतता पसरते.

व्लास: मंडळी! कवितेनं आपल्याजवळच्या माणसांची डोकी फिरवून टाकणं किती सोपं आहे, हे तुम्हाला दाखवून द्यायची माझी इच्छा आहे... सावधान! (आव्हानपूर्वक जोरात कविता म्हणतो.)

> **छोटी, विषण्ण माणसं**
> **माझ्या मायभूमीची फिरतात,**
> **फिरतात – उबदार जागेच्या शोधात,**
> **जिथं जीवनापासून लपता येईल.**

सर्वांना हवंय स्वस्तात सुख,
तृप्ती, आराम आणि शांतता,
फिरतात कुरकुरत आणि कण्हत
टुकार भित्रे आणि खोटारडे.

क्षुल्लक चोरलेले विचार...
आधुनिक सुंदर शब्द...
जीवनाच्या कडेशी वळवळतात
माणसाच्या फिकट सावलीसारखी.

संपल्यानंतर तो स्तब्ध उभा राहतो आणि शालीमोव, न्यूमिन, सूस्लोव यांच्याकडं आळीपाळीनं पाहतो. स्तब्धता. सगळे अवघडतात. कालेरीया खांदे उडवते. शालीमोव सावकाशपणे सिगारेट पेटवतात. सूस्लोव फार बेचैन होतात. मार्या आणि वार्वारा जणू कसल्या-तरी भीतीपायी व्लासला पाठीशी घालायला पुढे जातात.

दूदाकोव (शांत आणि स्पष्टपणे): फारच चपखल. खरंच, अत्यंत योग्य!

यूलीया: शाबास! मला आवडली कविता!

द्वोयेतोचिये: वा! काय सणसणीत चपराक मारलीय!

कालेरीया: अशिष्ट... दुष्टावा... कशासाठी?

झामीस्लोव: मजेदार नाही बुवा!

शालीमोव: तुला आवडली, सेर्गेइ?

बासोव: मला? अं... छंदोबद्धता चांगली नाही... पण विनोदी आहे...

झामीस्लोव : विनोदाच्या दृष्टीनं फार गंभीर आहे.

यूलीया (शालीमोवना) : किती सहज कूस बदलता!

सुस्लोव (चिडून) : आता मला — फिकट माणसाला — उत्तर द्यायची परवानगी द्या... ह्या... ह्या — माफ करा, पण ह्या विशिष्ट साहित्यप्रकाराला काय म्हणतात ते मला माहीत नाही. व्लास मिखायलोविच, तुम्हाला मी उत्तर देणार नाही. मी खुद्द तुमच्या स्फूर्तीदेवतेशी थेट बोलणार आहे: मार्या ल्वोवनाशी!

व्लास : हे काय आहे? सांभाळून बोला!

मार्या (अभिमानाने) : माझ्याशी? आश्चर्य आहे... पण मी ऐकते.

सूस्लोव : आश्चर्य मुळीच नाही, कारण ह्या कवितेची स्फूर्तीदेवता तुम्ही आहात हे मला ठाऊक आहे.

व्लास : असभ्यपणा करू नका.

यूलीया (सौम्यपणे) : असभ्यपणाशिवाय त्याला वागता येत नाही.

सूस्लोव : मला अडथळा करू नका. माझं बोलणं जेव्हा संपेल, तेव्हा माझ्या विधानांबद्दल मी सगळी उत्तरं देईन... मार्या ल्वोवना, तुम्हाला तथाकथित तत्त्वनिष्ठ म्हणतात. तुम्ही काहीतरी गूढ कार्य करता... कदाचित ते खूप महान, ऐतिहासिक असेल... माझा त्याच्याशी संबंध नाही! पण त्यामुळं इतर लोकांकडं तुच्छतेनं पाहण्याचा अधिकार तुम्हाला लाभलाय, असं तुम्हाला वाटत असेल.

मार्या (शांतपणे) : हे खरं नाही.

सूस्लोव : सगळयांवर प्रभाव पाडण्याचा, सर्वांना

शिकवण्याचा तुम्ही प्रयत्न करता... इतरांचा निवाडा करण्याचा आपल्याला हक्क आहे असे विचार तुम्ही ह्या पोराच्या टाळक्यात भरवून दिले आहेत.

क्लास: काय चक्की चालवताय?

सूस्लोव: पोरा, दम धर! आजपर्यंत मुकाटपणं मी तुमची टवाळखोरी सहन केली!..सन्माननीय मार्या ल्वोवना, मी तुम्हाला सांगू इच्छितो की, तुमच्या इच्छेप्रमाणं आम्ही जर जगत नसलो, तर त्याला आमची स्वत:ची काही कारणं आहेत! आमच्या लहानपणी आम्ही खूप यातना आणि उपासमार सहन केलीय. अर्थातच वाढत्या वयात चांगलं खाण्या-पिण्याची, विश्रांती घेण्याची, आमची इच्छा आहे. पूर्वीच्या अशांत, उपाशीपोटी जीवनाची कसर आता संपन्न आयुष्यानं भरून काढायची आहे.

शालीमोव (शुष्कपणे): हे आम्ही म्हणजे कोण ते मला समजेल का?

सूस्लोव (तापल्या आवाजात): आम्ही? म्हणजे मी, तुम्ही, तो, तो, आपण सगळे. होय... इथं असलेले आपण सगळे – गरीबांघरची मुलं! मी म्हणतोय, लहानपणी आम्ही खूप यातना सोसल्या, उपासमार भोगली. आता मोठ्या वयात खायची-प्यायची आणि विश्रांती घेण्याची आमची इच्छा आहे. हे आमचं मानसशास्त्र. मार्या ल्वोवना, तुम्हाला ते आवडत नाही, पण ते स्वाभाविक आहे आणि दुसरं काही असणं शक्य नाही! माननीय मार्या ल्वोवना, सर्वांत प्रथम माणूस आणि मग बाकीचा मूर्खपणा... म्हणून

मोडा आमचा नाद! आम्हाला सतत नांवं ठेवलीत आणि इतरांना आमची खरडपट्टी काढायला लावलीत, आम्हाला भित्रे अथवा आळशी अशी दूषणं दिलीत, मग आमच्यापैकी कुणीही सामाजिक कार्याला पुढं सरसावील असं वाटतं काय? मुळीच नाही! कुणीही येणार नाही!

दूदाकोव: किती दुष्टपणा! पुरे करा बोलणं!

सूस्लोव (संतापून): स्वतःबद्दल बोलतो – मी बाळ नाही! मार्या ल्वोवना, मला शिकवणं व्यर्थ आहे! मी प्रौढ माणूस आहे. सामान्य रशियन माणूस आहे. बस्स! आणखी काही नाही. एक सामान्य नागरिक. माझं हे आयुष्य. एक सामान्य नागरिक म्हणून जगायला मला आवडतं. मला हवं तसं मी जगेन! आणि सरतेशेवटी, तुमच्या प्रवचनांची, उदात्त विचारांची मला काडीइतकी किंमत वाटत नाही! (डोक्यावर फटदिशी टोपी ठेवतात आणि स्वतः-च्या दाचाकडे झपझप चालू लागतात. एकूण गोंधळ उडतो. झामीस्लोव, बासोव आणि शाली-मोव एका बाजूला जाऊन जोरजोराने कुजबुजू लागतात. वार्वारा आणि मार्या यांचा वेगळा गट बनतो. यूलीया, द्रोयेतोचिये, दूदाकोव आणि त्यांची पत्नी यांचा एक गट बनतो. एकूण अस्वस्थ संभाषण. हताश कालेरीया एकटीच पाईनच्या झाडांखाली उभी राहते. र्यूमिन जोरजोराने फेऱ्या मारतो.)

व्लास (डोके हातांनी गच्च धरून एका बाजूला जात): देवा रे देवा! कशाला केलं मी असं?

त्याला काहीतरी सांगत सोन्या त्याच्या पाठोपाठ जाते.

मार्या : हा वेडाचा झटका आहे! मानसिक आजारी माणूसच फक्त असं बोलू शकेल!

न्यूमिन (मार्याला) : बघितलंत, सत्य सांगणं किती भयानक असतं?

वार्वारा : किती वाईट!

द्वोयेतोचिये (यूलीयाला) : काहीही समजत नाही... काहीही!

यूलीया : मार्या ल्वोवना, तुम्हाला त्यानं दुखावलं ना?

मार्या : मला? नाही. त्यांनी स्वतःला दुखावून घेतलं!

द्वोयेतोचिये : भल्या मंडळींनो, तुमचा मामला थोर आहे!

दूदाकोव (बायकोला) : थांब... (द्वोयेतोचियेना.) हे गळू फुटलंय! मनाचं गळू फुटलंय! आपल्यापैकी कुणाच्याही बाबतीत असं घडू शकेल... (उत्तेजित मनःस्थितीपायी तोतरे बोलतात आणि पुढे बोलणे अशक्य ठरते.)

यूलीया : निकोलाय पेत्रोविच...

झामीस्लोव (तिच्याजवळ येत) : तुम्ही बेचैन बनलात?

यूलीया : मुळीच नाही... पण इथं थांबणं मला इष्ट वाटत नाही. मला सोडायला चला.

झामीस्लोव : किती मूर्खपणा! आणि किती वाईट.

मालकांनी किती चवदार आश्चर्य तयार ठेवलं होतं!

यूलीया: पुरे झाली तुमची आश्चर्यं!

जातात.

शालीमोव (कालेरीयापाशी जात): तुम्हाला आवडलं हे?

कालेरीया: भयानक! जणू दलदलीमधून चिखल वर चढलाय आणि मला घुसमटून टाकतोय असं वाटतं!

बासोव व्लासपाशी येतात व मुकाटपणे त्याचा हात धरतात.

व्लास: काय पाहिजे तुम्हाला?

बासोव (एका बाजूला नेत): दोन शब्द बोलायचेत.

र्‍यूमिन (विमनस्कपणे वार्वारापाशी जात): वार्वारा मिखायलोवना, ह्या संतापाच्या असभ्य चक्री वादळानं माझं काळीज झाकोळून गेलंय... मी भिरमिटलोय! मी जातो... अच्छा! मी तुमचा निरोप घ्यायला आलो होतो... निवांत संध्याकाळ घालवायची इच्छा होती... शेवटची संध्याकाळ! मी कायमचा निघून जातोय. अच्छा!

वार्वारा (त्याचे बोलणे न ऐकता): माझ्या मनात काय येतंय ठाऊक आहे? मला वाटतं, तुम्हा सर्वांमध्ये सुस्लोव सर्वांत जास्त प्रामाणिक आहेत. होय, प्रामाणिक! ते अशिष्ट भाषेत बोलले, पण हे कटु सत्य सांगायचं धैर्य दुसऱ्या कुणापाशीही नाही!

र्‍यूमिन (मागे सरत): एवढंच? हा तुमचा

निरोप ? अरे देवा ! (रंगभूमीच्या मागील भागात जातो .)

बासोव (क्लासला) : दाखवलंत तुमचं वेगळेपण, महाराज ! आता काय ? तुम्ही माझ्या बहिणीचा अपमान केलात आणि याकोवचा ... एका नामवंत लेखकाचा ! मग सूस्लोवचा . र्‍यूमिनचा ! तुम्ही माफी मागितली पाहिजे ...

क्लास : का ... य ? मी ? माफी मागू ? त्यांची ?

बासोव : त्यात काय विशेष ! सांगा – थोडी गंमत करायची होती, पण अतिरेक घडला ! तुम्हाला माफी करतील ... तुमच्या वागण्याची सर्वांना सवय झालीय ... तुम्ही विदूषक आहात हे सगळ्यांना माहीत आहे .

क्लास (किंचाळतो) : खड्ड्यात जा ! तुम्हीच विदूषक आहात !

सोन्या : मंडळी ! कमी गोंगाट करा !

वार्वारा : क्लास, काय बोलतोस ?

मार्या : खरंच, वेडाची लाट उसळलीय !

द्वोयेतोचिये : क्लास, तुम्ही इथून जा !

बासोव : नाही . माझाही अपमान झालाय !

वार्वारा : सेर्गेइ, मी विनंती करते ! क्लास !

बासोव : नाही ! मी विदूषक नव्हे !

क्लास : केवळ बहिणीचा मान राखायचा म्हणून मी तुम्हाला बोलत नाही ...

वार्वारा : क्लास, खबरदार ! ..

कालेरीया येते .

साशा (वार्वाराला) : जेवण वाढायचं ?

वार्वारा : चालत्या व्हा !

साशा (हळूच द्वोयेतोचियेना) : वाढलं तर बरं होईल ! साहेबांनी टेबलावर अन्न बघितलं म्हणजे त्यांचा राग शांत होईल.

द्वोयेतोचिये : तू चालती हो इथून !

बासोव (क्लासला) : नाही, मी तुम्हाला विचार-तोय (एकदम ओरडतो.) तुम्ही उपटसुंभ आहात !

कालेरीया : सेर्गेइ, हा रानटीपणा झाला !

बासोव : शेंबडं पोर आहे साला ! उपटसुंभ !

शालीमोव (बासोवचा हात धरून दाचाकडे नेतात. पाठीमागून साशा) : आता पुरे झालं !

मार्या : क्लास मिखायलोविच ! काय हे ?

क्लास : मी जबाबदार आहे का ? माझी चूक ?

साशा : साहेब ! जेवण वाढायचं ?

बासोव : चालत्या व्हा ! इथं मी कुणीच नव्हे ! मला माझ्या घरात ... (खोलीत जातो.)

मार्या (सोन्याला) : त्यांना आपल्याकडं घेऊन जा. (क्लासला.) जा तिच्याबरोबर.

क्लास : मला माफ करा, माफ करा ! आणि वार्या, तूही माफ कर ! माझी चूक झाली. माझी अभागी बहीण ! इथून निघून जा ! जा ! !

वार्वारा (अस्फुटपणे) : कुठं ? कुठं जाऊ मी ?

द्वोयेतोचिये : माझ्याकडं चला ! खरंच ! किती छान होईल !

त्यांचे बोलणे कुणीही ऐकत नाही. ते दुःखाने सुस्कारा टाकतात आणि शांतपणे सूस्लोवांच्या दाचाकडे जातात.

मार्या : आणि तुम्हीही माझ्याकडं चला, वार्या!

वार्वारा : मी येईन... नंतर. व्लास... मी येईन!

वार्वारा दाचामध्ये जाते. मार्या तिच्या पाठोपाठ जाते. व्लास आणि सोन्या राईत जातात. खचून गेलेली कालेरीया लटपटत्या पावलांनी दाचाकडे जाते.

ओल्गा : किती लज्जास्पद प्रसंग! आणि अचानक! किरिल, तुला याचा काही उलगडा होतो?

दूदाकोव : मला? समजतंय! होय! कधीतरी आपण एकमेकांच्या नरडयांना हात घालणारच होतो! ते आज घडलं! व्लासनं नेमका टोला हाणला! ओल्गा, तुला आता घरी गेलं पाहिजे.

ओल्गा : थांब! इथं किती मजा आलीय! कदाचित आणखी काहीतरी घडेल!

दूदाकोव : ओल्गा, हे बरं नव्हे! घरी गेलं पाहिजे... तिथं सगळी आरडाओरड आणि रडारड चाललीय. वोल्का दाईवर ओरडला, ती चिडलीय आणि तो म्हणतो की तिनं त्याचा कान पिरगाळला! एकूण तिथं अनर्थ माजलाय. मी केव्हापासून तुला सांगतोय – घरी जाणं आवश्यक आहे.

ओल्गा : खोटं! तू मुळीच बोलला नाहीस!

दूदाकोव : बोललो बाई! आपण तिथं उभे होतो, तू बासोवबद्दल काहीतरी सांगितलंस आणि मी तुला बोललो.

ओल्गा : तू मला काहीही बोलला नाहीस, किरिल !

दूदाकोव : तू कशाबद्दल वाद घालतेस, मला समजत नाही ! मला आठवतंय – मी म्हणालो – घरी जा.

ओल्गा : तू मला सांगणं शक्यच नव्हतं – घरी जा म्हणून ! तसं फक्त मुलांना आणि नोकरांना सांगतात.

दूदाकोव : ओल्गा ! तू भांडकुदळ बाई आहेस !

ओल्गा : असं ? किरिल, तुला शरम कशी वाटत नाही ? तू संयम राखशील असं मला वचन दिलं होतं.

दूदाकोव (तिच्यापासून दूर जात) : बोलू नकोस ! हा ... हा मूर्खपणा ! बायकांची जात !

ओल्गा (त्याच्या पाठोपाठ जात) : हा मूर्खपणा, किरिल ? मी – बायकांच्या मूर्ख जातीची ? (रडव्या सुरात.) आभारी आहे तुझी !

दोघे राईत अदृश्य होतात. काही सेकंद रंगभूमी मोकळी. अंधार होतो. व्हरांड्यात बासोव आणि शालीमोव येतात.

शालीमोव (बासोवना) : माझ्या मित्रा, थोडं तत्त्वज्ञानी बनलं पाहिजे ! क्षुल्लक बाबींवरून चिडणं हास्यास्पद !

बासोव : खेद होतो ! उपटसुंभ ! कोवळा पोरगा ! तुझा आता राग गेला ना ?

शालीमोव : अशा प्रसंगांना आम्हाला अनेकदा तोंड द्यावं लागतं. फालतू वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध होणाऱ्या अपयशी कवींच्या कडव्यांना ! पण मित्रा, त्यांना कोण भीक घालतो ?

व्हरांड्यातून बाहेर पडून पाईनवृक्षांपाशी जातात. सूस्लोव घाईने येतात.

सूस्लोव : सेर्गेइ वासिल्येविच! मी वाहवत गेलो... तुझी माफी मागायला आलोय! (शालीमोवना) आणि तुमचीसुद्धा! माझा तोल सुटला... पण फार पूर्वीपासून त्या बाईनं मला अस्वस्थ केलं होतं. ती आणि तिच्यासारखी माणसं – अगदी तिटकारा आणतात मला... तिचा चेहरा पाहणं, तिची बोलण्याची ढब... अगदी असह्य होतं!

बासोव : मित्रा, मला समजतं! अगदी उत्तम समजतं! माणसानं सौम्य असावं, चतुराईनं वागावं.

शालीमोव (कोरडेपणाने) : तुम्ही जरा मर्यादा सोडूनच वागलात.

बासोव (घाईने) : आता पुरे! त्याच्या सगळ्या बोलण्याला मी शिफारस जोडतो. देवाशपथ! आणि ह्या बाईला तर मी... खरं सांगायचं तर...

सूस्लोव : सगळ्या बायका थोर नटव्या असतात! रशियन बायका तर मुख्यत: शोक-नायिका! सगळ्यांना नायिका होण्याची दांडगी हौस!

बासोव : खरंच... बायकांबरोबर जगणं महाकठीण!

वार्वारा आणि मार्या व्हरांड्यात येतात.

शालीमोव : आपणच ही अवघड परिस्थिती निर्माण करतो. आपण स्वत:लाच बजावलं पाहिजे – बायका नीच जातीच्या आहेत!

बासोव (जणू दुसऱ्याचे विचार बोलून दाखवत) :

अर्थात, तुझं अगदी बरोबर आहे मित्रा. बाई आपल्यापेक्षा जनावराच्या जास्त जवळ आहे. बाईला आपल्या तंत्रानुसार वागवण्यासाठी तिच्याशी सौम्यपणानं, पण ठामपणं आणि सुंदर जुलमीपणं वागलं पाहिजे. आपल्या बळजबरीत सौंदर्य पाहिजे.

राईत उजव्या बाजूला गोळीबार होतो. कुणीही तिकडे लक्ष देत नाही.

सूस्लोव: एकच आवश्यक गोष्ट – तिला सतत गरोदर ठेवायचं! म्हणजे ती पूर्णपणं तुमच्या मुठीत राहील!

वार्वारा (हळू, पण ठामपणे): किती नीचपणा!

मार्या: देवा रे, इथं कसला दुर्गंध सुटलाय! अगदी प्रेतं सडल्याप्रमाणं! वार्या, चला इथून!

सूस्लोव हळूच खोकून दूर जातात.

बासोव (घाईने बायकोकडे धावत): अरे प्योत्र, तुझं हे जरा अतिरेकी विधान झालं... मर्यादा सोडून!

वार्वारा (शालीमोवला): तुम्ही! तुम्ही!

शालीमोव (टोपी उतरवून खांदे उडवत): मी काय केलं?

मार्या: चला लौकर, वार्या! दूर चला इथून! (वार्वाराचा हात धरून घेऊन जाते. बासोव गोंधळून त्यांच्याकडे पहात राहतात.)

बासोव: च्यायला! ऐकलं त्यांनी! अरे बापरे!

शालीमोव (किंचित हसून): बंधो... तू पण थोर!

बासोव (चिडून अस्वस्थपणे) : त्याच्यात कोणतं भूत शिरलंय ? चिडका समंध बनलाय ! अशा गोष्टी सावधपणं बोलायच्या असतात ना ? छीः !

शालीमोव (शुष्कपणे) : उद्या मी जातो. इथं दमट आणि थंड वाटतंय. मी घरात चलतो.

बासोव (उदासपणे) : तिथं माझी बहीण रडतेय ! नक्की ! ..

जातात. शांतता. पूस्तोबायका आणि क्रोपिल्किन बासोवांच्या दाचामागून येतात. दोघांच्या अंगात गरम कपडे. त्यांच्यापाशी शिट्या आणि खुळखुळ वाजणाऱ्या काठ्या आहेत. सूस्लोवांच्या घरातून पियानोचे सूर ऐकू येतात. नंतर यूलीया आणि झामीस्लोव द्वंद्वगीत गातात : " दिवस डुबतीला आला ... "

पूस्तोबायका : तू त्या रस्त्यानं जा, मी ह्या रस्त्यानं माझं तोंड दाखवतो. मग स्तेपानिदाच्या स्वैपाकघरात बसून चहा पिऊ !

क्रोपिल्किन : आपण लौकर बाहेर पडलो ... अजून कुणीही झोपलेलं नाही.

पूस्तोबायका : दाखवण्यापुरतं फिरलं पाहिजे. जा ...

क्रोपिल्किन (डावीकडे जात) : जातो मी ... देवा रे !

पूस्तोबायका : किती घाण करून ठेवतात ! हे दाचावाले सहलीला आलेल्या माणसांप्रमाणं वागतात ... येतात, सगळीकडं कचरा करतात आणि गायब होतात ... आम्ही नंतर स्वच्छ करत बसायचं ! (चिडून मोठ्यांदा

काठी आपटतो आणि शिटी वाजवतो. क्रोपिल्किन शिटीने उलट-उत्तर देतो. पूस्तोबायका जातो. कालेरीया पाईनवृक्षांखाली खिन्नपणे येऊन बसते. विचारात गढलेली. ऐकू येणाऱ्या गाण्याच्या साथीवर मान डोलावते आणि स्वत: गुणगुणते. राईत उजव्या बाजूला पुस्तो-बायकाचा आवाज येतो.)

पूस्तोबायका (मोठ्यांदा घाबरून) : कोण तू? काय? अरे देवा!

कालेरीया घाबरून कान देऊन ऐकते.

पूस्तोबायका (न्यूमिनला धरून आणत) : बासो-वांकडं?

कालेरीया : सेर्गेइ! सेर्गेइ!

न्यूमिन : डॉक्टरना बोलवा... कृपा करून!

कालेरीया : पावेल सेर्गेयेविच! तुम्ही? काय झालं तुम्हाला? काय झालं?

पूस्तोबायका : मी जात होतो तर हे सरपटत येत होते... जमिनीवरून... म्हणतात – जखमी झालेत!

कालेरीया : तुम्ही जखमी झाला आहात? सेर्गेइ, मार्या ल्वोवनाना बोलाव! लौकर डॉक्टरना आण...

बासोव (धावत) : काय झालं? काय घडलं?

न्यूमिन : मला क्षमा करा.

कालेरीया : कुणी तुम्हाला जखमी केलं?

पूस्तोबायका (पुटपुटतो) : इथं कोण माणसाला जखमी करणार? बहुधा स्वत:च! हे बघा पिस्तूल! (कोटाच्या खिशातून रिवॉल्वर काढून घेतो व लक्षपूर्वक पाहतो.)

बासोव : तुम्ही ? मला वाटलं – झामीस्लोव ... प्योत्रनं त्याला ... (वेगाने धावत ओरडत जातात ..) मार्या ल्वोवना !

शालीमोव (रगामध्ये गुंडाळून घेतलेले) : काय ... हे कोण ? काय झालं ?

कालेरीया : तुम्हाला खूप दुखतंय ?

र्‍यूमिन : मला लाज वाटतेय ... शरम वाटतेय !

शालीमोव : ही जखम धोक्याची तर नाही ?

र्‍यूमिन : मला इथून दूर न्या ... तिनं बघावं अशी माझी इच्छा नाही ... इथून न्या मला ! मी विनंती करतो !

कालेरीया (शालीमोवना) : जाऊन कुणालातरी हाका मारा ...

शालीमोव सूस्लोवांच्या दाचाकडे जातात. धावणाऱ्या लोकांचा गोंगाट, उत्तेजित आरोळ्या. मार्या, वार्वारा, सोन्या आणि व्लास येतात.

मार्या : तुम्ही ? सोन्या, मदत कर ! कोट काढ ... सावकाश, घाबरू नकोस.

वार्वारा : पावेल सेर्गेयेविच ...

र्‍यूमिन : मला क्षमा करा ! पटकन जीव द्यायचा माझा इरादा होता. पण माणसाचं हृदय जेव्हा खूप लहान असतं आणि जोरात धडधडतं, तेव्हा त्यात गोळी झाडणं फार अवघड जातं !

वार्वारा : कशाबद्दल ? कशाबद्दल तुम्ही ?..

कालेरीया (र्‍यूमिनवर वेड्यासारखी किंचाळते) :

हा क्रूरपणा आहे! (स्वत:ला सावरून.) काय बोलतेय मी! माफ करा!

क्लास (कालेरीयाला) : तुम्ही जा इथून ... तुम्हाला त्रास होईल! जा इथून! (पाईनच्या झाडाकडे ती जाते. टोपी नसलेले, अंगात फक्त बंडी घातलेले आणि खांद्यावर ओव्हरकोट टाकलेले द्वोयेतोचिये धावत येतात. त्यांच्याबरोबर सूस्लोव; त्यांच्यामागून झामीस्लोव, यूलीया; गबाळ्या आणि संत्रस्त अवतारात दूदाकोव व केविलवाणी, गोंधळलेली ओल्गा.)

मार्या : अस्सं! ही पहा इथं! जखम फारशी गंभीर नाही!

न्यूमिन : माणसं इकडं येताहेत ... वार्वारा मिखाय-लोवना, तुमचा हात द्या.

वार्वारा : कशाला हे सगळं?

न्यूमिन : माझं प्रेम आहे तुमच्यावर ... तुमच्याशिवाय जगणं अशक्य झालंय!

क्लास (दात आवळून) : सैतान तुझा नायनाट करो! तुझ्या प्रेमासकट!

कालेरीया (मोठ्यांदा पुटपुटते) : खबरदार, तसं बोलाल तर! मरणाऱ्या माणसाला अडवू नका!

मार्या (वार्वाराला) : तुम्ही इथून निघून जा बरं! जा! आणि महाशय, तुम्ही घाबरू नका. जखम अगदी किरकोळ आहे. ते बघा, डॉक्टर आले.

दूदाकोव : काय झालं? जखम? खांद्याला? असं खांद्यावर स्वत:ला कोण गोळी झाडून घेतं? डाव्या कुशीत झाडली पाहिजे ... आणि खरोखरीच

गंभीरपणानं आत्महत्या करायची असली तर कानशीलावर !

मार्या : किरिल आकीमोविच, तुम्ही काय बोल-ताय ?

दूदाकोव : आं ... हो ! माफ करा ! .. बँडेज बांधलं, ? मग काय ?.. घेऊन जा ह्यांना ...

बासोव : आमच्या घरात न्या. होय ना वार्या ?

च्यूमिन : गरज नाही ... मी चालत जाऊ शकतो.

दूदाकोव : शकता ? फार उत्तम !

च्यूमिन (लटपटत चालू लागतो. बासोव आणि सूस्लोव आधार देतात) : पहा ... अपयशी जगलो आणि मरणं जमलं नाही ... केविलवाणा माणूस !

त्याला खोलीत नेतात. दूदाकोव त्यांच्याबरोबर जातात.

यूलीया : त्यांचं बरोबर आहे.

झामीस्लोव (उदासपणे) : किती दुःखी तमाशा !

पूस्तोबायका (द्वोयेतोचियेना) : मी आणलं साहे-बांना !

द्वोयेतोचिये : अस्सं ... छान !

पूस्तोबायका : माझ्या कामगिरीबद्दल वोदकासाठी बक्षिशी पाहिजे.

द्वोयेतोचिये (संतापून) : किती निर्दय माणूस रे तू ! (त्याला पैसे देतात.)

पूस्तोबायका : देव तुमचं भलं करो !

कालेरीया (वार्वाराला) : ते मरतील ? वार्या,

बरं म्हणजे मी असं करायला पाहिजे होतं की नाही ?

वार्वारा : चूप ... असं बोलू नको ! (झटका आल्याप्रमाणे .) किती किळसवाणे आहोत आपण मगळे ! .. का बरं असं ?

शालीमोव (मार्याला) : काय ... जखम खूप गंभीर आहे ?

मार्या : नाही .

शालीमोव : हं ... अप्रिय घटना ! वार्वारा मिखायलोवना , मला परवानगी द्या ...

वार्वारा (दचकून) : काय झालं ?

शालीमोव : काही मिनिटांपूर्वी तुम्ही शब्द ऐकले होते ...

बासोव , सूस्लोव आणि दूदाकोव येतात .

बासोव : आम्ही निजवलं त्यांना .

वार्वारा : पुरे ! माझा खुलाशांवर विश्वास नाही ... खुलासे ऐकायची इच्छा नाही ! तुम्हा सगळ्यांचा मी मनापासून द्वेष करते ! केविलवाणे , तिरस्करणीय , राक्षस !

व्लास : थांब वार्या , मी त्यांना सांगतो – मला माहीत आहे : तुम्ही सोंगाडे आहात ! जोवर मी जिवंत आहे , तोवर तुमचे कपडे मी फाडत जाईन ... ज्यांच्याखाली तुम्ही खोटेपण लपवता ! तुमचा असभ्यपणा लपवता ! तुमच्या भावनांचं दारिद्र्य आणि अश्लील विचार लपवता !

शालीमोव खांदे उडवून एका बाजूला जातात.

मार्या: पुरे करा! याचा काही उपयोग नाही!

वार्वारा: नाही! ऐकूच दे ह्या माणसांना! त्यांच्याशी स्पष्ट बोलण्याची मला फार जबर किंमत द्यावी लागलीय! माझ्या मनाला त्यांनी कुरूप बनवलं, माझ्या सगळ्या आयुष्यात वीष पेरलं! मी अशी होते का? माझा विश्वास नाही... कशावरही विश्वास नाही! माझ्यात बळ नाही... जगण्यासारखं माझ्यापाशी काही उरलं नाही! मी अशी होते?

यूलीया (खेदाने): मीसुद्धा असं म्हणीन! मीसुद्धा असं सांगू शकेन!

ओल्गा (नवऱ्याला): बघ वार्वाराचा चेहरा... कशी पिसाळलीय!..

दूदाकोव बायकोला हाताने झटकतात.

बासोव: वार्या, पुरे! ह्याशिवाय चालणार नाही का? काय हे? वेडा आहे हा ऱ्यूमिन... एवढी काय किंमत द्यायची त्याला?

वार्वारा: माझ्यापासून दूर हो, सेर्गेइ.

बासोव: अग, पण लाडके...

वार्वारा: मी कधीही तुझी लाडकी नव्हते... आणि तू कधी माझा लाडका नव्हतास! आपण फक्त नवरा आणि बायको होतो. आता आपण एकमेकांना परके आहोत. मी निघून जातेय!

बासोव: कुठं? वार्या, लाज कशी वाटत नाही? सगळ्या लोकांसमक्ष, भर रस्त्यावर!

रंगभूमीच्या मागील भागात सूस्लोव स्तब्ध उभे.

वार्वारा: इथं माणसं नाहीत...

मार्या: चला, वार्या...

यूलीया: तिला अडवू नका! बोलू दे तिला!

द्वोयेतोचिये (दुःखाने): हाय, मंडळी! माझ्या मनाचा तुम्ही चक्काचूर केलात! अरे सद्‌गृहस्थांनो!

कालेरीया (मार्याला): अहो, हे काय हे? काय म्हणायचं ह्याला?

मार्या: शांत व्हा! त्यांना इथून घेऊन जायला मला मदत करा.

वार्वारा: होय, मी जातेय! इथून खूप दूर... इथं तुझ्याभोवती सगळं कुजकं आणि सडकं वातावरण आहे. रिकामटेकड्यांपासून दूर! मला जगायचंय! मी जगणार... आणि तुमच्याविरुद्ध काहीतरी करणार! तुमच्याविरुद्ध! (सगळयांकडे पाहते आणि निराशेने किंचाळते.) तुम्ही सदा शापभ्रष्ट रहाल!

व्लास: चल, वार्या! पुरे! तुझ्या इच्छेप्रमाणंच होईल! (तिला हाताला धरून दूर नेतो.)

बासोव (शालीमोवना): हे सगळं थोपवायला मला मदत कर रे बाबा!

शालीमोव (शांतपणे, किंचित हसून): तिला थंड पाणी दे. आणखी काय करणार?

यूलीया (वार्वारापाशी जात): मला असं जाता आलं तर किती छान होईल!

बासोव: वार्या! तू कुठं निघालीस? मार्या ल्वोवना,

हे चांगलं नाही. तुम्ही डॉक्टर आहात – तिला शांत करणं तुमचं कर्तव्य आहे.

मार्या: माझ्याशी बोलू नका!

द्रोयेतोचिये (बासोवना): हात् तुमची निष्पाप खलपुरुषांनो! (वार्वारा आणि क्लास यांच्या पाठी राईत उजवीकडे जातात.)

कालेरीया (रडत): आणि मी! मी कुठं जाऊ?

सोन्या (तिच्यापाशी जात): आमच्याकडं चला – चला! (कालेरीयाला घेऊन जाते.)

यूलीया (गंभीरपणे): प्योत्र इवानोविच! चला... आपलं जीवन पुढं जगायला!

सूस्लोव फक्त दात करकरा चावतात आणि जातात.

बासोव: हा काय प्रकार आहे? सगळ्यांची डोकी फिरलीत काय? हा च्यूमिन! काय ठोंब्या तरी? त्याच्या मूर्ख वागण्याचा हा सगळा परिणाम! याकोव, तू गप्प काय बसलास? हसतोस काय? हे काही गंभीर नाही असं वाटतं तुला? इतकं अनपेक्षित घडलंय! धडाड – आणि सगळा विध्वंस झाला! आता काय करायचं?

शालीमोव: माझ्या मित्रा, शांत हो! ही सगळी वेडाच्या झटक्यातली बडबड आहे... माझ्यावर विश्वास ठेव! (बासोवांचा हात धरून त्यांना दाचाकडे नेतात. हात मागे धरलेले दूदाकोव खोलीतून बाहेर येतात आणि सावकाशपणे उजवीकडे जातात. तेथे झाडांखाली त्यांची बायको स्तब्धपणे त्यांची वाट पहात उभी असते.)

बासोव : हाय ... काय अनर्थ झाला !

शालीमोव (उपहासाने) : शांत हो ... पाहिलंस – ते बघ सूस्लोव नवरा-बायको स्वतःचं आयुष्य पुढं जगायला गेले ... चल ! आपणही शांतपणं आपलं पुढचं आयुष्य जगू या !

ओल्गा : किरिल ... तो मरेल ?

दूदाकोव (तिखटपणे) : नाही ... चल ... कुणीही मरत नाही !

राईत जातात.

शालीमोव : माझ्या मित्रा, हे सगळं बिनमहत्त्वाचं ... माणसं आणि घडामोडी ... दारू ओत माझ्यासाठी ! .. हे सगळं अर्थहीन आहे, माझ्या मित्रा ... (पितात. राईत राखणदारांच्या प्रदीर्घ मंद शिट्या ऐकू येतात.)

पडदा

१९०४

वैरी

■



पात्र-परिचय

झखार बार्दिन – वय ४५.

पालीना – त्याची बायको, ४० च्या आत.

याकोव बार्दिन – वय ४०.

तात्याना – त्याची बायको, वय २८, अभिनेत्री.

नाद्या – पालीनाची भाची, वय १८.

पेचेनेगोव – सेवानिवृत्त जनरल, बार्दिनांचे काका.

मिखाइल स्क्रोबोतोव – वय ४०, व्यापारी, बार्दिनांचा भागीदार.

क्लेओपात्रा – त्याची बायको, वय ३०.

निकोलाय स्क्रोबोतोव – त्याचा भाऊ, वय ३५, फौजदारी सरकारी वकील.

सीन्त्सोव – दिवाणजी.

पालोगी – दिवाणजी.

कोन – माजी सैनिक.

ग्रेकोव
लेवशिन
यागोदिन
र्‍याबत्सोव
आकीमोव
} कामगार.

आग्राफेना – घरातील कारभारीण.

बाबोयेदोव – पोलीसांचा कप्तान.

म्वाच – नाईक .

सेना-लेफ्टनंट .

पोलीस-प्रमुख .

पोलीस .

पोलीस , शिपाई , कामगार , कारकून , नोकर .

अंक पहिला

१

बाग, निंबोणीची मोठी जुनी झाडे. बागेच्या आत दूरवर पांढरा लष्करी तंबू दिसतो. झाडांखाली उजव्या बाजूस टर्फ गवताचे रुंद आसन व त्यासमोर एक टेबल. डाव्या बाजूस झाडाच्या सावलीत न्याहरी मांडून ठेवलेले लांब टेबल. छोटा समोवार उकळतोय. टेबलाभोवती वेताच्या खुर्च्या. आग्राफेना कॉफी बनवतेय. कोन झाडाखाली उभा राहून पाईप ओढतोय आणि पालोगीशी बोलतोय.

पालोगी (चमत्कारिक हातवारे करीत) : ... अर्थात तुमचं खरं आहे, मी लहान माणूस, माझं आयुष्य किरकोळ, पण प्रत्येक काकडी मी माझ्या हातांनी वाढवलीय आणि माझ्या परवानगीविना कुणीही ती तोडू शकत नाही.

कोन (उदासपणे) : तुझी परवानगी पाहिजे कुणाला!

पालोगी (छातीवर हात दाबत) : पण ऐका! जर तुमच्या खाजगी मालमत्तेवर कुणी आक्रमण केलं, तर कायद्याचं संरक्षण मागायचा तुम्हाला हक्क आहे ना?

कोन : माग. आज काकड्या तोडताहेत, उद्या मुंडकी तोडतील. घ्या तुमचा कायदा!

पालोगी : तुमचं हे बोलणं ऐकायला विचित्र आणि धोक्याचंही वाटतं! तुमच्यासारखा पदकं मिळवलेला माजी सैनिक कायद्याबद्दल एवढं तुच्छ कसं बोलू शकतो?

कोन : कायदा – नाही. आहे फक्त – हुकूम. बाये... नड' आगे... कदम! आणि – निघाला! हुकूम दिला – रूक जाव! म्हणजे – थांबला!

आग्राफेना : अहो कोन, तुमची तंबाखू इथं ओढली नाहीत तर बरं होईल. तिच्यामुळं झाडांची पानं जळून जाताहेत.

पालोगी : उपासमारीपायी जर त्यांनी काकड्या चोरल्या, तर एक वेळ मी समजू शकतो. भूक अनेक गुन्ह्यांचा खुलासा देऊ शकते. भूक शांत करण्यासाठी नगळी वाईट कृत्यं घडतात असं म्हणता येईल. जेव्हा खायची इच्छा होते, तेव्हा अर्थातच...

कोन : देवदूत खात नाहीत, पण तरीही सैतान देवाविरुद्ध गेला.

पालोगी : (आनंदाने) : ह्यालाच मी खोडकरपणा म्हणतो!

याकोव बार्दिन येतो. तो हळू बोलतोय, जणू स्वतःचे शब्द स्वतःच ऐकतोय. पालोगी त्याला झुकून अभिवादन करतो. कोन बेफिकीरपणे लष्करी सलाम ठोकतो.

याकोव : नमस्ते. तुमचं – काय चाललंय?

पालोगी : झखार इवानोविचना एक नम्र विनंती करायला आलोय...

आग्राफेना : तक्रार करायला आलेत. काल रात्री

कारखान्यामधल्या पोरांनी त्यांच्या काकड्या चोरल्या.

याकोव : अं.. हे माझ्या बंधूंना सांगायला पाहिजे.

पालोगी : अगदी बरोबर. मी त्यांच्याकडंच निघालोय.

कोन : (खिन्नपणे) : तू कुठंही जात नाहीस. एकाच जागी उभा राहून कुरकुरतो आहेस.

पालोगी : मला वाटतं, मी तुम्हाला कसलाही त्रास देत नाही. जर तुम्ही वर्तमानपत्र वाचत असता, किंवा दुसरं काही करत असता, तर गोष्ट वेगळी.

याकोव : कोन, इकडं या.

कोन (येतो) : तू महाकंजूस आहेस पालोगी... हलकट लटपट्या!

पालोगी : तुम्ही निष्कारण असले वाईट शब्द मला वापरता आहात. तक्रारी करण्यासाठी माणसाला जीभ दिलेली आहे.

आग्राफेना : पालोगी, गप्प बसा आता... खरंच, तुम्ही माणूस नाही, डास आहात...

याकोव (कोनला) : काय करतोय तो इथं? जात का नाही?

पालोगी (आग्राफेनाला) : जर माझे शब्द तुमच्या कानांना त्रास देतात आणि काळजापर्यंत पोहचत नाहीत, तर मी गप्प बसतो. (पाऊलवाटेने जाऊ लागतो. जाताना झाडांना हाताचा स्पर्श करत जातो.)

याकोव (शरमून) : कोन, मला वाटतं... काल मी परत कुणाचा तरी अपमान केला!

कोन (हसून) : घडलं खरं तसं!

याकोव (येरझाऱ्या घालत) : हं... आश्चर्य

आहे! मी झिंगलो म्हणजे लोकांना नेहमी का दुखवतो बोलून?

कोन: असं घडतं. काहीवेळा झिंगलेली माणसं शुद्धीवर असतानापेक्षा जास्त चांगली असतात. ती जास्त धीट असतात. कुणालाही भीत नाहीत आणि स्वतःचाही मुलाहिजा ठेवत नाहीत. आमच्या फौजेत एक बिनमिशनवाला ऑफिसर होता – शुद्धीवर असला म्हणजे हांजीखोर वागायचा, कुचाळक्या करायचा आणि मारामाऱ्या करायचा. पण झिंगला म्हणजे रडायचा. म्हणायचा, बंधूनो, मीसुद्धा तुमच्यासारखाच माणूस आहे. माझ्या डोळ्यात थुंका. आणि काहीजण खरंच थुंकायचे त्याच्यावर.

याकोव: काल मी कुणाचा अपमान केला?

कोन: वकील साहेबांचा. तुम्ही म्हणालात त्यांना – तुमचं डोकं म्हणजे लाकडाचं खोकं आहे. मग डायरेक्टरसाहेबांच्या बायकोबद्दल वकील साहेबांना म्हणालात की, अनेक यारांबरोबर तिच्या भानगडी आहेत.

याकोव: पाहिलंस... काय करायचं होतं मला हे बोलून?

कोन: कुणास ठाऊक. आणखी तुम्ही...

याकोव: पुरे कोन, बस्स झालं... नाहीतर सर्वांनाच मी काही ना काही वाईट बोललो असं आढळून यायचं! खरंच – ह्या वोदकापायी सगळं दुर्दैव येतं! (टेबलापाशी जाऊन बाटल्यांकडे टक लावून पाहतो. एका मोठ्या ग्लासात मद्य ओतून घेतो व छोटे छोटे घुटके पितो.)

आग्राफेना डोळयाच्या कोपऱ्यातून त्याच्याकडे कटाक्ष टाकते आणि सुस्कारा सोडते.

माझ्याबद्दल तुम्हाला थोडंसं वाईट वाटतंय, होय ना ?

आग्राफेना: खूप वाईट वाटतं. तसे तुम्ही सगळयांशी मिळून-मिसळून, साधं वागता. बड्या माणसाचा गर्व नाही.

याकोव: पण कोनला कुणाचीही दया येत नाही. तो फक्त तत्त्वज्ञान बोलतो. माणसानं खूप अपमान सोसल्याविना तो विचार करायला लागत नाही, होय ना कोन ?

तंबूतून जनरलची आरोळी ऐकू येते: "कोन! ए!"

तुमचा भरपूर छळ केला, म्हणून तुम्ही असे चतुर बनलात ?

कोन (जात): जनरलसाहेबांना नुसतं पाहिलं तरी माझं मूर्खात रूपांतर होतं.

जनरल (तंबूतून बाहेर येत): कोन! पोहायला जायचंय! लौकर!

बागेत नाहीसे होतात.

याकोव (बसतो आणि खुर्चीवर डोलतो): माझी बायको अजून झोपलीय ?

आग्राफेना: केव्हाच उठल्या. पोहून सुद्धा आल्या.

याकोव: तर तुम्हाला माझ्याबद्दल वाईट वाटतं अं ?

आग्राफेना : तुम्ही काही उपचार करून घ्या.

याकोव : मग मला थोडी कन्याक ओता.

आग्राफेना : मला वाटतं, नको ओतायला, याकोव इवानोविच ?

याकोव : का ? एखादेवेळी मी नाही प्यायलो, तर त्यामुळं कुणाचाही फायदा होणार नाही.

उसासा टाकून आग्राफेना कन्याक ग्लासात ओतते. उत्तेजित मनःस्थितीत मिखाइल स्क्रोबोतोव प्रवेश करतो. अस्वस्थपणे तो आपली टोकदार काळी दाढी खेचतो आणि हातातील टोपीची चाळवाचाळव करतो.

मिखाइल : झखार इवानोविच उठले ? अजून नाही ? मला समजायला पाहिजे होतं ! द्या मला ... थंड दूध आहे ! धन्यवाद . नमस्ते, याकोव इवानोविच !.. तुम्हाला बातमी समजली ?.. हे हलकट मागणी करताहेत की, फोरमन दीचकोवला मी नोकरीतून काढून टाकावं ! काम थांबवायची धमकी घालताहेत ... सैतान नायनाट करो त्यांचा !

याकोव : तुम्ही काढून टाका त्या माणसाला.

मिखाइल : ते अगदी सोपं आहे . पण मुद्दा तो नाही ! मुद्दा असा आहे की, सवलतींमुळं ते जास्त जास्त लाडावत जातील ! आज मागणी करताहेत – फोरमनला काढून टाका, उद्या मागणी करतील – त्यांच्या मनोरंजनासाठी मी स्वतःला फास लावून घ्यावा !

याकोव (सौम्यपणे) : ह्यासाठी उद्याची ते वाट पाहतील असं वाटतं तुम्हाला ?

मिखाइल : तुम्हाला ही सगळी थट्टा वाटते! त्या कळकट सद्‌गृहस्थांना तुम्ही कसं हाताळता हे बघायची माझी इच्छा आहे – वेगवेगळ्या लोकांनी डोकी फिरवून ठेवलेले जवळ जवळ हजार लोक! तुमच्या उदारमत-वादी बंधूचा त्यात समावेश आहे – आणि पत्रकं लिहि-णाऱ्या त्या वेडपट कंपूचा! (घड्याळाकडे पाहतो.) दहा वाजत आले आणि जेवणाच्या सुटीनंतर स्वतःचा मूर्खपणा सुरू करण्याची ते धमकी घालताहेत. खरंच, याकोव इवानोविच, मी सुटीवर गेलो होतो तेवढ्या काळात तुमच्या थोर बंधूंनी कारखान्यात गोंधळ माजवून ठेवला. खंबीर न वागण्यापायी माणसं पार बिघडवून टाकली.

उजवीकडून सीन्त्सोव येतो. सुमारे तीस वय. त्याच्या एकूण आकृतीत आणि मुद्रेवर शांतपणा व प्रभावीपणा.

सीन्त्सोव : मिखाइल वासिल्येविच! कचेरीत काम-गारांचे प्रतिनिधी आलेत आणि मालकांना भेटायची मागणी करताहेत.

मिखाइल : मागणी करताहेत? सगळ्यांना जहन्नममध्ये पाठवून द्या!

डावीकडून पालीना येते.

माफ करा, पालीना द्मित्रीयेवना!

पालीना (कृपाळूपणे) : तुम्ही – नेहमी असे काहीतरी अपशब्द बोलता! आत्ता काय निमित्त झालं?

मिखाइल : हे कामगारवर्गीय ! तिथं ते मागणी करताहेत ! ...पूर्वी मला विनंती करायचे ...

पालीना : तुम्ही माणसांशी फार कठोर वागता !

मिखाइल :(हातांची हताश हालचाल करत) : आता काय बोलणार !

सीन्त्सोव : त्या प्रतिनिधींना काय सांगायचं ?

मिखाइल : खुशाल वाट पाहूं देत ... जा तुम्ही !

सीन्त्सोव सावकाशपणे जातो.

पालीना : ह्या माणसाचा चेहरा मोठा वैशिष्ट्यपूर्ण आहे . खूप दिवसांपासून नोकरीवर आहे ?

मिखाइल : मला वाटतं, जवळ जवळ वर्षभर ...

पालीना : सुसंस्कृत वाटतं त्याचं वागणं . कोण आहे तो ?

मिखाइल (खांदे उडवत) : चाळीस रूबल पगार मिळवतो . (घड्याळावर नजर टाकतो ; सुस्कारून भोवती नजर टाकतो, तेव्हा एका झाडाखाली पालोगी दृष्टिस पडतो .) तुम्ही काय करताय इथं ? माझ्याकडं आलात ?

पालोगी : मी, मिखाइल वासिल्येविच, झखार इवानोविचांकडं ...

मिखाइल : कशाला ?

पालोगी : खाजगी इस्टेटीत आक्रमण झालं म्हणून ...

मिखाइल (पालीनाला) : हा आणखी एक नवा कर्मचारी . बागकामाचा नाद आहे . त्याच्या हितसंबंधांना बाधा आणण्यासाठीच पृथ्वीवरच्या सर्व गोष्टी निर्माण

झाल्यात अशी त्याची ठाम खात्री आहे. प्रत्येक गोष्ट त्याला त्रासदायक वाटते – सूर्य, इंग्लंड, नवी यंत्रं, बेडूक ...

पालोगी (स्मित करत) : बेडूक ओरडायला लागले म्हणजे त्यांचा सगळ्यांनाच त्रास होतो, खरं की नाही?

मिखाइल : कचेरीत जा! कसली ही सवय? काम सोडून तक्रारी सांगत हिंडायचं? मला हे आवडत नाही ... जा!

पालोगी वाकून अभिवादन करतो आणि जातो. पालीना चापाच्या चष्म्यातून पहात स्मित करते.

पालीना : किती कडक आहात तुम्ही! फार मजेशीर आहे तो ... तुम्हाला माहीत आहे – परदेशीयांपेक्षा रशियात माणसं जास्त चित्रविचित्र आहेत.

मिखाइल : महाभयानक आहेत असं म्हणा – आणि मी तुमच्याशी सहमत होईन. गेली पंधरा वर्षं माणसांवर मी हुकमत गाजवतोय ... आणि आपल्या धर्मपरायण लेखकांनी रंगवलेल्या उदात्त रशियन माणसांना मी आता चांगलं ओळखतो!

पालीना – धर्मपरायण?

मिखाइल : अर्थातच. सगळे तुमचे चेर्नीशेवस्की, दब्रोल्यूबोव, झ्लातोव्रात्स्की, ऊस्पेन्स्की ... (घड्याळाकडे पाहतो.) झखार इवानोविच फार वेळ लावताहेत!

पालीना : तो कशात गुंतलाय माहीत आहे? तुमच्या भावाबरोबर काल संध्याकाळचा बुद्धिबळाचा डाव पुरा करतोय!

मिखाइल : तिथं जेवणाच्या सुटीनंतर काम बंद ठेवण्याच्या योजना शिजताहेत! ह्या रशियात सदिच्छा कधीही येणार नाही! अगदी खात्री देतो! अराजकाचा ह्ा देश! कोणत्याही कामाबाबत लोकांना मनस्वी तिटकारा आहे आणि सुव्यवस्था राखण्याची अजिबात कुवत नाही. कायद्याबद्दल काडीचाही आदर नाही!

पालीना : हे सगळं स्वाभाविक आहे. जिथं कायदा नाही तिथं कायद्याबद्दल आदर कसा असणार? तुमच्या–माझ्यात बोलायचं तर आपलं सरकार...

मिखाइल : मी कुणाचाही कैवार घेत नाही! सर-कारचासुद्धा! आंग्ल-सॅक्सन्सचं उदाहरण घ्या...

झखार बार्दिन आणि निकोलाय स्क्रोबोतोव प्रवेश करतात.

राज्य उभं करायला त्याहून चांगलं साधन नाही. इंग्रज माणूस कायद्यासमोर अगदी सर्कशीतल्या घोड्या-मारखा आज्ञाधारकपणं मागच्या दोन पायांवर उभा राहतो. त्याच्या हाडीमाशी कायदापालन मुरलंय!.. नमस्ते, झखार इवानोविच! नमस्कार, निकोलाय! कामगारांबरोबर तुम्ही उदारमतवादी धोरण राखल्याचा नवा परिणाम सांगतो... त्यांनी मागणी केलीय की, दीचकोवला मी तात्काळ बडतर्फ करावं आणि तसं झालं नाही तर जेवणाच्या सुटीनंतर ते काम करणार नाहीत... होय! कसं काय वाटतं याबद्दल आपल्याला?

झखार (कपाळ चोळत) : मी? हं... दीचकोव-बद्दल? नेहमी मारामाऱ्या करतो तो? आणि पोरींच्या

मागं लागतो तो?... त्या दीचकोवला हाकलून देणं ठीक होईल! अगदी योग्य ठरेल!

मिखाइल (उत्तेजित स्वरात): छीः! माननीय सहकारीमहाराज, जरा गंभीरपणं बोलू या! हा न्याय-अन्यायाचा प्रश्न नाही, तर धोरणाचा आहे. न्याय-अन्याय निकोलायचा प्रांत आहे. आणि मी परत एकदा सांगतो की, न्याय-अन्यायाबाबतचे तुमचे विचार आपल्या धंद्याला अपायकारक आहेत.

झखार: जरा थांबा महाशय! तुम्ही परस्परविरोधी विधानं करता आहात!

पालीना: धंद्याच्या गोष्टी माझ्यासमोर ... ऐन सकाळ-पासून?

मिखाइल: त्याबद्दल हजार वेळा माफी मागतो, पण तरीही पुढं बोलतो – मला वाटतं ही बाब एकदाची स्पष्ट झाली पाहिजे. मी सुटीवर जाण्याच्या आधीपर्यंत मी कारखाना हा असा धरला होता (हाताची घट्ट आवळलेली मूठ दाखवतो) आणि माझ्यापाशी साधा कूं आवाज करण्याची कुणाची हिंमत नव्हती. तुम्हाला माहीत आहे की, ह्या रविवारच्या करमणुकींमधून – वाचन मंडळं आणि तत्सम गोष्टींमधून – काहीही फाय-द्याचं निष्पन्न होणार नाही, असं मी आधीच सांगितलं होतं. कच्च्या रशियन मेंदूवर ज्ञानाची ठिणगी पडली तर प्रबोधनाच्या प्रकाशानं तो उजळून निघत नाही. त्यातून फक्त धूर निघतो आणि तो धुमसतो.

निकोलाय: माणसानं शांतपणं बोलावं.

मिखाइल (कष्टपूर्वक स्वतःला आवरून धरत):

ल्ल्याबद्दल आभार. फार शहाणपणाचा आहे, पण माझ्या उपयोगाचा नाही. झखार इवानोविच, कामगारांबद्दल-च्या तुमच्या धोरणामुळं अवघ्या सहा महिन्यात माझ्या आठ वर्षांच्या मेहनतीवर पाणी पडलंय. माझा सगळे आदर करायचे, मालक म्हणून माझ्याकडं पहायचे. पण आता स्पष्ट झालंय की, दोन मालक आहेत – एक चांगला आणि दुसरा वाईट. चांगला अर्थातच तुम्ही ...

झखार (शरमून) : पण ... कशाला असं बोलता?

पालीना : मिखाइल वासिल्येविच, तुम्ही फार विचित्र बोलताहात!

मिखाइल : तसं बोलायला माझ्यापाशी कारण आहे. मला अत्यंत वेडगळ परिस्थितीत टाकण्यात आलंय. गेल्या वेळी हा प्रश्न उद्‌भवला तेव्हा मी कामगारांना सांगितलं की, दीचकोवला बडतर्फ करण्याऐवजी मी आधी कारखाना बंद करून टाकीन. त्यांना समजलं की, जसं मी बोलतो तसं करतो – आणि गप्प झाले. पण शुक्रवारी झखार इवानोविच, तुम्ही त्या ग्रेकोवला म्हणालात की, दीचकोव उर्मट माणूस आहे आणि तुम्ही त्याला नोकरीवरून काढून टाकणार आहात.

झखार (मऊ आवाजात) : अहो पण जर तो लोकांचे दात पाडायला लागला, तर काय करायचं? अर्थात आपण असं चालवून घेणार नाही. आपण युरोपीयन आहोत – सुसंस्कृत माणसं आहोत!

मिखाइल : सर्वांत प्रथम आपण कारखानदार आहोत! कामगार प्रत्येक सणाला एकमेकांचे दात पाडतात.

आपल्याला काय करायचंय त्यांच्याशी? कामगारांना चांगले रीतीरिवाज शिकवण्याचा प्रश्न तूर्तास तुम्ही लांबणीवर टाकला पाहिजे. आता कचेरीत प्रतिनिधी-मंडळ वाट बघत बसलंय – दीचकोवला तुम्ही बडतर्फ करा अशी ते मागणी करील. काय करायचा तुमचा इरादा आहे?

झखार: दीचकोव काय एवढा मौल्यवान माणूस आहे?

निकोलाय: (शुष्कपणे): मला वाटतं, इथं माण-साचा प्रश्न नाही, तत्त्वाचा आहे.

मिखाइल: अगदी बरोबर! प्रश्न आहे – कारखान्याचे मालक कोण? आम्ही अथवा कामगार?

झखार (हताश होत): हो, मला समजतं! पण ...

मिखाइल: जर त्यांच्यापुढं आपण माघार घेतली, तर आणखी काय मागण्या करतील – मला माहीत नाही. अत्यंत बेशरम लोक आहेत. सहा महिने ह्या रविवारच्या शाळांनी आणि इतर गोष्टींनी आपली भूमिका चोख बजावलीय. माझ्याकडं लांडग्यांसारखं बघतात आणि काही पत्रकं एव्हाना बाहेर पडलीत. समाजवादाचा त्यांना वास आहे असं ऐकतो!

पालीना: असलं दूरचं ठिकाण आणि एकदम समाज-वाद उगवला इथं! गंमत आहे!

मिखाइल: खरंच? माननीय पालीना द्मित्रीयेवना, मुलं जेव्हा लहान असतात, तेव्हा ती सगळीच गंमतीदार वाटतात. पण हळूहळू ती वाढतात आणि एक दिवस आपल्यासमोर दांडगे हरामखोर उभे राहतात.

झखार : काय करायची तुमची इच्छा आहे? अं?

मिखाइल : कारखाना बंद करायचा. थोडा पोटाला चिमटा बसूं दे त्यांना. डोकी थंड होतील.

याकोव उठतो, टेबलापाशी जाऊन दारू पितो आणि सावकाशपणे निघून जातो.

आपण कारखाना बंद केला, म्हणजे बायका येतील... त्या रडतील – भेकतील. आणि स्वप्नांची झिंग आले-ल्यांना शुद्धीवर आणायला बायकांच्या आसवांचा अमो-नियाच्या बाटलीसारखा उपयोग होतो. आसवं चटकन परिणाम करतात.

पालीना : फार कठोर बोलता तुम्ही!

मिखाइल : आयुष्यात तसंच करावं लागतं!

झखार : पण हा उपाय... अगदी आवश्यकच आहे असं वाटतं?

मिखाइल : तुम्ही दुसरा सुचवू शकता!

झखार : मी जाऊन त्यांच्याशी बोललो तर?

मिखाइल : तुम्ही अर्थातच त्यांच्यापुढं नमतं घ्याल आणि मग माझी अत्यंत विचित्र अवस्था होईल... मला माफ करा, पण तुमचा हा डळमळता स्वभाव मला अपमानकारक वाटतो. त्यामुळं होणारं नुकसान तर वेगळंच...

झखार (चटकन) : पण भल्या गृहस्था, मी आक्षेप घेत नाही, फक्त विचार करतोय. तुम्हाला माहीत आहे – मी मूळ जमीनदार आहे, कारखानदार नाही. ह्या सगळया गोष्टी मला नव्या आहेत, अवघड आहेत.

वागण्यात न्याय असावा अशी इच्छा आहे. शेतकरी कामगारांपेक्षा जास्त नम्र आणि सुस्वभावी असतात. शेतकऱ्यांबरोबर मला उत्तम व्यवहार जमतो! कामगारांमध्ये काही माणसं स्वारस्याची आहेत, पण एकूण मी तुमच्याशी सहमत आहे. ते फार मगरूर आहेत.

मिखाइल: विशेषतः तुम्ही त्यांना खूप आश्वासनं दिल्यापासून.

झखार: तुम्ही गेलात आणि लगेच इथं काहीतरी खळबळ सुरू झाली. काही दंगलीही झाल्या. कदाचित मी तेवढा सावध वागलो नाही... पण त्यांना शांत करणं भाग होतं. आपल्याबद्दल वर्तमानपत्रात काहीबाही छापून आलं... फार कडक रीतीनं!

मिखाइल (अधीरपणे): आत्ता दहा वाजून सतरा मिनिटं झालीत. आपल्याला काहीतरी निर्णय घेतलाच पाहिजे. तो असा: एक तर मी कारखाना बंद करतो, किंवा कंपनीतून बाहेर पडतो... कारखाना बंद केला तर आपला काहीही तोटा होणार नाही. मी आवश्यक त्या उपाययोजना केल्यात. तातडीच्या ऑर्डरी पूर्ण झाल्यात आणि गुदामांमध्ये राखीव माल आहे.

झखार: अस्सं! आत्ताच निर्णय घेणं आवश्यक आहे... मला समजतं! निकोलाय वासिल्येविच, तुमचं काय मत आहे?

निकोलाय: मला वाटतं, बंधूंचं म्हणणं बरोबर आहे. जर आपण संस्कृतीचं मोल मानत असू, तर तत्त्वांचं काटेकोर पालन केलं पाहिजे.

झखार: कारखाना बंद करावा असं तुम्हालाही

वाटून? अरेरे, किती वाईट! मिखाइल वासिल्येविच, राग मानू नका... आणखी दहा मिनिटांनंतर मी तुम्हाला उत्तर देतो. चालेल?

मिखाइल: चालेल!

झखार: पालीना, जरा माझ्याबरोबर चल.

पालीना (नवऱ्याबरोबर जात): हे प्रभो! हे सगळं किती अप्रिय आहे...

झखार: जमीनदारांबद्दल शेतकऱ्यांच्या मनात शतकानुशतकं आदराची भावना वसत आलेली आहे...

जातात.

मिखाइल (दात आवळून): बुळबुळीत माणूस! दक्षिणेत शेतकऱ्यांच्या बंडाळया झाल्यानंतर असं बोलतोय! मूर्ख!!

निकोलाय: शांत रहा, मिखाइल! कशाला असं एकदम भडकायचं?

मिखाइल: माझ्या नसा फुटायची वेळ आलीय, समजलास! मी कारखान्यात जातोय आणि – बघ! (खिशातून रिवॉल्वर काढतो.) ह्या गाढवामुळं ते माझा तिरस्कार करतात. पण मी सगळं टाकू शकत नाही. तसं केलं असतं तर सगळयात पहिला तू माझ्यावर ठपका ठेवला असतास. आपलं सगळं भांडवल कारखान्यात गुंतलंय. जर मी अंग काढून घेतलं, तर हा टकल्या मूर्ख सगळा सत्यानाश करील.

निकोलाय (शांतपणे): तू जर अतिशयोक्ती करत नसलास, तर ही परिस्थिती वाईट आहे.

सीन्त्सोव (प्रवेश करतो): कामगार तुम्हाला विचारताहेत.

मिखाइल: मला? काय झालं?

सीन्त्सोव: अशी अफवा पसरलीय की, जेवणाच्या सुटीनंतर कारखाना बंद होणार आहे.

मिखाइल (भावाला): असं कसं झालं? त्यांना कसं माहीत?

निकोलाय: बहुतेक, याकोव इवानोविचनं सांगितलं.

मिखाइल: छ्या:! (दाबू न शकणाऱ्या संतापाने सीन्त्सोवकडे पाहतो.) पण तुम्ही का एवढे अस्वस्थ श्रीमान सीन्त्सोव? इथं येता... प्रश्न विचारता... अं?

सीन्त्सोव: दिवाणजींनी मला तुमच्याकडं यायला सांगितलं.

मिखाइल: असं? अशा पद्धतीनं निरखून बघायची आणि सैतानाप्रमाणं ओठ वाकडे करायची कसली ही तुमची सवय? एवढा कसला तुम्हाला आनंद झालाय?

सीन्त्सोव: मला वाटतं, हा माझा खाजगी प्रश्न आहे.

मिखाइल: मी सहमत नाही. यापुढं अधिक आदबीनं वागत जा माझ्याशी... समजलं?

सीन्त्सोव त्याच्यावर डोळे रोखून पहात राहतो.

अरेच्चा? कशाची वाट पाहताय?

तात्याना (उजव्या बाजूने प्रवेश करत): अग बाई! डायरेक्टर! नेहमीप्रमाणं घाईत? (सीन्त्सोवला उद्देशून

मोठ्यांदा.) मत्वेय निकोलायेविच, नमस्ते!

सीन्त्सोव (प्रेमळ आवाजात): राम राम! कशी आहे प्रकृती? दमला तर नाहीत ना?

तात्याना: नाही, धन्यवाद. वल्हवण्यामुळं हात मात्र दुखताहेत. कचेरीत जाताय? गेटापर्यंत मी येत्ये तुमच्या-बरोबर. मी तुम्हाला काय सांगणार ठाऊक आहे?

सीन्त्सोव: नाही बुवा!

तात्याना (सीन्त्सोवपाशी जात): काल तुम्ही खूप चतुर गोष्टी सांगितल्यात, पण फार भावनाप्रधान होऊन बोललात, फार टोकदार. काही गोष्टी कमी भावनाप्रधानतेनं सांगितल्या, तर त्यांचा अधिक प्रभाव पडतो. (त्यांचा संवाद ऐकू येत नाही.)

मिखाइल: बघा, काय प्रसंग आहे! आत्ता ज्याच्या उद्धटपणाचा मी जाब विचारला, तो तुमचा नोकर धडधडीत तुमच्या डोळ्यांदेखत तुमच्या भागीदाराच्या भावाच्या बायकोशी सलगीनं वागतोय! भाऊ – दारूबाज, बायको – नटी! कुठून इथं कडमडायला आले? काही समजत नाही!

निकोलाय: चमत्कारिक बाई आहे. देखणी आहे, पोषाख छान करते – आकर्षक आहे – पण तरीही त्या दारिद्र्याबरोबर तिची भानगड दिसतेय! तऱ्हेवाईक वागणं, पण मूर्खपणाचं!

मिखाइल (उपहासाने): हा लोकशाहीवाद. ती खेड्यातल्या एका मास्तरणीची मुलगी आहे आणि सामान्य माणसांकडं ती नेहमी ओढली जाते, असं म्हणते. असल्या गावच्या जमीनदारांबरोबर गुंतवून

घ्यायची अवदसा मला कुठून आठवली कुणास ठाऊक!

निकोलाय: ठीक आहे. पण धंदा तर तुझ्या हाती आहे. तूच मुख्य.

मिखाइल: होईन! पण अजून मी मालक नाही.

निकोलाय: मला वाटतं, तिला सहज गटवता येईल. तशी गरम दिसते!

मिखाइल: हा आपला उदारमतवादी... जाऊन झोप-लाय काय तिकडं? नाही, रशिया जगायच्या लायकीचा नाही. माणसं कसल्यातरी तंद्रीत फिरतात, बडबडतात, दिवास्वप्नं पाहतात. सरकारमध्ये विचित्र माणसांचा भरणा झालाय – दुष्ट, मूर्ख... त्यांना काही समजत नाही, काही करायला जमत नाही.

तात्याना (परत येते): तुम्हीही ओरडता? ...सगळीचजणं का कुणास ठाऊक ओरडायला लाग-लीत.

आग्राफेना: मिखाइल वासिल्येविच, तुम्हाला झखार इवानोविच बोलावताहेत.

मिखाइल (झपझप जात): शेवटी बोलावलं तर!

तात्याना (टेबलाशी बसत): एवढे अस्वस्थ का झालेत ते?

निकोलाय: मला वाटतं, ते समजून घेण्यात तुम्हाला फारसा रस नाही.

तात्याना (शांतपणे): त्यांना पाहिलं म्हणजे मला एका पोलीसाची आठवण येते. आमच्या कस्त्रोमामध्ये थिएटरात नेहमी एक पोलीस गस्त घालायचा. उंच होता आणि डोळे बटबटीत.

निकोलाय : माझ्या भावाशी साम्य दिसत नाही.

तात्याना : मी बाहेरच्या साम्याबाबत बोलत नाही. तो पोलीससुद्धा नेहमी कुठंतरी जायच्या घाईत असायचा. तो चालायचा नाही – पळायचा ! आणि धूम्रपान करायचा नाही – सिगारेटी फस्त करायचा ! तो जगतो असं वाटायचंच नाही – सगळा वेळ कुठंतरी उड्या मारत धावत असायचा. पण कुठं हे त्याला स्वतःलासुद्धा माहीत नव्हतं.

निकोलाय : तुम्हाला वाटतं – त्याला माहीत नव्हतं ?

तात्याना : माझी खात्री आहे. माणसाला स्वतःचं उद्दिष्ट स्पष्ट ठाऊक असतं, तेव्हा तो शांतपणे जातो. पण हा घाई करत होता. त्याची घाई वेगळ्या प्रकारची होती. काहीतरी त्याला आतून रेटत होतं आणि तो पळत होता – स्वतःला आणि इतरांना अडथळा आणत होता. तो लोभी नव्हता… मर्यादित अर्थानं ! फक्त सगळ्या कर्तव्यांमधून, लाच घेण्याच्यासुद्धा, लौकरात लौकर मुक्त होण्याचा त्याला ध्यास लागला होता. तो लाच घ्यायचा नाही – हिसकावून घ्यायचा आणि घाईमध्ये आभार मानायचेसुद्धा विसरायचा. शेवटी तो घोड्यांच्या टापांखाली सापडला आणि ठार झाला.

निकोलाय : माझ्या भावाची ताकद हेतूशून्य खर्च होतेय असं तुम्हाला सुचवायचंय ?

तात्याना : तुम्हाला माझ्या बोलण्यातून असा अर्थ लागला ? मला असं म्हणायचं नव्हतं… फक्त त्या पोलीसाशी त्यांचं साम्य आहे.

निकोलाय : भावाला प्रशंसनीय वाटेल असं यात काही नाही.

तात्याना : पण त्यांची प्रशंसा करण्याचा माझा मुळी इरादाच नाही.

निकोलाय : तुमचा नखरा करण्याचा ढंग अगदी वेगळा आहे.

तात्याना : असं?

निकोलाय : आणि फारसा मजेचा नाही.

तात्याना (शांतपणे) : तुमच्याबरोबर मजा वाटेल अशा बायका आहेत?

निकोलाय : ओहो!

पालीना (प्रवेश करत) : आज आमची एक गोष्ट धड पार पडत नाही. कुणीही न्याहरी करत नाही, सगळे झोप अर्धवट झाल्यासारखे वागताहेत... नाद्या खूप सकाळीच क्लेओपात्रा पेत्रोवनाबरोबर रानात अळंब्या गोळा करायला गेलीय. काल मी तिला जाऊ नको म्हटलं होतं... देवा... जगणं अवघड होत चाललंय!

तात्याना : तू फार खातेस!

पालीना : तान्या, असा सूर कशाला? माणसांशी तुझं वागणं विचित्र आहे.

तात्याना : खरंच?

पालीना : माणसापाशी काहीही नसतं आणि सगळ्या जबाबदाऱ्यांपासून मुक्ती असते, तेव्हा शांत राहणं सोपं आहे. पण हजार लोकांना पोसायची जबाबदारी म्हणजे थट्टा नव्हे!

तात्याना : तू सोडून दे ही जबाबदारी! नको

ेमु! खुशाल जगू दे त्यांना हवं तसं! देऊन टाक त्यांना सगळं – कारखाना, जमीन – आणि शांत हो!

निकोलाय (सिगारेट पेटवत): कोणत्या नाटकातला संवाद म्हटलात?

पालीना: कशाला असं बोलत्येस तान्या? मला समजत नाही. झखार किती अस्वस्थ झालाय हे बघायचंस. कामगार ताळ्यावर येईपर्यंत कारखाना बंद ठेवायचा आम्ही निर्णय घेतलाय. किती हे कठीण आहे ह्याचा जरा विचार कर! शेकडो माणसं बेकार होणार. त्यांना पोरंबाळं आहेत... भयंकर!

तात्याना: जर भयंकर आहे तर कारखाना बंद करू नका! स्वतःलाच अप्रिय गोष्ट का करून घ्यायची?

पालीना: तान्या, किती पीडादायी आहेस तू! आम्ही जर कारखाना बंद केला नाही, तर कामगार संपावर जातील आणि ते आणखीच वाईट होईल.

तात्याना: काय वाईट होईल?

पालीना: एकूण सगळंच! त्यांच्या सगळ्या मागण्यांपुढं आम्ही नमतं कसं घेणार? आणि शेवटी ह्या त्यांच्या स्वतःच्या मागण्या नव्हेत – समाजवाद्यांनी त्यांना पढवलंय आणि ते ओरडतात! (संतापून.) मला हे समजत नाही! परदेशात समाजवाद स्वतःच्या जागी आहे आणि त्याचे कारभार उघडपणं चालतात. पण आपल्या रशियात कामगारांना कोपऱ्यांमध्ये गाठून त्यांच्या कानात कुजबुजतात. राजसत्तेमध्ये समाजवाद अस्थानी आहे ह्याची मुळीच जाण न ठेवता! आपल्याला

घटना हवी, समाजवाद नव्हे! निकोलाय वासिल्येविच, तुमचं काय मत आहे?

निकोलाय (किंचित हसून) : मी किंचित वेगळ्या दृष्टीनं पाहतो. समाजवाद फार धोकादायक आहे. आणि ज्या देशात वांशिक तत्त्वज्ञान नाही, जिथं प्रत्येक गोष्ट धावत-पळत उसनी घेतली जाते, तिथं समाजवादा-ला हमखास सुपीक जमीन सापडणार. आपण अतिरेकी माणसं आहोत. हेच आपलं दुखणं आहे.

पालीना : अगदी खरं आहे! आपण माणसं अतिरेकी आहोत.

तात्याना (उठत) : विशेषत: तू आणि तुझा नवरा. किंवा हे वकील महाशय.

पालीना : तुला काही माहीत नाही तान्या! झखारला आमच्या गुबेर्नियात लाल समजतात!

तात्याना (येरझाऱ्या घालत) : मला वाटतं, तो लाल होतो फक्त शरमेपायी आणि तेसुद्धा क्वचित!

पालीना : काय ग हे तान्या!

तात्याना : ह्यात अपमान झाला? माझा तसा हेतू नव्हता. तुमचं आयुष्य मला हौशी कलावंतांच्या नाटका-सारखं भासतं. पात्रयोजना चुकीची, अभिनयगुणांचा पत्ता नाही, प्रत्येकाचं काम भयानक! नाटक समजून घेणं अशक्य!

निकोलाय : ह्यात काही सत्य आहे. नाटक भयानक कंटाळवाणं आहे अशी प्रत्येकजण तक्रार करतोय.

तात्याना : आपणच नाटक बिघडवून टाकतोय. एक्स्ट्रा नटांना आणि स्टेजमागं काम करणाऱ्यांना ते समजायला

लागलंय. एक दिवस ते आपल्याला स्टेजवरून हाकलून लावणार!

जनरल आणि कोन येतात.

निकोलाय: तुम्ही फारच लांब ताणलंत!

जनरल (आरोळी मारतो): पालीना! जनरलसाठी दूध! थंडगार दूध! (निकोलायला.) ओ हो, काय-द्याची शवपेटी!.. माझ्या मोहक पुतणी, तुझा हात दे! कोन, धडा पाठ कर: शिपाई कुणाला म्हणतात?

कोन (कंटाळवाण्या स्वरात): वरिष्ठाच्या मर्जी-नुसार वागणाऱ्याला, साहेब!

जनरल: शिपाई मासा होऊ शकतो?

कोन: शिपायाला सगळं आलं पाहिजे...

तात्याना: काकासाहेब, काल तुम्ही याच प्रवेशानं आमची करमणूक केली होती. पण दररोज काय जरूरी आहे ह्याची?

पालीना (सुस्कारत): रोजच्या रोज, पोहून झाल्या-नंतर!

जनरल: होय, रोजच्या रोज! आणि नेहमी काहीतरी वेगळं! त्या म्हाताऱ्या विदूषकानं स्वतःच प्रश्न बनवून स्वतःच उत्तरं दिली पाहिजेत.

तात्याना: तुम्हाला हे आवडतं, कोन?

कोन: साहेबांना आवडतं.

तात्याना: पण तुम्हाला?

जनरल: त्यालासुद्धा!

कोन: सर्कससाठी आता मी म्हातारा झालोय. पण

खायला पाहिजे असेल तर नाचलं पाहिजे ...

जनरल : अरे धूर्त हलकटा ! घूम जाव !

तात्याना : म्हाताऱ्याची थट्टा करायचा तुम्हाला कंटाळा येत नाही ?

जनरल : मी स्वतःच म्हातारा आहे ! पण तुम्ही सर्वांत जास्त कंटाळवाण्या आहात ... नटीनं हसवलं पाहिजे . पण तुम्ही ?

पालीना : तुला ठाऊक आहे , काका ...

जनरल : काहीही ठाऊक नाही .

पालीना : आम्ही कारखाना बंद करतोय .

जनरल : असं ? फार छान ! आता भोंगे वाजायचे नाहीत ! ऐन सकाळी छान साखरझोप लागलेली असते , तेवढ्यात ऊ-ऊ-ऊ ! बंद करून टाका !

मिखाइल (लगबगीने येतो) : निकोलाय , एक मिनिट ! (त्याला बाजूला घेत .) कारखाना बंद केला ! पण तरीही काही उपाययोजना केल्या पाहिजेत . व्हाईस-गव्हर्नरना तार पाठव . थोडक्यात परिस्थिती कळव आणि शिपायांची मागणी कर . माझ्या नांवाची सही कर .

निकोलाय : ते माझेही स्नेही आहेत .

मिखाइल : मी चलतो – त्या प्रतिनिधींना सैतानाकडं धाडायला ! तारेबद्दल तू बोलू नको . जेव्हा गरज पडेल तेव्हा मी स्वतःच सांगीन ... समजलं ?

निकोलाय : ठीक आहे .

मिखाइल : स्वतःच्या मनाप्रमाणं वागता आलं म्हणजे फार छान वाटतं ! बंधू , मी तुझ्यापेक्षा वयानं मोठा

असलो, तरी मनानं जास्त तरुण आहे. होय ना?

निकोलाय: मला वाटतं, हे तारुण्य नव्हे, हा घाबरटपणा आहे.

मिखाइल (उपहासाने): तुला दाखवतो मी घाबरटपणा! बघशील! (हसून निघून जातो.)

पालीना: त्यांनी ठरवलं ना, निकोलाय वासिल्येविच?

निकोलाय (जात): असं दिसतंय!

पालीना: देवा रे!

जनरल: काय ठरवलं?

पालीना: कारखाना बंद करायचं...

जनरल: ते होय!.. कोन!

कोन: मी इथं आहे.

जनरल: गळ आणि होडी!

कोन: तयार!

जनरल: माशांबरोबर मौन धरायला जातो... माणसांबरोबर कंटाळत बसण्यापेक्षा ते जास्त शहाणपणाचं... (हसतो.) छान बोललो की नाही?

नाद्या धावत येते.

अरे माझ्या फुलपाखरा! काय झालं?

नाद्या (आनंदाने): मोठ्ठं साहस! (मागे वळून हाक मारते.) कृपा करून इकडं या! ग्रेकोव! क्लेओपात्रा पेत्रोवना, तुम्ही त्यांना सोडू नका! बरं का काकाजी, आम्ही रानातून बाहेर आलो — अचानक समोर तीन झिंगलेले कामगार... समजलं?

पालीना : बघ ! मी नेहमी तुला सांगत होत्ये ...

क्लेओपात्रा (तिच्या पाठोपाठ ग्रेकोव येतो) : त्याहून किळसवाणी कल्पना करू शकता !

नाद्या : किळसवाणं काय त्यात ? फक्त गंमत होती ! मावशी, तीन कामगार ... गालातल्या गालात हसतात आणि म्हणतात : "नमस्ते, बाईसाहेबांनो !"

क्लेओपात्रा : त्यांना कामावरून हाकलून दे, असं मी नक्की नवऱ्याला सांगणार !

ग्रेकोव (स्मित करत) : कशाबद्दल ?

जनरल (नाद्याला) : हा कोण – काळतोंडचा ?

नाद्या : आमचा रक्षणकर्ता ! आजोबा, समजलं ?

जनरल : मला काहीही समजत नाही !

क्लेओपात्रा (नाद्याला) : तुमची सांगण्याची तऱ्हा वेगळीच !

नाद्या : मी घडलं तसं सांगत्येय.

पालीना : नाद्या, तुझ्या सांगण्यातून कसलाही बोध होत नाही.

नाद्या : कारण तुम्ही माझ्या बोलण्यात अडथळा आणता आहात ! ...आमच्यापाशी आले आणि म्हणतात : "बाईसाहेबांनो ! आमच्याबरोबर गाणी गा !"

पालीना : काय तरी बेशरमपणा !

नाद्या : मुळीच नाही ! "म्हणाले – तुम्ही फार छान गाता हे आम्हाला माहीत आहे ... अर्थात आम्ही दारू प्यायलोय, पण दारू प्यायल्यानंतरच आम्ही छान असतो !" मावशी, हे मात्र खरं ! दारू प्यायल्यानंतर ते नेहमीप्रमाणं उदास नव्हते !

क्लेओपात्रा : आमचं सुदैव म्हणून हा तरुण माणूस ...

नाद्या : मी तुमच्यापेक्षा जास्त चांगलं सांगत्ये! क्लेओपात्रा पेत्रोवना सुरवातीला त्यांना रागं भरू लाग-ल्या – तुम्ही निष्कारण तसं वागलात! मी खात्रीपूर्वक सांगत्ये! तेव्हा त्यांच्यातल्या एकानं ... खूप उंच आणि लुकडा होता ...

क्लेओपात्रा (गंभीरपणे) : मी त्याला ओळखत्ये!

नाद्या : ... त्यानं ह्यांचा हात धरला आणि अगदी दुःखानं म्हणाला : "तुम्ही एवढ्या सुंदर, शिकल्या-सवरलेल्या बाई! तुम्हाला बघितलं म्हणजे मनाला छान वाटतं! आणि तुम्ही रागावता? आम्ही तुमचा अपमान केला काय?" फार छान बोलला तो – अगदी मनापासून! पण दुसरा मात्र – तो खरंच ... तो म्हणा-ला : "त्यांच्याबरोबर काय बोलतोस? त्यांना काही समजणं शक्य आहे का? ती माणसं नाहीत – पशू आहेत!" आम्ही पशू – मी आणि ह्या! (हसते.)

तात्याना (हसून) : हे बिरूद तुला आवडलेलं दिसतंय?

पालीना : मी तुला बजावलं होतं नाद्या ... इथून कुठं कुठं पळत्येस ...

ग्रेकोव (नाद्याला) : मी जाऊ शकतो?

नाद्या : नाही, नाही! चहा घेणर? किंवा दूध? घेणार?

जनरल खो खो हसतात, क्लेओपात्रा खांदे उडवते. तात्याना ग्रेकोवकडे पाहते आणि शांतपणे गुणगुणते.

पालीना मान खाली घालते व लक्षपूर्वक चमचे पुसू लागते.

ग्रेकोव (स्मित करत) : धन्यवाद, मला नको.

नाद्या (आग्रह करत) : कृपा करून लाजू नका! ही सगळी छान माणसं आहेत! खरंच!

पालीना (निषेधाच्या स्वरात) : नाद्या!

नाद्या (ग्रेकोवला) : तुम्ही जाऊ नका. मी आत्ता सगळं सांगत्ये...

क्लेओपात्रा (नाराजीने) : थोडक्यात म्हणजे हा तरुण माणूस योग्य वेळी तिथं अवतरला आणि आम्हाला त्रास देऊ नका असं त्यानं स्वतःच्या झिंगलेल्या मित्रांना समजावलं... आणि आम्हाला इथपर्यंत सोबत कर अशी मी त्याला विनंती केली. बस्स, एवढंच...

नाद्या : छीः, काय हे! तुम्ही सांगता आहात त्याप्रमाणं जर सगळं घडलं असतं, तर रटाळपणापायी सगळीजणं मेली असती!

जनरल : काय समजायचं बुवा?

नाद्या (ग्रेकोवला) : तुम्ही बसा! मावशी, ह्यांना बसायला सांगा ना! अशी आंबट तोंड का तुमची?

पालीना (बसूनच, ग्रेकोवला) : तरुण गृहस्था, मी तुमचे आभार मानत्ये...

ग्रेकोव : कशाला उगीच!

पालीना (अधिक कोरडेपणाने) : ह्या बायकांचं तुम्ही रक्षण केलंत, हे फार छान वागलात!

ग्रेकोव (शांतपणे) : त्यांचं रक्षण करण्याची मुळीच

आवश्यकता नव्हती ... त्यांना कुणीही अपाय केला नाही.

नाद्या : मावशी ! असं बोलतात होय ?

पालीना : कृपा करून मला शिकवू नकोस !

नाद्या : अग पण, कुणीही कुणाचं रक्षण केलं नाही ! हे फक्त त्यांना म्हणाले : "मित्रांनो, पुरे करा, हे चांगलं नाही !" ह्यांना बघून त्यांना खूप आनंद झाला. म्हणाले – "ग्रेकोव ! चल आमच्याबरोबर ! तू हुषार आहेस !" मावशी, हे खरंच हुषार आहेत ... ग्रेकोव, मला माफ करा, पण हे अगदी सत्य आहे !

ग्रेकोव (स्मित करत) : तुम्ही मला अगदी पेचात टाकनाय !

नाद्या : मी नव्हे ! ही माणसं – ग्रेकोव !

पालीना : नाद्या ! तुझे हे उत्साहाचे झटके मला समजत नाहीत ! अगदी हास्यास्पद वागतेस !.. पुरे आता !

नाद्या (उत्तेजित होऊन) : तसं असेल तर हसा मला ! असे घुबडासारखं बसता कशाला ? खुशाल हसा !

क्लेओपात्रा : नाद्याला पराचा कावळा करायची किमया छान साधलीय. आणि तेसुद्धा भरपूर गोंगाट करून ! विशेषकरून आत्ता डोळ्यांना हे स्पष्ट दिसतंय – एक तिऱ्हाईत माणूससुद्धा तिला हसतोय !

नाद्या (ग्रेकोवला) : तुम्ही मला हसता ? कशाला ?

ग्रेकोव (सहजपणे) : मला तुमचं कौतुक वाटतंय. मी हसत नाही.

पालीना (गडबडून) : काय ? काका ...

क्लेओपात्रा (हसून) : ऐका !

जनरल : आता पुरे ! थोडक्यात गोडी ! तरुण माणसा, हे घे आणि जा !

ग्रेकोव (मागे वळत) : धन्यवाद ! पण ज़रूर नाही.

नाद्या (हातांनी तोंड झाकून) : छी: ! कशाला असं ?

जनरल (ग्रेकोवला थांबवत) : थांब ! हे दहा रूबल आहेत.

ग्रेकोव (शांतपणे) : मग काय झालं ?

क्षणभर सगळे गप्प.

जनरल (गोंधळून) : ए ... तुम्ही कोण ?

ग्रेकोव : कामगार.

जनरल लोहार ?

ग्रेकोव : फिटर.

जनरल (कठोरपणे) : एकूण एकच ! हे पैसे तू का घेत नाहीस ?

ग्रेकोव : नकोत मला.

जनरल (चिडून) : हा काय पोरखेळ ? काय पाहिजे तुला ?

ग्रेकोव : काहीही नको.

जनरल : कदाचित ह्या मुलीला लग्नाची मागणी घालायची तुझी इच्छा असेल ? (खो खो हसतो.)

सगळेजण शरमिंदे होतात.

नाद्या अहो, तुम्ही हे काय चालवलंय?

पालीना: काका, कृपा करून...

ग्रेकोव (शांतपणे, जनरलना): तुमचं वय काय?

जनरल (आश्चर्याने): काय? माझं... वय?

ग्रेकोव (त्याच सुरात): तुमचं वय काय?

जनरल (भोवती नजर टाकत): काय प्रकार आहे? एकसष्ट वर्षं... कशाबद्दल विचारलं?

ग्रेकोव (निघून जात): एवढ्या वयापर्यंत तुम्हाला शहाणपण यायला पाहिजे होतं!

जनरल: काय? मला... शहाणपण?

नाद्या (ग्रेकोवमागे धावत): ऐका... तुम्ही रागावू नका! आजोबा म्हातारे आहेत. पण ही सगळी माणसं चांगली आहेत. शप्पत!

जनरल: हा काय सैतानीपणा?

ग्रेकोव: तुम्ही बेचैन होऊ नका! हे सगळं अपेक्षित आहे.

नाद्या: उकाड्यामुळं त्यांना असं होतंय... म्हणून ते असं विचित्र वागताहेत... आणि मी सगळी हकीकत नीट सांगितली नाही.

ग्रेकोव (स्मित करत): तुम्ही कसंही सांगितलं असतं, तरी त्यांना समजलं नसतं. खात्री बाळगा.

ते अदृश्य होतात.

जनरल (संतापून): कशी हिंमत केली त्यानं मला असं बोलण्याची?

तात्याना : तुम्ही निष्कारण त्याच्या हातात पैसे कोंबलेत.

पालीना : काय करावं बाई ह्या नाद्याला! हे सगळं तिच्यामुळं घडलं!

क्लेओपात्रा : केवढा पण अभिमान त्याला! माझ्या नवऱ्याला सांगून त्याला कामावरून काढायला लावत्ये!

जनरल : कुत्तरडा साला!

पालीना : नाद्या अगदी अशक्य आहे! धावली त्याच्या मागं! मला फार काळजी वाटते तिची!

क्लेओपात्रा : तुमचे समाजवादी दर दिवसागणिक जास्त उर्मट बनत चाललेत.

पालीना : तो समाजवादी आहे असं तुम्हाला का वाटतं?

क्लेओपात्रा : मला दिसतंय! सगळे व्यवस्थित वागणारे कामगार समाजवादी असतात.

जनरल : मी झखारला ,सांगतो... ह्या शेंबड्या पोराला मानगुटीला धरून आजच कारखान्याबाहेर फेकून दे!

तात्याना : कारखाना बंद झालाय.

जनरल : तरीसुद्धा – मानगुटी धरून!

पालीना : तान्या! नाद्याला बोलाव! तिला म्हणावं, मी अगदी हात टेकलेत तिच्यापुढं!

तात्याना जाते.

जनरल : नीच! वय किती म्हणे!

क्लेओपात्रा : ते दारुडे आमच्यापाठी शिट्या वाजवत

होते ... आणि तुम्ही वाचन-मंडळं भरवता, आणखी काय काय करता – त्यांना लाडावून ठेवता!

पालीना: खरं आहे तुमचं! गुरुवारी मी खेड्यात गेले होते: एकदम शीळ ऐकली! मलासुद्धा शीळा घालतात! असभ्यपणा तर आहेच, पण अशामुळं घोडे बिथरायची भीती!

क्लेओपात्रा (पांडित्याचा आव आणून): झखार इवानोविच फार गोष्टींना कारणीभूत आहेत! माझा नवरा म्हणतो त्याप्रमाणं ते स्वतःमध्ये आणि ह्या माणसांमध्ये योग्य अंतर राखत नाहीत.

पालीना: तो फार नरम स्वभावाचा आहे. सगळ्यांशी भलेपणानं वागावंसं वाटतं त्याला! लोकांबरोबर प्रेमाचे संबंध ठेवणं दोन्ही बाजूंच्या हिताचं ठरतं, असं त्याचं मत आहे. शेतकऱ्यांच्या बाबतीत त्याचं बरोबर आहे. ते जमीन खंडानं घेतात, खंड भरतात आणि सगळं सुरळीत चालत. पण हे कामगार ...

तात्याना आणि नाद्या येतात.

नाद्या, लाडके, तुला समजतं की, किती अयोग्य ...

नाद्या (संतापून): तुम्ही ... तुम्ही अयोग्य वागलात! उकाड्यानं तुम्ही सगळे शिजून निघालात, चिडके बनला आहात, तुम्हाला काहीही समजत नाही! आणि आजोबा, तुम्ही ... किती मूर्ख आहात तुम्ही!

जनरल (चिडून): मी? मूर्ख? पुन्हा एकदा?

नाद्या: लग्नाच्या मागणीचं कशाला बोललात? शरम नाही वाटली?

जनरल : शरम ? आता मात्र फार झालं ! धन्यवाद ! आजच्या दिवसाला एवढं पुरे ! (निघून जाताना ओरडतात.) कोन ! तुझ्या सगळ्या अवलादीचा सैतान नायनाट करो ! मठ्ठा, रेम्याडोक्या, कुठं कडमडला आहेस तू ?

नाद्या : आणि मावशी, तुम्ही !.. परदेशी राहिला आहात, राजकारणाच्या चर्चा करता ! पण माणसाला साधं बसायला सांगत नाही, चहाचा एक कप पुढं करत नाही ! काय पण तुम्ही !

पालीना (ताडकन उठते, चमचा फेकून देत) : हे असह्य आहे ! काय बोलतेस तू हे समजतं तुला ?

नाद्या : आणि क्लेओपात्रा पेत्रोवना... तुम्हीसुद्धा त्यांच्याबरोबर तिथं प्रेमानं, लाडानं, मधाळ बोलत होतात आणि इथं...

क्लेओपात्रा : मी काय त्याचं चुंबन घ्यायला हवं होतं ? माफ करा, त्याचा चेहरा धुतलेला नव्हता ! आणि तुमचे आरोप ऐकायला मी बांधलेली नाही. पालीना द्मित्रीयेवना, पाहिलंत ? हा लोकशाहीवाद अथवा... मानवतावाद ! माझ्या नवऱ्याच्या मानेवर आत्ता ह्याचं ओझं पडलंय ! पण एक दिवस तुमच्याही मानेवर त्याचा बोजा पडणार आहे एवढं लक्षात ठेवा !

पालीना : क्लेओपात्रा पेत्रोवना, नाद्याच्या वर्तनाबद्दल मी तुमची माफी मागत्ये...

क्लेओपात्रा (जात) : काही गरज नाही. एकट्या नाद्याचा हा प्रश्न नाही... तुम्ही सगळेच दोषी आहात !

पालीना : ऐक, नाद्या ! तुझ्या आईनं मरतेवेळी

तुझ्या पालनपोषणाची जबाबदारी माझ्यावर टाकली ...

नाद्या : उगीच माझ्या आईचा उल्लेख करू नका! तिच्याबद्दल तुम्ही कधीही नीट बोलत नाही!

पालीना (चकित होऊन) : नाद्या! तुला बरं वाटत नाही का? काय बोलत्येस त्याचं भान ठेव! तुझी आई माझी बहीण होती आणि तुझ्यापेक्षा मी तिला नक्कीच जास्त ओळखत होत्ये!

नाद्या (डोळ्यातील अश्रू कसेबसे आवरून) : तुम्हाला काहीही माहीत नाही! गरीब आणि श्रीमंतात सारखेपणा नसतो! माझी आई गरीब होती, चांगली होती ... गरीबांची तुम्हाला ओळख नाही! तुम्ही तान्या मावशी-लासुद्धा नीट ओळखत नाही!

पालीना : नदेज्दा, तू इथून जा आता! चालती हो!

नाद्या : जातेच! पण माझंच बरोबर आहे! तुमचं नाही – माझं!

पालीना : देवा रे! चांगली धडधाकट पोरगी आणि एकदम उन्मादवायूनं झपाटल्यासारखी वागायला लागलीय! तान्या मला माफ कर, पण तुझी शिकवण तिला असं वागायला कारणीभूत ठरलीय! जणू मोठ्या माणसाप्रमाणं तिला समजून तिच्याशी तू सगळ्या विषयांवर बोलत्येस कामगारांच्या संगतीत तिला घेऊन जात्येस ... त्या कचेरीतल्या माणसांकडं ... फार विचित्र आहे सगळं! शिवाय तुमचे नौकाविहार ...

तात्याना : तू शांत हो! काहीतरी पी! तुला मान्य केलं पाहिजे की, ह्या कामगाराबरोबर तू खुबीनं

वागली नाहीस! त्याला बसायला सांगितलं असतंस तर काही त्यानं खुर्ची मोडली नसती!

पालीना: तुझं म्हणणं बरोबर नाही. कामगारांशी मी वाईट थोडंच वागत्ये? पण बाई ग, प्रत्येक गोष्टी-च्या मर्यादा पाळायला हव्यात!

तात्याना: आणि तू म्हणत्येस त्याप्रमाणं मी तिला कुठंही घेऊन जात नाही. ती स्वतःच येते आणि तिला अडवावं असं मला वाटत नाही.

पालीना: ती स्वतः येते? जणू काही तिला समज-तंच – कुठं जायचं ते!

झिंगलेला याकोव सावकाशपणे येतो.

याकोव (बसत): कारखान्यात बंडाळी होणार.

पालीना (जड स्वरात): पुरे करा, याकोव इवानोविच!

याकोव: नक्की होणार. बंडाळी होणार. ते कारखाना पेटवणार आणि आपणा सर्वांना त्या आगीत भाजून काढणार – सशांसारखं!

तात्याना (संतापून): मला वाटतं, एव्हाना तू प्यायला आहेस!

याकोव: ह्यावेळेपर्यंत मी नेहमीच प्यायलेला असतो. आत्ता क्लेओपात्राला पाहिलं... फार भिकार बाई आहे! तिच्या अनेक पुरुषांशी भानगडी आहेत म्हणून नव्हे... पण तिच्या छातीत काळजाऐवजी दुष्ट म्हातारा कुत्रा बसलाय!

पालीना (उठत): देवा रे देवा! सगळं छान

चाललं होतं आणि अचानक... (बागेत येरझाऱ्या घालू लागते.)

याकोव: मोठा कुत्रा नव्हे, पण दुष्ट आणि लूतभरा! लोभी! तिथं बसून दात विचकतोय. पोट फुटेपर्यंत खाल्लंय – सगळं फस्त केलंय. पण अजून कशाची तरी हाव आहे – काय हवंय ते मात्र त्याला समजत नाही. सारखा अस्वस्थ!

तात्याना: चूप बैस, याकोव! तुझा भाऊ येतोय बघ!

याकोव: मला भावाची गरज नाही! तान्या, मला समजतं – इतःपर माझ्यावर प्रेम करणं अशक्य आहे. पण तरीही त्याचं मला दुःख होतं. ही वेदना ठणकत असली तरी तुझ्यावर प्रेम करण्यात मला ती अडथळा आणत नाही.

तात्याना: तू जरा ताजातवाना झालास तर बरं होईल! जा, आंघोळ कर.

झखार (प्रवेश करत): काय? कारखाना बंद केल्याचं एव्हाना जाहीर केलं?

तात्याना: माहीत नाही.

याकोव: जाहीर केलेलं नाही, पण कामगारांना माहीत आहे.

झखार: कसं? कुणी सांगितलं त्यांना?

याकोव: मी. गेलो तिथं आणि सांगितलं.

पालीना: (प्रवेश करत): कशाला?

याकोव (खांदे उडवत): असंच... त्यांना ह्यात रस वाटतो. मी त्यांना सगळं सांगतो... ते ऐकतात.

मला वाटतं, मी त्यांना आवडतो. त्यांच्या मालकाचा भाऊ दारुडा आहे हे पहायला त्यांना छान वाटतं. समतेची भावना त्यामुळं त्यांना जाणवते.

झखार: अस्सं... याकोव, तू सारखा कारखान्यात येत असतोस... अर्थात ह्याला माझा विरोध नाही! पण मिखाइल वासिल्येविच म्हणतात की, कामगारां-बरोबर गप्पा मारताना तू कधी कधी कारखान्यातल्या कारभारावर टीका करतोस.

याकोव: तो खोटं बोलतो. कारभार – गैरकारभार ह्याबाबत मला काहीही समजत नाही.

झखार: तसंच ते म्हणतात की, कधी कधी तू बरोबर वोदका घेऊन जातोस.

याकोव: खोटं! बरोबर घेऊन जात नाही – मागवून घेतो. आणि कधी कधी नव्हे – नेहमी! तुला समजतं – वोदका असल्याशिवाय त्यांना माझ्यात रस वाटणार नाही!

झखार: याकोव, तू स्वतःच विचार कर – तू खुद्द मालकाचा भाऊ...

याकोव: ही माझी एवढी एकच उणीव नाही.

झखार (अपमानीत होत): ठीक आहे, मी गप्प बसतो! अगदी तोंड बंद ठेवतो! माझ्याभोवती असं वैराचं वातावरण का निर्माण होतंय हेच समजत नाही!

पालीना: हे मात्र खरं! नदेज्दा इथं काय बोलली हे तू ऐकायला पाहिजे होतं!

पालोगी (धावत येतो): मला सांगायची परवानगी

द्या ... आत्ता ... आत्ता ... डायरेक्टरसाहेबांचा खून झाला !

झखार : काय ?

पालीना : तुम्ही ... तुम्ही काय म्हणालात ?

पालोगी : अगदी ठार मारलं ! खाली पडले ...

झखार : कोण ... कुणी गोळी झाडली ?

पालोगी : कामगारांनी .

पालीना : त्यांना पकडलं ?

झखार : तिथं डॉक्टर आलेत ?

पालोगी : मला माहीत नाही .

पालीना : याकोव इवानोविच ! .. तुम्ही जा तिकडं !

याकोव (हात झटकत) : कुठं ?

पालीना : हे कसं घडलं ?

पालोगी : डायरेक्टरसाहेब फार संतापले होते . त्यांनी एका कामगाराच्या पोटात लाथ मारली .

याकोव : इकडं येताहेत ...

गोंधळ . मिखाइल स्क्रोबोतोवला निकोलाय आणि लेवशिन नावाचा मध्यमवयीन टक्कलवाला कामगार धरून आणतात . अनेक कामगार आणि कर्मचारी त्यांच्यासमवेत येतात .

मिखाइल (थकल्या आवाजात) : मला मोडा ... खाली निजवा .

निकोलाय : कुणी गोळी झाडली ते तू पाहिलंस ?

मिखाइल : मी थकलोय ... मी दमलोय ...

निकोलाय (चिकाटीने) : कुणी गोळी झाडली हे तुझ्या ध्यानात आलं ?

मिखाइल : मला वेदना होतेय ... कुणीतरी तांबडकेशा ... खाली निजवा मला ... कुणीतरी तांबडकेशा होता ...

त्याला टर्फच्या आसनावर निजवतात .

निकोलाय (पोलीसाला) : ऐकलंत ? तांबडकेशा ...

पोलीस : होय , साहेब !

मिखाइल : आता काय फरक पडतोय !

लेवशिन (निकोलायला) : आत्ता त्यांना त्रास देऊ नका !

निकोलाय : चूप ! डॉक्टर कुठं आहे ? मी विचारतोय , डॉक्टर कुठं आहे ?

सगळे कुजबुजू लागतात आणि निष्कारण धावपळ करतात .

मिखाइल : ओरडू नको ! मला दुखतंय ... मला आराम करूं द्या !

लेवशिन : आराम करा मिखाइल वासिल्येविच , शांत रहा ! छी: , माणसाचं आयुष्य म्हणजे सगळा पैशाचा मामला ! पैशासाठी सगळी धडपड ! पैसा म्हणजे आमची आई आणि पैसाच आमचं मरण !

निकोलाय : पोलीस ! बघ्यांची गर्दी हटवा इथून !

पोलीस (हळू आवाजात) : मंडळी , निघा इथून ! बघण्यासारखं काही नाही इथं !

झखार (हळूच) : डॉक्टर कुठं आहेत ?

निकोलाय : मीषा ! .. मिखाइल ! (भावावर ओणवा

ल्यो. इतरही सगळे खाली वाकतात.) मला वाटतं...
ते वारला!

झखार: छे: हो! बेशुद्ध झाले असतील!

निकोलाय (सावकाशपणे, हळू आवाजात): तुम्हाला समजतं, झखार इवानोविच? तो मेला!

झखार: पण... कदाचित तुमची चूक होत असेल!

निकोलाय: नाही. तुम्ही त्याच्या खुनाला जबाबदार आहात! तुम्ही!

झखार (स्तंभित होत): मी?

तात्याना किती क्रूर... किती मूर्खासारखं!

निकोलाय (झखारवर चालून जात): होय, तुम्ही!

पोलीस-प्रमुख (धावत): कुठं आहेत डायरेक्टर-साहेब? गंभीर जखम झालीय का?

लेवशिन: वारले. सगळ्यांना नेहमी पळवत राहिले आणि आता स्वत: बघा...

निकोलाय (पोलीस-प्रमुखाला): कुणातरी तांबड-केशानं त्याच्यावर गोळी झाडली, एवढं तो सांगू शकला.

पोलीस-प्रमुख: तांबडकेशा?

निकोलाय: होय. उपाययोजना अंमलात आणा... तावडतोब!

पोलीस-प्रमुख (पोलीसाला): तावडतोब सगळ्या तांबडकेशांना अटक करा!

पोलीस: होय साहेब.

पोलीस-प्रमुख: एकजात सगळ्यांना!

पोलीस जातो.

क्लेओपात्रा (धावत येते) : कुठं आहे तो ?.. मीषा ! काय झालं ? बेशुद्ध पडलाय ? निकोलाय वासिल्येविच... त्याला घेरी आलीय ?

निकोलाय तोंड बाजूला फिरवतो.

मेला ? खरंच मेला ?

लेवशिन : आता निवांत झाले. पिस्तूलानं धमकावत होते. पण तेच पिस्तूल त्यांच्यावर उलटलं.

निकोलाय (रागाने, दबत्या आवाजात) : तुम्ही — चालते व्हा ! (पोलीस-प्रमुखाना.) ह्याला घेऊन जा इथून !

क्लेओपात्रा : डॉक्टर... डॉक्टर काय म्हणतात ?

पोलीस-प्रमुख (लेवशिनला हळू आवाजात) : ए, तू ! जा इथून !

लेवशिन (हळूच) : जातो ! धक्के कशाला मारता ?

क्लेओपात्रा (अस्फुटपणे) : त्यांनी ठार मारलं ह्याला ?

पालीना (क्लेओपात्राला) : माझ्या लाडके...

क्लेओपात्रा (शांतपणे, पण रागीट स्वरात) : दूर व्हा ! ही तुमची करणी !.. तुमची !

झखार (विषण्णपणे) : मला समजतं... हा तुमच्यावर फार प्रचंड आघात आहे... पण असं कशाला बोलता ?

पालीना (अश्रुपूर्ण आवाजात) : किती भयंकर बोलताहात तुम्ही !

तात्याना (पालीनाला) : तू जा इथून ! डॉक्टर कुठे आहेत ?

क्लेओपात्रा : तुमच्या नतद्रष्ट मऊपणापायी त्याचा बळी गेला !

निकोलाय (कोरडेपणाने) : शांत व्हा , क्लेओपात्रा ! झखार इवानोविच त्यांचा गुन्हा नाकबूल करू शकत नाहीत आपल्यासमोर !

झखार (निराशपणे) : मंडळी ... मला समजत नाही ! तुम्ही काय बोलता आहात ? असा आरोप करणं शोभतं ?

पालीना : काय भयंकर ! देवा रे , केवढा निष्ठुर-पणा !

क्लेओपात्रा : निष्ठुरपणा ? तुम्ही कामगारांच्या मनात त्याच्याविरुद्ध विष भरवून दिलंत ! तुम्ही त्यांच्यातला त्याचा धाक नाहीसा केलात ! ते त्याला भ्यायचे , त्याच्यासमोर थरथर कापायचे ... आणि आता पहा ! त्यांनी त्याला ठार मारलं ... तुम्ही ... तुम्ही दोषी आहात ! त्याच्या रक्ताचा तुमच्यावर कलंक लागलाय !

निकोलाय : पुरे ! ओरडायचं कारण नाही !

क्लेओपात्रा (पालीनाला) : रडताय ? रडा ! त्याचं सगळं रक्त तुमच्या डोळयांमधून वाहून जाऊं दे !

पोलीस (प्रवेश करत) : साहेब !

पोलीस-प्रमुख : हळू बोल !

पोलीस : सगळया तांबडकेशांना पकडलं !

बागेच्या दूर टोकाहून जनरल कोनला पुढे ढकलत आणतात. ते मोठ्यांदा हसत असतात.

निकोलाय : श्शू !

क्लेओपात्रा : काय, खुन्यांनो ?

पडदा

अंक दुसरा

चांदणी रात्र. जमिनीवर दाट, काळ्या सावल्या. टेबलावर पावाचे तुकडे, काकड्या, अंडी वगैरे खाद्यपदार्थ विखुरलेले आहेत. बीयरच्या बाटल्या उभ्या आहेत. कंदिलांमध्ये मेणबत्त्या तेवत आहेत. आग्राफेना बशा विसळतेय. हाती काठी घेऊन खुर्चीवर बसलेला यागोदिन धूम्रपान करतोय. डावीकडे तात्याना, नाद्या, लेवशिन उभी आहेत. सगळेजण दबत्या, हळू आवाजात बोलत आहेत, जणू कसलातरी कानोसा घेत आहेत. एकूण वातावरण तंग आहे.

लेवशिन (नाद्याला) : ताईसाहेब, जमिनीवरच्या सगळ्या माणूसजातीत तांबं मिसळलंय ! म्हणून तुमचं तरुण काळीज असं जड बनलंय. सगळी माणसं तांब्याच्या कोपेकशी जखडलेली आहेत, पण तुम्ही अजून स्वतंत्र

आह्वान आणि म्हणून माणसात तुम्हाला अजून जागा नाही. जगातल्या प्रत्येक माणसाला कोपेक खणखणून मागतोय : स्वतःवर प्रेम करतोस तसं माझ्यावर प्रेम कर... पण तुम्हाला हे लागू पडत नाही. पाखरू ना पेरतं, ना पीक घेतं!

यागोदिन (आग्राफेनाला) : लेवशिन मोठ्या घरच्यांना चिडवायला लागलाय! मजेदार आहे!

आग्राफेना : काय झालं? तो खरं बोलतोय. थोडंसं खरं मोठ्या घरच्यांना समजलं पाहिजे.

नाद्या : तुमचं आयुष्य फार खडतर आहे ना एफीमिच?

लेवशिन : माझं फारसं अवघड नाही. मला पोरंबाळं नाहीत. बाई आहे – म्हणजे घरधनीण. मुलं सगळी वारली.

नाद्या : तान्या मावशी! घरात प्रेत असलं म्हणजे सगळी माणसं हळू आवाजात का बोलतात?

तात्याना : मला माहीत नाही.

लेवशिन (स्मित करत) : ताईसाहेब, त्याचं कारण मेलेल्या माणसासमोर आपण अपराधी असतो. प्रत्येक बाबतीत अपराधी असतो.

नाद्या : पण एफीमिच, असा काही नेहमीच माणसाचा खून होत नाही. तरी कोणत्याही प्रेतासमोर लोक हळू आवाजात बोलतात.

लेवशिन : बाई ग, सगळ्यांना आम्ही ठार मारतो! कुणाला गोळ्यांनी, कुणाला शब्दांनी – आमच्या कर्मांनी आम्ही सगळ्यांना ठार मारतो. न कळता-सवरता ह्या जगातून माणसांना मातीत पिटाळतो. आणि माण-

साला मृत्यूच्या तावडीत दिलं, म्हणजे नंतर आमच्या अपराधाची आम्हाला थोडीशी जाणीव होते. मेलेल्या माणसाबद्दल वाईट वाटतं, त्याच्यासमोर शरम वाटते आणि मनात भीती निर्माण होते. कारण आम्हालाही तसंच मरणाकडं पिटाळत असतात आणि थडगी आमची वाट पहात असतात!

नाद्या : खरंच ... हे फार भयंकर आहे!

लेवशिन : काळजी करू नका! आत्ता भीती वाटतेय– पण उद्या तिचा मागमूस राहणार नाही. पुन्हा माणसं धक्काबुक्कीला सुरवात करतील. जेव्हा एखादा माणूस खाली कोसळेल, तेव्हा क्षणभर सगळे गप्प बसतील, शरमतील. मग सुस्कारा टाकतील आणि परत पूर्वीसार-खंच सुरू होईल! परत पूर्वीच्या वाटेनं! अडाणीपणा! पण ताईसाहेब, तुम्हाला अपराधी वाटायचं कारण नाही. मेलेली माणसं तुमच्या वाटेत आडवी येणार नाहीत. तुम्ही त्यांच्यासमोर खुशाल मोठ्यांदा बोला!

तात्याना : आयुष्याची नव्यानं सुरवात करायची असेल तर काय केलं पाहिजे? तुम्हाला माहीत आहे?

लेवशिन (गूढपणे) : कोपेक नाहीसा केला पाहिजे! त्याला पुरून टाकला पाहिजे! तो नसला म्हणजे कशाला वैर धरायचं? कशाला एकमेकांना धक्काबुक्की करायची?

तात्याना : बस्स, एवढंच?

लेवशिन : सुरवातीला एवढं पुरे आहे.

तात्याना : बागेत फिरायला येत्येस नाद्या?

नाद्या (विचारमग्न होत) : ठीक आहे.

ऱ्या बागेत जातात. लेवशिन टेबलापाशी जातो. तंबूपाशी जनरल, कोन आणि पालोगी दिसतात.

यागोदिन: येफीमिच, तू दगडावर पेरणी करतो आहेस – मजेशीर आहेस!

लेवशिन: काय झालं?

यागोदिन: निष्फळ प्रयत्न करतोस... त्यांना थोडंच ममजणार? कामगाराच्या काळजाला समजेल, पण ह्या मोठ्या घरच्यांना नाही कळायचं!

लेवशिन: पोरगी छान आहे. ग्रेकोवनं मला तिच्या-बद्दल सांगितलंय.

आग्राफेना: आणखी चहा पिणार?

लेवशिन: चालेल.

गप्प बसतात. जनरलचा जाड आवाज ऐकू येतो. नाद्या आणि तात्यानाचे शुभ्र पोषाख झाडीतून पुसट दिसतात.

जनरल: नाही तर रस्त्यावर आडवी दोरी बांध... कुणाला दिसणार नाही अशा बेतानं! माणूस आला म्हणजे एकदम धप्प!

पालोगी: कुणीतरी खाली कोसळताना बघायला किती मजा येते नाही जनरलसाहेब!

यागोदिन: ऐकलंस?

लेवशिन: ऐकतोय!

कोन: आज असं काही करायला नको. घरात प्रेत आहे. प्रेतासमोर असली थट्टा करत नाहीत.

जनरल: मला शिकवू नको! जेव्हा तू मरशील, तेव्हा मी नाच करीन!

तात्याना आणि नाद्या टेबलाकडे येतात.

लेवशिन : एवढा म्हातारा झालाय !..

आग्राफेना (घराकडे जात) : तरीसुद्धा काही ना काही खोड्या करण्यात गुंतलेला असतो.

तात्याना (टेबलापाशी बसत) : येफीमिच, तुम्ही समाजवादी आहात ?

लेवशिन (साधेपणाने) : मी ? नाही. मी आणि तीमोफेय – आम्ही विणकर.

तात्याना : तुमची समाजवाद्यांशी ओळख आहे ? त्यांच्याबद्दल तुम्ही ऐकलंय ?

लेवशिन : ऐकलंय... आमच्या कुणी माहितीचा नाही – पण ऐकलं मात्र आहे.

तात्याना : सीन्त्सोव माहीत आहेत ? दिवाणजी ?

लेवशिन : माहीत आहेत. कचेरीत काम करणारी सगळी माणसं आम्हाला माहीत आहेत.

तात्याना : त्यांच्याबरोबर कधी बोललात ?

यागोदिन (अस्वस्थपणे) : कशाबद्दल बोलणार आम्ही ? ती माणसं वरती – आम्ही खाली. कचेरीत गेलो म्हणजे डायरेक्टरसाहेबाचा काय हुकूम आहे तो त्यांनी आम्हाला सांगायचा – बास् ! हीच आमची ओळख !

नाद्या : तुम्ही आम्हाला घाबरता का एफीमिच ! भिऊ नका. आम्हाला कुतूहल वाटतं...

लेवशिन : भ्यायचं कशाला ? आम्ही काहीही नीच काम केलेलं नाही. इथं गडबड होऊ नये म्हणून आम्हाला

न्हाग करायला बोलावलं – आम्ही आलो. तिथं माथी फिरलेली माणसं म्हणताहेत: कारखाना जाळून टाकू आणि मगळं भस्मसात करू, नुसते कोळसे उरतील. पण असल्या दंगलखोरीला आमचा विरोध आहे. काहीही जाळायची गरज नाही... कशाला जाळायचं? आम्हीच हे मगळं उभं केलंय – आमच्या बापांनी आणि आजोबांनी... आणि एकदम – जाळून टाकायचं?

तात्याना: तुम्हाला अपाय करण्याच्या हेतूनं आम्ही तुम्हाला प्रश्न विचारतो, असा तर तुमचा समज झाला नाही ना?

यागोदिन: कशाला होईल असा समज? आम्ही कुणाचं वाईट चिंतत नाही!

लेवशिन: आम्हाला असं वाटतं – हातांनी जे उभारलंय ते सगळं पवित्र आहे. माणसांच्या श्रमांचं मोल केलं पाहिजे – त्यांना जाळायचं नाही. पण माणसं अडाणी आहेत. त्यांना आगीचा उजेड आवडतो. ती सूडानं पेटलीत. मेलेला माणूस आमच्याशी फार कठोर वागायचा हे नाकारता येणार नाही. पिस्तूल परजत होता... धमक्या घालत होता!

नाद्या: आणि काका? ते जास्त चांगले आहेत?

यागोदिन: झखार इवानोविच?

नाद्या: हो! ते प्रेमळ आहेत? अथवा... तेसुद्धा तुमचा अपमान करतात?

लेवशिन: आम्ही याबद्दल बोलत नाही.

यागोदिन (उदासपणे): आमच्या दृष्टीनं सगळे सारखेच! कडक आणि प्रेमळ – सगळे सारखेच!

लेवशिन (मृदु आवाजात) : कडक मालक असतो, प्रेमळ मालक असतो. रोग माणसांना झपाटताना भेदाभेद करत नाही.

यागोदिन (कंटाळवाणेपणे) : अर्थात, झखार इवानोविच काळीज असलेले माणूस आहेत.

नाद्या : म्हणजे स्क्रोबोतोवपेक्षा चांगले ना ?

यागोदिन (हळूच) : पण डायरेक्टर आता जिवंत नाहीत.

लेवशिन : ताईसाहेब, तुमचे काका भला माणूस आहेत... पण त्यांच्या भलेपणामुळं आमचं ओझं काही कमी होत नाही.

तात्याना (संत्रस्त होत) : चल, नाद्या ! आपल्याला समजून घ्यायची त्यांची इच्छा नाही. दिसत नाही तुला ?

नाद्या (हळूच) : हो !

मुकाटपणे निघून जातात. लेवशिन त्यांच्या पाठमोऱ्या आकृतींकडे पहात राहतो, नंतर यागोदिनकडे पाहतो. दोघेही स्मित करतात.

यागोदिन : सहनशक्तीचा अंत पाहतात !

लेवशिन : त्यांना पहायला मजा वाटते.

यागोदिन : आपण काहीतरी बरळून टाकू असं कदाचित त्यांना वाटत असेल.

लेवशिन : छोटी मालकीण छान आहे. ती श्रीमंत आहे एवढंच वाईट.

यागोदिन : मत्वेय निकोलायेविचला ह्याबद्दल सांगितलं

पाहिजे. बाईसाहेब आमच्याकडून बातम्या काढायचा प्रयत्न करत होत्या.

लेवशिन : सांगू. आणि ग्रेकोवलाही सांगू.

यागोदिन : तिथं काय परिस्थिती आहे? मालकमंडळी आपल्यापुढं माघार घेणार किंवा नाही?

लेवशिन : घेतील माघार. थोडं थांबून परत आपल्याला चेचतील.

यागोदिन : आपले गळे दाबतील.

लेवशिन : अर्थातच.

यागोदिन : हं... झोप आलीय!

लेवशिन : थोडी कळ काढ. तो बघ... जनरल येतोय.

जनरल येतो. त्याच्याशेजारून पालोगी मर्यादशीलपणे पावले टाकतोय. पाठीमागून कोन येतो. पालोगी अचानक जनरलचा हात पकडतो.

जनरल : काय झालं?

पालोगी : खड्डा!

जनरल : असं! इथं टेबलावर काय आहे? घाण सगळी! हे तुम्ही खाल्लंत काय?

यागोदिन : होय, साहेब. दोन्ही बाईसाहेबही आमच्याबरोबर होत्या.

जनरल : असं होय? तुम्ही पहारा करताय?

यागोदिन : होय, साहेब.

जनरल : शाब्बास! तुमच्याबद्दल गव्हर्नरना सांगीन. तुम्ही इथं किती लोक?

लेवशिन : दोघं!

जनरल : मूर्ख ! दोनपर्यंत आकडे मला मोजता येतात ... एकूण किती ?

यागोदिन : तीस माणसं.

जनरल : बंदुका आहेत ?

लेवशिन (यागोदिनला) : तीमोफेय, तुझं पिस्तूल कुठं ?

यागोदिन : हे पहा.

जनरल : नळीला धरू नको ! कोन, शस्त्रं कशी हाताळायची त्याचं ह्या मठ्ठांना शिक्षण दे ! (लेवशिनला.) तुझ्यापाशी रिवॉल्वर आहे ?

लेवशिन न ... नाही. माझ्यापाशी नाही.

जनरल : गुंड आले तर गोळ्या झाडणार ?

लेवशिन : ते येणार नाहीत, जनरलसाहेब. त्यांची डोकी तात्पुरती तापली होती.

जनरल : पण आलेच, तर ?

लेवशिन : कारखाना बंद झाला म्हणून ते फार दुखावले. त्यांच्यापैकी काहींना मुलं आहेत.

जनरल : तू काय मला रडगाणं ऐकवतोस ! मी विचारतो आहे – गोळ्या झाडशील ?

लेवशिन : होय, जनरलसाहेब, आम्ही तयार आहोत ! का नाही गोळ्या झाडायच्या ? फक्त आम्हाला बंदुका चालवायच्या माहीत नाही. आणि गोळीबार करायचा कशानं ? बंदुका असत्या ... तोफा असत्या ... तर एक वेळ ठीक.

जनरल : कोन ! जा, त्यांना शिकव. जा तिथं नदीवर.

कोन (उदासपणे) : साहेब, आत्ता रात्रीची वेळ आहे आणि गोळीबार ऐकला तर माणसं घाबरतील. धावपळ होईल. अर्थात, तुम्ही सांगाल तसं मी वागीन.

जनरल : उद्यापर्यंत तहकूब ठेवा!

लेवशिन : उद्या सगळं शांत होईल. कारखाना उघडताहेत

जनरल : कोण उघडतंय?

लेवशिन : झखार इवानोविच. ह्याबद्दल आत्ता ते कामगारांबरोबर चर्चा करताहेत.

जनरल : छी: ! मी तर हा कारखाना कायमचा बंद करून टाकला असता! भल्या सकाळी भोंगा वाजू नये म्हणून!

यागोदिन : उशीरा वाजला तर आम्हालाही छान!

जनरल : तुम्हा सगळ्यांना उपाशी मारलं असतं! पुन्हा बंडाचं नांव काढलं नसतंत!

लेवशिन : आम्ही कुठं बंड करतोय?

जनरल : चूप रहा! इथं कशाला तडमडताय? तुम्ही कुंपणाभोवती गस्त घातली पाहिजे. कुणी आत घुसताना दिसला तर जागच्या जागी गोळी झाडा! मी जबाबदार राहीन!

लेवशिन : चल, तीमोफेय! पिस्तोल घे बरोबर.

जनरल (त्यांच्या पाठमोऱ्या आकृती पहात) : पिस्तोल! गाढव कुठले! शस्त्रांची नांव धड माहीत नाहीत!

पालोगी : एकूण सामान्य माणसं उर्मट आणि जनावरांसारखी वागतात, जनरलसाहेब. माझंच उदाहरण

घ्या. माझा स्वतःचा भाजीपाल्याचा वाफा आहे आणि माझ्या हातांनी मी त्यातून भाज्या पिकवतो.

जनरल: वा! कौतुकास्पद आहे.

पालोगी: माझ्या फावल्या वेळात मी तिथं काम करतो.

जनरल: सगळ्यांनी काम केलं पाहिजे!

तात्याना आणि नाद्या येतात.

तात्याना (दुरून) : असं ओरडता कशाला?

जनरल: ही माणसं मला सहन होत नाहीत! (पालोगीला.) मग?

पालोगी: पण जवळ जवळ रोज रात्री कामगार माझ्या श्रमाची फळं चोरून नेतात.

जनरल: चोरून नेतात?

पालोगी: होय ना! मी कायद्याचं संरक्षण मागितलं, पण ह्या भागात सन्माननीय पोलीस-प्रमुख कायद्याचे प्रतिनिधी आहेत आणि जनतेच्या गरजांकडं हे महाशय ढुंकूनही लक्ष पुरवत नाहीत.

तात्याना (पालोगीला) : तुम्ही असली मूर्ख भाषा का वापरता?

पालोगी (शरमून) : मी? माफ करा!.. पण मी तीन वर्षं जिम्नाशियममध्ये शिकलोय आणि रोज वर्तमान-पत्र वाचतो.

तात्याना (स्मित करत) : अस्सं! तरीच...

नाद्या: तुम्ही फार मजेदार आहात, पालोगी!

पालोगी: तुम्हाला जर हे आवडत असेल, तर

ऱ्यान मला आनंदच आहे! माणूस आवडता असावा!

जनरल : मासे धरण्यात तुम्हाला प्रेम आहे?

पालोगी : कधी अनुभव घेतला नाही, जनरलसाहेब!

जनरल (खांदे उडवून) : विचित्र उत्तर!

तात्याना : काय अनुभवलं नाही? धरणं किंवा प्रेम?

पालोगी (गोंधळून) : पहिलं!

तात्याना : दुसरं?

पालोगी : दुसऱ्याचा अनुभव घेतलाय.

तात्याना : तुमचं लग्न झालंय?

पालोगी : त्याचं नुसतं स्वप्न पाहतोय! पण महिना फक्त पंचवीस रूबल पगार असताना...

निकोलाय आणि क्लेओपात्रा वेगाने येतात.

लग्नाचा निर्णय पक्का करणं जमत नाही.

निकोलाय (रागाने) : अगदी कमाल आहे! संपूर्ण गोंधळ!

क्लेओपात्रा : कशी हिंमत झाली त्याची? कसं वागू शकला तो?

जनरल : काय भानगड आहे?

क्लेओपात्रा (किंचाळते) : तुमचा पुतण्या – फडतूस आहे! त्यानं कामगारांच्या सगळ्या मागण्या मान्य केल्या!.. माझ्या नवऱ्याच्या मारेकऱ्यांच्या!

नाद्या (हळूच) : पण ते काय सगळे खुनी आहेत?

क्लेओपात्रा : प्रेताची तो चक्क विटंबना करतोय! आणि माझीही! कारखाना बंद केला म्हणून ज्याचा

खून करण्यात आला, त्याचं दफन होण्याच्या आधीच कारखान्याची दारं सताड उघडताहेत!

नाद्या: पण काकांना भीती वाटते की, ते लोक सगळं जाळून टाकतील!

क्लेओपात्रा: तुम्ही अजून बाळ आहात! तेव्हा गप्प रहायला शिका!

निकोलाय: त्या पोराचं भाषण! धडधडीत समाजवादाचा प्रचार होता!

क्लेओपात्रा: कुणीतरी एक कारकून त्यांचा मुख्य आहे आणि तो त्यांना म्हणे सल्ला देतो. खुद्द मयतानंच गुन्ह्याला प्रवृत्त केलं असं म्हणायचं साहस केलं त्यानं!

निकोलाय (टिपणवहीत काहीतरी नोंद करत): हा माणूस संशयास्पद आहे. कारकुनाच्या कामाला तो जरा जास्तच हुषार वाटतो.

तात्याना: तुम्ही सीन्त्सोवबद्दल बोलताय?

निकोलाय: होय.

क्लेओपात्रा: माझ्या तोंडावर कुणीतरी थुंकल्याप्रमाणं मला भासतंय!

पालोगी (निकोलायला): सांगायची परवानगी घेतो: श्रीयुत सीन्त्सोव वर्तमानपत्रं वाचतात आणि राजकारणावर नेहमी मतं व्यक्त करतात. सरकारवर त्यांचा फार राग आहे.

तात्याना (निकोलायला): असल्या गोष्टी ऐकण्यात तुम्हाला रस आहे?

निकोलाय (आव्हानपूर्वक): अर्थात आहे! मला शरमिंदा करण्याचा प्रयत्न करताय?

तात्याना : मला वाटतं, श्रीमान पालोगी यांचं इथं काही काम नाही.

पालोगी (गोंधळून) : माफ करा... मी जातो! (लगबगीने निघून जातो.)

क्लेओपात्रा : तो इकडं येतोय... त्याला भेटायची माझी इच्छा नाही. त्याला बघणंसुद्धा मला असह्य आहे! (वेगाने जाते.)

नाद्या : हे सगळं काय चाललंय?

जनरल : असल्या धांदली सोसायचं आता माझं वय राहिलं नाही. खून पाडताहेत, बंडाळ्या करताहेत! मला इथं विश्रांतीला बोलावण्यापूर्वी झखारनं ह्या गोष्टीं-चा आधी विचार करायला हवा होता!

झखार येतो. उत्तेजित मन:स्थिती, पण खुषीत आहे. निकोलायला पाहताच एकदम शरमतो व स्वत:चा चष्मा नीट सावरतो.

ऐक, माझ्या लाडक्या पुतण्या – तू काय केलंस ह्याची तुला जाणीव आहे?

झखार : एक मिनिट थांबा काका... निकोलाय वासिल्येविच!

निकोलाय : बोला!

झखार : कामगार कमालीचे उत्तेजित झाले होते... कारखान्याची ते नासधूस करून टाकतील अशी मला भीती वाटली, म्हणून काम बंद न करण्याची त्यांची मागणी मी मान्य केली. दीचकोवबद्दलची त्यांची माग-णीही मी कबूल केली. त्यांना मी अट घातलीय – त्यांनी

गुन्हेगाराला माझ्या ताब्यात द्यायचं ! त्याचा शोध त्यांनी सुरू केलाय.

निकोलाय (कोरडेपणाने) : ही तसदी त्यांनी घ्यायचं काही कारण नव्हतं. त्यांच्या मदतीशिवाय आम्ही खुनी हुडकून काढू.

झखार : मला वाटतं, त्यांनी स्वतःच शोधून देणं जास्त चांगलं ठरेल ! हो ... उद्या दुपारपासून कारखाना उघडायचा आम्ही निर्णय घेतलाय.

निकोलाय : आम्ही म्हणजे कोण ?

झखार : मी ...

निकोलाय : अस्सं ! बातमी कळवल्याबद्दल आभारी आहे. पण मला वाटतं की, बंधूंच्या मृत्यूनंतर त्याची जागा माझ्याकडं आणि त्याच्या पत्नीकडं येते. तेव्हा स्वतःच एकट्यानं निर्णय घेण्याऐवजी तुम्ही आम्हा दोघांशी सल्ला-मसलत करायला पाहिजे होती.

झखार : मी तुम्हाला बोलावलं होतं ! सीन्त्सोव तुम्हाला बोलवायला आला होता ... तुम्ही नकार दिलात !

निकोलाय : भावाच्या मृत्यूदिवशी धंद्याच्या कामांमध्ये लक्ष घालणं मला अशक्य आहे हे तुम्हाला पटतं ना ?

झखार : पण तुम्ही तिथं कारखान्यातच होतात !

निकोलाय : होय, होतो ! भाषणं ऐकली. मग काय ?

झखार : समजून घ्या – मयतानं म्हणे शहरात तार पाठवली होती ... शिपायांना धाडा असा निरोप द्यायला ! उत्तर आलं होतं – शिपाई उद्या दुपारपर्यंत येतील.

जनरल : ओहो ! शिपाई ? हे ठीक ! शिपायांबरोबर गमजा चालणार नाहीत !

निकोलाय : उपाय शहाणपणाचा होता.

झखार : कुणास ठाऊक ! शिपाई आले म्हणजे कामगार जास्त भडकतील. कारखाना उघडला नाही तर काय घडेल हे फक्त देवच जाणे ! मला वाटतं, मी योग्य कारवाई केलीय. आता रक्तपाताचा धोका टळला.

निकोलाय : माझा दृष्टिकोण वेगळा आहे. निदान ठार झालेल्या माणसाच्या स्मृतीचा आदर म्हणून तरी तुम्ही त्या लोकांसमोर माघार घ्यायला नको.

झखार : पण त्यातून आणखी वाईट घडलं असतं हे तुम्हाला समजत नाही का ?

निकोलाय : त्याची मला फिकीर नाही.

झखार : पण माझी मला फिकीर आहे ना ? मला कामगारांबरोबर राहणं भाग आहे. जर त्यांचं रक्त सांडलं, तर सरतेशेवटी ते कारखाना जमीनदोस्त करून टाकतील !

निकोलाय : माझा ह्यावर विश्वास नाही.

जनरल : माझासुद्धा !

झखार (निकरावर येत) : म्हणजे तुम्ही मला दोष देता ?

निकोलाय : होय.

झखार (तळमळीने) : कशाला ... कशाला वैर धरायचं ? मला फक्त एकच इच्छा आहे ... रक्तपात टाळायचा ! संभाव्य भयानक गोष्ट टाळायची ! शांततेनं, शहाणपणानं आयुष्य जगण्याचा मार्ग काढणं अशक्य

आहे का? तुम्ही माझ्याकडं तिरस्कारानं पाहता — कामगार माझ्याकडं अविश्वासानं पाहतात. पण माझी फक्त भल्याची इच्छा आहे... फक्त भलं करण्याची!

जनरल: भलं म्हणजे काय? धड शब्दसुद्धा नाही... नुसती अक्षरांची जुळणी. माणसानं धंद बोलावं भलं, पण करायचं ते करावं!

नाद्या (अश्रुपूर्ण आवाजात): आजोबा, गप्प बसा! काका... तुम्ही शांत व्हा! आजोबांना काही समजत नाही! अरेरे, निकोलाय वासिल्येविच, कसं तुम्हाला समजत नाही? तुम्ही एवढे बुद्धिमान... काकांवर तुम्ही विश्वास का ठेवत नाही?

निकोलाय: माफ करा, झखार इवानोविच, मी चलतो. धंद्याच्या कारभारात लहान मुलांनी ढवळाढवळ केलेली आवडत नाही मला! (निघून जातो.)

झखार: पाहिलंस, नाद्या!

नाद्या (त्याचा हात धरत): ह्यात काही विशेष नाही. कामगार खूष राहणं सर्वांत महत्त्वाचं आहे. त्यांची संख्या खूप आहे. आपल्यापेक्षा खूपच जास्त!

झखार: जरा थांब. मी तुला सांगणं भाग आहे — मी तुझ्यावर फार नाराज झालोय!

जनरल: मीसुद्धा!

झखार: तुला कामगारांविषयी सहानुभूती वाटते... तुझ्या वयात तसं वाटणं स्वाभाविक आहे. पण माझ्या लाडक्या पोरी, मर्यादांचं भान ठेवलं पाहिजे. आज सकाळी त्या ग्रेकोवला तू इथं टेबलापाशी घेऊन आलीस... मी त्याला ओळखतो. तो फार हुशार तरुण

आहे. पण त्याच्याखातर तुझ्या मावशीबरोबर नाट्यप्रसंग निर्माण करण्याचं तुला कारण नव्हतं!

जनरल: चांगली खरडपट्टी काढ तिची!

नाद्या: पण खरं काय घडलं हे तुला ठाऊक नाही.

झखार: तुझ्यापेक्षा जास्त ठाऊक आहे मला! विश्वास ठेव! आपली माणसं रांगडी आहेत, असंस्कृत आहेत. त्यांच्यासमोर बोट धरलं, तर ते सबंध हात खेचून घ्यायला बघतात.

तात्याना: बुडता माणूस काडीचा आधार घ्यायला धडपडतो त्याप्रमाणं!

झखार: त्यांच्यात जनावरांचा लोभीपणा फार आहे, म्हणून त्यांचे लाड न करता त्यांना शिकवलं पाहिजे! तू ह्याबाबत शांतपणं विचार कर.

जनरल: आता जरा मी बोलतो. पोरी, तू माझ्याबरोबर फार विचित्र वागत्येस! तुला एक आठवण करून देतो की, आणखी चाळीस वर्षांनंतर माझ्या वयाची होशील... तेव्हा कदाचित माझ्या बरोबरीच्या नात्यानं मी तुला बोलायला परवानगी देईन. समजलं? कोन!

कोन (झाडांमधून): इथं आहे.

जनरल: तो हा कुठाय... काय त्याचं नांव... झाकणउघड्या?

कोन: कुठला झाकणउघड्या?

जनरल: तो... काय बरं त्याचं नांव? तो जाडा... वळवळणारा...

कोन: पालोगी! मला माहीत नाही.

जनरल (तंबूकडे जात) : शोधून काढ !

झखार मान खाली घालून येरझाऱ्या मारत रुमालाने चष्म्याच्या काचा पुसत राहतो. नाद्या खोल विचारात गढून बसते. तात्याना उभ्या उभ्या त्यांचे निरीक्षण करते.

तात्याना : खुनी कोण – समजलं ?

झखार : ते म्हणतात – माहीत नाही, पण शोधून काढू ! अर्थात त्यांना ठाऊक आहे. मला वाटतं (सभोवती नजर टाकत खालच्या आवाजात.) त्यांनी सामुदायिकपणं ठरवून हे कृत्य केलं. हा कट आहे ! खरं सांगायचं तर त्यानं त्यांना जेरीला आणलं होतं. वाट्टेल तसं वागायचा. सत्ता गाजवायला त्याला आवडायचं... एक प्रकारचा रोगच होता तो ! म्हणून त्यांनी त्याला ठार मारलं ! अगदी सरळ ! ह्या सरळपणात भयानकता भरलीय ! माणसाला ठार मारलं आणि पुन्हा अशा टक्क उघड्या डोळ्यांनी पाहतात, जणू हातून गुन्हा घडला ह्याची त्यांना जाणच नाही ! हे साधेपण भयंकर धक्का देणारं आहे.

तात्याना : असं म्हणतात, स्क्रोबोतोव गोळी झाडायच्या बेतात होता, तेवढ्यात कुणीतरी रिवॉल्वर त्याच्या हातून हिसकून घेतलं आणि...

झखार : आता ते महत्त्वाचं नाही. त्यांनी त्याला ठार मारलं... त्यानं नव्हे !

नाद्या : तू बसत का नाहीस ?

झखार : शिपायांना त्यानं कशाला बोलावलं ? त्यांना

ही बातमी समजली ... त्यांना सगळं माहीत असतं! त्यामुळं त्याचं मरण लौकर घडलं. अर्थात कारखाना उघडणं मला भाग होतं. तसं केलं नसतं तर फार काळपर्यंत त्यांचे-माझे संबंध बिघडलेले राहिले असते. अशा वेळी त्यांच्याकडं जास्त लक्ष पुरवलं पाहिजे, नम्माईनं वागलं पाहिजे. कुणास ठाऊक, ह्या मामल्याची अखेर कशी होईल? अशा काळात शहाण्या माणसाला मामान्यांमधले जास्तीत जास्त मित्र असणं इष्ट असतं ...

लेवशिन येतो.

कोण आहे तिथं?

लेवशिन: आम्ही ... गस्तवाले!

झखार: काय येफीमिच, माणसाचा खून केलात आणि आता गोडीगुलाबीनं, शांततेनं वागायला लागलात?

लेवशिन: आम्ही, झखार इवानोविच, नेहमीच तसे आहोत. शांत वागणारे!

झखार (दोष देत): होय. शांतपणं खून पाडता ना? मी असं ऐकलं की, तू कसलातरी प्रचार करतो आहेस, लेवशिन. कसलीतरी नवी शिकवण – पैशांची गरज नाही, मालकांची गरज नाही, वगैरे वगैरे. हे क्षम्य आहे, समजण्यासारखं आहे – ल्येव तल्स्तोयमध्ये. पण गड्या, तू हे बंद करणं बरं! अशा वटवटींमधून तुझं काहीही भलं होणार नाही.

सीन्त्सोव आणि याकोव यांचे आवाज जेथून येतात

त्या दिशेला तात्याना व नाद्या उजवीकडे जातात. झाडांमधून यागोदिन अवतरतो.

लेवशिन (शांतपणे) : काय बोलतो मी? जगलो, विचार केला आणि आता बोलून दाखवतो.

झखार : मालक म्हणजे पशू नव्हेत – हे समजून घेतलं पाहिजे. मी दुष्ट माणूस नाही हे तुला ठाऊक आहे. तुम्हाला मदत करायला मी नेहमी तयार असतो. तुमचं कल्याण व्हावं असं मला वाटतं.

लेवशिन (सुस्कारत) : स्वतःचं वाईट व्हावं असं कुणाला वाटेल?

झखार : तू समजून घे – तुमचं कल्याण व्हावं अशी माझी इच्छा आहे.

लेवशिन : आम्हाला समजतं...

झखार (त्याला निरखून पहात) : नाही, तू चूक करतो आहेस. तुम्हाला नाही समजत. विचित्र माणसं आहात! कधी पशू... कधी लहान मुलांप्रमाणं! (जातो.)

हातातील काठीवर रेलून उभे रहात लेवशिन त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहतो.

यागोदिन : परत प्रवचन झोडलं?

लेवशिन : चिनी आहे... अगदी पूर्ण चिनी! काय बोलतो? स्वतःशिवाय दुसऱ्या कुणालाही समजू शकत नाही.

यागोदिन : कल्याण व्हावं अशी इच्छा आहे म्हणे!

लेवशिन : होय, होय !

यागोदिन : चल ! ते आले बघ !

जातात. उजवीकडून तात्याना, नाद्या, याकोव आणि सीन्त्सोव येतात.

नाद्या : जणू स्वप्नात असल्याप्रमाणं आपण गोल गोल चकरा मारतोय.

तात्याना : तुम्हाला खायला हवं, मत्वेय निकोलायेविच ?

सीन्त्सोव : त्यापेक्षा ग्लासभर चहा द्या. आज मी एवढं बोललो, एवढं बोललो... घसा दुखायला लागलाय.

नाद्या : तुम्हाला कसलीही भीती वाटत नाही ?

सीन्त्सोव (टेबलाशी बसत) : मला ? कशाचीही भीती वाटत नाही.

नाद्या : पण मला खूप घाबरायला होतं ! अचानक सगळा गोंधळ माजलाय आणि मला काहीही समजेनासं झालंय ! चांगली माणसं कुठं आणि वाईट कुठं ?

सीन्त्सोव (स्मित करत) : सगळं थाऱ्यावर येईल ! मात्र तुम्ही विचार करायला भिऊ नका. अगदी बेधडक अखेरपर्यंत विचार करा ! एकूण कशालाच भ्यायचं कारण नसतं !

तात्याना : सगळं निवलं असं तुम्हाला वाटतं ?

सीन्त्सोव : होय. कामगारांना क्वचित जय मिळतो आणि छोटासा जयसुद्धा त्यांना प्रचंड आनंद देतो.

नाद्या : तुम्हाला ते आवडतात ?

सीन्त्सोव : आवडणं हा शब्द अपुरा ठरेल. त्यांच्या-

बरोबर मी खूप काळ राहिलोय, मला त्यांची माहिती आहे, त्यांचं बळ मला ठाऊक आहे, त्यांच्या शहाणपणावर माझा विश्वास आहे.

तात्याना: भविष्यकाळ त्यांच्या मालकीचा आहे, यावरही तुमचा विश्वास आहे?

सीन्त्सोव: होय, त्यावरही माझा विश्वास आहे.

नाद्या: भविष्यकाळ ... तो कसा असेल ह्याबद्दल मला कल्पनाच करता येत नाही.

तात्याना (हसून): तुमचे हे कामगारवर्गीय फार धूर्त आहेत! मी आणि नाद्यानं त्यांच्याशी बोलायचा प्रयत्न केला. पण आम्ही मूर्ख ठरलो.

नाद्या: अपमानच वाटला. जणू काही आम्ही दोघी वाईट माणसं आहोत अशा तऱ्हेनं म्हातारा बोलला – हेर आहोत म्हणे आम्ही! त्यांच्यात एक ग्रेकोव म्हणून आहे – तो माणसांकडं वेगळ्या नजरेनं पाहतो. म्हातारा नुसता हसरा चेहरा करून बसला होता – जणू आमची त्याला कीव येत होती, जणू आम्ही आजारी आहोत!

तात्याना: तू इतकं पिऊ नकोस, याकोव! बघायलासुद्धा किळस येत्ये.

याकोव: मग मी काय करू?

सीन्त्सोव: करण्यासारखं दुसरं काही नाही?

याकोव: धंद्याबद्दल आणि त्याच्याशी संबंधित अशा सर्व गोष्टींबद्दल मला तिटकारा आहे – जबरदस्त तिटकारा! मी तिसऱ्या गटातला माणूस आहे बघा!

सीन्त्सोव: कुठल्या?

याकोव: तिसऱ्या! लोकांचे तीन गट पडतात–

एक : सबंध आयुष्यभर राबणाऱ्यांचा ; दुसरा – पैसा गोळा करणाऱ्यांचा आणि तिसरा – भाकरीसाठी राबायची इच्छा नसलेल्यांचा. कारण त्यात काही अर्थ नाही ! त्यांना पैसाही साठवता येत नाही – हा मूर्ख-पणा आहे, शिवाय कमीपणाचं ! तर असा मी – तिसऱ्या गटातला. सगळे आळशी, भटके, संन्यासी, भिकारी आणि जगातले परपुष्ट ह्या गटात मोडतात.

नाद्या : फार कंटाळवाणं बोलतोस तू काका ! आणि तू मुळीच तसा नाहीस – तू फक्त प्रेमळ, नरम स्वभा-वाचा आहेस.

याकोव : म्हणजे कुचकामी ! शाळेत असतानाच माझ्या हे ध्यानात आलं होतं. प्रौढ व्हायच्या आधीच माणसांची तीन गटांमध्ये विभागणी होते.

तात्याना : नाद्या अगदी ठीक बोलली. हे फार कंटाळवाणं वाटतं, याकोव !

याकोव : मान्य ! मत्वेय निकोलायेविच, तुम्हाला काय वाटतं, आयुष्याला चेहरा असतो ?

सीन्त्सोव : असेल कदाचित !

याकोव : असतो ! तो नेहमी तरुण आहे. अगदी अलीकडं अलीकडंपर्यंत आयुष्य माझ्याकडं निर्विकारपणं पहात होतं. पण आता कठोरपणं पाहतं आणि विचारतं: "तुम्ही कोण? कुठं चाललाय ? ऑं ?" (कशाचीतरी भीती वाटून तो दचकतो. स्मित करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याचे ओठ थरथर कापतात आणि चेहऱ्या-वर दयनीय वाकडे स्मित उमटते.)

तात्याना : हा विषय पुरे झाला, याकोव ! ते बघ,

वकीलसाहेब येताहेत. त्यांच्यासमोर तू अशी बडबड करू नयेस, अशी माझी इच्छा आहे.

याकोव: ठीक.

नाद्या (हळूच): सगळे कशाचीतरी वाट पाहताहेत. आणि सगळ्यांना कसलीतरी भीती वाटत्येय, कामगारांची ओळख करून घ्यायला माझ्यावर बंदी का? हा मूर्खपणा आहे!

निकोलाय (प्रवेश करतो): चहाचा एक ग्लास मिळेल का?

तात्याना: जरूर.

काही सेकंद सगळे गप्प राहतात. निकोलाय चहात चमचा ढवळत उभा राहतो.

नाद्या: काकांवर कामगार विश्वास का ठेवत नाहीत हे समजून घ्यायची माझी फार इच्छा आहे आणि एकूणच...

निकोलाय (उदासपणे): "जगातील कामगारांनो, एक व्हा!" ह्या विषयावर जे भाषणं ठोकतात, त्यांच्यावरच त्यांचा विश्वास बसतो. त्यावर त्यांचा विश्वास बसतो!

नाद्या (खांदे उडवून, शांतपणे): हे शब्द मी जेव्हा ऐकत्ये, जगातल्या कामगारांना केलेलं हे आव्हान ऐकत्ये, तेव्हा मला वाटू लागतं की, आपल्यासारखी माणसं अनावश्यक आहेत.

निकोलाय (उद्वेगाने): अर्थातच! प्रत्येक सुसंस्कृत माणसाला तसं जाणवलं पाहिजे आणि माझी खात्री

आहे की, लौकरच पृथ्वीवर दुसरी आरोळी उमटेल : “जगातल्या सुसंस्कृत लोकांनो, एक व्हा!” अशी आरोळी ठोकायची आता वेळ येऊन ठेपलीय! मानवजातीच्या हजारो वर्षांच्या श्रमाच्या फळांना पायदळी तुडवायला रानटी माणसं येत आहेत. लोभानं पेटून ती धावत येत आहेत!

याकोव : त्यांचे आत्मे त्यांच्या पोटात आहेत, भुकेल्या पोटांमध्ये! हे दृश्य पाहून कुणालाही दारू प्यावीशी वाटेल. (ग्लासात बीयर ओतून घेतो.)

निकोलाय : लोभानं ग्रासलेली झुंड येत आहे आणि एकाच इच्छेनं. ती एकवटलीय – चरण्याच्या!

तात्याना (विचारमग्न होत) : झुंड... सगळीकडं झुंडी! थिएटरात, चर्चमध्ये...

निकोलाय : ही माणसं बरोबर काय आणतील? विध्वंसाशिवाय दुसरं काहीही नाही. आणि लक्षात ठेवा, इतर कुठल्याही ठिकाणापेक्षा आपल्याकडला विध्वंस महाभयानक असेल.

तात्याना : कामगार प्रगत माणसं आहेत असं जेव्हा मी ऐकत्ये, तेव्हा मला आश्चर्य वाटतं! माझ्या समजुतीपेक्षा हे फार दूरचं आहे.

निकोलाय : तुम्ही श्रीमान सीन्त्सोव ... तुम्ही अर्थातच आमच्याशी सहमत नसणार?

सीन्त्सोव (शांतपणे) : नाही.

नाद्या : तुला आठवतं तान्यामावशी, म्हातारा कोपेकबद्दल बोलला होता? किती सोपं सांगितलं त्यानं!

निकोलाय: तुम्ही का सहमत नाही, श्रीमान सीन्तसोव ?

सीन्त्सोव: माझी विचारांची रीत वेगळी आहे.

निकोलाय: पूर्णतया योग्य उत्तर ! कदाचित तुमचे विचार आम्हाला ऐकवाल ?

सीन्त्सोव: नाही. माझी इच्छा नाही.

निकोलाय: ऐकायला फार वाईट वाटतं. आशा धरतो की, पुन्हा तुमच्याशी भेट होईल, तेव्हा तुमची मनःस्थिती बदललेली असेल. याकोव इवानोविच, जर शक्य असेल तर कृपया मला पोचवायला या ! माझं चित्त अजिबात थाऱ्यावर नाही.

याकोव (कष्टाने उठत) : जरूर, जरूर.

जातात.

तात्याना: हा वकील – अगदी नकोसा वाटतो त्याच्याबरोबर सहमत व्हायला मला मुळीच आवडत नाही.

नाद्या (उठत) : मग का तू सहमत होत्येस ?

सीन्त्सोव (हसत) : खरंच, काय कारण, तात्याना पावलोवना ?

तात्याना: क़ारण मला स्वतःला तसंच जाणवतं !

सीन्त्सोव (तात्यानाला) : तुम्ही विचार तसा करता, पण तुम्हाला जाणवतं त्यांच्यापेक्षा वेगळ्या रीतीनं ! तुमची समजून घ्यायची इच्छा आहे, पण त्यांना तशी तसदी घ्यावीशी वाटत नाही. समजून घ्यायची त्यांना गरज नाही.

तात्याना: ते फार क्रूर असावेत.

सीन्त्सोव : होय. शहरात ते राजकीय खटले हाताळतात आणि अटक झालेल्या लोकांशी ते फार वाईट वागतात.

तात्याना : खरंच, त्यांनी स्वतःच्या टिपणवहीत तुमच्याबद्दल काहीतरी लिहिलं!

सीन्त्सोव (स्मित करत) : नक्कीच लिहिलं असणार. पालोगीशी चर्चा करतात. एकूण... कामात गुंतले आहेत! तात्याना पावलोवना, माझी तुम्हाला एक विनंती आहे...

तात्याना : बोला... विश्वास ठेवा — जर ती पार पाडणं मला शक्य असेल, तर मी आनंदानं तुमचं काम करीन!

सीन्त्सोव : धन्यवाद. मला वाटतं, गुप्त पोलीसांना बोलावलंय.

तात्याना : होय.

सीन्त्सोव : म्हणजे झडत्या होणार! काहीतरी लपवून ठेवायला तुम्ही मला मदत कराल?

तात्याना : तुमच्याकडं झडती घेतील असं वाटतं?

सीन्त्सोव : बहुधा!

तात्याना : आणि तुम्हाला अटक करतील?

सीन्त्सोव : तसं वाटत नाही. कशाबद्दल अटक करणार? भाषण केलं म्हणून? पण झखार इवानोविचना माहीत आहे की, ह्या भाषणांमधून मी कामगारांना शिस्त राखण्याची आवाहनं केलीत.

तात्याना : आणि तुमची पूर्वीची काही गडबड नाही?

सीन्त्सोव : मला भूतकाळ नाही. तर मला मदत

करणार का तुम्ही ? तुम्हाला मी त्रास दिला नसता, पण ह्या वस्तू जे कुणी लपवून ठेवू शकतील, त्या सर्वांच्या घरांच्या उद्या झडत्या होतील. (हळूच हसतो.)

तात्याना (शरमून) : मी स्पष्ट बोलत्ये... ह्या घरातली माझी परिस्थिती अशी आहे की, मला रहायला दिलेली खोली माझी आहे असं मी म्हणू शकत नाही.

सीन्त्सोव : म्हणजे तुम्हाला शक्य नाही ? असो !

तात्याना : कृपा करून अपमान वाटून घेऊ नका !

सीन्त्सोव : छे:, छे: ! तुमचा नकार समजू शकतो !

तात्याना : जरा थांबा, मी नाद्याशी बोलत्ये. (जाते.)

तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात सीन्त्सोव टेबलावर बोटांचा ठेका धरतो. सावध पावलांचा आवाज.

सीन्त्सोव (हळूच) : कोण आहे ?

ग्रेकोव : मी. तुम्ही इथं एकटेच ?

सीन्त्सोव : होय. पण भोवती माणसं वावरताहेत. कारखान्यात काय परिस्थिती ?

ग्रेकोव (किंचित हसून) : तुम्हाला माहीत आहे – गोळी झाडणाऱ्याला शोधून द्यायचं त्यांनी कबूल केलंय. आता तिथं तपास चाललाय. काहीजण ओरडताहेत : "समाजवाद्यांनी खून केला !" ज्यांना स्वत:ची कातडी बचावायची आहे, त्यांचा हा गोंगाट चाललाय !

सीन्त्सोव : तुम्हाला माहीत आहे – कुणी खून केला ?

ग्रेकोव : आकीमोव.

सीन्त्सोव : काय म्हणता ? कल्पनासुद्धा केली नव्हती ! इतका छान, विचारी पोरगा...

ग्रेकोव : भडक माथ्याचा आहे. स्वतःच कबूल कर-णार म्हणतो. त्याला बायको आहे, लहान मूल आहे... नोकरच आणखी एक होईल. आत्ता मी लेवशिनशी बोललो. अर्थात तो वेडपटासारखं बोलतोय – म्हणे आकीमोवपेक्षा कुणा कमी महत्त्वाच्या माणसाला आपण बदली म्हणून दिलं पाहिजे.

सीन्त्सोव : विचित्र आहे! पण हे ऐकून फार वाईट वाटलं!

स्तब्धता.

हे बघा ग्रेकोव, सगळ्या गोष्टी मातीत पुरून टाका. कुठंही लपवायला जागा नाही.

ग्रेकोव : मी जागा शोधलीय. तारमास्तरनं सगळं लपवायचं कबूल केलंय. मत्वेय निकोलायेविच, तुम्ही इथून निघून जाणं बरं ठरेल!

सीन्त्सोव : नाही, मी जाणार नाही.

ग्रेकोव : तुम्हाला अटक होईल.

सीन्त्सोव : मग काय झालं? जर मी गेलो, तर कामगारांची गैरसमजूत होईल.

ग्रेकोव : हे खरं आहे, पण तुमच्याबद्दल वाईट वाटतं.

सीन्त्सोव : फालतू! आकीमोवबद्दल मात्र खरंच वाईट वाटतं.

ग्रेकोव : होय. आणि काहीही मदत करता येत नाही! तो स्वतःच कबूल करणार म्हणतो... मालकांच्या इस्टे-टीची राखण करणाऱ्यांच्या प्रमुखाच्या भूमिकेत तुम्हा-ला पाहताना मात्र हसू येतं.

सीन्त्सोव (स्मित करत) : काय करणार ? मला वाटतं, माझी सेना झोपलीय ?

ग्रेकोव : नाही. एकत्र जमून चर्चा करताहेत. रात्र फार छान आहे.

सीन्त्सोव : मीसुद्धा इथून गेलो असतो... पण, वाट बघतोय... तुम्हालासुद्धा बहुधा अटक करतील.

ग्रेकोव : बरोबरच तुरुंगात बसू ! मी चलतो. (जातो.)

सीन्त्सोव : भेटू परत.

तात्याना येते.

तुम्ही आता तसदी घेऊ नका, तात्याना पावलोवना. सगळी व्यवस्था झाली. भेटू परत !

तात्याना : मला खरंच फार वाईट वाटतंय !

सीन्त्सोव : शुभरात्री ! (जातो.)

स्वतःच्या सँडलच्या टोकांकडे पहात तात्याना शांतपणे येरझाऱ्या घालते. याकोव येतो.

याकोव : तू झोपायला का जात नाहीस ?

तात्याना : इच्छा नाही. इथून निघून जायचा माझा विचार चाललाय.

याकोव : अस्सं ! पण मला जायला कुठं जागाच नाही. सगळ्या खंडांच्या आणि बेटांच्या जवळून एव्हाना मी पार झालोय.

तात्याना : इथं फार अवघड जातंय. सगळं हिंदकळतंय आणि डोकं विचित्रपणं भिरभिरतंय. नाइला-

ज्ञानं खोटं बोलावं लागतं आणि हे मला आवडत नाही.

याकोव : हं... हे तुला आवडत नाही. माझं दुर्दैव. फार मोठं दुर्दैव.

तात्याना (स्वतःशी) : आत्ताच मी खोटं बोलल्ये. न्या वस्तू लपवून ठेवायला अर्थातच नाद्या कबूल झाली असती. पण त्या रस्त्यावर तिला ढकलण्याचा मला अधिकार नाही.

याकोव : कशाबद्दल बोलत्ये आहेस ?

तात्याना : मी ? असंच... सगळं विचित्र ! अगदी थोड्या काळापूर्वी आयुष्य कसं स्पष्ट होतं ; मला काय हवं ते मला माहीत होतं असं वाटायचं.

याकोव (शांतपणे) : गुणी दारुडे, सुंदर रिकामटे-कडे आणि आनंदी उद्योगांमधली इतर मंडळी इतःपर स्वतःकडं लक्ष देत नाहीत. जोवर रोजच्या कंटाळवा-ण्या रगाड्यात आम्ही वेगळेपणानं उठून दिसत होतो, तोवर लोकांनी आमच्यात रस घेतला. पण आता रोजचं जीवनच जास्त जास्त नाट्यमय होत चाललंय. आणि माणसं आमच्यावर ओरडतात : "ए विदूषकांनो आणि विनोदी नटांनो ! रंगभूमीवरून चालते व्हा !" पण रंगभूमी हा तुझा प्रांत, तान्या !

तात्याना (अस्वस्थपणे) : माझा प्रांत !.. मला वाटलं होतं – मी रंगभूमीवर भक्कम पाय रोवून उभी राहीन ! खूप मोठी होईन ! (कष्टाने आणि दुःखाने.) थंड नजरेनं माझ्याकडं पाहणाऱ्या लोकांसमोर उभं राहणं मला अवघड जातं, फार सायास पडतात. जणू मूकपणं ते लोक म्हणत असतात : "आम्हाला हे ठाऊक

आहे. हे सगळं जुनं आणि कंटाळवाणं आहे ! " त्यांच्यासमोर मला दुबळेपण जाणवतं, निःशस्त्र उभं असल्यासारखं वाटतं. मी त्यांच्या मनांचा कबजा घेऊ शकत नाही, त्यांना जागृत करू शकत नाही. आनंदानं आणि भीतीनं थरारून जायची माझी इच्छा आहे. आगीनं धगधगणारे, आवेगानं आणि तिरस्कारानं भरलेले शब्द भडाभडा बोलायची माझी इच्छा आहे. धारदार सुरीसारखे आणि मशालीसारखे पेटते शब्द ! लोकांवर त्यांची मुक्त उधळण करावीशी वाटत्ये ! खुशाल लोक पेटून उठोत, किंचाळोत, धूम धावोत ! पण तसे शब्द नाहीत. पळणाऱ्या लोकांना यावेळी मी दुसऱ्या शब्दांनी थोपवीन – फुलांसारख्या सुंदर, आशेनं, प्रेमानं आणि आनंदानं भरलेल्या शब्दांनी ! ते रडतील आणि मीसुद्धा रडेन ! सुंदर आसवं ढाळीन ! टाळयांच्या कडकडाटानं ते माझं कौतुक करतील, फुलांनी मला गुदमरवून टाकतील आणि हातांवर उचलून नेतील. एक क्षणभर लोकांवर मी सत्ता गाजवली पाहिजे. हे क्षणाचं जीवन ... माझं सगळं जीवन त्या क्षणात सामावेल ! पण असे सजीव शब्द नाहीत.

याकोव : फक्त क्षणाचं जगणं आपणा सर्वांना माहीत आहे.

तात्याना : सर्वोत्तम अशा सर्व गोष्टी क्षणभंगुर आहेत. वेगळी माणसं बघायची माझी फार इच्छा आहे. अधिक प्रतिसाद देणारी ! वेगळं आयुष्य, असलं निरर्थक नव्हे ! ज्या आयुष्यात कला सगळयांना आणि नेहमी अत्यावश्यक आहे असं ! जिथं मी उपरी नसेन असं ...

याकोव विस्फारल्या डोळ्यांनी अंधाराकडे पाहतो.

कशाला तू एवढं पितोस? ह्या दारूनं तुझा नाश केला. एकेकाळी किती देखणा होतास!

याकोव: पुरे!

तात्याना: मला किती जड जातंय ह्याची तुला जाणीव आहे?

याकोव (भेदरून): मी कितीही झिंगलेला असलो तरी मला सगळं समजतं! केवढं दुर्भाग्य! हा नतद्रष्ट मेंदू सतत काम करतोय! नेहमी! माझ्यासमोर मोठ्या डोळ्यांचा एक मळकट चेहरा उभा राहतो आणि विचार-तो: "मग?" तो चेहरा फक्त एकच शब्द विचारत राहतो: "मग?"

पालीना (धावत येते): तान्या!.. तान्या, तू चल बाई तिकडं! त्या क्लेओपात्राला वेड लागलंय! सगळ्यांचा अपमान करत्येय... कदाचित तू तिला शांत करशील.

तात्याना (केविलवाणेपणाने): तुमच्या भांडणांमध्ये मला उगाच ओढू नका! पाहिजे तर एकमेकांना गिळून टाका, पण लोकांच्या वाटेत निष्कारण आडवं येऊ नका!

पालीना (घाबरून): तान्या! काय बोलत्येस? काय झालंय तुला?

तात्याना: काय पाहिजे तुम्हाला? काय हवंय् तुम्हाला?

पालीना: बघ तिच्याकडं... ती इकडंच येत्येय!

झखार (रंगमंचामागून): मी तुम्हाला विनंती करतो– आता गप्प रहा!

क्लेओपात्रा (रंगमंचामागून) : तुम्ही ... तुम्ही माझ्यासमोर मुकाट राहिलं पाहिजे !

पालीना : इथं ती आरडाओरडा करील. इथं नोकरमाणसं फिरताहेत. हे फार भयंकर ! तान्या, मी तुला हात जोडत्ये ...

झखार (प्रवेश करतो) : मला वाटतं, माझं आता डोकं फिरणार !

क्लेओपात्रा (त्याच्या पाठोपाठ येत) : तुम्ही माझ्यापासून पळून जाऊ शकत नाही. माझं बोलणं ऐकून घ्यायला मी तुम्हाला भाग पाडीन ! तुम्ही कामगारांशी खेळ खेळलात, कारण त्यांचा तुम्हाला आदर हवाय् ! पिसाळलेल्या कुत्र्यांसमोर मांसाचा तुकडा फेकावा, तसं तुम्ही माणसाचं आयुष्य त्यांच्यासमोर फेकून दिलंत ! दुसऱ्याच्या जीवावर, दुसऱ्याच्या रक्तावर, तुम्ही मानवतावादी आहात !

झखार : ती काय बोलत्येय ?

याकोव (तात्यानाला) : तू इथून निघून जाणं चांगलं ! (जातो.)

पालीना : बाईसाहेब ! आम्ही सभ्य माणसं आहोत आणि तुमच्यासारख्या कीर्तीच्या बाईनं आमच्यावर असं तोंड टाकलेलं आम्ही खपवून घेणार नाही.

झखार (घाबरून) : चूप रहा पालीना ... कृपा कर !

क्लेओपात्रा : कशावरून तुम्ही सभ्य माणसं ? राजकारणाच्या गप्पा मारता म्हणून ? दुर्दैवी माणसांबद्दल चर्चा करता म्हणून ? प्रगती आणि मानवतावादाच्या बाता मारता म्हणून ?

तात्याना : क्लेओपात्रा पेत्रोवना ! पुरे झालं !

क्लेओपात्रा : मी तुमच्याशी मुळीच बोलत नाही ! तुम्ही इथं उपऱ्या आहात ! तुमचा ह्यात काही संबंध नाही ! माझा नवरा प्रामाणिक माणूस होता... सरळ आणि प्रामाणिक. तुमच्यापेक्षा तो लोकांना जास्त चांगलं जाणत होता. तुमच्यासारख्या लंब्याचवड्या गप्पा तो मारत नव्हता. पण तुमच्या करंट्या मूर्ख-पणापायी तुम्ही त्याचा विश्वासघात केलात ! त्याचा खून केलात !

तात्याना (पालीना व झखारला) : तुम्ही दोघं इथून निघून जा ना !

क्लेओपात्रा : मी स्वतःच निघून जात्ये ! तुम्ही किळसवाणे आहात – सगळे ! (जाते.)

झखार : काय चक्रम बाई आहे !

पालीना (साश्रुनयनांनी) : सगळं सोडून दिलं पाहिजे ... इथून निघून जायला हवं ! माणसांचा वाट्टेल तसा अपमान करतात ...

झखार : अशी का वागत्ये ती ? जर नवऱ्यावर प्रेम केलं असतं, जर गुण्यागोविंदानं त्याच्याबरोबर राहिली असती ... पण दर वर्षाला दोन नवे प्रेमिक बदलायचे ... आणि पुन्हा असं ओरडत फिरायचं ?

पालीना : कारखाना विकून टाकावा !

झखार (चिडून) : बस्स करा ! विकणं हा उपाय नव्हे ! विचार केला पाहिजे ... फार नीट विचार केला पाहिजे ! आत्ता मी निकोलाय वासिल्येविचबरोबर बोलत होतो, तेवढ्यात ही बाई तिथं उपटली आणि

आमच्या बोलण्यात तिनं अडथळा आणला.

पालीना: तो निकोलाय वासिल्येविच आपला द्वेष करतो. भयंकर माणूस आहे.

झखार (शांत होत): तो खूप चिडलाय आणि त्याला धक्का बसलाय, पण तो हुशार माणूस आहे आणि आपला द्वेष करण्याचं त्याला काहीही कारण नाही. मिखाइलच्या मरणानंतर पूर्ण व्यावहारिक कारणांनी तो माझ्याशी बांधला गेला आहे.

पालीना: माझा त्याच्यावर विश्वास नाही. मला भीती वाटत्ये त्याची! तो तुला फसवील!

झखार: अग पालीना, ह्या सगळ्या क्षुल्लक बाबी आहेत! तो फार चतुराईनं विचार करतो! वस्तुस्थिती अशी आहे. की, कामगारांशी मी खरंच दुटप्पी धोरणानं वागतोय. मला हे मान्य केलं पाहिजे. संध्याकाळी जेव्हा मी त्यांच्याशी बोललो... पालीना, ही माणसं आपल्या अगदी कट्टर विरोधी आहेत!

पालीना: मी तुला सांगितलं होतं... बोलल्ये होत्ये! ते नेहमीच आपले वैरी आहेत!

तात्याना हळूच हसते व निघून जाते. पालीना तिच्याकडे नजर टाकते व मुद्दामच वरच्या स्वरात बोलते.
सगळेच आपले वैरी! सगळ्यांना मत्सर वाटतो... म्हणून आपल्यावर असे तुटून पडतात!

झखार (भराभर येरझाऱ्या घालत): काही अंशी तुझं म्हणणं खरं आहे. निकोलाय वासिल्येविच म्हणतात: हा वर्गांमधला लढा नाही, तर वंशांमधला आहे – काळ्या आणि गोऱ्या! असं बोलणं थोडं रांगडं वाटतं,

अतिरेकी टोकाला गेल्यासारखं वाटतं. पण विचार केला, तर आपण, सुसंस्कृत लोकांनी, शास्त्रांचा, कलांचा विकास घडवला... समता ... शारीरिक समता ... ठीक आहे. पण प्रथम त्यांना माणसं बनू दे, सुसंस्कृत होऊं दे... मग बोलू समतेच्या गोष्टी!

पालीना (सावध होत): हे तू नवीनच बोलायला लागलास.

झखार: माझे हे विचार मतभेदातून बनलेत. पूर्ण विचारांती बनलेले नाहीत. प्रथम स्वतःला जाणून घेणं महत्त्वाचं आहे.

पालीना (त्याचा हात धरत): तू फार मऊ स्वभा-वाचा आहेस माझ्या मित्रा! म्हणून तुला हे सारं अवघड जातं!

झखार: आपल्याला फार कमी माहीत असतं आणि म्हणून वारंवार अशी चकित व्हायची पाळी येते. त्या सीन्त्सोवचं उदाहरण घे – त्यानं मला चकित केलं. स्वतःला माझा आवडता बनवलं किती साधेपणा, किती स्पष्ट तर्कशुद्धता! असं आढळतं की, तो समाजवादी आहे आणि त्यातून त्यांच्यात साधेपणा आणि तर्क-शुद्धपणा निर्माण झालेत!

पालीना: होय, होय... त्याचं वागणं लक्ष वेधून घेणारं आहे. चेहरा किती अप्रिय! पण तू जरा विश्रांती घेतलीस तर बरं... चल जाऊ या?..

झखार (तिच्या पाठीमागून जात): आणखी एक कामगार... ग्रेकोव... अत्यंत गर्विष्ठ माणूस! मी आणि निकोलाय वासिल्येविच आत्ताच त्याच्या भाषणावर

चर्चा करत होतो... एवढासा पोर... पण बोलतो काय! विलक्षण मग्रूरीनं!

जातात. शांतता. कुठेतरी गाणे गात आहेत. मग हळू आवाज ऐकू येतात. यागोदिन, लेवशिन आणि न्याबत्सोव नांवाचा तरुण प्रवेश करतात. तो सतत मानेला झटके देतो. चेहरा गोल आणि सुस्वभावी.

तिघे झाडांखाली थांबतात.

लेवशिन (हळू, गूढ आवाजात): पाशा, हे सार्वजनिक हिताचं काम आहे.

न्याबत्सोव: मला माहीत आहे.

लेवशिन: सगळ्या माणूसजातीचं काम आहे... बंधू, आता प्रत्येक थोर आत्म्याला फार मोठी किंमत आहे. माणसं जागृत होताहेत, ऐकताहेत, वाचताहेत, विचार करताहेत. ज्यांना थोडी-फार समज आलीय अशी त्यातली माणसं मोलाची आहेत.

यागोदिन: हे मात्र खरं, पाशा.

न्याबत्सोव: माहीत आहे. सांगायला कशाला पाहिजे? मी जाईन.

लेवशिन: निष्कारण कुठं जाण्याचं कारण नाही. समजून घेतलं पाहिजे. तू तरुण आहेस आणि ह्या कामी – सक्तमजुरी होणार!

न्याबत्सोव: काही हरकत नाही. मी पळून जाईन.

यागोदिन: कदाचित सक्तमजुरी व्हायचीही नाही! पाशा, सक्तमजुरीला तुझं वय लहान ठरेल!

लेवशिन: सक्तमजुरी होईल असंच धरून बोलू!

ह्या कामी वाईट जेवढं जास्त अपेक्षू, तेवढं जास्त बरं! माणूस जर सक्तमजुरीला घाबरत नसेल, तर त्याचं मन खंबीर समजायचं!

न्याबत्सोव: मी खंबीरपणं निर्णय घेतलाय.

यागोदिन: थांब. नीट विचार कर.

न्याबत्सोव: विचार कसला करायचा? खून केलात, तर त्याची किंमत कुणालातरी मोजणं भागच आहे.

लेवशिन: बरोबर! किंमत देणं भाग आहे. आणि जर एक पुढं झाला नाही, तर अनेकांचा छळ होईल. आपल्यातल्या चांगल्या, चांगल्या माणसांचा छळ करतील. सार्वजनिक कार्यासाठी तुझ्याहून जास्त मोलाच्या माणसांचा, पावेल!

न्याबत्सोव: पण मी काही बोलतोय का? वयानं लहान असलो तरी मला समजतं... आपण साखळीतल्या कड्यांप्रमाणं एकमेकांना घट्ट धरून राहिलं पाहिजे.

लेवशिन (उसासा टाकत): अगदी बरोबर.

यागोदिन (स्मित करत): एकमेकांचे हात पकडू, त्यांना वेढा घालू, घट्ट आवळत नेऊ आणि... खलास!

न्याबत्सोव: ठीक आहे. मी एकटाच आहे, तेव्हा मी जायचं ठरलं. फक्त अशा कुजक्या रक्तासाठी एवढी मोठी किंमत द्यायला वाईट वाटतं.

लेवशिन: रक्तासाठी नव्हे, बांधवांसाठी!

न्याबत्सोव: नाही, मी त्या माणसाबद्दल बोलतो. अगदी पशू होता. नीच!

लेवशिन: म्हणून त्याचा खून झाला. भला माणूस स्वतःच मरतो. माणसांना तो भार ठरत नाही.

न्याबत्सोव : मग ? झालं ?

यागोदिन : होय, पाशा ! तर उद्या सकाळी सांगशील ?

न्याबत्सोव : कशाला उद्यापर्यंत लांबवायचं ? मी सांगतोय, मी आत्ता जातो.

लेवशिन : नाही, तू उद्याच सांगणं जास्त चांगलं ! रात्र कशी आईसारखी असते. ती भली सल्लागार असते.

न्याबत्सोव : बरं तर... आता मी चलतो.

लेवशिन : देव तुझं भलं करो !

यागोदिन :जा बंधू, खंबीरपणं जा !

न्याबत्सोव सावकाशपणे जातो. यागोदिन हातातील छडी फिरवत तिच्याकडे पहात राहतो. लेवशिन आकाश न्याहाळतो.

लेवशिन (हळूच) : चांगली माणसं निपजायला लागलीत , तीमोफेय !

यागोदिन : चांगली हवा... चांगलं पीक !

लेवशिन : ह्या खळग्यातून आपण वर येणार असं वाटायला लागलंय !

यागोदिन (विषण्णपणे) : पोराबद्दल वाईट वाटतं.

लेवशिन (हळूच) : खरंच वाईट वाटतं ! तुरुंगात जायचं – अशा आरोपाखाली ! एकच मनाला समाधान – बांधवांसाठी केलं !

यागोदिन : होय !

लेवशिन : पण तू आता जीभ आवर ! कशाला आकीमोवनं भान सोडलं ? खून करून काय लाभ ?

काहीही नाही! एका कुत्र्याला ठार मारलंस तर मालक दुसरा कुत्रा विकत आणतो... इथंच गोष्ट संपली!

यागोदिन (दुःखाने): आपली किती माणसं बलिदान करताहेत!

लेवशिन: चल, पहारेकऱ्या! मालकाच्या इस्टेटीची चांगली राखण केली पाहिजे!

जातात.

देवा रे!

यागोदिन: काय झालं तुला?

लेवशिन: फार अवघड जातंय! आयुष्याला लौकर काहीतरी वेगळं वळण लावलं पाहिजे!

पडदा

अंक तिसरा

बार्दिनांच्या घरातील मोठी खोली. पाठीमागील भिंतीत चार खिडक्या आणि व्हरांड्याकडे जायचे दार. काचांमधून शिपाई, पोलीस, कामगारांचा घोळका यांचे दर्शन घडते. कामगारांमध्ये लेवशिन, ग्रेकोव आहेत. खोलीत कुणी रहात नसावे असे दिसते. तेथील अगदी कमी फर्निचर जुने, चित्रविचित्र. भिंतींवरचा कागद फाटलेला. उजव्या भिंतीशी मोठे टेबल. चिडलेला कोन टेबलाभोवती खुर्च्या सरकवतो आहे. आग्राफेना

फरशी पुसत्येय. डाव्या आणि उजव्या भिंतींमध्ये दुहेरी फळीची मोठी दारे.

आग्राफेना: माझ्यावर राग धरायचं काही कारण नाही.

कोन: मी रागावलो नाही. मला कुणाचीही पर्वा नाही. देवाच्या कृपेनं लौकरच मी मरीन. माझं काळीज थांबत चाललंय.

आग्राफेना: आपण सगळेच मरणार आहोत! फुशारक्या मारायची गरज नाही.

कोन: आता माझ्यानं जास्त सोसवत नाही! पासष्ट वर्षं! आक्रोडासारख्या गोष्टी खायला दात शिल्लक राहिले नाहीत! माणसांना गोळा करून पावसात भिजवताहेत!

डाव्या दारातून कप्तान बाबोयेदोव आणि निकोलाय प्रवेश करतात.

बाबोयेदोव (मजेने): ही कोर्टाची खोली म्हणून झकास आहे! मला वाटतं, तुम्ही वकील ह्या नात्यानं उभे राहणार आहात?

निकोलाय: होय, होय. कोन, नाईकांना बोलवा!

बाबोयेदोव: आता ही थाळी आपण अशी सजवायची: मध्यभागी तो... काय त्याचं नांव?

निकोलाय: सीन्त्सोव.

बाबोयेदोव: सीन्त्सोव... अगदी काळजाला हेलावणारं! त्याच्या भोवती – जगातले सगळे कामगार?.. कसं? मनाला कसा आनंद होतोय! ह्या जागेचा मालक

छान माणूस आहे! फारच! आमचं त्याच्याबद्दल अगदी वाईट मत होतं यापूर्वी! त्याच्या भावजयीला मी ओळखतो – ती वारोनेझमध्ये नाटकात कामं करायची. अतिशय छान नटी म्हटलं पाहिजे.

क्वाच व्हरांड्यातून येतो.

काय, क्वाच?

क्वाच: सगळ्यांची झडती घेतली, साहेब.

बाबोयेदोव: छान. मग?

क्वाच: काही सापडलं नाही... लपवलंय! साहेब, सांगायला परवानगी द्या की, पोलीस इन्स्पेक्टर फार घाईघाईनं झडत्या घेताहेत आणि फारसं लक्ष देऊन काम करत नाहीत.

बाबोयेदोव: अर्थात, पोलीस नेहमीच असं वागतात! अटक केलेल्यांच्या घरांमध्ये काही सापडलं?

क्वाच: लेवशिनच्या घरी तसबिरींमागं काही सापडलं.

बाबोयेदोव: सगळ्या वस्तू माझ्या खोलीत आणा.

क्वाच: होय साहेब! तरुण पोलीस, जो नुकताच घोडेस्वार पलटणीतून आलाय, साहेब...

बाबोयेदोव: काय झालं त्याचं?

क्वाच: तोसुद्धा ध्यान देऊन काम करत नाही.

बाबोयेदोव: तूच त्याच्याकडं नीट ध्यान दे! चल जा!

क्वाच जातो.

हा क्वाच अजब पक्षी आहे! दिसतो असा बावळा आणि वागतो थोडा मूर्खाप्रमाणं – पण नाक तीक्ष्ण! कुत्र्यासारखं!

निकोलाय: तुम्ही, बग्दान देनिसोविच, त्या कारकूनावर नीट लक्ष ठेवा.

बाबोयेदोव: अर्थात, अर्थात! आम्ही त्याला चांगला पिळून काढू.

निकोलाय: मी पालोगीबद्दल बोलतोय, सीन्त्सोवबद्दल नव्हे. मला वाटतं, तो आपल्या उपयोगी पडेल.

बाबोयेदोव: आपण ज्याच्याशी बोलत होतो तो? अर्थात आम्ही त्याला ह्यात खेचू.

निकोलाय टेबलाशी जातो आणि काळजीपूर्वक दस्तऐवज रचतो.

क्लेओपात्रा (उजव्या दारात): कप्तान, आणखी चहा हवा?

बाबोयेदोव: धन्यवाद, चालेल! ही जागा फार सुंदर आहे... अतिशय सुरेख! मी मादाम लूगोवायाना ओळखतो. वारोनेझमध्ये त्या नाटकात कामं करायच्या ना?

क्लेओपात्रा: होय म्हणे! नाटकात कामं करायची ती. तुमच्या झडत्यांमधून काही सापडलं?

बाबोयेदोव (रुबाबात): सगळं, सगळं सापडलं! आम्ही शोधून काढू, तुम्ही काळजी करू नका! आमच्यासारख्यांना जिथं काहीही नसतं, अशा ठिकाणीसुद्धा काहीतरी सापडतंच!

क्लेओपात्रा : माझ्या दिवंगत पतीनं ह्या सगळ्या जाहीरनाम्यांकडं तेवढं गंभीरपणानं लक्ष दिलं नव्हतं. कागद क्रांती करत नाही असं म्हणायचा.

बाबोयेदोव : हं... हे मुळीच खरं नाही!

क्लेओपात्रा : हे जाहीरनामे म्हणजे वेड्यांनी मूर्खांना दिलेले गुप्त हुकूम आहेत, असं म्हणायचा.

बाबोयेदोव : फार चतुराईचं – पण हेसुद्धा बरोबर नव्हे!

क्लेओपात्रा : आणि आता पहा – कागदांमधून ते कृतीत शिरलेत.

बाबोयेदोव : त्यांना अत्यंत कडक शासन होईल ह्याची तुम्ही खात्री बाळगा! अत्यंत कडक!

क्लेओपात्रा : ह्यामुळं माझं मन खूप शांत होतंय. तुम्ही येताच मला एकदम हलकं वाटायला लागलं... मोकळं!

बाबोयेदोव : लोकांच्या चित्तवृत्ती उल्हसित ठेवणं आमचं कर्तव्य आहे.

क्लेओपात्रा : पूर्ण समाधानी, निकोप माणसाला पाहण्यात किती आनंद वाटतो म्हणून सांगू! फार क्वचित असा माणूस बघायला मिळतो.

बाबोयेदोव : आमच्या पोलीस खात्यात सगळे वेचक पुरुष असतात!

क्लेओपात्रा : चला टेबलाशी!

बाबोयेदोव (जात) : आनंदानं! मला सांगा, ह्या मोसमात मादाम लूगोवाया कुठं काम करणार आहेत?

क्लेओपात्रा : माहीत नाही.

व्हरांड्यातून तात्याना आणि नाद्या येतात.

नाद्या (अस्वस्थपणे) : तो म्हातारा लेवशिन आपल्याकडं कसा बघत होता. ते तू पाहिलंस ?

तात्याना : पाहिलं.

नाद्या : किती वाईट झालं ... लाज वाटत्ये ! निकोलाय वासिल्येविच, कशासाठी असं ? कशाबद्दल त्यांना अटक केली ?

निकोलाय (शुष्कपणे) : अटकेसाठी भरपूर कारणं आहेत. आणि तुम्हाला विनंती करतो ... व्हरांड्याचा वापर करू नका जोवर ही ...

नाद्या : नाही करणार ... नाही करणार.

तात्याना (निकोलायकडे पहात) : सीन्त्सोवनासुद्धा अटक झाली ?

निकोलाय : श्रीमान सीन्त्सोवनासुद्धा अटक झालीय.

नाद्या (खोलीत येरझाऱ्या घालत) : सतरा माणसं ! तिथं फाटकापाशी त्यांच्या बायका रडताहेत. शिपाई त्यांना धक्काबुक्की करताहेत आणि त्यांना हसताहेत. त्या शिपायांना सांगा – निदन सभ्यपणानं वागा !

निकोलाय : त्याच्याशी माझा संबंध नाही. शिपायांचे प्रमुख लेफ्टनंट स्त्रेपेतोव आहेत.

नाद्या : मीच जाऊन सांगत्ये त्यांना ... (उजव्या बाजूच्या दारातून जाते.)

स्मित करून तात्याना टेबलापाशी येते.

तात्याना : अहो कायद्यांचं स्मशान, जनरल तुम्हाला अशीच हाक मारतात ना !

निकोलाय : जनरल मला फार चतुर माणूस वाटत नाही. त्यांचे विनोद मी तरी परत सांगितले नसते.

तात्याना : माझी चूक झाली. ते तुम्हाला म्हणतात – कायद्यांची शवपेटी. तुम्हाला ह्याचा राग येतो?

निकोलाय : मी विनोद करण्याच्या मन:स्थितीत नाही.

तात्याना : तुम्ही खरंच एवढे गंभीर गृहस्थ आहात?

निकोलाय : तुम्हाला आठवण करून देतो – काल माझ्या भावाचा खून झाला.

तात्याना : पण त्याचं तुम्हाला काय?

निकोलाय : माफ करा, पण ...

तात्याना (किंचित हसून) : उगाच बहाणे करू नका. भावाबद्दल तुम्हाला मुळीच वाईट वाटलेलं नाही. तुम्हाला कुणाहीबद्दल कणव येत नाही. माझंही असंच आहे. मरण, अचानक मरण, नेहमीच धक्का देतं. पण मी खात्रीनं सांगत्ये, तुम्हाला एक क्षणभरसुद्धा तुमच्या भावाबद्दल खरोखर, माणुसकीच्या दृष्टीनं, वाईट वाटलं नाही. तुमच्यात ती भावनाच नाही!

निकोलाय (पेचात पडून) : कमाल आहे! काय पाहिजे तुम्हाला माझ्यापासून?

तात्याना : आपण दोघं वृत्तीनं समधर्मी आहोत हे तुमच्या ध्यानात येत नाही? नाही? अरेरे! मी नटी – थंड प्रवृत्तीची. मला नेहमी फक्त एकच इच्छा – भूमिका उत्तम वठवायची. तुम्हालासुद्धा उत्तम भूमिका वठवायची इच्छा आहे आणि तुमचंसुद्धा दगडी मन आहे. मला खरं सांगा – तुम्हाला वकील व्हायची इच्छा आहे?

निकोलाय (हळू आवाजात) : माझी इच्छा आहे

की, तुम्ही हे थांबवावं.

तात्याना (मूक हास्य करत) : नाही, माझ्यात मुत्सद्दे-गिरी नाही. मी काही विशिष्ट हेतूनं तुमच्यापाशी आल्येय. तुमच्याबरोबर लाडिक आणि मोहक वागायची माझी इच्छा होती. पण तुम्हाला पाहताच तुमचा अपमान करू लागल्ये. तुम्हाला पाहिलं म्हणजे नेहमी माझ्या मनात इच्छा होत्ये – तुमचा अपमान करणारे शब्द बोलण्याची. तुम्ही बसलेले असोत, उभे असोत, बोलत असोत अथवा लोकांबाबत मूकपणानं मतं बनवत असोत... तर मला तुम्हाला विचारायचं होतं...

निकोलाय (किंचित हसून) : त्याबद्दल मी तर्क करू शकतो.

तात्याना : कदाचित. पण आता त्याचा काही उपयोग नाही, असंच ना ?

निकोलाय : आता अथवा यापूर्वी – सारखंच. श्रीयुत सीन्त्सोव फार खोल गुंतले आहेत.

तात्याना : मला असं बोलून दाखवताना तुमच्या मनाला आनंदाच्या किंचित गुदगुल्या होत आहेत ना ?

निकोलाय : होय... हे मी लपवत नाही.

तात्याना (उसासा टाकत) : पाहिलंत – आपण किती सारखे आहोत ! मीसुद्धा अगदी क्षुद्र आणि दुष्ट वृत्तीची आहे... मला सांगा – सीन्त्सोव संपूर्णपणं तुमच्या ताव-डीत आहे ? म्हणजे फक्त तुमच्या ?

निकोलाय : अर्थात !

तात्याना : त्यांना सोडून द्या अशी मी तुम्हाला विनंती केली तर ?

निकोलाय : त्यात तुम्हाला यश येणार नाही.

तात्याना : मी खूप खूप गळ घातली तरी?

निकोलाय : तरीही. मला तुमचं आश्चर्य वाटतं!

तात्याना : असं? का?

निकोलाय : तुम्ही एक सुंदर स्त्री आहात आणि निःसंशयपणं बुद्धिमान आहात. तुम्हाला व्यक्तिमत्त्व आहे. आरामशीर, सुंदर आयुष्य प्राप्त करण्याच्या तुम्हाला भरपूर संधी उपलब्ध आहेत. पण कुणातरी नगण्य माणसात स्वतःला गुंतवून घेताहात! लहरी-पणा हा एक रोग आहे. कुणाही बुद्धिमान माणसाला तुमच्या वर्तनाचा संताप येईल. ज्याला स्त्रियांचं मोल वाटतं, सौंदर्याचं कौतुक वाटतं, असा पुरुष त्याबद्दल तुम्हाला क्षमा करणार नाही!

तात्याना (त्याच्याकडे कुतूहलाने पहात) : तर अशा रीतीनं. तुम्ही माझ्याबद्दल मत व्यक्त केलंत? आणि सीन्त्सोवबद्दलही?

निकोलाय : संध्याकाळी हा गृहस्थ तुरुंगात जाईल.

तात्याना : नक्की झालं?

निकोलाय : होय.

तात्याना : एका स्त्रीवर उपकार म्हणून काहीही सवलती मिळणार नाहीत? माझा नाही विश्वास बसत! माझी जर खूप इच्छा असती, तर तुम्ही सीन्त्सोवला नक्की सोडून दिलं असतं!

निकोलाय (मख्खपणे) : प्रयत्न करून बघा... करा प्रयत्न!

तात्याना : शक्य नाही. मला जमत नाही... पण

तरीही मला खरं सांगा – एखादेवेळी खरं बोलणं अवघड नाही. तुम्ही सोडलं असतं?

निकोलाय (काही वेळ थांबून): माहीत नाही.

तात्याना: पण मला माहीत आहे! (मूक उसासा टाकते.) आपण दोघं किती नीच आहोत.

निकोलाय: काही गोष्टी अशा आहेत, ज्यांच्याबद्दल बाईलाही क्षमा नाही!

तात्याना (बेफिकीरपणे): त्यात काय झालं? आपण इथं एकटे आहोत. कुणालाही आपलं बोलणं ऐकू जाणार नाही. मला तुम्हाला सांगण्याचा हक्क आहे की, आपण दोघंही...

निकोलाय: कृपा करा. मला आणखी काही ऐकायची इच्छा नाही.

तात्याना (शांतपणे आणि चिकाटीने): तरीसुद्धा वस्तुस्थिती अशी आहे की, स्त्रीच्या चुंबनापेक्षा तुमच्या तत्त्वांना तुम्ही कमी मोल देता!

निकोलाय: मी तुम्हाला एव्हाना सांगितलं की, तुमचं बोलणं ऐकण्याची माझी इच्छा नाही.

तात्याना (शांतपणे): तर मग निघून जा. मी अडवून धरलंय का तुम्हाला?

तो वेगाने निघून जातो. तात्याना अंगाभोवती शाल गुंडाळून घेते आणि खोलीच्या मध्यभागी उभी राहून व्हरांड्याकडे टक लावते. उजवीकडून नाद्या आणि लेफ्टनंट येतात.

लेफ्टनंट: मी तुम्हाला वचन देतो की, सैनिक स्त्रीचा

कधीही अपमान करत नाही. त्याच्या दृष्टीनं स्त्री पवित्र असते.

नाद्या : ठीक आहे, बघाल.

लेफ्टनंट : अशक्य! फक्त सैन्यात अजून स्त्रीदाक्षिण्य उरलं आहे.

डाव्या दाराकडे जातात. पालीना, झखार आणि याकोव प्रवेश करतात.

झखार : पाहिलंस, याकोव...

पालीना : पण दुसरं शक्य कसं आहे?

झखार : इथं वास्तवता आहे, अपरिहार्यता आहे.

तात्याना : काय झालं?

याकोव : शोकगीत गाऊन दाखवताहेत मला!

पालीना : आश्चर्यकारक क्रूरता! सगळेच आमच्यावर उलटलेत! नेहमी मऊ वागणारे याकोव इवानोविच-सुद्धा! आम्ही थोडंच शिपायांना बोलावलं होतं? पोलीसांना तर कुणीही निमंत्रण केलं नव्हतं. ते नेहमी स्वतःच हजर होतात.

झखार : ह्या अटकांबद्दल मला दोष देतोय!

याकोव : मी दोष देत नाही.

झखार : तू स्पष्ट बोलत नाहीस, पण मला जाणव-तंय!

याकोव (तात्यानाला) : मी बसलो होतो, तर हा माझ्यापाशी आला आणि म्हणतो : "काय झालं बंधू?" मी म्हणालो : "फार तिरस्करणीय, बंधू!" बस्स, एवढंच!

झखार : पण समजून घेतलं पाहिजे की, आपल्याकडं ज्या प्रकारच्या समाजवादाचा प्रचार करतात, तसला कुठंही शक्य नाही! तसं होणंच अशक्य!

पालीना : राजकारणात रस सगळ्यांनी घ्यावा, पण इथं समाजवादाचा काय संबंध? झखार असं म्हणतोय आणि त्याचं बरोबर आहे.

याकोव (विषण्णपणे) : म्हातारा लेवशिन कसला आलाय समाजवादी? फक्त अतिकामापायी आणि अति-थकव्यापायी त्याचं डोकं थोडं फिरलंय!

झखार : त्या सगळ्यांची टाळकी फिरलीत!

पालीना : सद्गृहस्थांनो, लोकांची थोडी कीव करा. आमचे आधीच खूप हाल झालेत!

झखार : माझ्या घराचं कोर्टात रूपांतर केलेलं बघताना मला त्रास होत नाही असं वाटतं? ही सगळी निकोलाय वासिल्येविचची कारवाई, पण एवढ्या नाटकानंतर त्याच्याशी हुज्जत घालणं अशक्य होतं!

क्लेओपात्रा (झपाट्याने प्रवेश करत) : तुम्ही ऐकलंत? खुनी सापडला... आत्ता त्याला इथं आणतील.

याकोव (पुटपुटतो) : अरे बापरे!

तात्याना : कोण आहे हा?

क्लेओपात्रा : कुणीतरी पोरगेला आहे! मला आनंद झाला! कदाचित मानवतावाद्यांच्या दृष्टिकोनातून हे चांगलं नाही, पण तरी मला आनंद झालाय! आणि तो जर पोरगाच असेल, तर खटल्यापर्यंत रोज मी त्याला बेदम झोडपून काढला असता! निकोलाय वासिल्येविच कुठं आहेत? नाही पाहिलंत? (डाव्या

दाराकडे जाते. तेथे जनरलशी तिची भेट होते.)

जनरल (उदासपणे): बघा!.. भिजलेल्या कोंबड्यांप्रमाणं सगळे उभे आहेत!

झखार: सगळं अप्रिय वाटतंय, काका.

जनरल: पोलीस? होय... हा कप्तान महा-हलकट आहे! त्याची गंमत करण्याचा माझा इरादा आहे. रात्री ते इथं मुक्काम करणार आहेत?

पालीना: मला वाटतं, नाही... कशाला?

जनरल: अरेरे! नाही तर... तो झोपला म्हणजे थंडगार पाण्याची बादली त्याच्यावर उपडी केली असती! आमच्या कोअरमधल्या कमकुवत मनाच्या कॅडेटांना आम्ही असं करायचे! नागडा आणि भिजलेला माणूस जेव्हा थयथय नाचत ओरडतो, तेव्हा बघायला भयंकर मजा येते!

क्लेओपात्रा (दारात उभी रहात): काय भयंकर बोलताय तुम्ही जनरल! आणि कशासाठी? कप्तान-साहेब फार सभ्य माणूस आहेत आणि अत्यंत कामसू आहेत. इथं आले आणि सगळ्यांना जाळ्यात पकडलं! ह्याचं मोल जाणलं पाहिजे! (जाते.)

जनरल: हं... हिच्या दृष्टीनं सगळे लांब मिशावाले पुरुष सभ्य ठरतात! प्रत्येकाला आपली जागा ठाऊक असली पाहिजे! ते महत्त्वाचं आहे. त्यातच सभ्यता साठलीय! (डाव्या दाराकडे जात.) ए कोन!

पालीना (हळू आवाजात): जणू इथली मालकीण असल्याप्रमाणं वावरत्येय! बघा तरी, कशा दिमाखात वागत्येय! अगदी असंस्कृत, रानटी!

झखार : सगळं लौकर संपून गेलं तर बरं होईल ! शांत, निवांत ... सुरळीत आयुष्य जगायची फार इच्छा होतेय !

नाद्या (धावत येते) : तान्यामावशी, तो लेफ्टनंट वेडा आहे ! मला वाटतं, तो आपल्या शिपायांना मारहाण करतो. कसा धावपळ करत होता, ओरडत होता आणि हिडीस चेहरे करत होता, हे तू पहायला हवं होतं. काका, अटक झालेल्यांना त्यांच्या बायकांना भेटू दिलं पाहिजे. त्यांच्यात पाच माणसं लग्न झालेली आहेत ! तू जाऊन त्या गुप्त पोलीसाला सांग ... मला वाटतं, तो त्यांचा प्रमुख असावा.

झखार : हे बघ, नाद्या ...

नाद्या : बघत्ये, तू जात नाहीस ! जा ... जा ... सांग त्याला ! तिथं रडारड चाललीय ... जा ना !

झखार (जात) : मला वाटतं ... काही उपयोग होणार नाही.

पालीना : नाद्या, तू नेहमी सगळयांना बेचैन करून टाकत्येस !

नाद्या : उलट तुम्हीच सगळयांना बेचैन करून टाकताय !

पालीना : आम्ही ? तू जरा विचार करून ...

नाद्या (खवळून) : आपण सगळे – मी, तू, काका ... आपण सगळे विस्कटून टाकतोय ! करत काहीच नाही, पण आपल्यापायी सैनिक, पोलीस आले आणि हे सगळं सुरू झालं ! ह्या अटकासुद्धा ... आणि बाया रडताहेत ... सगळं आपल्यामुळं !

तात्याना : इकडं ये, नाद्या.

नाद्या : ही आल्ये ... पुढं ?

तात्याना : बैस आणि शांत हो. तुला काहीही समजत नाही आणि तू काहीही करू शकत नाहीस.

नाद्या : आणि तू साधं बोलू सुद्धा शकत नाहीस! शांत व्हायची माझी मुळीच इच्छा नाही.

पालीना : तुझी आई म्हणायची ते खरं – फार विचित्र मुलगी आहेस तू!

नाद्या : होय, तिचं बरोबर होतं! ती राबायची आणि कष्टाची भाकरी खायची. पण तुम्ही... तुम्ही काय करता? कुणाची भाकरी खाता तुम्ही?

पालीना : झाली तुझी सुरवात! नदेज्दा, कृपा करून ह्या सुरात बोलू नको! वडील माणसांवर तोंड-सुख घेण्याची काय ही तुझी तऱ्हा!

नाद्या : तुम्ही वडीलमाणसं नव्हेत! तुम्ही कसली वडीलमाणसं? फक्त म्हातारी आहात!

पालीना : तान्या, खरंच, हे सगळे तुझे विचार! तू तिला सांगणं भाग आहे की, ती मूर्ख पोरगी आहे.

तात्याना : ऐकलंस? तू मूर्ख पोरगी आहेस! (तिच्या खांद्यांवर हळुवार थोपटते.)

नाद्या : बस्स! आणखी तुम्ही काही सांगू शकत नाही! काहीही नाही! स्वतःचं समर्थन करणंसुद्धा तुम्हाला जमत नाही. फार विचित्र माणसं! खरंच, स्वतःच्या घरातदेखील तुम्ही उपरे आहात! उपरे!!

पालीना (कठोरपणे) : तू काय बरळतेस हे तुला समजतं?

नाद्या : कुठलेतरी पोलीस, शिपाई, मिशावाले मूर्ख तुमच्याकडं आले ... हुकूम ठोकताहेत, तलवारी परजताहेत, आऱ्या खणखणताहेत, चहा ढोसताहेत, ख्यॅ ख्यॅ हसताहेत ... माणसांची धरपकड करताहेत, त्यांच्यावर खेकसताहेत, धमकावत आहेत, बायकांची रडारड चाललीय ... आणि तुम्ही? काय उपयोग आहे तुमचा इथं? तुम्हाला एका कोपऱ्यात लोटून दिलंय ...

पालीना : तू मूर्खाप्रमाणं बरळते आहेस. ही माणसं आपलं संरक्षण करायला आलीत.

नाद्या (कडवटपणे) : मावशी! शिपाई कुणाचंही मूर्खपणापासून संरक्षण करू शकत नाहीत! खरंच!

पालीना (गोंधळून) : का ... य?

नाद्या (तिच्यापुढे हात पसरून) : तू रागावू नकोस! मी हे सर्वांना उद्देशून बोलत्येय!

पालीना वेगाने निघून जाते.

पहा, पळाली! काकांना सांगील की, मी उर्मट आहे, बेफाम आहे ... मग काका एक लांबलचक व्याख्यान ठोकतील ... आणि कंटाळ्यापायी सगळ्या माशा मरून जातील!

तात्याना (विचारमग्न होत) : कशी जगणार तू पुढं? मला समजत नाही!

नाद्या (सभोवती हात फिरवत) : असं मुळीच नाही! अजिबात नाही! मी काय करणार ते मला ठाऊक नाही ... पण तुम्ही जे काही करता ते मुळीच करणार नाही! आत्ता व्हरांड्याजवळून त्या अंमलदाराबरोबर

येत होत्ये ... ग्रेकोव बघत होता, सिगारेट ओढत होता ... त्याचे डोळे मात्र हसत होते. खरं तर त्याला माहीत आहे की, तो तुरुंगात जाणार! पण पाहिलंस? जे स्वतःच्या मनाप्रमाणं जगतात त्यांना कशाचीही भीती वाटत नाही. ते मजेत राहतात! लेवशिनकडं, ग्रेकोवकडं नजर टाकायला मला शरम वाटत्ये! दुसरी माणसं माझ्या माहितीची नाहीत ... पण ही दोघं! त्यांना मी कधीही विसरणार नाही. तो बघ येतोय मिशीवाला मूर्ख! गुर्रर्र!

बाबोयेदोव (प्रवेश करत) : काय भयंकर! कुणाला तुम्ही घाबरवता आहात?

नाद्या : मी तुम्हाला घाबरते. बायकांना तुम्ही त्यांच्या नवऱ्यांपाशी जाऊ द्याल ना?

बाबोयेदोव : नाही, मुळीच सोडणार नाही मी दुष्ट आहे!

नाद्या : अर्थातच! जर तुम्ही पोलीस आहात! का नाही सोडत तुम्ही बायकांना?

बाबोयेदोव (नम्रपणे) : आत्ता शक्य नाही! नंतर, जेव्हा त्यांना घेऊन जातील, तेव्हा निरोप घ्यायला मी परवानगी देईन.

नाद्या : का अशक्य आहे? खरं तर सगळं तुमच्यावर अवलंबून आहे ना?

बाबोयेदोव : माझ्यावर ... तर आहे, म्हणजे कायद्यावर!

नाद्या : कुठला आलाय कायदा? सोडा ना ... मी तुम्हाला विनंती करत्ये.

बाबोयेदोव : कुठला कायदा म्हणजे काय? तुम्ही-सुद्धा कायदा मानत नाही? अरे, अरे, अरे!

नाद्या : माझ्याशी असं बोलू नका! मी कुक्कुलं बाळ नाही.

बाबोयेदोव : विश्वास नाही बसत! कायदा मानत नाहीत फक्त लहान मुलं आणि क्रांतिकारक!

नाद्या : तर मी क्रांतिकारक आहे.

बाबोयेदोव (हसून) : ओहो! तर मग तुम्हाला तुरुंगात पाठवलं पाहिजे. अटक करायची आणि तुरुं-गात धाडायचं.

नाद्या (कष्टाने) : नका उगाच थट्टा करू! सोडा त्यांना!

बाबोयेदोव : शक्य नाही... कायदा!

नाद्या : कायदा गाढव आहे!

बाबोयेदोव (गंभीरपणे) : हं... निष्कारण असं बोलता! तुम्ही म्हणता त्याप्रमाणं तुम्ही कुक्कुलं बाळ नसाल, तर तुम्हाला जाणवलं पाहिजे की, सत्तेवर असणाऱ्यांनी कायदे बनवलेले असतात आणि कायद्यां-शिवाय सरकार असत नाही.

नाद्या (संतापून) : कायदा, सत्ता, सरकार... छी:, देवा रे! पण ह्या सगळ्या गोष्टी लोकांसाठीच ना?

बाबोयेदोव : हं... असं मला वाटतं! पण सर्वांत प्रथम – सुव्यवस्था राखण्यासाठी!

नाद्या : जर माणसं रडतात, तर त्या सुव्यवस्थेत कुठंतरी चूक आहे. आणि माणसांना रडवणारी तुमची

मत्ता आणि तुमचं सरकार ह्यांची मुळीच गरज नाही! सरकार म्हणे – कसला मूर्खपणा! काय गरज त्याची मला? (दारापाशी जात.) सरकार! काहीही समजत नाहीत आणि उगीच बडबड करतात! (जाते.)

बाबोयेदोव काहीसा गडबडतो.

बाबोयेदोव (तात्यानाला): वेगळी आहे तरुणी! पण विचार धोक्याच्या दिशेनं झुकताहेत. तिचे काका मला वाटतं उदारमतवादी आहेत ना?

तात्याना: माझ्यापेक्षा तुम्हालाच जास्त चांगलं माहीत. उदारमतवादी माणूस म्हणजे काय, ते मला माहीत नाही.

बाबोयेदोव: असं कसं? सगळ्यांना हे माहीत आहे! सत्ताधाऱ्यांबद्दल अनादर – म्हणजेच उदारमतवाद! बरं ते जाऊं दे. मादाम लूगोवाया, मी तुम्हाला वारोनेझमध्ये पाहिलंय. खरंच! तुमच्या सूक्ष्म, आश्चर्यकारक तरल अभिनयाला पाहिलंय! कदाचित त्यावेळी तुमच्या ध्यानात आलं असेल की, व्हाईस-गव्हर्नरच्या शेजारच्या कोचावर मी नेहमी बसलेला असायचा! तेव्हा मी तिथल्या सरकारी कचेरीचा ॲडज्युटंट होतो.

तात्याना: नाही आठवत... असेल कदाचित. प्रत्येक शहरात पोलीस आहेत. खरं ना?

बाबोयेदोव: अर्थातच. प्रत्येक शहरात आहेतच! मी तुम्हाला सांगितलं पाहिजे की, आम्हा सरकारी अंमलदारांमध्येच तुम्हाला अस्सल कलाप्रेमी आढळतील. शिवाय काही व्यापारी. उदाहरणार्थ, आवडत्या नटीच्या

मदतीच्या खेळाला भेटवस्तू खरेदी करणाऱ्यांची यादी पहा – पोलीस अंमलदारांची नांवं त्या यादीत तुम्हाला हमखास सापडतील. ही एक परंपरा बनलीय. पुढच्या मोसमात कुठं काम करणार आहात?

तात्याना : अजून ठरवलं नाही. अर्थातच जिथं कला-प्रेमी आहेत अशा शहरात! हे अपरिहार्य आहे ना?

बाबोयेदोव (न समजून) : अर्थातच! प्रत्येक शहरात तुम्हाला ते आढळतील. सरतेशेवटी माणसं सुसंस्कृत बनत चाललीत.

क्वाच (व्हरांड्यातून) : साहेब! ज्यानं गोळी झाडली होती त्याला आणताहेत! कुठं आणू?

बाबोयेदोव : इथं! सगळयांना आण! वकील-साहेबांना बोलाव. (तात्यानाला.) माफ करा! थोडं कामात गुंतणं भाग आहे.

तात्याना : तुम्ही त्यांची उलटतपासणी घेणार?

बाबोयेदोव (सभ्यपणे) : थोडीशी ... वर वरची ... माणसांची ओळख होण्यापुरती. छोटीशी हजेरी म्हणा-यची!

तात्याना : मी ऐकलं तर चालेल?

बाबोयेदोव : अं ... तशी आम्ही परवानगी देत नाही ... राजकीय बाबतीत. पण हा खून-खटला आहे आणि आम्ही स्वतःच्या आवारात नाही. तुम्हाला हा आनंद लाभू द्यावा अशी माझी इच्छा आहे.

तात्याना : मी कुणाच्या नजरेला पडणार नाही. इथून बघीन.

बाबोयेदोव : छान! तुमच्या अभिनयामुळं जो आनंद

उपभोगला, त्याची अंशत: परतफेड करायची संधी मिळाली म्हणून मला फार फार समाधान वाटतंय. मला काही कागदपत्र घ्यायला गेलं पाहिजे. (जातो.)

व्हरांड्यामधून दोन वृद्ध कामगार न्याबत्सोवला आणतात. त्यांच्या शेजारून कोन येतो. तो कैद्याच्या चेहऱ्याकडे चोरटे कटाक्ष टाकत आहे. त्यांच्या पाठी लेवशिन, यागोदिन, ग्रेकोव आणि आणखी काही कामगार. पोलीस.

न्याबत्सोव (चिडून) : हात कशाला बांधलेत? सोडा... सोडा म्हणतो ना!

लेवशिन : बंधूंनो, त्याचे हात सोडा! कशाला माणसाला दुखवायचं?

यागोदिन : पळून नाही जायचा!

एक कामगार : रीत म्हणून पाहिजे! कायद्याप्रमाणं त्याचे हात बांधणं आम्हाला भाग आहे.

न्याबत्सोव : मला हे नको! सोडा हात!

दुसरा कामगार (क्वाचला) : पोलीससाहेब! चालेल? पोरगा तसा शांत आहे. आम्हाला आश्चर्य वाटतंय... कसा काय ह्यानं खून केला?

क्वाच : चालेल. सोडा... काही हरकत नाही!

कोन (अचानक) : तुम्ही त्याला उगीच धरलंत! जेव्हा तिकडं खून झाला, तेव्हा हा नदीवर होता... मी त्याला पाहिलंय आणि जनरलनीसुद्धा पाहिलंय! (न्याबत्सोवला.) तू गप्प काय बसतोस मूर्खा? तू बोल – मी नाही गोळी झाडली... चूप काय बसतोस?

न्याबत्सोव (ठामपणे) : नाही, मीच तो !

लेवशिन : त्यालाच सर्वांत जास्त चांगलं माहीत, शिपाईदादा.

न्याबत्सोव : मीच !

कोन (ओरडतो) : खोटं बोलतोस तू ! खोटारड्या...

बाबोयेदोव आणि निकोलाय स्क्रोबोतोव येतात.

त्या घटकेला तू नदीत होडीमधून फिरत होतास आणि गाणी गात होतास... होय की नाही ?

न्याबत्सोव (शांतपणे) : ते नंतर !

बाबोयेदोव : हा ?

क्वाच : होय साहेब !

कोन : नाही, हा नाही !

बाबोयेदोव : काय ? क्वाच, म्हाताऱ्याला बाहेर ने ! कुठून आला हा म्हातारा ?

क्वाच : जनरलसाहेबांचा मदतनीस आहे, साहेब !

निकोलाय (न्याबत्सोवला न्याहाळून पहात) : जरा थांबा बग्दान देनिसोविच ... त्याला त्रास देऊ नका क्वाच !

कोन : हात लावू नकोस ! मी स्वतः सैनिक आहे !

बाबोयेदोव : थांब क्वाच !

निकोलाय (न्याबत्सोवला) : तू मालकाचा खून केलास ?

न्याबत्सोव : मी.

निकोलाय : कशाबद्दल ?

न्याबत्सोव : त्यानं आमचा फार छळ केला.

निकोलाय : तुझं नांव काय ?

च्याबत्सोव : पावेल च्याबत्सोव.

निकोलाय : ठीक ! कोन – तुम्ही काय म्हणता ?

कोन (अस्वस्थपणे) : त्यानं नाही खून केला ! त्या घटकेला तो नदीवर होता। शपथ घ्यायला तयार आहे मी ! मी आणि जनरलसाहेबांनी त्याला बघितलंय. शिवाय जनरलसाहेब म्हणालेसुद्धा : "त्याची होडी उलटवून त्याला डुबकी द्यायला किती मजा येईल !" काय रे पोरा ! तू हे काय करतोस, आं ?

निकोलाय : खुनाच्या नेमक्या वेळी तो नदीवर होता असं तुम्ही एवढ्या खात्रीपूर्वक कसं सांगू शकता, कोन ?

कोन : जिथं तो होता, तिथून कारखान्यापर्यंत चालत जायला एक तास तरी लागतो.

च्याबत्सोव : मी पळत गेलो.

कोन : होडीत बसला होता आणि गाणी गात होता. नुकताच खून करणारा माणूस गाणं म्हणू शकत नाही !

निकोलाय (च्याबत्सोवला) : खोटा पुरावा सादर करणाऱ्याला आणि गुन्हेगाराला लपवू पाहणाऱ्याला कायदा फार कडक शिक्षा देतो, हे तुला माहीत आहे ? काय ?

च्याबत्सोव : मला सगळं सारखंच.

निकोलाय : ठीक. तर, तू डायरेक्टरसाहेबांचा खून केलास ?

च्याबत्सोव : मी.

बाबोयेदोव : पशू !

कोन : खोटं बोलतोय !

39–178

लेवशिन : ए शिपाया, तू बाहेरचा आहेस !

निकोलाय : काय म्हणालात ?

लेवशिन : मी म्हणालो – शिपाई परका आहे आणि कामात अडथळा आणतोय.

निकोलाय : तू नाहीस बाहेरचा ? कदाचित खुनाच्या कटात तुझा भाग होता ?

लेवशिन (हसतो) : मी ? साहेब, मी फक्त एकदाच काठीनं ससा मारला, तर किती दिवस हळहळत बसलो.

निकोलाय : तर चूप बैस ! (न्याबत्सोवला.) तू झाडलेलं रिवॉल्वर कुठं आहे ?

न्याबत्सोव : माहीत नाही.

निकोलाय : कुठल्या बनावटीचं होतं ? वर्णन कर !

न्याबत्सोव (अस्वस्थपणे) : कुठल्या बनावटीचं ?.. नेहमीचंच !

कोन (आनंदाने) : अरे कुत्तरडचा ! त्यानं रिवॉल्वर आयुष्यात कधी बघितलेलं नाही !

निकोलाय : केवढं मोठं होतं ? (हातांनी अर्धा वार दाखवत.) एवढं लांब ? होय ?

न्याबत्सोव : होय ... थोडं लहान.

निकोलाय : बग्दान देनिसोविच, जरा इकडं या. (त्याच्याशी दबत्या आवाजात बोलतो.) काही-तरी लपवण्याचा ह्यात प्रयत्न आहे. ह्या पोराशी आपण जास्त कडक वागलं पाहिजे. कॉरोनेर येईपर्यंत आपण त्याला बाजूला ठेवू.

बाबोयेदोव : पण तो स्वत: कबूल करतोय. मग काय ?

निकोलाय (ऐटीत) : आपणा दोघांना संशय आहे की, हा पोरगा खुनी नाही, तर खऱ्या गुन्हेगाराला लपवण्यासाठी ह्याचा ढालीसारखा वापर केला जात आहे. समजलं ?

दाराशी तात्यानाजवळ झिंगलेला याकोव हळूच येतो व मुकाटपणे पहात राहतो. अधूनमधून त्याचे डोके त्याच्या छातीवर झुकते, जणू डुलकी लागल्याप्रमाणे आणि त्या झटक्यासरशी भानावर येऊन तो भेदरल्या नजरेने परत सभोवार पाहू लागतो.

बाबोयेदोव (न समजता) : आस्सं ... बरं ... बरं... बरं ! कमाल आहे ना ?

निकोलाय : हा कट आहे ! सामूहिक गुन्हा.

बाबोयेदोव : हरामखोर !

निकोलाय : आत्तापुरतं नाईक त्याला इथून घेऊन जाऊं दे. अंधारकोठडीत एकट्याला टाका त्याला ! मी एक मिनिट बाहेर जातो... कोन, तुम्ही माझ्या-बरोबर चला ! जनरल कुठं आहेत ?

कोन : गांडूळं खणून काढताहेत.

जातात.

बाबोयेदोव : क्वाच ! ह्याला घेऊन जा. आणि त्या-च्यावर लक्ष ठेवा ! कडक नजर !

क्वाच : होय साहेब ! चल रे पोरा !

लेवशिन (प्रेमळपणे) : अच्छा, पाशा ! अच्छा !

यागोदिन (खेदाने) : अच्छा पावेल !

न्याबत्सोव : चलतो ! काळजी करू नका !

न्याबत्सोवला घेऊन जातात.

बाबोयेदोव (लेवशिनला) : ए म्हाताऱ्या, तू त्याला ओळखतोस ?

लेवशिन : अर्थातच ! बरोबर काम करतो.

बाबोयेदोव : तुझं नांव काय ?

लेवशिन : येफीम येफीमोव लेवशिन.

बाबोयेदोव (हळूच तात्यानाला) : आता पुढं काय होतं ते बघा ! हे बघ लेवशिन, मला खरं सांग — तू म्हातारा, शहाणा माणूस. वरिष्ठांना तू नेहमी खरं तेच सांगितलं पाहिजेस.

लेवशिन : खोटं कशाला बोलायचं ?

बाबोयेदोव (दुष्ट समाधानाने) : होय. तर प्रामाणिकपणं मला सांग — तुझ्या घरात तसबिरींमागं काय लपवलंय ? अं ? खरं बोल !

लेवशिन (शांतपणे) : तिथं काहीही नाही.

बाबोयेदोव : हे खरं ?

लेवशिन : होय.

बाबोयेदोव : अरे लेवशिन, तुला शरम वाटली पाहिजे ! तुझे केस पांढरे झालेत. टक्कल पडतंय, पण लहान पोराप्रमाणं खोटं बोलतोस ! खरं तर तू काय करतोस एवढंच नव्हे, तर तुझ्या मनात काय काय चालतं, ह्याची पूर्ण माहिती वरिष्ठांना आहे. वाईट, लेवशिन ! माझ्या हातांमध्ये हे काय आहे ?

लेवशिन : दिसत नाही... माझे डोळे अधू आहेत.

बाबोयेदोव: मी सांगतो. सरकारनं बंदी घातलेली पुस्तकं. झारविरुद्ध लोकांना बंडाची चिथावणी देणारी ही पुस्तकं तुझ्या घरात तसबिरींमागं लपवलेली सापडली ... मग? काय म्हणणं आहे?

लेवशिन (शांतपणे): काही नाही.

बाबोयेदोव: ही तुझ्या मालकीची आहेत असं कबूल करतोस?

लेवशिन: कदाचित ती माझी असतील. सगळी पुस्तकं बाहेरून सारखीच दिसतात.

बाबोयेदोव: म्हातारपणी कशाला रे बाबा खोटं बोलतोस?

लेवशिन: साहेब, मी तुम्हाला प्रामाणिक सत्य सांगितलं. तुम्ही विचारलंत – माझ्या घरात तसबिरीं-मागं काय आहे आणि ज्याअर्थी असा प्रश्न विचारलात त्याअर्थी तसबिरींमागं काहीही नाही, कारण तुम्ही ते आधीच काढून घेतलंत. म्हणून मी म्हणालो – काहीही नाही. मला शरमिंदा करण्याचा तुम्ही का प्रयत्न करता? शरम वाटण्यासारखं मी काहीही केलेलं नाही.

बाबोयेदोव (गोंधळून): असं का? जरा कमी बोलत जा. माझ्याशी छक्के-पंजे खेळू नको! कुणी दिली तुला ही पुस्तकं?

लेवशिन: तुम्हाला माहीत करून काय करायचंय? हे मी सांगणार नाही. खरं तर ती पुस्तकं कुठून आली ते मी विसरलोय. उगाच क्षुल्लक गोष्टींचा स्वतःला त्रास करून घेऊ नका.

बाबोयेदोव : अस्सं काय ? ठीक ! अलेक्सेइ ग्रेकोव ! कोण तुमच्यातला ग्रेकोव ?

ग्रेकोव : मी .

बाबोयेदोव : कारागिरांमध्ये क्रांतिकारक प्रचार केल्या-बद्दल स्मालेन्स्कमध्ये तुम्हाला अटक झाली होती ?

ग्रेकोव : होय .

बाबोयेदोव : एवढ्या लहान वयात एवढी कामगिरी ? आपली ओळख झाल्याबद्दल आनंद वाटला ! पोलीस, ह्यांना व्हरांड्यात घेऊन जा ... इथं फार घुसमटायला लागलंय . याकोव वीरीपायेव ? छान . आंद्रेइ स्वीस्तोव ?

पोलीस त्या सर्वांना व्हरांड्यात बाहेर नेतात आणि हाती यादी घेतलेला बाबोयेदोव त्यांच्यामागून जातो .

याकोव (हळूच) : ही माणसं मला आवडतात !

तात्याना : होय . पण एवढी साधी का ती ? सरळ बोलतात, सरळ पाहतात – का ? त्यांच्यात आवेग नाहीत ? शौर्य नाही ?

याकोव : त्यांच्या सत्यावर त्यांची शांत श्रद्धा आहे .

तात्याना : त्यांच्यात आवेग असले पाहिजेत ! आणि वीरही ! पण तुला जाणवतं – त्यांना सगळ्यांचा तिट-कारा वाटतो !

याकोव : येफीमिच छान आहे ! त्याच्या कष्टी-प्रेमळ डोळ्यात किती समजूत भरलीय ! जणू तो म्हणतो : "कशाला हे सगळं ? वाटेतून बाजूला व्हा आणि आम्हाला स्वातंत्र्य द्या ! .. निघून जा !"

झखार (दारातून डोकावत) : कायद्याच्या प्रति-

निधींचा मूर्खपणा पाहून आश्चर्य वाटतं! खटला उभा केलाय! निकोलाय वासिल्येविच एखाद्या जगज्जेत्याच्या दिमाखात वावरताहेत!

याकोव: हा सगळा व्यवहार तुझ्या डोळ्यांदेखत चाललाय, एवढाच तुझा आक्षेप आहे ना झखार?

झखार: अर्थातच! ह्या आनंदापासून मला वंचित ठेवू शकलं असतं! नाद्या ठार वेडी बनलीय. माझ्याशी आणि पालीनाशी उर्मट बोलली, क्लेओपात्राला कुत्री म्हणाली आणि आता माझ्या खोलीत दिवाणावर पडून रडत्येय! देव जाणे काय चाललंय!

याकोव (विचारमग्न होत): दर मिनिटागणिक मला जास्त जास्त किळस यायला लागलीय, झखार!

झखार: मी समजू शकतो... पण काय करणार? जर कुणी हल्ला केला, तर संरक्षण करावंच लागतं. मला घरात एक कोपरा नीट आढळत नाही. सगळं उलटपालट झालंय! आज ह्या पावसानं वातावरण दमट आणि गार झालंय! शरदाचा मोसम लौकर सुरू होतोय!

निकोलाय आणि क्लेओपात्रा येतात. दोघेही प्रक्षुब्ध.

निकोलाय: आता माझी खात्री पटलीय – त्यांनी त्याला लाच चारलीय!

क्लेओपात्रा: त्यांच्या स्वतःच्या डोक्यामधून ही कल्पना निघालेली नाही. कुणीतरी हुशार डोक्याचा माणूस त्यांच्यात आहे.

निकोलाय: सीन्त्सोव असेल काय?

क्लेओपात्रा : दुसरं कोण? हे आले श्रीयुत बाबोये-दोव.

बाबोयेदोव (व्हरांड्यातून) : काय सेवा करू शकतो?

निकोलाय : माझी पूर्ण खात्री पटलीय की, त्या पोराला लाच देऊन पढवलंय... (हळू बोलतो.)

बाबोयेदोव (हळू आवाजात) : अस्सं? हं...

क्लेओपात्रा (बाबोयेदोवला) : तुम्हाला समजतं?

बाबोयेदोव : हं... खरंच... काय डांबीस आहेत!

जोरदार संभाषणात गर्क झालेले निकोलाय आणि बाबोयेदोव दुहेरी दारांमधून अदृश्य होतात. क्लेओपात्रा सभोवती नजर टाकते तेव्हा तात्याना तिला दिसते.

क्लेओपात्रा : अं... तुम्ही इथं?

तात्याना : आणखी काही घडलं?

क्लेओपात्रा : मला वाटतं, तुम्हाला त्यात काही रस नाही. सीन्त्सोवबद्दल तुम्ही ऐकलंत?

तात्याना : माहीत आहे.

क्लेओपात्रा (आव्हानपूर्वक) : होय, अटक झाली! अखेरीस कारखान्यातलं सगळं तण उपटून काढलं ह्याचा मला आनंद झालाय! तुम्हाला?..

तात्याना : मला वाटतं, मला जे काही जाणवतंय त्यात तुम्हाला रस नाही.

क्लेओपात्रा (दुष्ट समाधानाने) : ह्या सीन्त्सोवबद्दल तुम्हाला सहानुभूती वाटत होती! (तात्यानाकडे पाहताना तिचा चेहरा मृदु बनतो.) असं विचित्र का पाहताय? तुमचा चेहरा ओढलाय. का बरं?

तात्याना : हवेमुळं असावं.

क्लेओपात्रा (तिच्याजवळ जात) : ऐका, कदाचित माझा मूर्खपणा असेल, पण मी सरळ वागणारी आहे! मी खूप अनुभवलंय! खूप सोसलंय आणि कडवट बनल्येय! फक्त एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीची मित्र होऊ शकते हे मला माहीत आहे.

तात्याना : तुम्हाला काय विचारायचं आहे?

क्लेओपात्रा : सांगायचंय, विचारायचं नाही! तुम्ही मला आवडता. तुम्ही मोकळं वागता, छान कपडे घालता आणि पुरुषांबरोबर सहजपणं वावरता. मला तुमचा हेवा वाटतो. किती छान चालता, किती छान बोलता! पण काही वेळा मला तुम्ही आवडत नाही. अगदी नजरेसमोर सहन होत नाही!

तात्याना : अरे वा! का बरं असं?

क्लेओपात्रा (विचित्रपणे) : तुम्ही कोण आहात?

तात्याना : कोण?

क्लेओपात्रा : तुम्ही कोण आहात हे मला समजत नाही. सर्व माणसांना स्पष्टपणं पाहण्याची माझी इच्छा आहे. माणसाला काय हवं ते जाणून घ्यायला आवडतं! ज्या माणसांना स्वतःला काय हवं ते ठाम माहीत नसतं, अशी माणसं माझ्या दृष्टीनं धोकेबाज! त्यांच्यावर विश्वास ठेवू नये!

तात्याना : फार चमत्कारिक बोलता आहात! तुमचे विचार जाणून घेण्याची मला गरज काय?

क्लेओपात्रा (आवेगाने आणि भेदरून) : माणसं एकमेकांच्या निकट स्नेहानं राहणं आवश्यक आहे,

आपण एकमेकांवर विश्वासून राहणं जरूरीचं आहे! तुम्ही बघताय – आपले खून पाडायला सुरवात झालीय, आपल्याला लुटू पाहताहेत! ह्या अटक झालेल्यांचे चेहरे कसे दरोडेखोरांसारखे दिसत होते ते पाहिलंत? त्यांना काय हवं ते त्यांना पक्कं माहीत आहे. ते मैत्रीच्या नात्यानं राहतात, एकमेकांवर विश्वासून राहतात. मला त्यांचा भारी तिटकारा वाटतो! मला त्यांची भीती वाटत्ये! आपण सगळे वैरात राहतो, कुणावरही विश्वासत नाही, कुणाशी संबंध राखत नाही, प्रत्येकजण स्वत:मध्ये गुंतलेला... आपण पोलीसांवर, शिपायांवर अवलंबून राहतो आणि ते? ते स्वत:वर अवलंबून राहतात... आपल्यापेक्षा त्यांचं बळ जास्त आहे!

तात्याना: मलासुद्धा तुम्हाला सरळ विचारावंसं वाटतं... तुम्ही नवऱ्याबरोबर सुखी होतात?

क्लेओपात्रा: कशाला हवं तुम्हाला हे?

तात्याना: सहज. कुतूहल म्हणून!

क्लेओपात्रा (विचार करून): नाही. तो सदा दुसऱ्या कामात गुंतलेला असायचा.

पालीना (प्रवेश करत): ऐकलंत? सीन्त्सोव समाजवादी आहेत असं आढळलं! झखार त्यांच्याशी नेहमी मनमोकळं बोलायचा आणि त्यांना दिवाणजींचा मदतनीस बनवणार होता! अर्थात हे फारसं महत्त्वाचं नाही, पण आयुष्य किती अवघड बनतंय बघा! तुमच्या अगदी शेजारी तुमचे कट्टर शत्रू आणि तुम्हाला त्यांचा पत्ता नाही!

तात्याना: मी श्रीमंत नाही हे किती छान!

पालीना : म्हातारपणी तू हे बोलून दाखव ! (क्लेओपात्राशी मृदु आवाजात .) क्लेओपात्रा पेत्रोवना, पोषाख परत एकदा घालून पहा अशी तुम्हाला विनंती करताहेत ... आणि क्रेप धाडलीय .

क्लेओपात्रा : ठीक आहे, येत्ये . कसंतरीच होतंय . काळजाचे ठोके नीट पडत नाहीत ... आजारी पडायला मला आवडत नाही !

पालीना : तुम्हाला हवं तर छातीतली धडधड थांबायला मी औषध देत्ये . खूप बरं वाटेल !

क्लेओपात्रा (जात) : उपकार होतील तुमचे !

पालीना : मी आत्ता येत्येच ! (तात्यानाला .) तिच्याशी मऊ वागणं आवश्यक आहे . त्यामुळं ती शांत होत्ये . तू तिच्याशी बोललीस हे छान झालं . तान्या, खरंच एकूण तुझा मला हेवा वाटतो . आरामशीर, मधलं स्थान पटकावण्याची खुबी तुला नेहमी अवगत आहे . जात्ये बाई ... तिला औषध देत्ये .

एकटी राहिलेली तात्याना व्हरांड्याकडे पाहते . अटक झालेली माणसे पहारेकऱ्यांच्या देखरेखीखाली तेथे उभी आहेत . याकोव दारातून डोकावतो .

याकोव (चिडवण्याच्या सुरात) : मी दारामागं उभा होतो आणि सगळं ऐकलं !

तात्याना (विमनस्कपणे) : असं चांगलं नाही म्हणतात ... चोरून ऐकणं !

याकोव : एकूणच माणसं काय बोलतात ते ऐकणं चांगलं नाही . फार वाईट वाटतं त्यांच्याबद्दल ! तान्या, मी जातोय !

तात्याना : कुठं ?

याकोव : अजून मला माहीत नाही. अच्छा !

तात्याना (प्रेमळपणे) : अच्छा ! पत्र लिही !

याकोव : इथं फार वीट आलाय !

तात्याना : केव्हा जाणार आहेस ?

याकोव (विचित्र स्मित करत) : आज... तूसुद्धा जाणार का ?

तात्याना : होय, मी जाणार आहे. तू हसतोस का गालातल्या गालात ?

याकोव : असंच ! कदाचित आपण एकमेकांना परत कधीही भेटणार नाही.

तात्याना : वेड्यासारखं बोलू नको.

याकोव : माफ, कर !

तात्याना त्याच्या कपाळाचे चुंबन घेते. तिला दूर लोटताना तो हलकेच हसतो.

...मेलेल्या माणसाचं चुंबन घेतात, नेमकं तसंच तू माझं चुंबन घेतलंस. (तो सावकाशपणे बाहेर जातो.)

तात्याना त्याला पहात राहते. त्याच्यापाठी धावण्याची तिला ऊर्मी येते, पण ती स्वतःला आवरते आणि दुबळेपणाने हात झटकते. नाद्या आत येते. तिच्या हातात छत्री.

नाद्या : कृपा करून माझ्याबरोबर बागेत चल. माझं डोकं दुखतंय. आत्ता मी अगदी वेड्यासारखी खूप खूप रडल्ये ! जर मी एकटी गेल्ये, तर परत रडायला लागेन !

तात्याना : कशाला रडत होतीस पोरी? रडण्या-सारखं काहीही नाही!

नाद्या : मला चीड आलीय. मला काहीही समजत नाही. कुणाचं बरोबर? काका म्हणतात त्यांचं बरोबर... पण मला तसं जाणवत नाही. काका दयाळू आहेत? तो दयाळू आहे अशी माझी खात्री होती. पण आता मात्र मला नक्की सांगता येत नाही! जेव्हा माझ्या-बरोबर ते बोलतात तेव्हा मी स्वतः दुष्ट आणि मूर्ख आहे असं मला वाटू लागतं... पण जेव्हा मी त्यांच्या-बद्दल विचार करायला लागत्ये आणि स्वतःला सर्व गोष्टींविषयी प्रश्न विचारू लागत्ये, तेव्हा काहीही समजत नाही!

तात्याना (खेदाने) : जर तू स्वतःला प्रश्न विचारत राहशील, तर लौकरच क्रांतिकारक होशील! आणि लाडक्या पोरी, ह्या गोंधळात तुझा बळी पडेल!

नाद्या : मला कुणीतरी बनलं पाहिजे!

तात्याना हळूच हसते.

कशाला तू हसत्येस? काही न समजता नुसतं आ वासून जगणं शक्य नाही!

तात्याना : म्हणून तर मी हसल्ये. कारण आज सगळेच असं बोलताहेत... अचानकपणं सगळे!

जातात. दारात त्यांची जनरलशी आणि लेफ्टनंटशी भेट होते. लेफ्टनंट पटकन त्यांच्या वाटेतून बाजूला होतो.

जनरल : सैनिकभरती आवश्यक आहे लेफ्टनंट! त्यामुळं दुहेरी हेतू साध्य होतो ... (नाद्या आणि तात्यानाला.) तुम्ही कुठं चाललात?

तात्याना : फिरायला.

जनरल : जर त्या कारकुनाला भेटलात ... काय त्याचं नांव? लेफ्टनंट, थोड्या वेळापूर्वी ज्या माणसाशी मी तुमची ओळख करून दिली, त्याचं काय नांव?

लेफ्टनंट : पकाती, जनरलसाहेब!

जनरल (तात्यानाला) : त्याला माझ्याकडं पाठवा. मी डायनिंग रूममध्ये चहा पिणार आहे, कन्याकबरोबर आणि लेफ्टनंटबरोबर ... ह्यॅ, ह्यॅ, ह्यॅ! (पटकन तोंडावर हात ठेवतो आणि अपराधीपणे सभोवार पाहतो.) धन्यवाद, लेफ्टनंट! तुमची स्मरणशक्ती उत्तम आहे! हे फार सुरेख! ऑफिसरला आपल्या तुकडीतल्या प्रत्येक सैनिकाचं नांव आणि त्याचा चेहरा आठवला पाहिजे! सैनिक नुकताच भरती होतो तेव्हा तो महाधूर्त असतो. धूर्त असतो, मूर्ख असतो, आळशी असतो. ऑफिसर त्याच्या अंतरंगात शिरतो आणि त्या प्राण्याची परत जुळवाजुळव करून त्याला माणूस बनवतो – शहाणा आणि कर्तव्यदक्ष!

झखार चिंतामग्न मुद्रेने येतो.

झखार : काका, तुम्ही याकोवला पाहिलंत?

जनरल : नाही. तिथं चहा आहे?

झखार : आहे, आहे.

जनरल आणि लेफ्टनंट जातात. व्हरांड्यामधून कोन येतो. तो रागावलेला आणि विस्कटलेला आहे.

कोन, तुम्हाला माझा भाऊ दिसला?

कोन (खिन्नपणे): नाही. आता मी काहीही बोलणार नाही. माणूस बघितला तरी सांगणार नाही. गप्प राहणार! खूप झालं बोलून!

पालीना (प्रवेश करत): तिथं शेतकरी आले आहेत. खंड उशिरा भरायची परवानगी मागताहेत.

झखार: काय पण वेळ काढलीय!..

पालीना: तक्रार करताहेत की, पीक वाईट आलंय आणि त्यामुळं खंड भरायला त्यांच्याजवळ काही नाही.

झखार: ते नेहमीच तक्रारी करतात!.. तुला याकोव दिसला होता का?

पालीना: नाही. काय सांगायचं त्यांना?

झखार: शेतकऱ्यांना? जाऊं दे त्यांना कचेरीत. माझी त्यांच्याशी बोलण्याची इच्छा नाही!

पालीना: पण कचेरीत कुणीच नाही! तुला माहीत आहे – आपल्याकडं सगळं अराजक माजलंय! लौकरच जेवणाची वेळ होईल आणि हा नाईक सारखा चहा मागतोय... जेवणघरातून सकाळपासून समोवार बाहेर नेलेला नाही... वेड्यांच्या इस्पितळात राहिल्यासारखं वाटतंय!

झखार: याकोव अचानक कुठंतरी जायला निघालाय हे तुला माहीत आहे?

पालीना: तू मला माफ कर. पण खरं सांगायचं तर तो जातोय हे चांगलंच!

झखार : अर्थात, बरोबर आहे तुझं! फार त्रासदायक बनलाय... काहीतरी फालतू बडबड करतो. थोड्या वेळापूर्वी मला येऊन विचारत होता – माझ्या रिवॉल्वरनं कावळा मारता येईल का? फार अपमानकारक बोलत होता. शेवटी रिवॉल्वर घेऊन गेला. नेहमी प्यायलेला!

व्हरांड्यातून दोन पोलीस आणि क्वाच यांच्यासह सीन्त्सोव येतो. पालीना चापाच्या चष्म्यातून सीन्त्सोवकडे पाहते आणि निघून जाते. झखार गोंधळून चष्मा नीट करतो आणि मागे सरतो.

(जाता जाता दूषणास्पद स्वरात.) श्रीमान सीन्त्सोव ... किती दु:खदायक हे सगळं! मला तुमच्याबद्दल फार वाईट वाटतं... फार!

सीन्त्सोव (स्मित करत) : काळजी करू नका... तेवढ्या लायकीचा नाही मी!

झखार : लायकी आहे तेवढी तुमची! माणसांनी एकमेकांबद्दल सहानुभूती बाळगली पाहिजे. ज्या माणसावर मी विश्वास ठेवला, त्यानं मला दगा दिला असला तरीही! त्याचं दुर्भाग्य पाहिल्यावर त्याला सहानुभूती दाखवणं मी माझं कर्तव्य समजतो! अच्छा, श्रीमान सीन्त्सोव!

सीन्त्सोव : भेटू परत!

झखार : तुमच्या माझ्याबद्दल काही तक्रारी आहेत?

सीन्त्सोव : अगदी एकही तक्रार नाही!

झखार (शरमून) : छान! अच्छा! तुमचा पगार तुमच्याकडं पाठवण्यात येईल. (जात.) हे असह्य आहे! माझं घर पोलीस-कचेरी बनलंय!

सीन्त्सोव किंचित हसतो. क्वाच त्याला न्याहाळतो – विशेषतः त्याचे हात. हे लक्षात येताच सीन्त्सोवसुद्धा क्वाचच्या डोळयांकडे काही सेकंद टक लावून पाहतो.

अचानक क्वाच हसतो.

सीन्त्सोव: काय? हसायला काय झालं?

क्वाच (मजेने): काही नाही... काही नाही!

बाबोयेदोव (प्रवेश करत): श्रीमान सीन्त्सोव, आता तुमची शहरात रवानगी करतो आहोत.

क्वाच (आनंदाने): साहेब, हे श्रीमान सीन्त्सोव नाहीत. दुसरेच आहेत!

बाबोयेदोव: काय? स्पष्ट बोल!

क्वाच: मी ह्यांना ओळखतो! ब्यान्स्कच्या कारखान्यात हे काम करत होते आणि तिथं यांचं नांव होतं माक्सिम मार्कोव! तिथं ह्यांना आम्ही अटक केली होती, दोन वर्षांपूर्वी! डाव्या हाताच्या अंगठ्यावर नख नाही त्यांच्या! मला माहीत आहे. जर खोटया नांवानं राहतात, तर तुरुंगातून फरारी झाले असावेत!

बाबोयेदोव (आनंदमिश्रित आश्चर्याने): हे खरं आहे, श्रीयुत सीन्त्सोव?

क्वाच: संपूर्ण खरं आहे, साहेब!

बाबोयेदोव: अस्सं! म्हणजे तुम्ही सीन्त्सोव नाही! च् च्!

सीन्त्सोव: मी कुणीही असलो तरी तुम्ही माझ्याशी नीट वागलं पाहिजे... विसरू नका!

बाबोयेदोव: ओहो! तुमच्याशी थट्टा-मस्करी करून

40--178

चालणार नाही हे पटकन समजतं! क्वाच, तू खुद्द घेऊन जा ह्याला! डोळे नीट उघडे ठेव!

क्वाच: होय साहेब!

बाबोयेदोव (आनंदाने): तर श्रीयुत सीन्त्सोव, अथवा जे कुणी आहात, तुम्ही शहरात जात आहात. क्वाच, तुला ह्याच्याबद्दल जे काही ठाऊक आहे ते सगळं ताबडतोब वरिष्ठांना सांग आणि आत्ताच्या आत्ता ह्याची पोलीस-फाईल पहा. नको, मी स्वतःच पाहतो! थांब, क्वाच... (वेगाने जातो.)

क्वाच (प्रेमळ सुरात): तर परत भेट झाली आपली!

सीन्त्सोव (किंचित हसून): तुम्हाला आनंद झाला?

क्वाच: म्हणजे काय? जुनी ओळख आपली!

सीन्त्सोव (तिटकाऱ्याने): असलं काम एव्हाना सोडून द्यायला पाहिजे तुम्ही! केस पांढरे झालेत आणि कुत्र्याप्रमाणं हुंगत माणसं शोधता! शरम नाही वाटत?

क्वाच (प्रेमळपणे): मला सवय झालीय! तेवीस वर्षं चाकरी करतोय! आणि कुत्र्यासारखी मुळीच नव्हे! वरिष्ठांची माझ्यावर मर्जी आहे. पदक द्यायचं कबूल केलंय! आता नक्की देतील!

सीन्त्सोव: माझ्यामुळं?

क्वाच: होय, तुमच्यासाठी! कुठून फरारी झालात?

सीन्त्सोव: नंतर समजेल.

क्वाच: नक्की समजेल! आठवतं... तिथं ब्यान्स्क-मध्ये काळ्या केसांचा चष्मेवाला होता – सावित्स्की

मास्तर ? त्यालासुद्धा अलिकडंच परत अटक झाली. पण तो मेला तुरुंगात. फार आजारी होता! तुमच्यासारखे फार थोडे उरलेत!

सीन्त्सोव : खूप होतील... जरा थांबा!

क्वाच : आँ ? हे छान! राजकीय कैदी जेवढे जास्त– तेवढं आम्हाला जास्त चांगलं!

सीन्त्सोव : सारखी पदकं मिळतात?

बाबोयेदोव, जनरल, लेफ्टनंट, क्लेओपात्रा आणि निकोलाय दारांमधून प्रवेश करतात.

निकोलाय (सीन्त्सोवकडे नजर टाकत) : मला हे अपेक्षितच होतं! (नाहीसा होतो.)

जनरल : वा रे पठ्ठे!

क्लेओपात्रा : हे सगळं कुठून आलं... आता समजलं!

सीन्त्सोव (उपहासाने) : कप्तानसाहेब, तुम्ही फार वेड्यासारखा हा मामला चालवलाय असं वाटत नाही ?

बाबोयेदोव : मला शिकवू नको!

सीन्त्सोव (चिकाटीने) : नाही, मी शिकवणारच! हा मूर्ख फार्स बंद करा!

जनरल : ओहो... काय पण ऐट!

बाबोयेदोव (ओरडतो) : क्वाच, घेऊन जा ह्याला!

क्वाच : होय साहेब! (सीन्त्सोवला घेऊन जातो.)

जनरल : हा अगदी हिंस्र पशू असावा ! केवढ्या डरकाळ्या फोडतोय !

क्लेओपात्रा : सगळ्याला तोच मूळ कारणीभूत आहे अशी माझी पक्की खात्री आहे.

बाबोयेदोव : शक्य आहे... फार शक्य आहे !

लेफ्टनंट : त्याच्यावर खटला भरतील ना ?

बाबोयेदोव (किंचित हसून) : आम्ही त्यांचा खटल्या-शिवाय फन्ना उडवू... जास्त गोडी येते !

जनरल : फार हुषारीचं ! एक घाव – दोन तुकडे !

बाबोयेदोव : हो हो ! जनरलसाहेब, आता आम्ही झटपट काम उरकून टाकू आणि ह्या कटकटीतून तुम्हाला मोकळं करू ! निकोलाय वासिल्येविच, तुम्ही कुठं आहात ?

सगळे दारांमधून जातात. व्हरांड्यातून पोलीस-प्रमुख येतो.

पोलीस-प्रमुख (कोनला) : इथं उलटतपासणी होणार ?

कोन (खिन्नपणे) : मला माहीत नाही. काहीही माहीत नाही !

पोलीस-प्रमुख : टेबल, कागदपत्र... म्हणजे इथंच ! (व्हरांड्यात उद्देशून बोलतो.) सगळ्यांना इकडं आणा ! (कोनला.) मयतानं चूक केली – म्हणाला होता लाल केसवाल्यानं त्याच्यावर गोळी झाडली, पण इथं तर काळे केसवाला आहे !

कोन (पुटपुटतो) : जिवंतसुद्धा चुका करतात !

व्हरांड्यातून परत अटक झालेल्यांना आणतात.

पोलीस-प्रमुख: सगळ्यांना इथं जवळ उभं कर! म्हाताऱ्या, रांगेच्या टोकाला उभा रहा! शरम नाही वाटत? थेरडा सैतान!

ग्रेकोव: उगीच शिव्या का घालताय?

लेवशिन: अरे काही बिघडत नाही आल्योशा! बोलूं दे त्याला!

पोलीस-प्रमुख (धमकावत): तुला मी चांगलंच ऐकवतो!

लेवशिन: असूं दे! माणसांचा अपमान करणं हे कामच आहे त्यांचं!

निकोलाय आणि बाबोयेदोव प्रवेश करतात. टेबलापाशी बसतात. जनरल कोपऱ्यातील आरामखुर्चीत व लेफ्टनंट त्याच्या मागे. दारात – क्लेओपात्रा आणि पालीना. त्यांच्या पाठीमागे तात्याना आणि नाद्या. त्यांच्या खांद्यांवरून झखार नाराज मुद्रेने पाहतोय. कुठल्यातरी कोपऱ्यातून सावधपणे पालोगी येतो, टेबलापाशी बसलेल्यांना झुकून अभिवादन करतो आणि खोलीच्या मध्यभागी गोंधळून उभा राहतो. जनरल बोटाने खूण करून त्याला जवळ बोलावतो. तो चवड्यावर चालत जातो आणि जनरलशेजारी उभा राहतो. ऱ्याबत्सोवला आत आणतात.

निकोलाय: सुरवात करू या. पावेल ऱ्याबत्सोव!

ऱ्याबत्सोव: काय?

बाबोयेदोव: काय नव्हे मूर्खा! "जी, हुजूर!"

निकोलाय : तर तुम्ही आग्रह धरताय की, तुम्ही डायरेक्टरचा खून केला ?

त्याबत्सोव (नाराजीने) : मी आधीच सांगितलंय ! काय पुन्हा पुन्हा ?

निकोलाय : अलेक्सेइ ग्रेकोवना तुम्ही ओळखता ?

त्याबत्सोव : कोण हा ?

निकोलाय : तुमच्याजवळ उभा आहे त्याला !

त्याबत्सोव : तो आमच्याबरोबर काम करतो.

निकोलाय : म्हणजे तो तुमच्या ओळखीचा आहे ?

त्याबत्सोव : आम्ही सगळे एकमेकांच्या ओळखीचे आहोत.

निकोलाय : अर्थात. पण तुम्ही त्याच्या घरी जात होतात, त्याच्याबरोबर फिरत होतात ? थोडक्यात, तुम्ही त्याला चांगलं जवळून ओळखता ? तुम्ही – मित्र आहात ?

त्याबत्सोव : मी सगळ्यांबरोबर भटकतो. आम्ही सगळे मित्र आहोत.

निकोलाय : असं ? मला वाटतं – तुम्ही खोटं बोलता आहात ! श्रीयुत पालोगी, आम्हाला सांगा ... त्याबत्सोव आणि ग्रेकोव यांचे संबंध कसे आहेत ?

पालोगी : घट्ट मैत्री आहे त्यांची ! इथं दोन गट आहेत. तरुणांचा म्होरक्या ग्रेकोव आहे. त्याच्यापेक्षा फार ज्येष्ठ असलेल्या माणसांबरोबर हा तरुण फार उर्मट वागतो. वयस्क लोकांचा म्होरक्या येफीम लेवशिन आहे : ह्या माणूस बोलण्यात चतुर आणि वागण्यात लबाड आहे.

नाद्या (हळूच) : हलकट मेला !

पालोगी वळून तिच्याकडे पाहतो आणि मग निकोलाय-कडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहतो. निकोलायसुद्धा नाद्याकडे कटाक्ष टाकतो.

निकोलाय : पुढं बोला !

पालोगी (निःश्वास टाकत) : त्यांचा दुवा श्रीमान सीन्त्सोवनी जोडलाय. त्यांचे सगळ्यांशी चांगले संबंध आहेत. ही व्यक्ती इतर सर्वसामान्यांसारखी नाही. हा माणूस सर्व प्रकारची पुस्तकं वाचतो आणि प्रत्येक बाबतीत त्याचे स्वतःचे स्वतंत्र विचार आहेत. त्यांचं घर... माझ्याच घराच्या समोर आहे ...तीन खोल्यांचं आहे.

निकोलाय : निरर्थक तपशील सांगायची गरज नाही.

पालोगी : माफ करा... सत्य सांगताना पूर्णत्वानं सांगावं लागतं ! सर्व प्रकारची माणसं त्यांच्या भेटीला येतात – त्यातली काही इथं हजर आहेत... ग्रेकोव...

निकोलाय : ग्रेकोव, हे खरं आहे ?

ग्रेकोव (शांतपणे) : कृपा करून मला प्रश्न विचारू नका. मी उत्तरं देणार नाही.

निकोलाय : फार वाईट !

नाद्या (मोठ्याने) : फार छान !

क्लेओपात्रा : याचा अर्थ काय ?

झखार : नाद्या, पोरी...

बाबोयेदोव : श्शू ः !

व्हरांड्यात गोंधळ.

निकोलाय : इथं परक्या माणसांचं काय काम ?

जनरल : हं ... कोण इथं परकं ?

बाबोयेदोव : क्वाच, गोंधळ कसला ?

क्वाच : एक माणूस दाराशी ओरडतोय, साहेब ! आत घुसायला बघतोय आणि शिवीगाळ करतोय !

निकोलाय : त्याला काय पाहिजे ? कोण तो ?

बाबोयेदोव : विचार !

पालोगी : पुढं सांगू का थांबू ?

नाद्या : नालायक !

निकोलाय : थांबा. परक्या माणसांनी इथून निघून जावं !

जनरल : म्हणजे याचा अर्थ काय ?

नाद्या (जोराने ओरडते) : इथं तुम्ही परके आहात ! तुम्ही – मी नव्हे ! तुम्ही सगळीकडंच परके ! मी इथं माझ्या घरात आहे ! तुम्हाला इथून चालते व्हा सांगण्याचा मला हक्क आहे !

झखार (संतापून नाद्याला) : चालती हो ! ताबडतोब ... जा !

नाद्या : असं ? ठीक आहे ! म्हणजे ... मी ... खरंच मी इथं परकी आहे ! तर मी जात्ये, पण तुम्हाला सांगत्ये ...

पालीना : आवरा तिला ! नाही तर काहीतरी भलतं बोलून बसेल !

निकोलाय (बाबोयेदोवला) : पोलीसांना दारं बंद करून घ्यायला सांगा !

नाद्या : तुम्ही सगळी बेशरम माणसं आहात !

तुम्हाला अंत:करण नाही! कविलवाणी आणि अभागी!

क्वाच (आनंदाने प्रवेश करत) : साहेब! आणखी एक कबुलीजबाब द्यायला येतोय!

बाबोयेदोव : काय?

क्वाच : आणखी एक खुनी आला!

टेबलापाशी सावकाशपणे आकीमोव येतो. लाल केस आणि मोठ्या मिशा.

निकोलाय (नकळत उठत) : काय पाहिजे तुम्हाला?

आकीमोव : डायरेक्टरचा खून मी केला!

निकोलाय : तुम्ही?

आकीमोव : मी.

क्लेओपात्रा (हळूच) : हलकटा! शरम वाटत नाही?

पालीना : देवा रे! काय भयंकर माणसं!

तात्याना (शांतपणे) : ही माणसं शेवटी जिंकणार!

आकीमोव (उदासपणे) : मी हजर झालोय! मी खुनी आहे!

सगळेच अवघडतात. निकोलाय घाईघाईने बाबोयेदोवला अस्पष्ट आवाजात सांगतो. बाबोयेदोवच्या गोंधळलेल्या चेहऱ्यावर स्मित उमटते. अटक झालेले गप्प आणि नि:स्तब्ध राहतात. नाद्या दारात उभी राहून आकीमोव-कडे पहात रडू लागते. पालीना आणि झखार एकमे-कांशी कुजबुजतात. तात्यानाचा शांत आवाज नि:स्तब्धतेत स्पष्ट ऐकू येतो.

तात्याना (नाद्याला) : रडू नकोस, ही माणसं जिंकतील !

लेवशिन : छी : आकीमोव, निष्कारण तू ...

बाबोयेदोव : चूप !

नाद्या (आकीमोवला) : का केलंत तुम्ही असं ? का ?

लेवशिन : ओरडू नकोस सायबा ! मी तुझ्यापेक्षा वयानं वडील आहे .

आकीमोव (नाद्याला) : तुम्हाला इथलं काही समजत नाही . गेलात तर बरं होईल !

क्लेओपात्रा : हा डांबीस म्हातारा केवढा संताचा आव आणत होता !

बाबोयेदोव : क्वाच !

लेवशिन : अरे आकीमोव, वाट कसली बघतोस ? बोल ! सांग की त्यानं तुझ्या छातीवर पिस्तूल टेकवलं होतं, तेव्हा तू ...

बाबोयेदोव (निकोलायला) : त्याला काय शिकवतोय ते ऐकलंत ? अरे थेरडचा खोटारडचा !

लेवशिन : नाही, मी खोटारडा नाही !

निकोलाय : तर, तुमचं आता काय म्हणणं आहे ऱ्याबत्सोव ?

ऱ्याबत्सोव : काही नाही .

लेवशिन : चूप रहा ! तू चूप रहा ! ते धूर्त आहेत . ते शब्दात आपल्यापेक्षा जास्त सामर्थ्यवान आहेत .

निकोलाय (बाबोयेदोवला) : फेकून द्या बाहेर त्याला !

लेवशिन : शक्य नाही ! तुम्ही आम्हाला बाहेर फेकून

देऊ शकणार नाही! तुमचा दांडगेपणा बस्स झाला! अंधेरनगरीत फार काळ राहिलो आम्ही! आता आम्ही आग पेटवलीय – ती विझवता येणार नाही! कुठल्याही धमकावण्यांनी ती विझणार नाही! तुम्ही विझवू शकणार नाही!

पडदा

१९०६

माननीय वाचक !

प्रस्तुत पुस्तकाबाबतची आपली मते आणि सूचना जाणून घेण्यास आम्हाला आनंद वाटेल.

रशियन आणि सोविएत साहित्याचे तुमच्या मातृभाषेतील अनुवाद आमच्या लोकांच्या संस्कृतीची व जीवनाची सखोल ओळख करून घेण्यास आपल्याला मदत करतील अशी आशा आहे. आमचा पत्ता: 'रादुगा' प्रकाशन, १७ झूबोवस्की बुलवार, मॉस्को, ११०२१, सोविएत संघ.

१९८६ साली ‘ रादुगा ’ प्रकाशनमध्ये पुढील पुस्तके प्रकाशित करण्यात येत आहेत :

गोर्की मा. ‘आई’. कादंबरी – नवीन आवृत्ती.

जागतिक साहित्याच्या संपूर्ण इतिहासात एकाही ललित-कृतीला ह्या पुस्तकाएवढी वाचकांची एवढी प्रचंड मंख्या लाभली नाही आणि लोकांच्या जीवनात ह्या पुस्तकाएवढी वाचकांची एवढी प्रचंड संख्या लाभली नाही आणि लोकांच्या जीवनात ह्या पुस्तकाएवढे दुसऱ्या कोणत्याही पुस्तकाने जबरदस्त परिणाम घडवून आणले नाहीत. जगातील १२७ भाषांमधून ह्या पुस्तकाच्या दशलक्षावधी प्रती प्रसिद्ध झाल्या आहेत. १९०५ साली ह्या पुस्तकाला हस्तलिखिताच्या स्वरूपातच लेनिननी वाचले होते तेव्हा ते ‘आई’ कादंबरीविषयी म्हणाले होते : “हे पुस्तक आवश्यक आहे. अनेक कामगारांनी क्रांतिचळवळीत अजाणता, उत्स्फूर्तपणे भाग घेतला होता, पण आता ते ‘आई’ वाचतील तेव्हा त्यांचा फार मोठा लाभ होईल...” कादंबरी वास्तव ऐतिहासिक घटनांवर आधारलेली आहे. पुस्तकातील व्यक्तिरेखा – पावेल व्लासोव आणि नीलोवना – गोर्कीच्या चांगल्या परिचयाच्या असलेल्या कामगार प्योत्र झालोमोव आणि त्यांची आई आन्ना किरील्लोवना यांच्यावर आधारलेल्या आहेत.